# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–३ : अर्थशास्त्र**

**सत्र–५ पेपर ९ Major**

# विकासाचे आणि वृद्धीचे अर्थशास्त्र–भाग १

(Economics of Development and Growth - I)

**सत्र–६ पेपर १२ Major**

# विकासाचे आणि वृद्धीचे अर्थशास्त्र–भाग २

(Economics of Development and Growth - II)

(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२६
बी. ए. ३ – विकासाचे आणि वृद्धीचे अर्थशास्त्र करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १२०**

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर – ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-68244-03-0

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (महाराष्ट्र)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ज्योती जाधव**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती व्ही. व्ही. मैंदरगी**
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
प्र. अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. व्ही. गुरव**
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. बी. साळी**
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## ■ अभ्यासमंडळ : अर्थशास्त्र ■

**अध्यक्ष – प्रा. डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. एम. एस. देशमुख**
  अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मनोहर आप्पासाहेब कोरे**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रकाश कृष्णा टोने**
  सावित्रिबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. सचिन आप्पासाहेब सरदेसाई**
  राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. प्रभाकर तानाजी माने**
  जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
  शिरोळ-वाडी रोड, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिल धोंडिराम सत्रे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. रमेश गणेशराव दंडगे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मोहन गोविंद सदामते**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड कॉलेज, कुंडल,
  जि. सांगली
- **श्री. मोहन नरहर पंडितराव**
  यशोदीप ८५, मंगेशकर नगर, सुभाष रोड,
  मंगळवारपेठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे. यावर्षी बी. ए. भाग ३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या नवीन बदललेल्या अभ्यासक्रमानुसार सत्र-५ आणि ६ साठी, पेपर क्रमांक ९ आणि १२ ''विकासाचे आणि वृद्धीचे अर्थशास्त्र'' हे पुस्तक लिहिले आहे. अर्थशास्त्र या विषयातील विविध अभ्यासू व अनुभवी लेखकांनी वेगवेगळे घटक या पुस्तकांमध्ये लिहिले आहेत. या पुस्तकातील विषयाच्या विविध संकल्पना, सिद्धांत व आर्थिक नियोजन यांची मांडणी सोप्या व दर्जेदार भाषेत करून हा विषय विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे. बहिःस्थ विद्यार्थ्यांना या विषयातील विविध संकल्पना, सिद्धांत व धोरणे समजण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके व आकृत्या काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकात बी. ए. भाग ३ (अर्थशास्त्र) या वर्गाच्या बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी असलेल्या ''विकास आणि वृद्धीचे अर्थशास्त्र'' सत्र ५ पेपर क्रमांक ९ आणि सत्र ६ पेपर क्रमांक १२ (Major) या बदललेल्या सुधारित अभ्यासक्रमाची एकूण ४ घटकामध्ये विभागणी करण्यात आली ओह. यामध्ये सत्र ५ साठी आर्थिक विकास व वृद्धीचा अर्थ, निर्देशक, कमी विकसित अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये, आर्थिक विकासातील अडथळे, शाश्वत विकास, मानव विकास, आर्थिक विकासात सरकारची आणि प्राथमिक, द्वितीय, तृतीय क्षेत्राची भूमिका इत्यादी बाबींची माहिती दिली आहे. सत्र ६ मध्ये आर्थिक विकासाच्या विविध सिद्धांतांची माहिती दिली आहे.

बहिःस्थ विद्यार्थ्यांना विषयाचे त्वरित व मुद्देसूद आकलन व्हावे यासाठी घटकांची मांडणी एका विशिष्ठ पद्धतीने म्हणजेच उद्दिष्टे, प्रास्ताविक, विषय विवेचन, सारांश, पारिभाषिक शब्द तसेच प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व त्यांची उत्तरे सरावासाठी दीर्घोत्तरी प्रश्न व टीपा दिलेल्या आहेत. पुस्तकाच्या शेवटी अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची नावे दिलेली आहेत. या पुस्तकाची मांडणी आणि विवेचन विद्यार्थ्यांना विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकाचा वापर करणाऱ्या सर्व विद्यार्थी व शिक्षक वर्गाला आमची नम्र विनंती अशी की त्यांनी त्यांच्या सूचना प्रकाशक वा संपादकांकडे जरूर पाठवाव्यात. पुढील आवृत्ती अधिक बिनचूक, अद्ययावत व उपयुक्त करण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

या पुस्तकाचे प्रकाशन करण्याच्या कामी मदत केलेल्या शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातील सर्व कर्मचारी व प्रशासकीय अधिकारी यांना मनःपूर्वक धन्यवाद. या पुस्तकाच्या सर्व घटक लेखकांनी आपले घटक वेळेत पूर्ण केल्याबद्दल संपादक या नात्याने कृतज्ञ आहोत.

**■ संपादक ■**

**डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**

प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,

प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड-मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर ९ आणि पेपर १२ (मेजर)**
**विकास आणि वृद्धीचे अर्थशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. चंद्रकांत जाधव**<br>यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर<br>ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. प्रसाद दावणे**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ | २ |
| **प्रा. डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**<br>प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड–मलकापूर,<br>ता.. शाहूवाडी, जि. कोल्हापूर | २ | १ |

**■ संपादक ■**

**डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड–मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **पेपर–९ : सेमिस्टर–५** | |
| १. | आर्थिक विकास व वृद्धी – भाग १ | १ |
| २. | आर्थिक विकास व वृद्धी – भाग १ | ३१ |
| | **पेपर–१२ : सेमिस्टर–६** | |
| १. | आर्थिक विकासाचे सिद्धांत – भाग १ | १४७ |
| २. | आर्थिक विकासाचे सिद्धांत – भाग २ | २३३ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी (क्र. ८ व १३) एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२६-२७ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

# आर्थिक विकास आणि वृद्धी – भाग १

## (Economic Development and Growth - I)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

 १.२.१ आर्थिक विकासाचा अर्थ आणि विकासाचे निर्देशक

 १.२.२ अविकसित अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

 १.२.३ आर्थिक विकासातील अडथळे

 १.२.४ आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक

 १.२.५ शाश्वत विकास – मानव विकास

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ

१.५ स्वयं–अध्ययन प्रश्न

१.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ


### १.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

* आर्थिक विकासाची संकल्पना समजून घेता येईल.
* आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यांच्यातील फरक समजून येईल.

* आर्थिक विकासाचे निर्देशक यांची माहीती मिळेल.
* आर्थिक विकासातील अडथळे समजून येतील.
* शाश्वत आणि हरित विकास या संकल्पना जाणून घेता येतील.

## १.१ प्रास्ताविक (Indroduction) :

अर्थशास्त्रामध्ये आर्थिक विकास या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. विकसित देश, विकसनशील देश आणि मागासलेले देश या सर्वांच्या दृष्टीकोनातून आर्थिक विकासाच्या संकल्पनेला महत्त्व दिले जाते. विशेषत: विसाव्या शतकात म्हणजेच दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील सर्व राष्ट्रांत आर्थिक विकासाची प्रेरणा वेगाने पसरली गेली. काही देशांना युद्धोत्तर पुनर्रचना करण्याचा प्रश्न होता, तर काही देशांना परकीय राजवटीमधून मुक्त झाल्यामुळे आर्थिक मागासलेपणा दूर करण्याचे प्रश्न होते. अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांच्या आर्थिक समस्या (प्रश्नांची) सोडवणूक करण्यासाठी नवीन अर्थशास्त्रीय तात्विक चौकटीची आवश्यकता होती. त्यामधुनच विकासाचे अर्थशास्त्र ह्या अर्थशास्त्राच्या शाखेचा विकास झाला. मागासलेल्या किंवा अविकसित देशांमधील आर्थिक विकासाच्या समस्यांचे स्वरूप आणि जटिलता भिन्न होती त्यांची सोडवणूक करण्यासाठी विकासाचे अर्थशास्त्र या अर्थशास्त्राच्या ज्ञानशाखेची निर्मिती झाली. तसेच दुसऱ्या बाजूला इंग्लंड मधील औद्योगिक क्रांती विकास प्रक्रिया सुरू झालेल्या आणि विसाव्या शतकात विकसनशील देशांच्या तुलनेत बरेच पुढे गेलेले विकसित देश यांच्या आर्थिक समस्या भिन्न होत्या. त्यांच्या विश्लेषणाचा विचार वृद्धीचे अर्थशास्त्र यात केला जाऊ लागला. आर्थिक विकासाच्या अर्थशास्त्रात आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यामध्ये अनेक अर्थतज्ञांनी फरक असल्याचे स्पष्ट केले. परंतू व्यवहारात आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी या दोन्ही संकल्पना एकाच अर्थाने वापरल्या जात आहेत. तथापि ह्या दोन्ही संकल्पनांमध्ये मूलत: फरक आहे. अर्थशास्त्रात आर्थिक विकास ही संज्ञा अधिक व्यापकपणे वापरली जात आहे. एखाद्या देशाचा आर्थिक विकास कसा होतो आहे किंवा किती झाला हे मोजण्यासाठी आर्थिक विकासाचे निर्देशक घटक अभ्यासणे आवश्यक ठरते. आर्थिक विकासाची प्रक्रिया कधीच संथ नसते तर विकासाच्या प्रक्रियेत अनेक अडथळे येत असतात. अलिकडच्या काळात आर्थिक विकास म्हणजे फक्त औद्योगिक विकास नसून विकासाच्या आधुनिक संकल्पनेनुसार आर्थिक विकासात मानवी विकास (Human Development) हा घटक महत्त्वाचा असतो. एकविसाव्या शतकात आर्थिक विकासात मानवी विकास (Human Development) अपेक्षित आहेच पण मानवी विकास हा शाश्वत किंवा चिरंतर विकास असावा. आर्थिक विकासात शाश्वत विकासाबरोबरच हरित विकासालाही अलिकडे अनन्य साधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणूनच सदरच्या घटकात आपण आर्थिक विकासाचा अर्थ, आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दी यांच्यातील फरक आर्थिक विकासातील अडथळे आणि शाश्वत व हरित विकास यांचा अभ्यास करणार आहोत.

### आर्थिक विकासाचा अर्थ (Meaning of Economic Development) :

विकासाच्या अर्थशास्त्रात आर्थिक विकास ही मध्यवर्ती संकल्पना आहे. कारण आर्थिक विकास ही सातत्याने व दिर्घकालीन प्रक्रियेत घडून येणारी घटना आहे. तसेच आर्थिक विकास ही संकल्पना अतिशय

व्यापक आणि गुंतागुंतीची आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत विविध पैलू असतात जसे की, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत सुधारणा, आरोग्य, शिक्षण, कामाची परिस्थिती, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय धोरणे, वस्तू आणि श्रमबाजाराची परिस्थिती या सारख्या समग्र आर्थिक सामाजिक घटकांचा अभ्यास विकासाच्या अर्थशास्त्रात केला जातो. अशा समग्र सामाजिक आणि आर्थिक घटकांमध्ये सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते.

आर्थिक विकासाच्या संकल्पनेत वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. म्हणजेच वास्तव राष्ट्रीय उत्पन्न ही आर्थिक विकासाची कसोटी मानली जाते. देशाचा आर्थिक विकास म्हणजे देशाचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वाढणे होय. म्हणून आर्थिक विकास म्हणजे देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकालावधीत वाढ होणे होय. थोडक्यात आर्थिक विकास म्हणजे ''दीर्घकालावधीत अर्थव्यवस्थेच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याच्या क्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात.'' यावरून असे लक्षात येते की, आर्थिक विकास ही दीर्घकाळात साध्य होणारी बाब आहे. तसेच आर्थिक विकास ही एक प्रक्रिया आहे. आर्थिक विकास किती झाला किंवा नाही हे पाहण्यासाठी देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास करावा लागेल.

काही अर्थशास्त्रीय विचारवंतांच्यामते आर्थिक विकास म्हणजे देशातील लोकांचे दारिद्र्य कमी करून राहणीमानात सुधारणा करणे होय. लोकांचे राहणीमान हे लोकांच्या वास्तव दरडोई उत्पन्नावर अवलंबून असते. त्यामुळे आर्थिक विकासाच्या संकल्पनेत वास्तव दरडोई उत्पन्नातही अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. देशाचा आर्थिक विकास होणे म्हणजेच देशातील लोकांच्या वास्तव दरडोई उत्पन्नामध्ये वाढ होणे अपेक्षित असते. त्यामुळे आर्थिक विकास म्हणजे, ''दीर्घकालावधीत देशाच्या वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ होण्याच्या प्रक्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात.'' थोडक्यात देशातील लोकांच्या वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ झाली तर देशाचा आर्थिक विकास घडून आला असे म्हणता येईल.

आर्थिक विकासाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्न (Real National Income) आणि वास्तव दरडोई उत्पन्न (Real Per Capita Income) या दोन कसोट्यांचा आपण विचार केला. जर एकूण वास्तव उत्पन्न आणि लोकसंख्या ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच प्रमाणात वाढल्या तर वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ होत नाही. म्हणून मायर, बाल्डवीन आणि कुझनेटस् ह्या सारख्या अर्थतज्ञांनी वास्तव दरडोई उत्पन्नापेक्षा एकूण वास्तव राष्ट्रीय उत्पन्न हीच आर्थिक विकास झाला आहे की नाही ते पाहण्याची अचूक व सर्वात चांगली कसोटी आहे असे म्हटले.

**आर्थिक विकासाच्या व्याख्या (Definitions of Economic Development) :**

आर्थिक विकासाच्या विविध व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

**१) प्रा. मायर आणि बाल्डविन यांची व्याख्या :** ''आर्थिक विकास ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यायोगे एखाद्या देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकालावधीत वाढ होणे, जर लोकसंख्या वाढीपेक्षा वास्तव राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ झाली तर देशाच्या दरडोई उत्पन्नातही वाढ होईल.''

("Economic Development is a process whereby the real national income of a country increases over a long period of time. If the increase in the real national income is more than the population increase then the per capita real income of the country will also increase." - Prof. Meier and Baldwin.)

**२) प्रो. विल्यमसन यांची व्याख्या :** ''आर्थिक विकास ही एक प्रक्रिया आहे. ज्यायोगे देशातील लोक उपलब्ध साधनांचा अशा प्रकारे वापर करतात की देशाचे दरडोई उत्पन्न वाढते.''

("Economic Development is a process whereby the people of a country utilize the available resources in such a way that per capita income of the country increases." - Prof. Williamson.)

**३) प्रो. हिगिन्स यांची व्याख्या :** ''आर्थिक विकास म्हणजे एखाद्या देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात वाढ होणे होय.

("Economic Development is the increase in per capita and national income of a country." - Prof. Higgins.)

**४) प्रो. आर्थर लेविस यांची व्याख्या :** ''आर्थिक विकास हा देशाच्या उत्पादनात दरडोई वाढीचे प्रतिनिधित्व करतो.''

("Economic Development represents the per capita increase in the producation of a country " - Prof. Arthur Lewis)

**५) प्रो. विन्स्टन यांची व्याख्या :** ''देशातील लोकसंख्या वाढीशी तुलना करता उपभोग आणि उत्पादन वाढणे म्हणजे आर्थिक विकास होय.''

("Economic Development shows the excess of consumption and production of a country as compared with increase in population." - Prof. Winston.)

**६) संयुक्त राष्ट्र संघाच्या तज्ज्ञ समितीची व्याख्या :** ''विकासाचा संबंध केवळ लोकांच्या भौतिक गरजांशी नसून तो त्यांच्या जीवनाच्या सामाजिक स्थितीच्या सुधारणेशी आहे. विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी नव्हे. परंतू वृद्धी आणि सामाजिक, सांस्कृतिक, संख्यात्मक तसेच आर्थिक बदल आणि वाढ होय.''

(" Development concern not only man's material needs but also the improvement in the social condition of his life, development is therefore, not only economic growth, but growth plus change social, cultural and institutional as well as economic." - United Nations Expert Committee.)

वरील विविध व्याख्यांमध्ये विविध अर्थतज्ज्ञांनी आर्थिक विकासाच्या विविध पैलूवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येकांच्या व्याख्या मध्ये काही बाबतीत साम्य आणि भेद दिसून येत आहे. परंतू आर्थिक विकास म्हणजे काय ते विविध पैलूंचा विचार करून विविध अर्थतज्ज्ञांनी विविध व्याख्यांच्या सहाय्याने स्पष्ट केले आहे.

**आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यांच्यातील फरक (Distinction between Economic Development and Economic Growth) :**

आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी ह्या दोन्ही संकल्पनामध्ये काही बाबतीत फरक असलेला दिसून येतो. मॅडिसन सारखे अर्थतज्ञ म्हणतात की, उत्पन्न पातळी वाढविण्याचे प्रयत्न विकसनशील देशात होत असल्यास त्याला आर्थिक विकास असे म्हणतात, तर हेच प्रयत्न विकसित अर्थव्यवस्थेत होत असल्यास ती आर्थिक वृद्धी असे समजण्यात येते. त्यामुळे आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी या संकल्पनांमध्ये विविध बाबतीत फरक असलेला आढळून येतो त्याचे तुलनात्मक विश्लेषण पुढीलप्रमाणे आपणास करता येईल.

| आर्थिक विकास | आर्थिक वृद्धी |
|---|---|
| १. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही आर्थिक विकासाची कसोटी मानली जाते. | १. एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही आर्थिक वृद्धीची कसोटी मानली जाते. |
| २. लोकसंख्येच्या वाढीपेक्षा वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात अधिक प्रमाणात वाढ झाली तरच आर्थिक विकास झाला असे मानले जाते. | २. लोकसंख्येच्या वाढीपेक्षा एकूण राष्ट्रीय उत्पन्नात जरी कमी प्रमाणात वाढ झाली तरी आर्थिक वृद्धी झाली असे मानले जाते. |
| ३. आर्थिक विकास ही दीर्घकाळात घडून येणारी क्रिया आहे. | ३. आर्थिक वृद्धी ही विशिष्ट काळात घडून येणारी क्रिया आहे. |
| ४. आर्थिक विकास ही संज्ञा विकसनशील देशांच्या संदर्भात वापरली जाते. | ४. आर्थिक वृद्धी ही संज्ञा विकसित देशांच्या संदर्भात वापरली जाते. |
| ५. आर्थिक विकास ही स्थिर अर्थव्यवस्थेत घडून येणारी घटना आहे. | ५. आर्थिक विकास ही गतिमान अर्थव्यवस्थेत घडून येणारी घटना आहे. |
| ६. आर्थिक विकास ही बाब जाणीवपूर्वक व जागृकतेने केलेल्या प्रयत्नांचे फळ असते. | ६. आर्थिक विकास ही नैसर्गिक क्रिया मानली जात असते. |
| ७. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेत स्वयंपूर्ण व तुटक किंवा खंडित स्वरूपाचे बदल होत असतात. | ७. आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेत संथगतिने बदल होत असतात. |
| ८. आर्थिक विकास ही संज्ञा सामाजिक आणि आर्थिक बाबींशी निगडीत असते. | ८. आर्थिक वृद्धी ही संज्ञा फक्त आर्थिक बाबींशी निगडीत असते. |
| ९. आर्थिक विकास म्हणजे गरिबी दूर करणे, बेकारी कमी करणे व लोकांच्या जीवनमानाचा स्तर(दर्जा) उंचावणे होय. | ९. आर्थिक वृद्धी म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे होय. |
| १०. आर्थिक विकास ही अर्थव्यवस्थेतील मोठी घटना मानली जाते. | १०. आर्थिक वृद्धी ही अर्थव्यवस्थेतील तुलनेने मोठी घटना नसते. |
| ११. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सरकारी हस्तक्षेपाची व मदतीची अत्यंत आवश्यकता असते. | ११. आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत सरकारी हस्तक्षेपाची व मदतीची जास्त आवश्यकता नसते. |
| १२. आर्थिक विकासात गुणात्मक बदल अभिप्रेत असतात. | १२. आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेत संख्यात्मक बदल अभिप्रेत असतात. |

**आर्थिक विकासाचे निर्देशक (Indicators of economic development) :**

देशाच्या आर्थिक विकासाची पातळी जाणून घेण्यासाठी आर्थिक विकासाचे भिन्न निर्देशक घटक वापरले जात असतात. अशा निर्देशक घटकांच्या सहाय्याने देशाचा विकास कसा होतो आहे किंवा नाही ते समजते. आर्थिक विकास निर्देशकांच्या सहाय्याने देशा-देशांची तुलना करता येते. स्वदेशाची भिन्न कालावधीमध्ये घडून आलेली आर्थिक विकासाची कल्पना येते. देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी योग्य प्रकारे नियोजन करता येते. म्हणून आर्थिक विकासाच्या निर्देशकांचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते. अशा आर्थिक विकासाच्या निर्देशकांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ (Increase in National Income) :**

राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीमध्ये वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. प्रो. मायर व बाल्डविन, सायमन कुझनेटस् यासारख्या विकासवादी अर्थशास्त्रज्ञांनी वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीला आर्थिक विकासाचा निर्देशक म्हणून मानले होते. त्यांच्या मते दीर्घकालावधीत एखाद्या अर्थव्यवस्थेच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याच्या क्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात. त्यामुळे वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा निर्देशक घटक आहे.

**२) दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढ (Increase in real Per Capita Income) :**

वास्तव दरडोई उत्पन्नातील वाढ हा दुसरा एक महत्त्वाचा आर्थिक विकास निर्देशक घटक आहे. देशाचा आर्थिक विकास होणे म्हणजे देशातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा होणे होय. देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा हा लोकांच्या दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढीवर अवलंबून असतो. देशातील लोकांच्या दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ झाली तर देशाचा आर्थिक विकास घडून आला असे म्हणता येते. दरडोई वास्तव उत्पन्न काढण्यासाठी एकूण वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाला लोकसंख्येने भागले जाते. थोडक्यात दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढ हा सुद्धा आर्थिक विकासाचा निर्देशक घटक आहे. दरडोई वास्तव उत्पन्न काढण्याचे सुत्र आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

सुत्ररूपाने

$$\text{दरडोई वास्तव उत्पन्न} = \frac{\text{वास्तव राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

**३. आर्थिक कल्याण (Economic Welfare) :**

आर्थिक कल्याण हा आर्थिक विकास मापनाचा महत्वाचा निर्देशांक आहे असे म्हणणे योग्य ठरते. कारण आर्थिक विकास किती आणि कसा झाला आहे हे तपासण्यासाठी लोकांच्या आर्थिक कल्याणातील

वाढ मोजावी लागेल. वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ झाल्यास लोकांच्या वस्तू आणि सेवांच्या खरेदीत, उपभोगात वाढ होते, त्या वेळी आर्थिक विकास घडून आला आहे असे म्हणावे लागेल. ओकुन आणि रिचर्डसन यांच्या मते आर्थिक विकास ही 'भौतिक कल्याणात एक शाश्वत आणि धर्मनिरपेक्ष सुधारणा आहे, ज्याचा आपण वस्तू आणि सेवांच्या वाढत्या प्रवाहातून प्रतिबिंबित होऊ शकते.'

**४. दरडोई उपभोगातील वाढ (Increase in per capita consumption) :**

देशातील लोकांकडून वस्तू आणि सेवांच्या वापरामधील वाढ दरडोई उपभोग यांच्या साहाय्याने मोजली जाते. जीवनावश्यक वस्तू यामध्ये अन्नधान्य, कपडे यांचा उपभोग वाढेल, तसेच शिक्षण, आरोग्याच्या सेवा सुविधांमध्येही वाढ झाली असेल, लोकांच्या जीवनावश्यक वस्तूबरोबरच चैनीच्या ही वस्तूंचा उपभोग वाढत असेल तर देशाचा उच्च आर्थिक विकास होत आहे हे दर्शविले जाते.

**५. औद्योगिक प्रगती (Industrial progress) :**

औद्योगिक प्रगती ही एखाद्या देशाच्या आर्थिक विकासाचे महत्वपूर्ण सूचक (निर्देशक) असते. देशातील उद्योगाची प्रगती वेगाने झाल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात वाढ होते. तसेच देशातील लोकांच्या दरडोई उत्पन्नातही वाढ होते. देशातील उद्योगांच्या प्रगतीमुळे त्या देशाचे स्थुल राष्ट्रीय उत्पादन आणि दरडोई उत्पन्न वाढत असेल तर त्या देशाचा आर्थिक विकास घडून आला आहे असे म्हणता येईल.

**६. भांडवल निर्मिती (Capital formation) :**

देशात औद्योगिक प्रगती झाल्यास राष्ट्रीय उत्पन्न वाढते. तसेच देशातील लोकांचे दरडोई उत्पन्नही वाढते. राष्ट्रीय उत्पन्न अणि दरडोई उत्पन्नातील वाढीमुळे लोकांच्या बचतीमध्ये वाढ होते. बचतीचे रूपांतर गुंतवणुकीत होणे म्हणजे भांडवल निर्मिती होय. देशातील लोकांच्या बचतीत वाढ झाल्यामुळे गुंतवणुकीमध्येही वाढ घडुन येते. गुंतवणुकीतील वाढीमुळे उत्पादन व उत्पन्न वाढून आर्थिक विकास अधिकच वेगाने होतो. त्यामुळे भांडवल निर्मितीचा वाढलेला वेग हा आर्थिक विकासाचा निर्देशक असतो.

**७. मानव विकास निर्देशांक (Human Development Index) :**

आर्थिक विकासाचे आर्थिक घटकांबरोबरच सामाजिक घटकांचाही विचार करुन मोजमाप करण्यासाठी मानव विकास निर्देशांक ही संकल्पना वापरली जाते. पाकिस्तानी अर्थशास्त्र मेहबूब उल हक आणि अमर्त्य सेन यांनी मानव विकास निर्देशांक विकसित केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रमाने सन १९९० पासून देशांचा विकास मोजण्यासाठी या संकल्पनेचा वापर केला आहे. या निर्देशांकात मानव विकासाशी निगडीत तीन परिमाणांचा विचार केला जातो. त्यामध्ये पहिला (अ) दिर्घ आणि निरोगी जीवन (Long and healthy life ) याचे मोजमाप अपेक्षित आयुमर्यादेच्या साहाय्याने केले जाते. दुसरा आ) ज्ञान (Knowledge) यामध्ये शिक्षणाची अपेक्षित वर्षे व शालेय शिक्षण वर्षे यांच्या साहाय्याने मापन केले जाते. तर तिसरा इ) जीवनमान (Standard of living) याचे मोजमाप वास्तविक दरडोई उत्पन्नातील बदल (जे क्रयशक्ती समतेच्या आधारावर डॉलरमध्ये ठरविले जाते) यांच्या साहाय्याने केले जाते. या तीनही घटकांचे स्वतंत्र निर्देशांक केले जातात.

त्यासाठी प्रत्येक घटकाचे किमान व कमाल मुल्य किती हे ठरविले जाते. सर्व घटकांचे निर्देशांक तयार केल्यानंतर तीनही घटकांच्या निर्देशांकाची सरासरी काढली जाते त्या मुल्यांलाच मानव विकास निर्देशांकाचे मुल्य असे म्हणतात. मानव विकास निर्देशांकाचे मुल्य नेहमी शून्य ते एक यांच्या दरम्यान असते.

**मानव विकासातील तीन परिमाणाच्या मोजमापासाठी सुत्र –**

$$\text{परिमाण निर्देशांक} = \frac{\text{घटकाचे प्रत्यक्ष मूल्य – किमान मूल्य}}{\text{महत्तम मूल्य – किमान मूल्य}}$$

मानव विकास निर्देशांकाच्या सहाय्याने आर्थिक विकास मापन अचूकपणे केले जात आहे. आर्थिक विकास मापनाच्या विविध निर्देशाकांपैकी मानव विकास निर्देशांक हा व्यापक व वास्तववादी आहे.

आर्थिक विकसाचे मोजमाप करण्यासाठी कोणताही एक निर्देशक वापरणे व्यावहारीक दृष्टया योग्य ठरणार नाही. देशाच्या भौगोलिक आर्थिक आणि सामाजिक घटकांचा विचार करुन वास्तववादी निर्देशकाच्या साहाय्याने आर्थिक विकास किती झाला हे सांगणे योग्य ठरेल.

### १.२.२ अविकसित अर्थव्यवस्थेची वैशिष्टे (Characteristics of Underdevelopment) :

अविकसित म्हणजे संपूर्ण विकास न झालेली किंवा विकसनशील म्हणजे विकासाच्या मार्गावर असणारी अर्थव्यवस्थेची अवस्था होय. बसू, के. (२०१३) यांच्या मते 'अविकसित' ही संज्ञा सापेक्ष संकल्पना आहे. अविकसितपणा मध्ये प्रामुख्याने विकासाचा अभाव दर्शविला जातो. आर्थिक विकास ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. खरंच विकासाच्या समान पातळीवर दोन देश शोधणे जगात कठीण आहे. जगातील विविध अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विश्लेषणाच्या सोयीसाठी विविध देशांच्या अर्थव्यवस्थांची मोठ्या प्रमाणावर दोन श्रेणींमध्ये विभागली. त्यामध्ये एक म्हणजे अविकसित किंवा विकसनशील अर्थव्यवस्था आणि दुसरी म्हणजे विकसित अर्थव्यवस्था होय.

अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये गरीबीचे प्रमाण लक्षणीय असते. शेतीसारखे प्राथमिक क्षेत्र अर्थव्यवस्थेच्या अग्रस्थानी असते. अर्थव्यवस्थेतील मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, मनुष्यबळ या स्वरूपातील संसाधनांचा विवेकपूर्ण वापर केला जात नाही. अर्थव्यवस्थेतील उत्पादन हे पारंपारिक पध्दतींवर अवलंबून राहिल्यामुळे उत्पादन दर व उत्पादकता कमी राहते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे श्रीमंत आणि गरीब यांच्यात लक्षणीय फरक असतो. गरीबीचे प्रमाण जास्त असलेले दिसून येते. तसेच अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये उच्च लोकसंख्या वाढीचा दर, मुबलक परंतु कमी वापरलेली नैसर्गिक संसाधने, भांडवल निर्मितीचा अल्प दर, अल्प दरडोई उत्पन्न, बेरोजगारीचा उच्च दर आणि मागासलेले राहणीमान अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये असलेले दिसून येते.

अविकसित अर्थव्यवस्थेचे आकलन होण्यासाठी विविध वैशिष्ट्यांचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. अविकसित अर्थव्यवस्थेचे किंवा देशांच्या मूलभूत चौदा वैशिष्ट्यांवर आपण प्रकाश टाकणार आहोत. ती पुढील प्रमाणे आहेत.

## १. उत्पन्नाची निम्न पातळी (Low Level of Income) :

उत्पन्नाची निम्न पातळी हे अविकसित देशांचे महत्वाचे वैशिष्ट्य असलेले दिसून येते. विकसित देशांच्या तुलनेत अविकसित देश उत्पन्नाच्या अत्यंत कमी पातळीवर कार्यरत असतात. विकसित देशांशी तुलना केली तर अविकसित देशांच्या समूहांचे दरडोई उत्पन्न सुध्दा अत्यंत कमी असते. शिवाय, उत्पन्नाच्या वितरणामध्ये असमानता म्हणजेच विषमता असलेली दिसून येते. अविकसित देश उत्पन्नाच्या निम्न स्तरावर कार्यरत असल्यामुळे अर्थव्यवस्थेची स्थिती मागासलेली असलेली असते.

## २. मोठ्या प्रमाणात गरिबी (Mass Poverty) :

दीर्घकालीन दारिद्र्याचे अस्तित्व हे अविकसित अर्थव्यवस्थांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. गरिबीची ही समस्या कोणत्याही तात्पुरत्या आर्थिक गैरव्यवस्थेमुळे उद्भवली नाही तर मुख्यत्वे उत्पादन आणि सामाजिक संस्थांच्या सनातनी पद्धतींच्या अस्तित्वामुळे उद्भवलली आहे. लोकसंख्येचा आकार वाढणे, उत्पन्नातील वाढती असमानता आणि किंमतीची पातळी वाढल्याने या अर्थव्यवस्थांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण हळूहळू वाढते. रॅग्नर नर्क्स (Ragnar Nurkse) यांच्या मते गरिबी किंवा दारिद्र्य हे दारिद्र्याचे कारण आणि अंतिम परिणाम ठरतो. त्यामुळे अविकसित देशामध्ये गरिबी किंवा दारिद्र्य यांचे प्रमाण जास्त दिसून येते.

जगातील जवळजवळ ७६.८ टक्के लोकसंख्या अविकसित किंवा विकसनशील देशांमध्ये रहात आहे. जी लोकसंख्या एकूण जागतिक पातळीवरील स्थूल जागतिक उत्पादनाच्या केवळ १५.६ टक्के इतकाच आनंद म्हणजेच लाभ घेत आहेत.

## ३. भांडवली निर्मितीचा अभाव (Lack of Capital Formation) :

जगातील विकसनशील किंवा अविकसित देश भांडवल निर्मितीच्या अल्प दरामुळे त्रस्त आहेत. या देशांमध्ये दरडोई उत्पन्नाची पातळी खूपच कमी असल्याने बचतीचा दर देखील खूपच कमी राहतो. यामुळे भांडवल निर्मितीचा अभाव निर्माण झाला आहे. परिणामी देशांमध्ये गुंतवणुकीच्या कमी दरासाठी पुन्हा भांडवल निर्मितीचा कमी दर जबाबदार आहे. भांडवल निर्मितीचा दर कमी म्हणून गुंतवणूक कमी परिणामी दरडोई उत्पन्न कमी त्यामुळे बचत कमी अंतिमत: पुन्हा भांडवल निर्मितीचा दर कमी राहतो.

उदाहरणार्थ, भारत आणि पाकिस्तान सारख्या देशांमध्ये गुंतवणुकीचा दर अगदी १० टक्क्यांपेक्षा कमी आहे, परंतु दुसरीकडे, गुंतवणुकीचा दर यू.एस.ए., कॅनडा इत्यादी विकसित देशांमध्ये मात्र १५ ते ३० टक्क्यांच्या दरम्यान आहे. भांडवल निर्मितीचा कमी दर हा जगातील अविकसित देशांच्या विकासाच्या मार्गातील एक प्रमुख अडथळा मनाला जातो.

## ४. प्रचंड लोकसंख्येचा दबाव (Heavy Population Pressure) :

अविकसित देशातील प्रचंड लोकसंख्येचा दबाव हे एक सर्वत्र दिसून येणारे वैशिष्ट्य आहे. अविकसित देशांवर वाढत्या लोकसंख्येचा प्रचंड दबाव आहे. या देशांतील लोकसंख्येचा नैसर्गिक वाढीचा दर खूप जास्त

आहे. कारण तिचा प्रचलित उच्च जन्मदर आणि घसरलेला मृत्यू दर होय. लोकसंख्येचा जास्त दबाव हा कमी दर्जाचे जीवनमान आणि जमिनीच्या धारण क्षेत्राच्या सरासरी आकारात घट होण्याची समस्या अशा विविध समस्या निर्माण करत आहे. अविकसित देशांमधील लोकसंख्येत दरवर्षी २ ते ३ टक्केनी वाढ होत आहे. ज्यामुळे विविध समस्या निर्माण झाल्या आहेत. जसे की शेतजमिनीचे विभाजन आणि तुकडीकरण, बेरोजगारीची, अन्न संकट, दारिद्र्य इ. अविकसित देशातील वाढती लोकसंख्या हि विविध समस्याचे मूळ कारण ठरते.

### ५. **कृषी मागासपणा (Agricultural Backwardness) :**

अविकसित देशात कृषीसारखे प्राथमिक क्षेत्र अर्थव्यवस्थेच्या अग्रस्थानी असते. त्यामुळे अविकसित देशामधील कृषी मागासलेपणामुळे त्रस्त आहेत. कृषी हे सर्वात महत्त्वाचे क्षेत्र असले तरी, या देशांमध्ये कृषी क्षेत्र पूर्णपणे अविकसित राहिले आहे. पण त्याहून विलक्षण गोष्ट म्हणजे हे देश या कृषी क्षेत्रावर जास्त अवलंबून आहेत. या देशांच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ ६० ते ७० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून असते. अविकसित देशांच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे ३० ते ४० टक्के हिस्सा कृषी उत्पादनातून निर्माण होत असतो. या देशांतील कृषी उत्पादकता आणि उत्पादन दर खूप महत्त्वाचा असूनही अजून त्यामध्ये अत्यंत मागासलेपणा राहिलेला आहे.

अविकसित देशांमध्ये शेतकरी अजूनही पारंपारिक पद्धतींचा अवलंब करत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान AË§ _` r@X à_rbUm dmab oOm/ Arho Aí`màH$ao A{dH${g V Xe_mÜ dH$r _mlg b nUm{Xg{Z `Um

### ६. **बेरोजगारीची समस्या (Unemployment Problem) :**

जास्त लोकसंख्येचा दबाव आणि पर्यायी व्यवसायाचा अभाव यामुळे अविकसित देशांमध्ये प्रचंड बेकारी आणि बेरोजगारीची समस्या निर्माण झाली आहे. अविकसित देशांच्या औद्योगिक आणि सेवा क्षेत्रामध्ये पर्यायी व्यवसायांच्या आणि रोजगारीच्या वाढीच्या अनुपस्थितीमुळे बेरोजगारीची समस्या अधिक तीव्र बनत आहे. लोकसंख्येच्या वाढीमुळे कृषी क्षेत्रात अतिरिक्त लोकसंख्या ढकलली जात आहे. त्याचा कृषी क्षेत्रावरील भार वाढत आहे. कृषी क्षेत्रावर अशा प्रकारच्या वाढत्या अवलंबनामुळे अविकसित अर्थव्यवस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी किंवा अल्प रोजगारी निर्माण होत आहे. शिवाय अशा अर्थव्यवस्थांमध्ये सुशिक्षित बेरोजगारीची समस्या देखील औद्योगिक विकासाअभावी दिवसेंदिवस हळूहळू वाढत निघाली आहे.

### ७. **मुबलक नैसर्गिक संसाधने (Abundant Natural Resources):**

अविकसित देशांमध्ये आर्थिक वाढीची वेगवान गती राखण्यासाठी, विविध प्रकारच्या नैसर्गिक संसाधनांचा पुरेशा प्रमाणात ताबा घेणे आणि त्याचा वापर करणे अत्यंत महत्वाचे आहे. परंतु अल्प विकसित देश एकतर कच्च्या मालाच्या कमतरतेने ग्रस्त आहेत किंवा स्वतःच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा गैरवापर करत आहेत.

जर आपण अविकसित देशांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची स्थिती पाहिली तर ती मुबलक प्रमाणात असलेली दिसून येते. काही अविकसित देशांकडे नैसर्गिक संसाधने जसे की, जमीन, पाणी, खनिज साठे, जंगल

संपत्ती इत्यादी पुरेशा प्रमाणात आहेत. परंतु ही संसाधने मोठ्या प्रमाणावर वापरली गेली नाहीत. मुबलक नैसर्गिक संसाधने योग्य प्रमाणात न वापरल्यामुळे अशा देशांना विविध अडचणी भेडसावत आहेत. या अडचणींमध्ये प्रदेशाची दुर्गमता, भांडवलाची कमतरता, मागासलेले तंत्रज्ञान, वाहतूक अडथळे आणि बाजाराची मर्यादा यांचा समावेश आहे. अशा प्रकारे अविकसित देश नैसर्गिक संसाधनांचा वापर करून, त्यांच्या स्वत: च्या किमान पुढाकाराने त्यांची अर्थव्यवस्था विकसित करू शकतात.

### ८. **तंत्रज्ञान आणि कौशल्यांची कमतरता (Shortage of Technology and Skills) :**

अविकसित देशामध्ये तंत्रज्ञान आणि कौशल्यांची कमतरता हे महत्वाचे वैशिष्ट्ये असलेले दिसून येते आहे. अविकसित देशांना कमी दर्जाचे तंत्रज्ञान आणि कुशल मनुष्यबळाची तीव्र कमतरता भेडसावत आहे. कमकुवत तंत्रज्ञान आणि कमी कौशल्ये हि अकार्यक्षम आणि अपुऱ्या उत्पादनासाठी जबाबदार ठरली आहेत. ज्यामुळे अर्थव्यवस्थेतील जनतेमध्ये गरिबी किंवा दारिद्र्य असलेले आपणास पहावयास मिळत आहे. मागास तंत्रज्ञानाच्या वापरामुळे अशा देशांमध्ये आर्थिक वाढीचा वेग अत्यंत मंद गतीचा आहे. तांत्रिक मागासलेपणामुळे मनुष्यबळामध्ये कौशल्यांची कमतरता असलेली दिसून येते. परंतु कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या देशांमध्ये अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पुरेशा भांडवलाची, तांत्रिक ज्ञानाची आणि प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.

### ९. **पायाभूत विकासाचा अभाव (Lack of Infrastructural Development) :**

पायाभूत विकासाचा अभाव हे अविकसित देशांचे सामान्य वैशिष्ट्य आहे. वाहतूक, दळणवळण, वीज निर्मिती आणि वितरण, बँकिंग सुविधा, शैक्षणिक सुविधा, आरोग्यविषयक सुविधा आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादी बाबतीत असे देश बहुतेक विकसित देशांच्या तुलनेत खूपच मागासलेले आहेत. अशाप्रकारे अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे, या देशांमध्ये आर्थिक विकासाची गती अत्यंत मंद आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्याप्रमाणात भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता असते. परंतु अविकसित देशामध्ये भांडवलाची कमतरता असते, तसेच तंत्रज्ञान आणि कौशल्यांची हि कमतरता असते. त्यामुळे पायाभूत सुविधांचा विकास करण्यात अविकसित देशांना अनेक अडचणी येत असतात.

### १०. **औद्योगिकीकरणाचा अभाव (Lack of Industrialization):**

अविकसित देश औद्योगिक विकासाच्या अभावामुळे सर्वत्र ओळखले जातात. भांडवल निर्मितीचा अभाव, यंत्रसामग्री आणि साधनांच्या पुरवठ्यातील कमतरता तसेच या देशांतील लोकांकडून पुढाकार आणि उपक्रमाच्या अभावामुळे या देशांमध्ये औद्योगिकीकरणाची गती अत्यंत मंद आहे.

औद्योगिक विकासाची प्रचंड क्षमता असूनही हे देश औद्योगिक क्षेत्राचा योग्य पायावर विकास करू शकले नाहीत. शिवाय या देशांनी साध्य केलेला कोणताही औद्योगिक विकास हा केवळ काही मर्यादित क्षेत्रांपुरताच मर्यादित राहिला आहे.

**११. योग्य बाजाराचा अभाव (Lack of Proper Market):**

अविकसित देश योग्यरित्या विकसित झालेल्या बाजाराच्या अभावामुळे त्रस्त आहेत. अशा देशांनी कितीही बाजारपेठ विकसित केली असली तरी, ते मर्यादांच्या समस्येने ग्रस्त आहेत. उदा. बाजार माहितीची कमतरता, विविधतेचा अभाव, स्पर्धेचा अभाव, पुरेशी मागणी नसणे किंवा मागणीनुसार पुरवठा नसणे इत्यादी.

**१२. मोठ्या प्रमाणात निरक्षरता (Mass Illiteracy):**

अविकसित देश मुख्यतः निरक्षरतेच्या अस्तित्वाद्वारे दर्शविले जातात. निरक्षरतेमुळे या देशांतील लोक खूपच अंधश्रद्धाळू, दैववादी आणि पुराणमतवादी असतात. जे या देशांतील लोकांच्या उद्योजकतेच्या आणि उपक्रमांच्या अभावासाठी पुन्हा जबाबदार असतात. एकूण लोकसंख्येच्या जवळपास ४० टक्के लोक निरक्षर असतात. निरक्षरते मध्ये महिलांचे प्रमाण सर्वाधिक असलेले दिसून येते. निरक्षरतेमुळे अविकसित देशात अनेक समस्या निर्माण झालेल्या असतात. अविकसितपणाचे हे एक महत्वाचे कारण आणि वैशिष्ट्य ठरले आहे.

**१३. गरीब (मागास) सामाजिक-आर्थिक स्थिती (Poor Socio-Economic Condition):**

अविकसित देश पूर्णपणे गरीब किंवा मागासलेल्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीमुळे ग्रस्त आहेत. या देशांतील आर्थिक विकासाच्या मार्गात विविध सामाजिक-आर्थिक घटकांद्वारे अडथळे आणले जात आहेत. संयुक्त कुटुंब व्यवस्था, सार्वत्रिक विवाह, दैववादीवृत्ती, महागड्या सामाजिक चालीरीती - रीतिरिवाज आणि वारसा हक्क कायदा इत्यादीमुळे अविकसित देशातील लोकांची सामाजिक - आर्थिक स्थिती गरीब किंवा मागासलेलीच राहते.

**१४. अकार्यक्षम प्रशासकीय व्यवस्था (Inefficient Administrative Set Up) :**

अविकसित देश त्याच्या विद्यमान अकार्यक्षम प्रशासकीय व्यवस्थेमुळे त्रस्त आहेत. अकार्यक्षमतेमुळे भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढलेला पहावयास मिळतो. कार्यक्षम आणि सुयोग्य प्रशासकीय व्यवस्थेच्या अनुपस्थितीमुळे अशा देशांना सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करता येत नाही. अकार्यक्षम प्रशासकीय व्यवस्थेमुळे राजकोषीय धोरणाची आणि मौद्रिक धोरणाची सुध्दा प्रभावीपणे अंमलबजावणी करता येत नाही. भांडवल उभारणी आणि गुंतवणुकीच्याबाबतीत योग्य निर्णय घेता येत नाहीत. ज्यामुळे अर्थव्यवस्थेत संपूर्ण गैरव्यवहार सुरु होतो.

## १.२.३ आर्थिक विकासातील अडथळे (Obstacles to Economic Development) :

ज्या प्रमाणे सर्व राष्ट्रांसाठी सर्वमान्य आर्थिक विकासाचे निर्देशक सांगणे कठीण आहे तशाच पद्धतीने आर्थिक विकासाच्या मार्गातील सामान्य अडथळे दाखविणे सुद्धा कठीण आहे. प्रत्येक देशातील भौगोलिक, राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत भिन्नता असल्यामुळे आर्थिक विकासातील अडथळयांचे स्वरुप सुद्धा भिन्न भिन्न आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा अवलंब केला. लोकांना परकिय राजवटीच्या काळात लोकशाहीचे प्रशिक्षण मिळाले नसल्यामुळे

सुरवातीला विकासात सामाजिक अडथळे निर्माण झाले. काही अविकसित किंवा विकसनशील देशांपुढे वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येची समस्या निर्माण झाली. वाढणारी लोकसंख्या त्या देशांच्या आर्थिक विकासाचे लाभ खाऊन टाकत होती. एकंदरीत सर्व देशांसाठी सामान्य असे अडथळे दाखविणे कठिण आहे. तथापि त्यापैकी काही प्रमुख आर्थिक विकासाच्या मार्गातील अडथळ्यांची आपण पुढे चर्चा करणार आहोत.

**१. परकीय राजवटीचा परिणाम :**

जगातील अनेक देश दीर्घकाळ परकीय राजवटीच्या वर्चस्वाखाली होते. परकिय राजवटींनी अशा देशांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणात शोषण केले आहे. म्हणजे परकिय सत्ता वसाहतीमधुन स्वस्त दराने कच्चा माल घेवून जात असते तर तयार पक्कामाल आणुन वसाहतीमध्ये जास्त किंमतीला विकत असते. परकीय राजवटींनी लघुद्योग नष्ट केले. शेती क्षेत्रात जमीनदारी वर्गाची निर्मिती केली. वसाहतीमधील लोकांची स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची शक्ती कारकुनी शिक्षण देऊन नष्ट केली. नैसर्गिक साधनसंपत्तीचा साठा मोठ्या प्रमाणात लुटुन नेला. लोकसंख्या वाढीला चालना दिली. त्यामुळे अशा देशांच्या आर्थिक विकासाच्या मार्गात लवकर दूर न होणारे आणि दुरगामी अडथळे निर्माण झाले.

**२. दारिद्र्याचे दृष्टचक्र :**

अविकसित देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये विविध आर्थिक घटकांचा चक्रीय संबंध (Circular Relationship) असलेला दिसून येतो. विशेषत: अनेक घटकांपैकी कोणता तरी एक घटक मुळ कारण असतो तर इतर एखादा घटक त्यांचा परिणाम असतो दुसऱ्याचा परिणाम पुन्हा पुढील घटकावर होतो. शेवटी अखेरच्या घटकाचा पुन्हा पहिल्या घटकावर परिणाम होऊन ही क्रिया अधिक तीव्र होते, यालाच दृष्टचक्र (Vicious Circle) असे म्हणतात.

रॅग्नर नर्क्स यांनी दारिद्र्याचे दुष्टचक्र स्पष्ट करताना त्यांनी पुढील उदाहरण दिले. समजा गरीब मनुष्याला खाण्यासाठी पुरेसे अन्न मिळत नाही त्यामुळे त्याची शारिरिक प्रकृती नित्कृष्ट राहते. परिणामी त्यांची कार्यक्षमता सुध्दा कमी होते. कमी कार्यक्षमतेमुळे व्यक्ती जास्त किंवा पुरेसे उत्पन्न मिळवु शकत नाही. परिणामी तो पुन्हा गरीबच राहतो. म्हणजेच गरीब मनुष्याची गरीबीही गरीबीचे कारण आणि अंतिम परिणाम ठरते. जसे व्यक्तीच्या बाबतीत घडते तसेच देशाच्या बाबतीत सुध्दा घडते. एखाद्या देशातील चक्रीय आणि संचयी प्रक्रियेमुळे तो देश सुध्दा गरीब राहतो. म्हणुन देश गरीब आहे कारण तो गरीब आहे. (A Country is poor because it is poor) असे म्हटले जाते. रॅग्नर नर्क्स यांच्या मते विकसनशील देशात भांडवल निर्मितीच्या बाबतीत दोन्ही बाजूंनी दृष्टचक्र कार्यान्वित झालेले दिसुन येते.

**मागणीची बाजू –**



**पुरवठ्याची बाजू –**

कमी वास्तव उत्पन्न → कमी बचत → कमी गुंतवणूक
↑ ↓
कमी रोजगार ← कमी उत्पादन ← कमी भांडवल निर्मिती

वरील चक्राकार प्रवाहाने विकसनशील देशात भांडवनिर्मितीच्या बाबतीत दुष्टचक्र कसे काम करते ते समजते. म्हणजे कमी वास्तव उत्पन्नामुळे देश गरीब राहतो. पण गरीबीचे कारण हेच अंतिम परिणाम सुध्दा ठरते.

अशा प्रकारे आर्थिक विकासाच्या मार्गात दारिद्र्याचे दुष्टचक्र हा एक मोठा अडथळा ठरतो.

**३. कृषी विकासातील अडथळे :**

विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषी हा अग्रस्थानी असणारा घटक आहे. बहुसंख्य लोकांची उपजीविका शेती क्षेत्रावर अवलंबून असते. विकसित देशांच्या अनुभवावरुन असे लक्षात येते की शेतीचा उपयोग भांडवल निर्मितीसाठी करुन विकास साध्य करता येतो. परंतू अविकसित देशाच्या बाबतीत ही शक्यता कमीच असते. कारण शेतीच्या विकसामध्ये अनेक अडथळे असतात. जसे दैववादी वृत्ती, सिंचन सुविधांचा अभाव आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, शेतकऱ्याचा निरक्षरपणा, भांडवलाची कमतरता, शेतमालाच्या आधार किंमतीची समस्या इत्यादी. कृषी विकासातील अडथळ्यांमुळे कृषीचा विकास करणे कठीण होते परिणामी आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण होत आहेत.

**४. बाजारातील अपूर्णता :**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत बाजारातील अपुर्णता हा एक महत्वाचा अडथळा ठरतो. अर्थव्यवस्थेमध्ये वस्तू बाजार आणि घटक बाजारात अपूर्णता असलेली दिसुन येते. त्यामध्ये किंमत स्थिरता, बाजारपेठेचे अपुर्ण ज्ञान, अचल घटक, बदलणारी सामाजिक परिस्थिती, उत्पादन घटकांच्या गतीशीलतेचा अभाव, माहीतीच्या बाजारातील अपूर्णता अशा विविध प्रकारच्या अपुर्णतेमुळे आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळे निमार्ण होतात.

**५. वाढती लोकसंख्या :**

अविकसित किंवा विकसनशील देशामधील जलद वाढणारी लोकसंख्या हा आर्थिक विकासात मोठा अडथळा ठरत आहे. लोकसंख्या वाढल्यामुळे लोकसंख्येचे आकारमान आणि लोकसंख्या वाढीचा दर सुध्दा आधिक राहतो. परिणामी वाढलेल्या लोकसंख्येला अन्नधान्य टंचाईला सामोरे जावे लागते. अर्थव्यवस्थेत चलनवाढीची स्थिती निर्माण होते. लोकसंख्या वाढल्यामुळे बेरोजगारी, दारिद्र्य, निरक्षरता आणि नित्कृष्ट राहणीमान अशा समस्या निर्माण होतात. वाढणारी लोकसंख्या आर्थिक विकासात साहाय्यभुत ठरण्याऐवजी अडथळा ठरत असते.

## ६. भांडवल टंचाई :

विकसनशील देशाच्या बाबतीत वास्तव राष्ट्रीय उत्पन्न अल्प राहते. त्यामुळे देशातील बचत कमी, भांडवलनिर्मिती कमी, रोजगार कमी आणि देशाचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न कमी राहते. म्हणजे भांडवलनिर्मिती अल्प राहील्यामुळे आर्थिक विकसात भांडवल टंचाई निर्माण होते. भांडवल हा उत्पादनाचा एक महत्वाचा घटक आहे. भांडवालाचीच टंचाई निर्माण झाल्यामुळे उत्पादन प्रक्रिया वेगाने वाढत नाही. परिणामी देशाच्या आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण होतात.

## ७. आधुनिक उद्योजकता आणि व्यवस्थापन कौशल्याचा अभाव :

विकसित देशामधील आधुनिक व्यवस्थापन कौशल्यामुळे उद्योजकांनी धोका पत्करुन अनेक प्रकल्पात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली त्यामुळे विकसित देशांचा विकास अधिक वेगाने घडून आला. परंतु अविकसित देशांच्या बाबतीत आधुनिक व्यवस्थापन कौशल्यांचा अभाव असल्यामुळे आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण होत आहे.

## ८. आंतरराष्ट्रीय घटक :

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यापारशर्ती ह्या अविकसित देशांना नेहमी प्रतिकूल ठरत असतात. कारण अविकसित देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये प्राथमिक वस्तूंची संख्या अधिक असते. विकासाच्या सुरवातीच्या काळात आवश्यक यंत्रे व तंत्रज्ञानाची टंचाई असते. त्यामुळे अविकसित देशांची आयात जास्त आणि निर्यात कमी राहते. याचा एकंदरित परिणाम म्हणुन अविकसित देशांच्या व्यवहारतोलात तुट निर्माण झालेली असते. आर्थिक विकासाबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसित देश अविकसित देशांची बाजारपेठ मिळविण्यासाठी काही अटी शर्ती अविकसित देशांवर लादतात. त्याचा एकूण परिणाम म्हणून अविकसित देशांच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो.

## ९. राजकीय अस्थैर्य :

अविकसित किंवा विकसनशील देशांच्या आर्थिक विकासात राजकीय अस्थैर्य हा महत्वाचा अडथळा असतो. विकसनशील देशांमध्ये बऱ्याच वेळा स्थिर आणि बहुमताचे सरकार सत्तेवर येत नाही, परकीय आक्रमणाचा धोका, दहशतवादी हल्ले अशा घटकांमुळे राजकीय अस्थैर्य निर्माण होते. देशातील उद्योग क्षेत्रातील अशांतता, सततचे मोर्चे यामुळे विदेशी आणि स्वदेशी गुंतवणुकीवर विपरीत परिणाम होतो. गुंतवणुक घटल्यामुळे विकासाच्या मार्गात खिळ बसते.

## १०. भ्रष्ट प्रशासन व्यवस्था :

अविकसित देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सरकारने पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा असते. सरकार देशाच्या विकासासाठी विविध घटकांच्या सहाय्याने कार्यभार पार पाडीत असते. परंतू आर्थिक विकास प्रक्रियेचा कार्यभार पार पाडताना प्रशासकीय यंत्रणा भ्रष्ट पध्दतीने कार्य करते. त्यामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. अनेक प्रकल्प सरकारच्या लालफितीच्या कारभारात अडकतात. उद्योगांमधील गुंतवणुक कमी होते.

### ११. धार्मिक घटक :

अविकसित देशामध्ये विकासाच्या सुरवातीच्या काळात निरक्षरतेचे प्रमाण अधिक असते. निरक्षरतेमुळे समाजातील बहुसंख्य लोकांची वृत्ती दैववादी असते. अनेक धार्मिक चालीरिती, परंपरांचा समाजावर पगडा असतो.

### १२. सामाजिक, सांस्कृतिक अडथळे :

सामान्यपणे अविकसित देशांमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक चालिरिती, पध्दती आर्थिक विकासाच्या मार्गात अडसर ठरत असतात. सनातनी विचारांच्या काही सामाजिक संघटना, सांस्कृतिक रितीरिवाज काळानुसार बदलल्यास आर्थिक विकासाला पोषक वातावरण तयार होते. परंतू अशा सामाजिक, सांस्कृतिक, रुढी, परंपरा यांच्यात बदल करण्याचा प्रयत्न केल्यास संघर्ष निर्माण होतो. परिणामत: आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात.

सारांश रूपाने विकासमार्गातील अडथळ्यांच्या बाबतीत असे म्हणता येते की, अविकसित राष्ट्रांच्या विपणनातील अपूर्णतेमुळे उपलब्ध संसाधनांची वाटणी आदर्श होत नाही. दारिद्र्याच्या दृष्ट चक्रामुळे अर्थव्यवस्थेत रचनत्मक बदल घडवून आणणे कठीण जाते. अडथळ्यांची तीव्रता जास्त असल्यामुळे या देशातील विकासाचा वेग कमी असलेला दिसून येतो.

## १.२.४ आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक (Factors affecting Economic Development):

आर्थिक विकास ही आधुनिक संकल्पना असून दुसऱ्या महायुद्धानंतर यांच्या अभ्यासाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. आर्थिक विकासामध्ये देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात सातत्याने आणि दीर्घकालीन प्रक्रियेने वाढ होणे अपेक्षित असते. परंतु अविकसित अर्थव्यवस्थांमध्ये सार्वत्रिक दारिद्र्य बेरोजगारी, अल्प उत्पादकता, वाढती लोकसंख्या आणि निकृष्ठ राहणीमान अशा विविध समस्या निर्माण झालेल्या असतात. तर विकसित अर्थव्यवस्थांमध्ये आर्थिक विकासाचा वेग टिकवणे, व्यापार चक्रे टाळणे यासाठी आर्थिक विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचा आपण अभ्यास करणे गरजेचा ठरणार आहे. आर्थिक विकासावर परिणाम करणारे घटक पुढील प्रमाणे आहेत.

### १. पायाभूत सुविधांचे स्तर (Levels of Infrastructure) :

पायाभूत सुविधांमध्ये वाहतूक, दळणवळणाची साधने, रस्ते, रेल्वे आणि बंदरे यामधील गुंतवणूक वाढल्यामुळे भारतातील आर्थिक विकास सुधारला आहे. पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढल्यामुळे खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढते. या गुंतवणुकीचा काही भाग विकसित देशांच्या अनेक कंपन्यांकडून आलेला असतो. अशा गुंतवणुकीतील वाढ रोजगार आणि उत्पन्न वाढवते, बचत आणि भांडवल निर्मिती वाढवते, त्यामुळे आर्थिक विकासावर त्याचा अनुकूल परिणाम घडून येतो.

### २. शिक्षण (Education) :

शिक्षणाचा श्रम उत्पादकतेवर महत्त्वपूर्ण प्रभाव पडतो. कारण श्रम हा उत्पादनाचा महत्वाचा घटक आहे.

अशा श्रम या उत्पादक घटकाचा गुणात्मक विकास घडवून आणण्यासाठी शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरली आहे. म्हणूनच शिक्षण हा मानवी भांडवलाच्या (श्रमाच्या) विकसातील महत्वाचा घटक आहे. मूलभूत साक्षरता आणि कौशल्याशिवाय श्रमापासून सेवा क्षेत्रात नवीन आणि उच्च तंत्रज्ञान उद्योग विकसित करणे कठीण आहे. उदाहरणार्थ, भारतातील शिक्षणाच्या चांगल्या पातळीमुळे माहिती तंत्रज्ञान आणि कॉल सेंटरसारख्या सेवा उद्योगांमध्ये तसेच औद्योगिक क्षेत्रात रोजगार वाढीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. म्हणजेच शिक्षण हा आर्थिक विकासावर परिणाम करणारा महत्वाचा घटक ठरला आहे. शिक्षणाचा आर्थिक विकासावर धनात्मक परिणाम  घडून येतो.

### ३. **आवक गुंतवणुकीचे स्तर (Levels of Inward Investment) :**

विदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूक आकर्षित करू शकणारे विकसनशील देश भांडवलाच्या उच्च पातळीमुळे आर्थिक विकास वेगाने करत आहेत. तसेच विकसनशील देशांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांना त्यांच्या अर्थव्यवस्थेत आकर्षित करण्याच्या प्रयत्नामुळे विकासात लक्षणीय वाढ घडून आणली आहे. नवीन औद्योगिक देशांसाठी आर्थिक विकास वाढवण्यासाठी विदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूकीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. अर्थव्यवस्थेतील आवक गुंतवणूक हि उद्योगात आणि सेवा क्षत्रात गुंतविल्यास त्याचे भांडवलात रुपांतर होते. भांडवल हा उत्पादनाचा एक महत्वाचा घटक आहे. त्यामुळे आवक गुंतवणुकीचा परिणाम आर्थिक विकसावर होत असतो.

### ४. **बचतीचा स्तर/भांडवल (Levels of Savings / Capital) :**

हेरॉल्ड-डोमर प्रतिमान (Harrod-Domar model) सारख्या वाढीच्या प्रतीमानामध्ये बचत आणि भांडवलाची पातळी आर्थिक वाढ निश्चित करण्यासाठी मुख्य घटक म्हणून पाहिली जाते. उच्च बचतीमुळे वाढीव गुंतवणूक, उच्च वाढ आणि त्यामुळे उच्च बचत यांचे सदगुण वर्तुळ निर्माण होते. परिणामी आर्थिक विकास वेगाने होतो. बचतीमधून भांडवल निर्मिती आणि आर्थिक विकास कसा घडून येतो याबाबतचे प्रतिमान हेरॉल्ड-डोमर यांनी स्पष्ट केले. आकृतीच्या सहाय्याने ते अधिक स्पष्ट केले आहे.



वरील प्रतीमानाच्या सहायाने बचत आणि भांडवल स्थर वाढून आर्थिक विकासाचा वेग वाढविता येतो हे दिसून येते.

### ५. राजकीय स्थिरता, कायदा आणि सुव्यवस्था (Political Stability / Law and Order):

विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी, कंपन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राजकीय स्थिरता आणि खाजगी मालमत्तेचे संरक्षण हे सर्वात महत्वाचे घटक म्हणून स्थान देण्यात आले आहेत. अस्थिरतेचे कोणतेही लक्षण विकसनशील देशांमध्ये गुंतवणुकीचे आर्थिक आणि वैयक्तिक जोखीम वाढवते. राजकीय स्थिरता, कायदा आणि सुव्यवस्था यामध्ये अस्थैर्य असेल तर आर्थिक विकासावर त्याचा अत्यंत प्रतिकूल परिणाम होत असतो. दीर्घकालीन नागरी अशांतता/लष्करी संघर्ष हा आर्थिक विकासाचा सर्वात मोठा अडथळा आहे, कारण यामुळे गुंतवणूक सुकते म्हणजे नष्ट होते किवा थांबते. परिणामी अनुत्पादक मार्गाने अर्थव्यवस्थेमधील संसाधने वाया जातात.

### ६. व्यापक आर्थिक स्थिरता (Macroeconomic Stability):

राजकीय स्थिरतेप्रमाणेच, व्यापक आर्थिक स्थिरता गुंतवणूक आणि विकासाला प्रोत्साहन देते. यामध्ये महागाईचे कमी दर आणि विनिमय दर स्थिरता यांचा समावेश होतो. जलद अवमूल्यनामुळे भांडवल उड्डाण आणि आर्थिक वाढ कमी होऊ शकते. त्यामुळे महागाई, विनिमय दर, बेरोजगारी आणि दारिद्र्य यांचा आर्थिक विकासावर आत्यंतिक परिणाम होत असतो.

### ७. कामगार गतिशीलता (Labour Mobility):

कामगारांचा आर्थिक विकासावर फार मोठा परिणाम होत असतो. कारण श्रम म्हणजेच कामगार हा उत्पादनाचा एक महत्वाचा घटक आहे. श्रम तुलनेने अनुत्पादक शेतीतून अधिक उत्पादक क्षेत्राकडे जाऊ शकतो का? यावर औद्योगिक आणि सेवा क्षेत्राचा विकास अवलंबून असतो. कामगारांच्या गतिशीलतेवर अनेक आर्थिक आणि सामाजिक घटक परिणाम करीत असतात. कामगार उत्पादन घटक असल्याने आर्थिक विकासावर परिणाम करीत असतो.

### ८. परदेशी मदत (Foreign Aid):

विकसित देश आणि आंतरराष्ट्रीय संस्था जागतिक लक्ष्य साध्य करणे, पायाभूत सुविधा आणि राहणीमान सुधारण्यासाठी आर्थिक मदत करू शकते. कमी पातळीची बचत आणि भांडवली गुंतवणूक असलेल्या विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी हि आर्थिक मदत महत्त्वाची ठरू शकते. परदेशी मदत कशी वापरली जाते, यावर आर्थिक विकास अवलंबून असतो. मग ती व्यापार करारांशी जोडलेले असो किंवा शिक्षण आणि आरोग्य सेवेसारख्या क्षेत्रातील असो, बाजारातील अपयशावर मात करण्यासाठी ती वापरली जाते. परदेशी मदतीवर काही अर्थतज्ञांकडून टीका देखील केली जाते. परंतु परदेशी मदत आर्थिक प्रोत्साहनांवर परिणाम करू शकते. मदतीचा परिणाम अनुकूल किंवा प्रतिकूल सुध्दा असू शकतो.

## ९. प्रादेशिक परिणाम (Regional Effects):

एखाद्या देशांच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दुसऱ्या शेजारी देशाच्या आर्थिक विकासावर जोरदार प्रभाव पडतो. उदाहरणार्थ, १९८० आणि १९९० च्या दशकात दक्षिण पूर्व आशियाने आर्थिक वाढ आणि विकासाचा मजबूत स्तर दर्शविला. तथापि, उप-सहारा आफ्रिकन देशांनी मात्र अतिशय मंद वृध्दी अनुभवली. हे अंशतः प्रदर्शन परिणामाच्या प्रभावामुळे घडते आहे. जवळच्या शेजाऱ्या राष्ट्रांशी व्यापार सर्वात फायदेशीर आणि कार्यक्षम असतो असा आंतरराष्ट्रीय सिद्धांत सांगतो. जर एखाद्या शेजारील राष्ट्राने अधिक चांगले काम केले, तर वाढीव व्यापार आणि वाढीव गुंतवणूक यासारख्या घटकांचा आर्थिक विकासावर अत्यंत चांगला परिणाम होऊ शकतो.

## १०. नैसर्गिक संसाधने (Natural Resources) :

नैसर्गिक संसाधनांचे उच्च स्तर असलेले देश आर्थिक विकासासाठी याचा वापर करू शकतात. उदाहरणार्थ, इंधन तेलापासून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे आखाती देशांना वास्तविक जीडीपीच्या उच्च पातळीवर झपाट्याने विकसित होण्यास सक्षम केले आहे. आफ्रिकन आणि आशियाई देशांसाठी, विविध प्रकारचा कच्चा माल हा महसूल आणि निर्यात कमाईचा महत्त्वाचा स्रोत आहे. ज्यामुळे उच्च आर्थिक विकास शक्य होतो.

तथापि, नैसर्गिक संसाधने आणि आर्थिक विकास यांच्यातील दुवा सरळ नाही. जिथे अर्थव्यवस्था अर्थव्यवस्थेत विविधता आणण्यासाठी कोणतेही प्रोत्साहन न देता प्राथमिक वस्तूंच्या उत्पादनात अडकली आहे, तिथे कच्च्या मालाच्या निर्यातीमुळे आणि प्रचंड वापरामुळे 'संसाधनाचा बेसुमार वापर शाप' ठरू शकतो. हे नैसर्गिक संसाधने विकसनशील अर्थव्यवस्थेच्या मालकीचे आहेत की नाही यावर अवलंबून असू शकते. नैसर्गिक संसाधनाच्या पर्याप्त आणि विवेकी वापरासाठी मानवी भांडवल महत्वाची भूमिका बजावत असते.

## ११. कर दर आणि भ्रष्टाचाराची पातळी (Tax Rates and Levels of Corruption):

कर दराचा वस्तू आणि सेवांच्या मागणी आणि गुंतवणुकीवर परिणाम होत असतो. उच्च कर दर वस्तू आणि सेवांच्या मागणी आणि गुंतवणुकीवर विपरीत परिणाम घडून आणतात. विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी कमी कर दर महत्त्वाचा असू शकतो. तथापि, देशातील कराचे दर कमी किवा मर्यादित असतील तर देशांतर्गत विविध उद्योग आणि उपक्रमी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करू शकतात. देशात असलेल्या प्रशासकीय यंत्रणेतील कारभार गुंतवणूक वाढीवर प्रभाव टाकू शकते. सुलभ प्रशासकीय यंत्रणा अनुकूल परिणाम घडवू शकते.

## १२. मुक्त व्यापार विरुद्ध संरक्षणवाद (Free Trade vs Protectionism):

आर्थिक विकासातील एक महत्वाची चर्चा मुक्त व्यापार विरुद्ध संरक्षणवाद याच्या फायद्यांमध्ये आहे. जकात अडथळे काढून टाकल्याने निर्यातीत वाढ होऊ शकते जी आर्थिक विकासासाठी महत्वपूर्ण योगदान देते. कोरिया, तैवान आणि चीन सारख्या आशियाई देशांचा शुल्क (जकाती) हटवल्यामुळे फायदा झाला आहे.

तथापि, प्राथमिक वस्तू आणि सेवांच्या उत्पादनात अडकलेल्या विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी नवीन शिशु उद्योग विकसित करण्यास सक्षम होण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात (अल्पकाळात) संरक्षणवादाचे धोरण आर्थिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

### १३. पर्यटन (Tourism):

आकर्षक हवामान आणि पर्यावरणासह विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी पर्यटन हे परदेशी कमाईचे एक महत्त्वाचे साधन आहे. देशातील पायाभूत सुविधा, दळणवळणाची साधने आणि नवीन हॉटेल्स विकसित करण्यासाठी ते प्रोत्साहन असू शकते. पर्यटन उद्योगाच्या विकासामुळे आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम घडून येतो.

### १४. उद्योजकतेची संस्कृती (Culture of Entrepreneurship) :

अर्थव्यवस्थेतील उद्योजकतेसाठी दिले जाणारे प्रोत्साहन, उपक्रमशीलता यांचा आर्थिक विकासावर परिणाम घडून येत असतो. उदाहरणार्थ, गेल्या काही दशकात भारताने भौतिक सुधारणेवर अधिक लक्ष केंद्रित करून रूढीवादी आणि धार्मिक समाजातून अधिक धर्मनिरपेक्ष समाजात बदल घडून आणला आहे. त्यामुळे देशात उद्योजकतेची संस्कृती रुजवली जात आहे. उदारणार्थ, विशेष आर्थिक क्षेत्र, विशेष निर्यात क्षेत्र, स्टार्ट अप इंडिया, आत्मनिर्भर भारत इत्यादी.

### १५. नियमन/मुक्त बाजार व्यवस्था (Regulation / Free Market System) :

अर्थव्यवस्थेत बाजार यंत्रणेकडून निर्णय घेतले जात असतील तर आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम घडून येतो. उदारणार्थ, खाजगीकरण, निर्हस्तक्षेप नीती इत्यादी. अर्थव्यवस्थेत जर निर्बंध किंवा नियंत्रणे असतील, परवाना धोरण, विविध कर, नोटाबंदी इत्यादी मुळे आर्थिक विकासामध्ये अडथळे निर्माण होतात.

अशा विविध घटकांचा आर्थिक विकासावर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम घडून येऊ शकतो. ज्या घटकांचा विकासावर अनुकूल परिणाम होतो, त्यामुळे विकासाची गती अधिक वाढते तर ज्या घटकामुळे विकासाच्या प्रक्रीयेत अडथळे निर्माण केले जातात त्यामुळे विकासाची गती मंदावते. सरकार विविध आर्थिक धोरणे आणि नियोजनाच्या माध्यमातून विकासातील अडथळे दूर करून विकासाचा वेग वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असते. त्यासाठी आर्थिक विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास अत्यंत महत्वाचा ठरतो.

## १.२.४ शाश्वत विकास (Sustainable Development) :

औद्योगिक क्रांतीची सुरवात अठराव्या शतकाच्या शेवटी इंग्लंडमध्ये झाली. औद्यागिक उत्पादनाच्या क्षेत्रात एक महान क्रांती ठरली. प्रचंड उत्पादनाचा प्रारंभ औद्योगिक क्रांतीतुनच झाला. उत्पादनाच्या श्रम ह्या घटकापेक्षा भांडवल ह्या घटकाला सर्वाधिक महत्व प्राप्त झाले. जगातील इतर देशांमध्ये सुध्दा भांडवलशाहीची रचना रुढ झाली. श्रम हा उत्पादनाचा महत्वाचा घटक मानला जाऊ लागला आणि त्यातुनच श्रमाचे शोषण सुरु झाले. कार्ल मार्क्स यांनी श्रमिकांच्या शोषणाविरुध्द कामगार वर्गाने संघर्षाचा मार्ग अवलंबिला.

औद्योगिक क्रांतीच्या काळात श्रमिक वर्गाच्या शोषणा बरोबरच दुसऱ्या एका घटकाचे शोषण जवळपास दोनशे वर्षे होतच राहीले. तो घटक म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण होय. औद्योगिक क्रांतीमुळे भांडवलशाही पध्दती रुढ झाली. भांडवलशाही भोगवादी संस्कृती वाढली. लोकसंख्या वाढीमुळे प्रचंड उत्पादन वाढले. परिणामी नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापराशिवाय प्रचंड उत्पादन शक्य नसते. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्ती (भूमी, वायू व पाणी) यांचे प्रचंड शोषण झाले. पर्यावरणाचा समतोल ढासळत गेला. यामुळे अनेक नैसर्गिक संकटे जसे, महापुर, ढगफुटी, भूकंप, त्सुनामी, वादळे, तापमान वाढ, दुष्काळ, महामारी, साथीचे आजार मोठ्या प्रमाणात उद्‌भवले आहेत. ही सर्व लक्षणे ढासळलेल्या पर्यावरणाच्या ऱ्हासाची आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीने औद्योगिकीकरण, वाढते शहरीकरण, वेगवान आर्थिक विकास त्यातून निसर्गाचे प्रचंड शोषण जर असेच होत राहीले तर पृथ्वीवरील जीवसृष्टी काही दशकातच धोक्यात येईल. अठराव्या शतकात थॉमस माल्थस यांनी लोकसंख्या वाढीचे व्यक्त केलेले भाकित विसाव्या शतकात मीडोज फॉरेस्टर यांनी परिस्थितीकी प्रलय (Ecological Catasrophe) याची भिती आज तंतोतंत खरी ठरत आहे. जर आपण निसर्ग वाचवण्यासाठी प्रयत्न केले नाहित तर भविष्यकाळात निसर्ग आपणाला वाचवणार नाही. आपले अस्तित्व टिकविणे शक्य नाही. आपले अस्तित्व टिकविण्याचा एकच मार्ग म्हणजे शाश्वत आणि हरित विकास होय.

शाश्वत विकास ही संकल्पना तशी अलीकडील आहे. कारण मानवाने नैसर्गिक साधनसंपत्तीचे केलेले प्रचंड शोषण थांबविण्यासाठी आणि आर्थिक विकासाच्या मर्यादा ओळखून निसर्ग व नैसर्गिक साधने संरक्षणाच्या आंतरराष्ट्रीय संघाने सादर केलेल्या १९८० च्या जागतिक संवर्धन डावपेच (World Conservation Strategy) यामध्ये ही संकल्पना सर्वप्रथम वापरली. शाश्वत विकासाच्या विचारसरणीचा कामावर प्रकाश टाकण्याच्या बाबतीत १९६२ मध्ये रॅचेल कार्लसन यांनी 'द सायलेंट स्प्रिंग' या पुस्तकात इकोलॉजिस्ट मॅगझिन १९७२ आणि क्लब ऑफ रोम यांच्या लिमिट्स टू ग्रोथ रिपोर्ट १९७२ यामध्ये प्रयत्न केले गेले होते.

शाश्वत विकास संकल्पनेला १९७२ च्या स्टॉकहोम येथिल संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी पर्यावरण परिषदेत आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. सन १९९२ च्या रिओ दी जानिरो येथिल संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण आणि विकासावरील परिषदेत शाश्वत विकासाचा कृती कार्यक्रम आणि रणनीती आखली गेली. सन २००२ मध्ये जोहान्सबर्ग येथील जागतिक शाश्वत विकासावरील शिखर परिषदेत १९१ राष्ट्रे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध संस्था आणि बहुपक्षीय वित्तीय गट सहभागी झाले होते. रिओ दी जानिरो पासुनच्या प्रगतीचे मुल्यांकन करण्याचे ठरले. सन २०१२ मध्ये रिओ दी जानिरो येथे संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकासावरील परिषदेत शाश्वत विकासाची ध्येये जन्माला आली. सन २०१५ साली न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्राची शिखर परिषद संपन्न झाली. त्यामध्ये २०१५ नंतरचा विकास अजेंड स्वीकारण्यावर चर्चा झाली. यामध्ये शाश्वत विकासाची १७ उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली. शाश्वत विकासाची ध्येये अहवाल २०२० नुसार जगातील कोणताच देश कोव्हिड-१९ महामारी पासुन वाचू शकत नाही. कोव्हिड -१९ च्या महामारीमुळे ऑगस्ट-२०२१ पर्यंत ४४,२६,५३१ पेक्षा

ही जास्त लोक मृत्यू मुखी पडले आहेत. अन्न असुरक्षिततेने ग्रस्त लोकांचे प्रमाण वाढले आहे. बेकारी प्रचंड वाढली आहे. आता तरी आपण शाश्वत विकासाची कास धरणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा आपले जिवनच धोक्यात आले आहे.

**शाश्वत विकासाचा अर्थ आणि व्याख्या :**

शाश्वत विकासाची संकल्पनाही सर्वसमावेशक आणि व्यापक आहे. भविष्यकालीन गरजा आणि विकासाशी शाश्वत विकास ही संकल्पना लागु ठरते. उपलब्ध नैसर्गिक आणि मानवी साधनसंपत्तीचा अतिरिक्त आणि अविवेकी पध्दतीने वापर केला तर भविष्यकालीन पिढीला अनेक समस्यंना सामोरे जावे लागेल. म्हणून साधनसंपत्तीचा वापर विवेकी आणि शाश्वत हवा. उपलब्ध नैसर्गिक आणि मानवी साधन संपत्तीचा वापर अशा पध्दतीने वर्तमान पिढीने करणे की भावी पिढीला त्याग किंवा त्रास सहन करावा लागणार नाही. म्हणुन नियोजन आणि विकासाच्या अर्थशास्त्रात शाश्वत विकासाच्या संकल्पनेला अनन्य साधारण असे महत्व आहे. शाश्वत विकासाच्या व्याख्या पुढील प्रमाणे –

**१. ब्रूटलॅड अहवालानुसार –** 'स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी भविष्यकालीन पिढ्यांची क्षमता बाधित होऊ न देता, वर्तमानकलीन गरजा पुर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय.' (Sustainable development is development that meets the needs of the present without compromising the ability of future generation it meet their own needs- Brutland Report )

**२. रॉबर्ट अॅलन यांच्या मते –** 'मानवी गरजांचे चिरकाल टिकणारे समाधान आणि मानवी जीवनाच्या दर्जात सुधारणा साध्य करणे म्हणजे शाश्वत विकास होय.'(Sustainable development that is likely to acheive lasting satisfaction of human need and improvement of the quality of human life." – Robert Allen )

**३. के परिख यांच्या मते –** ' निसर्गाच्या अवस्थेपासून प्राप्त केलेल्या त्याच वस्तू व सेवा अर्थव्यवस्थेचे उत्पादन शक्यतेची तजवीज करुन सुरु ठेवणे म्हणजे शाश्वत विकास होय.'

वरील व्याख्यांवरुन असे म्हणता येईल की, शाश्वत विकासाच्या व्याख्येमध्ये सामान्यपणे दोन पिढ्यांमधील समता अंतर्भुत असते. भविष्यातील पिढ्यांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी दिर्घकालीन शाश्वता असणे गरजेचे आहे. तर होणारा विकास हा शाश्वत असेल.

**शाश्वत विकास :**

आज संपूर्ण जग आपल्या देशाचा शाश्वत विकास कसा करता येईल याकडे जाणीवपूर्वक लक्ष देत आहे त्यासाठी विविध धोरण आणि उपाय योजना करीत आहेत, याबाबत संयुक्त राष्ट्रांनी २०१५ ते २०३० या १५ वर्षांसाठी १७ शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals) निश्चित केली आहेत. भारत सरकारने शाश्वत विकास करण्यासाठी शाश्वत विकास ध्येये निश्चित केली आहेत. शाश्वत विकास

(Sustainable Development) हा शब्द आजच्या काळात जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर, निसर्गाचा आणि पृथ्वीचा ऱ्हास न करता केलेला विकास म्हणजेच शाश्वत विकास होय.

**शाश्वत विकास अर्थ :**

**१. ब्रंडलँड आयोग –** (१९८७) ''असा विकास जो आजच्या पिढीच्या गरजा तर पूर्ण करतोच, पण त्याच वेळी भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड करत नाही.''

**२. मुस्तफा तोलबा** (माजी प्रमुख, UN Environment Programme)– ''शाश्वत विकास म्हणजे अन्न स्वावलंबन, स्वच्छ पाणी, निवारा आणि आरोग्य नियंत्रण यांसारख्या मानवकेंद्रित उपक्रमांद्वारे सर्वांचे जीवनमान सुधारणे; जिथे मानव स्वतः विकासाचे सर्वात मोठे साधन आहे.''

**३. डेव्हिड पिअर्स** (पर्यावरण अर्थतज्ज्ञ)– ''शाश्वत विकास म्हणजे आजच्या पिढीच्या कल्याणामध्ये अशी वाढ करणे, ज्यामुळे भविष्यातील पिढ्यांचे कल्याण किंवा त्यांचे जीवनमान आजच्या पिढीपेक्षा कमी दर्जाचे होणार नाही.''

**४. रॉबर्ट रेपेटो** (अर्थतज्ज्ञ आणि लेखक) – ''शाश्वत विकास ही एक अशी विकास धोरणाची रचना आहे, जी मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी आणि दीर्घकालीन प्रगतीसाठी सर्व प्रकारच्या संसाधनांची (मानवी, भौतिक आणि नैसर्गिक संपत्ती) क्षमता टिकवून ठेवते आणि वाढवते.''

विविध लेखकांच्या व्याख्यांचा अभ्यास केल्यास शाश्वत विकासाचे प्रामुख्याने तीन दृष्टिकोन समोर येतात:–

| दृष्टिकोन | मुख्य विचार |
|---|---|
| १. **आंतर–पिढी दृष्टिकोन** (Inter-generational) | आजच्या आणि भविष्यातील पिढ्यांमध्ये संसाधनांचे न्याय्य वाटप व्हावे. (उदा. ब्रंडलँड, पिअर्स) |
| २. **पर्यावरणीय दृष्टिकोन** (Ecological) | निसर्गाची हानी न करता, जैवविविधता टिकवून विकास करणे. (उदा. मुस्तफा तोलबा) |
| ३. **आर्थिक व सामाजिक दृष्टिकोन** (Socio-Economic) | गरिबी निर्मूलन करणे आणि समाजातील शेवटच्या घटकाचा विकास करणे. (उदा. एडवर्ड बार्बियर) |

**शाश्वत विकासाचे प्रामुख्याने तीन स्तंभ :**

१. **आर्थिक वाढ करणे :-** देशाची आर्थिक प्रगती होणे.

२. **सामाजिक विकास करणे:-** समाजात समानता, शिक्षण आणि चांगले आरोग्य मिळणे.

३. **पर्यावरण संरक्षण करणे :-** जल, वायू आणि भूमीचे प्रदूषण रोखणे.

**शाश्वत विकासाचा मुख्य उद्देश :**

१. **नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे** (Resource Conservation) **:-** कोळसा, पेट्रोल, डिझेल आणि भूगर्भातील पाणी यांसारखी मर्यादित संसाधने विचारपूर्वक वापरणे आणि सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या अक्षय (न संपणाऱ्या) ऊर्जेचा वापर वाढवणे.

२. **पर्यावरणाचा समतोल राखणे** (Ecological Balance) **:-** प्रदूषण कमी करणे, जागतिक तापमानवाढ (Global Warming) रोखणे, जंगलांचे रक्षण करणे आणि जैवविविधता (Biodiversity) टिकवून ठेवणे.

३. **गरिबी आणि भूक निर्मूलन करणे** (Eradication of Poverty Hunger) **:-** जगातील प्रत्येक व्यक्तीला अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा सन्मानाने मिळवून देणे, तसेच भुकबळी कमी करून दारिद्र्य कमी करणे हा प्रमुख उद्देश आहे.

४. **सामाजिक समानता आणने** (Social Equity) **:-** जात, धर्म, लिंग किंवा आर्थिक परिस्थितीवर आधारित भेदभाव नष्ट करून सर्वांना प्रगतीची समान संधी देणे. (उदा. महिलांचे सक्षमीकरण करणे आणि लैंगिक समानता आणने).

५. **दर्जेदार जीवन आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे** (Good Health and Well-being) **:-** सर्व नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छ हवा आणि चांगल्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे, हे सर्व दिल्यास मानवाची कार्यक्षमता वाढेल.

६. **आर्थिक स्थैर्य राखणे** (Economic Stability) **:-** असा आर्थिक विकास साधणे ज्यामुळे आज रोजगार आणि उत्पन्न तर निर्माण होईलच, पण भविष्यात संसाधनांच्या कमतरतेमुळे आर्थिक संकट कोसळणार नाही परिणामी आर्थिक स्थैर्य निर्माण होईल.

**जागतिक शाश्वत विकासाची १७ ध्येये खालीलप्रमाणे आहेत :-**

ध्येय १: गरिबी निर्मूलन (No Poverty)

ध्येय २: भूक आणि उपासमारीचे निर्मूलन (Zero Hunger)

ध्येय ३: उत्तम आरोग्य आणि कल्याण (Good Health and Well-being)

ध्येय ४: गुणवत्तापूर्ण शिक्षण (Quality Education)

ध्येय ५: लिंग समानता (Gender Equality)

ध्येय ६: स्वच्छ पाणी आणि स्वच्छता (Clean Water and Sanitation)

ध्येय ७: परवडणारी आणि स्वच्छ ऊर्जा (Affordable and Clean Energy)

ध्येय ८: सन्मानजनक काम आणि आर्थिक वाढ (Decent Work and Economic Growth)

ध्येय ९: उद्योग, नवोपक्रम आणि पायाभूत सुविधा (Industry, Innovation and Infrastructure)

ध्येय १०: असमानतेत घट (Reduced Inequalities)

ध्येय ११: शाश्वत शहरे आणि समुदाय (Sustainable Cities and Communities)

ध्येय १२: जबाबदार उपभोग आणि उत्पादन (Responsible Consumption and Production)

ध्येय १३: हवामान बदल कृती (Climate Action)

ध्येय १४: जलचरांचे रक्षण (Life Below Water)

ध्येय १५: भूचरांचे रक्षण (Life on Land)

ध्येय १६: शांतता, न्याय आणि भक्कम संस्था (Peace, Justice and Strong Institutions)

ध्येय १७: ध्येयपूर्तीसाठी भागीदारी (Partnerships for the Goals)



एकूण शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी (SDG) केवळ १६ टक्के उद्दिष्टांमध्ये प्रगती दिसून येत आहे. उपासमार (SDG -2) शाश्वत शहरे (SDG-11) जैवविविधता (SDG-14 आणि 15) आणि न्याय (SDG -16) यासारख्या अनेक प्रमुख मुद्द्यांवरील डऊऋ त्यांची उद्दिष्टे पूर्ण करण्यात अपयशी ठरत आहेत.

**२. मानवी विकास निर्देशांक** (Human Development Index - HDI) **:**

मानवी विकास निर्देशांक हे कोणत्याही देशातील लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाची पातळी मोजण्याचे एक सांख्यिकीय साधन आहे. याची सुरुवात १९९० मध्ये पाकिस्तानी अर्थतज्ज्ञ महबूब-उल-हक आणि भारतीय अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांनी केली.

**मानवी विकास निर्देशांकाची व्याख्या-** मानव विकास निर्देशांक म्हणजे एखाद्या देशातील नागरिकांचे सरासरी आयुर्मान, शैक्षणिक पातळी आणि दरडोई उत्पन्न या तीन मूलभूत घटकांच्या आधारे त्या देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाची पातळी मोजणारे एक सांख्यिकीय साधन होय.

**मानवी विकास निर्देशांकाचे घटक :**

**१. दीर्घ आणि निरोगी आयुष्य** (Health) **:-** हे जन्माच्या वेळच्या सरासरी आयुर्मानावरून (Life Expectancy) मोजले जाते.

**२. ज्ञान/शिक्षण** (Knowledge/Education) **:-** हे शाळेत घालवलेली सरासरी वर्षे (Mean years of schooling) आणि शालेय शिक्षणाची अपेक्षित वर्षे (Expected years of schooling) यावरून मोजले जाते.

**३. राहणीमान** (Standard of Living) **:-** हे दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (GNI per capita - PPP च्या आधारे) यावरून मोजले जाते.

**४. पर्यावरणाचा विचार :-** जर एखाद्या देशाचा HDI खूप चांगला असेल (चांगले शिक्षण, आरोग्य, उत्पन्न) पण त्यासाठी तिथल्या पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत असेल, तर तो विकास शाश्वत राहू शकत नाही.

**५. PHDI (Planetary Pressures-adjusted HDI) :-** मानवी विकास अहवालात आता 'ग्रहीय दबाव-समायोजित मानवी विकास निर्देशांक' (PHDI) देखील मोजला जातो. यामध्ये देशाच्या कार्बन उत्सर्जनाचा आणि भौतिक पाऊलखुणांचा (Material Footprint) विचार करून HDI चे मूल्य समायोजित केले जाते

मानवी विकास निर्देशांक मोजण्यासाठी वरील घटकाचा आधार घेउन निर्देशांक मोजला जातो.

**निर्देशांकाचे स्वरूप :**

मानवी विकासचे मूल्य ० ते १ दरम्यान मोजले जाते, देशाचा स्कोअर १ च्या जितका जवळ असेल,

तितका तो देश मानवी विकासात अधिक प्रगत मानला जातो, या आधारे जगातील देशांची 'अति-उच्च', 'उच्च', 'मध्यम' आणि 'निम्न' अशा चार श्रेणींमध्ये विभागणी केली जाते.

सन २०२६ मध्ये भारताचा मानवी विकास निर्देशांक क्रमांक हा १३० होता १९० देशामध्ये आणि भारताचे मानवी विकासचे मूल्य हे ०.६८५ होते म्हणजे भारत मानवी विकास निर्देशांकमध्ये मध्यम विकसित देशामध्ये गणला जातो.

**शाश्वत विकास आणि मानवी विकास निर्देशांक मधील परस्पर संबंध :**

कोणत्याही देशाचा केवळ उच्च मानवी विकास निर्देशांक असणे म्हणजे देश शाश्वत मार्गाने विकसित होत आहे असे नाही. तर सध्या संपूर्ण जग हे 'शाश्वत मानवी विकास' या संकल्पनेवर भर देत आहे आणि सध्या ही काळाची गरज बनली आहे.

सध्या प्रत्येक देश पर्यावरणाचा विचार करीत आहे जर एखाद्या देशाचा कञ्ञ खूप चांगला असेल (चांगले शिक्षण, आरोग्य, उत्पन्न) पण त्यासाठी तिथल्या पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत असेल, तर तो विकास शाश्वत राहू शकत नाही म्हणजे पर्यावरनाचा नाश किवा नुकसान करून झालेली प्रगती ही चिरकल टिकू शकत नाही.

सध्या PHDI (Planetary Pressures-adjusted HDI) : मानवी विकास अहवालात आता मग्रहीय दबाव आणि समायोजित मानवी विकास निर्देशांकम (PHDI) देखील मोजला जातो. यामध्ये देशाच्या कार्बन उत्सर्जनाचा आणि भौतिक पाऊलखुणांचा (Material Footprint) विचार करून HDI चे मूल्य समायोजित केले जाते.

**सारांश –** मानवी विकास निर्देशांक (HDI) हे आपले अंतिम ध्येय (माणसाचे कल्याण) दर्शवतो, तर शाश्वत विकास हा ते ध्येय भविष्यासाठी टिकवून ठेवण्याचा मार्ग दाखवतो.

**सरावासाठी प्रश्न :**

१) जागतिक शाश्वत विकासाची ध्येये स्पष्ट करा.

२) मानव विकास निर्देशांक म्हणजे काय?

३) शाश्वत विकास म्हणजे काय?

४) मानवी विकास निर्देशांकाचे घटक स्पष्ट करा.

५) शाश्वत विकासाचा मुख्य उद्देश स्पष्ट करा.

## १.३ सारांश :

आर्थिक विकास आणि आर्थिक वृध्दीच्या संकल्पना आणि त्यांच्यातील फरक ही आपण जाणून घेतला. आर्थिक विकास घडून येताना आपण परंपरागत ते आधुनिक आर्थिक विकासाचे निर्देशक घटक

अभ्यासले आर्थिक विकास साध्य करताना विविध अडथळे उद्भवतात यांचाही आपण अभ्यास केला. आर्थिक विकास घडवून आणताना होणारा आर्थिक विकास हा शाश्वत आणि हरित असावा हे अत्यंत गरजेचे आहे याचा ही आपण अभ्यास केला. आर्थिक विकास साध्य करताना शाश्वत आणि हरित विकासासाठी आपली कृती काय आणि कशी असायला पाहिजे हे समजले.

## १.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ :

**१. आर्थिक विकास :** दीर्घकालावधीत अर्थव्यवस्थेच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याच्या क्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात.

**२. आर्थिक वृध्दी :** आर्थिक वृध्दी म्हणजे केवळ एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे होय.

**३. मानव विकास निर्देशांक :** मानव विकास निर्देशांक म्हणजे दीर्घकालीन आणि निरोगी आयुष्य, ज्ञानार्जनास प्रवेश आणि राहणीमानातील सभ्य मानदंड या मानव विकासाच्या तीन मुलभूत आयामांमधील प्रगतीच्या मुल्यांकनासाठी असलेले सारांश मोजमाप होय.

## १.५ स्वयं–अध्ययन प्रश्न :

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुर्ण करा.**

१. आर्थिक विकासामध्ये दीर्घकालीन ............ राष्ट्रीय उत्पन्नामधील वाढ अभिप्रेत असते.

अ) वास्तव ब) पैशातील क) अवास्तव ड) यापैकी नाही

२. प्रा. आर्थर लेविस यांच्या मते .......... हा देशाच्या उत्पादनात दरडोई वाढीचे प्रतिनिधित्व करतो.

अ) दरडोई विकास ब) आर्थिक विकास क) आर्थिक वृध्दी ड) वरील सर्व

३. आर्थिक वृध्दी ही संज्ञा ........ देशांच्या संदर्भात वापरली जाते.

अ) विकसित ब) अल्पविकसित क) विकसनशील ड) अविकसित

४. आर्थिक विकासात ............. अभिप्रेत असतात.

अ) संख्यात्मक बदल ब) गुणात्मक बदल क) 'अ' आणि 'ब' पर्याय ड) यापैकी नाही.

५. ............ हे आर्थिक विकासाचे निर्देशक आहेत.

अ) राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ब) दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढ

क) आर्थिक कल्याण ड) वरील सर्व

६. मानव विकास निर्देशांक ही संकल्पना ........ यांनी मांडली

अ) मेहबूब उल हक ब) अमर्त्य सेन क) यापैकी नाही ड) अ व ब बरोबर

७. .......... हे आर्थिक विकासातील अडथळे आहेत.

अ) परकीय राजवटीचा परिणाम ब) दारिद्र्याचे दृष्टचक्र

क) वाढती लोकसंख्या ड) वरील सर्व

८. औद्योगिक क्रांतीच्या काळात श्रमिक वर्गाच्या शोषणा बरोबरच .......... ही शोषण झाले.

अ) नैसर्गिक साधनसंपत्तीचे ब) कामगार वर्गाचे क) भांडवलाचे क) यापैकी नाही

९. शाश्वत विकास संकल्पनेला १९७२ च्या......... येथिल संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी पर्यावरण परिषदेत मान्यता मिळाली.

अ) नवी दिल्ली ब) रिओ दी जनिरो क) स्टॉक होम ड) वरील सर्व

१०. हरित विकासामध्ये ........... अभिप्रेत असते.

अ) नैसर्गिक साधनांचा पर्यावरणपुरक वापर ब) नैसर्गिक साधनांचा विपुल वापर.

क) हरितगृह वायूचे प्रमाण वाढविणे ड) वरील सर्व

**१.६ स्वयं-अध्ययन प्रशनांची उत्तरे :**

**(अ)** १. अ) वास्तव २. ब) आर्थिक विकास

३. अ) विकसित ४. ब) गुणात्मक बदल

५. ड) वरील सर्व ६. ड) अ आणि ब दोन्ही बरोबर

७. ड) वरील सर्व ८. अ) नैसर्गिक साधनसंपत्तीचे

९. क) स्टॉक होम १०.अ) नैसर्गिक साधनांचा पर्यावरण पुरक वापर

**१.७ सरावासाठी स्वाध्याय :**

**(अ) टीपा लिहा :**

१. आर्थिक विकास

२. आर्थिक वृध्दी

३. आर्थिक विकासाचे निर्देशक घटक

४. आर्थिक विकासातील अडथळे

५. शाश्वत विकास

६. मानव विकास निर्देशांक

**(ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१. आर्थिक विकास संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

२. आर्थिक विकास अणि आर्थिक वृध्दी यातील फरक सांगा.

३. आर्थिक विकासाचे निर्देशक घटक सविस्तर सांगा.

**(क) सविस्तर उत्तरे लिहा.**

१. आर्थिक विकासाच्या मार्गातील अडथळ्यांचे विश्लेषण करा.

२. शाश्वत विकास संकल्पनेचे स्पष्टीकरण द्या.

३. अविकसित देशांची वैशिष्ट्ये सांगा.

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ :


१. Jhingan M. L. (1997) , "The Economics of Development and Planning" , 31st Revised and Enlarged Edition, Vinda Publication (p) Ltd, Delhi.

२. Misra S. K. and Puri V. K. (1998) , "Economics of Development and Planning (Theory and Practice), Seventh Revised and Enlarged Edition, Himalaya Publishing House, Mumbai.

३. कविमंडन विजय (२०११), 'विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. पाटील जे.एफ. (संपादक) (२०११), 'वृध्दी व विकासाचे अर्थशास्त्र', फडके प्रकाशन कोल्हापूर.

५. OECD Report (2012) " Green Growth and Developing Countries : A Summary for Policy Makers, www.oecd.org/dac/greengrowth.

६. Reports (2015), "Sustainable Development Goals", United Nations Resident Coordinator's office India- New Delhi, www. is.one. un.org.

७. इंगळे जयवंत, 'शाश्वत विकास' (Sustainable Development), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २०१५.


❑❑❑

घटक २

# आर्थिक विकास आणि वृद्धी–भाग २

## (Economic Development and Growth)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ प्राथमिक, द्वितीय व तृतीय क्षेत्राची विकासातील भूमिका

२.२.२ सरकारची आर्थिक विकासातील भूमिका

२.२.३ राजकोषीय धोरण, चलनविषयक धोरण आणि आर्थिक विकास

२.२.४ भांडवल संचय आणि आर्थिक विकास

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न

२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी प्रश्न

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची यादी

## २.० उद्दिष्टे :

आर्थिक विकास आणि वृद्धी या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

१. देशाच्या आर्थिक विकासातील कृषी क्षेत्राचे (प्राथमिक क्षेत्राचे) असलेले महत्त्व समजून येईल.

२. द्वितीय क्षेत्राची (औद्योगिक क्षेत्राची) राष्ट्राच्या आर्थिक विकासातील भूमिका समजेल.

३. देशाच्या आर्थिक विकासातील तृतीय क्षेत्राची (व्यापार आणि सेवा क्षेत्राची) भूमिका समजेल.

४. सरकारचे आर्थिक विकासातील महत्त्व समजेल.

५. राजकोषीय धोरण आणि आर्थिक विकास यांच्यातील संबंध समजतील.

६. चलनविषयक धोरणाची राष्ट्राच्या आर्थिक विकासातील भूमिका समजेल.

७. भांडवल संचय आणि आर्थिक विकास यांच्यातील संबंध समजतील.

## २.१ प्रास्ताविक :

ज्या राष्ट्रांचा आर्थिक विकास झालेला आहे अशा राष्ट्रांना विकसित राष्ट्र (Developed Country) असे म्हणतात. अशा देशांची अर्थव्यवस्था विकसित अर्थव्यवस्था (Developed Economy) असते. अशा विकसित राष्ट्रांना प्रगत राष्ट्रे, श्रीमंत देश असेही म्हणतात. अशा विकसित राष्ट्रांच्या संदर्भात 'आर्थिक वृद्धी' (Economic Growth) ही संकल्पना वापरली जाते. तर अविकसित आणि विकसनशील देशांच्या बाबतीत 'आर्थिक विकास' (Economic Development) ही संकल्पना वापरली जाते. ज्या राष्ट्राचा आर्थिक विकास झालेला नाही किंवा ज्या राष्ट्रातील प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय ही अर्थव्यवस्थेची सर्व क्षेत्रे मागासलेली आहेत अशा राष्ट्रांना अविकसित राष्ट्र (Undeveloped Country) किंवा मागासलेली अर्थव्यवस्था (Backward Economy) अथवा अप्रगत देश असे म्हणतात. आणि जी राष्ट्रे प्रगत किंवा विकसित नाहीत परंतु अप्रगत किंवा मागासलेली सुद्धा नाहीत अशा राष्ट्रांना विकसनशील देश (Developing Country) किंवा विकसनशील अर्थव्यवस्था (Developing Economy) असे म्हणतात. अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या संदर्भात 'आर्थिक विकास' (Economic Development) ही संकल्पना वापरली जाते. अशा प्रकारे विकास (Development) ही संकल्पना वृद्धी (Growth) या संकल्पनेपेक्षा काहीशी वेगळी आहे. वृद्धी (Growth) ही विकासानंतरची (Development) अवस्था आहे.

## २.२ विषय विवेचन :

आर्थिक विकासात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सरकारच्या प्रयत्नाशिवाय, सरकारच्या मदतीशिवाय कोणताही देश आर्थिक विकास करू शकत नाही. देशाचा विकास पूर्ण झाल्यानंतरसुद्धा सरकारचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व कमी होत नाही. देशाचा आर्थिक विकास झाल्यानंतर राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात जी वाढ घडून येते त्याला आर्थिक वृद्धी (Economic Growth) असे म्हणतात. या आर्थिक वृद्धीमध्ये सुद्धा सरकारची भूमिका खूप महत्त्वाची असते. झालेला आर्थिक विकास टिकवून ठेवणे सुद्धा महत्त्वाचे असते. म्हणून राष्ट्राचा आर्थिक विकास पूर्ण झाल्यानंतर देखील सरकारची भूमिका संपत नाही किंवा अर्थव्यवस्थेतील सरकारचे महत्त्व कमी होत नाही. व्यापारविषयक धोरण, चलनविषयक धोरण आणि राजकोषीय धोरण योग्य

प्रकारे बनवून सरकार देशाचा मागासलेपणा घालवून देशाचा आर्थिक विकास घडवून आणते. तसेच झालेला विकास टिकवून त्यामध्ये वाढ किंवा वृद्धी करण्याचे कार्यही सरकार करत असते. अशा प्रकारे अर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी घडवून आणण्यात सरकारची भूमिका महत्त्वपूर्ण असते. कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासात प्राथमिक (कृषी), द्वितीय (उद्योग) आणि तृतीय (व्यापार व सेवा) क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अर्थव्यवस्थेच्या या तिन्ही क्षेत्रावर राष्ट्राचा आर्थिक विकास अवलंबून असतो. तसेच भांडवल निर्मिती किंवा भांडवल संचयावरही देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. या घटकात कृषी, उद्योग आणि व्यापार व सेवा क्षेत्राची आर्थिक विकासातील भूमिका, सरकारच्या राजकोषीय आणि चलनविषयक धोरणाची आणि भांडवलाची आर्थिक विकास आणि वृद्धीमधील भूमिका स्पष्ट केली आहे.

### २.२.१ प्राथमिक क्षेत्राची आर्थिक विकासातील भूमिका : (Role of Primary Sector in Economic Development) :

**प्रास्ताविक :**

कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय अशा तीन क्षेत्रात विभागलेली असते. प्राथमिक क्षेत्रात शेती, जंगल, पशुपालन, मासेमारी व्यवसाय इत्यादी प्राथमिक व्यवसाय समाविष्ट असतात. परंतु प्राथमिक क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या एकूण व्यवसायापैकी शेतीपासून ९० टक्केपेक्षा अधिक उत्पन्न मिळत असल्याने प्राथमिक क्षेत्राला कृषी क्षेत्र किंवा शेती क्षेत्र असे म्हणतात. अर्थव्यवस्थेच्या द्वितीय क्षेत्रात लहान, मध्यम आणि मोठ्या अशा सर्व उद्योगांचा किंवा कारखान्यांचा समावेश होत असतो. म्हणून द्वितीय क्षेत्रास औद्योगिक क्षेत्र किंवा कारखानदारी क्षेत्र असे म्हणतात. तृतीय क्षेत्रामध्ये व्यापार, वाहतूक, दळणवळण, आरोग्य, शिक्षण, विमा, पर्यटन इत्यादी व्यवसायांचा समावेश होत असतो. तृतीय क्षेत्रास व्यापार व सेवा क्षेत्र असे म्हणतात. प्राथमिक (कृषी), द्वितीय (औद्योगिक) आणि तृतीय (व्यापार व सेवा) या तीन क्षेत्रांची देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका असते. या तिन्ही क्षेत्रात वस्तू आणि सेवांची निर्मिती होत असते. प्राथमिक क्षेत्रात तयार होणाऱ्या वस्तूंना प्राथमिक वस्तू (Primary goods) असे म्हणतात. द्वितीय क्षेत्रात तयार होणाऱ्या वस्तूंना औद्योगिक वस्तू किंवा कारखानदारी वस्तू (Industrial goods) असे म्हणतात. तृतीय क्षेत्रात वस्तूंची निर्मिती होत नाही. तर सेवांची निर्मिती होत असते. उदाहरणार्थ प्रवासी सेवा, माल वाहतूक सेवा, बँकिंग सेवा, चार्टर्ड अकौंटंटची सेवा, दळणवळण सेवा, आरोग्य सेवा, शैक्षणिक सेवा अशा विविध प्रकारच्या सेवा जनतेला पुरवल्या जात असतात. तसेच प्राथमिक आणि द्वितीय क्षेत्रात तयार होणाऱ्या वस्तूंची खरेदी आणि विक्री किंवा व्यापार तृतीय क्षेत्रात होत असतो. अशा प्रकारे तृतीय क्षेत्रात वस्तूंचा व्यापार चालत असतो आणि विविध प्रकारच्या सेवांची निर्मिती होत असते. म्हणून तृतीय क्षेत्राला व्यापार आणि सेवा क्षेत्र (Trade & Service Sector) असे म्हणतात. प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रात ज्या वस्तू आणि सेवा तयार होतात त्यांना उत्पादन (Production) असे म्हणतात. एका वर्षाच्या कालावधीत देशात तयार झालेल्या वस्तू आणि सेवांची एकूण संख्या म्हणजे राष्ट्रीय उत्पादन (National Production) होय. आणि या राष्ट्रीय उत्पादनाची पैशातील किंमत म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न (National Income) होय. राष्ट्रीय उत्पादन वस्तू आणि सेवांच्या संख्येत सांगतात. तर राष्ट्रीय उत्पन्न पैशात सांगतात. वस्तू आणि सेवांच्या संख्येला किंमतीने गुणून राष्ट्रीय उत्पन्न काढतात. राष्ट्रीय उत्पादनावर किंवा राष्ट्रीय उत्पन्नावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून

असतो. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जितके जास्त तितका देशाचा आर्थिक विकास दर अधिक असतो. राष्ट्रीय उत्पन्नावर देश अविकसित, विकसित की विकसनशील आहे ते ठरत असते. देशाला प्रगत किंवा विकसित बनवण्यासाठी अप्रगत आणि विकसनशील देश देशाच्या प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्राच्या प्रगतीकडे लक्ष देत असतात. कारण राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती या तीन क्षेत्रातच होत असते. अशा प्रकारे राष्ट्राच्या आर्थिक विकासात प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय अशा तिन्ही क्षेत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. विकसित, अविकसित आणि विकसनशील अर्थव्यवस्था अशा तीन प्रकारच्या अर्थव्यवस्था असलेले देश जगात आढळून येतात. या तिन्ही प्रकारच्या देशात प्राथमिक (कृषी), द्वितीय (उद्योग) आणि तृतीय (व्यापार व सेवा) क्षेत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आज जगात १० ते १२ जे विकसित देश आढळतात हे देश प्रारंभीच्या काळात अप्रगत होते आणि ते कृषी क्षेत्रावरच अवलंबून होते. त्यांच्या विकासात कृषी क्षेत्राचा किंवा प्राथमिक क्षेत्रांचा वाटा मोठा आणि मोलाचा होता. जगातील अनेक देशांची अर्थव्यवस्था आजही 'कृषीप्रधान अर्थव्यवस्था' (Agricultural Economy) म्हणून ओळखली जाते. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी आणि त्यानंतरची अनेक दशके कृषीप्रधानच होता. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक क्षेत्राची, व्यापार व सेवा क्षेत्राची चांगली प्रगती झाली असली तरी भारतीय अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्राचे (कृषी क्षेत्राचे) महत्त्व फारसे कमी झालेले नाही. भारतासारख्या राष्ट्रांना विकसित राष्ट्र बनवण्याची क्षमता कृषी क्षेत्रामध्ये आहे. कोणत्याही राष्ट्राचा आर्थिक विकास कोणत्याही एका क्षेत्रावर अवलंबून नसतो. अर्थव्यवस्थेची तिन्ही क्षेत्रांचा विकास झाल्याशिवाय राष्ट्राच्या विकासाचा वेग वाढत नाही. म्हणून सरकारला प्राथमिक, द्वितीय आणि आणि तृतीय अशा तिन्ही क्षेत्रांच्या विकासाकडे लक्ष द्यावे लागत असते. तसेच सर्व क्षेत्रांचा विकास एकमेकावर अवलंबून असतो. एका क्षेत्राच्या विकासामुळे इतर क्षेत्रांचा विकास होत असतो. अशा प्रकारे अर्थव्यव्थेची सर्व क्षेत्रे परस्परपूरक आणि परस्पर सहाय्यक असतात. देशाचा आर्थिक विकास जसजसा होत. जातो तसतसे अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्राचे (शेतीचे) महत्त्व कमी कमी होत जाते आणि द्वितीय (औद्योगिक) आणि तृतीय (व्यापार व सेवा क्षेत्राचे) महत्व वाढत जाते हा अनेक देशांचा अनुभव आहे. भारतालाही तोच अनुभव येत आहे. असे असले तरी शेतीच्या विकासाकडे कोणत्याही राष्ट्राला दुर्लक्ष करून चालत नाही. कारण भारतासारख्या राष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील अनेक उद्योग कच्च्या मालासाठी शेतीवर अवलंबून आहेत. तसेच तृतीय क्षेत्रात जो व्यापार चालतो, जी वाहतूक चालते त्यामध्ये प्राथमिक वस्तूंचा (विशेषत: शेतमालाचा) वाटा लक्षणीय आहे.




**(अ) प्राथमिक क्षेत्र** (Primary Sector) **:**

प्राथमिक क्षेत्रात खालील घटकांचा समावेश होतो.

१) शेती व्यवसाय (Agriculture and Horticulture)

२) पशुपालन (Animal Husbandary and Dairy), कुक्कुट पालन, दूध व्यवसाय, मधमाशी पालन.

३) मासेमारी (Fisheries)

४) जंगल (Forestry and Logging) लाकूड, कागद उत्पादन.

५) खाण व्यवसाय (Mining and Quarrying) कोळसा, तेल, लोखंड, नैसर्गिक गॅस इत्यादी.

प्राथमिक क्षेत्रात तयार होणाऱ्या वस्तूंना प्राथमिक वस्तू (Primary goods) असे म्हणतात. प्राथमिक क्षेत्रातील शेती व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय मानला जातो. कारण ९० टक्केपेक्षा अधिक उत्पन्न शेतीपासून प्राप्त होते. प्राथमिक क्षेत्रापासून राष्ट्रीय उत्पन्नात जी भर पडते त्यामध्ये शेतीचा वाटा मोठा आहे. खालील तक्ता क्रमांक १ मध्ये प्राथमिक क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा दर्शवला आहे.

**तक्ता क्रमांक १**

**प्राथमिक क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा**

| अनु. क्र. | वर्ष | शेती आणि शेती संलग्न व्यवसांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) | खाण व्यवसायाचा (Mining & Quarrying) राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) | एकूण प्राथमिक क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१८ | १६.५० | २.०० | १८.५० |
| २ | २०२० | १७.८० | १.८० | १९.६० |
| ३ | २०२३ | १८.२० | १.७० | १९.९० |

वरील तक्ता क्रमांक १ वरून असे दिसते की, सन २०१८ मध्ये प्राथमिक क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १८.५० टक्के होता. तो सन २०२० मध्ये १९.६० टक्के आणि सन २०२३ मध्ये १९.९० टक्के एवढा वाढला.

सन २०१८ मध्ये कृषी आणि कृषी संलग्न व्यवसायांचा राष्ट्रीय उत्पन्नात वाटा १६.५० टक्के होता. तो २०२० मध्ये १७.८० टक्के आणि २०२३ मध्ये १८.२० टक्के एवढा वाढला. खाण व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा सन २०१८ पासून घटत गेल्याचे दिसते. सन २०१८ मध्ये खाण व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नात वाटा २ टक्के होता. तो २०२० मध्ये १.८० टक्के आणि २०२३ मध्ये १.७० टक्के एवढ घटला. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचा वाटा ५५.४० टक्के एवढा होता. तो सन २०२३ मध्ये

१९.९० टक्के एवढा कमी झाल्याचे दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर म्हणजे सन १९५१ नंतर भारतात द्वितीय आणि तृतीय क्षेत्राची प्रगती झाली. त्यामुळे १९५१ नंतर राष्ट्रीय उत्पन्नातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा घटत गेल्याचे दिसते.

**आर्थिक विकासात शेतीक्षेत्राची भूमिका :**

आर्थिक विकास ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असते. देशाचा आर्थिक विकास पाच-दहा वर्षात घडून येत नाही. अविकसित देश विकसित बनण्यासाठी १०० ते २०० वर्षाचा काळ जावा लागतो. म्हणून ज्या दीर्घकालीन विकास प्रक्रियेमुळे देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात वाढ घडून येते, त्या प्रक्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात. किंवा ज्या विकास प्रक्रियेमुळे सार्वत्रिक दारिद्र्यात घट घडून येत असते त्या प्रक्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात. अविकसित आणि विकसनशील देशांच्या विकासात शेती क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कारण या देशात द्वितीय आणि तृतीय क्षेत्राचा फारसा विकास झालेला नसतो. अविकसित देशात तर द्वितीय आणि तृतीय क्षेत्रे खूपच मागासलेली असतात. शेतीक्षेत्रही फारसे प्रगत नसते. अविकसित आणि विकसनशील देशात उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण मोठे असते. द्वितीय आणि तृतीय क्षेत्र मागासलेले असल्याने राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा लक्षणीय असतो. सन १९५०-५१ मध्ये प्राथमिक देशाचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ५५.४० टक्के होता. तो सन २०२३-२४ मध्ये १९.७० टक्के एवढा होता. जरी विकसित देशातील द्वितीय आणि तृतीय क्षेत्राची मोठी प्रगती झाली असली तरी देशाच्या आर्थिक विकासातील कृषी क्षेत्राचे महत्त्व कमी झाले असे म्हणता येणार नाही. कारण अन्नधान्य आणि बराचसा कच्चा माल कृषी क्षेत्रच पुरवत असते. तसेच कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विकास एकमेकांवर अवलंबून असल्याने राष्ट्राच्या जलद आर्थिक विकासासाठी अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांच्या प्रगतीकडे सरकारला लक्ष द्यावे लागते. आर्थिक विकासात कृषी क्षेत्र पार पाडत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट केली आहे.

**१) राष्ट्रीय उत्पन्नात महत्त्वपूर्ण योगदान :**

अविकसित आणि विकसनशील राष्ट्रात शेती हाच महत्त्वाचा व्यवसाय असतो. कारण अर्थव्यवस्थेची द्वितीय (औद्योगिक) आणि तृतीय (व्यापार व सेवा) ही दोन क्षेत्रे मागासलेली किंवा कमी विकसित असतात. त्यामुळे प्राथमिक क्षेत्रापासून किंवा शेतीपासून राष्ट्रीय उत्पन्नात पडणारी भर मोठी किंवा लक्षणीय असते. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी हे दाखवून दिले आहे. राष्ट्रीय उत्पन्नावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. राष्ट्रीय उत्पन्न निर्मितीचा वेग जितका जास्त तितका देशाच्या विकासाचा वेग जास्त राहतो. 'राष्ट्रीय उत्पन्न' हा आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा दर्शक (Indicator) आहे. राष्ट्रीय उत्पन्नाला आर्थिक विकासाच्या मोजमापाचे साधन असे म्हणतात. देशात एका वर्षाच्या कालावधीत तयार झालेल्या वस्तू आणि सेवांची (उत्पादनाची) पैशातील किंमत म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. राष्ट्रीय उत्पादनाची (राष्ट्रीय उत्पन्नाची) निर्मिती अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक (कृषी), द्वितीय (उद्योग) आणि तृतीय (व्यापार व सेवा) या तीन क्षेत्रात होत असते. या तिन्ही

क्षेत्रातून राष्ट्रीय उत्पन्नात भर पडत असते. विकासाच्या सुरवातीच्या अवस्थेत अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा मोठा असतो. खालील तक्त्यावरून ही बाब आपल्या लक्षात येईल. खालील तक्त्यात भारताचा विविध वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाचा वाटा दर्शवला आहे.

**तक्ता क्रमांक १**

**कृषी क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा**

| अनु. क्र. | वर्ष | कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) |
|---|---|---|
| १ | १९५०-५१ | ५६.५० |
| २ | २०१०-११ | १४.४० |
| ३ | २०२०-२१ | १८.९७ |
| ४ | २०२२-२३ | १८.४२ |
| ५ | २०२३-२४ | १४.३० |

**स्रोत :** १) दत्त व सुंदरम, 'इंडियन इकॉनॉमी', ६५ वी आवृत्ती.

२) www.pig.gov.in

वरील तक्ता क्रमांक १ वरून असे दिसते की, सन १९५०-५१ च्या तुलनेत सन २०२३-२४ मध्ये कृषी क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा खूपच घटला आहे. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ५६.५० टक्के इतका होता. तो २०२३-२४ मध्ये १४.३० टक्के एवढा घटला आहे. भारताला सन १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी भारत अविकसित राष्ट्र होते. सर्व क्षेत्रात भारत मागासलेला होता. द्वितीय (उद्योग) आणि तृतीय (व्यापार व सेवा) ही क्षेत्रे मागासलेली होती. भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान होती. त्यामुळे सन १९५१ साली भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात द्वितीय आणि तृतीय क्षेत्राचा वाटा खूपच कमी होता आणि प्राथमिक क्षेत्राचा (शेतीचा) वाटा खूप जास्त म्हणजे ५६.५० टक्के एवढा होता. सन १९५१ साली भारत अप्रगत राष्ट्र होते आणि भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा निम्म्यापेक्षा अधिक होता. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील (GDP मधील) शेती क्षेत्राचा हिस्सा १९५० पासून दरवर्षी घटत आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतात द्वितीय (उद्योग) आणि तृतीय क्षेत्राची (व्यापार व सेवा) वेगाने होत असलेली प्रगती हे आहे. भारतात दिवसेंदिवस औद्योगिक, व्यापार व सेवा क्षेत्राची प्रगती होत जाणार असल्याने भविष्यात भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा घटत जाणार आहे. विकासाच्या

सुरवातीच्या अवस्थेत (देश अविकसित किंवा मागासलेला असताना) देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा लक्षणीय असतो हे जगातील अनेक राष्ट्रांनी दाखवून दिले आहे. अशा प्रकारे अप्रगत देशाच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण असते. कारण अशा राष्ट्रातील द्वितीय आणि तृतीय क्षेत्रे मागासलेली असतात.

**विकसित राष्ट्रातील राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा :**

खालील तक्ता क्रमांक २ मध्ये जगातील काही प्रमुख विकसित राष्ट्रातील राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा किती वाटा आहे ते दर्शवले आहे.

**तक्ता क्रमांक २**

**विकसित राष्ट्रातील राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा**

| **अनु. क्र.** | **देशाचे नाव** | **कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%)** |
|---|---|---|
| १ | जर्मनी | १ |
| २ | जपान | १ |
| ३ | फ्रान्स | ३ |
| ४ | इंग्लंड | २ |
| ५ | अमेरिका | ३ |
| ६ | ऑस्ट्रेलिया | ५ |

वरील तक्ता क्रमांक २ वरून असे दिसते की, विकसित राष्ट्रात राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा १ ते ५ टक्के एवढाच आहे. जर्मनी, जपान, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया ही सर्व विकसित राष्ट्रे असून या देशातील कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा अत्यंत नगण्य आहे. विकसित देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात औद्योगिक आणि व्यापार व सेवा क्षेत्राचा वाटा ९५ ते ९९ टक्के एवढा मोठा आहे. परंतु ही विकसित राष्ट्रे जेव्हा अविकसित होती तेव्हा त्यांच्या देशातील राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा मोठा होता.

विकसित राष्ट्रांशी तुलना करता भारतीय शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा आजही लक्षणीय आहे. शेतीपासून राष्ट्रीय उत्पन्नात १४.३० टक्के एवढी भर पडत असून शेतीचे आर्थिक विकासातील महत्व संपुष्टात आलेले नाही हे वास्तव आहे. देशाचा जसजसा आर्थिक विकास होत जातो तसतसे राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचे

योगदान कमी होत जाते. परंतु देश अप्रगत किंवा मागासलेला असताना शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा मोठा असतो आणि तो महत्त्वपूर्ण असतो.

**२) रोजगार निर्मितीत महत्त्वाची भूमिका :**

जगातील बहुसंख्य अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांत लोकसंख्या प्रचंड (अतिरिक्त) असते. अशा राष्ट्रात रोजगार निर्मितीत प्राथमिक क्षेत्राची (कृषी क्षेत्राची) भूमिका महत्त्वाची असते. विकासाच्या सुरवातीच्या अवस्थेत म्हणजे देश अविकसित किंवा मागासलेला असताना देशातील जास्तीत जास्त लोकांना रोजगार पुरवण्यात कृषी क्षेत्रच आघाडीवर असते. कारण अप्रगत देशात कारखानदारी क्षेत्र, व्यापार व सेवा क्षेत्र मागासलेले असते. बहुसंख्य लोक ग्रामीण भागात वास्तव्य करत असतात. ते उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी कृषी क्षेत्रावरच अवलंबून असतात. आज जी राष्ट्रे विकसित आहेत ती राष्ट्रे अप्रगत असताना रोजगाराच्या बाबतीत कृषी क्षेत्रावरच अवलंबून होती. ५० टक्केपेक्षा अधिक रोजगार कृषी क्षेत्राकडून पुरवला जात होता. खालील तक्ता क्रमांक ३ मध्ये अमेरिकेत सन १८७० मध्ये आणि सन १९९४ मध्ये किती लोक उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी शेतीवर अवलंबून होते याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ३**

**अमेरिकेत कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण**

| अनु. क्र. | वर्ष | शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण (%) |
|---|---|---|
| १ | १८७० | ५० टक्के |
| २ | १९९४ | ०२ टक्के |

**स्रोत :** कविमंडन विजय (डॉ.) विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २०१९.

वरील तक्ता क्रमांक ३ वरून असे दिसते की, अमेरिकेत सन १८७० मध्ये एकूण कार्यकारी (उत्पादक) लोकसंख्येपैकी ५० टक्के लोक शेतीवर अवलंबून होते. तर १९९४ मध्ये केवळ २ टक्के लोक शेतीवर अवलंबून होते. अमेरिका हा आज जगातील एक प्रमुख विकसित देश असून आज शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण तेथे खूपच कमी आहे. परंतु विकासाच्या सुरवातीच्या अवस्थेत म्हणजे अमेरिका द्वितीय आणि तृतीय क्षेत्रात अप्रगत असताना अमेरिकेत उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण मोठे होते. अमेरिकेची जसजशी आर्थिक प्रगती होत गेली तसतसे अमेरिकेत शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण घटत गेले. अमेरिकेत द्वितीय (उद्योग) आणि तृतीय (व्यापार व सेवा) क्षेत्राचा मोठा विकास झाल्याने तेथे कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण खूपच घटले आहे.

खालील तक्ता क्रमांक ४ मध्ये जपानमध्ये एकूण कार्यकारी लोकसंख्येपैकी किती टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ४**

**जपानमध्ये शेती क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण**

| अनु. क्र. | वर्ष | शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण (%) |
|---|---|---|
| १ | १८७७ | ८३ टक्के |
| २ | १९९४ | ०५ टक्के |

**स्रोत :** कविमंडन विजय (डॉ.) विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २०१९.

वरील तक्ता क्रमांक ३ वरून असे दिसते की, जपानमध्ये सन १८७७ मध्ये एकूण कार्यकारी लोकसंख्येपैकी ८३ टक्के लोक जगण्यासाठी (उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी) शेतीवर अवलंबून होते. १९९४ मध्ये हे प्रमाण ०५ टक्के पर्यंत घटते. जपान हा सुद्धा अमेरिकेप्रमाणे एक विकसित देश असून जपानमध्ये उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्राची मोठी प्रगती झाली असल्याने जपानमध्ये शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण ८३ टक्क्यावरून ५ टक्केपर्यंत घटले आहे.

**भारतातील शेतकरी आणि शेतमजूर यांची संख्या :**

खालील तक्ता क्रमांक ४ मध्ये भारतातील विविध वर्षातील शेतकरी आणि शेतमजूर यांची संख्या दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ४**

**भारतातील शेतकरी आणि शेतमजूर यांची संख्या**

| अनु. क्र. | वर्ष | एकूण श्रमिक (दशलक्ष) | शेतकरी (दशलक्ष) | शेतमजूर (दशलक्ष) | शेतकरी व शेतमजूर (दशलक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९५१ | १३९.५० | ६९.९० | २७.३० | ९७.२० |
| २ | १९८१ | २४४.६० | ९२.५० | ५५.५० | १४८.०० |
| ३ | २०११ | ४८१.९० | ११८.८० | १४४.३० | २६३.१० |

वरील तक्ता क्रमांक ४ वरून असे दिसते की, भारतात उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण प्रत्येक जनगणनेत वाढत गेले आहे. सन १९५१ मध्ये शेतकरी व शेतमजूर यांची एकूण संख्या भारतात ९७.२० दशलक्ष होती. ती १९८१ मध्ये १४८ दशलक्ष आणि २०११ मध्ये २६३.१० दशलक्ष एवढी वाढली. १९५१ च्या तुलनेत सन २०११ मध्ये शेतीवर जगण्यासाठी अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण अडीचपटीपेक्षा अधिक वाढल्याचे दिसते. यावरून उपजीविकेचे आणि रोजगार निर्मितीचे साधन म्हणून शेतीचे महत्त्व आजही महत्त्वपूर्ण असल्याचे आपल्या लक्षात येते.

सन १९५१ मध्ये भारतातील शेतकऱ्यांची संख्या ६९.९० दशलक्ष एवढी होती. ती सन २०११ मध्ये ११८.८० दशलक्ष एवढी वाढली. सन १९५१ मध्ये शेमजूरांची संख्या देशात २७.३० दशलक्ष होती. ती २०११ मध्ये १४४.३० दशलक्ष एवढी वाढली. अशा प्रकारे भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या सतत वाढत आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीत शेतीचे असणारे महत्त्व आपल्या देशात आजही कमी झालेले नाही.

खालील तक्ता क्रमांक ५ मध्ये भारतातील विविध जनगणना वर्षातील शेतकरी व शेमजूर यांचे (शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे) शेकडा प्रमाण दर्शवले आहे.

**तक्ता क्रमांक ५**

**शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे शेकडा प्रमाण**

| अनु. क्र. | वर्ष | शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण (शेतकरी व शेतमजूर) |
|---|---|---|
| १ | १९५१ | ६९.६७ टक्के |
| २ | १९८१ | ६०.५० टक्के |
| ३ | २०११ | ५४.५९ टक्के |
| ४ | २०२३ | ४४.०० टक्के |

वरील तक्ता क्रमांक ५ वरून असे दिसते की, १९५१ च्या तुलनेत सन २०२३ मध्ये भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण बरेच घटले आहे. सन १९५१ मध्ये भारतात जवळ जवळ ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून होते. सन २०२३ मध्ये हे प्रमाण ४४ टक्क्यावर आले आहे.

**भारतातील शेतकरी आणि शेतमजूर यांचे प्रमाण :**

खालील तक्ता क्रमांक ६ मध्ये भारतातील विविध वर्षातील शेतकरी आणि शेतमजूर यांचे प्रमाण दर्शवले आहे.

**तक्ता क्रमांक ६**

**भारतातील शेतकरी आणि शेतमजूर यांचे प्रमाण**

| अनु. क्र. | वर्ष | शेतकरी (%) | शेतमजूर (%) | इतर श्रमिक (%) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९५१ | ५०% | २०% | ३०% | १००% |
| २ | २०११ | २५% | ३०% | ४५% | १००% |

वरील तक्ता क्रमांक ६ वरून असे दिसते की, सन १९५१ मध्ये भारतात शेतकऱ्यांचे प्रमाण ५० टक्के होते ते सन २०११ मध्ये २५ टक्के एवढे घटले. सन १९५१ मध्ये भारतात शेतमजूरांचे प्रमाण २० टक्के होते ते सन २०११ मध्ये ३० टक्के एवढे वाढले. भारतात शेतकऱ्यांचे प्रमाण घटत असून शेतमजूरांचे प्रमाण वाढत आहे, हे स्पष्ट होते. तसेच भारतात सन १९५१ मध्ये शेतकरी व शेतमजूर सोडून इतर श्रमिकांचे प्रमाण ३० टक्के होते. ते सन २०११ मध्ये ४५ टक्के एवढे वाढले आहे. भारतात सन १९५१ मध्ये शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे (शेतकरी व शेतमजूर) प्रमाण ७०% होते. ते २०११ मध्ये ५५ टक्के एवढे घटले असून याच कालावधीत इतर श्रमिकांचे प्रमाण ३० टक्क्यावरून ४५ टक्के एवढे वाढल्याचे दिसते.

**काही विकसित राष्ट्रातील कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण :**

खालील तक्ता क्रमांक ८ मध्ये जगातील काही विकसित राष्ट्रात सध्या कृषी क्षेत्रात किती टक्के लोक काम करत आहेत ते दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ८**

**काही विकसित राष्ट्रातील कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण**

| अनु. क्र. | देशाचे नाव | कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | इंग्लंड | २ टक्के |
| २ | अमेरिका | २ टक्के |
| ३ | फ्रान्स | ७ टक्के |
| ४ | ऑस्ट्रेलिया | ६ टक्के |
| ५ | जपान | ५ टक्के |

वरील तक्ता क्रमांक ८ वरून असे दिसते की, इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया आणि जपान या विकसित देशात रोजगारासाठी आणि उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण भारताच्या तुलनेत खूपच कमी आहे. भारतात आजही सुमारे ४५ टक्के लोक उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी प्राथमिक क्षेत्रावर (कृषी क्षेत्रावर) अवलंबून आहेत. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्व फारसे कमी झालेले नाही.

**३) इतर क्षेत्रांना मनुष्यबळाची उपलब्धता :**

बहुसंख्य अविकसित आणि विकसनशील देशात लोकसंख्या प्रचंड असते आणि कारखानदारी, व्यापार, सेवा ही क्षेत्रे मागासलेली असल्याने अशा देशात कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या मोठी असते. म्हणून प्रचंड लोकसंख्या असलेल्या कृषीप्रधान देशात शेती क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला तर कृषी क्षेत्रात बेकारी वाढते. हे खरे असले तरी या बेरोजगारांना थोडे औद्योगिक प्रशिक्षण दिले तर त्यांना उद्योग क्षेत्रात काम देता येते. सेवा क्षेत्रातही काही प्रमाणात अकुशल कामगारांची गरज असते. त्यामुळे ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रात अतिरिक्त ठरलेल्या श्रमिकांना सेवा क्षेत्रात सुद्धा वळवता येते. अशा प्रकारे कृषी क्षेत्रातील अतिरिक्त मजूर अर्थव्यवस्थेच्या कारखानदारी, व्यापार, सेवा इत्यादी क्षेत्रात वळवता येतात. त्यामुळे कृषी क्षेत्राचाही फायदा होतो आणि उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रांचाही फायदा होतो. कृषी क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांचा शेतीला काहीही लाभ होत नाही. कारण अतिरिक्त श्रमिकांची सीमांत उत्पादकता कमी असते किंवा शून्य असते तसेच ती उणे सुद्धा असते. अशा अतिरिक्त शेतमजूरांना कृषी क्षेत्रातून बाहेर काढल्याशिवाय शेतीची प्रगती होत नाही. अशा प्रकारे कृषी क्षेत्राची जसजशी प्रगती होत जाते तसतसे अतिरिक्त ठरणारे मजूर कृषी क्षेत्रातून वळवता येतात. त्यामुळे त्यांची कामगारांची गरज भागू शकते. भारतात प्रत्येक शेतकरी कुटुंबातील किमान एकाने औद्योगिक प्रशिक्षण घ्यावे आणि उद्योग क्षेत्रात उपजीविकेसाठी यावे असे भारत सरकारने प्रयत्न आहेत.

**४) अन्नधान्याचा पुरवठा :**

शेतीत उत्पादित होणारे अन्नधान्य, फळे, भाजीपाला मनुष्याला जगण्यासाठी अत्यंत उपयुक्त असतो. कारण मनुष्याची जगण्याची गरज भागवणारे कृषी उत्पादन हे कृषीशिवाय अन्य कोणत्याही क्षेत्रात तयार होत नाही. अन्नधान्य आणि इतर कृषी उत्पादनासाठी मनुष्याला कृषी क्षेत्रावरच अवलंबून रहावे लागते. जगाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भारतही याला अपवाद नाही. भारताची आजची लोकसंख्या सुमारे १४० कोटी इतकी आहे. भारताच्या लोकसंख्येचा आकार प्रचंड आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्य, डाळी, कडधान्ये, फळे, भाजीपाला यांची मागणी भारतात प्रचंड आहे. तसेच या कृषी मालाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. सुरवातीला म्हणजे १९४७ पासून १९६५ पर्यंत आपणास दरवर्षी अन्नधान्याची आयात करावी लागत होती. परंतु १९६० नंतर भारतात झालेल्या हरित क्रांतीमुळे (जलद कृषी विकासामुळे) भारत अन्नधान्याच्या व इतर काही कृषी उत्पादनांच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. त्यामुळे आता आपणास अन्नधान्याची आयात करावी लागत नाही. गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी या सर्वच पिकांची उत्पादकता दीडपट ते दुप्पट वाढली आहे. तसेच देशात विविध फळांचे उत्पादनही दरवर्षी वाढत आहे. त्यामुळे १४० कोटी लोकसंख्येला

जगवण्यात शेती महत्त्वाची भूमिका बजावत आहे. खालील तक्ता क्रमांक ९ मध्ये भारतातील विविध वर्षातील अन्नधान्य उत्पादनाची माहिती दिली आहे. एकूण अन्नधान्यामध्ये भात (Rice), गहू (Wheat), कडधान्ये (Coarse cereals), डाळी (Pulses) यांचा समावेश आहे.

**तक्ता क्रमांक ९**

**भारतातील विविध वर्षातील अन्नधान्याचे उत्पादन**

| अनु. क्र. | वर्ष | अन्नधान्याचे एकूण उत्पादन (लाख टन) |
|---|---|---|
| १ | १९६६-६७ | ७४२.० |
| २ | १९८०-८१ | १२९६.० |
| ३ | १९९०-९१ | १७६४.० |
| ४ | २०००-२००१ | १९६८.० |
| ५ | २०१०-११ | २४४५.० |
| ६ | २०२३-२४ | ३२८८.५ |

**Source :** Hand Book of Statistics on the Indian Economy 2023-24, RBI, Page No.48.

वरील तक्ता क्रमांक ९ वरून असे दिसते की, भारतात अन्नधान्याचे उत्पादन सतत वाढत आहे. सन १९६६-६७ मध्ये भारतात ७४२ लाख टन एवढे अन्नधान्याचे उत्पादन झाले होते. सन २०२३-२४ मध्ये ३२८८.५ लाख टन एवढे अन्नधान्याचे उत्पादन झाले होते.

**५) औद्योगिक विकासास उपयुक्त :**

कोणत्याही देशातील शेतीची त्या देशाच्या औद्योगिक विकासात महत्त्वाची भूमिका असते. शेतीचा औद्योगिक विकासाला मोठा हातभार लागत असतो. शेतीचा जसजसा विकास होत जातो तसतसा औद्योगिक विकासाचा वेगही वाढत जातो. शेतीच्या उत्पादकतेत वाढ झाली तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे शेतकऱ्यांकडून शेतीची अवजारे (ट्रॅक्टर, नांगर, कुळव), रासायनिक खते व कीटकनाशके यांची मागणी वाढते. या कृषी आदानांचे उत्पादन उद्योग क्षेत्रात होत असल्याने उद्योग क्षेत्राची प्रगती होते. शेतीच्या विकासामुळे शेतीची अवजारे तयार करणाऱ्या कारखान्यांच्या संख्येत वाढ होते. त्याचा फायदा कृषी क्षेत्रालाही होतो आणि कारखानदारी क्षेत्रालाही होतो. कृषी क्षेत्राला आवश्यक असणारी अवजारे कारखानदारी क्षेत्राकडून उपलब्ध होतात. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याशिवाय कृषी आदानांची मागणी वाढत नाही. शेतकरी आपल्या

वाढाव्याचा (शेतीपासून मिळणाऱ्या नफ्याचा) काही भाग कृषी विकासासाठी जसा गुंतवत असतात त्याप्रमाणे उत्पन्नाचा काही हिस्सा राहणीमान उंचावण्यासाठी किंवा उपभोग्य वस्तूंच्या खरेदीसाठी खर्च करत असतात. उदाहरणार्थ, भारतात शेती व्यवसायाच्या विकासामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून चांगल्या दर्जाच्या अंगावरील वस्त्रांना आणि इतर प्रकारच्या कपड्यांना मागणी येत आहे. त्यांच्याकडून औद्योगिक क्षेत्रात तयार होणाऱ्या दुचाकी व चारचाकी गाड्यांना मागणी वाढत आहे. फर्निचर, मोबाईल, वॉशिंग मशीन, फ्रीज, पादत्राणे, टी. व्ही., कॉम्प्युटर, मिक्सर, पंखे इत्यादी विविध उपभोग्य वस्तूंना शेतकऱ्यांकडून मागणी येत आहे आणि या मागणीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. कारण दिवसेंदिवस शेती उत्पन्नात वाढ होत आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांकडून कारखानदारी क्षेत्रात तयार होणाऱ्या कृषी आदानांना आणि उपभोग्य वस्तूंना मागणी वाढत असल्याने कारखानदारी क्षेत्राचा म्हणजेच औद्योगिक क्षेत्राचा सुद्धा वेगाने विकास होत आहे. अशा प्रकारे अविकसित आणि विकसनशील देशांनी कृषी क्षेत्राचा विकास घडवून आणण्यास सुरवात केली तर त्यामुळे केवळ शेतीची प्रगती होत नाही तर त्या देशातील औद्योगक क्षेत्राच्या प्रगतीला सुद्धा हातभार लागतो. तो कसा लागतो त्याचे स्पष्टीकरण वरती विस्ताराने दिले आहे.

**६) कृषी उद्योगांच्या विकासास उपयुक्त :**

साखर उद्योग, कापड उद्योग, ताग उद्योग, खाद्यतेल उद्योग, चहा व कॉफी उद्योग, तंबाखू उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, पशुखाद्य उद्योग इत्यादी उद्योगांना कृषी उद्योग किंवा कृषी आधारित उद्योग (Agro based Industries) असे म्हणतात. कारण या उद्योगांना लागणारा कच्चा माल शेतीतूनच उपलब्ध होतो. कृषी उद्योगांना लागणारा ऊस, कापूस, ताग, तेलबिया, फळे इत्यादी कच्चा माल शेतीतूनच मिळतो. भारतासारख्या अनेक देशांत विविध प्रकारच्या कच्च्या मालाचे (कृषी मालाचे) उत्पादन मोठ्या प्रमाणात तयार होत आहे व त्याच्या उत्पादनात सतत वाढही घडून येत आहे. त्यामुळे भारतात कृषी उद्योगांची वाढ होत आहे. भारतात खाजगी आणि सहकारी क्षेत्रात कृषी उद्योग मोठ्या प्रमाणात उभे राहिले आहेत. या कृषी उद्योगात देशातील लाखो लोक गुंतलेले असून हे उद्योग रोजगार निर्मितीत आघाडीवर असून देशाच्या आर्थिक विकासात चांगली भूमिका बजावत आहेत. कृषी उद्योगांना लागणारा कच्चा माल शेतीतूनच उपलब्ध होत असल्याने कृषी उद्योगांच्या विकासात शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शेतीची उत्पादकता जसजशी वाढत जाईल तसतशी कृषी उद्योगांची संख्या वाढत जाते. म्हणून शेतीची उत्पादकता वाढणे आवश्यक आहे.

**७) जोडधंद्यांचा विकास :**

दुग्धव्यवसाय, कुक्कुट पालन, वराह पालन, शेळी–मेंढी पालन, इमू पालन, मधमाशी पालन इत्यादी अनेक जोडधंदे शेती क्षेत्राशीच संबंधित असून या जोडधंद्यामुळे शेती किफायतशीर बनते. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात चांगली वाढ होते. नुसती शेती फारशी किफायतशीर ठरत नाही. ज्या शेतकऱ्यांचे जमीन धारणक्षेत्र खूपच कमी आहे किंवा धारणक्षेत्र अनार्थिक (uneconomic) आहे अशा शेतकऱ्यांनी कोणता तरी जोडधंदा केलाच पाहिजे. जोडधंद्यासाठी लागणारा चारा, पशुखाद्य इत्यादी शेतीपासूनच मिळत असल्याने हे जोडधंदे शेतीवरच अवलंबून आहेत. काही शेतकरी तर मुख्य व्यवसाय मानल्या जाणाऱ्या शेतीपेक्षा पशुपालनासारख्या जोडधंद्यापासून

अधिक उत्पन्न मिळवतात. दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन इत्यादी जोडधंदे करणाऱ्यांकडे स्वत:च्या मालकीची पुरेशी शेतजमीन असेल तर जोडधंदे त्यांना किफायतशीर ठरतात. शेतीची प्रगती जसजशी होत जाईल तसतशी जोडधंद्यांची प्रगती होत जाणार आहे. शेतीची उत्पादकता वाढत गेली की त्याचा फायदा शेतीवर अवलंबून असणाऱ्या जोडधंद्यांना होतो. भारतातील शेतीशी संबंधित जोडधंद्यांनी लाखो लोकांना रोजगार पुरवला आहे. राष्ट्रीय उत्पन्नातही हे उद्योग चांगली भर घालत आहेत. भारतातील लाखो लोक या विविध जोडधंद्यावर उपजीविका करत आहेत. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि आत्महत्या रोखण्यात जोडधंदे उपयुक्त ठरतात असा भारताचा अनुभव आहे. शेतीशी संबंधित जोडधंद्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात, रोजगारात वाढ होते. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी होतो. शेती क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांनी जोडधंदे सुरू केले तर ग्रामीण भागातील बेकारी तर कमी होईलच. शिवाय शेतीतून अतिरिक्त श्रमिक बाहेर पडल्याने शेती किफायतशीर बनेल. अशा प्रकारे दुग्ध व्यवसाय, पशुपक्षी पालन, कुक्कुट पालन, शेळी-मेंढी पालन हे जोडधंदे कृषी विकास दरात वाढ झाल्यास वाढतात. जोडधंद्यांच्या वाढीमुळे दूध, अंडी, मांस, मासे, मध इत्यादी उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडून येते. जोडधंद्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची (वाढाव्याची) शेतीत गुंतवणूक करून शेतकरी शेतीचाही विकास घडवून आणू शकतात. अशा प्रकारे शेतीमुळे जोडधंद्यांचा विकास होतो आणि जोडधंद्यामुळे शेतीचाही विकास घडून येतो. भारतात दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, शेळी-मेंढी पालन इत्यादी व्यवसाय सध्या तेजीत चालत असून य व्यवसायातील गुंतवणूक दिवसेंदिवस वाढत आहे. कृषीशी संबंधित जोडधंद्यांच्या विकासात कृषी क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

**८) वाहतूक व्यवसायाचा विकास :**

कृषी क्षेत्र देशातील वाहतूक व्यवसायाच्या विकासातही मोलाची भूमिका बजावत असते. कृषी क्षेत्रामुळे रस्ते वाहतूक, जल वाहतूक, हवाई वाहतूक, रेल्वे वाहतूक इत्यादी विविध प्रकारच्या वाहतूक व्यवसायाचा विकास घडून येतो. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात वाहतूक क्षेत्र खूपच मागासलेले असते. कृषी आणि औद्योगिक उत्पादन वाढीचा वेग खूपच कमी असल्याने या मालाची वाहतूक सुद्धा कमी असते आणि फार दूर अंतरावर वाहतूक केली जात नाही. परंतु कृषी क्षेत्राची उत्पादकता जसजशी वाढत जाते तसतशी या मालाची वाहतूक (ने-आण) वाढत जाते. त्यामुळे वाहतूक क्षेत्राच्या प्रगतीला चालना मिळते. भारताचा विचार केला तर भारतातील रस्ते वाहतूक, जल वाहतूक, रेल्वे वाहतूक, विमान वाहतूक इत्यादी विविध प्रकारच्या वाहतूक व्यवसायाच्या विकासात भारतीय शेतीचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे आणि अजूनही वाहतूक व्यवसायाच्या विकासात भारतीय शेती मोलाची भूमिका बजावत आहे. सर्व प्रकारच्या शेतमालाचे उत्पादन भारतात दिवसेंदिवस वाढत असल्याने शेतमालाची वाहतूक करण्यासाठी रेल्वे, मालमोटारी, मालवाहतूक विमाने यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे देशातील वाहतूक व्यवसायाच्या विकासास मोठी मदत होत आहे. खेड्यातून शहरात शेतमालाची वाहतूक करण्यासाठी आणि शहरातील रासायनिक खते, कृषी अवजारे यांची शहरातून खेड्यात वाहतूक करण्यासाठी टेंपो, छोटे हत्ती अशा वाहनांचा देशात मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. देशात असे मालवाहू टेंपो कितीतरी लाख आहेत. वाहतूक साधनांबरोबर वाहतूक मार्ग (रस्ते)

यांचाही शेतीमुळे विकास होत आहे. शेती हळूहळू व्यापारी पद्धतीने केली जात असल्याने शेतीत रासायनिक खतांचा, अवजारांचा वापर वाढत चालला आहे. त्यांची ने-आण करण्यासाठी, ट्रॅक्टर चालवण्यासाठी चांगले रस्ते लागतात. त्यामुळे ग्रामीण भागात नवीन रस्ते तयार केले जात आहेत. जुन्या रस्त्यांची दुरुस्ती आणि रुंदीकरण केले जात आहे. काही कच्च्या रस्त्यांचे रूपांतर पक्क्या रस्त्यामध्ये केले जात आहे. शेतापर्यंत रस्ते तयार केले जात आहेत. पाणंद रस्ते चांगले बनवले जात आहेत. अशा प्रकारे कृषी क्षेत्रामुळे वाहतूक क्षेत्राचा विकास होत आहे. वाहतूक मार्ग, वाहतूकीची साधने यात वाढ व सुधारणा होत आहे. अशा प्रकारे वाहतूक व्यवसायाचा विकास कृषी विकासामुळे वेगाने घडून येतो. कृषी क्षेत्रामुळे वाहतूक क्षेत्राचा विकास होतो आणि वाहतूक क्षेत्राच्या प्रगतीमुळे कृषी विकासाला चालना मिळून कृषी क्षेत्राचा विकास घडून येतो. अशा प्रकारे कृषी क्षेत्राचा विकास आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास एकमेकावर अवलंबून असतो, हे आपल्या लक्षात येते. कृषी क्षेत्रात खाजगी आणि सरकारी गुंतवणूक वाढल्यास कृषी उत्पादनात वाढ होऊन वाहतूक व्यवसायात चांगली वाढ घडून येते.

**९) सरकारच्या उत्पन्नाचे साधन :**

शेतीशी संबंधित विविध बाबीवर जसे की जमीन महसूल, स्टॅम्प ड्युटी, कृषी आदानावरील कर इत्यादीपासून सरकारला मोठा महसूल मिळत असतो. शेतीचा जसजसा विकास होत जातो तसतशी शेतीपासून सरकारला मिळणाऱ्या महसूलात वाढ होत जाते. भारतात हे प्रकर्षाने अनुभवास येत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने कृषी क्षेत्राच्या विकासावर मोठा भर दिला. त्यामुळे कृषी उत्पादनातही वाढ झाली आणि कृषी व्यवसायापासून सरकारला मिळणाऱ्या विविध प्रकारच्या महसूलात सुद्धा वाढ घडून आली. भारतात शेती व्यवसायाचा दिवसेंदिवस विकास होत असल्याने शेतीपासून सरकारला मिळणाऱ्या महसुलात सुद्धा वाढ होत आहे. सरकारला जमीन महसूल, तंबाखूवरील कर इत्यादी विविध प्रकारच्या करापासून दरवर्षी मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. शेतजमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारावर सरकार स्टॅम्प ड्युटी आकारते. त्यापासूनही सरकारला दरवर्षी अब्जावधी रुपयांचा महसूल मिळतो. काही ठिकाणी एक शेतजमीन दोन-तीन वेळा विकली जाते. त्यामुळे सरकारला स्टॅम्प ड्यूटीपासून मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. शेतकरी शेतीसाठी ट्रॅक्टर्स, नांगर इत्यादी विविध अवजारे विकत घेतात. या वस्तूंच्या किंमतीत जे विविध कर समाविष्ट असतात, ते कर शेतकरी भरत असतात. त्यामुळे त्यापासूनही सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. भारतात शेती व्यवसाय जसजसा विकसित होत जाईल तसतसा शेतीपासून मिळणारा महसूल वाढत जाणार आहे. अशा प्रकारे शेती व्यवसायापासून विविध करांच्या पोटी सरकारला दरवर्षी अब्जावधी रूपयांचा महसूल मिळत असल्याने भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्त्व वाढत चालले आहे.

**१०) देशांतर्गत व्यापारात वाढ :**

अंतर्गत व्यापार अत्यंत महत्वाचा असतो. आर्थिक विकासात व्यापाराची भूमिका महत्त्वाची असते. व्यापारात वाढ झाली की आर्थिक विकासाला चालना मिळतते. व्यापारातील वाढीमुळे कृषी उद्योगांच्या विकासाला जसा हातभार लागतो त्याप्रमाणे कृषी, उद्योगांच्या विकासामुळे व्यापारवाढीला चालना मिळत

असते. कृषी व्यवसायाच्या विकासाची गती वाढल्याशिवाय देशांतर्गत व्यापारात वाढ होत नाही. कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली की कृषी मालाच्या व्यापारात (खरेदी-विक्रीत) मोठी वाढ घडून येते. भारतात अन्नधान्य, फळे, भाजीपाला, चहा, कॉफी, रबर, ऊस, कापूस, हळद, तंबाखू इत्यादी विविध कृषी मालाचे उत्पादन दिवसेंदिवस वाढत आहे. कित्येक कृषी मालाचे उत्पादन तिपटीपेक्षा अधिक वाढले आहे. फळे आणि फुलांच्या उत्पादनात दरवर्षी मोठी वाढ होत आहे. त्यामुळे या कृषी मालाचा देशांतर्गत व्यापारही खूप वाढत चालला आहे. भारतात साखर आणि गुळाचा व्यापारही मोठ्या प्रमाणात चालतो. ठोक व्यापारी, किरकोळ व्यापारी, दलाल, अडते इत्यादी घटकांचा कृषी मालाच्या व्यापाराशी संबंध असून भारतात शेती क्षेत्राने लाखो व्यापारी आणि दलालांना रोजगार पुरवला आहे. अलीकडच्या काळात भारतात ग्रीन हाऊस, पॉली हाऊस इत्यादी आधुनिक पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढत आहे. कारण ग्रीन हाऊस, पॉली हाऊसमधील उत्पादनांना भारतातून आणि जगभरातून मागणी वाढत आहे. त्यामुळे भारतासारख्या अनेक देशात ग्रीन हाऊस आणि पॉली हाऊस मध्ये तयार होणाऱ्या कृषी उत्पादनात आणि व्यापारात वाढ घडून येत आहे. भारतातील लोकांना जेवढे एकूण उत्पन्न मिळते त्यापैकी जवळ जवळ ६३ टक्के रक्कम भारतीय लोक अन्नधान्याच्या खरेदीवर आणि इतर कृषी मालाच्या खरेदीवर खर्च करतात असे राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालात नमूद करण्यात आले आहे. यावरून अन्नधान्याचा आणि इतर कृषी मालाचा अंतर्गत व्यापार किती मोठा आहे याची आपणास कल्पना येते. शेतीचा जसजसा विकास होत जाईल तसतशी देशाच्या अंतर्गत व्यापारात वाढ होत जाणार आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थाही अधिकाधिक मजबूत आणि समृद्ध होत जाणार आहे.

**११) निर्यात व्यापाराच्या दृष्टीने महत्त्व :**

देशाचा आर्थिक विकास हा निर्यात व्यापारावरही अवलंबून असतो. विकसित राष्ट्रांशी तुलना करता भारताचा नियात व्यापार आजही खूपच कमी आहे. परंतु १९५१ शी तुलना करता आज भारताचा निर्यात व्यापार खूपच वाढला आहे. या निर्यात व्यापारात भारतीय शेती महत्त्वाची भूमिका बजावत आहे. निर्यात जेवढी जास्त तेवढे परकीय चलन देशाला जास्त प्रमाणात मिळते. त्या परकीय चलनाचा उपयोग आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढण्यासाठी आणि कृषी, कारखानदारी क्षेत्राला लागणारी खते, सिमेंट, लोखंड, यंत्रसामग्री, सुट्टे भाग आणि नवीन तंत्रज्ञान आयात करण्यासाठी करता येतो व त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढतो. भारतात विविध प्रकारचा शेतमाल जसे की फळे, भाजीपाला, तांदूळ, चहा, कॉफी, तंबाखू यांची मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. या निर्यातीत दिवसेंदिवस वाढ होत असून त्याचा अर्थव्यवस्थेला मोठा लाभ होत आहे. या कृषीमालाचा एकूण निर्यातीत जवळ जवळ ५० टक्के हिस्सा आहे. ताग, कापड, साखर या कृषी क्षेत्राशी संबंधित वस्तूंचा निर्यातीत हिस्सा सुमारे २० टक्के आहे. अशा प्रकारे एकूण निर्यातीत कृषी मालाचा हिस्सा जवळ जवळ ७० टक्के एवढा आहे. शेतमालाच्या निर्यातीपासून सरकारला मिळणाऱ्या परकीय चलनात दरवर्षी वाढ घडून येत आहे. त्यामुळे भारतीय शेतीचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. विकासाच्या सुरवातीच्या अवस्थेत देश औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात खूपच मागासलेला असतो. अशा राष्ट्रांनी कृषी विकासाकडे अधिक लक्ष दिले तर कृषी मालाच्या निर्यातीत वाढ होऊन

मिळणाऱ्या परकीय चलनाचा उपयोग उद्योग क्षेत्रासाठी लागणारी यंत्रे व तंत्रज्ञान विकत घेण्यासाठी करता येतो. अशा प्रकारे अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी कृषी क्षेत्राच्या विकासावर अधिक भर दिला तर कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढून कृषी मालाच्या निर्यातीत वाढ घडवून आणता येते आणि मिळणाऱ्या परकीय चलनाचा वापर कृषी क्षेत्राबरोबर उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासासाठी करता येतो. भारताने हे करून दाखवले आहे.

**१२) बँकिंग क्षेत्राचा विकास आणि विस्तार :**

बँकिंग क्षेत्र हे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. बँकिंग क्षेत्राकडून कृषी, उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्राला अर्थपुरवठा केला जातो. बँकिंग क्षेत्राकडून विविध क्षेत्रांना पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा झाल्यास या क्षेत्रांचा विकास घडून येतो. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांच्या कृषी विकासात बँकिंग क्षेत्राची भूमिका खूपच महत्त्वाची असते. कारण शेती मागासलेली असते आणि शेतीला कर्जाची खूप गरज असते. असे असले तरी कृषी क्षेत्राकडून कर्जाला मागणी वाढली तर बँकांच्या कर्जपुरवठ्यात वाढ होते. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय शेती ही पूर्णपणे मागासलेली होती. बहुसंख्य शेतकरी गरीब होते. त्यामुळे शेती कर्जाला मागणी कमी होती. तसेच जी काही मागणी होती ती कमी रकमेची होती. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कृषी क्षेत्राला पुरेसा कर्जपुरवठा होईल याची काळजी घेतली. शेतकऱ्यांना शेती कर्ज परवडावे म्हणून सरकारने कमी व्याज दरात कर्ज देण्याचे धोरण स्वीकारले. हे धोरण गेली ८० वर्षे आजही सुरू आहे. त्यामुळे शेती कर्जाची मागणी भारतात वाढली असून त्यामुळे बँक शाखांच्या संख्येत, बँकांच्या संख्येत आणि बँकिंग क्षेत्राकडून केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठ्यात मोठी वाढ घडून आली आहे. भारत सरकारने शेती विकासासाठी अनेक धोरणे राबवण्यास सुरवात केली असल्याने शेतीक्षेत्राकडून दिवसेंदिवस कर्जाला मागणी वाढत आहे. त्यामुळे बँकांचे कर्जाचे व्यवहारही वाढत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात (खेड्यापाड्यात) अनेक बँकांनी आपल्या शाखा काढल्या असून ठेवींचे आणि कर्जाचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. अशा प्रकारे भारतीय कृषी क्षेत्राचा होत असलेल्या विकासामुळे भारतभर बँकांच्या शाखांचे जाळे निर्माण झाले असून त्यांच्या ठेव संकलनात आणि कर्जपुरवठ्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. अशा प्रकारे वरील स्पष्टीकरणावरून आपल्या लक्षात येते की, कृषी विकासात बँकिंग क्षेत्राची भूमिका जशी महत्त्वाची असते तशीच बँकिंग क्षेत्राच्या विकासात कृषी क्षेत्राची भूमिका सुद्धा महत्त्वाची असते. कारण कृषी क्षेत्र आणि बँकिंग क्षेत्र ही दोन्ही क्षेत्रे विकासासाठी परस्परावर अवलंबून असतात. भारतातील बँकिंग क्षेत्र मजबूत होण्यात भारतीय कृषी क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ही भारत सरकारच्या मालकीची बँक असून ही शाखा विस्ताराच्या बाबतीत जगातील सर्वात मोठी दोन क्रमांकाची बँक आहे. या बँकेने भारतातील जवळ जवळ सर्व खेड्यात आपल्या शाखा उघडल्या असून ही बँक कृषी क्षेत्राला अग्रक्रमाने कर्जपुरवठा करत आहे. खाजगी बँका, सरकारी बँका, सहकारी बँका ग्रामीण भागात शाखा उघडून करत असलेल्या बँक व्यवसायामुळे देशात लाखो लोकांना बँकेत रोजगार मिळाला आहे. हे कृषी क्षेत्राचेच योगदान मानता येईल.

**१३) अर्थिक विषमता कमी होण्यास मदत :**

आर्थिक विषमता देशात फार मोठ्या प्रमाणावर असेल तर त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल

परिणाम होतो. तसेच देशात फार मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता असेल तर दंगली किंवा रक्तरंजित क्रांत्या उद्‌भवतात. म्हणून सरकार देशात आर्थिक विषमता फारशी वाढणार नाही याची काळजी घेत असते. ज्या देशात लोकसंख्या प्रचंड प्रमाणावर असते आणि उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून असते अशा देशात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर असते. परंतु सरकारने विविध उपाय योजून शेतीचा विकास घडवून आणला तर शेतीची उत्पादकता वाढून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे आर्थिक विषमता कमी होण्यास सुरवात होते. तसेच शेतीच्या विस्तारामुळे शेती क्षेत्रात रोजगारात वाढ होते. त्यामुळेही लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. तसेच शेतीची जसजशी प्रगती होत जाते तसतसे जोडधंदे (पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन) आणि कृषी पूरक उद्योग (साखर उद्योग, फळप्रक्रिया उद्योग इत्यादी) यांच्यात संख्यात्मक वाढ होऊन तेथे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो. त्यामुळे ग्रामीण भागातील बेकारी कमी होऊन ग्रामीण भागातील आर्थिक विषमता कमी होते. भारतासारख्या अनेक विकसनशील देशात आर्थिक विषमता आढळते. अशा देशांनी आर्थिक विषमता कमी करण्यासाठी कृषी क्षेत्राच्या विकासावर भर दिला तर आर्थिक विषमता कमी होऊ शकते. भारत, चीन या राष्ट्रांनी ते दाखवून दिले आहे.

**१४) अविकसित देशात कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण :**

अविकसित देशात कृषी क्षेत्र अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. ज्या देशात कृषी, उद्योग, व्यापार व सेवा ही सर्व क्षेत्रे मागासलेली असतात अशा देशांना अविकसित देश किंवा मागासलेले देश असे म्हणतात. बहुसंख्य अप्रगत राष्ट्रात लोकसंख्या प्रचंड असते आणि लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा चांगला नसतो. देशात अल्पशिक्षित आणि अशिक्षित लोकांचे प्रमाण मोठे असते. अशा देशातील आर्थिक विकास जवळ जवळ ठप्प झालेला असतो. आर्थिक विकासाची गाडी बंद पडलेली असते आणि ती रुळावरून घसरलेली असते. अप्रगत देशात औद्योगिक, व्यापार व सेवा क्षेत्राचा विकास करण्यासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ (शास्त्रज्ञ, संशोधक, डॉक्टर्स, अभियंते, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, शिक्षक इ.) खूप कमी असते. अप्रगत देशात कुशल मनुष्यबळाची मोठी वाणवा असते. तसेच सरकारकडे आणि खाजगी क्षेत्राकडे भांडवल खूपच कमी असते. त्यामुळे अशा देशात कारखानदारी आणि सेवा क्षेत्राचा विकास करणे मोठे कठीण काम असते. अशा अप्रगत देशांनी प्राथमिक क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिले तर या क्षेत्राची प्रगती होऊ शकते. प्राथमिक क्षेत्रात कृषी, पशुपालन, मासेमारी, जंगल, मधमाशी पालन इत्यादी व्यवसायांचा समावेश होतो. यामध्ये शेती हा मुख्य व्यवसाय आहे. प्राथमिक क्षेत्रात काम करण्यासाठी शिक्षणाची, प्रशिक्षणाची गरज नसते. तसेच औद्योगिक क्षेत्राएवढे प्रचंड भांडवल सुद्धा शेतीत गुंतवावे लागत नाही. कमी भांडवलात प्राथमिक क्षेत्रातील विविध व्यवसाय सुरू करता येतात. अशिक्षित लोक शेती, पशुपालन व्यवसाय करू शकतात. विकासाच्या सुरवातीच्या अवस्थेत अप्रगत देशात अशिक्षित लोकांचे प्रमाण खूप मोठे असते. त्यांचा द्वितीय व तृतीय क्षेत्राला फारसा उपयोग होत नाही. परंतु हे निरक्षर लोक कृषी व इतर प्राथमिक व्यवसाय उत्तम प्रकारे करू शकतात. या निरक्षर आणि अल्पशिक्षित लोकांना थोडेसे भांडवल आणि रास्त दराने कृषी आदाने पुरवली तर लोक कृषी व्यवसाय उत्तम प्रकारे करू शकतात. अशिक्षित, अल्पशिक्षित लोकांच्या सहाय्याने भारताने हरित क्रांती घडवली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी भारतात निरक्षर व अल्पशिक्षित लोकांचे प्रमाण ७० टक्केपेक्षा जास्त होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने शेतीच्या विकासाकडे मोठे लक्ष दिले. देशातील ग्रामीण भागातील अशिक्षित आणि अल्पशिक्षित लोकांच्या मदतीने सरकारने कृषी विकासाच्या योजना राबवल्या आणि कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणली. अशा प्रकारे अप्रगत देशात अशिक्षित लोक मोठ्या प्रमाणात असले तरी आणि भांडवलाची टंचाई असली तरी शेतीचा विकास घडवून आणता येतो. भारतासारख्या अनेक देशांनी हे दाखवून दिले आहे. त्यांनी विकसाच्या सुरवातीच्या काळात शेती विकासाकडे चांगले लक्ष पुरवले त्यामुळे आज भारताने कृषी क्षेत्रात चांगली प्रगती केली आहे. अप्रगत देशात अकुशल किंवा निकृष्ट लोकसंख्येचे प्रमाण मोठे असते. या लोकांचा कारखानदारी क्षेत्राला, सेवा क्षेत्राला फारसा उपयोग होत नाही. अशा निकृष्ट लोकसंख्येला जगवण्यासाठी सरकारला प्राथमिक क्षेत्राच्या विकासावरच अधिक भर द्यावा लागतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५१ पासून आजतागायत भारत सरकारने प्राथमिक क्षेत्राच्या विकासावरूच भर दिला आहे. त्याचा फायदा कृषी क्षेत्राबरोबर संपूर्ण अर्थव्यवस्थेला होत आहे. कृषी क्षेत्राच्या प्रगतीकडे चांगले लक्ष दिले तर देशाचा अविकसितपणा (मागासलेपणा) नष्ट होऊन देश विकासाच्या दिशेने गतीने जाऊ शकतो हे भारतासारख्या काही देशांनी जगाला दाखवून दिले आहे. भारत आज मागासलेले राष्ट्र राहिलेले नाही. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्था अविकसित किंवा मागासलेली राहिलेली नाही. जगातील एक प्रमुख विकसनशील राष्ट्र म्हणून भारताला ओळखले जाते आणि आता भारत विकसित राष्ट्र बनण्याच्या मार्गावर आहे. भारताच्या या अभूतपूर्व यशात शेतीक्षेत्राचे योगदान मोलाचे राहिलेले आहे. हे भारतीय शेतीचे फार मोठे आणि महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**१५) ग्रामीण – शहरी अंतर कमी होण्यास मदत :**

अनेक अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना भेडसावणारी एक महत्वाची समस्या म्हणजे वाढते ग्रामीण आणि शहरी अंतर हे होय. अनेक देशात ग्रामीण भाग शहरी भागापासून विकासाच्या बाबतीत मागासलेला आढळतो. परंतु सरकारने जर प्राथमिक क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरवले तर ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्नात, रोजगारात, पायाभूत सुविधात वाढ होऊन ग्रामीण आणि शहरी विकासातील अंतर कमी होऊ शकते. भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात शेतीकडे आणि ग्रामीण भागातील कृषी पूरक उद्योग व जोडधंद्याकडे विशेष लक्ष दिल्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासास मोठी चालना मिळाली. त्यामुळे भारतात ग्रामीण-शहरी अंतर कमी होत आहे. अशा प्रकारे जर शेतीचा आणि इतर प्राथमिक व्यवसायांचा विकास घडवून आणला तर विविध बाबतीत असणारे ग्रामीण आणि शहरी अंतर कमी होऊ शकते. यादृष्टीने शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**१६) देशाच्या संपूर्ण विकासाला चालना देण्यास उपयुक्त :**

देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. अप्रगत आणि विकसनशील देशांचा आर्थिक विकास हा शेतीवरच अवलंबून असतो. अशा देशात अगोदर शेतीचा विकास घडवून आणावा लागतो. अशा देशात जर हरितक्रांती घडवून आणली तर लोकांची अन्नधान्याची गरज पूर्ण होते. सरकारला अन्नधान्याची आयात करावी लागत नाही. देशाच्या परकीय चलनाची बचत होते.

शेतीच्या उत्पादकतेत वाढ घडून आली की ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कारागिर यांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे त्यांच्याकडून कृषी मालाची, कारखानदारी वस्तूंची आणि विविध सेवांची मागणी वाढते. त्यामुळे कारखाने, हॉटेल, बँका, वाहतूक क्षेत्र आणि कृषी क्षेत्र या विविध क्षेत्रातील उत्पादनात वाढ होते. त्यामुळे या क्षेत्रांच्या विकासाला चालना व गती मिळते. अशा प्रकारे शेतीचा विकास घडून आल्यास ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढून त्यांची खरेदीशक्ती वाढते. त्यामुळे एकूण मागणी / प्रभावी मागणी वाढते. त्यामुळे कारखानदारी क्षेत्राच्या, व्यापार व सेवा क्षेत्राच्या विकासाला गती मिळते. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासाला योग्य ती गती देण्याच्या दृष्टिकोनातून म्हणजेच देशाच्या आर्थिक विकसाचा दर वाढवण्यासाठी अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील कृषीक्षेत्र मोलाची भूमिका पार पाडत असते. भारताने हे जगाला दाखवून दिले आहे. कृषी क्षेत्रामुळे राष्ट्रीय उत्पन्नात चांगली भर पडते. स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) चांगली भर पडते. त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढतो. अप्रगत राष्ट्रात आणि विकसनशील राष्ट्रात राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा निम्म्यापेक्षा अधिक असतो. यावरून या राष्ट्रात शेतीचे असलेले महत्त्व आपल्या लक्षात येते.

**१७) भांडवलनिर्मितीस मदत :**

बचतीतून भांडवलाची निर्मिती होते. बचत केलेल्या एकूण पैशापैकी जेवढा पैसा आपण उत्पादक कामासाठी वापरतो त्याला भांडवलनिर्मिती असे म्हणतात. बचतीचा विनियोग उत्पादक कामासाठी झाला तर भांडवलनिर्मिती घडून येते. अप्रगत आणि विकसनशील देशात भांडवल निर्मितीचा वेग कमी असतो. कारण अशा राष्ट्रात बचत खूप कमी असते. लोकांचे उत्पन्न कमी असल्याने त्यांची बचत कमी असते. त्यामुळे अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात बचत आणि भांडवलनिर्मिती कमी असते. परंतु जलद आर्थिक विकासासाठी भांडवलनिर्मितीचा दर अधिक असणे गरजेचे असते. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी शेतीच्या आणि शेतीशी संबंधित प्राथमिक व्यवसायांच्या विकासाकडे लक्ष दिले तर कृषी वस्तू आणि प्राथमिक वस्तूंच्या उत्पादनात वाढ होऊन शेतकरी, कारागिर, व्यावसायिक यांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे त्यांची बचत वाढते. या बचतीचा उपयोग अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांच्या विकासासाठी करता येतो. अशा प्रकारे कृषी क्षेत्राच्या उत्पादकतेत वाढ घडून आली तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात, बचतीत वाढ होते. या बचत रकमेचा उपयोग उत्पादक कामासाठी करता येतो. अशा प्रकारे शेतीचा विकास घडवून आणला तर भांडवलनिर्मितीचा दर वाढण्यास मदत होते. हे शेतीचे महत्त्व आहे. म्हणून भारताने आजही शेतीच्या विकासाकडे लक्ष देण्याची आपली भूमिका कायम ठेवली आहे.

**समारोप :**

शेती क्षेत्राची राष्ट्राच्या आर्थिक विकासातील भूमिका अनन्यसाधारण आहे. शेतीच्या विकासामुळे कारखानदारी, बँकिंग, वाहतूक, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, व्यापार या सर्व क्षेत्रांचा विकास घडून येतो. भारतासारख्या ज्या देशात ग्रामीण भागात लोक मोठ्या प्रमाणावर राहतात अशा राष्ट्रात लोकांना रोजगार पुरवण्यात शेती महत्वपूर्ण भूमिका बजावते. लाखो, कोट्यावधी लोकांना रोजगार देऊन देशातील बेकारी कमी करण्याचे मोलाचे कार्य कृषी क्षेत्र करत असते. औद्योगिक विकासासाठी लागणारा कच्चा माल शेतीच पुरवत

असल्याने औद्योगिक विकासात शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कृषी व्यवसायामुळे कृषी उद्योगांचा, जोडधंद्यांचा विकास वेगाने होतो. परकीय चलनामुळे शेतीबरोबरच कारखानदारी क्षेत्रासाठी लागणारी यंत्रे व तंत्रज्ञान आयात करता येते. शेतीच्या विकासाकडे जर प्रमाणिकपणे व काळजीपूर्वक लक्ष दिले तर देशाचा मागासलेपणा घालवता येतो आणि देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करता येतो हे भारताने जगाला दाखवून दिले आहे.

**द्वितीय क्षेत्राची देशाच्या आर्थिक विकासातील भूमिका** (Role of Secondary Sector in the Process of Economic Development) **:**

**प्रास्ताविक :**

अर्थव्यवस्थेच्या द्वितीय क्षेत्रात सर्व प्रकारच्या लहान, मोठ्या कारखान्यांचा समावेश होतो. तसेच द्वितीय क्षेत्रात वीज, गॅस, पाणीपुरवठा आणि बांधकाम व्यवसायाचा समावेश होतो. द्वितीय क्षेत्राला औद्योगिक क्षेत्र असेही म्हणतात. खालील तक्ता क्रमांक १० मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील द्वितीय क्षेत्राचा वाटा दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक १०**

**द्वितीय क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा**

| अनु. क्र. | वर्ष | कारखाने (Manufacturing) (%) | वीज, गॅस पाणीपुरवठा इत्यादी (%) | बांधकाम (%) | एकूण द्वितीय क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१८-१९ | १६.३८ | २.६२ | ७.८७ | २६.८७ |
| २ | २०१९-२० | १४.७२ | २.७४ | ७.५० | २४.९६ |
| ३ | १९२०-२१ | १५.४० | २.७५ | ७.३९ | २५.५४ |
| ४ | २०२१-२२ | १५.८४ | २.५९ | ८.१० | २६.५३ |
| ५ | २०२२-२३ | १४.७० | ३.०० | ८.१९ | २५.८९ |

(Source : www.pib.gov.in)

वरील तक्ता क्रमांक १० वरून असे दिसते की, सन २०१८-१९ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात द्वितीय क्षेत्राचा वाटा २६.८७ टक्के एवढा होता. तो २०२२-२३ मध्ये २५.८९ टक्के एवढा घटला.

२०१८-१९ मध्ये कारखानदारी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १८.३८ टक्के होता. तो २०२२-२३ मध्ये १४.७० टक्के एवढा घटला. सन २०१८-१९ मध्ये वीज, गॅस, पाणीपुरवठा इत्यादी व्यवसायांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २.६२ टक्के एवढा होतो. तो २०२२-२३ मध्ये ३.०० टक्के एवढा वाढला. सन २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नात बांधकाम व्यवसायाचा वाटा ७.८७ टक्के एवढा होता. तो २०२२-२३ मध्ये ८.१९ टक्के एवढा वाढला. वरील तक्त्यावरून असे दिसते की, कारखानदारी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा घटत आहे. तर वीज, गॅस, पाणीपुरवठा आणि बांधकाम व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढत आहे.

**आर्थिक विकासात औद्योगिक क्षेत्राची भूमिका :**

अर्थव्यवस्थेत द्वितीय क्षेत्रात सर्व प्रकारचे लहान व मोठे कारखाने, वीज, गॅस, पाणीपुरवठा, बांधकाम या व्यवसायांचा समावेश होतो. सन २०२२-२३ मध्ये द्वितीय क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २५.८९ टक्के एवढा होता. त्यामध्ये कारखानदारी वस्तूंचा वाटा १४.७० टक्के होता. वीज, गॅस, पाणीपुरवठा इत्यादी व्यवसायांचा वाटा ३.०० टक्के होता. बांधकाम व्यवसायाचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ८.१९ टक्के एवढा होता. द्वितीय क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या व्यवसायामध्ये कारखानदारी व्यवसाय हा अत्यंत महत्त्वाचा असल्याने या ठिकाणी कारखानदारी क्षेत्राची म्हणजेच औद्योगिक क्षेत्राची आर्थिक विकासातील भूमिका विचारात घेतली आहे.

औद्योगिक क्षेत्रामध्ये लहान, मध्यम, मोठ्या अशा सर्व प्रकारच्या उद्योगांचा (कारखान्यांचा) समावेश होतो. भारतात लघुउद्योग आढळतात. तसेच कुटिर उद्योगही आढळतात. सन २००६ मध्ये भारतात सूक्ष, लघु आणि मध्यम उद्योग कायदा संमत झाला असून या कायद्यानुसार 'उद्योग' या शब्दाऐवजी 'उपक्रम' हा शब्द वापरला जातो. या कायद्यानुसार सूक्ष्म उपक्रम (Micro Enterprises), लहान उपक्रम (Small Enterprises) आणि मध्यम उपक्रम (Medium Enterprises) असे उद्योगांचे प्रकार अस्तित्वात आले आहेत. अशा प्रकारे आपल्या देशात औद्योगिक क्षेत्रात लहान उद्योग, मध्यम उद्योग आणि मोठे उद्योग अस्तित्वात आहेत. यापैकी काही उद्योग हे खाजगी क्षेत्रात आहेत. काही सरकारी क्षेत्रात आहेत तर काही सहकारी क्षेत्रात आहेत. औद्योगिक क्षेत्राची देशाच्या आर्थिक विकासातील भूमिका ही महत्त्वपूर्ण असते. ही भूमिका खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट केली आहे.

**१) राष्ट्रीय उत्पातील वाटा लक्षणीय :**

'राष्ट्रीय उत्पन्न' ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना असून देशाच्या आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न संकल्पनेचा उपयोग केला जातो. आर्थिक विकासात म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या निर्मितीत औद्योगिक क्षेत्राची भूमिका अत्यंत मोलाची असते. औद्योगिक क्षेत्राचा जसजसा विकास होत जातो तसतशी औद्योगिक क्षेत्रातून राष्ट्रीय उत्पन्नात पडणारी भर वाढत जाते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा दरही वाढत जातो. म्हणून जगातील प्रत्येक देश जलद आर्थिक विकासासाठी कृषी आणि सेवा क्षेत्राबरोबर औद्योगिक क्षेत्राच्या विकासावरही भर देत असतो. भारतानेही स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक विकासाकडे चांगले लक्ष दिले. भारत सरकारने स्वत: पुढाकार घेऊन मोठमोठे उद्योग उभे केले. तसेच खाजगी आणि सहकारी क्षेत्रालाही लहान-मोठे कारखाने स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे सन १९४७ साली औद्योगिकदृष्ट्या मागासलेला

भारत आज मागासलेला राहिलेला नाही. सन २०२३-२४ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात औद्योगिक क्षेत्राचा वाटा १७ टक्के एवढा होता. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासात औद्योगिक क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावत असते. औद्योगिक क्षेत्रातील लघुउद्योग, कुटिरउद्योग किंवा सूक्ष्म उपक्रम औद्योगिक उत्पादनात चांगली भर घालत असतात. त्यामुळे एकूण औद्योगिक उत्पादनात वाढ होण्यास आणि त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात अधिक भर पडण्यास मदत होते.

**२) कृषी विकासात महत्त्वपूर्ण भूमिका :**

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील कृषी क्षेत्र मागासलेले असते. जवळ जवळ सर्व पिकांची उत्पादकता खूपच कमी असते. परंतु सरकारने जर कृषी क्षेत्राबरोबर औद्योगिक विकासाकडे लक्ष दिले तर शेतीच्या विकासास चालना मिळते. शेतीच्या विकासात औद्योगिक क्षेत्र कशी महत्त्वाची भूमिका बजावते ते खालील मुद्द्यांच्याद्वारे स्पष्ट केले आहे.

(अ) भारतासारख्या अनेक अविकसित आणि विकसनशील राष्ट्रात लोकसंख्या प्रचंड असते. उत्पादक लोकसंख्येपैकी सुमारे ७०% लोकसंख्या जगण्यासाठी शेतीवरच अवलंबून असते. त्यामुळे कृषी क्षेत्रात अदृष्य किंवा प्रछन्न बेकारी आढळते. या बेकारांची सीमांत उत्पादकता शून्य असते. त्यांच्यापासून उत्पादनात काहीच भर पडत नाही. जर अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी औद्योगिकरणाचा वेग वाढवला म्हणजेच खाजगी, सहकारी क्षेत्राला देशभर लहान, मध्यम आकाराचे कारखाने स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले तर कृषी क्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्येला औद्योगिक क्षेत्रात काम मिळते. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा दबाव कमी होऊन शेती किफायतशीर होते. औद्योगिक विकासाचा आणि औद्योगिकरणाचा वेग जसजसा वाढत जाईल तसतसा शेतीवरील लोकसंख्येचा दबाव कमी होण्यास मदत होते. म्हणून प्रचंड लोकसंख्येची किंवा अतिरिक्त लोकसंख्येची समस्या असलेल्या राष्ट्रांनी कृषी विकासाबरोबर औद्योगिक विकासाकडेही लक्ष दिले पाहिजे.

(ब) कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी आणि कमी खर्चात शेती व्यवसाय करता येण्यासाठी शेतीच्या यांत्रिकीकरणाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शेतीची अवजारे व इतर कृषी यंत्रे परदेशातून आयात करणे परवडत नाही. कारण त्यासाठी खूप परकीय चलन खर्च करावे लागते आणि तेवढे परकीय चलन अप्रगत आणि विकसनशील राष्ट्राकडे नसते. म्हणून अप्रगत व विकसनशील राष्ट्रांनी औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर भर दिला तर कृषी क्षेत्राला लागणारी अवजारे, यंत्रे, ट्रॅक्टर इत्यादी औद्योगिक वस्तू देशातच उपलब्ध होतील. त्यामुळे कृषीक्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल. भारतात अलीकडच्या काळात औद्योगिक क्षेत्रात कृषी अवजारे तयार करणारे अनेक कारखाने स्थापन झाले असून कृषी अवजारांचे आणि कृषी यंत्रांचे उत्पादन देशात दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचा फायदा कृषी क्षेत्राला होत आहे. अशा प्रकारे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी, कमी खर्चात शेती व्यवसाय करता येण्यासाठी पुरेशा प्रमाणात कृषी

अवजारे उपलब्ध होणे आवश्यक असते. त्यासाठी औद्योगिक विकास अत्यंत महत्त्वाचा असतो. भारतात औद्योगिकरणाचा वेग वाढत असल्याने आणि औद्योगिक क्षेत्रात कृषी अवजारांचे उत्पादन वाढत असल्याने शेतीचा विकास घडून येण्यास मदत होत आहे. हा औद्योगिक क्षेत्राचा (औद्योगिकरणाचा / औद्योगिक विकासाचा) कृषी क्षेत्राला होत असलेला महत्त्वाचा फायदा आहे. शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे ग्रामीण भागात बेकारी वाढण्याचा धोका असतो. परंतु शेतीच्या यांत्रिकीकरणाबरोबर जर देशभर कारखान्यांची संख्या वाढत गेली तर शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे बेरोजगारीची पाळी आलेल्या शेतमजूरांना औद्योगिक क्षेत्राकडे वळवता येऊ शकेल.

(क) औद्योगिक विकासाचा कृषी क्षेत्राला मिळणारा आणखी एक फायदा म्हणजे जसजसा औद्योगिक विकास होत जातो तसतशी उद्योग क्षेत्रातील साखर उद्योग, चहा उद्योग, कापड उद्योग इत्यादी विविध उद्योगाकडून ऊस, कापूस, चहा, ताग, तेलबिया, फळे इत्यादी कृषी मालाला मागणी वाढत जाते. त्यामुळे या कृषी मालाच्या उत्पादनात वाढ घडून येते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन शेती किफायतशीर बनते. अशा प्रकारे ऊस, कापूस, ताग, चहा, फळे, तेलबिया इत्यादी कृषी मालाला चांगली मागणी यावयाची असेल तर या कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योग देशात उभे राहिले पाहिजेत. तरच या कृषी मालाच्या उत्पादनात आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात चांगली वाढ होऊ शकते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने अशा प्रकारचे कृषी उद्योग खाजगी आणि सहकारी क्षेत्रात स्थापन व्हावेत यासाठी मोठा पुढाकार घेतला. त्यामुळे ऊस, कापूस, तेलबिया या पिकांच्या उत्पादनात वाढ होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे शेतीचाही विकास घडून येण्यास मदत होत आहे.

(ड) औद्योगिक क्षेत्राचा (औद्योगिक विकासाचा / औद्योगिकरणाचा) कृषी क्षेत्राला होणारा आणखी एक फायदा म्हणजे औद्योगिक क्षेत्रामुळे विविध प्रकारे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होते. औद्योगिक क्षेत्राच्या विकासामुळे कृषी क्षेत्राला रासायनिक खते, अवजारे, संकरित बियाणे, जंतुनाशके, कीटकनाशके इत्यादी औद्योगिक वस्तूंचा पुरवठा पुरेशा प्रमाणात होतो. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होते. अशा प्रकारे देशाचे औद्योगिक क्षेत्र कृषी क्षेत्राला उपयोगी ठरत असते. अविकसित आणि विकसनशील राष्ट्रातील शेतीची उत्पादकता खूपच कमी असते. अशा राष्ट्रांनी जर औद्योगिक विकासाकडे पुरेसे लक्ष दिले तर औद्योगिक क्षेत्रातून कृषी क्षेत्राला वर उल्लेख केलेली खते, अवजारे इत्यादी कृषी आदाने पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील आणि त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेत वाढ घडून येण्यास मदत होईल. औद्योगिक क्षेत्राचा हा फायदा मिळवण्यासाठी विकसनशील देशांच्या सरकारांनी, अविकसित देशांच्या सरकारांनी औद्योगिक विकासाकडे पुरेसे लक्ष दिले पाहिजे.

(इ) औद्योगिक क्षेत्र चांगले मजबूत असेल तर औद्योगिक क्षेत्रामुळे ग्रामीण भागातील शेतीपूरक व्यवसायांचा चांगला विकास घडून येतो. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, वराह पालन, शेळीमेंढी

पालन या व्यवसायांना कृषी पूरक व्यवसाय असे म्हणतात. हे व्यवसाय पशुखाद्यासाठी, जनावरे आणि पक्ष्यांच्या औषधासाठी उद्योग क्षेत्रावर अवलंबून असतात. तसेच जनावरांचे गोठे किंवा शेड तयार करण्यासाठी लागणारे साहित्य हे उद्योग क्षेत्रातच तयार होत असते. म्हणून शेतीपूरक व्यवसायाच्या विकासासाठी सरकारला औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष द्यावे लागते. देशात औद्योगिक विकास पुरेशा प्रमाणात घडून आला असेल तर शेतीपूरक व्यवसायासाठी लागणारे पशुखाद्य, औषधे, शेडचे साहित्य आणि इतर औद्योगिक वस्तू पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकतात. त्याचा फायदा शेतीपूरक व्यवसायांना होतो. शेतीपूरक व्यवसायात वाढ होऊन दूध, अंडी, मांस, मासे, जनावरे (पशु व पक्षी) यांच्या उत्पादनात आणि रोजगारात वाढ घडून येते. औद्योगिक क्षेत्राचे हे फायदे मिळवण्यासाठी अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांच्या सरकारांनी कृषी क्षेत्राबरोबर औद्योगक क्षेत्राच्या विकासाकडेही पुरेसे लक्ष देण्याची गरज असते.

**३) रोजगार निर्मितीत महत्त्वाची भूमिका :**

औद्योगिक क्षेत्राची देशाच्या रोजगार निर्मितीत सुद्धा अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. मोठ्या अवजड उद्योगामुळे फारशी रोजगार निर्मिती होत नसली तरी लहान आकाराच्या उद्योगामुळे देशात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते. लघुउद्योग, कुटिर उद्योगामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. लघु आणि कुटिर उद्योगात कुशल तसेच अकुशल श्रमिकानांही रोजगार मिळतो. ज्या देशात लोकसंख्या प्रचंड असते आणि बेकारीची समस्या गंभीर असते अशा देशांनी लघु आणि कुटिर उद्योगांच्या उभारणीवर भर दिला तर बेकारीच्या समस्येवर मात करता येते. भारतात लोकसंख्यावाढीची आणि बेकारीची समस्या आजही गंभीर आहे. म्हणून भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून आजतागायत लघु आणि कुटिर उद्योगांच्या विकासावर आणि वाढीवर विशेष भर दिला आहे. त्यामुळे भारतात लघु आणि कुटिर उद्योगात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला आहे आणि होत आहे. खालील तक्ता क्रमांक ११ मध्ये भारताच्या द्वितीय क्षेत्राचा एकूण रोजगारातील हिस्सा दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ११**

**द्वितीय क्षेत्राचा एकूण रोजगारातील हिस्सा**

| अनु. क्र. | वर्ष | रोजगारातील हिस्सा (टक्के) |
|---|---|---|
| १ | १९५१ | १०.७० |
| २ | १९७२-७३ | ११.०० |
| ३ | १९९१ | १२.७० |

| | | |
|---|---|---|
| ४ | २००४-०५ | १८.७० |
| ५ | २०२३ | २५.०० |

वरील तक्ता क्रमांक ११ वरून असे दिसते की, द्वितीय क्षेत्राचा रोजगारतील हिस्सा दिवसेंदिवस वाढत आहे. सन १९५१ मध्ये द्वितीय क्षेत्राचा एकूण रोजगारातील हिस्सा १०.७० टक्के होता. तो २०२३ मध्ये २५ टक्के एवढा वाढला आहे. यावरून द्वितीय क्षेत्राची (औद्योगिक क्षेत्राची) रोजगार निर्मितीत भूमिका किती महत्त्वाची आहे. ते आपल्या लक्षात येते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. त्यामुळे भारतात औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकली. आज देशातील एकूण कार्यकारी लोकसंख्येपकी जवळ जवळ २५ टक्के लोक औद्योगिक क्षेत्रात (द्वितीय क्षेत्रात) काम करत आहेत. यावरून औद्योगिक क्षेत्राचे देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्व आपल्या लक्षात येईल. खालील तक्ता क्रमांक १२ मध्ये भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांनी ग्रामीण आणि शहरी भागात किती लोकांना रोजगार दिला आहे याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक १२**

**सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांनी भारतात निर्माण केलेला रोजगार**

| अनु. क्र. | क्षेत्र | निर्माण केलेला रोजगार (लाख) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण | ४९७.७८ | ४४.८५ |
| २ | शहरी | ६१२.११ | ५५.१५ |
| | एकूण | ११०९.८९ | १०० |

(Source : Ministry of MSME Annual Report, 2021-22.)

वरील तक्ता क्रमांक १२ वरून असे दिसते की, भारतात सन २०२०-२१ मध्ये सूक्ष्म, लघू आणि मध्यम उपक्रमांनी ११ कोटीपेक्षा अधिक लोकांना रोजगार दिला होता. या उपक्रमांनी ग्रामीण भागात सुमारे ४५ टक्के आणि शहरी भागात ५५ टक्के लोकांना रोजगार पुरवला होता. अशा प्रकारे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमात मोठ्या उद्योगापेक्षा अधिक रोजगार देण्याची क्षमता असल्याने या उपक्रमांच्या विकासावर भारत सरकारने पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच मोठा भर देण्यास सुरवात केली आहे.

**४) नाणेबाजार आणि भांडवलबाजाराच्या विकासास हातभार :**

ज्या बाजारात अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जाची देवाण-घेवाण होते त्या बाजाराला नाणेबाजार असे

म्हणतात आणि ज्या बाजारात दीर्घ मुदतीच्या आणि मोठ्या रकमेच्या कर्जाची देवाण-घेवाण होते त्या बाजाराला भांडवल बाजार असे म्हणतात. नाणेबाजारात खाजगी, सरकारी, सहकारी अशा सर्व प्रकारच्या व्यापारी बँकांचा समावेश होतो. तर भांडवल बाजारात औद्योगिक क्षेत्राला वित्तपुरवठा करणाऱ्या सर्व वित्तीय संस्थांचा समावेश होतो. नाणेबाजार आणि भांडवल बाजाराची देशाच्या आर्थिक विकासात खूप महत्त्वाची भूमिका असते. नाणेबाजार आणि भांडवल बाजाराकडून अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्राला अर्थपुरवठा होत असतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. कृषी, उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्राचा विकास ज्याप्रमाणे नाणेबाजार व भांडवल बाजारावर अवलंबून असतो त्याप्रमाणे नाणेबाजार आणि भांडवल बाजाराचा विकास हा कृषी, उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्रावर अवलंबून असतो. भारताच्या नाणेबाजाराचा आणि भांडवल बाजाराचा विकास गतीने होत आहे. त्याचे कारण भारतात औद्योगिक क्षेत्र वेगाने विकसित होत आहे हे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. स्वत: पुढाकार घेऊन अनेक मोठमोठे उद्योग स्थापन केले. खाजगी आणि सहकारी क्षेत्राला उद्योग, व्यवसाय स्थापन करण्यासाठी विशेष मदत दिली. ही मदत सरकारकडून आजही दिली जात आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राच्या विकासास हातभार लागत आहे. भारतातून इंग्रजांची राजवट हद्दपार झाल्यामुळे, भारत सरकारने बँकिंग आणि वित्तीय संस्थांच्या विकासावर भर दिल्याने भारतात आर्थिक विकासाला सुरवात झाली. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत भारत सरकारने औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष दिल्याने देशभर लहान, मध्यम आकाराचे कारखाने स्थापन होऊ लागले. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राकडून कर्जाला (भांडवलाला) मोठ्या प्रमाणात मागणी येऊ लागली. त्यामुळे नाणेबाजार आणि भांडवल बाजाराच्या विकासाला चालना मिळू लागली. आजही भारतात औद्योगिक विकासाचा कार्यक्रम धुमधडाक्यात सुरू आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राकडून भांडवलाला (कर्जाला) असलेली मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. अशा प्रकारे भारतात स्वातंत्र्यप्राप्तीपासून सुरू असलेल्या औद्योगिक विकासाच्या कार्यक्रमामुळे औद्योगिक क्षेत्राकडून कर्जाला मागणी वाढत आहे. त्यामुळे नाणेबाजार आणि भांडवल बाजाराच्या विकासाला मोठी चालना मिळत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात खाजगी, सहकारी आणि सरकारी क्षेत्रात अनेक व्यापारी बँकांची स्थापना झाली. तसेच अनेक मोठ्या वित्तीय संस्थांची स्थापना झाली आणि त्यांच्या उलाढालीत (कर्जव्यवहारात, ठेवीत, शाखांच्या संख्येत) मोठी वाढ झाली. त्यास औद्योगिक क्षेत्राचा होत असलेला विकास हा घटक सुद्धा कारणीभूत आहे. अशा प्रकारे भारतासारख्या अनेक विकसनशील देशांच्या नाणेबाजाराच्या आणि भांडवल बाजाराच्या विकासात औद्योगिक क्षेत्राचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले आहे.

**५) दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यास उपयुक्त :**

दारिद्र्य हा आर्थिक विकासातील प्रमुख अडथळा आहे. म्हणून प्रत्येक देश दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रयत्न करत असतो. औद्योगिक क्षेत्राचा विकास करून देशातील दारिद्र्याचे निराकरण करता येते. देशाचा औद्योगिक विकास जसजसा होत जातो तसतसे दारिद्र्याचे प्रमाण कमी होत जाते. जगातील अनेक अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांचा हा अनुभव आहे. मोठ्या आणि अवजड उद्योगांच्या उभारणीतून फारसा रोजगार निर्माण

होत नाही. परंतु देशभर जर लघुउद्योग आणि कुटिर उद्योग पुरेशा प्रमाणात उभे केले तर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो. बेरोजगारांना काम मिळते. त्यामुळे त्यांचे दारिद्र्य नष्ट होते. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने ग्रामीण आणि शहरी भागात लघु व कुटीर उद्योगांच्या उभारणीवर मोठा भर दिला. आज एकूण लघु आणि कुटिर उद्योगापैकी सुमारे ४५ टक्के उद्योग ग्रामीण भागात आहेत आणि सुमारे ५५ टक्के लघु व कुटिर उद्योग शहरी भागात आहेत. या उद्योगामध्ये देशातील ११ कोटीपेक्षा अधिक लोकांना रोजगार मिळाला असून त्यांचे दारिद्र्य नष्ट झाले आहे. भारतातील औद्योगिक क्षेत्राची (लघु व कुटिर उद्योगांची) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमातील भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. देशात लघु व कुटिर उद्योगांची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ जसजशी होत जाईल तसतसे खेड्यातील आणि शहरातील दारिद्र्याचे प्रमाण कमी कमी होत जाणार आहे. म्हणून लघु आणि कुटिर उद्योगांच्या विकासावर व वाढीवर भर देणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी भारतात सुमारे ८० टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली होते. आज हे प्रमाण २५ टक्क्यापेक्षा कमी आहे. याला जे विविध घटक कारणीभूत आहेत त्यामध्ये भारत सरकारने औद्योगिक क्षेत्राचा घडवून आणलेला विकास हा महत्त्वाचा घटक कारणीभूत आहे. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात दरिद्री लोकांचे प्रमाण ५० टक्के ते ८० टक्के असते. अशा राष्ट्रांनी कृषी क्षेत्राबरोबर औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिले तर रोजगार वाढून दारिद्र्याचे प्रमाण कमी होते. भारतासारख्या अनेक देशांनी जगाला हे दाखवून दिले आहे.

**६) ग्रामीण विकासास हातभार :**

औद्योगिक क्षेत्राची देशाच्या ग्रामीण विकासात सुद्धा अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका असते. अविकसित आणि विकसनशील देशात खेड्यांची संख्या मोठी असते. तसेच खेड्यात किंवा शहरात राहणाऱ्या लोकांची संख्या मोठी असते. परंतु विविध कारणामुळे अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात शहरांचा जेवढा विकास झालेला असतो त्यापेक्षा खूपच कमी खेड्यांचा किंवा ग्रामीण भागाचा विकासा झालेला असतो. भारतात आजमितीस खेड्यांची संख्या सुमारे ७ लाख एवढी आहे. खेड्याबरोबर देशात वाड्यांची, वस्त्यांची आणि पाड्यांची संख्या मोठी आहे. लोकसंख्या जसजशी वाढत जाते तसतशी खेड्यांची, वाड्यांची, वस्त्यांची आणि पाड्यांची संख्या वाढत जाते. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात शहरांची संख्या मोजकी असते. शहरांची त्यामुळे चांगली वाढ होते. परंतु ग्रामीण भागात मात्र बऱ्याच सुविधांची वाणवा असते. तसेच त्या सुविधांचा गुणात्मक दर्जाही फारसा चांगला नसतो. भारतात १४० कोटी लोकसंख्यापैकी ८० कोटीपेक्षा अधिक लोक खेड्यात राहतात. परंतु शहरांच्या तुलनेत खेड्यांचा विकास कमी आहे. सरकारने जर खेड्यात, लहान-लहान गावात छोटे-छोटे उद्योग किंवा कारखाने उघडण्यास प्रोत्साहन दिले तर खेड्यातील लोकांना रोजगार मिळेल. तसेच खेड्यात कारखाने निघू लागले तर खेड्यात रस्ते, वीज, पाणी यांची पुरेशी उपलब्धता होऊ शकेल. म्हणून ग्रामीण विकासासाठी (खेड्यांच्या विकासासाठी) ग्रामीण भागात उद्योगधंद्यांचे जाळे उभे करणे आवश्यक आहे. भारतात एकूण जे लघु आणि कुटिर उद्योग आहेत त्यापैकी ४५ टक्के लघु आणि कटिर उद्योग ग्रामीण भागात आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळत आहे. सरकारने ग्रामीण भागात लघु आणि कुटिर उद्योग उभारण्याला आणखी प्रोत्साहन दिले तर ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात, रोजगारात वाढ होऊन ग्रामीण विकासाचा

वेग वाढण्यास मदत होईल. थोडक्यात ग्रामीण विकासासाठी कृषी क्षेत्राच्या विकासाबरोबर औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे सुद्धा लक्ष देणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी भारतातील खेडी खूपच मागासलेली होती. खेड्यात दारिद्र्याचे प्रमाण मोठे होते. रस्ते, वीज, पाणी यांची खूपच कमतरता होती. परंतु आज भारतातील ग्रामीण भागाचा चांगला विकास घडून आला आहे. त्याला जी विविध कारणे जबाबदार आहेत त्यामध्ये औद्योगक क्षेत्राच्या विकासासाठी सरकारने केलेले प्रयत्न हा घटक सुद्धा जबाबदार आहे.

**७) प्रादेशिक विषमता कमी करण्यास उपयुक्त :**

देशातील काही राज्ये पुढारलेली असणे आणि काही राज्ये मागासलेली असणे याला प्रादेशिक विषमता असे म्हणतात. किंवा देशाचा काही भाग विकसित असणे आणि काही भाग अविकसित असणे याला प्रादेशिक असमतोल असे म्हणतात. प्रादेशिक विषमता हा आर्थिक विकासाच्या मार्गातील अडथळा आहे. प्रादेशिक विषमतेमुळे देशाचा सर्वसमावेशक आर्थिक विकास होऊ शकत नाही. तसेच देशात जर प्रादेशिक विषमता असेल तर मागासलेल्या प्रदेशापासून राष्ट्रीय उत्पन्नात, रोजगारात फारशी भर पडत नाही. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा दर कमी राहतो. अशा प्रकारे देशात प्रादेशिक विषमता अस्तित्वात असणे देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने अडचणीचे असते. प्रादेशिक विषमतेमुळे देशाच्या आर्थिक विकासाला बाधा पोहचते. म्हणून प्रत्येक देश प्रादेशिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करत असतो. भारतातही आजही प्रादेशिक विषमतेची समस्या अस्त्विात आहे. परंतु स्वांत्र्यप्राप्तीच्यावेळी भारतात जेवढी प्रादेशिक विषमतेची समस्या गंभीर होती तेवढी आज नाही. प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी भारत सरकारने १९५१ पासून म्हणजेच पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच सुरवात केली आहे. आज १२ पंचवार्षिक योजना आणि एकेक वर्षाच्या काही वार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत. या प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सरकारने मागासलेल्या राज्यात कारखाने काढण्यावर भर दिला होता. खाजगी व सरकारी क्षेत्रात मागास राज्यात कारखाने स्थापन करण्यावर सरकारने मोठा भर दिला. त्यामुळे मागासलेल्या राज्यांचा हळूहळू विकास घडून येत असून प्रादेशिक विषमता कमी होण्यास मदत होत आहे. मागासलेल्या प्रदेशात पुरेशा प्रमाणात लहान मोठे कारखाने स्थापन केले तर मागास प्रदेशांचा मागासलेपणा कमी होण्यास मदत होते. भारताने हे जगाला दाखवून दिले आहे. मागास प्रदेशात कारखानदारी क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिल्यास औद्योगिक वस्तूंचे उत्पादन वाढून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. अशा प्रकारे देशात जर प्रादेशिक विषमता असेल तर ती कमी करण्यासाठी औद्योगिक क्षेत्र अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते.

**८) मजूरांचे देशांतर्गत स्थलांतर थांबवणे शक्य :**

मजूर खेड्यातून शहरात, मागास राज्यातून प्रगत राज्यात कामधंद्यासाठी (जगण्यासाठी) स्थलांतर करत असतात. परंतु शहरात स्थलांतरितांची संख्या वाढल्यास शहरावर लोकसंख्येचा ताण पडून शहरातील सोयी सुविधा अपुऱ्या पडू लागतात. म्हणून खेड्यातून, मागास राज्यातून शहरात कामधंद्यासाठी येणारे लोकांचे लोंढे रोखणे आवश्यक असते. हे लोंढे रोखल्याशिवाय शहरांची चांगली, निकोप वाढ होत नाही. खेड्यात मागास प्रदेशात लहान, मध्यम आकाराचे, कारखाने उभे केल्यास खेड्यातून आणि मागास प्रदेशातून शहरात होणारे

स्थलांतर कमी होते. त्यामुळे शहरांच्या विकासातील अडथळे कमी होण्यास मदत होते. अशा प्रकारे खेड्यात, मागास प्रदेशात उद्योगधंदे उघडल्यास मजूरांचे शहरात होणारे स्थलांतर थांबण्यास मदत होते.

**९) मानवी भांडवलाचे विदेशात होणारे स्थलांतर रोखण्यास उपयुक्त :**

देशातील बुद्धीमान लोक (शास्त्रज्ञ, संशोधक, इंजिनिअर्स, संगणक तज्ज्ञ इत्यादी) आपला देश सोडून उपजीविकेसाठी परदेशात जातात तेव्हा त्यास मानवी भांडवलाचे स्थलांतर किंवा बुद्धिवहन असे म्हणतात. अविकसित आणि विकसनशील देशातून असे चांगले मनुष्यबळ विकसित देशात सतत जात असते. भारताचा विचार केला तर असे दिसते की, दरवर्षी भारतातून इंग्लंड, अमेरिका इत्यादी विकसित राष्ट्रात बुद्धिमान लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत असतात. ज्या देशातून अशा प्रकारचे चांगले मनुष्यबळ दुसऱ्या देशात जाते त्या देशांचे मोठे नुकसान होत असते. इंग्लंड, अमेरिका, जपान या राष्ट्रांच्या विकासात अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातून तेथे गेलेल्या बुद्धीमान लोकांचे चांगले योगदान आहे. त्यामुळे हे देश अप्रगत राष्ट्रातील हुषार, बुद्धीमान लोकांना आपल्या देशात येण्यास अटकाव करत नाहीत. औद्योगिक क्षेत्राला हुशार, बुद्धीमान, संशोधकांची, शास्त्रज्ञांची, नवप्रवर्तकांची गरज असते. देशातील औद्योगिक क्षेत्राचा विकास होत असेल, देशात पुरेशा प्रमाणात कारखाने असतील आणि सतत नवनवीन लहान, मोठे कारखाने स्थापन होत असतील तर बुद्धीमान लोकांना परदेशात जाण्याची गरज पडत नाही. त्यांना देशातच पुरेसे काम मिळू शकते. अशा प्रकारे देशातील औद्योगिक क्षेत्राचा विकास होत असेल तर देशातील चांगले मनुष्यबळ विदेशात जात नाही. बुद्धिवहनाचे (मानवी भांडवल देशातून बाहेर जाण्याचे) प्रमाण कमी होते. त्यांच्या बुद्धीचा देशाच्या विकासाला फायदा करून घेता येतो. अशा प्रकारे अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे पुरेसे लक्ष दिले तर अशा राष्ट्रातील चांगले मनुष्यबळ देशातच राहते. हे मानवी भांडवल विदेशात जाण्याचे प्रमाण खूपच कमी होते. त्याचा फायदा राष्ट्राच्या विकासाला होतो. म्हणून मानवी भांडवलाचे (बुद्धिमान लोकांचे) विदेशात होणारे स्थलांतर रोखण्यासाठी अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी कृषी क्षेत्राबरोबर औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडेही लक्ष दिले पाहिजे.

**१०) राहणीमानाच्या दर्जात वाढ / सुधारणा :**

औद्योगिक क्षेत्रामुळे देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना कृषी क्षेत्रातील कामगारांपेक्षा चांगले (जास्त) वेतन मिळते. वेतनाबरोबरच काही कंपन्या आपल्या कामगारांना निवासाची, वाहतुकीची सुविधा देतात. मुलांच्या शिक्षणाचा खर्च करतात. इतर सोयी सुविधा पुरवतात. त्यामुळे कृषी क्षेत्रातील कामगारापेक्षा औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या राहणीमानाचा दर्जा चांगला राहतो. म्हणून अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी कृषी विकासाबरोबर औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडेही लक्ष दिले पाहिजे. भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिक विकासाकडे चांगले लक्ष दिले. त्यामुळे कारखान्यांच्या, औद्योगिक कामगारांच्या संख्येत वाढ झाली. तसेच औद्योगिक कामगारांच्या राहणीमानातही चांगली सुधारणा झाली.

**११) सरकारला महसूल मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका :**

आर्थिक विकास कार्यक्रमासाठी, राज्यकारभारासाठी सरकारला पैशाची गरज असते. कर हे सरकारच्या

उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. सरकारला विविध साधनापासून जेवढा एकूण महसूल मिळतो त्यामध्ये कर महसूलाचा वाटा ९० टक्केपेक्षा जास्त आहे. भारताचा विचार केला तर भारतात सरकारला शेती क्षेत्रापासून फारसा महसूल मिळत नाही. शेतजमीन खरेदी-विक्रीच्या स्टॅम्प ड्युटीपासून सरकारला महसूल मिळतो. भारतात शेतकऱ्याकडून आयकर घेतला जात नाही. शेतीचे उत्पन्न अनिश्चित असल्याने भारतात शेती उत्पन्नावर आयकर घेतला जात नाही. औद्योगिक क्षेत्रापासून मात्र भारताला दरवर्षी अब्जावधी रूपयांचा कर महसूल मिळतो. उत्पन्न कर, विक्री कर, आयात निर्यात कर, भांडवली लाभ कर अशा विविध करापासून औद्योगिक क्षेत्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून देते. भारतात औद्योगिक विकासास आणि औद्योगिकीकरणास मोठा वाव आहे. भारतात औद्योगिकरणाचा वेग जसजसा वाढेल तसतशी कारखानदारी क्षेत्राकडून सरकारला मिळणाऱ्या महसूलात वाढ होत जाईल. म्हणून भारत सरकारने औद्योगिक विकासाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**१२) परकीय चलन मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका :**

परदेशांना वस्तूंची विक्री केल्यानंतर त्यांच्याकडून आपणाला जे डॉलर्स, पौंड, येन, मार्क, रुबल इत्यादी चलन मिळते त्याला परकीय चलन (Foreign Currency) असे म्हणतात. अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांना अशा परकीय चलनाची मोठी गरज असते. अप्रगत राष्ट्रांना, विकसनशील राष्ट्रांना पेट्रोलियम पदार्थ, गॅस, यंत्रसामग्री, खते, यंत्रांचे सुट्टे भाग, औषधे विकत घेण्यासाठी परकीय चलनाची गरज असते. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारातून निर्माण झालेली येणी-देणी भागवण्यासाठी (देणी देण्यासाठी) विदेशी चलनाची गरज असते. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी आपल्या देशातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिले तर औद्योगिक वस्तूंच्या उत्पादनात वाढ होऊन या वस्तूंच्या निर्यातीत सुद्धा वाढ घडून येते आणि त्यापासून मिळणाऱ्या परकीय चलनाच्या प्राप्तीत सुद्धा वाढ घडून येते. भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे चांगले लक्ष दिले. सरकारने स्वत: पुढाकार घेऊन मोठमोठे उद्योग उभे केले. खाजगी क्षेत्रालाही प्रोत्साहन दिले. त्यामुळे १९५१ पासून भारताच्या औद्योगिक उत्पादनात आणि निर्यातीत वाढ घडून येत आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढण्यासाठी भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांना विदेशी चलनाची मोठी गरज असते. विदेशी चलनासाठी केवळ कृषी क्षेत्रावर अवलंबून राहून चालत नाही. म्हणून औद्योगिक विकासाला महत्त्व देण्याची गरज असते.

**१३) नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर शक्य :**

बहुसंख्य अविकसित आणि विकसनशील राष्ट्रात जमीन, पाणी, जंगल, खनिज ही नैसर्गिक साधन संपत्ती विपुल प्रमाणात आहे. परंतु या नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेसा किंवा पर्याप्त वापर केला जात नाही. अशा अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी कारखानदारी क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिले तर देशात विविध प्रकारच्या कारखान्यांची संख्या वाढून त्यांच्याकडून पाणी, लाकूड, दगडी कोळसा, खनिज तेल इत्यादी नैसर्गिक साधनसंपत्तीला चांगली मागणी येईल. अशा प्रकारे अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी कारखानदारी क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिले तर देशात कारखान्यांची संख्या वाढून त्यांच्याकडून पाणी, जंगल आणि खनिज संपत्तीला

मोठी मागणी येते. त्यामुळे पडून असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती वापरता येते. अशा प्रकारे वापराशिवाय पडून असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा देशाच्या आर्थिक विकासासाठी वापर करून घेण्यासाठी कारखानदारी क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे.

**१४) आर्थिक विषमता कमी करण्यास उपयुक्त :**

औद्योगिक क्षेत्राचा देशाला होणारा आणखी एक फायदा म्हणजे औद्योगिक विकासामुळे देशातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. मोठ्या उद्योगापेक्षा लघु आणि कुटिर उद्योग देशात मोठ्या प्रमाणात स्थापन झाले तर देशातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. संपूर्ण देशभर पुरेशा प्रमाणात ग्रामीण आणि शहरी भागात लघु आणि कुटिर उद्योग स्थापन झाले तर कोट्यावधी लोकांना उत्पन्नाचे साधन मिळून आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. भारतात आजमितीस सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची संख्या ६,३३,८८,००० एवढी आहे. याचा अर्थ या उपक्रमांच्या मालकांची संख्या ६,३३,८८,००० एवढी आहे. या विविध उपक्रमात सुमारे १२ कोटी लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. अशा प्रकारे सूक्ष्म, लघु आणि मध्यम प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतो. या उपक्रमात गरीब लोकांना रोजगार मिळतो. त्यामुळे त्यांना उत्पन्नाचे साधन मिळते. त्यामुळे देशातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील लघु आणि कुटिर उद्योग महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ पासूनच या उद्योगांच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यामुळे भारतात लघु आणि कुटिर उद्योगांची चांगली वाढ होत आहे.

**१५) व्यापार आणि वाहतूक व्यवसायाच्या विकासास मदत :**

देशाचा आर्थिक विकास व्यापार आणि वाहतूक क्षेत्रावरही अवलंबून असतो. देशाच्या अंतर्गत व्यापाराचा आकार (Volume) जितका मोठा तितका देशाच्या विकासाचा दर अधिक राहतो. तसेच देशातील वाहतूक क्षेत्रही आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावात असते. रस्ते वाहतूक, जल वाहतूक, हवाई वाहतूक, रेल्वे वाहतूक इत्यादी मार्गाने वस्तूंची वाहतूक होत असते. स्वातंत्र्योत्तरकाळात भारतात वाहतूक क्षेत्राची चांगली प्रगती झाली आहे. तसेच देशांतर्गत व्यापारातही चांगली वाढ झाली आहे. याची जी काही कारणे आहेत त्यामध्ये औद्योगिक वस्तूंच्या किंवा कारखानदारी वस्तूंच्या उत्पादनात दिवसेंदिवस होत असलेली वाढ हे महत्त्वाचे कारण आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने कारखानदारी क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. त्यामुळे औद्योगिक वस्तूंच्या उत्पादनात दरवर्षी मोठी वाढ घडून येत आहे. त्यामुळे औद्योगिक वस्तूंच्या व्यापारात (खरेदी-विक्री व्यवहारात) आणि वाहतूकीत वाढ घडून येत आहे. मालमोटारी, रेल्वे, जहाज आणि विमानांच्या द्वारे औद्योगिक वस्तूंची जी वाहतूक केली जाते त्यामध्ये वाढ होत आहे. व्यापार आणि वाहतूक क्षेत्राच्या प्रगतीमुळे औद्योगिक क्षेत्राचा विकास घडून येतो. त्याचप्रमाणे औद्योगिक विकासामुळे (औद्योगिकरणामुळे /कारखान्यांच्या संख्येतील वाढीमुळे) देशांतर्गत व्यापारात वाढ होते आणि वाहतूक क्षेत्राचीही प्रगती होते.

**१६) प्रभावी मागणीत वाढ - विकासाला चालना :**

देशातील औद्योगिक क्षेत्राचा आणखी एक फायदा औद्योगिक विकासामुळे देशातील प्रभावी मागणीत

वाढ घडून येते आणि त्यामुळे राष्ट्राच्या विकासाला चालना मिळते. देशाचा औद्योगिक विकास घडून आला तर देशातील लोकांना (उत्पादक लोकसंख्येला / कार्यकारी लोकसंख्येला) औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार मिळतो. त्यामुळे त्यांची विविध प्रकारच्या वस्तू आणि सेवांना असणारी मागणी वाढते. औद्योगिक कामगारांकडून कृषी वस्तू, औद्योगिक वस्तू आणि सेवा क्षेत्रातील सेवांना मागणी वाढते. देशातील लोकांची वस्तू आणि सेवांना असणारी एकूण मागणी म्हणजे प्रभावी मागणी होय. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्यामुळे प्रभावी मागणीत वाढ होते. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या तिन्ही क्षेत्रात गुंतवणूक वाढते. अशा प्रकारे औद्योगिक क्षेत्र जर विकसित असेल तर औद्योगिक क्षेत्र जास्तीत जास्त लोकांना रोजगार देऊ शकते. त्यामुळे प्रभावी मागणीत वाढ होण्यास मदत होते. भारतातील एकूण श्रमिकापैकी २५ टक्के श्रमिक औद्योगिक क्षेत्रात काम करतात. म्हणजे १५ कोटीपेक्षा अधिक श्रमिक औद्योगिक क्षेत्रात काम करत असून त्यांच्यामुळे प्रभावी मागणी टिकून राहण्यास व त्यात वाढ होण्यास मदत होत आहे. औद्योगिक क्षेत्राचा जसजसा विकास होत जातो तसतशी औद्योगिक क्षेत्राची रोजगार देण्याची क्षमता वाढत जाते. त्यामुळे प्रभावी मागणीत वाढ घडून येण्यास आणि आर्थिक विकासाला चालना मिळण्यास मदत होते. प्रभावी मागणीत वाढ झाल्यास तिन्ही क्षेत्रातील वस्तू व सेवांच्या उत्पादनात, गुंतवणूकीत, नफ्यात आणि रोजगारात वाढ होते. प्रभावी मागणीतील वाढीमुळे राष्ट्रीय उत्पादनात, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन राष्ट्राच्या आर्थिक विकासाचा दरही वाढतो. प्रभावी मागणीतील वाढीचे हे फायदे मिळवण्यासाठी जगातील प्रत्येक देश औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष देत असतो. अशा प्रकारे औद्योगिक क्षेत्र देशातील प्रभावी मागणीत (सर्व प्रकारच्या वस्तू व सेवांच्या मागणीत) वाढ घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते.

**१७) राष्ट्राला आत्मनिर्भर बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका :**

जगातील प्रत्येक राष्ट्र आत्मनिर्भर (स्वावलंबी) बनण्याचा प्रयत्न करत असते. भारतानेही सर्व क्षेत्रात आत्मनिर्भर बनण्याचे स्वप्न उराशी बाळगले असून त्याप्रमाणे भारताची वेगाने वाटचाल सुरू आहे. तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी दिलेली 'जय जवान, जय किसान' घोषणा भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठीच दिलेली होती. कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, वित्त, संरक्षण अशा सर्व क्षेत्रात आत्मनिर्भर बनण्याचा प्रयत्न भारतासारखे अनेक देश करत आहेत. देशाला लागणाऱ्या सर्व वस्तू आणि सेवा जेव्हा देशातच तयार होतात, आयातीवर अवलंबून रहावे लागत नाही तेंव्हा देश आत्मनिर्भर किंवा स्वावलंबी होतो. राष्ट्राला आत्मनिर्भर बनवण्यात औद्योगिक क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्वाची असते. देशाचा औद्योगिक विकास जसजसा घडून येतो तसतसे औद्योगिक वस्तूंचे उत्पादन देशात वाढत जाते आणि विदेशातून केली जाणारी औद्योगिक वस्तूंची आयात कमी होत जाते आणि औद्योगिक क्षेत्रात देश स्वावलंबी बनतो. अशा प्रकारे राष्ट्राला आत्मनिर्भर बनण्यासाठी औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष द्यावे लागते.

**समारोप :**

अशा प्रकारे द्वितीय क्षेत्राची म्हणजे औद्योगिक क्षेत्राची देशाच्या आर्थिक विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. औद्योगिक क्षेत्राचा विकास घडून आल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास होत नाही. म्हणून

प्रत्येक देश जलद आर्थिक विकासासाठी इतर क्षेत्राबरोबरच औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडेही लक्ष देत असतो. औद्योगिक क्षेत्राची स्थूल देशांतर्गत उत्पादन निर्मितीत (GDP मध्ये) महत्त्वाची भूमिका असते. तसेच रोजगार निर्मितीत महत्त्वाची भूमिका असते. औद्योगिक क्षेत्राची जसजशी प्रगती होत जाते तसतशी देशाची निर्यात वाढून देशाला मिळणाऱ्या परकीय चलनाच्या प्राप्तीत वाढ होत जाते. औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीमुळे देशातील दारिद्र्य, आर्थिक विषमता, बेकारी, प्रादेशिक विषमता, परकीय चलनाची टंचाई, प्रभावी मागणीची कमतरता या समस्यांचे निर्मूलन होते. म्हणून जगातील प्रत्येक देश औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष देत असतो.

**तृतीय क्षेत्राची देशाच्या आर्थिक विकासातील भूमिका (Role of Tertiary Sector in Economic Development) :**

**प्रास्ताविक :**

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेची तीन क्षेत्रे असतात (१) प्राथमिक क्षेत्र (Primary Sector), (२) द्वितीय क्षेत्र (Secondary Sector) आणि (३) तृतीय क्षेत्र (Tertiary Sector). देशाच्या आर्थिक विकासात या तिन्ही क्षेत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. प्राथमिक क्षेत्राची (शेतीची) आणि द्वितीय क्षेत्राची (कारखानदारीची) राष्ट्राच्या आर्थिक विकासात असलेली महत्त्वपूर्ण भूमिका यापूर्वी आपण पाहिली असून या भागात तृतीय क्षेत्राची (सेवा क्षेत्राची) देशाच्या आर्थिक विकासात असणारी महत्त्वपूर्ण भूमिका आपण पाहणार आहोत. प्राथमिक आणि द्वितीय क्षेत्राप्रमाणे तृतीय क्षेत्रसुद्धा आर्थिक विकासात महत्वाची भूमिका बजावत असते. त्याची माहिती या भागात दिली आहे. तृतीय क्षेत्रात व्यापार आणि सर्व प्रकारच्या सेवांचा समावेश होतो. म्हणून तृतीय क्षेत्रास संक्षिप्तपणे व्यापार व सेवा क्षेत्र असे म्हणतात. या भागात सेवा क्षेत्राची आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट केली आहे. तृतीय क्षेत्रात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

१. व्यापार (Trade)
२. माहिती तंत्रज्ञान (IT and Software Services)
३. बँकिंग आणि वित्त (Banking and Finance)
४. पर्यटन व आदरातिथ्य (Tourism and Hospitality)
५. आरोग्य व शिक्षण (Health and Education)
६. वाहतूक (Transport and Logistics) – रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, विमान वाहतूक, जल वाहतूक, बंदरे इत्यादी.

**स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) तृतीय क्षेत्राचा वाटा (Share) :**

खालील तक्ता क्रमांक १३ मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (GDP मधील) तृतीय क्षेत्राच्या हिश्शाची / वाट्याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक १३**

**स्थूल देशांतर्गत उत्पादनात तृतीय क्षेत्राचा वाटा (टक्के)**

| अनु. क्र. | वर्ष | G.D.P. मधील वाटा | | | एकूण तृतीय क्षेत्राचा उत्पन्नातील वाटा वाटा (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| | | माहिती तंत्रज्ञान व वित्त सेवा (Financial and (IT Services) | व्यापार आणि वाहतूक (Trade and Transport (टक्के) | इतर सेवा (Other services) (टक्के) | |
| १ | २०१८ | ३०.१० | १३.५० | १२.४० | ५६.०० |
| २ | २०२० | ३२.५० | १४.०० | १२.८० | ५९.३० |
| ३ | २०२३ | ३४.८० | १५.२० | १३.५० | ६३.५० |

वरील तक्ता क्रमांक १३ वरून असे दिसते की, सन २०१८ मध्ये तृतीय क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ५६ टक्के एवढा होता. तो सन २०२३ मध्ये ६३.५० टक्के एवढा वाढलेला आहे.

**स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) तृतीय क्षेत्राचा वाटा :**

खालील तक्ता क्रमांक १४ मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील (GDP मध्ये) तृतीय क्षेत्राचा सन १९५०-५१ मधील आणि सन २०२३ मधील वाटा (हिस्सा) दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक १४**

**स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP मध्ये) तृतीय क्षेत्राचा वाटा**

| अनु. क्र. | वर्ष | GDP मधील तृतीय क्षेत्राचा वाटा (हिस्सा) (टक्के) |
|---|---|---|
| १ | १९५०-५१ | २९.६० |
| २ | १९८०-८१ | ३८.०० |
| ३ | २०१०-११ | ५७.८० |
| ४ | २०२३ | ६३.५० |

वरील तक्ता क्रमांक १४ वरून असे दिसते की, सन १९५०-५१ मध्ये तृतीय क्षेत्राचा (व्यापार व सेवा क्षेत्राचा) भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात २९.६० टक्के एवढा वाटा होता. सन २०२३ मध्ये तो ६३.५० टक्केपर्यंत वाढल्याचे दिसून येते. यावरून तृतीय क्षेत्राचे देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्व आपल्या लक्षात येते.

**सेवा क्षेत्राची देशाच्या आर्थिक विकासातील भूमिका :**

प्राथमिक आणि द्वितीय क्षेत्रात वस्तू तयार होतात. तृतीय क्षेत्रात वस्तू तयार होत नाहीत. तर तृतीय क्षेत्रात सेवांची निर्मिती होते. तृतीय क्षेत्रात प्राथमिक व द्वितीय क्षेत्रात तयार झालेल्या वस्तूंची खरेदी-विक्री होत असते. म्हणजेच तृतीय क्षेत्रात वस्तूंचा व्यापार होत असतो. तसेच शिक्षण, वाहतूक, दळणवळण, पर्यटन, आरोग्य, गृहनिर्माण, बँकिंग, मनोरंजन, बांधकाम, विमा, खेळ, पोलीस आणि लष्करी सेवा अशा विविध प्रकारच्या सेवांची निर्मिती अर्थव्यवस्थेच्या तृतीय क्षेत्रात होत असते. अशा प्रकारे तृतीय क्षेत्रात व्यापार आणि विविध प्रकारच्या सेवांचा समावेश होत असतो.

**सेवा म्हणजे काय?:**

वाहतूक, साठवण, दूरसंचार, बँका, रेल्वे, विमा, हॉटेल, शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण इत्यादी आर्थिक आणि सामाजिक बाबींचा समावेश सेवा क्षेत्रात होतो. खालील काही व्याख्यावरून सेवा म्हणजे काय ते आपल्या लक्षात येईल.

''**सेवा म्हणजे असे उत्पादन की, जे उत्पादन भांडी, कपडे, पुस्तके, फर्निचर इत्यादी वस्तूप्रमाणे डोळ्यांना दिसत नाही. परंतु त्यामध्ये मनुष्याच्या दृष्टीने उपयोगिता असते. अशा उत्पादकांना सेवा असे म्हणतात.**''

वरील व्याख्येवरून आपल्या लक्षात येते की, डोळ्यांना न दिसणाऱ्या वस्तू (अदृष्य वस्तू) म्हणजे सेवा होय. The service Industrial Journal मध्ये सेवेची व्याख्या खालील शब्दात दिली आहे. (संदर्भ : योजना मासिक, भारत सरकार, सप्टेंबर-२०११)

''**कोणतीही प्राथमिक अथवा पूरक क्रिया जी भौतिक उत्पादन करत नाही म्हणजेच विक्रेते आणि उपभोक्त्यामधील बिगर वस्तू रुपातील व्यवहार म्हणजे सेवा होय.**''

**कोलटर व आर्मस्ट्रॉंग** यांनी सेवेची व्याख्या खालील शब्दात दिली आहे. (संदर्भ : योजना मासिक, भारत सरकार, सप्टेंबर-२०११)

''**सेवा म्हणजे अशी क्रिया जिचा लाभ एकाद्वारे दुसऱ्याला देताना वस्तूप्रमाणे मालकी निर्माण होत नाही तर गरजांची पूर्तता होते.**''

**सेवाक्षेत्राचे स्वरूप आणि रचना :**

भारतातील सेवाक्षेत्र दिवसेंदिवस विस्तारत आहे. नवनवीन सेवा निर्माण होत आहेत व त्याचा समावेश सेवा क्षेत्रात होत आहे. सेवाक्षेत्राची रचना खालीलप्रमाणे सांगता येईल.

**अ) व्यावसायिक सेवा**

१) समुपदेशन २) बँकिंग ३) वित्तसेवा

**ब) पायाभूत सेवा**

१) वाहतूक २) दळणवळण

**क) व्यापार सेवा**

१) पर्यटन २) मनोरंजन ३) बांधकाम

४) अभियांत्रिकी ५) माहिती तंत्रज्ञान

**ड) सामाजिक सेवा**

१) शिक्षण २) आरोग्य ३) प्रशिक्षण

**इ) प्रशासन**

१) पोलीस सेवा २) लष्करी सेवा




**भारतातील सेवा क्षेत्राची रचना**

**भारतातील राज्यघटनेतील सेवांची संरचना**

भारताच्या राज्यघटनेतही सेवांची माहिती दिली आहे. ती पुढीलप्रमाणे -

**१) केंद्र सरकारच्या यादीतील सेवा :**

रेडिओ, दूरदर्शन, पोस्ट व तार, संरक्षण सेवा, भूदल, हवाई दल, सागरी दल, वित्तपुरवठा संस्था, विमा, रेल्वे, विमानसेवा, राष्ट्रीय महामार्ग, खाणकाम व्यवसाय.

**२) राज्य सरकारच्या यादीतील सेवा :**

आरोग्य सेवा, स्थावर मालमत्ता, शेती, पशुपालन, वन विभाग.

**३) मध्यवर्ती सूचीतील सेवा :**

वीज, वैद्यकीय, मुद्रण व प्रसिद्धी, शिक्षण, करसेवा, नागरी नियोजन, हिशेब, अभियांत्रिकी, स्थापत्यशास्त्र.

भारतातील सेवा क्षेत्राचे वर्गीकरण खालील दोन गटात सुद्धा केले जाते.

**१) आर्थिक सेवा**

अ) वाहतूक, दळणवळण आणि साठवणूक

ब) व्यापार, पर्यटन आणि हॉटेल्स

क) विमा आणि बँकिंग सेवा

**२) समाजसेवा**

अ) शिक्षण ब) आरोग्य क) प्रशासन

**गॅट करारानुसारच्या जागतिक बाजार सेवा**

गॅट करारातसुद्धा रेल्वे आणि संरक्षण सेवा वगळून इतर सर्व सेवांना खाजगी क्षेत्राला मुक्त प्रवेश दिला आहे. या बारा जागतिक बाजार सेवा खालील प्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

१) शिक्षण २) संप्रेषण ३) बांधकाम ४) अभियांत्रिकी ५) व्यापार ६) पर्यावरण ७) आरोग्य ८) पर्यटन ९) क्रीडा १०) संस्कृती ११) मनोरंजन १२) वाहतूक आणि आर्थिक सेवा.

**सेवांचे इतर वर्गीकरण**

**१) सार्वजनिक उपयोगाच्या सेवा :**

वीज, पाणी, आरोग्य, दळणवळण, गॅस, साठवणूक

**२) सार्वजनिक बांधकाम सेवा :**

तलाव, कालवे, रस्ते, धरणे

**३) वाहतूक क्षेत्र :**

रस्ते, लोह, हवाई वाहतूक, जलवाहतूक,

**भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राचे महत्त्व :**

भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राची कामगिरी किंवा सेवा क्षेत्र बजावत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**१) स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाढता हिस्सा :**

स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) ही राष्ट्रीय उत्पन्नाची एक संकल्पना आहे. GDP वर देशाचा आर्थिक

विकास अवलंबून असतो. GDP वाढीचा दर जितका जास्त तितका देशाच्या आर्थिक विकास वृद्धीचा दर जास्त राहतो. म्हणून प्रत्येक देश GDP मध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करत असतो. भारताच्या GDP मध्ये सेवा क्षेत्राचा वाटा वाढत आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा दरही वाढत आहे.

खालील तक्ता क्रमांक १ मध्ये भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पादनातील कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्राचा वाटा (Share) दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक १**

**स्थूल देशांतर्गत उत्पादनातील कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा :**

| अ. क्र. | वर्ष | स्थूल देशांतर्गत उत्पादनातील विविध क्षेत्रांचा वाटा (%) | | |
|---|---|---|---|---|
| | | कृषी (%) | उद्योग (%) | सेवा क्षेत्र (%) |
| १ | १९५०-५१ | ५३.१० | १६.६० | ३०.३० |
| २ | १९६०-६१ | ४८.७० | २०.५० | ३०.८० |
| ३ | १९७०-७१ | ४२.३० | २४.०० | ३३.७० |
| ४ | १९८०-८१ | ३६.१० | २५.९० | ३८.०० |
| ५ | १९९०-९१ | २९.६० | २७.७० | ४२.७१ |
| ६ | २०००-२००१ | २२.३० | २७.३० | ५०.४० |
| ७ | २०१०-२०११ | १४.६० | २७.९० | ५७.५० |
| ८ | २०१३-२०१४ | १३.९४ | २६.१३ | ५९.९३ |
| ९ | २०१५-२०१६ | १७.४० | २५.३० | ५६.३० |
| १० | २०१८-२०१९ | १३.५० | २४.५० | ६२.०० |
| ११ | २०२०-२०२१ | २०.१९ | २५.९२ | ५३.८९ |
| १२ | २०२३-२०२४ | १८.८० | २८.२० | ५३.०० |

(स्त्रोत: आर्थिक सर्वेक्षण, २०२३)

वरील तक्ता क्रमांक एक वरून असे दिसते की, सन १९५०-५१ पासून सतत स्थूल देशांतर्गत उत्पादनातील कृषी क्षेत्राचा हिस्सा (एक-दोन वर्षाचा अपवाद वगळता) घटत गेला आहे. आणि उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत गेला आहे. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात (स्थूल देशांतर्गत उत्पादनात- जीडीपी मध्ये) कृषी क्षेत्राचा वाटा ५३.१०% होता. तो २०२३-२४ मध्ये १८.८०% पर्यंत घटला आहे. सन १९५०-५१ मध्ये उद्योग क्षेत्राचा वाटा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात १६.६०% होता. तो २०२३-

२४ मध्ये २८.२०% एवढा वाढला. सन १९५०-५१ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा ३०.३०% होता. तो २०२३-२४ मध्ये ५३% पर्यंत वाढला. वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २०१०-११ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा ५७.५०% होता. तो २०१३-१४ मध्ये ५९.९३% एवढा वाढला. २०१५-१६ मध्ये तो ५६.३०% एवढा घटला. २०१८-१९ मध्ये तो ६२% पर्यंत वाढला. २०१८-१९ च्या तुलनेत २०२०-२१ आणि २०२३-२४ मध्ये सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा अनुक्रमे ५३.८९% आणि ५३% एवढा घटल्याचे दिसते. असे असले तरी कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या तुलनेत भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वाटा मोठा (लक्षणीय) व महत्त्वपूर्ण असल्याचे आपल्या लक्षात येते. सन २०२३-२४ मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १८.८०% होता. उद्योग क्षेत्राचा वाटा २८.२०% होता आणि सेवा क्षेत्राचा वाटा ५३% होता. अशा प्रकारे भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात (जीडीपी मध्ये) कृषी आणि उद्योग क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्राचा वाटा मोठा आणि महत्त्वपूर्ण असल्याचे आपल्या लक्षात येते.

**तक्ता क्रमांक २:**

**२०२४ या वर्षातील विविध क्षेत्रांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा**

| अ.क्र. | क्षेत्र | राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) |
|---|---|---|
| १. | कृषी व कृषी संबंधित क्षेत्र | १७.५९ |
| २. | उद्योग | २७.५५ |
| ३. | सेवा | ५४.८६ |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, सन २०२४ या वर्षात कृषी क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १७.५९% होता. उद्योग क्षेत्राचा वाटा २७.५५%होता आणि सेवा क्षेत्राचा वाटा ५४.८६% एवढा होता. कृषी व उद्योग क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा असल्याचे दिसते. यावरून भारताच्या आर्थिक विकासातील सेवा क्षेत्राचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

**तक्ता क्रमांक ३**

**सन २०२३-२४ या वर्षातील कृषी, उद्योग आणि विविध सेवांचा राष्ट्रीय उत्पादनातील वाटा**

| अ.क्र. | क्षेत्र | राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा (%) |
|---|---|---|
| १. | कृषी, वने आणि मासेमारी | १७.५९ |
| २. | खाण व्यवसाय (Mining & Quarrying) | १.९८ |
| ३. | मॅन्युफॅक्चरिंग (Manufacturing) | १४.१४ |

| | | |
|---|---|---|
| ४. | वीज, गॅस पाणीपुरवठा व इतर उपयोगी सेवा | २.४४ |
| ५. | बांधकाम | ८.९९ |
| ६. | व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण आणि नभोवाणीसेवा | १७.५७ |
| ७. | वित्त सेवा, रियल इस्टेट आणि व्यावसायिक सेवा | २२.६९ |
| ८. | सार्वजनिक प्रशासन, सुरक्षा आणि इतर सेवा | १४.६० |
| | एकूण- | १००.०० |

वरील तक्ता क्रमांक ३ वरून असे दिसते की, सन २०२३-२४ या वर्षात कृषी, वने आणि मासेरी क्षेत्राचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात (स्थूल देशांतर्गत उत्पादनात) १७.५९% एवढा वाटा आहे. खाण व्यवसायापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा १.९८% इतका आहे. मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १४.१४ टक्के एवढा आहे. वीज, गॅस, पाणीपुरवठा व इतर उपयोगी सेवांचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २.४४% एवढा आहे. बांधकाम क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ८.९९% आहे. व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण आणि नभोवाणी सेवांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १५.५७% आहे. वित्त सेवा, रिअल इस्टेट आणि व्यावसायिक सेवांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २२.६९ टक्के आहे. तर सार्वजनिक प्रशासन, सुरक्षा आणि इतर सेवांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १४.६०% एवढा आहे.

**२) रोजगारातील वाढता हिस्सा :**

भारतातील सेवा क्षेत्र भारतातील बेरोजगारी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सेवा क्षेत्राची दिवसेंदिवस प्रगती होत असल्याने सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण होत आहेत. भारतात प्रचंड बेकारी आहे. ही बेकारी कमी करण्यासाठी सेवा क्षेत्र अत्यंत उपयुक्त आहे. खालील तक्ता क्रमांक ४ मध्ये सन २०११ ते २०२२ या वर्षातील सेवा क्षेत्रात पुरवलेल्या रोजगाराची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ४**

**सेवा क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण (२०११ ते २०२२)**

| अ.क्र. | क्षेत्र | सेवा क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण (%) |
|---|---|---|
| १. | २०११ | २७.३८ |
| २. | २०१२ | २८.२१ |
| ३. | २०१३ | २९.०४ |

| | | |
|---|---|---|
| ४. | २०१४ | २९.८७ |
| ५. | २०१५ | ३०.७४ |
| ६. | २०१६ | ३१.५८ |
| ७. | २०१७ | ३२.४६ |
| ८. | २०१८ | ३३.३३ |
| ९. | २०१९ | ३४.०९ |
| १०. | २०२० | ३१.६२ |
| ११. | २०२१ | ३१.४५ |
| १२. | २०२२ | ३१.०८ |

स्त्रोत : tradingeconomics.com

वरील तक्ता क्रमांक चार वरून असे दिसते की, सन २०११ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये सेवा क्षेत्रात पुरवलेल्या रोजगाराचे प्रमाण वाढले आहे. सन २०११ मध्ये २७.३८% श्रमिक सेवा क्षेत्रात काम करत होते. २०२२ मध्ये हे प्रमाण ३१.०८% एवढे वाढले आहे. २०१९ मध्ये ३४.०९% श्रमिक सेवा क्षेत्रात काम करत होते. २०२० पासून २०२२ पर्यंत रोजगारात घट होत गेल्याचे दिसते.

**सन २०२२-२३ या वर्षातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण :**

**(Sectorwise distribution of workers in 2022-23 in %) :**

खालील तक्ता क्रमांक पाच मध्ये २०२२-२३ या वर्षातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक ५**

**सन २०२२-२३ या वर्षातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे प्रमाण**

| अ.क्र. | क्षेत्र | कामगारांचे प्रमाण (%) |
|---|---|---|
| १. | कृषी | ४६ |
| २. | बांधकाम | १३ |
| ३. | व्यापार, हॉटेल्स व रेस्टॉरंट | १२ |

| | | |
|---|---|---|
| ४. | मॅन्युफॅक्चरिंग | ११ |
| ५. | इतर | १८ |
| | एकूण | १०० |

स्रोत : पिरॅडिक लेबर फोर्स सर्व्हे

वरील तक्ता क्रमांक ५ वरून असे दिसते की, सन २०२२-२३ या वर्षात कृषी क्षेत्रात ४६ टक्के श्रमिक काम करत होते. बांधकाम क्षेत्रात १३ टक्के श्रमिक काम करत होते. व्यापार, हॉटेल व रेस्टॉरंट क्षेत्रात १२ टक्के, मॅन्युफॅक्चरिंग ११ टक्के आणि इतर क्षेत्रात १८ टक्के श्रमिक काम करत होते. उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या तुलनेत आजही कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांचे (कामगारांचे) प्रमाण ४६% एवढे मोठे असल्याचे दिसते.

खालील तक्ता क्रमांक सहा मध्ये विविध क्षेत्राने पुरवलेल्या रोजगाराची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक ६**

**विविध क्षेत्रांनी पुरवलेला रोजगार**

| अ. क्र. | वर्ष | कामगारांचे प्रमाण (%) | | |
|---|---|---|---|---|
| | | कृषी क्षेत्र | उद्योग क्षेत्र | सेवा क्षेत्र |
| १. | १९७२-७३ | ७४.०० | ११.२० | १४.६० |
| २. | १९९३-९४ | ६४.८० | १५.६० | १९.७० |
| ३. | २०११-१२ | ४८.९० | २४.३० | २६.८० |
| ४. | २०२२-२३ | ४६.०० | २४.०० | ३०.०० |

वरील तक्ता क्रमांक सहा वरून असे दिसते की, सन १९७२-७३ मध्ये कृषी क्षेत्रात ७४% लोक काम करत होते. उद्योग क्षेत्रात ११.२०% लोक काम करत होते आणि सेवा क्षेत्रात १४.६०% लोक काम करत होते. सन २०२२-२३ मध्ये कृषी क्षेत्रात ४६ टक्के लोक काम करत होते. उद्योगक्षेत्रात २४% आणि सेवा क्षेत्रात ३० टक्के लोक काम करत होते. १९७२ ७३ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये सेवा क्षेत्राने दुपटीपेक्षा अधिक रोजगार पुरवला आहे. अधिकाधिक रोजगार संधी निर्माण करण्याच्या बाबतीत हे क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावत आहे, हे स्पष्ट होते. १९७२-७३ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये सेवा क्षेत्रात झालेल्या रोजगार वाढीची माहिती खालील आलेखात दिली आहे.




**३) निर्यातीत वाढता हिस्सा :**

भारतातील सेवा क्षेत्राचा एकूण निर्यातीत हिस्सा वाढत आहे. १९६०-६१ मध्ये हा हिस्सा १०.४०% होता. तो २०१७-१८ मध्ये ४७.८०% एवढा वाढला. खालील तक्ता क्रमांक सात मध्ये सेवा क्षेत्रातून सेवांच्या निर्यातीपासून मिळालेल्या उत्पन्नाची माहिती (US$ Billions) दिली आहे.

**तक्ता क्रमांक ७**

**सेवांच्या निर्यातीपासून मिळालेले उत्पन्न**

| अ.क्र. | वर्ष | उत्पन्न (बिलियन डॉलर्स) |
|---|---|---|
| १. | २०१९-२० | २१३.२ |
| २. | १९२०-२१ | २०६.१ |
| ३. | २०२१-२२ | २५० |
| ४. | २०२२-२३ | २७२ |

स्त्रोत- मिनिस्ट्री ऑफ स्टॅटिसटिक्स प्रोग्राम इम्प्लिमेंटेशन

वरील तक्ता क्रमांक सात वरून असे दिसते की, दरवर्षी सेवांच्या निर्यातीत आणि निर्यातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होत आहे. सन २०१९-२० मध्ये सेवांच्या निर्यातीपासून भारताला २१३.२ बिलियन डॉलर्स उत्पन्न मिळाले होते. २०२०-२१ मध्ये कोरोनामुळे निर्यात उत्पन्नात घट झाली असली तरी २०२१-२२ पासून निर्यातीत वाढ होत आहे. २०२१-२२ मध्ये सेवांच्या निर्यातीपासून २५० बिलियन डॉलर्स मिळाले होते. तर २०२२-२३ मध्ये २७२ बिलियन डॉलर्स उत्पन्न मिळाले होते.




भारतातून सेवांची जशी निर्यात केली जाते तशी सेवांची आयात सुद्धा केली जाते. परंतु आयातीपेक्षा निर्यात जास्त असल्याने भारताला सेवा क्षेत्रापासून मिळणाऱ्या निव्वळ परकीय चलनाच्या प्राप्तीत अधिकाधिक वाढ होत आहे.

**तक्ता क्रमांक ८**

**भारतातील सेवांची आयात निर्यात (बिलियन डॉलर्स)**

| अ.क्र. | वर्ष | सेवांची निर्यात (बिलियन डॉलर्स) | सेवांची आयात (बिलियन डॉलर्स) | व्यापारशेष (बिलियन डॉलर्स) |
|---|---|---|---|---|
| १. | २०१३-१४ | १५७.२० | १२८.३६ | २८.३३ |
| २. | २०१४-१५ | १५६.२८ | १२३.५७ | ३२.७१ |
| ३. | २०१५-१६ | १६१.८२ | १३३.५३ | २८.२९ |
| ४. | २०१६-१७ | १८५.२९ | १५४.६० | ३०.७० |
| ५. | २०१७-१८ | २०५.११ | १७६.५८ | २८.५२ |

वरील तक्ता क्रमांक आठ वरून असे दिसते की, भारतातून ज्या सेवा निर्यात केल्या जातात त्या सेवांच्या निर्यातीपासून जेवढे उत्पन्न (परकीय चलन) देशाला मिळते त्यापेक्षा आयात कमी असल्याने देशाला सेवांच्या आयात-निर्यातव्यापारातून तोटा न होता फायदाच होतो. उदाहरणार्थ सन २०१३-१४ मध्ये भारतातून १५७.२० बिलियन डॉलरची निर्यात झाली होती. तर १२८.३६ बिलियन डॉलर्स सेवांची आयात केली होती. त्यामुळे २८.३३ बिलियन डॉलर्सचा देशाला लाभ झाला होता. सन २०१४-१५ मध्ये सेवांच्या आयात-निर्यात व्यापारापासून देशाला ३२.७१ बिलियन डॉलर्स, २०१५-१६ मध्ये २८.२९ बिलियन डॉलर्स, २०१६-१७ मध्ये ३०.७० बिलियन डॉलर्स आणि २०१७-१८ मध्ये २८.५२ डॉलर्स एवढे निव्वळ उत्पन्न मिळाले होते.

**भारताच्या एकूण निर्यातीत सेवा क्षेत्राचा वाटा :**

खालील तक्ता क्रमांक नऊ मध्ये भारताच्या एकूण निर्यातीतील सेवा क्षेत्राचा वाटा दर्शविला आहे.

**तक्ता क्रमांक ९**

**भारताच्या एकूण निर्यातीत सेवा क्षेत्राचा वाटा**

| अ.क्र. | वर्ष | निर्यात (%) |
|---|---|---|
| १. | २००४-०५ | २२.२० |
| २. | २००७-०८ | ३७.०० |
| ३. | २००८-०९ | २३.३० |
| ४. | २०१७ | ३८.०० |

स्त्रोत: एन. एस. एस. ओ. डाटा २०११-१२

वरील तक्ता क्रमांक नऊ वरून असे दिसते की, सन २००४-५ च्या तुलनेत भारताच्या एकूण निर्यातीत सेवा क्षेत्राचा असणारा वाटा २०१७ या वर्षात वाढलेला आहे. सन २००४-५ वर्षात सेवा क्षेत्राचा एकूण निर्यातीत वाटा २२.२०% होता. २०१७ मध्ये ३८ टक्के एवढा वाढला आहे.




**४) सेवा क्षेत्रातील वाढती विदेशी गुंतवणूक :**

भारतातील सेवा क्षेत्रात विदेशी गुंतवणूक वाढत आहे. वित्त संशोधन वविकास, कुरिअर, कॉम्प्युटर हार्डवेअर, सॉफ्टवेअर, व्यापार, टेलिकम्युनिकेशन, माहिती व प्रशासन, हॉटेल्स व टुरिझम, हॉस्पिटल डायग्नोस्टिक सेंटर, शिक्षण, किरकोळ व्यापार, सल्ला सेवा, सागरी व हवाई वाहतूक, कृषी सेवा इत्यादी विविध सेवांध्ये प्रत्यक्ष

विदेशी गुंतवणूक भारतात मोठ्या प्रमाणात होत आहे. खालील तक्ता क्रमांक १० मध्ये भारतातील सेवा क्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक / विदेशी थेट गुंतवणूक अमेरिकन डॉलर्स मध्ये (USS Million) दर्शविले आहे. तसेच एकूण विदेशी गुंतवणूकीमध्ये सेवा क्षेत्रात झालेल्या गुंतवणूकीचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक १०–सेवा क्षेत्रातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (USS Million)**

| अ.क्र. | वर्ष | भारतात आलेली एकूण विदेशी गुंतवणूक | सेवा क्षेत्रात झालेली विदेशी गुंतवणूक | एकूण विदेशी गुंतवणूकीत सेवा क्षेत्राचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | २०१६–१७ | ४३४७८ मिलियन डॉलर्स | २५१८५ मिलियन डॉलर्स | ५७.९०% |
| २. | २०१७–१८ | ४४८५७ मिलियन डॉलर्स | २८९६० मिलियन डॉलर्स | ६४.६०% |
| ३. | २०१८–१९ | ४४३६६ मिलियन डॉलर्स | २८२६४ मिलियन डॉलर्स | ६३.७०% |
| ४. | २०१९–२० | ४१९७७ मिलियन डॉलर्स | ३९५३९ मिलियन डॉलर्स | ६१.८०% |
| ५. | २०२०–२१ | ५९६३६ मिलियन डॉलर्स | ३९५३९ मिलियन डॉलर्स | ६६.३०% |

स्त्रोत: डिपार्टेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटरनल ट्रेड

वरील तक्ता क्रमांक १० वरून असे दिसते की, भारतात सेवा क्षेत्रात होत असलेल्या थेट विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण मोठे आहे. सन २०१६–१७ मध्ये भारतात ४३४७८ मिलियन डॉलर्स थेट विदेशी गुंतवणूक झाली होती. त्यातील २५१८५ मिलियन डॉलर्स गुंतवणूक सेवाक्षेत्रात झाली होती. सन २०१७–१८ मध्ये सेवाक्षेत्रात २८९६० तर २०१८–१९ मध्ये सेवा क्षेत्रात २८२६४ मिलियन डॉलर्सची गुंतवणूक झाली होती. २०१७–१८ च्या तुलनेत २०१८–१९ मध्ये थेट विदेशी गुंतवणूक आणि सेवा क्षेत्रात झालेली थेट विदेशी गुंतवणूक थोडी कमी झाल्याचे दिसते. सन २०१६–१७ मध्ये एकूण थेट विदेशी गुंतवणूकीपैकी सेवा क्षेत्रात झालेल्या गुंतवणूकीचे प्रमाण ५७.९० टक्के होते. २०१७–१८ मध्ये हे प्रमाण ६४.६० टक्के एवढे वाढले. तर २०१८–१९ मध्ये हे प्रमाण ६३.७० % एवढे (थोडेकमी) झाले. २०१९–२० मध्ये हे प्रमाण ६९.८०% एवढे वाढले. २०२०–२१ मध्ये हे प्रमाण ६६.३० % एवढे होते.

सन २०१८–१९ या वर्षात विविध सेवांध्ये खालीलप्रमाणे थेट विदेशी गुंतवणूक झाली होती.

**तक्ता क्र. ११**

**विविध सेवांधील थेट विदेशी गुंतवणूक**

| अ.क्र. | सेवांचा प्रकार | २०१८–१९ वर्षातील थेट विदेशी गुंतवणूक (USS मिलियन डॉलर) |
|---|---|---|
| १. | वित्त, संशोधन व विकास करिअर | ९१५८ |

| | | |
|---|---|---|
| २. | कॉम्प्युटर हार्डवेअर, सॉफ्टवेअर | ६४१५ |
| ३. | व्यापार | ४४६२ |
| ४. | टेलिकम्युनिकेशन | २६६८ |
| ५. | माहिती व प्रसारण | १२५२ |
| ६. | हॉटेल व टुरिझम | १०७६ |
| ७. | हॉस्पिटल डायग्नोस्टिक सेंटर | १०४५ |
| ८. | शिक्षण | ७७७ |
| ९. | किरकोळ व्यापार | ४४३ |
| १०. | सल्ला सेवा | ४११ |
| ११. | सागरी व हवाई वाहतूक | ४७० |
| १२. | कृषी सेवा | ८८ |
| | सेवा क्षेत्रातील एकूण विदेशी गुंतवणूक | २८२६४ |

स्त्रोत: तक्ता क्रमांक १० प्रमाणे

वरील तक्ता क्रमांक ११ वरून असे दिसते की, सन २०१८-१९ या वर्षात वित्त, संशोधन व विकास क्षेत्रात सर्वाधिक ९१५८ मिलियन डॉलरची गुंतवणूक झाली होती. त्या खालोखाल कॉम्प्युटर, हार्डवेअर, सॉफ्टवेअर (६४१५ मिलियन डॉलर्स), व्यापार (४४६२ मिलियन डॉलर्स), टेलिकम्युनिकेशन (२६६८ मिलियन डॉलर्स) गुंतवणूक झाली होती. सर्वात कमी थेट विदेशी गुंतवणूक कृषी क्षेत्रात झाली होती (८८ मिलियन डॉलर्स).

**५) सेवा क्षेत्राचे इतर महत्त्व किंवा फायदे :**

भारतातील सेवा क्षेत्राची वेगाने प्रगती होत आहे. खाजगी आणि सरकारीप्रयत्नांनी सेवा क्षेत्राचा विकास व सेवा क्षेत्राची वाढ घडून येत आहे. वरील फायद्याबरोबरच सेवा क्षेत्राचे इतरही फायदे भारतीय अर्थव्यवस्थेला प्राप्त होत आहेत. हे फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) शेतीचा विकास:**

सेवा क्षेत्राचा शेती क्षेत्रालाही लाभ होत असून सेवा क्षेत्राकडून पुरवल्या जाणाऱ्या विविध सेवामुंळे शेतीचाही विकास घडून येत आहे. सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना जे उत्पन्न मिळते ते काही प्रमाणात झिरपत जाऊन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत आहे. ''एकाचा खर्च म्हणजे दुसऱ्याचे उत्पन्न'' या अर्थशास्त्रातील तत्त्वाप्रमाणे सेवा क्षेत्रात काम करणारे लोक जो खर्च करतात त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत आहे. सेवा क्षेत्रात

रोजगार मिळाल्याने सेवा क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना उत्पन्नाचे साधन मिळाले आहे. तसेच सेवा क्षेत्रात अधिक उत्पन्न मिळत असल्याने सेवा क्षेत्रातील लोकांचा फळे, भाज्या, कडधान्ये, डाळी, दूध, अंडी यावरील खर्च वाढत आहे. अशाप्रकारे सेवा क्षेत्रात काम करत असणाऱ्या लोकांकडून विविध प्रकारच्या कृषी मालाला मागणी वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा, व्यापाऱ्यांचा फायदा होत आहे. सेवा क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने आणि त्यांचे उत्पन्नही वाढत असल्याने त्यांच्याकडून कृषी मालाची मागणी सुद्धा दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. सेवा क्षेत्रातील लोकांकडून कृषी मालाची मागणी वाढत असल्याने कृषी उत्पादनातही वाढ घडून येत आहे. कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्याची प्रेरणा शेतकऱ्यांना मिळत आहे. सेवा क्षेत्रात रोजगार संधी वाढत असल्याने ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुले, मुली सेवा क्षेत्रात दाखल होत आहेत. हे प्रमाण असेच वाढत राहिले तर शेतीवरील लोकसंख्येचा ताण त्यामुळे कमी होण्यास मदत होणार आहे. शेतीवरील लोकसंख्येचा वाढता दबाव कमी करण्यासाठी सेवा क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. म्हणून सेवा क्षेत्राच्या विकासाकडे आणि वाढीकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. काही शेतकऱ्यांची मुले,मुली सेवा क्षेत्रात काम करत असून त्यांना मिळणारे उत्पन्न ते काही प्रमाणात शेतीत गुंतवत आहेत. सिंचन सुविधा करणे, ट्रॅक्टर सारख्या यंत्रांचा वापर करणे, ग्रीन हाऊस, पॉलीहाऊस, तुषार सिंचन, ठिबक सिंचन सुविधा करणे यावर ते पैसा खर्च करत आहेत. त्यामुळे शेतीची उत्पादकता आणि उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. अशा प्रकारे सेवा क्षेत्रामुळे शेती व शेतकऱ्यांचा विविध प्रकारे फायदा होत आहे. सेवा क्षेत्राकडून कृषी विषयक ज्या विविध सेवा पुरवल्या जात आहेत त्याचा शेतीला लाभ होत आहे.

**२) औद्योगिक विकास :**

सेवा क्षेत्राचा कृषी क्षेत्राबरोबर औद्योगिक क्षेत्राला सुद्धा लाभ होत आहे. बँकिंग, व्यापार, वाहतूक, साठवणूक, वीज या सुविधा सेवा क्षेत्राकडून पुरवल्याजातात. त्याचा फायदा औद्योगिक क्षेत्राला होत आहे. सेवा क्षेत्रातील शिक्षण सेवा क्षेत्र भारतात झपाट्याने विकास पावत आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राला लागणारे चांगले मनुष्यबळ सेवा क्षेत्राकडून उपलब्ध होत आहे. यंत्रे हाताळण्यासाठी, कारखान्याचे किंवा उत्पादन संस्थेचे उत्तम व्यवस्थापन करण्यासाठी यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, व्यवस्थापक लागतात. त्याचा पुरवठा औद्योगिक क्षेत्राला सेवा क्षेत्राकडून होत आहे. औद्योगिक प्रगतीसाठी वाहतूक आणि दळणवळण क्षेत्राचीही भूमिका महत्त्वाची असते. भारतात वाहतूक आणि दळणवळण क्षेत्र सुद्धा वेगाने विकसित होत असून त्याचा फायदा औद्योगिक क्षेत्राला होत आहे. अशा प्रकारे सेवा क्षेत्रामुळे औद्योगिक क्षेत्राचाही विकास घडून येत असून भारताच्या औद्योगिक विकासाला चांगली चालना मिळत आहे.

**३) राहणीमानाच्या दर्जात सुधारणा:**

भारतातील सेवा क्षेत्राचा आणखी एक फायदा म्हणजे सेवा क्षेत्राच्या जलद प्रगतीमुळे भारतातील लोकांच्या राहणीमानात वाढ व सुधारणा होत आहे. सेवाक्षेत्रामुळे चांगले राहणीमान असणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ होत आहे. सेवा क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना अधिक चांगले उत्पन्न मिळत असल्याने त्यांना विविध

वस्तू व सेवांचा लाभ घेता येत आहे. त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे. अशाप्रकारे सेवा क्षेत्रामुळे (अधिक उत्पन्न मिळत असल्यामुळे) लोकांना चांगल्या राहणीमानाचे जीवन जगण्याची संधी मिळत आहे. म्हणून सेवा क्षेत्राच्या विकासाकडे सरकारने अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

**४) दारिद्र्यात घट :**

सेवा क्षेत्राच्या विकासाचा आणि वाढीचा आणखी एक फायदा म्हणजे सेवा क्षेत्रामुळे देशातील दारिद्र्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. कारण कृषी क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्रात अधिक उत्पन्न मिळते. सेवा क्षेत्रात रोजगाराच्या नवनवीन संधी सतत निर्माण होत आहेत. सेवा क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे दारिद्र्यात घट होण्यास मदत होत आहे. सेवा क्षेत्राचा जसजसा विकास होत जाईल तसतसे भारतातील दारिद्र्याचे प्रमाण कमी होत जाणार आहे. कारण सेवा क्षेत्रात अधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या रोजगाराच्या संधी सतत उपलब्ध होत असतात. कृषी क्षेत्रात तुलनेने वर्षातील कमी दिवस रोजगार उपलब्ध असतो. त्यामुळे सीमांत शेतकरी, शेतमजूर यांना दारिद्र्याशी सामना करावा लागतो. परंतु सेवा क्षेत्रात जवळजवळ वर्षभर रोजगार उपलब्ध असतो. त्यामुळे सेवा क्षेत्रात हलक्या दर्जाचे जरी काम उपलब्ध असले तरी या क्षेत्रातील श्रमिकांना दारिद्र्याशी सामना करावा लागत नाही.

**५) कौशल्यात वाढ व सुधारणा :**

वेगाने विकास पावत असलेल्या सेवा क्षेत्रामुळे भारतातील कुशल कामगारांचा फायदा होत आहे. त्यांना सेवा क्षेत्रात काम करण्याची संधी मिळत आहे. सेवा क्षेत्राला विविध कौशल्ये अंगी असलेल्या कुशल मनुष्यबळाची गरज असते. सेवाक्षेत्र वेगाने प्रगत होत असल्याने विविध कौशल्ये आत्मसात केलेल्या लोकांना सेवा क्षेत्राकडून मागणी वाढत आहे. त्यामुळे अशी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी अनेक लोक कौशल्याचे शिक्षण व प्रशिक्षण घेत आहेत. अशा प्रकारे सेवा क्षेत्राच्या वाढीमुळे कौशल्यात वाढ व सुधारणा होत आहे. सेवा क्षेत्राची वाढ जसजशी होत जाईल तसतशी कुशल श्रमिकांना मागणी वाढत जाईल. त्यामुळे कुशल श्रमिकांच्या अंगी असणाऱ्या विविध कौशल्यांचा देशाला लाभ होत जाईल. सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे अकुशल श्रमिकांना कुशल व प्रशिक्षित बनण्याची संधी प्राप्त झाली आहे. अशा प्रकारे सेवा क्षेत्रामुळे कौशल्यात वाढ व सुधारणा होत असल्यामुळे सेवा क्षेत्राचे महत्त्व भारतात दिवसेंदिवस वाढत आहे.

**६) बाजारपेठांचा विस्तार :**

भारतातील वेगाने विकास होत असलेल्या सेवा क्षेत्राचा आणखी एक फायदा दिसून येत आहे आणि तो म्हणजे सेवा क्षेत्रामुळे बाजारपेठांचा वेगाने विकास होत आहे. बाजारपेठांचा विकास आणि विस्तार होत आहे. नवनवीन बाजारपेठा निर्माण होत आहेत. सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे बाजारपेठांचा विकास होत आहे आणि बाजारपेठांच्या विकासामुळे सेवा क्षेत्राची प्रगती होत आहे. बाजारपेठांच्या विकासाचे, विस्ताराचे अनेक फायदे देशाला मिळत आहेत. हे फायदे मिळवण्यासाठी सेवा क्षेत्राच्या प्रगतीकडे सतत लक्ष देणे आवश्यक आहे.

### ७) आर्थिक वृद्धीच्या दरात वाढ :

भारताच्या आर्थिक विकासात सेवा क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उदाहरणार्थ १९५०-५१ मध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा दर किंवा आर्थिक वृद्धीचा दर ३.५% होता. तो सन २००८-२००९ मध्ये ६.७% वर पोहोचला. २०२३ मध्ये तो ६.३% होता. १९५०-५१ च्या तुलनेत सन २००८-०९ आणि २०२३ मध्ये भारताच्या आर्थिक वृद्धीच्या दरात जवळजवळ दुप्पट वाढ झाली आहे. त्याची जी काही प्रमुख कारणे आहेत, त्यामध्ये भारतात दिवसेंदिवस सेवा क्षेत्राची जी वाढ होत आहे ती वाढ कारणीभूत आहे. भारताच्या आर्थिक विकासाचा दर सतत वाढता ठेवायचा असेल तर सेवा क्षेत्राच्या प्रगतीकडे लक्ष दिलेच पाहिजे. हे या आकडेवारीवरून आपल्या लक्षात येते. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी आणि उद्योग क्षेत्राच्या तुलनेत सेवा क्षेत्राच्या वृद्धीचा दर जास्त आहे. उदाहरणार्थ सन २००८-०९ मध्ये कृषी क्षेत्राच्या वृद्धीचा दर १.६% होता. उद्योग क्षेत्राच्या वृद्धीचा दर ३.९% होता. तर सेवा क्षेत्राच्या वृद्धीचा दर ९.७% होता. अशा प्रकारे कृषी आणि उद्योग क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्राच्या वृद्धीचा दर जास्त असल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वृद्धीचा दर सुद्धा जास्त आहे. म्हणून भारताच्या आर्थिक वृद्धीचा दर वाढावा यासाठी सेवा क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष दिले पाहिजे. भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये सेवा क्षेत्राचा वाटा दिवसेंदिवस वाढत असल्यामुळेच भारताच्या आर्थिक वृद्धी दरात वाढ घडून आल्याचे स्पष्ट होते. म्हणून भारतात सेवा क्षेत्राचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

### ८) कर महसूलात वाढ :

सरकारला विविध प्रकारच्या करांपासून महसूल मिळत असतो. या एकूण कर महसूलात सेवा क्षेत्राचे योगदान दिवसेंदिवस वाढत आहे. सेवा क्षेत्र झपाट्याने प्रगत होत असल्याने सेवा करापासून मिळणाऱ्या महसूलात सुद्धा वेगाने व मोठी वाढ होत आहे. भारतात करपात्र सेवांची संख्या, सेवा करांचे दर आणि सेवा करदात्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सेवा क्षेत्राच्या विकासाचे हे निर्देशकच आहेत. उदाहरणार्थ सन १९९४-९५ मध्ये करपात्र सेवांची संख्या ०३ होती. ती २००६-०७ मध्ये ९९ झाली. सन १९९४-९५ मध्ये सेवा करदात्यांची संख्या ३९४३ होती. ती सन २००६-०७ मध्ये ९,१८,७४६ इतकी झाली. भारताच्या एकूण कर महसूलात सेवा करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा दिवसेंदिवस वाढत आहे. उदाहरणार्थ सन २०००-२००१ मध्ये एकूण कर महसूलात सेवा कराचा वाटा केवळ १.३८% होता. तो २००८-०९ मध्ये ११.८% एवढा वाढला.

### ९) मानव विकासात सुधारणा :

वेगाने विकास पावणाऱ्या सेवा क्षेत्राचा आणखी एक फायदा देशाला होत आहे आणि तो म्हणजे भारतातील मानव विकासात (लोकसंख्येच्या गुणवत्तेत) सुधारणा होत आहे. भारतात लोकसंख्या प्रचंड आहे. परंतु लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा खूपच कमी आहे. दारिद्र्य, निरक्षरता मोठ्या प्रमाणावर आहे. अपेक्षित आयुर्मान कमी आहे. परंतु सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे मानव विकास निर्देशांकात सुधारणा होत आहे. दारिद्र्य,

निरक्षरता, आरोग्य यांचे प्रमाण कमी होत आहे. अशा प्रकारे मानव विकासात सुधारणा घडवून आणण्यासाठी म्हणजेच लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा सुद्धा उंचावण्यासाठी सेवा क्षेत्राच्या प्रगतीकडे लक्ष दिले पाहिजे.

**१०) तांत्रिक प्रगती/ तंत्रज्ञानाचा विकास:**

सेवा क्षेत्राचा आणखी एक फायदा सांगता येईल आणि तो म्हणजे सेवा क्षेत्रामुळे देशाच्या तांत्रिक प्रगतीचा वेग वाढत आहे. नवनवीन तंत्रज्ञान सेवा क्षेत्रामुळे देशातील कृषी, उद्योग या क्षेत्रांना उपलब्ध होत आहे. नवनवीन तंत्रज्ञानाचा शोध आणि वापर वाढत आहे. हा सेवा क्षेत्राचा महत्त्वाचा फायदा सांगितला जातो.

**११) भारतीय कामगारांच्या गतिशीलतेत वाढ:**

सेवा क्षेत्राच्या वाढीमुळे भारतीय कामगारांची गतिशीलता वाढत आहे. विकसित देशांच्या तुलनेत भारतीय कामगारांची गतिशीलता खूपच कमी आहे. परंतु सेवा क्षेत्रात रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होत असल्याने आणि उत्पन्नही चांगले मिळत असल्याने कामगार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास पसंती देत आहेत. संपूर्ण देशभर सेवा क्षेत्राची वाढ होत असल्याने स्थलांतरातही वाढ होत आहे. कामगारांची गतिशीलता किंवा स्थलांतर वाढल्यामुळे कामगारांची बेकारी, दारिद्र्य यात घट होत आहे. तसेच गतिशीलता/ स्थलांतर वाढल्यामुळे सेवा क्षेत्राला कुशल, अकुशल अशा विविध प्रकारचे मजूरही उपलब्ध होत आहेत. सेवा क्षेत्राच्या वाढीमुळे कामगारांची गतिशीलता वाढून कामगारांचाही फायदा होत आहे आणि कामगारांची गतिशीलता वाढल्यामुळे सेवा क्षेत्राला कामगार मिळून सेवा क्षेत्राचाही फायदा होत आहे.

**१२) इतर फायदे :**

भारतातील वेगाने विकास पावत असलेल्या सेवा क्षेत्रामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला इतरही काही फायदे मिळत आहेत. हे फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

१) प्रादेशिक विषमता कमी करण्यास उपयुक्त

२) आर्थिक विषमता कमी होण्यास मदत

३) आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढण्यास सेवाक्षेत्र उपयुक्त

४) लोकांच्या आरोग्यात सुधारणा घडवून आणण्यास उपयुक्त

५) संशोधनात वाढ

६) सामाजिक विकास

७) सर्वसमावेशक वृद्धी घडवून आणण्यास उपयुक्त

८) उपभोक्त्याच्या संतोषाधिक्यात वाढ

**१३) प्रादेशिक विषमता कमी करण्यास उपयुक्त :**

जेव्हा एखाद्या देशातील काही प्रदेश विकसित किंवा पुढारलेले असतात आणि काही प्रदेश मागासलेले किंवा विकसित प्रदेशांच्या तुलनेत कमी विकसित असतात तेव्हा त्यास प्रादेशिक विषमता किंवा प्रादेशिक असमतोल असे म्हणतात. प्रादेशिक विषमतेची समस्या गंभीर मानली जाते. कारण प्रादेशिक विषमता आर्थिक विकासात अडथळा निर्माण करते. म्हणून प्रत्येक देश आपल्या देशातील प्रादेशिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करत असतो. प्रादेशिक विषमतेची संकल्पना खूप व्यापक आहे. प्रादेशिक विषमता ही तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवरही आढळून येते. मागासलेल्या प्रदेशातून किंवा मागास विभागातून राष्ट्रीय उत्पन्नात पडणारी भर कमी असते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा दर कमी राहतो. म्हणून प्रत्येक देश प्रादेशिक विषमता कमी करण्याला प्राधान्य देत असतो. सरकारने मागास प्रदेशात प्राथमिक आणि द्वितीय क्षेत्राबरोबर तृतीय क्षेत्राच्या विकासावर भर दिला तर मागास प्रदेशांचा मागासलेपणा कमी होऊन देशाच्या विकासातील प्रादेशिक विषमता कमी होण्यास मदत होते. मागास प्रदेशात नवीन रस्त्यांची बांधणी, जुन्या रस्त्यांची दुरुस्ती, जुन्या रस्त्यांचे रुंदीकरण, पर्यटन स्थळांचा विकास आणि नवीन पर्यटन स्थळांची निर्मिती, नवीन अनुदानित शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना, नवीन रेल्वेमार्गांची उभारणी, बँक शाखांची स्थापना, दळणवळणाची सुविधा इत्यादी सेवांच्या संख्यात्मक आणि गुणात्मक वाढीवर सरकारने भर दिला तर मागास प्रदेशांचा मागासलेपणा कमी होण्यास मदत होते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात आणि रोजगार पातळीत वाढ घडून येण्यास मदत होते. अशा प्रकारे मागास प्रदेशात विविध सेवा निर्माण करण्यावर सरकारने भर दिला तर देशातील प्रादेशिक विषमता कमी होऊन आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. हे सेवा क्षेत्राचे महत्त्व आहे.

**१४) आर्थिक विषमता कमी होण्यास मदत :**

देशात गरीब लोकांचा वर्ग आणि श्रीमंत लोकांचा वर्ग असे दोन वर्ग अस्तित्वात असणे म्हणजे आर्थिक विषमता होय. कोणत्याही देशात गरीब, मध्यम आणि श्रीमंत अशा प्रकारचे लोक आढळून येतात. आर्थिक विषमता विविध कारणामुळे निर्माण होत असते. देश विकसित असो, अविकसित असो अगर विकसनशील असो कोणत्याही प्रकारचा देश असो प्रत्येक देशात आर्थिक विषमता असतेच. आर्थिक विषमता तीव्र / पराकोटीची असेल तर देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. आर्थिक विषमतेची समस्या गंभीर स्वरूपाची नसेल तर आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होत नाहीत. देशात श्रीमंतांची संख्या २० टक्के असेल आणि गरीबांची लोकसंख्या ८० टक्के असेल तर मात्र आर्थिक विषमतेची समस्या गंभीर स्वरूपाची राहते. अशी विषमता आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण करते. म्हणून प्रत्येक देश आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सतत उपाययोजना करत असतो. आर्थिक विषमतेला संपत्तीतील विषमता / उत्पन्नातील विषमता / मालमत्तेतील विषमता असे म्हणतात. आर्थिक विकासाचे फायदे मूठभर लोकांनाच मिळत असतील तर आर्थिक विषमता निर्माण होते. सेवा क्षेत्राच्या माध्यमातून आर्थिक विषमता कमी करणे शक्य असते. रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक इत्यादी वाहतूक सोयींचा समावेश सेवा क्षेत्रात होत असतो. सरकारने वाहतूक सोयींच्या विकासाकडे लक्ष दिले तर या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होऊन लोकांना उत्पन्नाचे साधन मिळून

आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. तसेच सेवा क्षेत्रातील व्यापार, पर्यटन, मनोरंजन इत्यादी सेवांची जसजशी प्रगती होत जाते तसतशी आर्थिक विषमता कमी होत जाते. सरकारने सेवा क्षेत्राच्या विकासाकडे योग्य प्रकारे लक्ष दिले तर लोकांना उत्पन्नाचे साधन मिळून आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. अशा प्रकारे सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे (सेवा क्षेत्रातील पुरेशा गुंतवणूकीमुळे) देशातील आर्थिक विषमता कमी होऊन आर्थिक विकासाचा दर वाढण्यास मदत होते. म्हणून देशाच्या आर्थिक विकासात तृतीय क्षेत्राची (सेवा क्षेत्राची) भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**१५) आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढण्यास उपयुक्त :**

सेवा क्षेत्राचा राष्ट्राला मिळणारा आणखी एक महत्त्वपूर्ण फायदा म्हणजे सेवा क्षेत्रामुळे किंवा सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचा होतो. म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट भरून काढण्यास मदत होते. देशातील प्राथमिक (कृषी), द्वितीय (उद्योग) आणि तृतीय (व्यापार व सेवा) ही तिन्ही क्षेत्रे प्रगत असतील तर आंतरराष्ट्रीय व्यापारात तूट निर्माण होत नाही. कारण अशा राष्ट्रांची आयात कमी असते आणि निर्यात जास्त असते. अविकसित देशांची आणि विकसनशील देशांची आयात जास्त असते आणि निर्यात कमी असते. कारण या देशातील तिन्ही क्षेत्रांची उत्पादकता व कार्यक्षमता कमी असते. सन १९५१ पासून आजतागायत भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारात तूट दिसून येते. एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट दिवसेंदिवस वाढत असल्याचे आढळते. तिन्ही क्षेत्रातील वस्तू आणि सेवांच्या निर्यातीत जर वाढ घडून आली तर आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी होण्यास मदत होते. आंतरराष्ट्रीय व्यपारातील तूट कमी करण्यासाठी सेवा क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावू शकते. सरकारने सेवा क्षेत्राच्या प्रगतीकडे विशेष लक्ष दिले, सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आणि खाजगी क्षेत्राला सेवा क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन दिले तर सेवा क्षेत्रातील सेवांच्या निर्यातीत वाढ होऊन आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी होण्यास मदत होते. म्हणून अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी सेवा क्षेत्राच्या प्रगतीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ पासून भारताने सेवा क्षेत्राकडे चांगले लक्ष दिले आहे. त्यामुळे सेवा क्षेत्राची चांगली प्रगती घडून येत आहे.

**१६) उपभोक्त्यांच्या संतोषाधिक्यात वाढ :**

सेवा क्षेत्राच्या प्रगतीचा आणखी एक फायदा म्हणजे सेवा क्षेत्रामुळे देशातील उपभोक्त्यांच्या संतोषाधिक्यात वाढ होते. अपेक्षिलेल्या किंमतीपेक्षा कमी किंमतीत ग्राहकांना जेव्हा वस्तू व सेवा मिळतात तेव्हा उपभोक्त्यांचा जो आर्थिक फायदा होतो त्यास उपभोक्त्यांचे संतोषाधिक्य असे म्हणतात. देशातील सेवा क्षेत्राची जसजशी प्रगती होत जाते तसतशी विविध सेवांची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ होत राहते. त्यामुळे उपभोक्त्यांच्या संतोषाधिक्यातही वाढ घडून येते. उपभोक्त्यांच्या संतोषाधिक्यात वाढ झाल्यामुळे उपभोक्त्यांकडून विविध सेवांना असणाऱ्या मागणीत सुद्धा वाढ घडून येते. त्यामुळे सेवा क्षेत्राच्या प्रगतीला चालना मिळून आर्थिक विकासालाही चांगली चालना मिळते.

**१७) मानवी भांडवलाचे स्थलांतर रोखण्यास उपयुक्त :**

देशातील शास्त्रज्ञ, कलावंत, संशोधक, व्यावसायिक, संयोजक, शिक्षक इत्यादी बुद्धिमान लोक जेव्हा

आपल्या देशातून दुसऱ्या देशात नोकरीसाठी, व्यवसायासाठी स्थलांतरित होतात तेव्हा त्यास मानवी भांडवलाचे उड्डाण किंवा मानवी भांडवलाचे स्थलांतर किंवा बुद्धीवहन (Brain drain) असे म्हणतात. अविकसित आणि विकसनशील राष्ट्रातून विकसित राष्ट्रात सतत मानवी भांडवलाचे (चांगल्या मनुष्यबळाचे) स्थलांतर होत असते. चांगले मनुष्यबळ देशाबाहेर जात असल्याने अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांचा जलद विकास होत नाही. त्यांच्या विकासदरावर प्रतिकूल परिणाम होतो. देशात बुद्धिमान लोकांना पुरेसा कामधंदा नसेल तर काही बुद्धिमान लोक परेदशात निघून जातात. परंतु जर देशातील सेवा क्षेत्र प्रगत असेल तर बुद्धिमान लोकांना देशातच त्यांच्या योग्यतेचे काम मिळते. त्यामुळे बुद्धिमान लोकांचे देश सोडून जाण्याचे प्रमाण कमी होते. त्यांच्या बुद्धिमत्तेचा, कौशल्याचा, ज्ञानाचा देशाला फायदा होतो. अशा प्रकारे बुद्धिमान लोकांनी देश सोडून जाऊ नये यासाठी आणि त्यांच्या विद्वत्तेचा, बुद्धिमत्तेचा फायदा देशाच्या सर्वांगीण विकासाला व्हावा यासाठी देशातील सेवा क्षेत्र मजबूत आणि प्रगत असले पाहिजे. सेवा क्षेत्राची जसजशी प्रगती होत जाते तसतसे मानवी भांडवलाचे स्थलांतर कमी होण्यास मदत होते आणि विकासाचा दर वाढण्यास मदत होते.

**१८) प्रभावी मागणीत वाढ :**

देशातील सेवा क्षेत्राची जसजशी प्रगती होत जाते तसतशी प्रभावी मागणीत (परिणामकारक मागणीत) वाढ घडून येते. देशातील सर्व लोकांची किंवा संपूर्ण समाजाची वस्तू आणि सेवांना असणारी मागणी म्हणजे प्रभावी मागणी होय. प्रभावी मागणीत वाढ झाल्यास उत्पादनात आणि रोजगारात वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकास दरात वाढ घडून येते. सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे प्रभावी मागणीत वाढ घडून येण्यास मदत होते. सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे विविध प्रकारच्या सेवांचा पुरवठा वाढतो. त्यामुळे सेवांना मागणी वाढून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. सेवा क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगले उत्पन्न मिळत असल्याने त्यांची कृषी मालाची, कारखानदारी वस्तूंची आणि विविध सेवांची मागणी वाढते. अशा प्रकारे सेवा क्षेत्र प्रगत असेल तर प्रभावी मागणी वाढून राष्ट्रीय उत्पादनात आणि रोजगार पातळीत वाढ घडून येते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाचा दर वाढण्यास मदत होते.

**१९) इतर फायदे :**

सेवा क्षेत्राचे इतरही फायदे देशाला मिळतात. उदाहरणार्थ, सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे लोकांच्या आरोग्यात सुधारणा घडून येण्यास मदत होते. संशोधनात वाढ व सुधारणा होते. सामाजिक विकास घडून येतो. चंगळवादात वाढ होऊन वस्तू व सेवांचा उपभोग वाढतो. सर्वसमावेशक वृद्धी घडून येण्यास मदत होते. ग्रामीण विकासास हातभार लागतो. लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात वाढ व सुधारणा होते. देशाला आत्मनिर्भर / स्वावलंबी बनवणे शक्य होते.

**समारोप :**

भारत सरकारने सन १९९१ पासून स्वीकारलेले नवीन आर्थिक धोरण, शहरीकरणाचा वाढता वेग, पर्यटन व्यवसायात होत असलेली वृद्धी, वाढता चंगळवाद, लोकांच्या उत्पन्नात होत असलेली वाढ, सेवा क्षेत्रातील

वाढती खाजगी, सरकारी आणि विदेशी गुंतवणूक या विविध कारणांळे भारतातील सेवा क्षेत्र अलीकडच्या काळात वेगाने विकसित होत आहे. झपाट्याने विकसित होत असलेल्या सेवा क्षेत्राचे काही फायदेही भारताला अनुभवास येत आहेत. उदाहरणार्थ सेवाक्षेत्रामुळे राष्ट्रीय उत्पन्नात, दरडोई उत्पन्नात, राहणीमानाच्या दर्जात, निर्यातीत, आर्थिक वृद्धी दरात, परकीय चलनाच्या साठ्यात, कृषी आणि औद्योगिक विकासात, मानव विकासात, कामगारांच्या गतिशीलतेत वाढ होत आहे. सामाजिक, आर्थिक विकासासाठी आणि सर्वसमावेशक विकास घडवून आणण्यासाठी सेवा क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. म्हणून सेवाक्षेत्राच्या विकासाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.

### २.२.२ सरकारची आर्थिक विकासातील भूमिका : (Role of Government in Economic Development)

**प्रास्ताविक :**

राष्ट्राच्या आर्थिक विकासात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासासाठी सरकारला पुढाकार घ्यावाच लागतो. आर्थिक विकासासाठी सरकारला विविध प्रकारची उपयुक्त कार्ये करावी लागतात. सरकार ही जी उपयुक्त कार्ये करते त्यास सरकारचा अर्थव्यवस्थेतील हस्तक्षेप असे म्हणतात. सरकारचा अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप असावा की नसावा? हस्तक्षेप असावा तर तो किती प्रमाणात असावा? याबाबतीत अर्थशास्त्रज्ञांमध्ये एकमत नाही. ॲडम स्मिथ सारख्या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी निर्हस्तक्षेप धोरणाचे समर्थन केले आहे. त्यांनी सरकारने अर्थव्यवस्थेत कमीत कमी हस्तक्षेप करावा किंवा अर्थव्यवस्थेत कमीत कमी कार्ये करावीत असे म्हटले होते. पूर्वीच्या काळात बऱ्याच देशातील सरकारे किंवा शासन व्यवयस्था जनतेवर जुलूम करत असत. सरकारला अर्थव्यवस्थेत जास्तीत जास्त हस्तक्षेप करू दिला तर सरकारकडून जनतेचे अधिकच शोषण व नुकसान होईल म्हणून सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी हस्तक्षेप नीतीऐवजी निर्हस्तक्षेप नितीचे समर्थन केले होते. आजच्या काळात हुकूमशाही असणारी राष्ट्रे जगात कमी आहेत. त्यामुळे देशाच्या आर्थिक, सामाजिक विकासासाठी सरकारने अर्थव्यवस्थेत अधिकाधिक कामे करावीत या विचाराला मान्यता मिळाली आहे. हुकूमशाही राष्ट्र अधिकच हुकूमशाही बनून जनतेवर अधिकच जुलूम करू नये या चांगल्या उद्देशाने जुन्या काळातील अर्थतज्ज्ञांनी सरकारने मर्यादित (कमीत कमी) हस्तक्षेप करावा असा विचार मांडला होता. त्यामुळे त्यांच्या विचारावर टीका करणे योग्य होत नाही.

आर्थिक विकास (Economic Development) आणि आर्थिक वृद्धी (Economic Growth) यामध्ये फरक आहे. आर्थिक विकास ही संकल्पना अविकसित (Undeveloped / Backward) आणि विकसनशील (Developing) राष्ट्रांच्या संदर्भात वापरली जाते. आर्थिक वृद्धी (आर्थिक वाढ) ही संकल्पना विकसित (Developed) किंवा श्रीमंत (Rich) राष्ट्रांच्या संदर्भात वापरली जाते. ज्या राष्ट्रातील कृषी, कारखानदारी, व्यापार व सेवा ही सर्व क्षेत्रे मागासलेली असतात, दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्न खूपच कमी असते त्या राष्ट्रांना अप्रगत राष्ट्रे (Undeveloped Countries) असे म्हणतात. याऊलट ज्या राष्ट्रातील सर्व क्षेत्रे पुढारेली असतात, लोकांचे दरडोई उत्पन्न आणि राष्ट्रीय उत्पन्न सर्वोच्च असते अशा राष्ट्रांना विकसित राष्ट्रे (Developed Countries)

असे म्हणतात. जी राष्ट्रे अप्रगतही नाहीत आणि विकसितही नाहीत अशा राष्ट्रांना विकसनशील राष्ट्रे (Developing Countries) असे म्हणतात. भारत आणि चीन ही जगातील प्रमुख विकसनशील राष्ट्रे आहेत. जी राष्ट्रे इंग्लंड, अमेरिका, जपान या राष्ट्रांप्रमाणे प्रगत नाहीत परंतु विकासाच्या दिशेने ज्यांची वाटचाल सुरू आहे अशा राष्ट्रांना विकसनशील देश असे म्हणतात. अशा प्रकारे जगातील राष्ट्रांची (१) अप्रगत देश, (२) प्रगत देश आणि (३) विकसनशील देश अशा तीन प्रकारात वर्गवारी केली जाते. अप्रगत राष्ट्रांना (Less Developed Countries) असे संबोधले जाते. ज्या राष्ट्रांचा फारसा विकास झालेला नाही किंवा जी राष्ट्रे कमी विकसित आहेत आणि जी राष्ट्रे विकसनशील आहेत अशा राष्ट्रात सरकारच्या भूमिकेला (कार्याला / हस्तक्षेपाला) खूप महत्त्व असते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारत एक मागासलेले राष्ट्र होते. परंतु भारत सरकारच्या विशेष पुढाकारामुळे ८० वर्षांत भारत विकसनशील राष्ट्र बनले असून विकासाच्या दिशेने ते वेगाने झेप घेत आहे. GDP च्या बाबतीत (स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये) भारताने आज जगात चौथ्या क्रमांकाचे स्थान मिळवले आहे. यावरून राष्ट्राच्या आर्थिक विकासात सरकारची भूमिका किती महत्त्वपूर्ण असते ते आपल्या लक्षात येते. आर्थिक विकास ही एक सावकाश आणि दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असते. राष्ट्राचा विकास १०-२० वर्षात घडून येत नाही. त्यासाठी ५० ते १०० वर्षे लागतात. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात प्रचंड भांडवल गुंतवावे लागते. बहुसंख्य लोक गरीब असल्याने सरकारलाच त्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो. अशा प्रकारे देशात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला सुरवात करण्यासाठी, आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रातील सरकारांना मोठा पुढाकार घ्यावा लागतो. सरकारने पुढाकार घेतल्याशिवाय (विविध विकास कामे सुरू केल्याशिवाय) अप्रगत राष्ट्रातील विकास प्रक्रियेला चांगली गती येत नाही. कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासात सरकारची भूमिका किती महत्त्वपूर्ण असे ते खालील मुद्द्यांवरून आणि त्यांच्या स्पष्टीकरणावरून आपल्या लक्षात येईल.

**१) कृषी क्षेत्राचा विकास :**

कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रातील शेती मागासलेली असते. शेतीची उत्पादकता खूपच कमी असते. कारखानदारी क्षेत्राचा आणि सेवा क्षेत्राचा फारसा विकास झाला नसल्याने गरीब राष्ट्रातील बहुसंख्य लोकसंख्या उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असते. त्यामुळे सरकारला कृषी क्षेत्राच्या विकासाकडे लक्ष द्यावे लागते. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जगण्यासाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची लोकसंख्या सुमारे ७२ टक्के होती. ब्रिटीश राजवटीत हे प्रमाण ८० टक्केपेक्षा अधिक होते. द्वितीय आणि तृतीय क्षेत्रांचा विकास झाला नसल्याने प्राथमिक (कृषी) क्षेत्रही मागासलेले राहिलेले असते. अर्थव्यवस्थेची सर्व क्षेत्रे विकासासाठी एकमेकांवर अवलंबून असतात. उदाहरणार्थ, कृषी क्षेत्राचा विकास होऊ लागला की कारखानदारी क्षेत्राचा फायदा होतो. या क्षेत्राच्या प्रगतीस सुरवात होते आणि कारखानदारी क्षेत्राच्या विकासास सुरवात झाली की त्याचा फायदा कृषी क्षेत्राला होतो. कृषी क्षेत्राच्या विकासाला सुरवात होते. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांची अर्थव्यवस्था 'कृषीप्रधान अर्थव्यवस्था' (Agricultural Economy) असते. उपजीविका, रोजगार, निर्यात इत्यादी अनेक बाबतीत ही राष्ट्रे कृषीक्षेत्रावर अवलंबून असतात. म्हणून कृषी क्षेत्राच्या प्रगतीकडे अप्रगत

व विकसनशील राष्ट्रांच्या सरकारांना विशेष लक्ष द्यावे लागते. अशा देशात कृषी क्षेत्राच्या विकासात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. सरकारच्या पुढाकाराशिवाय अशा गरीब राष्ट्रातील मागास शेतीची प्रगतीच होऊ शकत नाही. अप्रगत राष्ट्रात कोरडवाहू (जिराईत) शेतीचे प्रमाण ८० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक असते. २५ टक्के किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्र बागाईत असते. अशा प्रकारे अप्रगत देशात सिंचनाखालील क्षेत्र खूपच कमी असते. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या शेतजमिनीचे प्रमाण मोठे असते. पाऊस बेभरवशाचा असल्याने अशा देशांना कधी ओल्या तर कधी कोरड्या दुष्काळाशी सामना करावा लागतो. भारतात दरवर्षी कोठे ना कोठे ओला किंवा कोरडा दुष्काळा पडत असतो. त्याचा परिणाम कृषी उत्पादनावर होतो. शेतीला बारमाही खात्रीची पाण्याची सुविधा असेल तर कृषी उत्पादनात लक्षणीय वाढ होते. त्यासाठी देशात पुरेशा प्रमाणात धरणे, कालवे बांधावी लागतात. त्यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. खाजगी क्षेत्राला हे शक्य नसते. सरकारलाच पुढाकार घेऊन लहान मोठी धरणे बांधावी लागतात. स्वातंत्र्योत्तरकाळात भारत सरकारने देशात अनेक लहान, मध्यम व मोठी धरणे बांधली आहेत. तसेच सरकारकडून शेतकऱ्यांना शेतात विहिर काढण्यासाठी, शेततळे तयार करण्यासाठी मोठी आर्थिक मदत दिली जात आहे. महाराष्ट्र राज्यात सरकारने शेतकऱ्यांसाठी 'मागेल त्याला शेततळे' ही योजना सुरू केली असून या योजनेवर सरकार दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च करत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात  हजारो शेततळी तयार झाली आहेत. त्यामुळे सिंचनाखालील क्षेत्र वाढत असून कोरडवाहू क्षेत्र कमी होत आहे. त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ घडून येत आहे. अप्रगत देशातील सरकारांना केवळ सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करून चालत नाही तर कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी इतरही उपाय योजावे लागतात. उदाहरणार्थ, जमीन सुधारणा कायदे करणे व त्याची अंमलबजावणी करणे (कसेल त्याची जमीन, जमीनधारणा मर्यादा कायदा इत्यादी), देशात हरित क्रांती घडवून आणणे इत्यादी उपाय सरकारला योजावे लागतात. परदेशातून खते, चांगली बियाणे, कृषी अवजारे आयात करून ती शेतकऱ्यांना पुरवणे ही कामे सरकारलाच करावी लागतात. शेतीच्या विकासासाठी कृषी संशोधन संस्था आणि कृषी विद्यापीठांची गरज असते. त्यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. हे काम अप्रगत देशात सरकारलाच करावे लागते. स्वातंत्र्योत्तरकाळात भारत सरकारने देशात ठिकठिकाणी अनेक कृषी विद्यापीठे आणि शेतकी शाळा व कृषी महाविद्यालये स्थापन केली असून या कृषी विद्यापीठात कृषी क्षेत्राला उपयुक्त ठरणारे संशोधन केले जात आहे. त्याचा मोठा लाभ कृषी क्षेत्राला होत आहे. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील बहुसंख्य शेतकरी गरीब असतात. ते शेतीची सुधारणा करू शकत नाहीत. म्हणून कृषी क्षेत्राला (शेतकऱ्यांना) कमी व्याज दरात आणि पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करण्याचे काम सरकारलाच करावे लागते. खाजगी बँका कमी व्याजात शेती क्षेत्राला कर्जपुरवठा करू शकत नाहीत. ते काम सरकारलाच करावे लागते. खेड्यापाड्यात सरकारी बँकांच्या शाखा स्थापन करून त्यामार्फत कृषी क्षेत्राला कमी व्याज दरात कर्जपुरवठा करण्याचे काम सरकारला करावे लागते. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने हे काम अत्यंत प्रभावीपणे केले आहे. स्टेट बँक (SBI), रिझर्व्ह बँक (मध्यवर्ती बँक) आणि इतर राष्ट्रीयीकृत बँकामार्फत भारत सरकार सन १९४७ पासून गेली ८० वर्षे सतत कृषी क्षेत्राला सवलतीच्या व्याज दराने कर्जपुरवठा करत आहे. त्याचा फायदा कृषी क्षेत्राला होत असून शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होत आहे. १९४७ पासून १९७० पर्यंत भारताला अन्नधान्याची व इतर कृषी मालाची आयात

करावी लागत होती. परंतु १९६० नंतर भारत सरकारने हरित क्रांती घडवून आणण्याला प्राधान्य दिले. सरकारने पुढाकार घेऊन हरित क्रांती घडवून आणली. त्यावर अब्जावधी रुपये खर्च केले. त्यामुळे १९७० साली भारत अन्नधान्याच्या आणि इतर कृषी उत्पादनांच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनू शकला. कृषी मालाची आयात करणारा आपला देश आता कृषी मालाची निर्यात करत आहे. अशा प्रकारे वरील स्पष्टीकरणावरून कृषी विकासात सरकारची भूमिका किती महत्त्वाची असते हे आपल्या लक्षात येते. सरकारच्या पुढाकाराशिवाय अप्रगत देशातील मागास शेतीचा विकास होऊ शकत नाही. कारण अशा देशातील शेतकरी खूप गरीब असतात. शेतीत गुंतवण्यासाठी त्यांच्याकडे पुरेशे भांडवल नसते. तसेच खाजगी क्षेत्र धरण बांधणी प्रकल्पावर खर्च करू शकत नाही. हे काम सरकारलाच करावे लागते. भारतात हे काम आजही सरकारच करत आहे.

**२) कारखानदारी क्षेत्राचा विकास :**

अर्थव्यवस्थेच्या द्वितीय क्षेत्राला कारखानदारी क्षेत्र किंवा औद्योगिक क्षेत्र असे म्हणतात. औद्योगिक क्षेत्रामध्ये लहान, मध्यम, मोठे उद्योग या सर्व प्रकारच्या उद्योगांचा समावेश होतो. अप्रगत राष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रसुद्धा खूपच मागासलेले असते. विविध प्रकारच्या लहान-मोठ्या कारखान्यांची संख्या खूपच कमी असते. मागणीपेक्षा कारखानदारी वस्तूंचा पुरवठा खूपच कमी असतो. त्यामुळे विदेशातून औद्योगिक वस्तू मोठ्या प्रमाणात आयात कराव्या लागतात. कृषी क्षेत्राप्रमाणे औद्योगिक क्षेत्र सुद्धा अप्रगत राष्ट्रात खूपच मागासलेले असते. म्हणून औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी सुद्धा सरकारलाच पुढाकार घ्यावा लागतो. लोखंड उद्योग, पोलाद व स्टील उद्योग, स्वयंपाकाचा गॅस, वीज, खनिज तेल इत्यादी मोठे व अवजड उद्योग उभे करण्यासाठी सरकारला पुढे यावे लागते. कारण मोठ्या किंवा अवजड उद्योगात प्रचंड गुंतवणूक करावी लागते. तेवढा पैसा आणि धाडस खाजगी क्षेत्राजवळ नसते. या मोठ्या आणि अवजड उद्योगापासून फायदे मिळण्यास खूप उशीर लागतो. त्यामुळे सरकारलाच पुढाकार घेऊन हे उद्योग सुरू करावे लागतात. मोठे व अवजड उद्योग सरकारने सुरू केले की त्या उद्योगात तयार होणाऱ्या उत्पादनापासून इतर वस्तू तयार करणारे उद्योग देशात सुरू होतात. अप्रगत देशातील जनता खूपच गरीब असते. त्यामुळे लहान व्यवसाय सुरू करण्यासाठी सुद्धा पुरेसे भांडवल त्यांच्याकडे नसते. म्हणून सरकारला लघु उद्योग, कुटिर उद्योग किंवा सूक्ष्म उपक्रमांना मदत करावी लागते. लहान, मध्यम, मोठ्या उद्योगांना सरकार बँकामार्फत, वित्तीय संस्थामार्फत वित्तीय मदत करते. तसेच औद्योगिक क्षेत्राला लागणारा कच्चा माल, यंत्रे, यंत्रांचे सुट्टे भाग, खनिज तेल, गॅस इत्यादी विदेशातून आयात करून त्याचा पुरवठा करण्याचे काम सरकारला करावे लागते. औद्योगिक क्षेत्राला स्वस्तात वीज पुरवठा करणे, कमी व्याज दरात कर्जपुरवठा करणे, कारखाना बांधण्यासाठी कमी दरात जमीन उपलब्ध करून देणे, आयात कर व निर्यात करात सवलत देणे, GST सारख्या करात व आयकरात सवलत देणे इत्यादी उपाय सरकारला योजावे लागतात. स्वातंत्र्योत्तरकाळात भारत सरकारने हे सर्व उपाय योजले असून आजही सरकारकडून औद्योगिक क्षेत्राला या सेवा पुरवल्या जात आहेत. त्याचा फायदा औद्योगिक क्षेत्राला होत आहे. निर्यातक्षम उद्योगांना सरकारकडून भरपूर सवलती दिल्या जातात. आयातीला पर्याय ठरणाऱ्या औद्योगिक वस्तू तयार करण्यास सरकारकडून प्रोत्साहन व मदत दिली जाते. त्यामुळे औद्योगिक वस्तूंची

आयात कमी होण्यास मदत होत आहे. १९४७ पासून आजपर्यंत ८० वर्षे भारत सरकारने कारखानदारी क्षेत्राला मोठी मदत केल्याने कारखानदारी वस्तूंच्या उत्पादनात, रोजगारात आणि निर्यातीत मोठी वाढ घडून आली असून ती दिवसेंदिवस वाढतच आहे. अशा प्रकारे वरील स्पष्टीकरणावरून देशाच्या औद्योगिक विकासात सरकारची भूमिका किती महत्त्वाची असते हे आपल्या लक्षात येते. सन १९४७ साली भारताचे औद्योगिक क्षेत्र खूपच मागासलेले होते. राष्ट्रीय उत्पन्नात औद्योगिक क्षेत्राचा वाटा खूपच कमी होता. आज हे चित्र खूपच बदलले असून औद्योगिक क्षेत्राची चांगली प्रगती झाली आहे. भारत सरकारने पुढाकार घेतल्यामुळेच हे शक्य झाले आहे हे वास्तव आहे.

**३) वाहतूक क्षेत्राचा विकास :**

देशातील वाहतूक क्षेत्राच्या विकासात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अप्रगत देशातील वाहतूक क्षेत्रही खूपच मागासलेले असते. रस्ते वाहतूक, जलवाहतूक, रेल्वे वाहतूक, विमान वाहतूक अशी सर्व प्रकारची वाहतूक व्यवस्था चांगली नसते. रस्त्यांची दुरावस्था झालेली असते. रस्ते आवश्यकतेपेक्षा खूपच कमी असतात. रस्ते चांगले, रुंद, मजबूत नसतात. दुर्गम, डोंगराळ भागात रस्ते नसतात. असले तरी त्यांची स्थिती चांगली नसते. तीच गत जमिनीवरील रेल्वे वाहतूकीची असते. आर्थिक विकासात मालमोटार वाहतूकीबरोबर रेल्वे वाहतूकीची भूमिकाही महत्त्वाची असते. परंतु देशात रेल्वेचे जाळे पसरलेले नसते. रेल्वेची आणि रेल्वेच्या डब्यांची संख्या खूपच कमी असते. मालवाहतूक करणाऱ्या रेल्वेंची खूपच कमतरता असते. जलवाहतूक आणि विमान वाहतूकीची स्थितीही चांगली नसते. केवळ कृषी क्षेत्राचा आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास होऊन चालत नाही. वाहतूक क्षेत्राचाही विकास व्हावा लागतो. कृषी व औद्योगिक क्षेत्रात तयार होणाऱ्या मालाची वाहतूक अत्यंत महत्त्वाची असते. वाहतूक व्यवस्था चांगली, मजबूत, कार्यक्षम, स्वस्त असेल तरच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी, ग्रामीण भागातून शहरात, एका राज्यातून दुसऱ्या राज्यात कृषी माल, औद्योगिक माल कमी वेळेत आणि सहज पोचवता येतो. अशा प्रकारे वाहतूक व्यवस्था पुरेशी व कार्यक्षम असेल तरच कृषी आणि औद्योगिक विकासाला चालना मिळते. खेड्यात सुद्धा रस्त्यांची आणि रेल्वेची सुविधा असेल तर शहरातील कारखान्यात तयार होणारी कृषी अवजारे, शेतीची लहान मोठी यंत्रे इत्यादी मालमोटारीतून, रेल्वेने खेड्यात पोहचवता येतात. तसेच विमान वाहतूक सुविधा पुरेशी व चांगली असेल तर नाशवंत कृषी माल कमी वेळेत परदेशी पाठवता येतो. जलवाहतूक चांगली व पुरेशी असेल तर परदेशातून शेतीसाठी आवश्यक असणारी खते, किटकनाशके, चांगली बियाणे आयात करता येतात. त्याचा फायदा शेतीला होतो. तसेच उद्योग क्षेत्रासाठी लागणारा कच्चा माल, खनिज तेल, गॅस, कच्चे लोखंड यांचीही आयात करता येते. अशा प्रकारे देशातील वाहतूक क्षेत्र (रस्ते, रेल्वे, जल आणि विमान वाहतूक) कार्यक्षम, मजबूत असेल तर कृषी आणि उद्योग क्षेत्राचाही फायदा होतो. परंतु अप्रगत देशात इतर क्षेत्राप्रमाणे वाहतूक क्षेत्रही खूपच मागासलेले असते. देशाच्या आर्थिक विकासासाठी वाहतूक क्षेत्राकडेही लक्ष द्यावे लागते. परंतु देशातील खाजगी क्षेत्र वाहतूक क्षेत्राच्या विकासासाठी पुरेसे योगदान देऊ शकत नाही. कारण वाहतूक क्षेत्राच्या प्रगतीसाठी प्रचंड प्रमाणावर भांडवल लागते. त्यामुळे अप्रगत देशांच्या सरकारांनांच यासाठी पुढाकार घ्यावा लागतो. सन १९४७ साली भारत स्वतंत्र

झाला तेव्हा देशात वाहतूक क्षेत्र खूपच मागासलेले होते. रस्त्यांचे प्रमाण खूपच कमी होते. रस्त्यांचा दर्जाही फारसा चांगला नव्हता. इंग्रजांनी रेल्वेचाही विकास केलेला नव्हता. भारतातून इंग्लंडला सर्व प्रकारचा माल विशेषत: जंगल उत्पादने नेता यावीत यासाठी त्यांनी रेल्वे आणि रस्त्याची थोडी सोय केली होती. भारताची लूट करण्यासाठी त्यांनी थोडे रस्ते बनवले होते आणि रेल्वेची सोय केली होती. आपल्या ताब्यात देश दिला तेव्हा कृषी, उद्योग क्षेत्राप्रमाणे वाहतूक क्षेत्रही खूपच मागासलेले होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने कृषी उद्योगाबरोबर वाहतूक क्षेत्राकडे लक्ष दिले. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या ८० वर्षात भारतातील वाहतूक क्षेत्राची चांगली प्रगती घडून आली. त्यामुळे कृषी, उद्योग या क्षेत्रांना फायदा होत आहे. बराचसा कृषी माल हा नाशवंत असतो. त्याची जलद वाहतूक करावी लागते. परंतु त्यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. सरकारशिवाय कोणालाही (खाजगी क्षेत्राला किंवा व्यक्तींना) हे धाडस करता येत नाही. कारण अप्रगत देशात लोक गरीब असतात. खाजगी क्षेत्राला प्रचंड गुंतवणूक करता येत नाही. सन १९४७ पासून भारत सरकार रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, जल वाहतूक, विमान वाहतूक या वाहतूक साधनांच्या विकासासाठी प्रचंड खर्च करत आहे. आता भारतात खाजगी कंपन्यामार्फत रस्ते निर्मिती केली जात आहे. देश अप्रगत असताना खाजगी कंपन्यामार्फत रस्ते निर्मिती केली जात आहे. देश अप्रगत असताना खाजगी कंपन्यामार्फत रस्ते विकास, जल वाहतूक विकास करता येत नाही. कारण देशातील लोकही गरीब असतात. म्हणून वाहतूक क्षेत्राच्या विकासासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागतो.

**४) दारिद्र्य आणि बेकारी निर्मूलन :**

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या म्हणजे देशात वर्षानुवर्षे, शतकानुशतके अस्तित्वात असलेली दारिद्र्याची आणि बेकारीची समस्या होय. दारिद्र्य आणि बेकारी आर्थिक विकासातील प्रमुख अडथळे आहेत. अप्रगत राष्ट्रात देशाच्या सर्व भागात दारिद्र्याची आणि बेरोजगारीची समस्या अस्तित्वात असते. अप्रगत आणि गरीब राष्ट्रात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ८० टक्क्यापर्यंत असते. तर विकसनशील राष्ट्रात हे प्रमाण २० ते ४० टक्क्यापर्यंत असते. दारिद्र्याचे मुख्य कारण बेरोजगारी हे असते. दारिद्र्य हे बेकारीचे कारण आणि परिणाम सुद्धा आहे. बेकारीमुळे दारिद्र्याची समस्या निर्माण होते आणि दारिद्र्यामुळे बेकारीची समस्या गंभीर बनते. कारण घरच्या दारिद्र्यामुळे व्यक्ती चांगले शिक्षण, प्रशिक्षण घेऊ शकत नाही. त्यामुळे दरिद्री कुटुंबातील लोकांवर बेकार राहण्याची पाळी येते. प्रा. रॅगनर नर्क्स यांच्या मते, ''अप्रगत राष्ट्रे दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेली असतात.'' नर्क्स यांनी गरीब राष्ट्रांच्या गरीबीचे कारण सांगितले आहे. ते म्हणतात, ''एखादे राष्ट्र गरीब असते कारण ते राष्ट्र गरीब असते.'' (A country is poor because it is poor) अशा प्रकारे अप्रगत राष्ट्रे दारिद्र्याच्या दुष्टचक्रात सापडली असल्याने त्यांची प्रगती होत नाही. एखाद्या अप्रगत राष्ट्राच्या मागासलेपणास जे काही प्रमुख घटक जबाबदार असतात त्यामध्ये 'दारिद्र्य' हा प्रमुख घटक आहे. सार्वत्रिक दारिद्र्यामुळे आणि सर्वदूर आढळणाऱ्या प्रचंड बेकारीमुळे देश गरीब किंवा मागासलेला राहतो. म्हणून देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी सरकारला दारिद्र्य आणि बेकारी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना कराव्या लागतात. देशातील बेकारी आणि दारिद्र्य हटवणे सरकारशिवाय कोणालाही शक्य नसते.

कारण दारिद्र्य व बेकारी निर्मूलनासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. लोकांना काम देण्यासाठी उत्पादक आणि अनुत्पादक अशा दोन्ही प्रकारचा खर्च करावा लागतो. दारिद्र्यरेषेखालील लोकांना घर बांधण्यासाठी जागा देणे, मोफत घरे बांधून देणे, त्यांच्या मुलाबाळांना मोफत शिक्षण देणे, रोजगार हमी योजनेसारख्या योजना सुरू करणे, बेकारांना बेकार भत्ता देणे, गरीबांना स्वस्त धान्य दुकानामार्फत अत्यंत अल्प दरात अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे या बाबींवर अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील सरकारांना खर्च करावा लागतो. त्याशिवाय दारिद्र्य आणि बेकारीची समस्या सोडवता येत नाही. भारताला सन १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशात दारिद्र्याची आणि बेकारीची समस्या गंभीर होती. सन १९४७ पासून भारत सरकार या समस्या सोडवण्यासाठी प्रचंड खर्च करत आहे. त्यामुळे १९४७ साली ८०% असलेले दारिद्र्याचे प्रमाण आज २० ते २२ टक्क्यावर आले असून रोजगारातही मोठी वाढ होत आहे. दारिद्र्य आणि बेकारी निर्मूलनासाठी भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीपासून प्रयत्न केले आहेत. त्यामुळे सन १९४७ साली भारतात दारिद्र्याची आणि बेकारीची समस्या जेवढी गंभीर होती तेवढी गंभीर आज राहिलेली नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने मोठ्या उद्योगाबरोबर लघुउद्योग, कुटिर उद्योग किंवा सूक्ष्म उपक्रमांच्या उभारणीला प्राधान्य दिले असून त्यासाठी सरकारने भरपूर मदत दिली आहे. आजही सरकारने हे धोरण पुढे चालू ठेवले आहे. त्यामुळे ग्रामीण, शहरी भागातील कुशल, अकुशल कामगारांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत असून बेकारी आणि दारिद्र्याचे प्रमाण घटत आहे. देशातील लोकांना काम मिळाले तर केवळ बेकारीची आणि दारिद्र्याची समस्या सुटत नाही तर लोकांना रोजगार मिळाल्याने त्यांची खरेदीशक्ती वाढते. त्यांची वस्तू व सेवा खरेदी करण्याची शक्ती वाढते. त्यामुळे प्रभावी मागणी वाढते. प्रभावी मागणी वाढल्यामुळे उत्पादनात वाढ होते. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पादनात (राष्ट्रीय उत्पन्नात) वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास दरात वाढ होणे होय. प्रभावी मागणीत वाढ झाल्यास देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळते. लोकांना जर रोजगार उपलब्ध करून दिला तर लोकांचे दारिद्र्य नष्ट होऊन त्यांची विविध वस्तू व सेवांना असणारी मागणी वाढून उत्पादन वाढीला चालना मिळते आणि आर्थिक विकास गतिमान होतो. म्हणून आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी देशातील दारिद्र्य आणि बेकारी या समस्यांचे निर्मूलन करावे लागते. ते काम सरकारलाच करावे लागते. कारण त्यासाठी अनेक वर्षे प्रचंड खर्च करावा लागतो. भारतासारख्या राष्ट्रांनी राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दारिद्र्य आणि बेकारी निर्मूलनाच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले. त्यामुळेच दारिद्र्य आणि बेकारी कमी होऊन देशाच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळू शकली. वरील स्पष्टीकरणावरून आपल्या लक्षात येते की, अप्रगत राष्ट्रात आर्थिक विकासाला सुरवात करण्यासाठी आणि आर्थिक विकासाला गती देण्यासाठी दारिद्र्य आणि बेकारीचे उच्चाटन करणे आवश्यक असते आणि हे महत्त्वपूर्ण आणि आव्हानात्मक काम सरकारलाच करावे लागते. भारतासारख्या अनेक राष्ट्रांनी हे शिवधनुष्य पेलून दाखवले असून आपल्या माथ्यावरील मागासलेपणाचा / गरीबीचा शिक्का पुसून टाकला आहे.

**५) विदेशातून कर्ज, तंत्रज्ञान इत्यादी मदत मिळवणे :**

आर्थिक विकासासाठी भांडवलाची गरज असते. परंतु अप्रगत किंवा कमी विकसित राष्ट्राजवळ पुरेसे

भांडवल नसते. अपुरे भांडवल हे मागास राष्ट्रांच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण आहे. अप्रगत राष्ट्राजवळ भांडवल कमी असल्याने अशा राष्ट्रांना परकीय मदतीची (परकीय भांडवलाची) गरज असते. विकसित देशांची सरकारे, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था, विकसित देशातील धनाढ्य व्यक्ती यांच्याकडून अप्रगत राष्ट्रांना कर्जाच्या स्वरूपात मदत मिळत असते. अप्रगत राष्ट्रातील उद्योजकांना अशी मदत मिळत नाही. सरकारने हमी दिली तरच अशी मदत मिळू शकते. त्यासाठी सुद्धा सरकारचे प्रयत्न महत्त्वाचे असतात. सरकारला विदेशातून जेवढी सहज मदत मिळते तेवढी सहज मदत खाजगी क्षेत्राला मिळत नाही. सरकारलाच यासाठी पुढाकार घ्यावा लागतो. अप्रगत राष्ट्रातील सरकार विकसित देशांच्या सरकारांकडून, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक इत्यादीकडून कर्ज घेऊन त्या पैशातून देशात रस्ते बांधणी, धरण बांधणी, मोठे व अवजड उद्योगांची उभारणी इत्यादी कामे करते. तसेच परकीय कर्जाच्या साहाय्याने परदेशातून सिमेंट, लोखंड, खनिज तेल, गॅस इत्यादींची आयात करून हे साहित्य देशातील खाजगी आणि सरकारी उद्योगांना उपलब्ध करून देते. अशा प्रकारे सरकार परदेशातून कर्ज घेऊन त्या पैशाची देशातील कृषी, उद्योग, पाणीपुरवठा, वीज निर्मिती, रस्तेबांधणी, जहाज बांधणी, रेल्वे बांधणी इत्यादी विविध क्षेत्रात गुंतवणूक करते. सरकार परदेशातून वस्तूंच्या स्वरूपात आणि रोख पैशात (विदेशी चलनात) कर्ज मिळवते आणि देशाच्या विकासासाठी त्याचा वापर करते. कर्जाऊ रकमेबरोबर सरकार विदेशातून उच्च दर्जाचे, अत्याधुनिक तंत्रज्ञान मिळवते. त्याचा कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्राला लाभ होतो. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारी परकीय मदत मिळवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सरकारलाच करावे लागते. देश मागासलेला असताना देशातील खाजगी क्षेत्राला किंवा खाजगी व्यक्तींना परदेशातून मदत मिळत नाही. सरकारलाच त्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो. भारत सरकारने सन १९४७ पासून म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीपासून विदेशातून मोठी मदत मिळवून तिची गुंतवणूक करून आर्थिक विकासाला चांगली चालना दिली आहे. परकीय कर्जाच्या गुंतवणूकीमुळे, परकीय तंत्रज्ञानाच्या आयातीमुळे भारतातील कृषी, उद्योग आणि पायाभूत क्षेत्राला चांगला लाभ झाला असून या क्षेत्रांचा मागासलेपणा कमी होण्यास मोठी मदत झाली आहे. परकीय मदतीशिवाय मागासलेल्या राष्ट्रांना किंवा युद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या राष्ट्रांना विकास प्रक्रियेला गती देता येत नाही. म्हणूनच जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक इत्यादी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांची स्थापना झाली आहे. या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांची आणि विकसित राष्ट्रांच्या सरकारांची मदत घेऊन अनेक अप्रगत राष्ट्रांनी देशाच्या आर्थिक विकासाला चालना दिली आहे. भारतही याला अपवाद नाही. भारताने गेल्या ८० वर्षात मोठ्या प्रमाणात परकीय मदत मिळवली असून तिचा विकासासाठी वापर केला आहे. आजही भारतासारखे अनेक विकसनशील देश आर्थिक विकासासाठी थोड्या प्रमाणात का होईना परकीय मदतीवर (कार्जावर, विदेशी तंत्रज्ञानावर) अवलंबून आहेत.

**६) नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर :**

जमीन, हवामान, पाणी, भूगर्भातील खनिज संपत्ती, जंगले इत्यादींना नैसर्गिक साधनसंपत्ती असे म्हणतात. देशाचा आर्थिक विकास ज्या अनेक घटकावर अवलंबून असतो त्यामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. देशात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य (पर्याप्त) वापर केला तर

देशाच्या आर्थिक विकासाला चांगली गती मिळते. उदाहरणार्थ, पाण्याची कृषी आणि उद्योग क्षेत्राला गरज असते. त्यासाठी धरणे बांधून, नद्या, कालवे यांची निर्मिती करून पावसाचे पाणी साठवून ठेवावे लागते. त्यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. त्यामुळे हे काम सरकारलाच करावे लागते. तसेच पडीक जमिनी लागवडीयोग्य बनवणे, वृक्षारोपण करून नवीन जंगलांची निर्मिती करणे, जंगलातील लाकडांचा विविध वस्तू बनविण्यासाठी वापर करणे, भूगर्भातील तेल, दगडी कोळसा, लोखंड, बॉक्साईट इत्यादींचा उपसा करून औद्योगिक क्षेत्राला त्याचा पुरवठा करणे ही कामे सरकारलाच करावी लागतात. यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. सरकारच हे करू शकते. खाजगी क्षेत्राला हे शक्य नसते. सरकार परदेशातून कर्जउभारणी करून नैसर्गिक साधनसंपत्ती देशातील जनतेला उपलब्ध करून देऊ शकते. नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेसा, चांगला व काळजीपूर्वक वापर केला तर अप्रगत राष्ट्रांच्या विकासाला चांगली चालना मिळते. अनेक अप्रगत राष्ट्रांत विविध प्रकारची नैसर्गिक साधनसंपत्ती विपूल प्रमाणात आहे. परंतु भांडवलाअभावी अप्रगत राष्ट्रे या साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करू शकत नाहीत. नैसर्गिक साधनांचा पर्याप्त / पुरेसा वापर केला जात नसल्यामुळे ही राष्ट्रे गरीब राहिली आहेत. सरकारने जर पुढाकार घेतला तर नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापरास सुरवात होऊन आर्थिक विकासाच्या प्रक्रियेस सुरवात होते हे भारतासारख्या अनेक देशांनी दाखवून दिले आहे. १९४७ साली अप्रगत किंवा मागासलेला आपला देश आज विकसनशील बनला आहे. त्यास जे विविध घटक जबाबदार आहेत त्यामध्ये भारत सरकारकडून नैसर्गिक साधनसंपत्तीचा होत असलेला पुरेपूर वापर हा घटक सुद्धा जबाबदार आहे. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासासाठी देशात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करावा लागतो. त्यामध्ये सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कारण त्यासाठी प्रचंड खर्च करावा लागत असतो. खाजगी क्षेत्राला हे शक्य नसते.

**७) नाणेबाजार आणि भांडवल बाजाराचा विकास :**

अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणाऱ्या सर्व प्रकारच्या बँकांचा आणि व्यक्तींचा समावेश नाणेबाजारात होतो आणि दीर्घमुदतीचा, मोठ्या रकमेचा कर्जपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थांचा समावेश भांडवल बाजारात होतो. शेअर बाजाराचा किंवा रोखे बाजाराचाही समावेश भांडवल बाजारात होतो. देशाच्या आर्थिक विकासात भांडवल बाजाराची आणि नाणेबाजाराची भूमिका खूप महत्त्वाची असते. नाणेबाजारातील बँकांकडून कृषी क्षेत्राला, उद्योगक्षेत्राला आणि व्यापार व सेवा क्षेत्राला वित्तपुरवठा होत असतो. तर भांडवल बाजारातील औद्योगिक वित्तपुरवठा संस्थांकडून औद्योगिक क्षेत्रातील लहान, मोठ्या कारखान्यांना कर्जपुरवठा होत असतो. औद्योगिक क्षेत्राच्या विकासात भांडवल बाजाराची भूमिका खूप महत्त्वाची असते. लहान, मोठ्या कारखान्यांचे बांधकाम करण्यासाठी, यंत्रसामग्री विकत घेण्यासाठी औद्योगक वित्तपुरवठा संस्था कर्जपुरवठा करत असतात. अशा प्रकारे नाणेबाजाराकडून आणि भांडवल बाजाराकडून अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, बांधकाम इत्यादी विविध क्षेत्रांना कर्जपुरवठा केला जात असतो. परंतु अप्रगत किंवा कमी विकसित देशात नाणेबाजार आणि भांडवल बाजाराचा फारसा विकास झालेला नसतो. त्यामुळे कृषी, उद्योग, व्यापार इत्यादी क्षेत्रांना पुरेसा कर्जपुरवठा होत नाही. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळत नाही.

म्हणून आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी अप्रगत राष्ट्रांच्या सरकारांनाच नाणेबाजाराच्या आणि भांडवल बाजाराच्या विकासासाठी पुढे जावे लागते. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी म्हणजे सन १९४७ साली भारत अप्रगत राष्ट्र होते. मागासलेल्या राष्ट्रात भारताची गणना होत होती. त्यास जी विविध कारणे जबाबदार होती त्यामध्ये अप्रगत नाणेबाजार आणि भांडवल बाजार हे प्रमुख कारण होते. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने नाणेबाजाराच्या आणि भांडवल बाजाराच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. सरकारने पुढाकार घेऊन काही बँकांची आणि वित्तीय संस्थांची स्थापना केली. खाजगी बँका कृषी क्षेत्राला आणि गरीब लोकांच्या व्यवसायांना कर्जपुरवठा करत नव्हत्या. म्हणून सरकारने सुमारे २० मोठ्या खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. देशाच्या कानाकोपऱ्यात बँकांच्या शाखा स्थापन होतील याची काळजी घेतली. जवळ जवळ सर्व राज्यात राज्य वित्तीय महामंडळांची (SFCs) आणि औद्योगिक विकास बँकांची स्थापना केली. तसेच सहकारी तत्त्वावर बँका स्थापन करण्यासाठी मदत केली. भारतात गावपातळीपासून राज्य पातळीपर्यंत सहकारी बँका स्थापन झाल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने शेअर बाजाराच्या विकासाकडेही विशेष लक्ष दिले. त्याचा फायदा उद्योग क्षेत्राला कर्जउभारणीसाठी होत आहे. अशा प्रकारे नाणेबाजाराच्या आणि भांडवल बाजाराच्या विकासात सरकारची भूमिका अत्यंत मोलाची असते. अप्रगत राष्ट्रातील नाणेबाजर आणि भांडवल बाजार अप्रगत असतात. सरकारने पुढाकार घेतल्याशिवाय नाणेबाजाराचा आणि भांडवल बाजाराचा विकास होत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून आज ८० वर्षे पूर्ण झाली आहेत. या ८० वर्षाच्या काळात सरकारच्या प्रयत्नामुळे नाणेबाजार आणि भांडवल बाजाराने चांगली प्रगती केली आहे. त्याचा फायदा कृषी, उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्राला होत असून त्यामुळे विकासाचा वेग वाढत आहे. देशाचा आर्थिक विकास नाणेबाजार आणि भांडवल बाजारावर अवलंबून असतो. अप्रगत देशात सरकारच्या पुढाकाराशिवाय नाणेबाजाराचा आणि भांडवल बाजाराचा विकास घडून येऊ शकत नाही. म्हणून नाणेबाजाराच्या आणि भांडवल बाजाराच्या विकासात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

**८) लोकसंख्या नियंत्रण** (Population Control) **:**

बहुसंख्य अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना भेडसावणारी प्रमुख समस्या म्हणजे वाढत्या लोकसंख्येची (प्रचंड आकाराच्या लोकसंख्येची / अतिरिक्त लोकसंख्येची) समस्या होय. ही समस्या या राष्ट्रांना अनेक वर्षापासून भेडसावत आहे. वाढती लोकसंख्या हा अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांच्या विकासातील प्रमुख अडथळा आहे. भारताचा विचार केला तर स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात जन्मदर आणि मृत्यूदर सारखा होता. त्यामुळे लोकसंख्या वाढीची समस्या फारशी गंभीर नव्हती. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर म्हणजे १९४७ नंतर वाढत्या लोकसंख्येच्या समस्येने भारताला हैराण केले. सन १९४७ पासून आजतागायत ही समस्या भारताला भेडसावत आहे. भविष्यातही अनेक वर्षे ही समस्या भारताला भेडसावत राहणार आहे. वाढते उत्पादन वाढती लोकसंख्या फस्त करते. त्यामुळे विकास फारसा दिसत नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. अतिरिक्त लोकसंख्या देशाच्या आर्थिक विकासात मोठा अडथळा निर्माण करते. म्हणून लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य अप्रगत आणि विकसनशील

राष्ट्रांच्या सरकारांना करावे लागते. वेळोवेळी लोकसंख्याविषयक धोरणे आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम सरकारला करावे लागते. कुटुंब नियोजन (Family Planning), आणि कुटुंब कल्याण (Family Welfare) कार्यक्रम राबवावे लागतात. स्वातंत्र्योत्तरकाळात भारत सरकारने आपल्या पंचवार्षिक योजनामध्ये कृषी, उद्योग, व्यापार, सेवा यांच्या विकासाबरोबर लोकसंख्या नियंत्रणाच्या कार्यक्रमावरही विशेष भर दिला. आजही लोकसंख्या वाढ आटोक्यात आणण्यासाठी भारतात कुटुंब कल्याण कार्यक्रम राबवला जात आहे. त्यामुळे भारतातील लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर (Population Growth Rate) खूपच कमी झाला आहे. भारताच्या लोकसंख्या वृद्धीचा दर सतत घटत असून त्याचा लाभ अर्थव्यवस्थेला होत आहे. तरीही आज सुद्धा भारताची लोकसंख्या प्रचंड असून ती सुमारे १४० कोटी इतकी आहे. भारताच्या लोकसंख्येचा आकार प्रचंड असल्याने लोकसंख्या वाढीचा दर कमी होऊनही लोकसंख्या वाढीची समस्या कायमच राहते. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण करणाऱ्या लोकसंख्येच्या समस्येचे निराकरण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अप्रगत व विकसनशील राष्ट्रांच्या सरकारांना करावे लागते. त्याशिवाय देशाच्या आर्थिक विकासाचा दर वाढत नाही.

**९) चलनविषयक धोरणाची आणि राजकोषीय धोरणाची अंमलबजावणी :**

देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी चलनविषयक आणि राजकोषीय धोरण अत्यंत आवश्यक असते. चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी सरकारच्या वतीने देशाची मध्यवर्ती बँक करत असते. मध्यवर्ती बँक ही सरकारच्या मालकीची असते. चलननिर्मिती करण्याचा कायदेशीर अधिकार देशाच्या मध्यवर्ती बँकेचा असतो. मध्यवर्ती बँकेबरोबर देशातील व्यापारी बँका पतपैशाची निर्मिती करत असतात. अशा प्रकारे अर्थव्यवस्थेत सरकारने (मध्यवर्ती बँकेने) निर्माण केलेला पैसा आणि व्यापारी बँकांनी कर्जव्यवहारातून निर्माण केलेला पैसा (पतपैसा) येत असतो. त्याला एकूण पैसा किंवा पैशाचा एकूण पुरवठा असे म्हणतात. हा एकूण पैसा आर्थिक विकासासाठी (कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण इत्यादी क्षेत्रासाठी) अत्यंत आवश्यक असतो. पैशाचा पुरवठा फार कमी झाला तर आर्थिक विकासाच्या दरावर प्रतिकूल परिणाम होतो. तसेच पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा जास्त झाला तरी आर्थिक विकासात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम देशाच्या मध्यवर्ती बँकेला करावे लागते. पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक जे उपाय योजते त्यास चलनविषयक उपाय किंवा चलनविषयक धोरण असे म्हणतात. मध्यवर्ती बँक संख्यात्मक आणि गुणात्मक साधनांचा वापर करून अर्थव्यवस्थेतील पैशाच्या पुरवठ्यावर विशेषत: व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवते. अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांना पैशाचा पुरेसा पुरवठा होईल याची काळजी मध्यवर्ती बँक घेते. त्यामुळे कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण, बांधकाम इत्यादी विविध क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळून आर्थिक विकासाला चांगली गती मिळते. देशाच्या आर्थिक विकासासाठी चलनविषयक धोरणाबरोबर राजकोषीय धोरणही अत्यंत महत्त्वाचे असते. राजकोषीय धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी केंद्र सरकारकडून केली जाते. कर, कर्ज, खर्च आणि अंदाजपत्रक ही राजकोषीय धोरणाची प्रमुख साधने आहेत. सरकारच्या करविषयक, कर्जविषयक, खर्चविषयक आणि अंदाजपत्रकीय

धोरणास राजकोषीय धोरण असे म्हणतात. सरकारचे राजकोषीय धोरण प्रभावी असेल तर आर्थिक विकासाला चांगली चालना मिळते. सरकारचे करविषयक धोरण कृषी, उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्राला उपयुक्त असले पाहिजे. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील सरकारे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांना चालना देण्यासाठी करांचे दर कमीत कमी ठेवते. जुने, जाचक कर रद्द करते. कर भरण्याची पद्धत सुलभ राहील याची काळजी घेते. त्यामुळे अधिक गुंतवणूक करण्यास उत्पादकांना प्रेरणा मिळते. त्यामुळे उत्पादनात, रोजागारात वाढ होण्यास मदत होते. करविषयक धोरणाप्रमाणे सरकारचे खर्चविषयक धोरणही अत्यंत प्रभावी असावे लागते. आर्थिक व सामाजिक विकासासाठी सरकार जो खर्च करते त्यास खर्चविषयक धोरण असे म्हणतात. सरकारने शेतीच्या विकासासाठी, कारखानदारी क्षेत्राच्या विकासासाठी, वाहतूक आणि दळणवळणाच्या सुविधेसाठी, रोजगार वृद्धीसाठी पुरेसा खर्च करण्याचे धोरण सतत राबवले तर या क्षेत्रांचा विकास होऊन राष्ट्रीय उत्पादनात आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. खर्चविषयक धोरणाप्रमाणे अप्रगत राष्ट्रांनी कर्जविषयक धोरणही प्रभावीपणे राबवावे लागते. सरकार देशातून आणि विदेशातून जी कर्जउभारणी करते त्यास सार्वजनिक कर्ज असे म्हणतात. अप्रगत राष्ट्रांनी विदेशातून मोठ्या प्रमाणात कर्जउभारणी करून वीज निर्मिती, धरणबांधणी, रेल्वे बांधणी, जहाज बांधणी इत्यादी उद्योगात कर्जाची रक्कम गुंतवली तर देशाच्या विकासाला चांगली चालना मिळते. अशा प्रकारे राजकोषीय धोरणाच्या साहाय्याने अप्रगत राष्ट्रे देशाच्या आर्थिक विकासाला चांगली गती देऊ शकतात. सरकारने चलनविषयक धोरणाची (Monetary Policy) आणि राजकोषीय धोरणाची (Fiscal Policy) आखणी व अंमलबजावणी प्रभावीपणे, कार्यक्षमपणे केली तर अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांची प्रगती होऊन देशाच्या आर्थिक प्रगतीच्या दरातही चांगली वाढ होते. भारतासारखे देश की जे एकेकाळी (स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी) अप्रगत, मागासलेले होते त्यांनी चलनविषयक आणि राजकोषीय धोरणाची अंमलबजावणी चांगली केल्यामुळे आज ते मागासलेपणातून बाहेर पडले आहेत. अशा प्रकारे अप्रगत राष्ट्रांच्या आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासात सरकारची म्हणजेच सरकारच्या चलनविषयक आणि राजकोषीय धोरणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

**१०) देशांतर्गत शांतता, कायदा व सुव्यवस्था निर्माण करणे :**

देशात कायदा, शांतता आणि सुव्यवस्था असेल तर आर्थिक विकासाच्या प्रगतीत अडथळे येत नाहीत. म्हणून सरकारला देशात कायद्याचे राज्य, सुव्यवस्था निर्माण करावी लागते. जगातील अनेक कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांत आजही अतिरेकी किंवा हिंसक कारवाया चाललेल्या दिसतात. देशापासून फुटून निघून स्वतंत्र देशाची मागणी करणाऱ्या फुटीरवादी संघटना हिंसक कारवाया करत असतात. भारतात पंजाबमधील खलिस्तान चळवळ ही अशाच प्रकारची एक हिंसक, देशविरोधी चळवळ अनेक वर्षे कार्यरत होती. भारत सरकारने या फुटिरवाद्यांचा बंदोबस्त करून शांतता प्रस्थापित करण्यात यश मिळवले आहे. गेली ८० वर्षे भारताच्या काही राज्यात नक्षलवादी चळवळ अस्तित्वात होती. सरकारने कडक कारवाई केल्याने या चळवळीचा जोर खूपच ओसरला असून लवकरच ही हिंसक चळवळ संपुष्टात येईल. भारतातील काश्मीर राज्यात अनेक वर्षे अतिरेकी कारवाया सुरू होत्या. त्या अतिरेक्यांचाही सरकारने चांगला बंदोबस्त केला आहे. भारतात शहरी

नक्षलवादही आढळून येतो. त्याचाही बंदोबस्त सरकार करत आहे. फुटीरवादी चळवळी आणि नक्षलवादी चळवळी हिंसक कारवाया करत असतात. ज्या भागात अशा चळवळी सक्रिय असतात तेथे कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण इत्यादी क्षेत्रांचा विकास होत नाही. कारण अतिरेकी, नक्षलवादी, फुटिरवादी लोक शेतकऱ्यांना शेती करू देत नाहीत. कारखाने, दुकाने, हॉटेल्स जाळपोळ करून नष्ट करतात. बॉम्बस्फोट करून पर्यटकांना भीती घालतात. त्यामुळे तेथील पर्यटन व्यवसायही मोडकळीस येतो. अतिरेकी, फुटिरवादी आणि नक्षलवादी यांच्या भीतीने कारखानदार, इतर व्यावसायिक गुंतवणूक करत नाहीत. त्यामुळे तेथील प्रदेश मागासलेले राहतात. राष्ट्राच्या आर्थिक विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. म्हणून सरकारला देशाच्या सर्व भागात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे कार्य करावे लागते. जनजागरण, प्रबोधन, पोलीस आणि लष्करी बळाचा वापर करून सरकारला देशविघातक कारवाया करणाऱ्यांचा बंदोबस्त करावा लागतो. भारत सन १९४७ साली स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुमारे ५० ते ६० वर्षे भारताला अतिरेकी आणि नक्षलवादी कारवायांचा त्रास सहन करावा लागला. आता सरकारने देशाच्या विविध भागातील हिंसक चळवळींचा चांगलाच बंदोबस्त केला असून तेथील समाज भयमुक्त केला आहे. त्याचा विकासाला चांगला लाभ होत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने पोलीस, न्यायालय यांच्या उभारणीवर चांगला भर दिल्यामुळे गुन्हेगारांचा बंदोबस्त होत आहे. चोर, दरोडेखोर यांच्यामुळेही लोक गुंतवणूक करण्याचे धाडस करत नाहीत. थोडक्यात देशात अंतर्गत शांतता व सुव्यवस्था असेल, देशात कायद्याचे राज्य स्थापन झालेले असेल तर गुंतवणूक वाढून राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याच्या बाबतीत सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

**सारांश :** वरील स्पष्टीकरणावरून आपल्या लक्षात येते की, राष्ट्राच्या आर्थिक विकासात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अप्रगत किंवा कमी विकसित राष्ट्रात विकासाची प्रक्रिया गतीने सुरू करण्यासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागतो. रस्ते बांधणी, रेल्वे बांधणी, वीज निर्मिती, लोखंड आणि पोलाद उद्योग, पाणीपुरवठा प्रकल्पांची उभारणी इत्यादीसाठी प्रचंड पैसा लागतो. तेवढा पैसा आणि धाडस खाजगी क्षेत्राजवळ नसते. म्हणून अप्रगत राष्ट्रांच्या सरकारांनाच पुढे येऊन या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात. भारतासारखे अनेक देश सुरवातीच्या काळात अप्रगत किंवा मागासलेले होते. त्या देशांच्या सरकारांनी पुढे येऊन अनेक विकास कामे सुरू केली. त्यामुळे त्या देशांच्या कपाळावरचा मागासलेपणाचा शिक्का पुसला गेला हे वास्तव आहे. आज भारतासारखी एकेकाळी मागासलेली असणारी राष्ट्रे विकासाच्या दिशेने झेपावत आहेत. यावरून अप्रगत राष्ट्रांच्या आर्थिक विकासात सरकारची भूमिका किती महत्त्वाची असते ते आपल्या लक्षात येते.

### २.२.३ आर्थिक विकासात चलनविषयक आणि राजकोषीय धोरणाची भूमिका :

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासात चलनविषयक आणि राजकोषीय धोरणाची भूमिका खूप महत्त्वाची असते. सरकारची मालकी असलेली मध्यवर्ती बँक चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करते. तर केंद्र सरकारकडून राजकोषीय धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी केली

जाते. चलनविषयक आणि राजकोषीय धोरण ही दोन धोरणे राष्ट्राच्या आर्थिक विकासाला कशी सहाय्यभूत ठरतात ते खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

**चलनविषयक धोरण (Monetary Policy) :**

**प्रास्ताविक :**

देशाच्या आर्थिक विकासात चलनविषयक धोरणाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी देशाची मध्यवर्ती बँक करत असते. मध्यवर्ती बँक ही सरकारी मालकीची असते. मध्यवर्ती बँकेला चलन निर्माण करण्याचा कायदेशीर अधिकार असतो. अर्थव्यवस्थेची गरज लक्षात घेऊन मध्यवर्ती बँक चलनाची (नोटा व नाणी यांची) निर्मिती करत असते. मध्यवर्ती बँकेने तयार केलेल्या पैशाला 'पैसा' (Money) किंवा 'विधिग्राह्य पैसा' / कायदेशीर पैसा (Legal Tender Money) असे म्हणतात. मध्यवर्ती बँकेप्रमाणे व्यापारी बँकासुद्धा पैसा निर्माण करत असतात. त्यांनी निर्माण केलेल्या पैशाला 'पतपैसा' (Credit Money) किंवा 'बँक पैसा' (Bank Money) असे म्हणतात. व्यापारी बँकांच्या कर्जव्यवहारातून जो पैसा निर्माण होतो त्या पैशास पतपैसा किंवा पतचलन असे म्हणतात. व्यापारी बँका त्यांच्याजवळ जमा झालेल्या एकूण ठेवीमधून किंवा रोख निधीमधून जेवढा पैसा कर्जाऊ देतात, त्या पैशाला (रकमेला) पतपैसा / पतचलन असे म्हणतात. अशा प्रकारे व्यापारी बँका चलन छपाई न करता कर्जाचे व्यवहार करून पैशाची निर्मिती करत असतात. अशा प्रकारे अर्थव्यवस्थेत दोन प्रकारचा पैसा चलनात असतो. (१) मध्यवर्ती बँकेने निर्माण केलेले चलन (M) आणि (२) व्यापारी बँकांनी निर्माण केलेले पतचलन (M'). पैसा (M) आणि पतपैसा (M') यांना मिळून पैशाचा एकूण पुरवठा असे म्हणतात. (Total Supply of Money in the country) अर्थव्यवस्थेत चलनात जो एकूण पैसा असतो तो अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक असतो. पैसा आणि पतपैसा म्हणजेच एकूण पैसा कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण, बांधकाम, वीज निर्मिती, शिक्षण, आरोग्य, पर्यटन इत्यादी विविध क्षेत्रांच्या विकासासाठी आवश्यक असतो. पैशाचे आणि पतपैशाचे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर परिणाम होत असतात. अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा खूप जास्त झाला किंवा खूप कमी झाला तर त्याचे विविध क्षेत्रावर अनिष्ट किंवा प्रतिकूल परिणाम होतात. चलनात (अर्थव्यवस्थेत) पैशाचा पुरवठा योग्य प्रमाणात असेल तर कृषी, उद्योग, व्यापार इत्यादी विविध क्षेत्रांना पुरेशा प्रमाणात पैसा उपलब्ध होऊन त्या क्षेत्रांची प्रगती होते आणि देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळते. चलन निर्माण करण्याचा कायदेशीर अधिकार ज्या मध्यवर्ती बँकेला असतो तीच बँक चलन पुरवठ्याचे व्यवस्थापन करण्याचे कार्य करते. त्यासाठी विविध उपाय योजते. त्यालाच मध्यवर्ती बँकेचे चलनविषयक धोरण असे म्हणतात. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांना पुरेशा प्रमाणात पैसा उपलब्ध व्हावा यासाठी मध्यवर्ती बँकेने आखलेले धोरण किंवा योजलेले उपाय म्हणजेच चलनविषयक धोरण किंवा मौद्रिक धोरण होय. मध्यवर्ती बँकेचे चलनविषयक धोरण सुयोग्य असेल तर राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना मिळते. अप्रगत किंवा कमी विकसित राष्ट्रातील कृषी, उद्योग, व्यापार ही सर्व क्षेत्रे खूपच मागासलेली असतात. देशात दारिद्र्याचे आणि बेकारीचे प्रमाण मोठे असते. म्हणून अप्रगत राष्ट्रांना सुयोग्य चलनविषयक धोरण तयार करून त्याची

प्रभावीपणे अंमलबजावणी करावी लागते. वर स्पष्ट केल्याप्रमाणे सरकारची मध्यवर्ती बँक चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करण्याचे काम करत असते.

**चलनविषयक धोरण म्हणजे काय?**

चलनविषयक धोरणाची एक साधी, सोपी आणि सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''पूर्ण रोजगार, किंमत स्थैर्य, आर्थिक स्थैर्य आणि आर्थिक विकास इत्यादी विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेने पैशाच्या पुरवठ्यात आणि व्याज दरात जाणीवपूर्वक केलेले बदल म्हणजे चलनविषयक धोरण होय.''**

**प्रा. हॅरी जॉन्सन :**

प्रा. हॅरी जॉन्सन यांनी चलनविषयक धोरणाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''सर्वसाधारण आर्थिक उद्दिष्टे साकार करण्यासाठी पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचे मध्यवर्ती बँकेचे धोरण म्हणजे चलनविषयक धोरण होय.''** (Monetary policy refers to a regulatory policy whereby the central bank maintains its control over the supply of money for the realisation of general economic goals.)

**प्रा. विरिग्समन (Prof Wrightsman) :**

प्रा. विरिग्समन यांनी चलनविषयक धोरणाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''विविध आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मध्यवर्ती बँकेने पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न म्हणजे चलनविषयक धोरण होय.''** (The deliberate effort by the central bank to control the money supply and credit condition for the purpose of achieving certain broad economic objectives.)

**जी. के. शॉ (G. K. Show) :**

जी. के शॉ यांची चलनविषयक धोरणाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''चलनविषयक निर्मिती करणाऱ्या संस्थेने पैशाच्या पुरवठ्यात, पैशाच्या उपलब्धतेत आणि व्याजदरात बदल घडवून आणण्यासाठी हेतूत: घेतलेले निर्णय म्हणजे चलनविषयक धोरण होय.''** (Monetary Policy refers to any deliberate and consicious action undertaken by the central monetary authority to change the quantity, availability or cost (interest rate) of money.

**पॉल एनझिन (Paul Enzig) :**

**''चलनविषयक धोरणामध्ये चलनविषयक निर्णयांचा आणि उपाययोजनांचा समावेश होतो ज्यांच्या सहाय्याने चलनविषयक आणि बिगर चलनविषयक उद्दिष्टे पूर्ण केली जातात.''** (Monetary Policy in-

cludes all monetary decisions and measures irrespective of whether their aims are monetary or nonmonetary and all non monetary decisions and measures that aim at affecting the monetary system.)

**आर. पी. केंट (R. P. Kent) :**

प्रा. आर. पी. केंट यांची चलनविषयक धोरणाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''पूर्ण रोजगारासारखे विशेष महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी चलनातील पैशाचा पुरवठ्यात विस्तार करण्याचे किंवा पैशाचा पुरवठा संकोच करण्याचे (कमी करण्याचे) व्यवस्थापन म्हणजे चलनविषयक धोरण होय.''** (Monetary Policy is the management of the expansion and contraction of the volume of money in circulation for the explicit purpose of attaining a specific objective, such as full employment.)

**सर्वसाधारण व्याख्या :**

चलनविषयक धोरणाची सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''अर्थव्यवस्थेतील विविध घटकांना त्यांच्या मागणीप्रमाणे पैशाचा पुरवठा करण्यासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेने योजलेले मौद्रिक आणि अमौद्रिक उपाय यांचा समावेश चलनविषयक धोरणात होतो.''**

**सर्वसाधारण व्याख्या :**

**''पैसा आणि पतपैसा म्हणजेच पैशाच्या एकूण पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचे मध्यवर्ती बँकेचे धोरण म्हणजे चलनविषयक धोरण होय.''**

**सर्वसाधारण व्याख्या :**

**''समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साकार करण्यासाठी मध्यवर्ती बँकेकडून आखलेले आणि राबवले जाणारे धोरण म्हणजे चलनविषयक धोरण किंवा द्रव्यविषयक धोरण होय.''**

आर्थिक स्थैर्य, पूर्ण रोजगार, किंमत स्थैर्य, बाह्य समतोल आणि आर्थिक विकास या उद्दिष्टांना समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे असे म्हणतात. प्रत्येक देशाच्या समग्रलक्षी आर्थिक धोरणाची ही प्रमुख उद्दिष्टे असतात. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चलनविषयक धोरण मध्यवर्ती तयार करते. म्हणून चलनविषयक धोरणाला (द्रव्यविषयक नीतीला) समग्रलक्षी आर्थिक धोरण (Macro Economic Policy) असे म्हणतात.

**सर्वसाधारण व्याख्या :**

''व्याज दरात (बँकरेटमध्ये) बदल करून (व्याज दरात वाढ किंवा घटक करून) मध्यवर्ती बँक पैशाच्या पुरवठ्यावर जे नियंत्रण ठेवते, त्यास मौद्रिक धोरण (चलनविषयक धोरण) असे म्हणतात.

विविध कारणामुळे अर्थव्यवस्थेतील (देशातील) चलनात असलेल्या पैशाच्या पुरवठ्यात बदल होत

असतात. पैशाच्या पुरवठ्यात वाढ होत असते किंवा पैशाच्या पुरवठ्यात घट होत असते. त्यामुळे चलन निर्माण करणाऱ्या मध्यवर्ती बँकेला पैशाच्या एकूण पुरवठ्यावर (पैशावर आणि पतपैशावर) नियंत्रण ठेवावे लागते.

**सारांश :** चलनविषयक धोरणाच्या वरील विविध व्याख्यावरून आपल्या लक्षात येते की, सरकारची मालकी असलेल्या मध्यवर्ती बँकेकडून सरकारच्या वतीने देशाच्या आर्थिक विकासासाठी चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी केली जाते. अर्थव्यवस्थेतील पैशाच्या एकूण पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी चलनविषयक धोरण तयार केले जाते. पैसा स्वत: पैशाचे व्यवस्थापन करू शकत नाही. म्हणून पैशाचे व्यवस्थापन करण्याचे काम पैसा निर्माण करणाऱ्या मध्यवर्ती बँकेला करावे लागते. पैशाच्या पुरवठ्यात गरजेपेक्षा (मागणीपेक्षा) जास्त वाढ होणार नाही आणि मागणीपेक्षा (गरजेपेक्षा) पैशाचा पुरवठा कमी पडणार नाही याची काळजी मध्यवर्ती बँकेला घ्यावी लागते. म्हणून चलनविषयक धोरणात पैशाच्या व्यवस्थापनाला महत्त्व असते. विविध उपाय योजून मध्यवर्ती बँक पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवत असते. म्हणजेच पैशाचे व्यवस्थापन करत असते. वरील व्याख्यापैकी काही व्याख्या या संकुचित स्वरूपाच्या आहेत तर काही व्याख्या या व्यापक स्वरूपाच्या आहेत. म्हणून चलनविषयक धोरण समजून घेण्यासाठी चलनविषयक धोरणाची एकच व्याख्या अभ्यासून चालत नाही तर चलनविषयक धोरणाच्या विविध व्याख्यांचा अभ्यास करावा लागतो.

**चलनविषयक धोरणाची उद्दिष्टे (Objectives of Monetary Policy) :**

विकसित देश (Developed Country), अविकसित देश (Undeveloped Country) आणि विकसनशील देश (Developing Country) असे तीन प्रकारचे देश जगात आढळून येतात. काही देशांना कमी विकसित देश (Less Developed Country) किंवा अर्धविकसित देश (Underdeveloped Country) असेही म्हणतात. काही देशांना गरीब देश (Poor Country) तर काही देशांना श्रीमंत देश (Rich Country) असेही म्हणतात. या सर्व प्रकारच्या देशांना पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करावी लागते. या सर्व प्रकारच्या देशांच्या चलनविषयक धोरणाची काही उद्दिष्टे सारखी असतात तर काही उद्दिष्टे वेगळी असतात. चलनविषयक धोरणाची काही ठळक उद्दिष्टे थोडक्यात खालील स्पष्ट केली आहेत.

(१) पैसा तटस्थ ठेवणे (Neutrality of Money)

(२) आर्थिक विकास (Economic Development)

(३) आर्थिक वृद्धी (Economic Growth)

(४) पूर्ण रोजगार (Full Employment)

(५) व्यापारचक्रांचे नियंत्रण (Control of Trade Cycle)

(६) सर्वसाधारण किंमत पातळीत स्थैर्य प्रस्थापित करणे (Price Stability)

(७) विनिमय दरात स्थैर्य प्रस्थापित करणे (Exchange Stability)

(८) पतपैशाचे नियंत्रण (Credit Control)

चलनविषयक धोरणाच्या वरील उद्दिष्टांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**(१) पैसा तटस्थ ठेवणे** (Neutrality of Money) **:**

प्रा. विकस्टिड (Wicksteed), प्रा. हायेक (Hayek) आणि प्रा. रॉबर्टसन (Robertson) यांनी तटस्थ पैशाच्या धोरणाचे समर्थन केले आहे. त्यांच्या मते, जेथे पैसा तटस्थ असतो ती चलनविषयक व्यवस्था आदर्श किंवा चांगली असते. तटस्थ पैसा धोरणामुळे (The policy of nautral money) पैशाच्या पुरवठ्यावर विपरित परिणाम होत नाहीत. म्हणजे तटस्थ पैसा धोरणामुळे किंमती, उत्पादन, रोजगार, उत्पन्न या घटकावर प्रतिकूल परिणाम होत नाही. पैसा तटस्थ ठेवल्याने तेजी-मंदी देशात निर्माण होत नाही. परंतु या धोरणावर अनेकांनी टीका केली आहे. त्यांच्या मते, पैसा तटस्थ ठेवला तर मंदीला तोंड देता येत नाही. कारण मंदी नाहीशी करण्यासाठी प्रचंड पैसा खर्च करावा लागतो. आजच्या आधनिक आणि गतिमान जगात पैसा तटस्ट ठेवणे योग्य किंवा समर्थनीय आणि व्यवहार्य नाही.

**(२) आर्थिक विकास** (Economic Development) **:**

देशाचा जलद आणि सर्वांगीण (सर्व क्षेत्रांचा) आर्थिक विकास घडवून आणणे हे चलनविषयक धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. अविकसित आणि विकसनशील देशांच्या चलनविषयक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आर्थिक विकासाचा वेग वाढवणे हेच असते. कारण या देशांचा आर्थिक विकास झालेला नसतो. अविकसित देशात विकासाला बऱ्यापैकी सुरुवात झालेली असते. परंतु विकासाला चालना देणे अत्यंत आवश्यक असते. चलनविषयक धोरणाची योग्यप्रकारे अंमलबजावणी केल्यास या दोन्ही प्रकारच्या देशांच्या विकासाला चांगली गती मिळू शकते. अविकसित आणि विकसनशील देशांना विकासासाठी पैशाची प्रचंड गरज असते. अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा गरजेइतका झाला तर कृषी, उद्योग, व्यापार इत्यादी विविध क्षेत्रांचा पैसा उपलब्ध होऊन त्यांच्या विकासाला गती मिळते. म्हणून अर्थव्यवस्थेत पुरेसा पैसा उपलब्ध होईल असे चलनविषयक धोरण मध्यवर्ती बँक तयार करते व त्यांची अंमलबजावणी करते. त्यामुळे गरीब आणि विकसनशील देशांच्या विकासाला गती मिळण्यास मदत होते.

**(३) आर्थिक वृद्धी** (Economic Growth) **:**

आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी यामध्ये फरक आहे. आर्थिक विकास ही संकल्पना अप्रगत आणि विकसनशील देशांच्या संदर्भात वापरली जाते. तर आर्थिक वृद्धी ही संकल्पना विकसित देशांच्या संदर्भात वापरली जाते. विकसित राष्ट्रातील मध्यवर्ती बँकांच्या चलनविषयक धोरणाचे उद्दिष्ट देशाचा झालेला विकास टिकवून ठेवणे आणि आर्थिक वृद्धी दरात वाढ घडवून आणणे हे असते. विकसित राष्ट्रांचा आर्थिक विकास पूर्ण झालेला असतो. अर्थव्यवस्थेची सर्व क्षेत्रे विकसित असतात. परंतु झालेला विकास टिकवून ठेवणे ही सुद्धा

सोपी बाब नसते. म्हणून विकसित देशातील चलनविषयक धोरणाला सुद्धा महत्त्व असते. झालेला विकास टिकवून ठेवून आर्थिक वृद्धी दरात वाढ होईल, असे चलनविषयक धोरण विकसित देशातील मध्यवर्ती बँका तयार करत असतात.

**(४) पूर्ण रोजगार** (Full Employment) **:**

देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे हे जगातील सर्व देशांच्या सरकारांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे याचा अर्थ भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन या सर्व उत्पादन घटकांना आणि उत्पादनाच्या इतर साधनांना काम मिळालेले असणे होय. पूर्ण रोजगाराच्या संकल्पनेत केवळ मनुष्याचा रोजगार विचारात घेतला जात नाही. उत्पादनाचे सर्व घटक आणि उत्पादनाची सर्व साधने उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी असतात तेव्हा देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित झाला असे म्हटले जाते. पूर्ण रोजगाराची संकल्पना खूप व्यापक आहे. पूर्ण रोजगाराच्या या व्याख्येनुसार जगातील कोणत्याही देशात अद्याप पूर्ण रोजगार आढळत नाही. तरीही पूर्ण रोजगाराच्या दिशेने वाटचाल करणे हे महत्त्वाचे मानले जाते. विकसित देशापेक्षा अविकसित आणि विकसनशील देशात बेकारी मोठ्या प्रमाणात आढळते. विकसित देशात बेकारीची समस्या फारशी गंभीर नसते. परंतु विकसनशील, अप्रगत देशात मात्र बेकारीची समस्या उग्र स्वरूपाची असते. सर्व प्रकारची बेकारी या देशात आढळते. म्हणून बेकारी नष्ट करण्यासाठी या देशातील मध्यवर्ती बँकांना सुयोग्य असे चलनविषयक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करावी लागते. पैशाच्या पुरवठ्यात योग्य प्रमाणात वाढ केली असता गुंतवणूक वाढून रोजगार वाढ घडून येते. त्यासाठी मध्यवर्ती बँका योग्य ते उपाय योजतात.

**(५) व्यापारचक्रांचे नियंत्रण** (Control of Business Cycle) **:**

तेजी आणि मतंदी या व्यापारचक्राच्या प्रमुख दोन अवस्था आहेत. अर्थव्यवस्थेत तेजी किंवा मंदी निर्माण झाली तर आर्थिक स्थैर्य नष्ट होते. आर्थिक विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. तेजीचे काही फायदे मिळत असले तरी मंदीचा जन्म तेजीतच होत असल्याने तेजी सुद्धा वाईटच मानले जाते. देशात आर्थिक स्थैर्य असेल तर आर्थिक विकास दरात सातत्य राहते. आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी तेजी किंवा मंदी निर्माण होणार नाही याची काळजी सरकारला घ्यावी लागते. मध्यवर्ती बँक चलनविषयक धोरणाच्या सहाय्याने तेजी किंवा मंदी निर्माण होऊ देत नाही किंवा तेजी अथवा मंदी निर्माण झाली तर ती नाहीशी करण्याचा प्रयत्न करते आणि देशात आर्थिक स्थैर्य निर्माण करते. चलनपुरवठ्याचे व्यवस्थापन नीट झाले नाही तर आर्थिक स्थैर्य नष्ट होते. म्हणजे तेजी किंवा मंदी निर्माण होते. म्हणून मध्यवर्ती बँक पैशाच्या पुरवठ्याचे योग्य व्यवस्थापन करते आणि व्यापारचक्रावर नियंत्रण ठेवणे. मंदी नाहीशी करण्यासाठी मध्यवर्ती बँक पैशाच्या पुरवठ्यात वाढ करते आणि तेजीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पैशाच्या पुरवठ्यात योग्य ती घट करते.

**(६) सर्वसाधारण किंमत पातळीत स्थैर्य प्रस्थापित करणे** (Price Stability) **:**

सर्वसाधारण किंमत पातळीत (विविध प्रकारच्या वस्तूंच्या किंमतीत) सतत चढ-उतार होत असतील तर

त्याचे अर्थव्यवस्थेवर (ग्राहक, उत्पादक, व्यापारी यांच्यावर) अनिष्ठ परिणाम होतात. म्हणून सर्वसाधारण किंमतपातळीत स्थैर्य प्रस्थापित करण्याचे काम मध्यवर्ती बँकेला करावे लागते. किंमत पातळी स्थिर ठेवणे याचा अर्थ किंमतीत वाढ होऊ न देणे असा नाही. किंमतीत वार्षिक २ ते ३ टक्के वाढ अर्थव्यवस्थेला हानीकारक ठरत नाही. उलट अशा किंमत वाढीमुळे उत्पादन, उत्पन्न, नफा, गुंतवणूक यामध्ये चांगली वाढ घडून येत असते. किंमतीत होणारे फार मोठे चढ-उतार टाळणे म्हणजे किंमत स्थैर्य होय. पैशाचा पुरवठा फार झाला तर किंमतीत फार मोठी वाढ होते आणि पैशाचा पुरवठा फारच कमी झाला तर किंमतीत फार मोठी वाढ होते आणि पैशाचा पुरवठा फारच कमी झाला तर किंमतीत फार मोठी घट होते. म्हणून किंमतीत फार मोठी वाढ होणार नाही किंवा फार मोठी घट होणार असे चलनविषयक धोरण मध्यवर्ती बँक राबवत असते.

**(७) विनिमय दरात स्थैर्य प्रस्थापित करणे** (Exchange Rate Stability) **:**

दोन देशांच्या चलनाची देवघेव (खरेदी-विक्री) ज्या दराने होते, त्या दराला विनिमय दर असे म्हणतात. एका देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलनात व्यक्त केलेली किंमत म्हणजे विनिमय दर होय. विनिमय दरालाच हुंडणावळीचा दर असेही म्हणतात. चलनाची बाह्य किंमत म्हणजे विनिमय दर होय. उदाहरणार्थ, १ डॉलर = ८७ रुपये. विनिमय दरात सतत चढ-उतार होत असतील तर त्याचे अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होतात. उदाहरणार्थ, डॉलरच्या तुलनेत रुपयीच किंमत सतत घसरत गेली तर आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेचा फायदा होतो आणि भारताचा तोटा होतो. म्हणून भारतासारख्या अनेक देशांनी विनिमय दराच्या स्थैर्याला प्राधान्य दिले आहे.

**सारांश :**

किंमत स्थैर्य, पूर्ण रोजगार, आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी, आर्थिक स्थैर्य (व्यापारचक्रांचे नियंत्रण), विनिमय दर स्थैर्य ही चलनविषयक धोरणाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. आजच्या गतिमान अर्थव्यवस्थेत किंवा ज्या अर्थव्यवस्थेत पैशाचा वापर प्रचंड प्रमाणावर केला जातो त्या अर्थव्यवस्थेत चलनविषयक धोरणाला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे.

**चलनविषयक धोरणाची साधने (Methods / Measures / Instruments / Weapons of Monetary Policy) :**

आजच्या गतिमान अर्थव्यवस्थेत म्हणजेच ज्या अर्थव्यवस्थेत पैशाचा वापर प्रचंड प्रमाणावर केला जातो त्या अर्थव्यवस्थेत चलनविषयक धोरणाला खूपच महत्त्व प्राप्त झाले आहे. चलनविषयक धोरणाची विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मध्यवर्ती बँक जे विविध उपाय योजते त्या उपायांना चलनविषयक धोरणाची साधने (Measures of Monetary Policy) असे म्हणतात. यालाच मध्यवर्ती बँकेची पतनियंत्रणाची साधने असेही म्हणतात.

**''अर्थव्यवस्थेतील पैशाचा एकूण पुरवठा नियंत्रित करण्यासाठी मध्यवर्ती बँक ज्या संख्यात्मक आणि**

**गुणात्मक साधनांचा अवलंब करते त्या साधनांना चलनविषयक धोरणाची साधने किंवा पतनियंत्रणाची साधने (Measures of Credit Control) असे म्हणतात.''**

अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा खूप जास्त झाला तर तेजी किंवा भाववाढीची परिस्थिती निर्माण होते आणि पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा खूपच कमी पडू लागला तर देशात मंदीची समस्या निर्माण होते. देशाच्या आर्थिक विकासाचा दर कमी होतो. म्हणून पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य देशाच्या मध्यवर्ती बँकेला करावे लागते. चलनविषयक साधनांच्या सहाय्याने / पतनियंत्रणाच्या साधनांच्या सहाय्याने मध्यवर्ती बँक पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा जास्त झाला असेल तर तो योग्य पातळीपर्यंत कमी करते किंवा पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा खूपच कमी पडला असेल तर तो योग्य पातळीपर्यंत वाढवते. मध्यवर्ती बँक आपल्या चलनविषयक साधनांचा वापर करून अर्थव्यवस्थेला पैशाचा पुरवठा कमी किंवा जास्त (गरजेइतका) करते. त्यालाच चलनविषयक धोरण असे म्हणतात. अशा प्रकारे पतनियंत्रणाच्या संख्यात्मक आणि गुणात्मक साधनांचा / चलनविषयक धोरणाच्या साधनांचा वापर करून मध्यवर्ती बँक राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असणारी पूर्ण रोजगार, आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य, विनिमय दर स्थैर्य, पतनियंत्रण, किंमत स्थैर्य, तेजी-मंदीचे नियंत्रण ही समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करते. मध्यवर्ती बँकेच्या पतनियंत्रणाच्या साधनांची चलनविषयक धोरणाच्या साधनांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

### अ) चलनविषयक धोरणाची / पतनियंत्रणाची संख्यात्मक साधने (Quantitative Measures of Monetary Policy or Credit Control) :

ज्या साधनांच्या सहाय्याने मध्यवर्ती बँक पैशाचा पुरवठा कमी किंवा जास्त करू शकते त्या साधनांना चलनविषयक धोरणाची / पतनियंत्रणाची संख्यात्मक साधने असे म्हणतात. बँक दर धोरण (Bank Rate Policy), खुल्या बाजारातील व्यवहार (Open Market Operations), रोख राखीव निधी (Cash Reserve Ratio) या तीन साधनांना चलनविषयक धोरणाची / पतनियंत्रणाची संख्यात्मक साधने असे म्हणतात. या तीन साधनांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) बँकदर धोरण** (Bank Rate Policy) **:**

मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना ज्या व्याजदराने कर्जपुरवठा करते त्या व्याजदरास बँक दर असे म्हणतात. तसेच मध्यवर्ती बँक ज्या दराने व्यापारी बँकांच्या हुंड्या वटवून देते त्या वटाव दरास बँक रेट असे म्हणतात. पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा खूप जास्त झाला की मध्यवर्ती बँक बँकरेटमध्ये आणि वटाव दरामध्ये वाढ करते. त्यामुळे पैशाचा पुरवठा कमी होण्यास मदत होते. याऊलट अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा खूपच कमी असेल तर मध्यवर्ती बँक बँकरेटमध्ये कपात करते. त्यामुळे पैशाचा पुरवठा वाढण्यास मदत होते. मध्यवर्ती बँकेने बँकरेटमध्ये कपात केली की, व्यापारी बँका सुद्धा कर्जावरील व्याजाचा दर कमी करतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील शेतकरी, व्यापारी, कारखानदार, नोकरदार इत्यादी विविध घटकांची कर्जाला मागणी वाढते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील

पैशाचा पुरवठा वाढण्यास मदत होते. मध्यवर्ती बँकेने बँकरेटमध्ये कपात केली की व्यापारी बँकांना मध्यवर्ती बँकेकडून पूर्वीपेक्षा कमी व्याजदरात कर्ज मिळते. त्यामुळे व्यापारी बँका मध्यवर्ती बँकेकडून पूर्वीपेक्षा अधिक कर्ज घेऊन अधिक पतीनिर्मिती करतात. त्यामुळे पैशाचा पुरवठा वाढण्यास मदत होते. अशा प्रकारे मध्यवर्ती बँकेने बँकरेटमध्ये कपात केली की व्यापारी बँकांची पतनिर्माणशक्ती वाढून पतनिर्मिती वाढते. त्यामुळे पैशाचा पुरवठा वाढण्यास मदत होते. याऊलट मध्यवर्ती बँकेने बँकरेटमध्ये वाढ केली की व्यापारी बँकासुद्धा कर्जावरील व्याजदर वाढवतात. त्यामुळे लोकांची कर्जाला मागणी कमी होऊन व्यापारी बँकांची पतनिर्मिती कमी होते. त्यामुळे पैशाचा वाढलेला पुरवठा कमी होण्यास मदत होते. तसेच मध्यवर्ती बँकेने बँकरेटमध्ये वाढ केली की व्यापारी बँकांची मध्यवर्ती बँकेकडील कर्जाची मागणी कमी होते. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्मिती कमी होते. अशा प्रकारे मध्यवर्ती बँकेने बँकरेटमध्ये वाढ केली की व्यापारी बँकांची पतचलन निर्माण करण्याची शक्ती कमी होते. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्मिती कमी होऊन पैशाचा पुरवठा कमी होण्यास मदत होते.

**२) खुल्या बाजारातील व्यवहार** (Open Market Operations) **:**

मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना कर्जरोख्यांची विक्री करत असते तसेच विकलेले कर्जरोखे पुन्हा खरेदी करत असते. त्यास खुल्या बाजारातील व्यवहार किंवा खुल्या बाजारातील कर्जरोख्यांची खरेदी-विक्री असे म्हणतात. पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक या साधनाचा वापर करत असते. अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा जेव्हा गरजेपेक्षा जास्त झालेला असतो तेव्हा तो कमी करण्यासाठी आणि पैशाचा पुरवठा वाढू नये यासाठी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना कर्जरोख्यांची विक्री करते. आपल्याजवळील रोख निधीतून व्यापारी बँका मध्यवर्ती बँकेकडून कर्जरोख्यांची खरेदी करतात. त्यामुळे व्यापारी बँकेकडील पैसा मध्यवर्ती बँकेत जाऊन व्यापारी बँकांची पतनिर्माण शक्ती (कर्ज देण्याची शक्ती) कमी होते. त्यामुळे पैशाचा पुरवठा कमी होण्यास मदत होते. याउलट अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा कमी असेल किंवा व्यापारी बँका कमी प्रमाणात पतनिर्मिती करत असतील तर मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांकडून कर्जरोख्यांची खरेदी करते. व्यापारी बँकांना पूर्वी विकलेले कर्जरोखे मध्यवर्ती बँक विकत घेते. त्यामुळे व्यापारी बँकांना मध्यवती बँकेकडून व्याजासहित रक्कम मिळते. त्यामुळे व्यापारी बँकांच्या रोख निधीत वाढ होते. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्माण शक्ती (कर्ज देण्याची शक्ती) वाढते. त्यामुळे व्यापारी बँकांच्या कर्जपुरवठ्यात वाढ होऊन देशातील पैशाचा एकूण पुरवठा वाढण्यास मदत होते. अशा प्रकारे देशात पैशाचा पुरवठा खूप जास्त होतो तेव्हा तो कमी करण्यासाठी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना कर्जरोख्यांची विक्री करते आणि पैशाचा पुरवठा देशात गरजेपेक्षा / मागणीपेक्षा खूपच कमी झाला असेल तर मध्यवर्ती बँक व्यापारी बँकेकडून कर्जरोख्यांची खरेदी करते. यालाच खुल्या बाजारातील व्यवहार असे महणतात.

**३) रोख राखीव निधी** (Cash Reserve Ratio - CRR) **:**

बँकदर, खुल्या बाजारातील व्यवहार याप्रमाणे रोख राखीव निधी हे मध्यवर्ती बँकेचे पतनियंत्रणाचे / चलनविषयक धोरणाचे महत्त्वाचे संख्यात्मक साधन आहे. अर्थव्यवस्थेतील पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण

ठेवण्यासाठी / व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक 'रोख राखीव निधी' या साधनाचा वापर करते. बँकिंग रेग्युलेशन ॲक्टनुसार देशातील सर्व व्यापारी बँकांना त्यांच्याजवळ जमा झालेल्या एकूण ठेवीपैकी (एकूण रोख निधीपैकी) विशिष्ट टक्के रक्कम रोख स्वरूपात स्वत:जवळ ठेवावी लागते आणि विशिष्ट टक्के रक्कम मध्यवर्ती बँकेत स्वत:च्या खात्यावर ठेवावी लागते. यालाच रोख राखीव निधीचे प्रमाण असे म्हणतात. रोख राखीव निधीचे प्रमाण भारतात ३ ते १५ टक्के एवढे आहे. रोख राखीव निधीच्या प्रमाणात बदल करून मध्यवर्ती बँक पैशाच्या पुरवठ्यावर / व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवत असते. पैशाचा पुरवठा देशात गरजेपेक्षा जास्त झाला असेल तर तो कमी करण्यासाठी मध्यवर्ती बँक रोख राखीव निधीच्या प्रमाणात वाढ करते. त्यामुळे व्यापारी बँकांना पूर्वीपेक्षा अधिक रक्कम रोख निधीत ठेवावी लागते. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्माण शक्ती कमी होते. त्यामुळे व्यापारी बँकांचा कर्जपुरवठा कमी होतो. त्यामुळे पैशाचा पुरवठा घटण्यास मदत होते. याऊलट अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा खूपच कमी असेल तर तो वाढवण्यासाठी मध्यवर्ती बँक रोख राखीव निधीच्या प्रमाणात घट करते. त्यामुळे व्यापारी बँकांना रोख निधीमध्ये कमी रक्कम ठेवावी लागते. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्माण शक्ती / कर्ज देण्याची शक्ती वाढते. मध्यवर्ती बँकेने रोख राखीव निधीचे प्रमाण कमी केल्यामुळे व्यापारी बँका पूर्वीपेक्षा अधिक कर्ज देऊ शकतात. त्यामुळे पैशाचा पुरवठा वाढण्यास मदत होते. अशा प्रकारे मध्यवर्ती बँकने रोख राखीव निधीचे प्रमाण वाढवले की व्यापारी बँकांची पतनिर्माण शक्ती कमी होते आणि मध्यवर्ती बँकेने रोख राखीव निधीच्या प्रमाणात घट केली की व्यापारी बँकांची पतनिर्माण शक्ती वाढते. त्यामुळे पैशाचा पुरवठा वाढण्यास मदत होते. चलनविषयक धोरणाचे मध्यवर्ती बँकेचे हे महत्त्वाचे साधन आहे. या साधनाचा वापर करून मध्यवर्ती बँक पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवत असते.

**कायदेशीर रोखता निधी प्रमाण** (Statutory Liquidity Ratio - SLR) **:**

कायदेशीर रोखता निधीलाच 'वैधानिक तरलता दर' असेही म्हणतात. व्यापारी बँका जेव्हा त्यांच्याकडे जमा झालेल्या एकूण ठेवीपैकी विशिष्ट टक्के रक्कम रोख स्वरूपात आणि सोन्याच्या खरेदीत व सरकारी कर्जरोख्यात गुंतवतात तेव्हा त्यास कायदेशीर रोखता निधी असे म्हणतात. व्यापारी बँकांची पतनिर्मिती गरजेपेक्षा जास्त झाली असेल तर मध्यवर्ती बँक वैधानिक तरलता दरात वाढ करते. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्मिती कमी होऊन पैशाचा पुरवठा कमी होण्यास मदत होते. याऊलट अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा गरजेपेक्षा खूपच कमी झाला असेल तर मध्यवर्ती बँक कायदेशीर रोखता निधीच्या प्रमाणात घट करते. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्मितीचे प्रमाण वाढून पैशाचा पुरवठा वाढण्यास मदत होते.

**४) रेपो दर आणि रिव्हर्स रेपो दर :**

व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक रेपो दर (Repo Rate) आणि रिव्हर्स रेपो दरामध्ये (Rreverse Repo Rate) वेळोवेळी बदल करत असते. रेपो दर आणि रिव्हर्स रेपो दर ही पतनियंत्रणाची दोन वेगवेगळी साधने आहेत. त्यांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**अ. रेपो दर** (Repo Rate) **:**

व्यापारी बँकांना पतनिर्मिती करण्यासाठी (गरजूंना कर्जपुरवठा करण्यासाठी) रोख निधीची (पैशाची) गरज असते. बँकांना जेव्हा रोखतेची अडचण असते तेव्हा देशाची मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांना कर्जपुरवठा करते. या रकमेतून मग व्यापारी बँका, शेतकरी, कारखानदार, व्यापारी, व्यावसायिक, नोकरदार इत्यादी समाजातील विविध घटकांना कर्जपुरवठा करतात. परंतु मध्यवर्ती बँकेकडून व्यापारी बँकांना जो कर्जपुरवठा केला जातो तो बिनव्याजी केला जात नाही. त्यावर मध्यवर्ती बँक व्याज आकारते. त्या व्याजदराला रेपो दर (Repo Rate) असे म्हणतात. सध्या हा रेपो दर ६ ते ६.५० टक्केच्या आसपास आहे.

**ब. रिव्हर्स रेपो दर** (Reverse Repo Rate) **:**

व्यापारी बँकांकडे जर अतिरिक्त रोख निधी असेल तर व्यापारी बँका अधिक (जास्त) पतनिर्मिती करतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील पैशाचा एकूण पुरवठा वाढून भाववाढ, तेजी अशा प्रकारच्या समस्या निर्माण होतात. या समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांकडून कर्ज घेते. ज्या दराने मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांकडून कर्ज घेते त्या दराला रिव्हर्स रेपो दर असे म्हणतात.

रेपो दर आणि रिव्हर्स रेपो दर या शब्दांचा अर्थ पाहिल्यानंतर मध्यवर्ती बँक या साधनांचा कसा वापर करते ते आपण पाहू. व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीत वाढ किंवा घट झाली तर अर्थव्यवस्थेतील पैशाचा एकूण पुरवठा वाढतो किंवा घटतो. त्याचे अर्थव्यवस्थेबरोबर प्रतिकूल परिणाम होतात. म्हणून मध्यवर्ती बँक रेपो दरात आणि रिव्हर्स रेपो दरात योग्य ते बदल करते. व्यापारी बँका गरजेपेक्षा जास्त पतनिर्मिती करत असतील तर मध्यवर्ती बँक रेपो दरात वाढ करते आणि व्यापारी बँका गरजेपेक्षा कमी पतनिर्मिती करत असतील तर मध्यवर्ती बँक रेपो दरात घट करते. मध्यवर्ती बँकेने रेपो दरात वाढ केली की व्यापारी बँकांची कर्जाला मागणी कमी होते. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्माण शक्ती कमी होते. याऊलट मध्यवर्ती बँकेने रेपो दरात घट केली की, व्यापारी बँका मध्यवर्ती बँकेकडून पूर्वीपेक्षा अधिक कर्ज घेतात. त्यामुळे व्यापारी बँकांची पतनिर्मिती वाढून पैशाचा पुरवठा वाढतो.

**ब) चलनविषयक धोरणाची / पतनियंत्रणाची गुणात्मक साधने (Qualitative Measures / Weapons / Methods of Monetary Policy or Credit Control) :**

मध्यवर्ती बँक संख्यात्मक साधनाबरोबर पतनियंत्रणाच्या गुणात्मक साधनांचासुद्धा वापर करते आणि व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवते. गुणात्मक साधनांचा वापर करून व्यापारी बँकांचा पैसा (पतपुरवठा) योग्य त्या क्षेत्राकडे वळवता येतो. अनुत्पादक कारणासाठी वापरला जाणारा पैसा उत्पादक कामासाठी वळवता येतो. जी क्षेत्रे देशाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची असतात त्या क्षेत्रांकडे पैसा वळवता येतो. त्यामुळे विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. गुणात्मक साधनांना निवडक साधने किंवा वेचक साधने असेही म्हणतात. पतनियंत्रणाची गुणात्मक साधने थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) तारण व कर्ज यातील अंतर / गाळा / सीमा / ठरवणे :**

हे मध्यवर्ती बँकेचे पतनियंत्रणाचे गुणात्मक (Qualitative) साधन (Weapon) आहे. व्यापारी बँकांच्या अतिरिक्त पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक तारण व कर्ज यातील गाळा (margin) वाढवते. उदाहरणार्थ तारण व कर्ज यातील मार्जिन २०% असेल तर १०० रुपये कर्जाची मागणी केली असेल तर ८० रुपये कर्ज मिळेल. हे मार्जिन २०% वरून ४०% वाढवले तर ६० रुपये कर्ज मिळेल. त्यामुळे पतनिर्मिती कमी होते. याउलट व्यापारी बँकांची पतनिर्मिती गरजेपेक्षा कमी होत असेल तर ती वाढविण्यासाठी मध्यवर्ती बँक तारण व कर्ज यातील गाळा कमी करते. त्यामुळे व्यापारी बँका पूर्वीपेक्षा अधिक कर्ज देऊन अधिक पतनिर्मिती करू शकतात. अर्थव्यवस्थेतील पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्यासाठी मध्यवर्ती बँक 'तारण व कर्ज यातील गाळा ठरवणे' या साधनाचा वापर करते. अर्थव्यवस्थेत पैशाचा पुवठा अतिरिक्त झाला असेल तर त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक तारण व कर्ज यातील गाळा वाढवते. त्यामुळे व्यापारी बँकांकडून जनतेला तारण मूल्यापेक्षा खूपच कमी कर्ज मिळते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील पतपैशाचे (बँकपैशाचे) प्रमाण घटून पैशाचा पुरवठा हळूहळू कमी होतो.

**२) कर्जाचे वाटप** (Rationing of Credit) **:**

हे सुद्धा मध्यवर्ती बँकेचे पतनियंत्रणाचे गुणात्मक साधन आहे. मध्यवर्ती बँकेकडून व्यापारी बँकांना कर्ज दिली जातात. बँका गरजेपेक्षा जास्त पतनिर्मिती करत असतील तर मध्यवर्ती बँक कर्जाची मर्यादा आखून देते. त्या मर्यादेपेक्षा जास्त कर्ज व्यापीर बँकांना दिले जात नाही. त्यामुळे अतिरिक्त पतनिर्मिती आटोक्यात येते. अर्थव्यवस्थेतील पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक पतनियंत्रणाच्या या गुणात्मक साधनाचा वापर करते. या साधनाचा वापर करून पैशाच्या एकूण पुरवठ्यात वाढ किंवा घट घडवून आणता येते.

**३) उपभोग्य कर्जाचे नियंत्रण** (Consumers Credit Regulation) **:**

हे मध्यवर्ती बँकेचे पतनियंत्रणाचे गुणात्मक साधन आहे. व्यापारी बँका ग्राहकांना मोटारसायकल, टी. व्ही., फ्रीज, धुलाई यंत्र (वॉशिंग मशीन) इत्यादी विकत घेण्यासाठी कर्ज देतात. परंतु देशात जर भाववाढीची/ तेजीची परिस्थिती असेल तर मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांच्या उपभोग्य कर्जावर नियंत्रणे बसवते. व्यापारी बँकांना जनतेला उपभोग्य कर्जे कमी प्रमाणात देण्याचे आदेश मध्यवर्ती बँक देते तसेच कर्ज परतफेडीचे हप्ते कमीतकमी ठेवण्याच्या सूचना देते. याउलट देशात जर मंदीची परिस्थिती असेल तर मंदी हटविण्यासाठी व्यापारी बँकांना जनतेला जास्तीत जास्त उपभोग्य कर्जे देण्याचे आदेश मध्यवर्ती बँक देते.

**४) आदेशांच्याद्वारे नियंत्रण** (Control Through Directives) **:**

हे मध्यवर्ती बँकेचे पतनियंत्रणाचे गुणात्मक (निवडक / वेचक) साधन आहे. या साधनाच्या साहाय्याने सुद्धा मध्यवर्ती बँक अर्थव्यवस्थेतील पैशाच्या एकूण पुरवठ्यावर नियंत्रण ठेवत असते. पैशाच्या पुरवठावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँकेला व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवावे लागते. कारण व्यापारी बँकांची पतनिर्मिती वाढली की पैशाचा एकूण पुरवठा वाढतो. त्यामुळे देशात तेजी किंवा भाववाढ (महागाई)

निर्माण होते. व्यापारी बँकांना विविध प्रकारचे आदेश देऊन मध्यवर्ती बँक व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर ठेवत असते. व्यापारी बँकांनी कोणत्या प्रकारची कर्जे द्यावीत? कोणत्या प्रकारची कर्जे देऊ नयेत? कोणत्या प्रकारच्या उद्योगांना कर्जे द्यावीत इत्यादी विविध प्रकारचे आदेश किंवा सूचना मध्यवर्ती बँकेकडून व्यापारी बँकांना दिल्या जातात. या आदेशांच्याद्वारे व्यापारी बँकांची पतनिर्मिती नियंत्रित करण्याचे कार्य मध्यवर्ती बँक करते.

**५) प्रसिद्धी** (Publicity) **:**

कृषी, व्यापार, उद्योग इत्यादी अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रातील अद्ययावत आकडेवारी आपल्या मासिकामधून आणि बुलेटीन्समधून प्रसिद्ध करण्याचे काम मध्यवर्ती बँक करत असते. पतनिर्मिती करणाऱ्या व्यापारी बँकांना त्याचा खूप उपयोग होतो. मध्यवर्ती बँकेच्या विविध प्रकाशनामध्ये बुडालेल्या / दिवाळखोरीत गेलेल्या बँकांची माहिती आणि बँका बुडण्याची कारणे दिलेली असतात. त्यामुळे किती प्रमाणात पतनिर्मिती करावी? याचे मार्गदर्शन व्यापारी बँकांना होते.

**६) नैतिक समजावणी** (Moral Suasion) **:**

हे पितनियंत्रणाचे मध्यवर्ती बँकेचे गुणात्मक साधन आहे. पैशाच्या पुरठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक या साधनाचा सुद्धा वापर करते. व्यापारी बँकांनी गरजेपेक्षा जास्त किंवा कमी पतनिर्मिती करू नये यासाठी मध्यवर्ती बँकेकडून व्यापारी बँकांचे मन वळवले जाते. कमी किंवा जास्त पतनिर्मितीचे दुष्परिणाम व्यापारी बँकांना समजावून दिले जातात. देशात मध्यवर्ती बँकेला जर प्रतिष्ठा असेल तर या उपायाचा व्यापारी बँकावर चांगला परिणाम होतो.

**७) प्रत्क्ष कारवाई** (Direct Action) **:**

हे मध्यवर्ती बँकेचे पतनियंत्रणाचे गुणात्मक साधन आहे. व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही वेळा मध्यवर्ती बँकेकडून या साधनाचा वापर केला जातो. ज्या व्यापारी बँका मध्यवर्ती बँका मध्यवर्ती बँकेचे आदेश पाळत नाहीत त्या बँकांवर मध्यवर्ती बँकेकडून कडक कारवाई केली जाते. उदाहरणार्थ, इतर बँकापेक्षा जादा व्याजाने कर्ज देणे, व्यापारी बँकांच्या हुंड्या वटवून न देणे, बँकेचा परवाना रद्द करणे अशा कडक कारवाया केल्या जातात. अशी कडक कारवाई आपल्यावर होऊ नये म्हणून व्यापारी बँका मध्यवर्ती बँकेच्या धोरणानुसार पतनिर्मिती करण्याचा प्रयत्न करतात.

**सारांश :**

अशा प्रकारे पैशाच्या पुरवठावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँक विविध उपाय योजते. पैशाच्या पुरवठ्यात पतपैशाचाही समावेश होत असतो. पतपैशाचे प्रमाण कमी किंवा जास्त झाले तर पैशाचा एकूण पुरवठा सुद्धा कमी किंवा जास्त होत असतो. अर्थव्यवस्थेतील पैशाच्या एकूण पुरवठ्यावर पतपैशाचा मोठा परिम होत असल्याने पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मध्यवर्ती बँकेला व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीवर

नियंत्रण ठेवावे लागते. त्यासाठी मध्यवर्ती बँक वर स्पष्ट केल्याप्रमाणे पतनियंत्रणाची संख्यात्मक आणि गुणात्मक साधने वापरते. बँक दर, खुल्या बाजारातील व्यवहार, रोख राखीव निधी ही पतनियंत्रणाची संख्यात्मक साधने आहेत, तर तारण व कर्ज यातील गाळा ठरवणे, कर्जाचे वाटप उपभोग्य कर्जाचे नियंत्रण, आदेशांच्याद्वारे नियंत्रण, प्रसिद्धी, नैतिक समजावणी आणि प्रत्यक्ष कारवाई ही मध्यवर्ती बँकेची पतनियंत्रणाची गुणात्मक साधने आहेत.

**राजकोषीय धोरण (Fiscal Policy) :**

राजकोषीय धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी केंद्र सरकारकडून केली जाते. केवळ चलनविषयक धोरणाच्या साहाय्याने देशातील पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवता येत नाही किंवा आर्थिक विकासाची गती वाढवता येत नाही तर त्यासाठी राजकोषीय धोरणाची सुद्धा गरज असते. चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी सरकारच्या वतीने सरकारची मध्यवर्ती बँक करते तर राजकोषीय धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी केंद्र सरकारकडून केली जाते. राजकोषीय धोरणाला वित्तीय धोरण किंवा राज्यवित्तीय धोरण असेही म्हणतात. सन १९३० नंतर राजकोषीय धोरणाचे महत्त्व जगाला पटले. कारण १९२९ ते १९३३ या काळात जगाला महामंदीशी सामना करावा लागला. मंदीच्या निर्मूलनासाठी सरकारने अर्थव्यवस्थेत अधिकाधिक खर्च करावा (अनेक कामे करावीत) असा विचार प्रा. डॉ. जे. एम केन्स यांनी मांडला. राजकोषीय धोरणाची गरज विकसित तसेच अविकसित, विकसनशील राष्ट्रांना सुद्धा असते. विकसित राष्ट्रांचा विकास झालेला असतो. हा झालेला विकास टिकवून ठेवण्यासाठी आणि आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी (तेजी-मंदीवर नियंत्रण ठेवण्यासाठी) प्रगत राष्ट्रांना राजकोषीय धोरणाची गरज असते. तसेच आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी आणि विकासाला गती देण्यासाठी अप्रगत, कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांना राजकोषीय धोरणाची गरज असते. राजकोषीय धोरणाची गरीब राष्ट्रांच्या आर्थिक विकासातील भूमिका खूप महत्त्वाची असते.

**राजकोषीय धोरण म्हणजे काय?**

राजकोषीय धोरणाची राष्ट्राच्या आर्थिक विकासातील भूमिका पाहण्यापूर्वी राजकोषीय धोरण म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. राजकोषीय धोरणाच्या विविध तज्ज्ञांनी दिलेल्या विविध व्याख्या खाली स्पष्ट केल्या आहेत.

**१) सर्वसाधारण व्याख्या :**

राजकोषीय धोरणाची एक सोपी, सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''**पूर्ण रोजगार, आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य इत्यादी विविध समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारने तयार केलेले आणि राबवलेले करविषयक, कर्जविषयक, खर्चविषयक आणि अंदाजपत्रकीय धोरण म्हणजे राजकोषीय धोरण होय.**''

कर, कर्ज, खर्च आणि अंदाजपत्रक ही सरकारच्या राजकोषीय धोरणाची साधने (Tools) असून या साधनात योग्य तो बदल करून सरकार आर्थिक विकासाला चालना देते किंवा इतर समग्रलक्षी उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करत असते. म्हणून सरकारच्या करविषयक, खर्चविषयक, कर्जविषयक आणि अंदाजपत्रकीय धोरणास राजकोषीय धोरण असे म्हणतात.

**२) पॉल सॅम्यूअल्सन** (Paul Samuelson) **:**

पॉल सॅम्यूअल्सन यांची राजकोषीय धोरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे-

''**राजकोषीय धोण म्हणजे सार्वजनिक खर्चविषयक आणि करविषयक धोरण होय.**'' (According to Paul Samuelson, "Fiscal Policy means public expenditure and Tax policy.")

**३) ऑर्थर स्मिथिस** (Arthur Smithies) **:**

ऑर्थर स्मिथिस यांची राजकोषीय धोरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे-

''**सरकारकडून खर्च आणि महसूलविषयक कार्यक्रमांच्या सहाय्याने राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन आणि रोजगारावर अनुकूल परिणाम घडवून आणले जातात आणि प्रतिकूल / नुकसानकारक परिणाम टाळले जातात. त्यास राजकोषीय धोरण असे म्हणतात.**'' (According to Arthur Smithies, "Fiscal Policy is a policy under which government uses its expenditure and revenue programmes to produce desirable effects and avoid undesirable effects on the national income, production and employment.")

**४) जी. के. शॉ** (G. K. Shaw) **:**

जी. के. शॉ यांची राजकोषीय धोरणाची व्याख्या खालील शब्दात दिली आहे -

''**सरकारी खर्चाची रचना, कालावधी आणि करांची रचना यामध्ये बदल करण्याचे धोरण म्हणजे राजकोषीय धोरण होय.**''

**सारांश :** राजकोषीय धोरण म्हणजे सरकारचे करविषयक, कर्जविषयक, खर्चविषयक आणि अंदाजपत्रकीय धोरण होय. राष्ट्रीय उत्पादनात, रोजगारात वाढ घडवून आणण्यासाठी सरकारने आपल्या करविषयक, कर्जविषयक, खर्चविषयक आणि अंदाजपत्रकीय धोरणात केलेले कदल म्हणजे राजकोषीय धोरण होय. सरकारच्या उत्पन्न आणि खर्चविषयक धोरणाला राजकोषीय धोरण असे म्हणतात. अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सरकारने आपल्या उत्पन्न आणि खर्चात बदल करण्याचे स्वीकारलेले धोरण म्हणजे राजकोषीय धोरण होय.

**राजकोषीय धोरणाची साधने** (Instruments of Fiscal Policy) **:**

ज्या साधनांच्या साहाय्याने सरकार आर्थिक विकासाला चालना देते त्या साधनांना राजकोषीय धोरणाची साधने असे म्हणतात. कर, कर्ज, खर्च आणि अंदाजपत्रक ही सरकारच्या राजकोषीय धोरणाची प्रमुख साधने

आहेत. या साधनांचा वापर करून सरकार पूर्ण रोजगार, आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी, आर्थिक स्थैर्य (व्यापारचक्रांचे नियंत्रण) इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करत असते. देशाच्या विकासाच्या दृष्टीने राजकोषीय धोरणाला खूप महत्त्व असते. राजकोषीय धोरणाचे महत्त्व पाहण्यापूर्वी आपणास राजकोषीय धोरणाची साधने पाहणे आवश्यक आहे. राजकोषीय धोरणाच्या साधनांची थोडक्यात चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

**१) कर** (Tax) **:**

सरकारने जनतेवर लादलेले सक्तीचे देणे म्हणजे कर अशी कराची व्याख्या सांगितली जाते. 'कर' (Tax) हे सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. सरकारला विविध मार्गांनी जो एकूण महसूल मिळतो त्यामध्ये करापासून मिळणाऱ्या महसूलाचा वाटा सुमारे ९० टक्के एवढा मोठा आहे. काही देशात तो त्याहीपेक्षा अधिक आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून विविध प्रकारचे कर आकारले जातात. करांची आकारणी फक्त सरकारलाच करता येते. कर आकारणीचा अधिकार सरकारशिवाय कोणालाही नसतो हे कराचे ठळक वैशिष्ट्य आहे. सरकारकडून लोकांच्या उत्पन्नावर, नफ्यावर, वस्तूवर (वस्तूच्या खरेदी-विक्रीवर), मालमत्तेवर, विविध सेवांच्या उपभोगावर कर आकारणी केली जाते. देशाची (अर्थव्यवस्थेची) परिस्थिती विचारात घेऊन सरकार करविषयक धोरण जाहीर करत असते. करांच्या दरात वाढ करणे, घट करणे, जुने किंवा जाचक कर काढून टाकणे, नवीन कर बसवणे इत्यादी करविषयक निर्णय सरकार घेत असते. त्यालाच करविषयक धोरण असे म्हणतात. केवळ महसूल गोळा करणे एवढाच कर आकारणीचा (करधोरणाचा) सरकारचा उद्देश नसतो. तेजी-मंदीवर नियंत्रण ठेवणे किंवा तेजी-मंदी आटोक्यात आणणे, बेरोजगारी कमी करणे, बचत आणि गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे, राष्ट्रीय उत्पादनात आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे (म्हणजेच आर्थिक विकास दरात वृद्धी घडवून आणणे), आर्थिक विषमता कमी करणे इत्यादी समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साकार करण्यासाठी सरकार 'कर' या महत्त्वपूर्ण राजकोषीय साधनाचा वापर करत असते. करविषयक धोरणात योग्य तो बदल करून सरकार देशाच्या विकासाला चालना देण्याचे काम करत असते. देशाचे करविषयक धोरण सुयोग्य असेल तर देशाच्या आर्थिक विकासाची प्रक्रिया अधिक व जलद गतिमान होते.

**२) सार्वजनिक खर्च** (Public Expenditure) **:**

राज्यकारभारासाठी / समाजहितासाठी / राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी सरकार जो खर्च करत असते त्यास सार्वजनिक खर्च असे म्हणतात. रस्ते बांधणी, रेल्वे प्रकल्प, जहाज बांधणी प्रकल्प, मोठ्या व अवजड उद्योगांची उभारणी, दवाखाने, धरण बांधणी प्रकल्प, शाळा व महाविद्यालयांची उभारणी, कृषी विद्यापीठे व संशोधन संस्थांची उभारणी इत्यादी विविध बाबींवर सरकारकडून केल्या जाणाऱ्या खर्चास सार्वजनिक खर्च असे म्हणतात. जनतेकडून गोळा केलेल्या कराची रक्कम सरकार वर उल्लेख केलेल्या विविध बाबीवर खर्च करत असते. सरकारला देशात पुरेसा खर्च करता यावा म्हणूनच सरकार करांच्या रुपाने आणि इतर मार्गांनी महसूल गोळा करत असते. देशाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन सरकार किती प्रमाणात खर्च करावा हे ठरवत

असते. प्रगत किंवा विकसित राष्ट्रांच्या सरकारचा खर्च कमी असतो. परंतु विकसनशील राष्ट्रांना आणि बेरोजगारी, दारिद्र्य या प्रश्नांचा सामना करावा लागणाऱ्या राष्ट्रांना अधिक खर्च करावा लागतो. विकसित राष्ट्रांना अधून-मधून आर्थिक मंदीच्या संकटाला तोंड द्यावे लागत असते. म्हणून विकसित राष्ट्रांना मंदीच्या निराकरणासाठी सुयोग्य असे खर्चविषयक धोरण आखावे लागते. सरकार आपल्या खर्चविषयक धोरणात योग्य ते बदल करून बेकारीचे निर्मूलन (पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे), दारिद्र्य निर्मूलन, आर्थिक विकास, भाववाढीचे निर्मूलन अशी विविध समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करत असते. तसेच सामाजिक विकास साधण्यासाठी प्रयत्न करत असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास करण्याचे सार्वजनिक खर्च हे महत्त्वाचे राजकोषीय साधन आहे.

**३) सार्वजनिक कर्ज** (Public Debt / Public Borrowing) **:**

सरकारला देशातून आणि देशाबाहेरून कर्ज काढण्याचा कायदेशीर अधिकार असतो. सरकार देशातील जनतेकडून, व्यापारी बँकांकडून, विविध संस्थांकडून, देवस्थानांकडून जे कर्ज घेते त्यास अंतर्गत कर्ज (Internal Debt) असे म्हणतात. आणि सरकार जेव्हा विदेशातून कर्ज घेते तेव्हा त्यास विदेशी कर्ज / बाह्य कर्ज / परकीय कर्ज (Foreign Debt / External Debt) असे म्हणतात. प्रगत देशांची सरकारे, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था (जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक इत्यादी), विदेशातील सधन व्यक्ती आणि संस्था यांच्याकडून एखाद्या देशाच्या सरकारने घेतलेले कर्ज म्हणजे सार्वजनिक ऋण होय. कर्ज हे सरकारच्या उत्पन्नाचे किंवा राजकोषीय धोरणाचे प्रमुख साधन आहे. या साधनाचा वापर अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना वारंवार करावा लागतो. कारण त्यांचे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असतो. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात गरीब आणि मध्यमवर्गीयांचे प्रमाण मोठे असते. श्रीमंत लोकांचे प्रमाण २० ते ३० टक्के एवढेच असते. त्यामुळे सरकारला करापासून जास्त उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे सरकारला विदेशातून कर्ज काढावे लागते. देशातून किती कर्ज घ्यावयाचे? विदेशातून किती कर्ज घ्यायचे? किती कालावधीसाठी कर्ज घ्यायचे? त्याची परतफेड कशी करावयाची? यासंदर्भातील धोरण सरकार ठरवत असते. त्या धोरणालाच सरकारचे कर्जविषयक धोरण असे म्हणतात. सरकारचे कर्जविषयक धोरण सुयोग्य असेल तर देशाच्या आर्थिक विकासाला चांगली चालना मिळते. कर्जाची रक्कम उत्पादक बाबीवर खर्च केली तर कर्जबाजारीपणाच्या समस्येला तोंड द्यावे लागत नाही. याऊलट कर्जाची रक्कम मोठ्या प्रमाणात अनुत्पादक बाबीवर खर्च केली तर राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न यात फारशी वाढ होत नाही. देश कर्जबाजारी बनतो. म्हणून सरकारला कर्जविषयक धोरण अत्यंत काळजीपूर्वक आखावे आणि राबवावे लागते. सरकारच्या कर्जविषयक धोरणालाच सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन असेही म्हणतात. यामध्ये कर्ज मिळवून त्याची परतफेड करणे या बाबींचा समावेश असतो.

**४) अंदाजपत्रक** (Budget) **:**

कर, कर्ज, खर्च याप्रमाणे अंदाजपत्रक हे सुद्धा सरकारच्या राजकोषीय धोरणाचे प्रमुख साधन आहे. ज्या सरकारी कागदपत्रात सरकारच्या पुढील वर्षीच्या महसूलाची आणि खर्चाची माहिती दिलेली असते त्या कागदपत्रांना अंदाजपत्रक किंवा सरकारी अंदाजपत्रक असे म्हणतात. पुढील वर्षात सरकार कोणकोणत्या

मार्गानी व किती उत्पन्न मिळवणार आहे आणि ते कोणकोणत्या बाबीवर खर्च करणार आहे याची अंदाजित माहिती असते. सरकारने अंदाज केल्यापेक्षा सरकारला कमी उत्पन्न मिळू शकते किंवा जास्त उत्पन्न मिळू शकते. किंवा सरकारने जेवढा खर्च पुढील वर्षी करावयाचा ठरवला आहे त्यापेक्षा सरकारचा खर्च प्रत्यक्षात कमी होऊ शकतो किंवा जास्त होऊ शकतो. सरकारच्या अंदाजपत्रकात मागील वर्षाची, चालू वर्षाची आणि पुढील वर्षाची उत्पन्न व खर्चाची माहिती असते. समतोल अंदाजपत्रक (Balanced Budget) आणि असमतोल अंदाजपत्रक (Imbalanced Budget) असे अंदाजपत्रकाचे प्रमुख दोन प्रकार आहेत. शिलकीचे अंदाजपत्रक (Surplus Budget) आणि तुटीचे अंदाजपत्रक (Deficit Budget) असे असमतोल अंदाजपत्रकाचे दोन प्रकार आहेत. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी निर्हस्तक्षेप धोरणाचा पुरस्कार केला होता. सरकारने अर्थव्यवस्थेत कमीत कमी कार्ये करावीत म्हणजेच सरकारने कमीत कमी हस्तक्षेप करावा असे म्हटले होते. त्यांनी संतुलित आणि लहान अंदाजपत्रकाचे समर्थन केले होते. आजच्या काळात त्यांचा हा विचार योग्य वाटत नाही. सरकारने जास्तीत जास्त उत्पन्न मिळवावे आणि जास्तीत जास्त खर्च करावा, प्रसंगी उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करावा म्हणजे सरकारने अंदाजपत्रक तुटीचे बनवावे असे विचार आज मांडले जातात. विकसित राष्ट्रांची अंदाजपत्रके प्रामुख्याने शिलकीची असतात आणि अप्रगत व विकसनशील राष्ट्रांची अंदाजपत्रके ही तुटीची असतात. सुयोग्य अंदाजपत्रकीय धोरण तयार करून सरकार मंदी आणि बेकारीशी चांगला सामना करू शकते. त्यासाठी तुटीचे अंदाजपत्रक तयार करावे लागते. आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी गरीब राष्ट्रांना तुटीच्या अंदाजपत्रकाचा आधार घ्यावा लागतो. आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी, आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी विकसनशील राष्ट्रे तुटीचीच अंदाजपत्रके तयार करत असतात. थोडक्यात आर्थिक विकासासाठी आणि व्यापारचक्राच्या नियंत्रणासाठी सरकारला सुयोग्य अंदाजपत्रकीय धोरण बनवावे लागते. अशा प्रकारे अंदाजपत्रक हे देशाच्या आर्थिक विकासाचे आणि राजकोषीय धोरणाचे प्रमुख साधन आहे.

**राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे** (Objectives of Fiscal Policy) **:**

विविध समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केंद्र सरकारकडून राजकोषीय धोरणाचा वापर केला जातो. राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी राजकोषीय धोरणाचा अवलंब केला जातो. राजकोषीय धोरण हे देशाच्या आर्थिक विकासाचे मुख्य साधन आहे. कर, कर्ज, खर्च आणि अंदाजपत्रक या बाबींचा सरकारच्या राजकोषीय धोरणामध्ये समावेश होतो. यांनाच राजकोषीय धोरणाची साधने असेही म्हणतात. या साधनांचा वापर करून सरकार विविध आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टे साध्य करत असते. मंदी, बेकारी इत्यादी विविध आर्थिक प्रश्न सोडवण्याचे साधन म्हणून सरकारकडून राजकोषीय धोरणाचा वापर केला जातो. प्रा. मसग्रेव्ह यांनी उच्च रोजगार, किंमत स्थैर्य, समतोल व्यापार, आर्थिक विकासाचा दर वाढवणे ही राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे सांगितली आहेत. (According to Prof. Musgrave, "The objective of fiscal policy is higher employment, stability in prices, balance in trade and increase in economic development.") राजकोषीय धोरणाची ठळक उद्दिष्टे खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत. विकसित देशातील, अविकसित

देशातील आणि विकसनशील देशातील राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे वेगवेगळी असतात. म्हणून त्यांचा याठिकाणी स्वतंत्रपणे विचार केला आहे.

**(अ) विकसित देशातील राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे :**

ज्या देशातील राष्ट्रीय उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न सर्वोच्च असते, दारिद्र्याचे प्रमाण शून्य असते, बेकारीची समस्या फारशी गंभीर नसते आणि देशातील कृषी, उद्योग, व्यापार व सेवा ही सर्व क्षेत्रे प्रगत असतात, लोकांच्या राहणीमानाचा दर्जा अत्यंत चांगला असतो त्या देशांना प्रगत राष्ट्रे / विकसित राष्ट्रे असे म्हणतात. अशा देशांच्या राजकोषीय धारेणाची उद्दिष्टे (१) आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे (मंदीचे निराकरण करणे, आर्थिक मंदी देशात निर्माण होणार नाही याची काळजी घेणे), (२) पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे, (३) आर्थिक वृद्धी दरात वाढ घडवून आणणे ही असतात. या उद्दिष्टांची थोडक्यात चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

**१) आर्थिक स्थैर्य** (Economic Stability) **:**

तेजी आणि मंदी किंवा भाववाढ आणि भावघट यामुळे आर्थिक स्थैर्य नष्ट होऊन देशात आर्थिक अस्थैर्य निर्माण होते. तेजी आणि मंदी या व्यापारचक्राच्या प्रमुख दोन अवस्था असून त्यामुळे विकासात अडथळे निर्माण होतात. म्हणून सरकारला देशात आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याचे कार्य करावे लागते. तेजीमुळे (भाववाढीमुळे) उत्पादक, व्यापारी यांचा फायदा होत असला तरी सर्वसामान्य ग्राहकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. आर्थिक मंदीमुळे उत्पादक, व्यापारी यांचे मोठे नुकसान होते. मंदीमुळे किंमती, उत्पादन, गुंतवणूक, रोजगार यामध्ये मोठी घट होते. म्हणून तेजी आणि मंदी ह्या दोन्ही अवस्था देशाच्या दृष्टीने अत्यंत वाईट मानल्या जातात. आर्थिक विकासासाठी देशात आर्थिक स्थैर्य असणे आवश्यक असते. तेजी, मंदी नष्ट झाल्याशिवाय देशात आर्थिक स्थैर्य प्रस्थापित होत नाही. त्यासाठी सरकारला सुयोग्य असे राजकोषीय धोरण तयार करावे लागते. राजकोषीय धोरणाच्या सहाय्याने सरकार तेजी आणि मंदी किंवा भाववाढ आणि भावघट नष्ट करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करते. कर, कर्ज, खर्च, अंदाजपत्रक या विविध राजकोषीय साधनांचा वापर करून सरकार निर्माण झालेली तेजी किंवा मंदी नष्ट करते. तेजी किंवा मंदी निर्माण झाल्यानंतर ती नष्ट करण्यासाठी सरकार ज्याप्रमाणे राजकोषीय धोणाचा (राजकोषीय साधनांचा) वापर करते त्याचप्रमाणे तेजी किंवा मंदी देशात निर्माण होऊ नये यासाठी सुद्धा सरकारकडून राजकोषीय धोरणाचा अवलंब केला जातो. थोडक्यात राजकोषीय धोरणाच्या सहाय्याने व्यापारचक्रावर (तेजी आणि मंदीवर) नियंत्रण ठेवता येते आणि आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवता येते. तसेच तेजी किंवा मंदीमुळे निर्माण झालेले आर्थिक अस्थैर्य सुद्धा राजकोषीय धोरणाच्या सहाय्याने नष्ट करता येते.

**२) पूर्ण रोजगार** (Full Employment) **:**

भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन हे उत्पादनाचे सर्व घटक जेव्हा उत्पादन प्रक्रियेत सहभागी असतात तेव्हा त्यास पूर्ण रोजगार प्रस्थापित झाला असे म्हणतात. देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे हे विकसित राष्ट्रातील चलनविषयक धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. कर (Tax), कर्ज (Public Debt), खर्च (Public Expenditure), अंदाजपत्रक (Budget) ही राजकोषीय धोरणाची साधने वापरून सरकार पूर्ण रोजगार प्रस्थापित

करण्याचा प्रयत्न करत असते. जगातील कोणत्याही राष्ट्राने अजून तरी पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट गाठलेले नाही. कारण हे उद्दिष्ट गाठणे एवढे सोपे नाही. तरीही राजकोषीय धोरणाच्या सहाय्याने देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न विकसित राष्ट्रे करत असतात. देशात पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे हे त्यांच्या राजकोषीय धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**३) आर्थिक वृद्धीच्या दरात वाढ घडवून आणणे :**

आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धी या दोन संकल्पना वेगवेगळ्या आहेत. वृद्धी (Growth) ही विकासानंतरची (Development) अवस्था आहे. आर्थिक विकास (Economic Development) ही संकल्पना अप्रगत, कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या संदर्भात वापरली जाते. तर आर्थिक वृद्धी (Economic Growth) ही संकल्पना विकसित राष्ट्रांच्या बाबतीत वापरली जाते. विकसित राष्ट्रांचा आर्थिक विकास पूर्ण झालेला असतो. त्यामुळे झालेला आर्थिक विकास कसा टिकवून ठेवायचा? ही त्यांच्यापुढे महत्त्वाची समस्या असते त्यासाठी विकसित राष्ट्रे राजकोषीय धोरणाचा अवलंब करत असतात. देशाचा आर्थिक विकास पूर्ण झाल्यानंतरसुद्धा राष्ट्रीय उत्पादनात, राष्ट्रीय उत्पन्नात जी वाढ घडून येते त्यास आर्थिक वृद्धी असे म्हणतात. आर्थिक विकासाच्या वृद्धीचा उच्च दर हे विकसित राष्ट्रांचे ठळक वैशिष्ट्य असते. या वैशिष्ट्यांमुळेच त्यांना प्रगत राष्ट्राचा (श्रीमंत राष्ट्राचा) बहुमान मिळालेला असतो. हा बहुमान टिकवून ठेवणे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. म्हणून झालेला प्रचंड आर्थिक विकास टिकवून ठेवणे आणि आर्थिक वृद्धीच्या दरात सतत वाढ घडवून आणणे यासाठी राजकोषीय धोरणाच्या विविध साधनांचा अवलंब सरकारकडून केला जातो.

**सारांश :** अशा प्रकारे विकसित राष्ट्रातील राजकोषीय धोरणाची प्रमुख उद्दिष्टे वरीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत. आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे, पूर्ण रोजगार प्रस्थापित करणे आणि आर्थिक वृद्धीच्या दरात वाढ घडवून आणणे ही प्रगत राष्ट्रातील राजकोषीय धोरणाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. प्रगत राष्ट्रे राजकोषीय धोरणाच्या साहाय्याने ही उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतात.

**(ब) अविकसित, कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रातील राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे :**

ज्या राष्ट्रांचा आर्थिक विकास झालेला नसतो किंवा ज्या राष्ट्रातील अर्थव्यवस्थेची प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय अशी तिन्ही क्षेत्रे मागसलेली असतात अशा राष्ट्रांना अविकसित राष्ट्रे (Undeveloped Countries / Backward Countries) असे म्हणतात. तर जी राष्ट्रे इंग्लंड, अमेरिकेप्रमाणे विकसित नसतात आणि मागासलेली / अप्रगत नसतात, त्या राष्ट्रांना विकसनशील राष्ट्रे (Developing Countries) असे म्हणतात. भारत, चीन ही राष्ट्रे विकसनशील आहेत. म्हणजे ज्या राष्ट्रांचा आर्थिक विकास पूर्ण झालेला नाही, जी राष्ट्रे विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहेत अशा राष्ट्रांना विकसनशील देश (Developing Countries) असे म्हणतात किंवा अशा देशांच्या अर्थव्यवस्थांना विकसनशील अर्थव्यवस्था (Developing Economy) असे म्हणतात. अविकसित किंवा कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रातील राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे असतात.

### १) दारिद्र्य निर्मूलन :

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण मोठे असते. दरिद्री लोकांचे उत्पन्न एवढे अपुरे असते की त्या उत्पन्नातून त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या प्राथमिक गरजासुद्धा पूर्ण होत नाहीत. अशा राष्ट्रात दारिद्र्याची समस्या सार्वत्रिक आणि जुनाट असते. दारिद्र्याची समस्या आर्थिक विकासाच्या मार्गात मोठा अडथळा निर्माण करते. दरिद्री लोकांची खरेदीशक्ती कमी असते. त्यामुळे अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील प्रभावी मागणी कमी असते. प्रभावी मागणी म्हणजे समाजाची वस्तू व सेवांची मागणी होय. प्रभावी मागणीत वाढ झाल्याशिवाय आर्थिक विकासाला चालना मिळत नाही. दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले की, प्रभावी मागणीत वाढ होऊन उत्पादनात, रोजगारात, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. त्यासाठी सरकार राजकोषीय धोरणात योग्य तो बदल करून त्याची अंमलबजावणी करते. गरीब, मध्यमवर्गीय लोकांकडून कमी दराने कर वसूल करणे, दरिद्री लोकांच्या रोजगार योजनावर मोठा खर्च करणे यामाध्यमातून सरकार गरीब किंवा दारिद्री लोकांची खरेदीशक्ती वाढवते. दरिद्री लोकांच्याकडून कमी कर घेतल्याने आणि त्यांना रोजगार पुरवल्याने गरीब/दरिद्री लोक पूर्वीपेक्षा अधिक वस्तू व सेवा खरेदी करू शकतात. त्यामुळे वस्तू व सेवांना मागणी वाढते. यालाच प्रभावी मागणीत वाढ होणे असे म्हणतात. प्रभावी मागणीत वाढ झाल्याने उत्पादकांना उत्पादन वाढीची प्रेरणा मिळते. त्यामुळे गुंतवणूक वाढून आर्थिक विकासाला चालना मिळते. अशा प्रकारे सरकारच्या करविषयक आणि खर्चविषयक धोरणामुळे दारिद्र्याचे प्रमाण कमी होते आणि दारिद्र्य कमी झाल्याने प्रभावी मागणी वाढून उत्पादन, गुंतवणूक, रोजगार या सर्व घटकात वाढ होऊन आर्थिक विकासाला चालना मिळते.

### २) बेरोजगारी कमी करणे :

कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे बेकारीची समस्या होय. अशा राष्ट्रात सर्वत्र मोठी बेकारी दिसते. कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रातील बेकारीची समस्या गंभीर आणि जुनाट असते. प्रचंड बेकारी हे अप्रगत आणि कमी विकसनशील अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य मानले जाते. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रातही प्रचंड बेकारी आढळते. कृषी, कारखानदारी, व्यापार व सेवा क्षेत्राचा अपुरा विकास, प्रचंड आकाराची लोकसंख्या, लोकसंख्या वाढीचा उच्च दर इत्यादी विविध कारणामुळे कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रात बेकारी आढळते. भारतासारख्या देशात तर कोट्यावधी लोक बेकारीशी सामना करत असतात. अप्रगत, अर्धविकसित राष्ट्रात शेकडो वर्षापासून बेकारीची समस्या अस्तित्वात आहे. बेकारी आर्थिक व सामाजिक विकासात मोठा अडथळा निर्माण करते. बेकारीमुळे देशातील चांगले मनुष्यबळ वाया जाते. बेरोजगारांचा (श्रमशक्तीचा / मनुष्यबळाचा) देशाच्या आर्थिक विकासासाठी वापर करून घेता येत नाही. बेकारीची समस्या गंभीर असेल तर सामाजिक स्वास्थ सुद्धा ढासळते. देशविघातक संघटना बेरोजगार लोकांचा उपयोग दंगली, जाळपोळ, सरकारविरुद्ध उठाव इत्यादीसाठी करतात. भारतात हे चित्र अधूनमधून दिसते. देशात बेकारीचे प्रमाण मोठे असेल तर समाजाची प्रभावी मागणी कमी राहते. प्रभावी मागणी म्हणजे समाजाची (देशातील लोकांची) वस्तू आणि सेवांना असणारी एकत्रित मागणी होय. बेकारीमुळे प्रभावी मागणी कमी राहून आर्थिक विकासाचा दरही कमी राहतो. कारण आर्थिक विकास ज्या विविध घटकावर

अवलंबून असतो त्यामध्ये प्रभावी मागणी हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. प्रभावी मागणी कमी असेल तर उत्पादन, गुंतवणूक, रोजगार यात घट होऊन आर्थिक विकासाचा दर कमी राहतो. अशा प्रकारे बेकारीचा आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होत असल्याने कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या सरकारांना बेकारी निर्मूलन कार्यक्रमावर भर द्यावा लागतो. त्यासाठी सुयोग्य राजकोषीय धोरण तयार करावे लागते. राजकोषीय धोरणाच्या साधनांचा (कर, कर्ज, खर्च, अंदाजपत्रक इत्यादी) वापर करून सरकार रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण करून देशातील बेरोजगारांचे प्रमाण कमी करू शकते. सरकारने कारखानदारांकडून कमी दराने करआकारणी केली, काही कर माफ केले तर कारखानदारांचा फायदा होऊन कारखानदार अधिक गुंतवणूक करतात. कारखान्यांचा विस्तार करतात. त्यामुळे रोजगार वाढण्यास मदत होते. सरकारने देशात ठिकठिकाणी औद्योगिक वसाहती उभ्या केल्या, रस्ते, वीज इत्यादी सोयीसाठी खर्च केला तर कारखानदारी क्षेत्राचा विकास होऊन रोजगारात वाढ होते. सरकारने परदेशातून कर्ज घेऊन रस्ते बांधणी, रेल्वे बांधणी, धरण बांधणी, वीजनिर्मिती इत्यादी प्रकल्पाावर खर्च केला तर रोजगार वाढीस मदत होते. रोजगार निर्मितीत (बेकारी कमी करण्यात) अंदाजपत्रकाची भूमिका सुद्धा अत्यंत महत्त्वाची असते. रोजगार निर्मितीसाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो. त्यासाठी सरकार आपले अंदाजपत्रक तुटीचे ठेवते. ज्या अंदाजपत्रकात सरकारने उत्पन्नापेक्षा खर्च अधिक दर्शवलेला असतो त्या अंदाजपत्रकाला तुटीचे अंदाजपत्रक (Dfeficit Budget) असे म्हणतात. तुटीचा अर्थभरणा करून विदेशातून कर्ज घेऊन आणि इतर मार्गांनी सरकार उत्पन्न खर्चातील तूट भरून काढते आणि अर्थव्यवस्थेत मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक खर्च करते. त्यामुळे रोजगार वाढण्यास मदत होते. रोजगारात वाढ झाली की प्रभावी मागणीत वाढ होते आणि प्रभावी मागणी वाढली की रोजगारात वाढ होते आणि देशाच्या आर्थिक विकासाच्या दरात वाढ होते. अशा प्रकारे राजकोषीय धोरणाच्या विविध साधनांचा वापर करून सरकार रोजगार संधीत वाढ करून आर्थिक विकासाला चांगली चालना देऊ शकते. म्हणून अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांनी बेकारी कमी करणे हे राजकोषीय धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट मानले आहे.

**३) महागाई / भाववाढ राखणे :**

आपल्या उत्पन्नातून वस्तू आणि सेवा खरेदी करणे लोकांना जिकिरीचे होते, उपभोग कमी करावा लागतो तेव्हा त्या परिस्थितीला महागाईची परिस्थिती किंवा भाववाढ (Inflation) असे म्हणतात. पैशाच्या पुरवठ्यातील वाढ, उत्पादनातील घट इत्यादी विविध कारणांनी भाववाढ किंवा महागाई होते. वस्तू व सेवांचा पुरवठा मागणीपेक्षा कमी पडतो तेव्हा महागाईची समस्या निर्माण होते. वस्तू व सेवांच्या किंमतीत सावकाश / संथ गतीने वाढ होत असेल तर अशा किंमतवाढीला भाववाढ म्हणत नाहीत. अशी किंमत वाढ आर्थिक विकासाला चालना देणारी असते. सौम्य किंमत वाढीमुळे उत्पादकांच्या, व्यापाऱ्यांच्या नफ्यात वाढ होते. त्यामुळे गुंतवणूक, उत्पादन, रोजगार इत्यादीमध्ये वाढ होऊन आर्थिक विकासाचा दर वाढतो. परंतु वस्तू व सेवांच्या किंमतीत वेगाने आणि जास्त वाढ झाली असेल तर त्यास महागाई किंवा भाववाढ असे म्हणतात. अशा महागाईचे अनेक आर्थिक आणि सामाजिक परिणाम उद्‌भवतात. म्हणून महागाई कमी करण्याला सरकारला

प्राधान्य द्यावे लागते. राजकोषीय धोरणाच्या साहाय्याने सरकारला वाढत्या महागाईवर / भाववाढीवर नियंत्रण ठेवता येते. भारतासारख्या अनेक विकसनशील राष्ट्रांच्या राजकोषीय धोरणाचे उद्दिष्ट महागाई रोखणे हे आहे. विकसनशील राष्ट्रांना महागाई रोखण्याला प्राधान्य द्यावे लागते. कारण अशा राष्ट्रात गरीब आणि मध्यमवर्गीयांचे प्रमाण जवळ जवळ ८० टक्के एवढे मोठे असते. म्हणून या राष्ट्रांना वाढत्या महागाईकडे दुर्लक्ष करून चालत नाही. विकसनशील राष्ट्रात आर्थिक विकासाचे कार्यक्रम जोरात चालू असतात. त्यामुळे पैशाचा पुरवठा वाढून महागाईची समस्या निमाण होत असते. तसेच अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील कृषी व इतर काही क्षेत्रांची उत्पादकता खूपच कमी असते. लोकसंख्या प्रचंड असते. त्यामुळे पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक राहून महागाई निर्माण होत असते. म्हणून महागाई रोखण्यासाठी अशा राष्ट्रांच्या सरकारांना कर, कर्ज, खर्च, अंदाजपत्रक इत्यादी राजकोषीय साधनांचा वापर करावा लागतो. काही वस्तूंच्या करात घट करणे, सरकारी खर्चात कपात करणे किंवा काही बाबीवरील सरकारी खर्च लांबणीवर टाकणे, देशांतर्गत कर्ज उभारणी करणे इत्यादी राजकोषीय उपायांचा अवलंब सरकार करते. जीवनावश्यक वस्तूंवरील करांच्या दरात घट केल्यामुळे वस्तूंच्या किंमती कमी होतात. त्यामुळे भाववाढ आटोक्यात येण्यास मदत होते. सरकार उत्पादक, व्यापारी यांच्याकडून काही कर वसूल करत असते. त्यामध्ये कपात करण्याचा निर्णय सरकारकडून घेतला जातो. त्यामुळे उत्पादकांकडून वस्तूंच्या किंमती कमी केल्या जातात. तसेच सरकारने खर्चात कपात केल्यामुळे पैशाचा पुरवठा घटून भाववाढ आटोक्यात येण्यास मदत होते. अशा प्रकारे देशात महागाई किंवा भाववाढीची समस्या निर्माण झाली असेल तर या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी सरकार कर, खर्च इत्यादी राजकोषीय साधनांचा वापर करते. सौम्य किंमतवाढीकडे सरकार लक्ष देत नाही. परंतु भाववाढीची / महागाईची समस्या खूपच गंभीर असेल तर मात्र सरकारला राजकोषीय धोरणाची साधने वापरून महागाई नाहीशी करावी लागते.

**४) आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी करणे :**

देशाची आयात जास्त आणि निर्यात कमी असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापारात तूट येते. यालाच तोट्याचा व्यापार किंवा प्रतिकूल व्यापारतोल असे म्हणतात. उदाहरणार्थ देशाची आयात १०,००० कोटी रुपयांची असेल आणि निर्यात ७००० कोटी रुपयांची असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट ३००० कोटी रुपयांची असेल. हे ३००० कोटी रुपये ज्या देशाकडून वस्तूंची आयात केली आहे त्या देशांना डॉलरच्या, सोन्याच्या स्वरूपात द्यावे लागतात. त्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज काढावे लागते. आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट प्रतिवर्षी वाढत असेल आणि ही तूट मोठी असेल तर त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचा असेल तर त्याचा देशाच्या विकासावर अनुकूल परिणाम होतो. भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार सन १९५१ पासून तुटीचाच आहे. कारण सन १९५१ पासून भारताने आर्थिक नियोजनाच्या मार्गाचा अवलंब केला असून पंचवार्षिक योजना राबवून विकास कार्यक्रमाला मोठी सुरवात केली आहे. त्यामुळे विदेशातून यंत्रसामग्री, यंत्रांचे सुट्टे भाग, कच्चे लोखंड, खनिज तेल, सिमेंट इत्यादी वस्तूंची आयात भारताला करावी लागत आहे. या आयातीत दिवसेंदिवस वाढच होत आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट दिवसेंदिवस वाढत आहे. बहुतेक सर्व विकसनशील राष्ट्रांना या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. कारण विकास

कार्यक्रमासाठी / विकास प्रकल्पासाठी त्यांना परदेशातून खते, सिमेंट, लोखंड, यंत्रे यांची आयात करावी लागते. आंतरराष्ट्रीय व्यापारात सतत तूट येत असेल तर देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो म्हणून प्रत्येक अप्रगत आणि विकसनशील देश आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी करण्याचा प्रयत्न करत असतो. त्यासाठी ही राष्ट्रे राजकोषीय धोरणाचा अवलंब करत असतात. देशाची आयात कमी झाल्यास आणि निर्यात वाढल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी होते. परंतु लोखंड, खते, यंत्रे, खनिज तेल इत्यादी वस्तूंची आयात कमी करता येत नाही. या वस्तूंची आयात कमी झाल्यास देशाच्या आर्थिक विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. म्हणून अशा आवश्यक वस्तूंच्या आयातीवरील कर (आयात शुल्क) वाढवता येत नाही. म्हणून आयात कमी करण्यासाठी सरकार चैनीच्या किंवा इतर अनावश्यक वस्तूंच्या आयातावरील करात (आयात शुल्कात) मोठी वाढ करते. त्यामुळे त्या वस्तूंच्या किंमती वाढून आयात कमी होण्यास मदत होते. कर धोरणाचा अवलंब करून सरकारला देशाची निर्यात वाढवता येते. निर्यातीत वाढ व्हावी यासाठी सरकार निर्यात करात (Expoert duty) कपात करते. त्यामुळे निर्यात स्वस्त होते. परदेशांकडून वस्तूंची मागणी वाढून निर्यात वाढते. ज्या वस्तूंचे उत्पादन देशात गरजेपेक्षा जास्त होते त्या वस्तूंच्या निर्यातीवरील शुल्कात (करात) सरकार घट करते. त्यामुळे त्या वस्तूंची निर्यात वाढण्यास मदत होते. तसेच निर्यात वाढावी यासाठी सरकार निर्यातप्रधान उद्योगांना (Export Oriented Industries) विशेष सवलती देते. निर्यात प्रधान उद्योगातील १०० टक्के उत्पादन हे निर्यात केले जाते. म्हणून त्या उद्योगांना सरकार विविध करात सवलती देते. या उद्योगांच्या उभारणीसाठी मदत करते. त्यासाठी खर्च करते. त्यामुळे निर्यात वाढण्यास मदत होते. विविध वस्तूंची आयात कमी व्हावी यासाठी सरकार आयात पर्यायी वस्तूंच्या उत्पादनाला प्रोत्साहन देते. अशा वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांना सरकार करात सवलती देते. त्यामुळे आयात पर्यायी वस्तूंचे उत्पादन वाढण्यास आणि आयात कमी होण्यास मदत होते. गॅस, खनिज तेल, रासायनिक खते या विविध वस्तूंची भारताला प्रचंड आयात करावी लागते. त्यामुळे आपला आंतरराष्ट्रीय व्यापार दरवर्षी तुटीचाच राहतो आणि ही तूट सतत वाढतच राहते. म्हणून आयात कमी करण्यासाठी सरकारने आयात पर्यायीकरणाला प्राधान्य दिले आहे. आयात वस्तूला पर्यायी वस्तू तयार करणाऱ्या उद्योगांना सरकारकडून कर सवलती, अनुदान आणि इतर मदत केली जाते. त्यामुळे आयातीचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. थोडक्यात आंतरराष्ट्रीय व्यापारातील सततच्या तुटीमुळे कर्जबाजारीपणा वाढून आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. म्हणून प्रत्येक देश आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी करण्याचा किंवा आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचा (अनुकूल) होण्यासाठी प्रयत्न करत असतो. त्यासाठी इतर विविध उपायाबरोबरच राजकोषीय धोरणाच्या साधनांचाही वापर केला जात असतो. राजकोषीय धोरण सुयोग्य असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापारातील तूट कमी करून आर्थिक विकासाला चालना देता येते.

**५) बचतीत वाढ घडवून आणणे :**

आर्थिक विकास ज्या विविध घटकावर अवलंबून असतो त्यामध्ये बचत (saving) हा एक महत्त्वाचा घटक आहे. बचतीतून भांडवलनिर्मिती होत असते. एकूण बचतीमधील जेवढ्या भागाचा विनियोग उत्पादक कार्यासाठी होतो त्याला भांडवल निर्मिती किंवा भांडवल संचय असे म्हणतात. अशा प्रकारे आर्थिक विकासात

बचतीची व भांडवल निर्मितीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात विविध कारणामुळे बचत आणि भांडवल निर्मितीचा दर कमी असतो. भांडवलनिर्मितीचा दर विविध घटकावर अवलंबून असतो. त्यामध्ये बचत हा एक महत्त्वाचा घटक आहे. देशातील लोकांची / समाजाची बचत वाढली की भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकासाला चांगली चालना मिळते. म्हणून अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील सरकारे बचत आणि भांडवलनिर्मितीचा दर वाढवण्यासाठी इतर उपायाबरोबर राजकोषीय धोरणाचा सुद्धा वापर करत असतात. लोक आपल्या उत्पन्नातून बचत करत असतात. उत्पन्नातून उपभोगावर खर्च केल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहते त्यास बचत असे म्हणतात. ही बचत वाढण्यासाठी लोकांच्या उत्पन्नात / दरडोई उत्पन्नात वाढ व्हावी लागते. तसेच लोकांना वस्तू आणि सेवा कमी किंमतीत मिळाव्या लागतात. लोकांचे उत्पन्न वाढावे आणि बचत वाढावी यासाठी सरकार नोकरदारांच्या पगारात वाढ करते. महागाई भत्ता, बोनस इत्यादीमध्ये वाढ करते. रोजगार योजनावरील खर्चात वाढ करते. अशा प्रकारे सरकार नोकरदारांच्या पगारावरील, महागाई भत्त्यावरील खर्चात वाढ करते. बोनसवरील खर्चात वाढ करते. त्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढून त्यांची बचत वाढते. शिवाय काही वस्तूवरील करांचे दर सरकार कमी करते. त्यामुळे लोकांना कमी दरात वस्तू मिळून त्यांची बचतक्षमता वाढते. अशा प्रकारे लोकांचे उत्पन्न आणि बचत वाढण्यासाठी सरकार नोकरदारांच्या पगारावरील व इतर खर्चात वाढ करते. रोजगार हमी योजनेसारख्या योजनावरील खर्चात वाढ करते. लोकांनी पोस्ट ऑफिस, विमा, बँका इत्यादीमध्ये केलेल्या बचतीचा विनियोग रस्ते, वीज, पाणीपुरवठा प्रकल्पासाठी करता येतो. त्यामुळे आर्थिक विकासाच्या दरात वाढ घडून येते. बचत आणि भांडवल निर्मितीत वाढ घडून आली तर आर्थिक विकासाला गती मिळते. राजकोषीय धोरणाच्या सहाय्याने बचत आणि भांडवल निर्मितीत वाढ घडवून आणता येते. म्हणून बचतीत वाढ घडवून आणणे हे अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांच्या राजकोषीय धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे.

**६) खाजगी गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे :**

देशाचा आर्थिक विकास हा खाजगी गुंतवणूकीवरही अवलंबून असतो. खाजगी गुंतवणूक म्हणजे देशातील शेतकरी, व्यापारी, कारखानदार आणि इतर व्यावसायिकांनी कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण, बांधकाम, हॉटेल इत्यादी विविध व्यवसायात केलेली गुंतवणूक होय. खाजगी गुंतवणूकीलाच खाजगी खर्च असेही म्हणतात. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात विविध कारणामुळे खाजगी गुंतवणूक कमी असते. त्यामुळे विकास प्रक्रिया सुरू करण्यासाठी किंवा गतिमान करण्यासाठी सरकारला खाजगी गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्याचे काम करावे लागते. त्यासाठी अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील सरकारे इतर धोरणाबरोबर राजकोषीय धोरणाचाही अवलंब करत असतात. राजकोषीय धोरणाच्या विविध साधनांचा वापर करून खाजगी गुंतवणूकीत वाढ घडवून आणता येते. त्यासाठी सरकार विविध करांचे दर कमी करते. जाचक कर काढून टाकते. काही कर काही वर्षापर्यंत माफ करते. आयात करात व निर्यात करात सवलती देते. त्यामुळे कारखानदार, बांधकाम व्यावसायिक, हॉटेल व्यावसायिक इत्यादींचा फायदा होतो. त्यांना अधिक गुंतवणूक करण्याची प्रेरणा मिळते. शिवाय सरकारने कर सवलती दिल्यामुळे नवीन व्यावसायिक पुढे येतात आणि नवीन कारखाने व इतर

उद्योग व्यवसाय सुरू करतात. त्यामुळे उत्पादन, रोजगार यात वाढ होऊन आर्थिक विकासाला चालना मिळते. कारखानदार आणि इतर व्यावसायिकाबरोबर सरकार शेतकऱ्यांनाही अनुदान, पीक विमा, कमी व्याजात कर्ज आणि कर्जमाफी इत्यादी विविध सुविधा देते. त्यावर प्रचंड खर्च करते. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती विकासाची प्रेरणा मिळून त्यांची कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढते. शेतीतील गुंतवणूक म्हणजे शेतकऱ्यांनी कृषी उत्पादकता वाढण्यासाठी शेतजमिनीची सुधारणा, बांधबंदिस्ती, जमिनीचे सपाटीकरण, शेततळ्यांची निर्मिती, सिंचनासाठी पाईपलाईन इत्यादीवर केलेला खर्च होय. त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास होऊन विविध प्रकारच्या कृषी उत्पादनात वाढ घडून येण्यास मदत होते. अशा प्रकारे देशातील कृषी, कारखानदारी, व्यापार, बांधकाम इत्यादी विविध क्षेत्रातील खाजगी गुंतवणूकीत वाढ झाल्यास देशाच्या आर्थिक विकासाला चांगली चालना मिळते. त्यासाठी म्हणजेच खाजगी गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यासाठी राजकोषीय धोरणाचा अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना चांगला उपयोग होतो.

**७) सरकारी गुंतवणूकीत वाढ घडवून आणणे :**

देशाचा आर्थिक विकास हा खाजगी गुंतवणूकीप्रमाणे सरकारी गुंतवणूकीवरही अवलंबून असतो. धरणे बांधण्यासाठी, रेल्वे प्रकल्प उभे करण्यासाठी, वीजनिर्मिती प्रकल्प उभे करण्यासाठी, मोठे व मूलभूत उद्योग उभे करण्यासाठी सरकार जो खर्च करते त्याला सरकारी खर्च किंवा सरकारी गुंतवणूक असे म्हणतात. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात खाजगी गुंतवणूक कमी असते. त्यामुळे जलद आर्थिक विकासासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागतो. त्यासाठी सरकार राजकोषीय धोरणाच्या विविध साधनांची अंमलबजावणी करते. सरकार आपले खर्चविषयक धोरण प्रभावीपणे राबवते. सरकारी खर्चात प्रचंड वाढ करते. तुटीचे अंदाजपत्रक तयार करून प्रचंड खर्च करते. देशात लहान, मध्यम आणि मोठ्या आकाराची धरणे बांधण्याचा कार्यक्रम सुरू करते. जुन्या रस्त्यांची दुरुस्ती, नव्या रस्त्यांची निर्मिती, रेल्वे मार्गाची उभारणी, लोखंड व पोलाद कारखान्यांची उभारणी इत्यादीवर प्रचंड खर्च करते. त्यामुळे सरकारी गुंतवणूक वाढून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. म्हणजेच आर्थिक विकासाला चालना मिळते. तसेच सरकार विदेशातून मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन कर्जाची रक्कम आर्थिक विकासासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या प्रकल्पांच्या उभारणीवर खर्च करते. त्यामुळे आर्थिक विकासाला मोठी चालना मिळते. प्रगत राष्ट्रांनीही सुरवातीच्या काळात सरकारी गुंतवणूकीवर मोठा भर दिला होता. प्रगत देशांची सरकारे आजही विविध क्षेत्रात गुंतवणूक करत असतात. सरकारी गुंतवणूकीची जास्त गरज प्रगत राष्ट्रापेक्षा अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना असते. त्यासाठी अशा राष्ट्रांना राजकोषीय धोरण अत्यंत उपयोगी पडते.

**८) प्रादेशिक विषमता कमी करणे :**

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे प्रादेशिक विषमतेची / प्रादेशिक असमतोलाची समस्या होय. अशा राष्ट्रातील काही प्रदेश इतर प्रदेशांच्या तुलनेत खूपच मागासलेले असतात. ही प्रादेशिक विषमता तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर आढळून येते. देशातील प्रादेशिक विषमता ही आर्थिक विकासात अडथळा उत्पन्न करते. प्रादेशिक विषमतेमुळे देशाच्या आर्थिक

विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. मागासलेल्या भागातील उत्पादन खूपच कमी होते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न कमी राहून आर्थिक विकासाचा दरही कमी राहतो. म्हणून आर्थिक विकासाच्या दरात वाढ घडवून आणण्यासाठी सरकारला प्रादेशिक विषमता कमी करावी लागते. त्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना केल्या जातात. विविध आर्थिक धोरणे आखली जातात. त्यामध्ये राजकोषीय धोरण हे एक महत्त्वाचे धोरण आहे. सरकार राजकोषीय धोरणाचा अवलंब करून मागासलेल्या भागांचा विकास करून प्रादेशिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न करते. मागासलेल्या भागात पुढाकार घेऊन विविध प्रकल्प उभे करणे, त्यावर पुरेसा खर्च करणे, खाजगी उद्योजकांनी मागास भागात उद्योग सुरू करावेत यासाठी त्यांना करात सवलती देणे, अनुदाने देणे इत्यादी उपायांचा अवलंब सरकार करते. देशातून आणि देशाबाहेरून कर्जउभारणी करून सरकार ती रक्कम देशाच्या मागास भागांच्या विकासासाठी खर्च करते. अशा प्रकारे प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी म्हणजेच मागास प्रदेशांच्या विकासासाठी सरकार कर, कर्ज आणि खर्च या विविध राजकोषीय साधनांचा वापर करते. राजकोषीय धोरणाची अंमलबजावणी योग्य प्रकारे केली तर प्रादेशिक विषमता कमी करता येते हे भारतासारख्या अनेक देशांनी दाखवून दिले आहे. हे राजकोषीय धोरणाचे महत्व आहे.

**९) आर्थिक विषमता कमी करणे :**

बहुसंख्य कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रात आर्थिक विषमता आढळते. आर्थिक विषमतेलाच उत्पन्नातील विषमता, मालमत्तेमधील विषमता किंवा संपत्तीमधील विषमता असे म्हणतात. ज्या देशात गरीब आणि श्रीमंत असे दोन वर्ग आढळतात त्यालाच आर्थिक विषमता असे म्हणतात. गरीबांची लोकसंख्या मोठी असते आणि श्रीमंतांची लोकसंख्या खूपच कमी असते. २० टक्के लोकांजवळ देशातील ८० टक्के संपत्ती असते. तर ८० टक्के लोकांच्याकडे देशातील २० टक्के संपत्ती असते. आर्थिक विषमता मोठी असेल, गंभीर स्वरूपाची असेल तर देशाच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो. आर्थिक विषमतेमुळे प्रभावी मागणी वाढत नाही. ज्या देशात आर्थिक विषमता असते त्या देशात गरीबांची लोकसंख्या मोठी असते. त्यामुळे प्रभावी मागणी कमी राहून राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय गुंतवणूक आणि एकूण रोजगार कमी राहतो. त्यामुळे आर्थिक विकासाचा दरही कमी राहतो. म्हणून देशातील आर्थिक विषमता कमी करावी लागते. त्यासाठी राजकोषीय धोरणाचा चांगला उपयोग होतो. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील सरकारे कर, कर्ज, खर्च इत्यादी विविध राजकोषीय साधनांचा वापर करून आर्थिक विषमता कमी करू शकतात. गरीबाकडून कमी दराने कर घेणे, गरीबांना काही कर माफ करणे, गरीबांना मोफत घरे बांधून देणे, मोफत वीज, मोफत प्रवास इत्यादी सुविधा पुरवणे हे उपाय सरकार योजते. त्यामुळे गरीबांची गरीबी कमी होण्यास मदत होते. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी सरकार श्रीमंतांकडून अधिक दराने कर आकारणी करते. उदाहरणार्थ, भारतात श्रीमंतांची श्रीमंती कमी करण्यासाठी संपत्ती कर, मालमत्ता कर, नफ्यावरील कर वसूल केले जातात आणि ही कराची रक्कम गरीबांच्या कल्याणासाठी खर्च केली जाते. अशा प्रकारे राजकोषीय साधनांचा वापर करून सरकारला आर्थिक विषमता कमी करता येते. म्हणून राजकोषीय धोरणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आर्थिक विषमता वाढीस लागू नये म्हणून विकसित राष्ट्रे सुद्धा राजकोषीय धोरणाचा अवलंब करत असतात.

**१०) पायाभूत सुविधामध्ये वाढ आणि सुधारणा :**

पायाभूत सुविधांना आधारभूत संरचना असे म्हणतात. ज्या सोयीसुविधावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो त्या सोयीसुविधांना पायाभूत सुविधा असे म्हणतात. पायाभूत सुविधा या आर्थिक आणि सामाजिक अशा प्रकारच्या असतात. शिक्षण, आरोग्य, वाहतूक, दळणवळण, वीज, पाणी इत्यादी सोयीसुविधांना आंतरसुविधा / पायाभूत सुविधा (Infrastructural Facilities) असे म्हणतात. ज्या देशांचा आर्थिक विकास झालेला नसतो त्या देशांनी सर्वप्रथम पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर, पायाभूत सुविधांच्या संख्यात्मक आणि गुणात्मक वाढीवर भर देणे आवश्यक असते. पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी प्रचंड खर्च करावा लागतो. खाजगी क्षेत्राजवळ तेवढे साहस आणि भांडवल नसते. सरकारलाच त्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो. शिक्षण, आरोग्य, वाहतूक, दळणवळण, वीज, पाणीपुरवठा इत्यादी सुविधा देशात पुरेशा प्रमाणात निर्माण झाल्या तर कृषी, उद्योग, व्यापार या क्षेत्रांच्या विकासाला चांगली चालना मिळते. कृषी आणि कारखानदारी क्षेत्रासाठी वीज, पाणी, वाहतूक सुविधा पुरेशा प्रमाणात असावी लागते. त्या सुविधांच्या निर्मितीसाठी सरकारने मोठ्या प्रमाणात खर्च करण्याचे धोरण अनुसरले तर शेतीचा विकास होतो. कारखानदारी क्षेत्राची वाढ होते. व्यापारात वाढ होते आणि आर्थिक विकासाला गती मिळते. म्हणून आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी अप्रगत राष्ट्रांना आणि आर्थिक विकासाला चांगली गती देण्यासाठी विकसनशील राष्ट्रांना पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर, वाढीवर आणि सुधारणेवर मोठा भर द्यावा लागतो. राजकोषीय धोरणाच्या साहाय्याने सरकारला हे शक्य होते. परदेशातून मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन त्या कर्जाचा विनियोग पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी सरकारला करता येतो. तसेच तुटीचे अंदाजपत्रक स्वीकारून सरकार उत्पन्नापेक्षा अधिक खर्च करण्याचे धोरण स्वीकारते. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात विविध मार्गांनी मिळणारा महसूल कमी असतो आणि खर्च मात्र प्रचंड करावा लागतो. त्यामुळे तुटीचे अंदाजपत्रक तयार करून, विदेशातून कर्ज घेऊन, तुटीचा अर्थभरणा करून सरकार तूट भरून काढते. अशा प्रकारे पायाभूत सुविधांची निर्मिती, वाढ आणि सुधारणा यासाठी राजकोषीय धोरणाचा सरकारला चांगला उपयोग होतो. हे राजकोषीय धोरणाचे महत्त्व आहे.

**११) नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करणे :**

बहुसंख्य अप्रगत किंवा कमी विकसित राष्ट्रात नैसर्गिक साधनसंपत्ती विपूल प्रमाणात आहे. या राष्ट्रांनी या साधनसामग्रीचा पुरेसा (पर्याप्त) वापर केला तर त्यांचा आर्थिक मागासलेपणा नष्ट होऊ शकतो. कारण आर्थिक विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्ती देशात मुबलक प्रमाणावर असावी लागते. तसेच या साधनसामग्रीचा वापरही पुरेशा प्रमाणात आणि चांगल्या प्रकारे करावा लागतो. नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये जमीन, पाणी, हवामान, भूगर्भातील खनिज संपत्ती, जंगल संपत्ती, समुद्र संपत्ती इत्यादींचा समावेश होतो. या साधनसंपत्तीचा राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी वापर करण्यासाठी अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रे राजकोषीय धोरणाचा वापर करू शकतात. राजकोषीय धोरणात योग्य ते बदल करून वापरात नसलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करता येतो आणि राष्ट्रीय उत्पादनात व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणून आर्थिक विकासाला चालना देता येते. सार्वजनिक खर्च (Public Expenditure) हे राजकोषीय धोरणाचे प्रमुख साधन आहे. सरकारी खर्च मोठ्या

प्रमाणात करून सरकारला पडीक जमीन लागवडीखाली आणता येते. लहान, मध्यम, मोठी धरणे बांधून पावसाचे वाया जाणारे पाणी अडवता येते. त्या पाण्याचा कृषी व कारखानदारी क्षेत्राला उपयोग होतो. तसेच परदेशातून अद्ययावत यंत्रसामग्री विकत आणून भूगर्भातील खनिज तेल, बॉक्साईट, लोखंड इत्यादी खनिज संपत्तीचे उत्खनन करून त्याचा उत्पादनासाठी वापर करता येतो. परदेशी सरकारे आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन त्याच्या सहाय्याने नैसर्गिक साधन संपत्तीचे उत्खनन करता येते. कारण नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करण्यासाठी प्रचंड पैसा लागतो. विदेशातून कर्ज घेऊन सरकार हा पैसा उभा करते आणि त्याचा विनियोग नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करण्यासाठी करते. अशा प्रकारे देशात विपुल प्रमाणात असणारी आणि पडून असणारी (वापरात नसणारी) नैसर्गिक साधनसंपत्ती खर्च (Public Expenditure) आणि कर्ज (Public Debt) या राजकोषीय साधनांच्या साहाय्याने वापरात आणता येते आणि देशाच्या आर्थिक विकासाला चालना देता येते.

**१२) देशाला आत्मनिर्भर, विकसित राष्ट्र बनवणे किंवा महासत्ता बनवणे :**

देशाला आत्मनिर्भर, विकसित राष्ट्र बनवणे, महासत्ता बनवणे हे भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांच्या राजकोषीय धोरणाचे प्रमुख आणि महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. सन १९४७ साली अप्रगत / मागासलेला असलेला भारत आज विकसनशील राष्ट्र बनला आहे. इतर उपायाबरोबर सुयोग्य राजकोषीय धोरणही त्यास कारणीभूत आहे. राजकोषीय धोरणाची, चलनविषयक धोरणाची, व्यापार धोरणाची व इतर आर्थिक धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी प्रभावीपणे आणि प्रामाणिकपणे केली तर देशाचा आर्थिक मागासलेपणा कमी करता येतो, देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करता येते, देशाच्या आर्थिक विकासाला चालना व गती देता येते हे भारतासारख्या अनेक देशांनी जगाला दाखवून दिले आहे. आज भारत पूर्वीसारखा अप्रगत किंवा मागासलेला राहिलेला नाही. जगातील एक प्रमुख विकसनशील राष्ट्र म्हणून भारत आज ओळखला जातो. आता भारताने देशाला आत्मनिर्भर, विकसित बनवणे, महासत्ता बनवणे हे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. त्यासाठी विविध धोरणे सरकारकडून राबवली जात आहेत. त्यामध्ये राजकोषीय धोरणाचा देखील समावेश आहे. राजकोषीय धोरणाच्या साहाय्याने देशाला आत्मनिर्भर (स्वावलंबी), विकसित (समृद्ध) आणि महासत्ता बनवण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. त्यासाठी कर (Tax), कर्ज (Public Borrowing), खर्च (Public Expenditure) आणि अंदाजपत्रक (Budget) या राजकोषीय साधनांचा वापर केला जात आहे. देशाला सर्व बाबतीत आत्मनिर्भर बनवण्यासाठी, विकसित बनवण्यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. पाकिस्तान, चीन ही भारताची शत्रूराष्ट्रे असून या राष्ट्रापासून देशाचे संरक्षण करण्यासाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागत आहे. सरंक्षण साहित्याच्या उत्पादनासाठी सरकारने आत्तापर्यंत प्रचंड खर्च केला असून दरवर्षी हा खर्च वाढतच आहे. काही युद्धसाहित्याची सरकारला परदेशातून आयात करावी लागते. विदेशी सरकारे, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन भारतासारखी राष्ट्रे युद्धसाहित्याची आयात करतात. तसेच कृषी, उद्योग इत्यादी क्षेत्रांना लागणारी यंत्रे, अद्ययावत तंत्रज्ञान, रासायनिक खते, लोखंड, सिमेंट यांच्या आयातीवर भारतासारखी विकसनशील राष्ट्रे अधिक खर्च करतात. परकीय कर्ज काढून हा खर्च करावा लागतो. कोणत्याही विकसनशील राष्ट्राला

आत्मनिर्भर, विकसित राष्ट्र बनवणे सोपे नाही. त्यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो आणि परकीय कर्जाचाही आश्रय घ्यावा लागतो. स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या बाबतीत (GDP) भारत आज जगातील चौथ्या क्रमांकाचे राष्ट्र बनले आहे. त्यामध्ये इतर आर्थिक धोरणाप्रमाणे राजकोषीय धोरणाची भूमिकाही महत्त्वाची राहिली आहे. अशा प्रकारे राजकोषीय धोरणाच्या खर्च, कर्ज, अंदाजपत्रक इत्यादी विविध साधनांचा वापर करून देशाला आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनवता येते.

**१३) परकीय गुंतवणूक आकर्षित करणे :**

देशाचा आर्थिक विकास ज्या अनेक घटकावर अवलंबून असतो त्यामध्ये परकीय गुंतवणूक (Foreign Investment) हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. परकीय गुंतवणूकीची गरज प्रामुख्याने अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना असते. कारण अशा देशात बचत आणि भांडवल निर्मितीचा दर कमी असतो. आर्थिक विकासासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. देशात खाजगी आणि सरकारी गुंतवणूक कमी असते. म्हणून गरीब व विकसनशील देशांना परकीय गुंतवणूकीची गरज असते. तसेच देशात उपलब्ध नसलेल्या उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाचीही देशाला गरज असते. परकीय गुंतवणूकीला, परकीय कंपन्यांना देशात गुंतवणूकीची परवानगी दिली तर परकीय भांडवलाबरोबर उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाचाही देशाला लाभ होतो. म्हणून अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रे परकीय गुंतवणूक आपल्या देशात येण्यासाठी धडपडत असतात. राजकोषीय धोरणात योगय ते बदल करून अशी राष्ट्रे विदेशी गुंतवणूक देशात आणण्यात यशस्वी होऊ शकतात. परकीय गुंतवणूक देशात पुरेशा प्रमाणात यावी यासाठी परकीय कंपन्यांना विविध प्रकारच्या करात सवलती द्याव्या लागतात. त्यामुळे परकीय कंपन्यासाठी सरकार उदार करधोरण स्वीकारते. त्यांना आयात निर्यात करात सवलती देते. तसेच उत्पन्न कर व इतर करात सवलती देते. त्यामुळे परकीय कंपन्यांना अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात गुंतवणूक करणे फायदेशीर होते. तसेच देशात रस्ते, वीज, पाणी, वाहतूक या सुविधा पुरेशा प्रमाणात आणि चांगल्या दर्जाच्या असतील तरच परकीय कंपन्या अप्रगत व विकसनशील राष्ट्रात गुंतवणूक करण्याचे धाडस करतात. म्हणून अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रे खर्चविषयक धोरणात बदल करून पायाभूत सुविधावर मोठा प्रमाणात खर्च करण्याचे धोरण अनुसरतात. त्यामुळे परकीय कंपन्यांना विकसनशील देशात गुंतवणूक करणे शक्य, फायदेशीर व सुरक्षित होते. तसेच देशात शांतता, कायदा व सुव्यवस्था असेल, हिसंक चळवळी, देशविघातक चळवळी अस्तित्वात नसतील तरच विदेशी कंपन्या अप्रगत व विकसनशील राष्ट्रात गुंतवणूक करण्याचे धाडस करतात. म्हणून अप्रगत व विकसनशील राष्ट्रांना लष्कर, पोलीस, न्यायालये यावर मोठा खर्च करण्याचे धोरण स्वीकारावे लागते. अशा प्रकारे अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रे राजकोषीय धोरणाच्या कर, खर्च इत्यादी साधनांचा वापर करून परकीय गुंतवणूक आकर्षित करू शकतात. हा राजकोषीय धोरणाचा एक अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**१४) इतर उद्दिष्टे :**

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांच्या सरकारांच्या राजकोषीय धोरणाची इतरही उद्दिष्टे असतात. ती उद्दिष्टे खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

१) क्षेत्रीय असमतोल कमी करणे - अप्रगत राष्ट्रात विकास होत असताना कारखानदारी आणि सेवा क्षेत्राची वेगाने प्रगती होत जाते. परंतु कृषी क्षेत्र काहीसे मागासलेले राहते. त्याला क्षेत्रीय असमतोल (Seetoral Imbalance) असे म्हणतात.

२) लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा व वाढ करणे.

३) अनावश्यक क्षेत्रातील गुंतवणूकीवर मर्यादा घालणे. समाजाच्या, राष्ट्राच्या दृष्टीने अनावश्यक क्षेत्रात होणारी गुंतवणूक आवश्यक क्षेत्राकडे वळवणे, तंबाखूच्या लागवडीखालील शेतीक्षेत्र कमी करण्यासाठी तंबाखूवर मोठ्या प्रमाणात कर आकारणे, तंबाखूची शेती करणाऱ्यांची सर्व अर्थसहाय्ये (अनुदाने) बंद करणे.

४) सामाजिक सुरक्षितता योजनांची अंमलबजावणी करणे / जनतेला सामाजिक सुरक्षितता प्राप्त करून देणे.

५) महिला सक्षमीकरण

६) काळ्या पैशाच्या वाढीला पायबंद घालणे.

७) सार्वजनिक क्षेत्र मजबूत करणे.

८) मानवी भांडवलाचा विकास घडवून आणणे.

### २.२.३ आर्थिक विकासात भांडवल संचयाची भूमिका (Role of Capital Formation in Economic Development) :

**प्रास्ताविक :**

सामान्य लोक पैशालाच भांडवल समजतात. पैसा म्हणजे भांडवल किंवा भांडवल म्हणजे पैसा असे त्यांना वाटते. परंतु अर्थशास्त्रात भांडवलाचा अर्थ खूप व्यापक आहे. मनुष्यनिर्मित उत्पादनाच्या साधनांना अर्थशास्त्रात भांडवल असे म्हटले जाते. गरीब राष्ट्रांच्या गरीबीचे प्रमुख कारण म्हणजे गरीब राष्ट्रात भांडवल निर्मितीचा दर खूपच कमी असणे होय. गरीब, अर्धविकसित आणि विकसनशील राष्ट्रात भांडवलाची खूपच कमतरता असते. अशा देशात भांडवलनिर्मितीचा दर (Rate of Capital Formation) कमी असतो. त्यामुळे आर्थिक विकासाचा दर (Rate of Growth of Economic Development) सुद्धा कमी असतो. आर्थिक विकासाची ठप्प असलेली प्रक्रिया सुरू करण्यासाठी देशात पुरेशा प्रमाणात भांडवल असणे आवश्यक असते. भांडवलनिर्मितीचा दर वाढल्यास देशाच्या आर्थिक विकासाचा दरसुद्धा वाढतो. म्हणून अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रे भांडवलनिर्मितीचा दर वाढावा यासाठी विविध उपाय योजत असतात.

**भांडवल संचय / भांडवलनिर्मिती म्हणजे काय?**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील भांडवलाचे महत्त्व अभ्यासण्यापूर्वी भांडवल किंवा भांडवलनिर्मिती

म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. विविध अर्थतज्ञांनी भांडवलाच्या आणि भांडवल संचयाच्या विविध व्याख्या दिल्या आहेत. त्या व्याख्यांच्या अभ्यासावरून भांडवलनिर्मितीचा अर्थ आपल्या लक्षात येईल. या व्याख्या पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

**१) प्रा. सिंगर (Prof. Singer) :**

प्रा. सिंगर यांची भांडवलनिर्मितीची व्याख्या पुढील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''भांडवलनिर्मितीमध्ये (भांडवल संचयामध्ये) दोन प्रकारच्या वस्तूंचा समावेश होतो. (१) अवजारे, यंत्रे आणि (२) उच्च दर्जाचे शिक्षण, आरोग्य, विज्ञान आणि संशोधन.''** (According to Prof. Singer, "Capital formation consists of both tangible goods like plants, tools and machinery and intangible goods like high standard of education, health, scientific tradition and research.")

**२) सर्वसाधारण व्याख्या :**

भांडवलाची सोपी, सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''भांडवल हा संपत्तीचा असा भाग असतो जो पुढील संपत्तीच्या उत्पादनासाठी वापरला जातो.''** (Capital may be defind as that part of wealth which is used or is intended to be used for further production of wealth.)

**३) कोलिन क्लार्क (Colin Clark) :**

कोलिन क्लार्क यांची भांडवलाची व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''उत्पादनाच्या निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या भांडवली वस्तू म्हणजे भांडवल किंवा भांडवल निर्मिती होय.''** (According to Prof. Colin Clark, "Capital goods are reproducible wealth used for the purpose of production.")

**४) संयुक्त राष्ट्र संघ (United Nations Orgasation) :**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अभ्यासगटाने भांडवलाची व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''भांडवली वस्तू म्हणजे अशा वस्तू की ज्या इतर वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरल्या जातात.''** (According to UNO, "As those goods resulting from economic activity which are used for the furture production of other goods.")

**सर्वसाधारण व्याख्या :**

भांडवलनिर्मितीची सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''अवजारे, यंत्रसामग्री, वीज, कारखाने, धरणे, कालवे या भांडवली वस्तूंच्या निर्मितीत वाढ करणे**

**म्हणजे भांडवलनिर्मिती होय.**'' (Capital formatin means making of more capital goods, such as, machines, tools, factories, canals, electricity etc.)

**रॅगनर नर्क्स (Ragnar Nurkse) :**

प्रा. रॅगनर नर्क्स यांनी भांडवलनिर्मितीची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''भांडवल निर्मितीमध्ये अवजारे, उपकरणे, यंत्रसामग्री, वाहतूक साधने इत्यादी भौतिक वस्तूंचा समावेश होतो.**'' (According to Prof. Nurkse, "The meaning of 'capital formation' is that society does not apply the whole of its current productive activity to the needs and desires of immediate consumption, but directs a part of it to the making of capital goods : tools and instruments, machines and transport facilities, plant and equipment all the various forms of real capital that can so greatly increase the efficacy of productive effort. The term is sometimes used to cover human as well as material capital. It can be made to include investment in skills, education and health - a very important form of investment.")

**प्रा. सायमन कुझनेटस् (Simon Kuznets) :**

सिंगर (Singer) आणि कुझनेटस् (Kuznets) यांची भांडवलनिर्मितीची व्याख्या नर्क्स (Nurkse) आणि इतरांच्या व्याख्येपेक्षा व्यापक आहे. नर्क्स यांनी भांडवलामध्ये किंवा भांडवलनिर्मितीमध्ये मानवी भांडवलाचा विचार केलेला नाही. परंतु कुझनेटस् यांनी भांडवलनिर्मितीमध्ये / भांडवलामध्ये भौतिक भांडवलाबरोबर मानवी भांडवलाचासुद्धा विचार केला आहे. कुझनेटस् यांची भांडवलनिर्मितीची व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''देशांतर्गत भांडवलनिर्मितीमध्ये केवळ बांधकाम, उपकरणे यांचाच समावेश होत नाही तर शिक्षण, करमणूक, आराम इत्यादीवरील खर्चाचा सुद्धा समावेश होतो. यामुळे उत्पादकतेत वाढ होते आणि आरोग्यात सुधारणा होते. समाजाकडून केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या खर्चामुळे काम करणाऱ्या लोकांची नैतिकता वाढते.**'' (According to Prof. Simon Kuznets, "Domestic capital formation would include not only additions to constructions, equipment and inventories within the country, but also other expenditure, except those necessary to sustain output at existing levels. It would include outlays on eduction, rrecreation and material luxuries that contribute to the greater health and productivity of individulals and all expenditures by society that serve to raise the morale of employed population.")

भांडवलाच्या आणि भांडवलनिर्मितीच्या वरील विविध व्याख्यावरून आपणास भांडवलाची किंवा भांडवलनिर्मितीची काही ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील. ती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहेत.

१) भांडवल हे मनुष्यनिर्मित असते. जमीन या उत्पादन घटकाप्रमाणे ते निसर्गनिर्मित नसते. भांडवलाची किंवा भांडवली साधनांची निर्मिती मनुष्य करत असतो.

२) एखाद्या देशातील भूमीचा किंवा जमिनीचा पुरवठा अलवचिक असतो. त्यात वाढ करता येत नाही. जमिनीचा पुरवठा वाढवता येत नाही. परंतु भांडवलाच्या साठ्यात वाढ करता येते. प्रयत्न करून भांडवलाचा पुरवठा वाढवता येतो. भूमी प्रमाणे भांडवलाचा पुरवठा अलवचिक नसतो.

३) मनुष्याने उत्पादित केलेल्या उत्पादनाच्या साधनांना (अवजारे, उपकरणे, यंत्रे, हत्यारे इत्यादी) भांडवल असे म्हणतात.

४) भांडवलामध्ये केवळ भौतिक वस्तूंचा समावेश होत नाही तर मानवी भांडवलाचा सुद्धा समावेश होतो. (Capital formation consists of both material capital and human capital.)

५) भूमी, श्रम, संयोजन या उत्पादन घटकाप्रमाणे भांडवल हा सुद्धा उत्पादनाचा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. इतर उत्पादन घटकाप्रमाणे आर्थिक विकासात भांडवलाची भूमिका खूप महत्वाची असते.

**भांडवलनिर्मितीची प्रक्रिया / भांडवल निर्मितीचे टप्पे** (Process of Capital Formation / Stages of Capital Formation) **:**

भांडवलनिर्मितीची प्रक्रिया कशी होते ते खालील मुद्द्यांच्याद्वारे स्पष्ट केले आहे. यालाच भांडवलनिर्मितीचे टप्पे असेही म्हणतात.

**१) बचत निर्मिती** (Creation of Savings) **:**

बचतीतून भांडवल निर्मिती होते. म्हणून भांडवलनिर्मितीसाठी देशात बचत निर्माण होणे आवश्यक असते. बचतनिर्मितीचा दर जितका जास्त तितका भांडवलनिर्मितीचा दर जास्त राहतो. देशातील लोकांकडून किंवा समाजाकडून बचत केली जाते. लोक आपल्या उत्पन्नातील काही हिस्सा उपभोगावर (वस्तू आणि सेवांच्या खरेदीवर) खर्च करतात आणि राहिलेल्या पैशाची बँकेत, पोस्ट ऑफिस, विमा केंद्रे इत्यादी ठिकाणी बचत करतात. अशा प्रकारे मिळालेल्या एकूण उत्पन्नातून उपभोगावर खर्च केल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहते त्यास बचत (Saving) असे म्हणतात. या बचतीवरच भांडवलनिर्मिती अवलंबून असते. बचतीचा जो भाग उत्पादक कामासाठी वापरला जातो त्यास भांडवलनिर्मिती असे म्हणतात. देशात बचतीचे प्रमाण वाढले की भांडवलनिर्मितीचा दर वाढतो. म्हणून देशात सतत बचतीत वाढ होणे आवश्यक असते. लोकांनी अधिकाधिक बचत करावी यासाठी लोकांना बचतीच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतात. पोस्ट कार्यालये, बँका, पतसंस्था देशात पुरेशा प्रमाणात असतील तर लोक घरात बचत न करता या ठिकाणी बचत करतात. बचत करण्याच्या क्षमतेवरही लोकांची बचत अवलंबून असते. बचत करण्याची क्षमता जितकी जास्त तितकी बचत अधिक राहून भांडवलनिर्मितीही अधिक राहते. लोकांची बचत क्षमता ही लोकांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. लोकांचे उत्पन्न जितके जास्त तितकी लोकांची बचत अधिक राहते. लोकांची बचत क्षमता वाढावी यासाठी लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली पाहिजे. लोकांचे उत्पन्न वाढावे यासाठी देशात पुरेशा प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या पाहिजेत. बचत आणखी एका घटकावर अवलंबून असते आणि तो घटक म्हणजे बचत करण्याची लोकांची इच्छा असली पाहिजे. बचत करण्याची इच्छा हा घटक खूप महत्त्वाचा आहे. देशातील लोकांची

बचत करण्याची इच्छा जितकी प्रबळ तितकी बचत अधिक केली जाते. कित्येक लोक बचत करण्यासाठी उपभोगात कपात करतात. काटकसर करतात. अशा प्रकारे खर्चात काटकसर करून किंवा उपभोगात कपात करून कित्येक लोक बचत करत असतात. बचत करण्याची इच्छा प्रबळ असेल तर बचतीचे प्रमाण वाढते. अशा प्रकारे लोकांची (१) बचत करण्याची क्षमता, (२) बचतीच्या सुविधा आणि (३) लोकांची बचत करण्याची इच्छा, तयारी या विविध बाबींवर देशातील बचतीचे प्रमाण अवलंबून असते. बचतनिर्मितीचा दर जितका जास्त तितका भांडवलनिर्मितीचा दर अधिक राहतो.

**२) बचत गोळा करणे / बचतीचे एकत्रीकरण** (Mobilisation of Savings) **:**

गुंतवणूकीसाठी देशातील बचत गोळा करणे किंवा बचतीचे एकत्रीकरण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात बचतीचे प्रमाण कमी असते आणि बचत सर्वत्र विखुरलेली असते. अशा राष्ट्रातील बचत गोळा करण्यासाठी देशात बँकिंग व्यवस्था मजबूत असावी लागते. बचत गोळा करण्यासाठी बँका, वित्तीय संस्था असाव्या लागतात आणि बँकिंग व्यवस्था कार्यक्षम असावी लागते. परंतु अप्रगत देशातील बँकिंग व्यवस्था फारशी चांगली नसते. त्यामुळे बचत गोळा करण्यासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागतो. गावोगावी डाक कार्यालये (Post offices) उघडून सरकारला बचतीची सुविधा उपलब्ध करून द्यावी लागते.

**३) बचतीची गुंतवणूक :**

गोळा केलेल्या बचतीची गुंतवणूक करणे हा भांडवलनिर्मितीच्या प्रक्रियेतील तिसरा आणि अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील बचत करणाऱ्या श्रीमंत लोकापैकी बहुतेकजण अनावश्यक गुंतवणूक करत असतात. दागिण्यांच्या किंवा सोन्याच्या खरेदीत बचत गुंतवली जाते. उत्पादक कार्यात बचत गुंतवली तरच भांडवलनिर्मिती होते किंवा उत्पादनात वाढ होऊन आर्थिक विकासाचा दर वाढतो. बचत केलेल्या रकमेतून उत्पादक कार्ये केल्यास उत्पादनात व रोजगारात वाढ होते. म्हणून भांडवलनिर्मिती घडून येण्यासाठी आणि आर्थिक विकासासाठी बचतीची सर्व रक्कम उत्पादक कार्यातच गुंतवली पाहिजे. अशा प्रकारे बचतीची गुंतवणूक उत्पादक कार्यात केली की भांडवलनिर्मिती घडून येते. म्हणून भांडवलनिर्मिती केवळ बचतीवर अवलंबून नसते. तर बचतीचा जेवढा भाग उत्पादक कार्यात गुंतवला जातो त्यावर अवलंबून असते.

सारांश, अशा प्रकारे (१) बचतीची निर्मिती (Creation of savings), (२) बचती गोळा करणे (Mobilisation of savings) आणि (३) बचतीची गुंतवणूक (Investment of savings) या तीन घटकांचा समावेश भांडवलनिर्मितीच्या प्रक्रियेत होतो. यालाच भांडवलनिर्मितीचे टप्पे असे म्हणतात.

**आर्थिक विकासात भांडवलनिर्मितीची भूमिका / भांडवलनिर्मितीचे महत्त्व किंवा फायदे** (Role of Capital Formation in Economic Development / Significance of Capital Formation) **:**

**प्रास्ताविक :**

ज्या राष्ट्रात आर्थिक विकासाची प्रक्रिया पूर्ण झालेली नसते किंवा ज्या राष्ट्रांचा आर्थिक विकास झालेला

नसतो अशा राष्ट्रांना गरीब राष्ट्रे (Poor Countries), अप्रगत राष्ट्रे (Undeveloped Countries / Backward Countries), कमी विकसित राष्ट्रे (Less Developed Countries), अर्धविकसित राष्ट्रे (Underdeveloped Countries) आणि विकसनशील राष्ट्रे (Developing Countries) असे म्हणतात. अशा देशांच्या आर्थिक विकासात भांडवलाची / भांडवल संचयाची / भांडवलनिर्मितीची भूमिका खूप महत्त्वाची असते. बचत आणि भांडवलनिर्मितीचा कमी दर हे गरीब, अप्रगत देशांच्या गरीबीचे, मागासलेपणाचे प्रमुख कारण असते. म्हणून अशा देशांना विकासासाठी भांडवलाची खूप गरज असते. कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांत भांडवलनिर्मितीचा दर सतत वाढता पाहिजे. तरच अशा राष्ट्रातील बेकारी, दारिद्र्य, कमी राष्ट्रीय उत्पन्न या समस्यांचे निर्मूलन होऊन आर्थिक विकासाच्या दरात वाढ घडून येऊ शकते. गरीब राष्ट्रांच्या आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासातील भांडवलनिर्मितीचे महत्त्व पुढील मुद्द्यांच्याद्वारे स्पष्ट केले आहे.

**१) शेतीचा विकास :**

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील शेती प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत खूपच मागासलेली असल्याचे दिसते. अशा राष्ट्रातील शेतीची उत्पादकता कमी असते. त्यामुळे आर्थिक विकासाचा दर कमी असतो. आर्थिक विकास इतर क्षेत्राप्रमाणे शेती क्षेत्रावरही अवलंबून असतो. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी शेती क्षेत्रात पुरेशी गुंतवणूक केली तर शेतीची उत्पादकता वाढून एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. भारतासारख्या अनेक देशांनी जगाला हे दाखवून दिले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी म्हणजे सन १९४७ साली भारतीय शेती खूपच मागासलेली होती. म्हणून कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सरकारने प्रचंड गुंतवणूक केली. १९६० नंतर देशात हरित क्रांती घडवून आणली. हरित क्रांती घडवून आणण्यासाठी प्रचंड भांडवलाची गुंतवणूक केली. त्यामुळे भारत आज अन्नधान्याच्या आणि इतर अनेक कृषी उत्पादनांच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. सन १९४७ च्या तुलनेत आज भारतीय शेतीची उत्पादकता खूपच वाढली आहे. प्रचंड भांडवली गुंतवणूकीमुळेच हे शक्य झाले आहे. असे असले तरी विकसित राष्ट्रांच्या तुलनेत भारतीय शेतीची उत्पादकता आजही कमी आहे. एवढेच नाही तर काही कृषी उत्पादनांच्या बाबतीत चीनसारख्या विकसनशील राष्ट्रापेक्षा आपल्या शेतीची उत्पादकता कमी आहे. आणखी पुरेशी भांडवलाची गुंतवणूक करून आपल्या शेतीची उत्पादकता वाढवता येणे शक्य आहे. भारतीय शेतीत गुंतवणूकीला आजही खूप मोठा वाव आहे. खाजगी आणि सरकारी गुंतवणूकीत जसजशी वाढ होत जाईल तसतशी शेतीची उत्पादकता वाढून आर्थिक विकासाचा वेग वाढणार आहे. शेती क्षेत्रात पुरेशी भांडवल गुंतवणूक केली असता शेतीचा मागासलेपणा दूर होतो आणि कृषी उत्पादनात वाढ होऊन आर्थिक विकासाला चांगली चालना मिळते. म्हणून अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात भांडवलनिर्मितीचा दर अधिक असणे आवश्यक आहे.

**२) औद्योगिक क्षेत्राचा विकास :**

औद्योगिक क्षेत्रास कारखानदारी क्षेत्र असेही म्हणतात. औद्योगिक क्षेत्रात लहान, मध्यम आणि मोठ्या आकाराच्या उद्योगांचा / कारखान्यांचा समावेश होतो. देशाचा आर्थिक विकास हा औद्योगिक विकासावरही अवलंबून असतो. म्हणून अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना जलद आर्थिक विकासासाठी कृषी क्षेत्राबरोबर

औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडेही चांगले लक्ष द्यावे लागते. कृषी क्षेत्राप्रमाणे अप्रगत राष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रसुद्धा मागासलेले असते. औद्योगिक क्षेत्रात फारच कमी भांडवल गुंतवणूक केली जात असल्याने अप्रगत राष्ट्रे विकासाच्या बाबतीत मागासलेली राहिली आहेत. भारताला सन १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताचे औद्योगिक क्षेत्र खूपच मागासलेले होते. इंग्रजांचे औद्योगिक धोरण भारताच्या फायद्याचे नव्हते. ते इंग्लंडच्या फायद्याचे होते. त्यामुळे भारतातील लघु आणि कुटिरउद्योगांचा ऱ्हास झाला. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. औद्योगिक क्षेत्रात खाजगी, सरकारी, विदेशी भांडवल गुंतवणूक वाढेल याकडे लक्ष दिले. भांडवलनिर्मितीचा मंद वेग हेच औद्योगिक क्षेत्राच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण असते. म्हणून औद्योगिक क्षेत्राचा मागासलेपणा घालवण्यासाठी भांडवलनिर्मितीचा दर उच्च असणे आवश्यक असते. देशातील भांडवलनिर्मितीचा दर उच्च असेल तर मोठे (अवजड), मूलभूत किंवा पायाभूत उद्योगांची उभारणी करता येते. मोठ्या अवजड उद्योगात तयार होणाऱ्या वीज, लोखंड, पोलाद या वस्तूपासून विविध वस्तू तयार करणारे लहान, मध्यम कारखाने खाजगी क्षेत्रात देशात स्थापन होतात. त्यामुळे कारखानदारी क्षेत्राच्या / औद्योगिक क्षेत्राच्या विकासास चालना मिळते. भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बचत आणि भांडवलनिर्मितीकडे विशेष लक्ष दिले. त्यासाठी विविध उपाय योजले. त्यामुळे भांडवलनिर्मिती आणि भांडवलाची गुंतवणूक औद्योगिक क्षेत्रात वाढण्यास मदत झाली. स्वातंत्र्योत्तरकाळात देशात भांडवलनिर्मितीचा दर वाढल्यानेच अप्रगत किंवा मागासलेले असलेले औद्योगिक क्षेत्र आज चांगली प्रगती करत असलेले दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने औद्योगिक क्षेत्रात चांगली प्रगती केली असली तरी आजही औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करण्यास चांगला वाव आहे. त्यासाठी भांडवलनिर्मितीच्या दरात (भांडवल संचयात) वाढ होणे आवश्यक आहे. भारत, चीन सारख्या अनेक राष्ट्रांनी औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करून औद्योगिक क्षेत्राचा मागासलेपणा घालवला आहे. अशा प्रकारे औद्योगिक क्षेत्राचा मागासलेपणा नष्ट करण्यासाठी देशांतर्गत भांडवलनिर्मितीचा दर उच्च असणे आवश्यक आहे.

**३) नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर :**

भांडवलनिर्मितीचा दर उच्च असण्याचा आणखी एक फायदा म्हणजे त्यामुळे देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर आणि चांगला वापर करता येतो. आर्थिक विकास हा जमीन, पाणी, हवामान, जंगले, खनिज तेल, दगडी कोळसा व इतर खनिज संपत्ती आणि समुद्रसंपत्तीवर अवलंबून असतो. ही साधनसंपत्ती देशात पुरेशा प्रमाणात असावी लागते आणि त्या साधनसामग्रीचा पर्याप्त (पुरेसा) आणि चांगला (योग्य) वापर करावा लागतो. तरच देशाचा आर्थिक विकास घडून येतो. देशात केवळ नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात असून चालत नाही तर त्या साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करता यावा यासाठी देशांतर्गत बचत आणि भांडवलनिर्मितीचा दर चांगला असावा लागतो. नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करण्यासाठी यंत्रसामग्री, अद्ययावत / आधुनिक तंत्रज्ञान आवश्यक असते. त्यासाठी अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना भांडवलाची मोठी गरज असते. भारतात नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात असूनही सन १९४७ पर्यंत भारत मागासलेला देश होता. पुढे जवळ जवळ ३०-३५ वर्षे १९८०-८५ पर्यंत भारत मागासलेलाच होता. कारण भांडवलनिर्मितीचा दर कमी असल्याने

नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर देशाला करता येत नव्हता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील भांडवलनिर्मितीच्या दरात जसजशी वाढ होत गेली तसतसा नैसर्गिक साधनसंपत्तीचा (जमिनीचा, पाण्याचा, खनिज संपत्तीचा) वापर वाढत गेला. त्यामुळे कृषी, कारखानदारी इत्यादी क्षेत्रांच्या विकासाला सुरवात झाली. स्वातंत्र्योत्तरकाळात भारतातील भांडवली वस्तूंच्या साठ्यात / भांडवलनिर्मितीत वाढ होत गेली. त्यामुळे भारत संपूर्ण देशभरात नद्यावर लहान, मध्यम, मोठी अशी शेकडो धरणे बांधू शकला. आजही भारताला धरणांची गरज आहे. पावसाचे पाणी समुद्रात मोठ्या प्रमाणात वाहून जाते. वाया जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण भारतात जास्त आहे. ते अडवले तर देशातील जास्तीत जास्त शेतजमिनीला सिंचनाची सोय होऊन कृषी उत्पादनात वाढ होऊ शकेल. तसेच कारखानदारी क्षेत्राला पाणी मिळून कारखानदारी क्षेत्राचीही वेगाने प्रगती होऊ शकेल. त्यासाठी भांडवलनिर्मितीचा दर वाढणे आवश्यक आहे. अशा प्रकारे देशात भांडवलनिर्मितीचा दर चांगला असेल तर जमीन, पाणी, हवामान, जंगले, खनिजे इत्यादी नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेसा वापर करता येतो आणि आर्थिक विकासाच्या दरात वाढ घडवून आणता येते. नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात असूनही काही राष्ट्रे अप्रगत राहिली किंवा मागासलेली राहिली. याचे प्रमुख कारण त्यांच्याकडे भांडवलाची प्रचंड कमतरता होती. त्यांच्या देशात भांडवलनिर्मितीचा दर अत्यंत कमी होता. अशा प्रकारे अप्रगत राष्ट्रांना आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी आणि विकसनशील राष्ट्रांना आर्थिक विकासाचा वेग वाढविता यावा यासाठी भांडवलनिर्मितीचा दर चांगला व वाढता असला पाहिजे.

**४) बेकारीचे प्रमाण करणे :**

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात बेकारीचे प्रमाण खूप मोठे असते. भारत हे विकसनशील राष्ट्र असूनही भारतात बेकारीची समस्या गंभीर आहे. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात कृषी क्षेत्रात छुपी बेकारी अस्तित्वात असते. छुप्या बेकारीला सुप्त बेकारी, अदृश्य बेकारी, प्रच्छन्न बेकारी (Disguised Unemployment) असे म्हणतात. अशा प्रकारच्या बेकारीमुळे उत्पादनात वाढ होत नाही. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात छुपी बेकारी, उघड बेकारी, अर्थ बेकारी, ग्रामीण बेकारी, शहरी बेकारी अशी विविध प्रकारची बेकारी आढळते. देशात बेकारीची समस्या गंभीर असेल किंवा देशात बेरोजगारांची संख्या प्रचंड असेल तर ही बेकारी आर्थिक विकासात अडथळा निर्माण करते. म्हणून अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना बेकारी निर्मूलनाच्या उद्दिष्टाला प्राधान्य द्यावे लागते. बेकारीमुळे चांगले मनुष्यबळ वाया जाते. या उत्पादक लोकसंख्येचा (बेकारांचा) देशाच्या आर्थिक विकासासाठी वापर करून घेता येत नाही. त्यामुळे कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासाचा दर वाढत नाही. बेरोजगारांचा आर्थिक विकासासाठी वापर करता यावा यासाठी अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात क्षेत्रात भांडवलाची गुंतवणूक वाढली पाहिजे. कृषी, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण इत्यादी विविध क्षेत्रात भांडवलाची गुंतवणूक वाढल्याशिवाय बेकारी कमी होत नाही. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रात भांडवलनिर्मितीचा दर कमी असल्याने विविध क्षेत्रातील भांडवलाची गुंतवणूक कमी आहे. भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ घडून आली तर गुंतवणूक वाढून रोजगारातही वाढ घडून येईल. बेरोजगारांचा उत्पादन कार्यासाठी वापर करता येईल. त्यामुळे आर्थिक विकास दरात वाढ घडून येईल.

स्वातंत्र्योत्तरकाळात भारतात  भांडवलनिर्मितीच्या दरात आणि भांडवल गुंतवणूकीत वाढ होऊनही बेकारीची समस्या गंभीर दिसते. याचे कारण प्रचंड वेगाने वाढणारी लोकसंख्या हे आहे. सन १९४७ साली भारताची लोकसंख्या ४० कोटी होती. आज ती सुमारे १४० कोटी एवढी आहे. १९४७ च्या तुलनेत लोकसंख्या आज तिपटीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे भारताने १९४७ पासून अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करूनही बेकारीचे निराकरण न होता बेकारीची समस्या गंभीरच बनत चालली आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या, संगणकीकरण, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, आधुनिकीकरण किंवा यांत्रिकीकरण यामुळे भांडवलाची प्रचंड गुंतवणूक होत असतानाही बेकारी दिसून येते. त्यामुळे भारतातील बेकारीला भांडवलाची कमतरता किंवा भांडवलाची कमी गुंतवणूक हा एकमेव घटक कारणीभूत नाही. लोकसंख्या वाढीचा दर घटत गेला आणि भांडवलनिर्मितीचा दर वाढत गेला तर बेकारीची समस्या सोडवता येईल आणि आर्थिक विकासाचा वेग वाढवता येईल. बेरोजगारांना रोजगार मिळाल्यास त्यांची खरेदीशक्ती वाढते. त्यांची वस्तू आणि सेवांची मागणी वाढते. त्यामुळे उत्पादनवाढीला चालना मिळून राष्ट्रीय उत्पादनात, राष्ट्रीय उत्पन्नात, रोजगारात आणि गुंतवणूकीत वाढ होऊन आर्थिक विकासाला चालना मिळते. अशा प्रकारे बेकारांना रोजगार पुरवल्याने वाया जाणाऱ्या मनुष्यबळाचा देशाच्या विकासासाठी वापर करता येतो. तसेच बेकारांना रोजगार मिळाल्याने त्यांची खरेदीशक्ती वाढून प्रभावी मागणीत (वस्तू व सेवांच्या एकूण मागणीत) वाढ होऊन विकासाला गती मिळते. म्हणून अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी आर्थिक विकासासाठी बेकारी निर्मूलनाच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले पाहिजे. त्यासाठी भांडवलनिर्मितीचा दर वाढेल याची काळजी घेतली पाहिजे.

**५) दारिद्र्याचे निराकरण :**

अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे दारिद्र्याची समस्या होय. ज्या लोकांना आपल्या उत्पन्नातून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या प्राथमिक / मूलभूत गरजा भागवता येत नाहीत त्या लोकांना दरिद्री लोक किंवा गरीब लोक असे म्हणतात. अप्रगत राष्ट्रात गरीब लोकांची संख्या ८० टक्के पर्यंत असते तर विकसनशील राष्ट्रात गरीब लोकांचे प्रमाण २० टक्के ते ४० टक्के एवढे असते. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी भारतात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण सुमारे ८० टक्के होते. आज ते २५ टक्क्यांच्या खाली आले आहे. स्वातंत्र्योत्तरकाळात सरकारने विविध क्षेत्रात केलेल्या गुंतवणूकीमुळे, खाजगी गुंतवणूकीमुळे लोकांना रोजगार मिळत गेला. त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण आज २० ते २५ टक्के एवढे दिसते. एकूण १४० कोटी लोकसंख्येचा विचार करता दारिद्र्याचे हे प्रमाण मोठेच आहे. २५ टक्क्याप्रमाणे १४० कोटीपैकी ३५ कोटी लोक भारतात दरिद्री आहेत. देशात दारिद्र्याचे प्रमाण मोठे असेल तर राष्ट्राच्या आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. दरिद्री लोकांचा उपभोगावर खर्च जास्त असतो. त्यामुळे त्यांची बचत जवळजवळ शून्य असते. त्यामुळे भांडवलनिर्मितीचा दरही कमी राहतो. देशातील दारिद्र्य नष्ट झाले तर देशातील एकूण बचत वाढते. त्यामुळे भांडवलनिर्मितीचा दर वाढण्यास मदत होते. देशातील दारिद्र्याच्या निराकरणासाठी विविध क्षेत्रात भांडवलाची गुंतवणूक पुरेशा प्रमाणात होणे आवश्यक असते. त्यासाठी देशात भांडवलनिर्मितीचा दर चांगला असणे आवश्यक असते. भांडवलसंचयाच्या साहाय्याने म्हणजेच भांडवलनिर्मितीच्या

दरात वाढ करून देशातील दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदता येते, असे प्रा. नर्क्स यांनी म्हटले आहे. (According to Prof. Ragnar Nurkse, "The vicious circle of poverty in underdeveloped countries can be broken through capital formation.")

**६) निर्यातीत वाढ :**

अप्रगत देशांची आणि विकसनशील देशांची आयात जास्त असते आणि निर्यात कमी असते. त्याचा देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. या राष्ट्रांनी जर निर्यातीत वाढ घडवून आणली तर विकासाला चांगली चालना मिळू शकते. आंतरराष्ट्रीय व्यापार तोट्याचा असेल म्हणजे देशाची आयात जास्त असेल आणि निर्यात कमी असेल तर आयातीचा खर्च भागवण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून परकीय चलनाच्या स्वरूपात कर्ज काढावे लागते. त्यामुळे देशावरील विदेशी कर्जाचा बोजा वाढतो. त्याचा देशाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. आयातीपेक्षा निर्यात कमी असण्यास अनेक घटक कारणीभूत असतात. त्यामध्ये भांडवलनिर्मितीचा दर कमी असणे हे मुख्य कारण आहे. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ घडून आली तर कृषी, उद्योग, व्यापार, सेवा या सर्व क्षेत्रातील गुंतवणूक वाढून उत्पादनात चांगली वाढ होईल. त्यामुळे निर्यातीत वाढ घडून येण्यास मदत होईल. भांडवलनिर्मितीच्या वाढत्या दराचा फायदा निर्यात व्यापाराला होत असल्याने अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रे भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ घडवून आणण्याला प्राधान्य देतात. देशात पुरेशा प्रमाणात भांडवलनिर्मिती होत असेल तर निर्यातीत वाढ घडून येते. त्यामुळे आर्थिक विकासाला गती मिळते. हे भांडवलनिर्मितीचे महत्त्व आहे.

**७) राहणीमानाच्या दर्जात सुधारणा :**

भांडवलनिर्मितीचा आणखी एक फायदा म्हणजे भांडवलनिर्मितीचा दर जर चांगला असेल तर त्यामुळे देशातील लोकांचे राहणीमान सुधारते. लोकांच्या राहणीमानाचा दर्जा (Standard of Living) उंचावतो. भांडवलनिर्मितीच्या उच्च दरामुळे वस्तू आणि सेवांच्या निर्मितीत वाढ होते. वस्तू व सेवांचा संख्यात्मक आणि गुणात्मक दर्जा उंचावतो. लोकांना वस्तू आणि सेवा पुरेशा प्रमाणात तसेच चांगल्या दर्जाच्या मिळतात. त्यामुळे लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होते. जेव्हा लोकांना वस्तू व सेवा पुरेशा प्रमाणात आणि उत्तम दर्जाच्या उपभोगावयास मिळतात तेव्हा त्याचा अर्थ लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा झाली असा होतो. देशात भांडवलनिर्मितीचा दर चांगला किंवा उच्च असेल तर हे शक्य होते. देशात राहणीमानाचा दर्जा उच्च असलेल्या लोकांचे प्रमाण जास्तीत जास्त असणे हे राष्ट्राच्या आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. आर्थिक विकासाचे हे वैशिष्ट्य प्राप्त करण्यासाठी अप्रगत राष्ट्रात भांडवलनिर्मितीचा दर उच्च असणे अत्यंत आवश्यक असते. स्वातंत्र्योत्तरकाळात भारतातील बचतनिर्मितीचा आणि भांडवलनिर्मितीचा दर वाढला. त्यामुळे गुंतवणूक वाढून रोजगारात वाढ झाली आणि रोजगार वाढीमुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन लोकांच्या राहणीमानाच्या दर्जातही वाढ / सुधारणा झाली.

**८) महागाईवर नियंत्रण :**

महागाईची समस्या प्रामुख्याने विकसनशील राष्ट्रांना जास्त भेडसावते. अशा राष्ट्रात विकासाची प्रक्रिया गतीने चालू असते. त्यामुळे पैशाचा पुरवठा वाढून भाववाढ किंवा महागाईची समस्या निर्माण होते. सौम्य भाववाढ आर्थिक विकासाला फायदेशीर असते. परंतु देशात महागाईची समस्या फारच गंभीर स्वरूपाची असेल तर दरिद्र्याचे प्रमाण वाढते. लोकांच्या राहणीमानाचा दर्जा खालावतो. महागाईमुळे लोकांचा उपभोगावरील खर्च कमी होतो. त्यामुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. म्हणून सरकारला महागाईवर नियंत्रण ठेवण्याचे काम करावे लागते. त्यासाठी सरकार विविध उपाय योजते. भांडवलनिर्मितीत वाढ घडवून आणणे हा त्यापैकी एक महत्त्वाचा उपाय आहे. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ घडवून आणली तर विविध क्षेत्रात भांडवलाची गुंतवणूक वाढून उत्पादनात व वस्तूच्या पुरवठ्यात वाढ होते. त्यामुळे भाववाढ किंवा महागाई कमी होण्यास मदत होते. जीवघेणी महागाई आर्थिक विकासावर विपरित परिणाम करत असल्याने महागाई उद्‌भवू नये यासाठी सरकारला उत्पादनात वाढ घडवून आणावी लागते. भांडवलनिर्मितीत वाढ घडून आल्याशिवाय गुंतवणूक आणि उत्पादनात वाढ होत नाही. हे भांडवलाचे किंवा भांडवलनिर्मितीचे महत्त्व आहे.

**९) बाजारपेठांचा विकास आणि विस्तार :**

देशाच्या आर्थिक विकासात बाजारपेठांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. देशातील बाजारपेठा सक्षम किंवा कार्यक्षम असाव्या लागतात. देशात भांडवलनिर्मितीचा दर जर चांगला असेल तर भांडवलाच्या साहाय्याने देशात वाहतूकीच्या चांगल्या आणि पुरेशा सोयी निर्माण करता येतात. त्यामुळे तयार झालेला पक्का माल बाजारपेठापर्यंत पोहचवता येतो. देशात केवळ मोठ्या प्रमाणात उत्पादन तयार होऊन चालत नाही तर ते उत्पादन ग्राहकांच्या हातात वेळेत पोहचले पाहिजे. त्यासाठी झालेले उत्पादन बाजारपेठामध्ये पोहचले पाहिजे. देशातील वाहतूक सुविधा पुरेशी आणि कार्यक्षम असेल तर हे शक्य होते. अशा प्रकारे भांडवलाची वाहतूक क्षेत्रात गुंतवणूक करून तयार झालेले उत्पादन बाजारपेठापर्यंत पोहचवता येते. त्यामुळे बाजारपेठांचा विकास आणि विस्तार घडून येतो. तसेच भांडवली गुंतवणूकीमुळे कृषी मालाच्या आणि औद्योगिक मालाच्या उत्पादनात वाढ होऊन बाजारपेठामध्ये पुरेसा माल विक्रीसाठी उपलब्ध होतो. त्यामुळे बाजारपेठा सक्षम होतात. अशा प्रकारे देशात जर भांडवलनिर्मितीचा दर चांगला असेल तर बाजारपेठांचा विकास आणि विस्तार घडून येतो. त्यामुळे मालाचा खप वाढण्यास मदत होते. मालाचा खप वाढल्याने उत्पादन वाढीस चालना मिळून आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होते. अशा प्रकारे जलद आर्थिक विकासासाठी देशातील बाजारपेठा सक्षम असाव्या लागतात. भांडवलनिर्मितीचा दर चांगला असेल तर भांडवलाची गुंतवणूक वाढून देशातील बाजारपेठांचा विकास व विस्तार होण्यास मदत होते.

**१०) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :**

राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे म्हणजे देशाच्या आर्थिक विकास दरात वाढ घडून येणे होय. अप्रगत कमी

विकसित राष्ट्रांच्या आर्थिक विकासाच्या वृद्धीचा दर कमी असतो. त्यास जे विविध घटक जबाबदार आहेत त्यामध्ये भांडवलनिर्मितीचा मंद वेग हा प्रमुख घटक आहे. भांडवलनिर्मितीचा दर वाढल्याशिवाय अप्रगत राष्ट्रांच्या आर्थिक विकासाचा वेग वाढत नाही. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांनी भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ घडवून आणली तर अर्थव्यवस्थेच्या कृषी,  उद्योग, व्यापार, वाहतूक इत्यादी क्षेत्रातील गुंतवणूक वाढून राष्ट्रीय उत्पादनात आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. त्यामुळे आर्थिक विकासाचा दर वाढण्यास मदत होते. कृषी, उद्योग इत्यादी विविध क्षेत्रात अद्ययावत यंत्राचा वापर केल्याने या क्षेत्रातील उत्पादन वाढते. शेतीचे यांत्रिकीकरण शक्य होते. त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ घडून येते. अशा प्रकारे देशात भांडवलनिर्मिती पुरेशा प्रमाणात होत असेल तर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक विकासाचा वेग वाढण्यास मदत होते.

अशा प्रकारे भांडवलनिर्मितीची अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासातील भूमिका वरीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. भांडवलनिर्मितीचा दर चांगला असेल तर कृषी, उद्योग क्षेत्रांची उत्पादकता वाढते. नैसर्गिक साधनसंपत्तीचा चांगला व पुरेसा वापर करता येतो. देशातील दारिद्र्याचे आणि बेकारीचे प्रमाण कमी करता येते. लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावता येतो. अतिरिक्त लोकसंख्येला उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेता येते. मनुष्यबळाचा चांगला उपयोग करता येतो. भांडवलाच्या गुंतवणूकीमुळे वस्तू आणि सेवांच्या उत्पादनात वाढ होत असल्याने लोकांच्या आर्थिक कल्याणात वाढ होते. तसेच पुरेशा वस्तू देशात तयार होत असल्याने महागाईचा दर कमी राखता येतो. भांडवलनिर्मितीच्या उच्च दरामुळे भांडवलाची गुंतवणूक वाढून उत्पादनात वाढ होते. त्यामुळे निर्यातीत वाढ होऊन परकीय कर्जाचा बोजा कमी होतो. रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण या पायाभूत सुविधामध्ये वाढ घडवून आणता येते. उद्योजकतेत आणि नवप्रवर्तनात वाढ होते. अशा प्रकारे भांडवलनिर्मितीचा दर उच्च असेल तर अप्रगत राष्ट्रांच्या आणि विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासाला चांगली चालना मिळते.

## २.३ सारांश :

प्राथमिक (कृषी), द्वितीय (औद्योगिक) आणि तृतीय (व्यापार व सेवा) ही अर्थव्यवस्थेची प्रमुख तीन क्षेत्रे आहेत. या क्षेत्रांचा विकास झाल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास होत नाही. या तीन क्षेत्रांच्या विकासावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. या तिन्ही क्षेत्रांचा एकाच वेळी विकास व्हावा लागतो. त्याशिवाय आर्थिक विकासाच्या दरात अपेक्षित व चांगली वाढ होत नाही. अर्थव्यवस्थेची ही सर्व क्षेत्रे एकमेकावर अवलंबून असतात. त्यामुळे सरकारला सर्व क्षेत्रांच्या विकासाकडे लक्ष द्यावे लागते. अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक, द्वितीय क्षेत्रात वस्तू तयार होतात आणि तृतीय क्षेत्रात सेवांची निर्मिती होते. अशा प्रकारे प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रात ज्या वस्तू आणि सेवा तयार होतात त्याला राष्ट्रीय उत्पादन असे म्हणतात. किंवा त्यास स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) असे म्हणतात. GDP हे आर्थिक विकास मोजण्याचे महत्त्वाचे साधन आहे. GDP मध्ये वाढ घडून येणे म्हणजे आर्थिक विकास दरात वाढ होणे होय. आर्थिक विकास दरात वाढ घडवून आणण्यासाठी GDP मध्ये वाढ घडून यावी लागते. GDP मध्ये वाढ घडून येण्यासाठी प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्राची प्रगती होणे महत्त्वाचे असते. अप्रगत देशात ही तिन्ही क्षेत्रे मागासलेली असतात. म्हणून

सरकारलाच पुढाकार घेऊन या तिन्ही क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करून आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करावी लागते. खाजगी क्षेत्राजवळ पुरेसे भांडवल आणि साहस नसल्याने खाजगी क्षेत्राकडून प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रात पुरेशी गुंतवणूक होऊ शकत नाही. म्हणून अप्रगत राष्ट्रात सरकारलाच पुढाकार घेऊन विविध क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करावी लागते. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रातील सरकारांनासुद्धा जलद आर्थिक विकासासाठी पुढाकार घेऊन विविध क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करावी लागते. भारतासारख्या अनेक राष्ट्रांनी देश सर्व क्षेत्रात मागसलेला असताना वीज, पाणी, कारखानदारी, वाहतूक इत्यादी विविध क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करून देशाचा मागासलेपणा घालवला आहे आणि आपल्या राष्ट्रांना विकसनशील बनवले आहे. आज ही राष्ट्रे विकासाच्या दिशेने वेगाने धावत आहेत. त्यामध्ये सरकारची भूमिका खूपच महत्त्वाची आहे. अप्रगत आणि विकसनशील राष्ट्रातील सरकारांना / शासनसंस्थांना अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात केवळ प्रचंड गुंतवणूक करून चालत नाही तर आर्थिक विकासाला चांगली चालना देण्यासाठी विविध आर्थिक धोरणेही तयार करून ती प्रभावीपणे राबवावी लागतात. या धोरणामध्ये चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरण, वेतन धोरण, किंमत धोरण इत्यादी विविध धोरणांचा समावेश होतो. या धोरणांच्या सहाय्याने सरकार अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणण्याचे काम करत असते.

## २.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ :

१. **प्राथमिक क्षेत्र :** हे अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख क्षेत्र आहे. प्राथमिक क्षेत्रात कृषी, जंगल, पशुपालन, मासेमारी, मधमाशीपालन या प्राथमिक व्यवसायांचा समावेश होतो. प्राथमिक क्षेत्रात तयार झालेल्या वस्तूंना प्राथमिक वस्तू (Primary goods) असे म्हणतात. प्राथमिक क्षेत्रात जे एकूण उत्पन्न तयार होते त्यामध्ये शेतीचा वाटा मोठा असतो. ९० टक्केपेक्षा अधिक उत्पन्न कृषी क्षेत्रापासून मिळत असल्याने प्राथमिक क्षेत्राला 'कृषी क्षेत्र' किंवा 'शेती क्षेत्र' (Agricultural sector) असे म्हणतात.

२. **द्वितीय क्षेत्र :** हे अर्थव्यवस्थेचे दुसरे महत्त्वाचे क्षेत्र आहे. द्वितीय क्षेत्रात लहान, मध्यम आणि मोठ्या उद्योगांचा समावेश होतो. तसेच सूक्ष्म उपक्रमांचाही समावेश होतो. द्वितीय क्षेत्रास 'औद्योगिक क्षेत्र' किंवा 'कारखानदारी क्षेत्र' असेही म्हणतात. द्वितीय क्षेत्रात तयार होणाऱ्या वस्तूंना औद्योगिक वस्तू (Industrial goods) असे म्हणतात.

३. **तृतीय क्षेत्र :** तृतीय क्षेत्रास व्यापार व सेवा क्षेत्र (Trade and service sector) असे म्हणतात. तृतीय क्षेत्रात वस्तू तयार होत नाहीत. प्राथमिक आणि द्वितीय क्षेत्रात तयार झालेल्या वस्तू आणि सेवांची खरेदी-विक्री तृतीय क्षेत्रात चालते. त्यालाच व्यापार असे म्हणतात. तृतीय क्षेत्रात व्यापाराबरोबरच सर्व प्रकारच्या सेवांचा समावेश होतो. उदाहरणार्थ वाहतूक सेवा, दळणवळण सेवा, शिक्षण, आरोग्य, बँकिंग इत्यादी.

४. **आर्थिक विकास :** सार्वत्रिक दारिद्र्यात घट करणे म्हणजे आर्थिक विकासाचा मार्ग खुला करणे अशी वायनर यांनी आर्थिक विकासाची व्याख्या केली आहे. आर्थिक विकास ही दीर्घकाळ

चालणारी प्रक्रिया असते. राष्ट्राचा आर्थिक विकास अल्पकाळात घडून येत नाही. त्याला खूप मोठा काळ लागतो. ज्या दीर्घकालीन प्रक्रियेमुळे देशाच्या वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात आणि दरडोई उत्पन्नात वाढ घडून येते आणि ही वाढीची प्रक्रिया सतत चालत असते त्या प्रक्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात.

५. **चलनविषयक धोरण :** पूर्ण रोजगार, किंमत स्थैर्य, आर्थिक स्थैर्य आणि आर्थिक विकास इत्यादी विविध उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेने पैशाच्या पुरवठ्यात आणि व्याजदरात जाणीवपूर्वक केलेले बदल म्हणजे चलनविषयक धोरण होय.

६. **राजकोषीय धोरण :** पूर्ण रोजगार, आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य इत्यादी विविध समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारने तयार केलेले आणि राबवलेले करविषयक, कर्जविषयक, खर्चविषयक आणि अंदाजपत्रकीय धोरण म्हणजे राजकोषीय धोरण होय.

७. **भांडवल :** भांडवल हा संपत्तीचा असा भाग असतो जो पुढील संपत्तीच्या उत्पादनासाठी वापरला जातो. मनुष्यनिर्मित उत्पादनाची साधने म्हणजे भांडवल होय.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्न :

**(अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा व वाक्य पुन्हा लिहा.**

1. विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक विकासात प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा ............. आहे.

   (अ) घटत (ब) वाढत (क) स्थिर (ड) यापैकी नाही

2. अप्रगत राष्ट्रात ............. क्षेत्र महत्त्वाचे असते.

   (अ) उद्योग (ब) सेवा (क) शेती (ड) शेती, उद्योग, सेवा

3. विकसनशील राष्ट्रात राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा हिस्सा .................. आहे.

   (अ) घटत (ब) वाढत (क) स्थिर (ड) यापैकी नाही

4. अप्रगत राष्ट्रांच्या आर्थिक विकासात सरकारची भूमिका महत्त्वाची ..................

   (अ) असते (ब) नसते (क) तटस्थ (ड) यापैकी नाही

5. चलनविषयक धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी .................. करते.

   (अ) मध्यवर्ती बँक (ब) स्टेट बँक (क) व्यापारी बँक (ड) सरकार

6. राजकोषीय धोरणाचे आखणी आणि अंमलबजावणी .................. करते.

   (अ) केंद्र सरकार (ब) राज्य सरकार (क) मध्यवर्ती बँक (ड) स्टेट बँक

7. पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी .................. धोरण उपयोगी पडते.

(अ) चलनविषयक (ब) किंमत (क) वेतन (ड) उत्पन्न

8. पतनियंत्रणाची संख्यात्मक आणि गुणात्मक साधने ही .................. धोरणाची साधने आहेत.

(अ) चलनविषयक (ब) राजकोषीय (क) वेतन (ड) उत्पन्न

9. बँक दरात वाढ केली की पैशाचा पुरवठा ..................

(अ) वाढतो (ब) घटतो (क) स्थिर राहतो (ड) यापैकी नाही

10. सरकारच्या करविषयक, कर्जविषयक आणि खर्चविषयक धोरणाला .................. धोरण म्हणतात.

(अ) चलनविषयक (ब) राजकोषीय (क) उत्पन्न (ड) किंमत

11. मंदीच्या काळात .................. अंदाजपत्रक गरजेचे असते.

(अ) तुटीचे (ब) शिलकीचे (क) समतोल (ड) यापैकी नाही

12. भांडवल हे .................. असते.

(अ) मनुष्यनिर्मित (ब) नैसर्गिक (क) यापैकी नाही

**२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) अ २) क ३) ब ४) अ ५) अ ६) अ

७) अ ८) अ ९) ब १०) ब ११) अ १२) अ

**२.७ सरावासाठी प्रश्न :**

**अ) टीपा द्या.**

१) प्राथमिक क्षेत्र २) द्वितीय क्षेत्र ३) तृतीय क्षेत्र

४) भांडवलनिर्मिती ५) चलनविषयक धोरण ६) राजकोषीय धोरण

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१) आर्थिक विकासात शेतीची भूमिका स्पष्ट करा.

२) आर्थिक विकासात औद्योगिक क्षेत्राची (द्वितीय क्षेत्राची) भूमिका स्पष्ट करा.

३) आर्थिक विकासात तृतीय क्षेत्राची (सेवा क्षेत्राची) भूमिका स्पष्ट करा.

**क) सविस्तर उत्तरे द्या.**

१) चलनविषयक धोरणाच्या साहाय्याने सरकार आर्थिक विकास कसा घडवून आणते ते स्पष्ट करा.

२) राजकोषीय धोरणामुळे आर्थिक विकास कसा होतो?

३) सरकारची आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट करा.

४) भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ झाल्यास आर्थिक विकास होतो या मताशी आपण सहमत आहात का?

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१) Jhingan M. L., The Economics of Developmend and Planning, Vrinda Publications (P) Limited, Delhi (2006).

२) Agarwal R. C., Economics of Development (Theory and Practice), Lakshmi Narain Agarwal, Agara (2013).

३) Misra S. K., Puri V. K., Economics of Development and Planning, Himalaya Publishing House, Mumbai (1998).

४) कविमंडन विजय, विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर (२०११).

५) इंगळे जयवंत, भारतीय अर्थव्यवस्था, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २०२५.


❑❑❑

घटक १

# आर्थिक विकासाचे सिद्धांत–भाग १

## (Theories of Economic Development - I)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ आर्थिक विकासाचे सनातनवादी सिद्धांत – ॲडम स्मिथ, रिकार्डो, मिल आणि माल्थस
- १.२.२ कार्ल मार्क्स यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत
- १.२.३ शुंपीटर यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत
- १.२.४ लेविस यांचा आर्थिक विकासाचा अमर्यादित श्रमपुरवठ्याचा सिद्धांत

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न

१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी प्रश्न

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींची माहिती होईल.

१. ॲडम स्मिथ, रिकार्डो, मिल आणि माल्थस या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांचे आर्थिक विकासाबाबतचे विचार समजतील.

२. कार्ल मार्क्स यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत समजेल.

३. शूंपीटर यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत समजेल.

४. लेविस यांचा आर्थिक विकासाचा अमर्यादित श्रमपुरवठ्याचा सिद्धांत लक्षात येईल.

## १.१ प्रास्ताविक :

कमी विकसित आणि विकसनशील राष्ट्रांची संख्या जगात कमी नाही. आज जगात १० टक्क्यापेक्षा कमी राष्ट्रे विकसित आहेत. अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांची संख्या मोठी आहे. काही राष्ट्रात आर्थिक विकासाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. पूर्वी ही राष्ट्रे अप्रगत किंवा मागासलेली होती. अशा राष्ट्रांना विकसनशील राष्ट्रे असे म्हणतात. भारत, चीन या राष्ट्रांचा विकसनशील देशामध्ये समावेश होतो. त्यांच्या अर्थव्यवस्थांना विकसनशील अर्थव्यवस्था (Developing Economy) असे म्हणतात. जगातील काही राष्ट्रे अशी आहेत की, त्या राष्ट्रातील आर्थिक विकासाचा वेग खूपच कमी आहे. भांडवलाची कमतरता, प्रचंड लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्तीचा अपुरा व चुकीचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानाची अनुपलब्धता इत्यादी काही कारणामुळे जगातील बऱ्याच राष्ट्रांचा आर्थिक विकासाचा दर कमी आहे. ही राष्ट्रे आर्थिक विकासाचा वेग वाढवण्याचा प्रयत्न करत असतात. आर्थिक विकासाची प्रक्रिया कशी सुरू करता येईल? आणि आर्थिक विकासाचा दर कसा वाढवता येईल? यासंदर्भात अप्रगत राष्ट्रांना मार्गदर्शन करण्यासाठी सनातनवादी, नवसनातनवादी आणि आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी काही सैद्धांतिक विचार मांडले आहेत. त्यालाच आर्थिक विकासाचे सिद्धांत (Theories of Economic Development) असे म्हणतात. या घटकात ॲडम स्मिथ, रिकार्डो, मिल आणि माल्थस या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताची माहिती दिली आहे. तसेच कार्ल मार्क्स, शूंपीटर आणि आर्थर लेविस यांनी मांडलेल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताची माहिती दिली आहे. १६ व्या, १७ व्या शतकात घेऊन गेलेल्या अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाबाबत मांडलेले विचार काही प्रमाणात आजही उपयुक्त आणि मार्गदर्शक आहेत. म्हणून त्यांचे आर्थिक विकासविषयक विचार या भागात आपण अभ्यासणार आहोत.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ आर्थिक विकासाचे सनातनवादी सिद्धांत (Classical Theories of Economic Development) :

**प्रास्ताविक :**

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील अर्थशास्त्रज्ञांना सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ असे म्हणतात. ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, थॉमस माल्थस, प्रा. पिगू, जे. बी. से, जे. एस. मिल हे प्रमुख सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आहेत.

त्यांनी देशाच्या आर्थिक विकासासंबंधी जे आर्थिक विचार किंवा सिद्धांत मांडले आहेत, त्यांना आर्थिक विकासाचे सनातनवादी सिद्धांत असे म्हणतात. सनातनवाद्यांचे आर्थिक विचार २०० ते २५० वर्षापूर्वीचे आहेत. त्यामुळे त्यांचे त्या काळात मांडलेले आर्थिक विचार किंवा आर्थिक सिद्धांत आजच्या काळात जसेच्या तसे लागू पडत नाहीत. जरी त्यांचे विचार २५० वर्षापूर्वीचे असले तरी ते काही प्रमाणात आजही लागू पडतात. तसेच त्यांच्या आर्थिक सिद्धांतावरून त्या काळातील समाजाची व देशाची परिस्थिती कशा प्रकारची होती ते सुद्धा समजते. म्हणून आर्थिक विकासाचे सनातनवादी सिद्धांत जरी २०० वर्षापूर्वीचे असले तरी ते अभ्यासणे अत्यंत आवश्यक आहे.

**ॲडम स्मिथ यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत :**

**प्रास्ताविक :**

ॲडम स्मिथ हे प्रमुख सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांचा कालखंड १७२३ ते १७९० असा आहे. ॲडम स्मिथ यांचा जन्म ५ जून, १७२३ रोजी स्कॉटलंडमधील किरकॅलडी (Kirkculdy) या खेडेगावात झाला. हे खेडे एडिंबर्ग जवळ आहे. सन १७३७ ते १७४० पर्यंत ॲडम स्मिथ यांचे शिक्षण ग्लासगो विद्यापीठात झाले. १७४० ते १७४६ पर्यंतचे त्याचे शिक्षण ऑक्सफर्ड विद्यापीठात झाले. त्यानंतर शिक्षणासाठी ते १७४८ मध्ये एडिंबर्ग विद्यापीठात गेले. ॲडम स्मिथ हे तत्त्वज्ञानाचे आणि वाङ्मयाचे सुद्धा अभ्यासक होते. तत्त्वज्ञान आणि वाङ्मयावर ते व्याख्याने देत असत. सन १७६२ मध्ये ॲडम स्मिथ यांना ग्लासगो विद्यापीठाची 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी मिळाली. ते केवळ अर्थशास्त्राचे अभ्यासक नव्हते तर तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान आणि वाङ्मयाचे सुद्धा अभ्यासक होते. ते ग्लासगो विद्यापीठात १७५९ ते १७६३ सर काळात तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयाचे प्राध्यापक होते. १७७८ मध्ये 'कमिशनर ऑफ कस्टमस' या सर्वोच्च पदावर त्यांची नेमणूक झाली. ॲडम स्मिथ यांनी आपले पहिले पुस्तक सन १७५९ मध्ये प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाचे शीर्षक 'Theory of Moral Sentiments' असे होते. हे पुस्तक देशभर (इंग्लंडभर) गाजले. या पुस्तकाने इंग्लंडमधील अनेक विचारवंत, राजकारणी प्रभावित झाले होते. यावरून स्मिथ यांच्या बुद्धिमत्तेची आपणास कल्पना येते. त्यांनी सन १७७६ मध्ये 'राष्ट्रांच्या संपत्तीचे स्वरूप व संपत्तीच्या उत्पत्तीची (कारणांची) चौकशी' (An Inquiry into the Nature and Caues of the Wealth of Nations) या शीर्षकाचा अर्थशास्त्रावरील ग्रंथ प्रसिद्ध केला. हा ग्रंथ ॲडम स्मिथ यांनी १७६४ मध्ये लिहावयास घेतला होता. तब्बल बारा वर्षे ॲडम स्मिथ हा ग्रंथ लिहित होते. या ग्रंथाला संक्षिप्तमध्ये 'राष्ट्रांची संपत्ती' (Wealth of Nations) असे म्हणतात. हा ग्रंथ जगभर गाजला. त्यांच्या या ग्रंथाची जगातील अनेक भाषांत भाषांतरे झाली. त्यामुळे स्मिथ यांना व त्यांच्या ग्रंथाला जगभर लोकप्रियता मिळाली. 'राष्ट्रांची संपत्ती' हा त्यांचा ग्रंथ अर्थशास्त्र विषयातील महत्त्वाचा ग्रंथ असल्याने अर्थशास्त्र हा एक स्वतंत्र विषय म्हणून मान्यता मिळाली. ॲडम स्मिथ यांना या ग्रंथामुळेच 'अर्थशास्त्राचा जनक' (Father of Economics) हा किताब मिळाला. अर्थशास्त्रातच नव्हे तर सर्वच शास्त्रात ॲडम स्मिथ यांचा 'राष्ट्राची संपत्ती' हा ग्रंथ त्या काळात श्रेष्ठ मानला जात होता. त्यावरून या ग्रंथाचे महत्त्व आपल्या लक्षात येते. साधारणपणे १७७६ नंतरच्या अर्थतज्ज्ञांना सनातनवादी अर्थतज्ज्ञ म्हणतात. ॲडम स्मिथ यांना सनातन संप्रदायाचे संस्थापक

मानले जाते. (Adam Smith was the founder of classical school of Economics) ॲडम स्मिथ यांनी स्वतंत्र असा आर्थिक विकासाचा सिद्धांत मांडलेला नाही. त्यांनी आपल्या 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथात देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने जे विविध आर्थिक विचार मांडले आहेत, ते आर्थिक विचार एकत्र करून ते सिद्धांताच्या स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न काही अर्थतज्ज्ञांनी केला असून स्मिथ यांच्या त्या एकत्र केलेल्या आर्थिक विचारांच्या मांडणीलाच 'आर्थिक विकासाचा सिद्धांत' असे म्हणतात.

**१) निसर्ग नियम** (Natural Law) :

ॲडम स्मिथ यांचा निसर्ग नियमावर विश्वास होता. त्यांच्या मते, निसर्ग नियम हे सरकारच्या नियमापेक्षा श्रेष्ठ आहेत. सरकारने किंवा मनुष्याने केलेले कायदे परिपूर्ण असू शकत नाहीत. तसेच हे कायदे समाजाच्या फायद्याचे असू शकत नाहीत. म्हणून ॲडम स्मिथ हे निसर्ग नियमांचे समर्थन करतात. त्यांचा पुरस्कार करतात. निसर्ग मनुष्याला नैतिकतेचे आणि प्रामाणिकपणाचे धडे देतो. निसर्गामुळे / निसर्गनियमामुळे देशाचा आर्थिक विकास घडून येतो. त्यांनी आर्थिक संस्थांच्या निर्मितीस मनुष्य किंवा सरकार कारणीभूत नसून निसर्गच त्यास कारणीभूत आहे असे म्हटले आहे. पैसा, भांडवल, वस्तूची मागणी, वस्तूचा पुरवठा, लोकसंख्या, चलनसंख्या, श्रम, श्रमविभागणी या विविध आर्थिक संस्था आपोआप निर्माण झाल्या आहेत, असे ॲडम स्मिथ यांनी म्हटले आहे. या विविध आर्थिक संस्था निसर्गामुळे किंवा अदृष्य शक्तीमुळे निर्माण झाल्या आहेत. अशा संस्था मनुष्यनिर्मित किंवा सरकारनिर्मित नसतात तर त्या आपोआप निर्माण होत असतात. सरकारला या आर्थिक संस्था निर्माण कराव्या लागत नाहीत. स्मिथ यांच्या या विचारांनाच स्मिथ यांचा निसर्गवाद (Smith's Naturalism) असे म्हणतात. निसर्ग किंवा अदृश्य शक्ती मनुष्याने कसे वागावे? ते सांगते. प्रत्येक मनुष्य स्वार्थी असतो. म्हणजे आपले स्वत:चे हित साधण्याचा तो प्रयत्न करीत असतो. निसर्गच त्याला हे शिकवतो. मनुष्याला निसर्गत: स्वत:चे हित कशात आहे? आणि हे हित कसे करून घेता येईल? हे समजत असते. देशातील सर्वच व्यक्ती आपले हित किंवा कल्याण करून घेण्यासाठी प्रयत्न करत असल्याने वस्तूंचे उत्पादन (संपत्ती) वाढून देशाचा विकास घडून येतो. विकासात वाढ होते असे ॲडम स्मिथ म्हणतात. प्रत्येक मनुष्य आपले स्वत:चे हित साधण्याचा प्रयत्न करत असल्याने प्रत्येकाला स्वहित साधण्याचे (संपत्तीत वाढ घडवून आणण्याचे) स्वातंत्र्य दिले पाहिजे असे ॲडम स्मिथ म्हणतात. देशातील प्रत्येक मनुष्याने आपले स्वहित घडवून आणले तर एकूण समाजाचे / संपूर्ण देशाचे हित साधले जाऊन देशाचा विकास घडून येतो असे स्मिथ म्हणतात. मनुष्याच्या स्वहित साधण्याच्या प्रयत्नातूनच पैसा, लोकसंख्या, स्पर्धा, श्रम, भांडवल या आर्थिक संस्था निर्माण होतात. म्हणून व्यक्तीच्या, समाजाच्या, देशाच्या विकासासाठी देशातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या संपत्तीत वाढ घडवून आणण्याचा अधिकार व स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्यांच्या या विचारानांच निसर्गवाद असे म्हणतात. थोडक्यात, व्यक्तीच्या आणि देशाच्या संपत्तीत (उत्पादनात) वाढ घडवून आणण्यासाठी सरकारी कायद्यापेक्षा निसर्ग नियमच उपयुक्त ठरतात असे स्मिथ यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे. स्मिथ यांनी व्यक्तीच्या आणि देशाच्या आर्थिक विकासासाठी 'निर्हस्तक्षेप धोरणाचा' (Laissez Faire Policy) पुरस्कार केला असून सरकारी हस्तक्षेपाला कडाडून विरोध केला आहे. (Adam Smith's Theory of economic development is based

on the principle of laissez faire, which requires that the state should not impose any restrictions on the freedom of action of an individual.) स्मिथ हे व्यक्तीस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. उद्योग व व्यापार सरकारी नियंत्रणापासून मुक्त असावेत असे त्यांचे मत होते. व्यक्तीला व्यवसायाची निवड करण्याचा, मालमत्तेत वाढ करण्याचा अधिकार असला पाहिजे असे त्यांचे मत होते. सरकारी हस्तक्षेप देशाच्या आर्थिक विकासाला हानिकारक असतो, असे स्मिथ म्हणतात.

**२) श्रमविभागणी** (Division of Labour) **:**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात 'श्रमविभागणीला' विशेष महत्त्व दिले आहे. त्यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताची सुरवातच श्रमविभागणीच्या मुद्द्यापासून होते. स्मिथ यांनी उत्पादक श्रमामुळे संपत्ती निर्माण होते असे म्हटले आहे. स्मिथ यांनी श्रमविभागणीचे महत्त्व किंवा काही फायदे सांगितले आहेत. श्रमविभागणीमुळे देशाचा आर्थिक विकास कसा घडून येतो ते स्मिथ यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, श्रमविभागणीमुळे श्रमिकांच्या उत्पादकतेत वाढ होते. श्रमविभागणीमुळे कामगारांच्या कार्यक्षमतेत आणि कौशल्यात वाढ होते. आपल्या नेमून दिलेल्या छोट्या कामावर तो पूर्ण लक्ष देऊ शकतो. सगळी कामे एकट्या कामगाराला करावी लागत नाहीत. त्यामुळे एकच काम सतत केल्याने त्याची कार्यक्षमता व कौशल्य यात वाढ होते. त्यामुळे उत्पादकतेत व उत्पादनात वाढ घडून येते. श्रमविभागणीमुळे वेळेची बचत होते. कमी वेळेत अधिक उत्पादन शक्य होते. श्रमाची बचत करणाऱ्या विविध यंत्रांच्या शोधामुळे उत्पादनात वाढ होते. स्मिथ यांच्या मते, श्रमविभागणी हे उत्पादन व उत्पादकता वाढविण्याचे एक महत्त्वाचे तंत्रज्ञान आहे. बाजारपेठेचा आकार आणि श्रमविभागणी यांच्यातील संबंध स्मिथ यांनी स्पष्ट करून सांगितले आहेत. बाजारपेठेच्या आकारावर श्रमविभागणी अवलंबून असते. बाजारपेठांचा विस्तार झाला की श्रमविभागणी वाढत जाते. प्रत्येक मनुष्य स्वहितासाठी धडपडत असतो. त्यामुळे श्रमविभागणीला प्रोत्साहन मिळते, असे स्मिथ म्हणतात. अशा प्रकारे स्मिथ यांनी श्रमविभागणीचे तीन फायदे सांगितले आहेत.

१) श्रमविभागणीमुळे श्रमिकांची कार्यक्षमता, उत्पादकता, कौशल्य यात वाढ होते.

२) श्रमविभागणीमुळे वेळेची बचत होते. ज्यामुळे उत्पादनात वाढ घडून येते.

३) श्रमविभागणीमुळे चांगल्या उपकरणांचा व यंत्राचा शोध लागतो.

श्रमविभागणीमुळे कामगारांच्या कौशल्यात, कार्यक्षमतेत वाढ होऊन उत्पादनातही त्यामुळे वाढ घडून येते. म्हणून आर्थिक विकासात श्रमविभागणीची भूमिका महत्त्वाची आहे. श्रमविभागणीमुळे वस्तूंचा विनिमय वाढून बाजारपेठांचा आकार मोठा होतो किंवा बाजारपेठा विस्तारतात. मोठ्या आकाराच्या बाजारपेठा आर्थिक विकासासाठी आवश्यक असतात. विस्तारणाऱ्या बाजारपेठांमुळे विक्रीत व नफ्यात वाढ घडून येते. अशा प्रकारे श्रमविभागणीमुळे देशाचा आर्थिक विकास घडून येतो, असे ॲडम स्मिथ यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे.

**३) उत्पादन फलन** (Production Function) **:**

ॲडम स्मिथ यांनी उत्पादनाचे तीन घटक सांगितले आहेत. १) श्रम, २) भांडवल आणि ३) भूमी किंवा जमीन. त्यांनी उत्पादन फलनाचे सूत्र खालीलप्रमाणे दिले आहे.

$$Y = f(K, L, N)$$

K = Capital - भांडवल (Stock of Capital)

N = Land - जमीन / भूमी

L = labour - श्रम (labour force)

ॲडम स्मिथ यांनी उत्पादन घटकापैकी श्रम (labour) या घटकाला अधिक महत्त्व दिले आहे. श्रम हा एकमेव क्रियाशील उत्पादन घटक आहे असे त्यांचे मत आहे. त्यांनी श्रमाला पिता (father) आणि जमिनीला माता (mother) असे म्हटले आहे. (Adam Smith regarded labour as father and land as mother.)

ॲडम स्मिथ यांनी तंत्रज्ञानाचे महत्त्व विषद केले असून तंत्रज्ञानाच्या विकासामुळे उत्पादकतेत सुधारणा होते. परंतु भांडवलाची उपलब्धता असेल तरच हे शक्य होते, असे स्मिथ म्हणतात.

**४) भांडवल संचय** (Capital Accumulation) **:**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात भांडवल संचयाला विशेष महत्त्व दिले आहे. भांडवल संचयात वाढ घडून आल्यास राष्ट्राच्या संपत्तीत (उत्पादनात) वाढ घडून येते असे त्यांनी म्हटले आहे. राष्ट्राच्या संपत्तीत कशी वाढ घडवून आणावयाची? हा सनातनवाद्यांसमोर महत्वाचा प्रश्न होता. संपत्तीतील वाढ (वस्तू व सेवांच्या उत्पादनातील वाढ) हा देशाच्या प्रगतीचा (भरभराटीचा) निर्देशक आहे. ॲडम स्मिथ यांनी संपत्तीत वाढ घडवून आणण्यासाठी अधिक उत्पादन केले पाहिजे, त्यासाठी अधिक भांडवलाची गरज आहे असे म्हटले आहे. अधिक भांडवलाचा वापर करता यावा यासाठी आपण अधिक भांडवल निर्माण केले पाहिजे. अधिक भांडवल संचयासाठी बचतही अधिक केली पाहिजे. स्मिथ म्हणतात, उपभोगावरील खर्च कमी करून बचत केली पाहिजे. (We shoud sacrifice the present wants and enjoyments for the sake of the future wants and enjoyments.) अधिकाधिक भांडवलाची निर्मिती आणि अधिकाधिक भांडवलाची गुंतवणूक देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. अशा प्रकारे राष्ट्राच्या आर्थिक विकासात भांडवलाची किंवा भांडवल संचयाची भूमिका महत्त्वाची असते, असा विचार स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात मांडला आहे. ॲडम स्मिथ यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात 'भांडवल संचय' या घटकाला महत्त्वाचे स्थान दिले आहे.

**५) व्याज दर :**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या सिद्धांतात (आर्थिक विचारांच्या ग्रंथात) व्याजदराबाबत विश्लेषण केले आहे. त्यांनी भांडवलाचा पुरवठा आणि व्याजदर यांच्यातील संबंध स्पष्ट केले आहेत. ते म्हणतात, भांडवलाच्या पुरवठ्यात वाढ होत गेली की, व्याजाचा दर घटत जातो. त्यामुळे व्याजावर उपजीविका करणाऱ्यांचे (भांडवलाचा पुरवठा करणाऱ्यांचे) उत्पन्न कमी होते. त्यांच्या राहणीमानाचा दर्जा खालावतो. राहणीमानाचा दर्जा खालावू नये

यासाठी त्यांच्याकडून (व्याजाच्या रुपाने उत्पन्न मिळवण्यासाठी) भांडवलाचा अधिक पुरवठा केला जातो. ॲडम स्मिथ म्हणतात, व्याजदरात घट होऊ लागली की, भांडवलाच्या मागणीत वाढ होते. व्याजाच्या दरात फारच घट झाली तर भांडवल पुरवणारे लोक आपले अधिक नुकसान होऊ नये यासाठी व्याजाने भांडवल (पैसे) देणे बंद करतील आणि स्वत:च गुंतवणूक करतील. व्याजाचे दर जरी घटले तरी भांडवल संचयावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत नाही. भांडवल संचयात आणि देशाच्या आर्थिक विकासात वाढ घडून येते.

**५) विकासाचे मध्यस्थ** (Agents of Economic Growth) **:**

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ यांनी आपल्या 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथात आर्थिक विकासाच्या (आर्थिक वाढीच्या) तीन मध्यस्थांची (Agents) चर्चा केली आहे. त्यांच्या मते, राष्ट्राच्या आर्थिक विकासात (१) शेतकरी (farmers), (२) उत्पादक / उद्योजक (producers) आणि (३) व्यापारी / व्यावसायिक (businessman) हे तीन घटक (मध्यस्थ) अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतात. मुक्त व्यापार आणि खुली बाजार स्पर्धा यामुळे शेतकरी, उत्पादक, व्यावसायिक या तीन घटकांमुळे देशांतर्गत (domestic) आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचा विकास व विस्तार घडून येतो. त्यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढतो. त्यांच्या मते, शेतकरी, उद्योजक आणि व्यावसायिक या तीन मध्यस्थांची कार्ये एकमेकांना पूरक असतात. शेतीचा विकास घडून आला की उद्योग व व्यापारात वाढ होते. शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली की आर्थिक विकासाचा वेग वाढतो. शेतीच्या (शेतकऱ्यांच्या) उत्पन्नात वाढ झाल्यामुळे त्यांच्याकडून उद्योग व व्यापार क्षेत्रातील वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होते. त्यामुळे उद्योग क्षेत्राचा विकास घडून येतो. व्यापारातही वाढ होते. प्रगत कृषी तंत्रज्ञानाचा वापर शेतीत केल्याने कृषी उत्पादनात वाढ घडून येते. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासात शेतकरी, उद्योजक आणि व्यावसायिक हे तीन घटक (मध्यस्थ) अत्यंत महत्त्वाचे असतात. हे तीन घटक राष्ट्राच्या आर्थिक विकासात महत्त्वाची (मध्यस्थांची) भूमिका बजावत असतात.

**७) विकासाची प्रक्रिया** (Proces of Development / Cumulative Development Process) **:**

ॲडम स्मिथ यांच्या मते, भांडवल संचयातील वाढीमुळे आणि बाजारपेठांच्या विस्तारामुळे श्रमविभागणी शक्य होते. त्यामुळे श्रमविभागणीचे फायदे मिळतात. श्रमविभागणीतील वाढीमुळे उत्पादनात आणि उत्पादकतेत वाढ घडून येते. त्यामुळे स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP मध्ये) म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. त्यामुळे बचत व गुंतवणुकीत वाढ घडून येते. दारिद्र्याच्या दुष्टचक्रात सापडलेल्या मागासलेल्या देशांना दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचा सल्ला स्मिथ यांनी दिला आहे. ते म्हणतात, ''अशा देशांनी दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी बचत व गुंतवणूक वाढविली पाहिजे.''

**८) स्थितीशील अवस्था** (Stationary State) **:**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथात आर्थिक विकासाची प्रक्रिया का आणि कशी थांबते? याचे वर्णन केले आहे. (Adam Smith belived that the progressive state was not endless.) त्यांच्या मते, देशाच्या विकासाच्या प्रक्रियेला शेवट नसतो असे नाही. कालांतराने (आर्थिक विकासाची प्रक्रिया

पूर्ण झाल्यानंतर) देशाचा विकास होण्याचे थांबते. देश स्थितीशील अवस्थेकडे जातो. आर्थिक विकासाची प्रक्रिया थांबणे म्हणजे स्थितीशील अवस्था निर्माण होणे होय. स्थितीशील अवस्थेची / स्थैतिक अवस्थेची संकल्पना पूर्ण रोजागाराच्या स्थितीशी संबंधित आहे. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित झाला की विकास स्थितीशील अवस्थेकडे जातो. म्हणजेच देशाचा विकास थांबतो. जेव्हा देशातील सर्व साधनसंपत्ती वापरून झालेली असते तेव्हा देशाची विकास प्रक्रिया थांबते. नैसर्गिक साधनसामग्रीचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे स्थैतिक अवस्था निर्माण होते. म्हणजेच विकास प्रक्रिया थांबते. पूर्ण स्पर्धेमुळे मजुरांचे मजुरीचे दर निर्वाह पातळीपेक्षा खाली येतात. उद्योजक- व्यावसायिकामधील अतितीव्र स्पर्धेमुळे उत्पादकांचा नफा सतत घटत जातो आणि शेवटी तो खूपच कमी होतो. त्यामुळे गुंतवणूकीत सुद्धा घट होऊ लागते. अशा प्रकारे भांडवलशाही अर्थव्यवस्था स्थितीशील अवस्थेत जाऊन पोहचते. दरडोई उत्पन्न, राष्ट्रीय उत्पन्न घटते. अर्थव्यवस्था जेव्हा स्थैतिक (कुंठित) अवस्थेला पोहचते तेव्हा समाजातील सर्व लोकांचे जीवन अत्यंत कठीण आणि वेदनादायी बनते. खुल्या बाजारात अर्थव्यवस्थेमुळे हे सर्व घडते असे स्मिथ म्हणतात. (According to Adam Smith the stationary state is dull, the declining melancholy. Life is hard in the stationary state for the different sections of the society and miserable in the declining state. All this happens in a free market economy.)

**आकृतीच्या साहाय्याने स्पष्टीकरण :**




वरील आकृतीत OX अक्षावर कालावधी (Time) हा घटक दर्शवला आहे. तर OY अक्षावर भांडवल संचयाचा दर (Rate of accumulation) दर्शविला आहे. O ते T पर्यंत (T कालावधीपर्यंत) K ते S पर्यंत अर्थव्यवस्थेची वाढ होते (आर्थिक वाढ होते.) परंतु T नंतर अर्थव्यवस्था कुंठित अवस्थेत पोहचते. S नंतर

विकास थांबतो. कारण वेतनाचे दर वाढतात. नफा शून्य होतो आणि त्यामुळे भांडवल संचय (आर्थिक विकास) थांबतो.

**ॲडम स्मिथ यांच्या विकास सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण :**

ॲडम स्मिथ यांचा आर्थिक विकास सिद्धांतात काही दोष किंवा उणिवा आहेत. म्हणून या सिद्धांतावर काही टीकाकारांनी खालीलप्रमाणे टीका केल्या आहेत.

**१) पूर्ण स्पर्धेचे गृहीत चुकीचे व अवास्तव :**

ॲडम स्मिथ यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत पूर्ण स्पर्धेच्या गृहीतावर आधारित आहे. टीकाकारांच्या मते, पूर्ण स्पर्धेचे गृहीत चुकीचे व अवास्तव आहे. पूर्ण स्पर्धा प्रत्यक्ष व्यवहारात आढळत नाही. त्यांच्या मते, पूर्ण स्पर्धेच्या बाजारातील निर्हस्तक्षेपाचे धोरण जगात कोठेच आढळत नाही. खाजगी क्षेत्रावर सरकारची अनेक बंधने असतात. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारावरही सरकारची नियंत्रणे असतात. अशा प्रकारे जगात कोठेही पूर्ण स्पर्धा आढळत नाही. म्हणून चुकीच्या गृहीतावर मांडणी करण्यात आलेला ॲडम स्मिथ यांचा सिद्धांत टीकेस पात्र ठरतो.

**२) संयोजकाच्या भूमिकेकडे दुर्लक्ष :**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात संयोजकाच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले आहे. संयोजकांची आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका असते. शुंपीटर यांच्या मते, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत संयोजकांची भूमिका खूप महत्त्वाची असते. संयोजक नवप्रवर्तन करत असतात. त्यामुळे भांडवल संचयाचा आणि आर्थिक विकासाचा दर वाढत असतो. परंतु ॲडम स्मिथ यांनी संयोजकाच्या आर्थिक विकासातील महत्त्वपूर्ण भूमिकेचा विचार केला नाही, ही त्यांच्या सिद्धांतातील मोठी उणिव आहे.

**३) भांडवलदार, जमीनदार आणि सावकार लोकच बचत करतात हे चूक :**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात फक्त भांडवलदार, जमीनदार आणि सावकारच बचत करतात असे म्हटले आहे. समाजातील इतर घटक बचत करत नाहीत असे म्हटले आहे. स्मिथ यांचे बचतीविषयक हे विचार बरोबर नाहीत. टीकाकारांच्या मते, समाजातील उत्पन्न मिळवणारे लोक (पगारदार कर्मचारी, अधिकारी, औद्योगिक कामगार) बचत करत असतात. परंतु त्याकडे स्मिथ यांनी दुर्लक्ष केले आहे.

**४) स्थैतिक अवस्थेचे गृहीत अवास्तव :**

टीकाकारांच्या मते, स्मिथ यांचे स्थितीशील अवस्थेचे गृहीत अवास्तव आहे. स्मिथ यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत स्थैतिक अवस्थेच्या गृहीतावर आधारलेला आहे. पण टीकाकारांच्या मते, हे गृहीतच चुकीचे आहे. (The assumption of the statioinary state is unrealistic) According to Smith, "There is progress but it is steady, uniform and regular like a tree." स्मिथ यांच्या मते, अर्थव्यवस्थेत नियमित

आणि एकसारखी प्रगती होत असते. झाडाची उंची जशी एका विशिष्ट अवस्थेपर्यंत होते, त्यानंतर झाडाची उंची न वाढता झाडाच्या फांद्याच केवळ विस्तारतात. त्याप्रमाणे भांडवलशाहीत आर्थिक विकास होतो. टीकाकारांच्या मते, स्मिथ यांनी विकासाचे दिलेले हे स्पष्टीकरण बरोबर नाही किंवा पटण्यासारखे नाही. त्यांच्या मते, विकासाची प्रक्रिया ही सरळ, सतत, एकसारखी चालणारी नसते. तर 'झटका आणि सुरवात' (Fits and starts) या स्वरूपाची असते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्थिर अवस्था (Stationary State) येते आणि विकासाचा शेवट होतो हे स्मिथ यांचे मत चुकीचे आहे.

**५) मध्यम वर्गाकडे दुर्लक्ष :**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील मध्यमवर्गीयांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले आहे. स्मिथ यांनी समाजात दोनच वर्ग असतात असे म्हटले आहे. (१) भांडवलदार (जमीनदारासहित) व (२) श्रमिक अशा दोन गटात त्यांनी समाजाची विभागणी केली असून ही ताठर विभागणी (Rigid division of society) आहे, असे टीकाकार म्हणतात. टीकाकारांच्या मते, आधुनिक समाजात आर्थिक विकासात मध्यमवर्गीयांची भूमिका महत्त्वाची असते. परंतु स्मिथ यांनी मध्यमवर्गीयांच्या विकासातील भूमिकेला महत्त्व दिलेले नाही, ही या सिद्धांताची मोठी उणिव आहे.

**६) स्थैतिक प्रतिमान** (Static Model) **:**

हिक्स यांच्या मते, स्मिथ यांचे विकासाचे प्रतिपादन हे स्थैतिक प्रतिमान (Static Model) आहे.

**सारांश :** अशा प्रकारे ॲडम स्मिथ यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतावर वरीलप्रमाणे टीका केल्या जात असल्या तरी या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. स्मिथ यांच्या विचाराचा जगावर अनेक वर्षे प्रभाव होता. त्यांच्या सिद्धांतातील अनेक आर्थिक विचार किंवा आर्थिक संकल्पना आजही उपयुक्त आहेत. देशाचा आर्थिक विकास कसा होतो? आणि आर्थिक विकास पूर्ण झाल्यानंतर विकासाचा शेवट कसा व का होतो? याचे उत्तम विवेचन स्मिथ यांनी केले आहे. त्यामुळे स्मिथ यांचा सिद्धांत जगाला आजही मार्गदर्शक आहे.

**रिकार्डो यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत** (Ricardian Theory of Economic Development) **:**

**प्रास्ताविक :**

रिकार्डो हे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ असून सनातनवादी अर्थशास्त्रज्ञामध्ये ॲडम स्मिथ यांच्या खालोखाल त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. स्मिथ यांच्याप्रमाणे रिकार्डो हे सुद्धा एक प्रमुख सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आहेत. स्मिथ यांनी ज्याप्रमाणे स्वतंत्रपणे आर्थिक विकासाचा सिद्धांत मांडला नाही त्याप्रमाणे रिकार्डो यांनी सुद्धा आर्थिक विकासाचा स्वतंत्र असा सिद्धांत मांडलेला नाही. त्यांनी अर्थशास्त्रावर जे लेखन केले आहे त्या लेखनामध्ये आर्थिक विकासासंदर्भात जे विचार मांडले आहेत ते विचार एकत्र करून आपणास रिकार्डो यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत मांडता येतो. तशी मांडणी याठिकाणी केली आहे. १७७२ ते १८२३ या काळात

डेव्हिड रिकार्डो होऊन गेले. रिकार्डो यांचा जन्म १७७२ चा आणि मृत्यू १८२३ चा. रिकार्डो यांनी 'राजकीय अर्थव्यवस्थेची आणि करांची तत्त्वे' (The Principles of Political Economy and Taxation) हा ग्रंथ लिहिला असून या ग्रंथात त्यांनी आर्थिक विकाससंदर्भात काही विचार मांडलेले आहेत. त्यांच्या ग्रंथाची पहिली आवृत्ती सन १८१७ साली प्रसिद्ध झाली. तर तिसरी आवृत्ती सन १९२१ मध्ये प्रकाशित झाली. ॲडम स्मिथ यांनी राष्ट्राच्या संपत्तीवर (वाढीवर) अधिक भर दिला होता तर रिकार्डो यांनी 'उत्पन्नाचे विभाजन आणि परकीय व्यापार' (Income Distribution and Foreign Trade) यावर अधिक भर दिला आहे. रिकार्डो यांनी वितरणाच्या सिद्धांताला (Theory of Distribution) अधिक महत्त्व दिले आहे. रिकार्डो यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत प्रामुख्याने सीमांत तत्त्व (Marginal Principle) आणि वाढावा तत्त्व (Surplus Principle) या तत्त्वावर आधारित आहे. सीमांत तत्त्व राष्ट्रीय उत्पन्नातील खंडाचा वाटा स्पष्ट करते तर आधिक्याचे (वाढाव्याचे) तत्त्व उर्वरित आधिक्याचे मजुरी आणि नफ्यामध्ये कसे विभाजन होते ते स्पष्ट करते. (The marginal principle explains the share of rent in the national output, while the surplus principle explains the division of the remaining share between wages and profits.)

**सिद्धांताची गृहीते :**

रिकार्डो यांचा सिद्धांत विविध गृहीतावर आधारित आहे. ही गृहीते खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

१) जमिनीचा पुरवठा स्थिर असतो.

२) जमिनीचा उपयोग अन्नधान्याच्या उत्पादनासाठी केला जातो.

३) शेतजमिनीला घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम लागू होतो.

४) अन्नधान्याची मागणी अलवचिक असते.

५) श्रम आणि भांडवल हे बदलते उत्पादन घटक आहेत.

६) भांडवल एकजिनसी असते.

७) सर्व कामगारांना निर्वाहाएवढे वेतन दिले जाते.

८) अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धा असते.

९) श्रमाची पुरवठा किंमत स्थिर असते.

१०) श्रमाची मागणी ही भांडवल संचयावर (भांडवलनिर्मितीवर) अवलंबून असते.

११) नफ्यातून भांडवल संचय होत असतो. (Capital accumulation results from profits)

१२) श्रमाची मागणी आणि पुरवठा किंमत स्वतंत्र असते आणि ती श्रमाच्या सीमांत उत्पादकतेशी संबंधित असते. (Demand and supply price are independent of the marginal productivity of labour.)

रिकार्डो यांच्या आर्थिक विकास सिद्धांतातील महत्त्वाचे घटक किंवा आर्थिक विचार यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे घटक :**

रिकार्डो यांच्या मते (१) जमीनदार (Landlords) (२) भांडवलदार (Capitalists) आणि कामगार (Labourers) हे अर्थव्यवस्थेतील तीन महत्त्वाचे घटक आहेत. देशातील संपूर्ण उत्पादक जमीन त्यांच्याकडे असते. जमीनदारांना खंड, भांडवलदारांना नफा आणि कामगारांना वेतन या स्वरूपात राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप होत असते. (According to Ricardo, there are three major gropus in the economy. They are (i) landlords (ii) Capitalists and (iii) Labourers among whom the entire productive land is distributed. The total national income is distributed among the three groups as rent, wages and profits respectively.) रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात शेतीला महत्त्वाचा घटक मानले आहे. देशाच्या आर्थिक विकासात शेती खूप महत्त्वाची भूमिका बजावते असे रिकार्डो म्हणतात. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेती क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. कृषी क्षेत्र वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्याबरोबर औद्योगिक क्षेत्राला लागणाऱ्या कच्च्या मालाचा सुद्धा पुरवठा करत असते. शेतीमुळे ग्रामीण भागातील लोकांची खरेदीशक्ती वाढण्यास आणि त्यामुळे प्रभावी मागणी वाढण्यास मदत होते. ग्रामीण भागातील लोकांची खरेदीशक्ती वाढल्यामुळे त्यांच्याकडून औद्योगिक क्षेत्रातील कारखानदारी वस्तूंना मागणी वाढते. अशा प्रकारे शेती क्षेत्र अर्थव्यवस्थेत (देशाच्या आर्थिक विकासात) महत्त्वाची भूमिका कशा प्रकारे बजावते ते रिकार्डो यांनी वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहे. भूमी (Land), श्रम (Labour) आणि भांडवल (Capital) हे उत्पादनाचे तीन घटक रिकार्डो यांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे मानले आहेत. तसेच तांत्रिक ज्ञान किंवा तंत्रज्ञान (Technology) हा घटक सुद्धा उत्पादनाच्या प्रक्रियेत महत्त्वाचा असतो, असे रिकार्डो यांनी म्हटले आहे. रिकार्डो यांच्या उत्पादन फलनाचे सूत्र खाली दिले आहे.

$$P = f(C, L, L, T)$$

Production is the fucntion of Capital, land, labour and technology

P = Production (उत्पादन)

f = Function (फलन)

C = Capital (भांडवल)

L = Land (जमीन)

L = Labour (कामगार)

T = Technology (तंत्रज्ञान)

भांडवल, भूमी, कामगार आणि तंत्रज्ञान यांच्यापासून उत्पादनाची निर्मिती होते. म्हणजे उत्पादन हे

भांडवल, भूमी, कामगार आणि तंत्रज्ञान यांचे फलन असते. देशातील एकूण उत्पादन म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न होय. भांडवल, जमीन, कामगार, तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने राष्ट्रीय उत्पन्नाची निर्मिती होते आणि या राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप या उत्पादन घटकामध्ये नफा, खंड आणि व्याज या स्वरूपात होते. भूमी, श्रम आणि भांडवल या उत्पादन घटकांच्या मालकांना खंड, वेतन आणि नफा कसा मिळतो ते रिकार्डो यांनी सांगितले आहे. ते म्हणतात, आर्थिक विकास जसजसा होत जातो तसतसा जमीनदारांना राष्ट्रीय उत्पन्नात मिळणारा वाटा वाढत जातो. कारण आर्थिक विकास होत असताना देशात शेतजमिनीचा तुटवडा निर्माण होतो. सुपीक जमिनीची टंचाई निर्माण होऊन सुपीक जमिनी संपुष्टात येतात. त्यामुळे कमी सुपीक जमिनी लागवडीखाली आणाव्या लागतात. चांगली जमीन मिळवण्याची स्पर्धा भांडवलदारामध्ये होते. त्यामुळे जमीनदारांना राष्ट्रीय उत्पन्नात अधिक वाटा मिळतो. भांडवलदार त्यांना मिळणारा नफा आणखी नफा मिळवण्यासाठी गुंतवतात. म्हणजे भांडवलदार नफ्याची पुनर्गुंतवणूक करतात. भांडवलदार गुंतवणूकीचे काम करत असल्यामुळे भांडवल संचयात वाढ घडून येते. म्हणून रिकार्डो यांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भांडवलदारांची भूमिका महत्त्वाची असते असे म्हटले आहे. उत्पादन प्रक्रियेतील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे श्रमिक किंवा कामगार होय. रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात कामगारांना निर्वाहापुरते म्हणजे जगण्यापुरते वेतन मिळते असे म्हटले आहे. कामगारांना वेतन देण्यासाठी वेतन निधी तयार केला जातो. त्या वेतननिधीतून कामगारांना वेतन दिले जाते. वेतननिधीला कामगारांच्या संख्येने भागले असता जो वेतन दर येतो ते वेतन कामगारांना दिले जाते. कामगारांना त्यांच्या निर्वाहस्तरापेक्षा अधिक मजुरी मिळाली तर कामगारांची संख्या वाढते. म्हणजेच कामगारांचा पुरवठा वाढतो. याऊलट कामगारांना त्यांच्या निर्वाहापेक्षा कमी मजुरी मिळाली तर कामगारांची संख्या कमी होते. म्हणजेच कामगारांचा पुरवठा कमी होतो.

**शेतीला घटत्या उत्पादन फलाचा नियम लागू :**

अर्थशास्त्रात घटत्या उत्पादन फलाचा नियम आहे. तो नियम शेतीला लागू पडतो असे रिकार्डो यांनी म्हटले आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या मार्गात मोळा अडथळा निर्माण होतो असे रिकार्डो म्हणतात. वाढत्या लोकसंख्येमुळे सुपीक शेतीतील अन्नधान्य पुरत नाही. त्यामुळे कमी सुपीक जमीन लागवडीखाली आणून उत्पादन करावे लागते. परंतु शेतीतील उत्पादन घटत्या फलानुसार होते. सुपीक जमिनीएवढे उत्पादन कमी सुपीक जमिनीत होत नाही. म्हणून रिकार्डो यांनी देशाच्या आर्थिक विकासाचे नियोजन करणाऱ्या नियोजनकारांना कृषी उत्पादन घटू नये यासाठी कृषी संशोधनावर भर द्यावा असे सुचवले आहे. (Ricardo advised planners of economic development to give priority for agricultural research, so as to curb the tendency of diminishing returns in agriculture through the utilisation and application of improved technology.) वाढत्या लोकसंख्येमुळे कमी सुपीक किंवा हलक्या दर्जाच्या शेतीत उत्पादन घ्यावे लागत असल्याने कृषी उत्पादनात घट होते. परंतु शेतीत नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला तर थोड्या काळापुरता घटत्या उत्पादन फलाचा नियम रोखून धरता येतो. म्हणजे नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कृषी उत्पादनात वाढ घडवून आणता येते.

**भांडवल संचय** (Capital Accumulation) **:**

रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात भांडवल संचयाला (भांडवल निर्मितीला) विशेष महत्त्व दिले आहे. भांडवल (भांडवलनिर्मिती) हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा स्रोत आहे असे रिकार्डो यांनी म्हटले आहे. आर्थिक विकासात भांडवलदार महत्त्वाची भूमिका बजावतात. कारण समाजातील हाच वर्ग जास्तीत जास्त बचत करत असतो. भांडवलदारांना जो नफा मिळतो त्यामुळे भांडवलनिर्मिती होते असे रिकार्डो म्हणतात. (According to Ricardo, "Capital is saved from profits and high profits are favourable to the accumulation of capital.") रिकार्डो यांच्या मते, नफा हा भांडवलनिर्मितीचा मुख्य स्रोत आहे. तर वेतन आणि खंड हे दुय्यम स्रोत आहेत. कामगार आणि जमीनदार जास्त बचत करू शकत नाहीत. भांडवलदारच जास्त बचत करू शकतात. रिकार्डो यांनी स्थिर भांडवल (Fixed Capital) आणि खेळते भांडवल (Circulating Capital) असे भांडवलाचे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यांनी अवजारे, यंत्रसामग्री, कच्चा माल या बाबींचा समावेश स्थिर भांडवलात केला आहे. तर वेतन निधीचा समावेश खेळत्या भांडवलात केला आहे. स्थिर भांडवलात वाढ झाली तर वेतन निधीत वाढ घडून येते.




बचत करण्याची क्षमता (Capacity to save) आणि बचतीची इच्छा (will to save) या दोन घटकावर भांडवलनिर्मिती अवलंबून असते असे रिकार्डो यांनी म्हटले आहे. (According to Ricardo, "Capital accumulation depends on two factors : firstly, the capicity to save and secondly, will to save.") भांडवलनिर्मितीमध्ये बचत करण्याच्या इच्छेपेक्षा बचत करण्याची क्षमता महत्त्वाची असते. ही बचत करण्याची क्षमता समाजाच्या निव्वळ उत्पन्नावर अवलंबून असते. निव्वळ उत्पन्नालाच वाढावा किंवा आर्थिक वाढावा (Economic Surplus) असे म्हणतात. एकूण उत्पन्नातून कामगारांच्या वेतनाचा खर्च वजा केला असता निव्वळ उत्पन्न प्राप्त होते. एका विशिष्ट काळात तयार झालेल्या अंतिम वस्तूंची बाजार किंमत म्हणजे एकूण उत्पन्न (Gross Revenue) होय. नफा किंवा वाढावा जितका जास्त तितकी भांडवलदारांची बचत करण्याची क्षमता (Capacity to save) जास्त राहते. बचत क्षमता जितकी जास्त तितकी भांडवलनिर्मिती जास्त राहते. अशा प्रकारे भांडवलसंचय हा नफ्यावर किंवा वाढाव्यावर अवलंबून असतो. नफा किंवा वाढावा जितका जास्त तितकी भांडवलनिर्मिती जास्त राहते आणि भांडवलनिर्मितीचा दर वाढला की आर्थिक विकासाचा दर वाढतो. वाढाव्यात किंवा निव्वळ उत्पन्नात वाढ झाली की बचतीत वाढ होते असे रिकार्डो म्हणतात. ही बचत कशी वाढते ते सांगताना ते म्हणतात, "Out of two loans I may save one, out of four I may save three." रिकार्डो यांच्या मते, भांडवलदार आणि जमीनदार वर्गाची बचतक्षमता ही नफ्याच्या दरावर अवलंबून असते. नफ्याच्या दरात वाढ झाली की त्यांची बचत वाढून भांडवलनिर्मितीचा दरही वाढतो. त्यांच्या मते, नफ्याचा दर

हा कामगारांच्या वेतनावर अवलंबून असतो. वेतनाचा दर धान्याच्या किंमतीवर अवलंबून असतो आणि धान्याच्या किंमती सीमांत जमिनीच्या उत्पादकतेवर अवलंबून असतात. (The Profits depend on wages, wages on the price of corn and the price of the corn depends on the fertility of the marginal land.) नफा आणि वेतन या दोन घटकामध्ये व्यस्त संबंध असतात. वेतनातील वाढ किंवा घट ही धान्याच्या किंमतीवर अवलंबून असते. वेतनात वाढ झाली तर नफ्यात घट होते आणि वेतनात घट झाली तर नफ्यात वाढ होते. शेतीत चांगल्या तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी उत्पादनात वाढ घडवून आणता येते. त्यामुळे कृषी मालाचा (धान्याचा) पुरवठा वाढून धान्याच्या किंमती कमी होतात. त्यामुळे कामगारांच्या निर्वाह वेतन दरात घट होते. निर्वाह वेतन दरात घट झाल्यामुळे भांडवलदारांच्या नफ्यात (वाढाव्यात) वाढ होते. त्यामुळे भांडवल संचयात वाढ घडून येते. कारण भांडवलदारांच्या नफ्यात वाढ झाली की भांडवलदार त्या नफ्याची नफा मिळवून देणाऱ्या क्षेत्रात गुंतवणूक करतात. थोडक्यात भांडवलनिर्मितीचा दर वाढण्यासाठी निव्वळ नफ्याचा दर अधिक असणे आवश्यक आहे. नफ्यात वाढ झाली की भांडवलनिर्मितीचा दर वाढतो, त्यामुळे भांडवलाची गुंतवणूक वाढते. भांडवलाची गुंतवणूक वाढल्यामुळे कामगारांची मागणी वाढते. कामगारांची मागणी वाढल्यामुळे मजुरीचे दर वाढतात. मजुरीच्या दरात वाढ झाली की कामगार अधिक अपत्यांना जन्म देतात. कारण मजुरी दरातील वाढीमुळे ते जास्त अपत्यांना पोसू शकतात. त्यामुळे देशाची लोकसंख्या वाढते. लोकसंख्या वाढल्यामुळे अन्नधान्याची मागणी वाढते. त्यामुळे अन्नधान्याच्या किंमती वाढतात. कामगारांच्या वेतनात वाढ झाल्यामुळे जमीनदार, भांडवलदार यांना मिळणाऱ्या नफ्यामध्ये घट होते. त्यामुळे निव्वळ नफ्याचा दर कमी होऊन भांडवलनिर्मितीचा दर कमी होतो. नफा शून्य होईपर्यंत ही प्रक्रिया चालते असे रिकार्डो म्हणतात. नफा शून्य झाला की भांडवलनिर्मिती घटून भांडवलाची गुंतवणूकही थांबते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत स्थैतिक अवस्था (stationary state) येते. स्थैतिक अवस्था म्हणजे स्थितीशील किंवा गतिशून्य अवस्था होय. पण ही अवस्था अर्थव्यवस्थेत कायमपणे टिकून राहत नाही. नफा शून्य होणे म्हणजे गतिशील प्रक्रियेचा शेवट नव्हे.

**भांडवल संचयाचे इतर मार्ग :**

आर्थिक विकासासाठी भांडवलनिर्मितीचा दर अधिक असणे आवश्यक असते. त्यासाठी रिकार्डो यांनी काही मार्ग सांगितले आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

**१) उत्पादनात वाढ घडवून आणणे** (Increase in Production) **:**

रिकार्डो यांनी आर्थिक विकासासाठी उत्पादन वाढीवर भर दिला आहे. त्यांनी अनुत्पादक उपभोग (unproductive consumption) कमी करावा असे म्हटले आहे. चांगले संघटन (Better organisation) आणि चांगले तंत्रज्ञान वापरून श्रमिकांची उत्पादकता वाढवता येते. त्यामुळे भांडवल संचयात वाढ घडून येते. यंत्रसामग्रीचा अधिकाधिक वापर करून उत्पादनात वाढ घडवून आणता येते. उत्पादनासाठी यंत्रांचा अधिक वापर केल्यास कामगारांची बेकारी वाढते. त्यामुळे कामगारांच्या वेतनात घट होते. उत्पादनात यंत्रांचा अधिक वापर केल्यामुळे कामगारांना मागणी कमी येते. त्यामुळे कामगारांच्या मजुरीत घट होते. (Use of more machines

will replace labour which will lead to unemployment and reduction in wages.) मजुरीच्या दरात घट झाल्याने कामगार आपल्या जीवनावश्यक गरजासुद्धा पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे ते आपल्या कुटुंबाचा आकार लहान ठेवतील.

**२) कर** (Taxes) **:**

कर आकारणी हा भांडवलनिर्मितीचा महत्त्वाचा स्रोत आहे. सरकारच्या हातातील हे महत्त्वाचे साधन आहे. सरकारचया कर आकारणीमुळे भांडवलदार, जमीनदार आणि कामगार यांच्याकडील काही उत्पन्न सरकारकडे जमा होते. त्यामुळे भांडवली गुंतवणूक कमी होते. म्हणून रिकार्डो यांनी कर आकारणीला विरोध केला आहे. कर आकारणीमुळे अनावश्यक उपभोग कमी होतो असे रिकार्डो म्हणतात. परंतु कर बसवल्यामुळे लोकांच्या उत्पन्नात, नफ्यात आणि भांडवल नितीच्या दरात घट होते. म्हणून कर आकारणी करू नये असे रिकार्डो यांनी म्हटले आहे. (According to Ricardo, "Taxes reduce income, profits and ultimately capital accumulation.")

**३) मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार** (Free International Trade) **:**

रिकार्डो यांनी आर्थिक विकासासाठी मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराचे समर्थन केले आहे. आर्थिक विकासात आंतरराष्ट्रीय व्यापाराची भूमिका महत्त्वाची असते असे रिकार्डो म्हणतात. त्यांनी खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचा पुरस्कार केला आहे. (According to Ricardo, "Free International trade is an important factor of economic development of a country.") मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशातील भांडवलदारांच्या नफ्यात वाढ होते. आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधने नसल्यास भांडवलदार विदेशांना मोठ्या प्रमाणात वस्तूची निर्यात करू शकतात. निर्यातप्रधान उद्योगात ते गुंतवणूक करतील. त्यामुळे त्यांची निर्यात वाढून त्यांच्या नफ्यात मोठी वाढ होते. या नफ्याची भांडवलदारांकडून गुंतवणूक होऊन आर्थिक विकासाला चालना मिळते. अशा प्रकारे भांडवलनिर्मितीच्या दरात आणि आर्थिक विकास दरात वाढ घडवून आणण्यासाठी मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार फायद्याचा असतो. भांडवलनिर्मितीचा दर नफ्यावर अवलंबून असल्याने भांडवलदारांच्या नफ्यात वाढ होण्यासाठी रिकार्डो यांनी कोणतीही बंधने नसलेल्या मुक्त किंवा खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे समर्थन केले आहे.

**सारांश :** रिकार्डो यांनी आर्थिक विकासात भांडवलसंचयाची भूमिका किती महत्त्वाची असते ते स्पष्ट केले आहे. भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ घडून आल्याशिवाय आर्थिक विकास दरात वाढ घडून येत नाही. भांडवलनिर्मिती ही नफ्याच्या दरावर अवलंबून असते. म्हणून नफ्याच्या दरात वाढ झाली पाहिजे, असे रिकार्डो यांनी म्हटले आहे. भांडवलदारांचा नफा वाढावा यासाठी त्यांनी मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराचा पुरस्कार केला आहे. कर आकारणी केल्यास नफा घटून भांडवलनिर्मितीचा दर घटतो असे रिकार्डो यांनी म्हटले आहे. म्हणून त्यांनी करआकारणीला विरोध केला आहे. त्याऐवजी त्यांनी निर्यात व्यापाराचा पुरस्कार केला आहे. जगातील ज्या अविकसित देशात लोकसंख्या प्रचंड आहे त्या देशांनी लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवावे असा महत्त्वपूर्ण

उपाय रिकार्डो यांनी सुचवला आहे. अप्रगत देशांच्या आर्थिक विकासासाठी रिकार्डो यांनी खालील उपाय सुचवले आहेत.

१) शेतीची उत्पादकता वाढावी यसाठी शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा.

२) ज्या देशात सुपीक जमीन पडून आहे त्यांनी ती लागवडीखाली आणून उत्पादनात वाढ घडवून आणावी.

३) देशात शांतता, कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करावी.

४) लोकसंख्या वाढीच्या दरावर नियंत्रण ठेवावे.

**रिकार्डो यांच्या सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण :**

रिकार्डो यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात अनेक महत्त्वपूर्ण बाबी आहेत. तरीही या सिद्धांतात काही दोष आहेत. म्हणून या सिद्धांतावर टीकाकारांनी टीका केल्या आहेत. त्या टीका खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

**१) व्याजदराकडे दुर्लक्ष :**

रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकास सिद्धांतात व्याजाच्या दराकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांनी व्याजाचा स्वतंत्रपणे विचार न करता व्याजाचा नफ्यामध्ये समावशे केला आहे. त्यामुळे भांडवलदार आणि संयोजक यामध्ये फरक होत नाही. टीकाकारांच्या मते, भांडवलदार (Capitalist) आणि संयोजक (Entrepreneur) यांच्यामध्ये फरक आहे. परंतु तो फरक रिकार्डो यांनी केलेला नाही. त्यांनी व्याजाचा समावेश नफ्यामध्ये केला आहे. परंतु व्याजाचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे.

**२) पूर्ण स्पर्धेचे गृहीत चुकीचे :**

रिकार्डो हे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी इतर सनातनवादी अर्थशास्त्रज्ञाप्रमाणे आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात पूर्ण स्पर्धेचे गृहीत घेतले आहे. परंतु पूर्ण स्पर्धा ही काल्पनिक बाब आहे. प्रत्यक्ष व्यवहारात पूर्ण स्पर्धा कुठेही आढळत नाही. त्याचा विचार रिकार्डो यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

**३) उत्पादनाचे घटक गतिशील असतात हे चूक :**

रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात उत्पादनाचे घटक गतिशील असतात असे म्हटले आहे. प्रत्यक्षात असे आढळत नाही. अविकसित राष्ट्रात भांडवल हा घटकही फारसा गतिशील नसतो. कामगारही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास फारसे उत्सूक नसतात. त्याचा विचार रिकार्डो यांनी केलेला नाही.

**४) जमिनीचा उपयोग केवळ धान्य उत्पादनासाठी केला जातो हे चूक :**

रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात शेतजमिनीचा उपयोग केवळ अन्नधान्याच्या उत्पादनासाठी केला जातो असे म्हटले आहे. परंतु आपणास माहित आहे की, जमिनिचा उपयोग केवळ धान्य उत्पादनासाठी ककेला जात नाही तर इतरही कारणांसाठी जमिनीचा उपयोग केला जातो. परंतु त्याचा विचार रिकार्डो यांनी केलेला नाही.

**५) सरकारी हस्तक्षेपाकडे दुर्लक्ष :**

इतर सनातनवादी अर्थशास्त्रज्ञाप्रमाणे रिकार्डो यांनीही 'निर्हस्तक्षेप धोरणाचा' (Laissez Fair Policy) पुरस्कार केला आहे. (According to this plicy, "There is no government interference and the economy operates automatically through perfect competition." अविकसित देशांच्या आर्थिक विकासात सरकारची भूमिका खूप महत्त्वाची असते. अप्रगत देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागतो. परंतु त्याचा विचार रिकार्डो यांनी केलेला नाही. निर्हस्तक्षेप धोरण अप्रगत राष्ट्रांना उपयोगी पडत नाही.

**६) स्थितीशील अवस्थेची कल्पना चुकीची** (Wrong Notion of the statronary state) **:**

रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात स्थैतिक अवस्थेची संकल्पना मांडली आहे. अर्थव्यवस्थेचा विकास झाल्यानंतर काही काळानंतर अर्थव्यवस्था स्थितीशील अवस्थेत येते असे रिकार्डो आपल्या सिद्धांतात म्हणतात. परंतु टीकाकारांच्या मते, रिकार्डो यांची ही आधारहीन संकल्पना आहे. याला कोणताही आधार नाही किंवा पुरावा नाही.

**७) लोकसंख्या आणि वेतनाचा संबंध चुकीचा :**

टीकाकारांच्या मते, रिकार्डो यांनी लावलेला लोकसंख्या आणि वेतनाचा संबंध चुकीचा आहे. लोकसंख्येत वाढ झाली की वेतनात घट होते आणि लोकसंख्या घटली की वेतनात घट होते. असे रिकार्डो म्हणतात. परंतु भारतासारख्या अनेक देशात आपण असे पाहतो की, लोकसंख्येत वाढ होत असतानाही वेतनाचे दर कमी झाले नाहीत. उलट लोकसंख्या वाढत असतानासुद्धा वेतनात वाढ होत आहे. म्हणून लोकसंख्या वाढली की वेतनाचे दर घटतात, हे रिकार्डो यांचे प्रतिपादन आजच्या परिस्थितीत तरी खरे वाटत नाही.

**८) संस्थात्मक घटकाकडे दुर्लक्ष** (Neglects the Role of Institutional Factors) **:**

देशाच्या आर्थिक विकासात संस्थात्मक घटकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. परंतु रिकार्डो यांनी त्याचा विचार आपल्या सिद्धांतात केलेला नाही. ही रिकार्डो यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतातील महत्त्वाची उणीव आहे.

**९) तंत्रज्ञानाच्या परिणामाकडे दुर्लक्ष** (Neglets Impact of Technology) **:**

रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात तंत्रज्ञानातील सुधारणामुळे म्हणजेच यंत्रांचा वापर केल्यामुळे कामगार बेकार होतात असे म्हटले आहे. अल्पकाळात हे खरे होत असले तरी दीर्घकाळात हे खरे वाटत नाही असे टीकाकार म्हणतात. दीर्घकाळात तंत्रज्ञानातील सुधारणामुळे (यंत्रांच्या वाढत्या वापरामुळे) उत्पादनात वाढ होऊन आर्थिक विकासाचा वेग वाढतो. तसेच रोजगाराच्या संधीही वाढतात. परंतु त्याचा विचार रिकार्डो यांनी केलेला नाही.

**१०) भांडवल व श्रम स्वतंत्र घटक असतात त्याकडे दुर्लक्ष :**

टीकाकारांच्या मते, भांडवल आणि श्रम हे स्वतंत्र घटक असतात. परंतु त्याचा विचार रिकार्डो यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

**११) वितरणाला / विभाजनाला अधिक महत्त्व :**

शूंपीटर यांच्यासारख्या टीकाकारांनी या सिद्धांतावर कडक शब्दात टीका केली आहे. त्यांच्या मते, रिकार्डो यांचा सिद्धांत उत्पादनापेक्षा त्याच्या विभाजनावर अधिक भर देतो. (According to Prof. Schumpeter, "Ricardian Theory is not growth theory but a theory of distribution which determines the share of capitalists, landlords and labourers.")

**१२) बचत करणाऱ्या इतर वर्गाकडे दुर्लक्ष :**

रिकार्डो यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात भांडवलदार बचत करतात असे म्हटले आहे. भांडवलदारच अधिक बचत करतात असे त्यांचे मत आहे. परंतु टीकाकारांच्या मते, समाजात केवळ भांडवलदारच बचत करतात असे नाही तर समाजातील शेतकरी, कामगार इत्यादी घटकसुद्धा बचत करत असतात. परंतु त्याचा विचार रिकार्डो यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

**समारोप :**

अशा प्रकारे रिकार्डो यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतावर विविध टीकाकारांनी वरीलप्रमाणे विविध टीका केल्या आहेत. या सिद्धांतात काही दोष असले तरी हा सिद्धांत अविकसित देशांना आजही उपयुक्त आहे. या सिद्धांतात रिकार्डो यांनी अनेक महत्त्वाच्या बाबी मांडल्या आहेत. त्या बाबी अप्रगत देशांना उपयोगी आहेत. आर्थिक विकासासाठी देशाच्या लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले पाहिजे हा त्यांचा विचार आजही अप्रगत देशांना उपयुक्त आहे. कारण अतिरिक्त लोकसंख्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण करते याचा अनुभव भारतासहित जगातील अनेक देश घेत आहेत. म्हणून रिकार्डो यांच्या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही.

**जे. एस. मिल यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत :**

**प्रास्ताविक :**

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञामध्ये ॲडम स्मिथ, रिकार्डो, थॉमस माल्थस आणि जे. एस. मिल यांचा समावेश

होतो. जे. एस. मिल (John Stuart Mill - जॉन स्टुअर्ट मिल) हे एक प्रमुख सनातनवादी विचारवंत होते. इतिहास आणि अर्थशास्त्र विषयाचे गाढे अभ्यासक जेम्स मिल यांचे जॉन स्टुअर्ट मिल हे मोठे चिरंजीव होते. जे. एस. मिल हे लहापणापासूनच खूप हुषार आणि बुद्धिमान होते. वयाच्या तिसऱ्या वषी ते ग्रीक भाषा शिकले होते. वयाच्या सहाव्या वर्षी ते लॅटिन भाषा शिकले होते. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी तर्कशास्त्राचा अभ्यास केला होता. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला होता. वयाच्या १५ व्या वर्षी त्यांनी राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता. जॉन स्टुअर्ट मिल यांचे सर्व शिक्षण आणि वाचन त्यांचे वडील जेम्स मिल (James Mill) यांच्या मार्गदर्शनाखाली घरीच झाले होते. प्रमुख सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ डेव्हिड रिकार्डो हे जेम्स मिल यांचे जवळचे मित्र होते. त्यामुळे रिकार्डो यांच्या विचारांचा प्रभाव जे. एस. मिल यांच्यावर पडलेला होता. मिल यांनी रिकार्डो यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करून त्यांच्या विवेचनात काही सुधारणा केल्या असून काही नवीन विचारांची भर त्यात घातली आहे. सन १८४८ मध्ये जे. एस. मिल यांनी 'राजकीय अर्थशास्त्राची तत्त्वे' (Principles of Political Economy) हा आपला पहिला ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या काळात हा ग्रंथ खूपच गाजला होता. जे. एस. मिल यांनी आपल्या हयातीत या ग्रंथांच्या सात आवृत्त्या निघालेल्या पाहिल्या. इंग्लंड आणि अमेरिकेतील विविध विद्यापीठांनी त्यांचे हे पुस्तक अभ्यासासाठी लावलेले होते. जवळ जवळ पन्नास वर्षे हे पुस्तक दोन्ही देशात शिकवले व अभ्यासले जात होते.

**मिल यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतातील प्रमुख घटक :**

जे. एस. मिल यांनी आर्थिक विकासाचा स्वतंत्र असा सिद्धांत मांडला नसला तरी त्यांनी राष्ट्राच्या आर्थिक विकासासंदर्भात जे विविध आर्थिक विचार मांडले आहेत, त्यांची एकत्रित मांडणी करून त्यावरून त्यांचा आर्थिक विकासाबाबतचा दृष्टिकोन समजून घेता येतो. जे. एस. मिल यांनी उत्पादन घटकाबाबत, लोकसंख्येच्या प्रश्नाबाबत, वेतन निधी, भांडवल संचय, नफा, सरकारची विकासातील भूमिका इत्यादी बाबत जे विचार मांडले आहेत ते आर्थिक विकासाशी संबंधित आहेत. जे. एस. मिल यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतातील हे प्रमुख घटक मानता येतील. या घटकांची थोडक्यात चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

**१) भूमी, श्रम, भांडवल हे आर्थिक विकास निश्चित करणारे महत्त्वाचे घटक :**

जे. एस. मिल यांनी आपल्या अर्थशास्त्रावरील ग्रंथात आर्थिक विकासावर परिणाम करणाऱ्या उत्पादन घटकांचे विवेचन केले आहे. त्यांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भूमी, श्रम, भांडवल हे महत्वाचे उत्पादन घटक असतात असे म्हटले आहे. According to J. S. Mill, "Economic Development is a Functin of Land, Labour and Capital." याचा अर्थ 'राष्ट्राचा आर्थिक विकास हा भूमी, श्रम आणि भांडवल या घटकांचे फलन आहे.'' म्हणजे भूमी, श्रम आणि भांडवल या उत्पादन घटकांचा आणि आर्थिक विकासाचा जवळचा संबंध असतो. देशाचा आर्थिक विकास हा या तीन उत्पादन घटकावर अवलंबून असतो. मिल यांचा हा विचार आपणास खालील सूत्राच्या साहाय्याने मांडता येईल.

**D = f (La, L, C)**

Development is the function of Land, Labour and Capital

D = Development (विकास)

f = Functional relationship (कार्यात्मक संबंध)

La = Land (भूमी)

L = Labour (श्रम)

C = Capital (भांडवल)

जे. एस. मिल यांनी उत्पादनाच्या भूमी, श्रम आणि भांडवल या तीन घटकापैकी भूमी आणि श्रम हे उत्पादनाचे दोन महत्त्वाचे मूलभूत (orginal) घटक आहेत असे म्हटले आहे. त्यांच्या मते, ''भांडवल हा पूर्वीच्या (अगोदरच्या) कामगारांनी साठवलेल्या उत्पादनाचा साठा असतो.'' (Capital is a stock previously accumulated of the products of former labour.) संपत्तीत केव्हा, कशी वाढ होते? या प्रश्नाचे उत्तर मिल यांनी दिले आहे. ते म्हणतात, ''श्रमशक्तीपेक्षा (labour force) भूमी आणि भांडवल हे उत्पादनाचे घटक उत्पादन वाढीस अधिक मदत करतील तेव्हाच संपत्तीत वाढ होणे शक्य असते.'' मिल यांनी संपत्तीमध्ये उपकरणे किंवा अवजारे (tools), यंत्रे (machines) आणि कामगारांचे कौशल्य (skills of labour force) या घटकांचा समावेश केला आहे. त्यांनी श्रमाचे उत्पादक श्रम (productive labour) आणि अनुत्पादक श्रम (unproductive labour) असे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यांनी या दोन्ही श्रमामध्ये फरक असतो असे म्हटले आहे. उत्पादक श्रम हे उत्पादक संपत्ती आणि भांडवल संचय असतात. भांडवल संचयाचा दर हे श्रमदलाचा जो भाग उत्पादक कार्यात गुंतलेला असतो त्याचे फलन असते. (The rate of capital accumulation is a function of the proportion of the labour force employed productively). अनुत्पादक श्रमामुळे संपत्ती (wealth) किंवा उत्पन्न (income) निर्माण होत नाही. उत्पादक श्रमामुळेच फक्त संपत्ती आणि भांडवल निर्मिती शक्य होते. जे. एस. मिल यांनी ज्याप्रमाणे उत्पादक श्रम आणि अनुत्पादक श्रम यामध्ये फरक केला आहे त्याप्रमाणे त्यांनी उत्पादक उपभोग आणि अनुत्पादक उपभोग असा फरक केला आहे. उत्पादक उपभोग कशाला म्हणतात आणि अनुत्पादक उपभोग कशाला म्हणतात ते त्यांनी स्पष्ट केले आहे. सर्व प्रकारचा उपभोग हा उत्पादक उपभोग नसतो. उत्पादक श्रमिकांकडून उत्पादक उपभोग घेतला जातो. समाजाची उत्पादक शक्ती वाढवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी घेतला जाणारा उपभोग म्हणजे उत्पादक उपभोग होय. केवळ उत्पादक उपभोग हे उत्पादक श्रम असतात. कामगारांकडून उपभोगल्या जाणाऱ्या निर्वाह वस्तूंचा उपभोग हा उत्पादक उपभोग असतो तर आरामदायी वस्तूंचा उपभोग हा अनुत्पादक उपभोग असतो. अनुत्पादक उपभोगापेक्षा उत्पादक उपभोग हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे, असे मिल यांनी म्हटले आहे. अशा प्रकारे उत्पादनाच्या कार्यात 'श्रम' हा महत्त्वाचा घटक असतो, असे मिल यांनी म्हटले आहे. त्यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात उत्पादन, उपभोग, विनिमय आणि वितरण या महत्त्वाचा चार प्रश्नांची चर्चा केली आहे.

**२) लोकसंख्या नियंत्रण** (Control of Population Growth) **:**

जे. एस. मिल यांना थॉमस माल्थस यांचा लोकसंख्या सिद्धांत मान्य होता. त्यांचा माल्थस यांच्या सिद्धांतावर विश्वास होता. लोकसंख्या आणि आर्थिक विकास या दोन घटकात जवळचे संबंध असतात असे त्यांनी म्हटले आहे. लोकसंख्यावाढ ही आर्थिक विकासाशी संबंधित बाब आहे. उत्पादन साधनातील वाढीपेक्षा लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असतो. अप्रगत देशात जलद लोकसंख्या वाढ ही अन्नटंचाईची समस्या निर्माण करते. त्यांनी आपल्या सिद्धांतात उत्पादक लोकसंख्येचा (कार्यकारी लोकसंख्येचा - working population) विचार केला आहे. उत्पादनाच्या प्रक्रियेत भाग घेत असलेल्या लोकसंख्येचाच विचार मिल यांनी लोकसंख्या संकल्पनेत केला आहे. लोकांच्या हालाखीला लोकसंख्या वाढ हा घटक कारणीभूत आहे असे मिल यांनी म्हटले आहे. लोकांच्या हालअपेष्टा कमी करण्यासाठी लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले पाहिजे. लोकसंख्या वाढ कमी करण्यासाठी उपाय योजले नाहीत तर लोकांची आर्थिक परिस्थिती खालावेल असे मिल यांनी म्हटले आहे. देशाची लोकसंख्या का वाढते?'' ते सुद्धा मिल यांनी सांगितले आहे ते म्हणतात, ''लोकांच्यात दूरदृष्टीचा अभाव असल्याने आणि लोकसंख्यावाढीचा वेग रोखण्यासाठी योग्य व निश्चित उपाय न योजल्याने देशाची लोकसंख्या वेगाने वाढते. लोक दूरदृष्टीचे नसल्यामुळे आपली संख्या वाढवत नेतात असे मिल यांनी म्हटले आहे. उत्पादक (कार्यकारी) लोकांच्या (कामगारांच्या) स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मगच तांत्रिक प्रगतीचे आणि भांडवल संचयाचे फायदे मिळतील. अशा प्रकारे आर्थिक विकासासाठी जन्मदर (Birth rate) कमी केला पाहिजे, असा विचार मिल यांनी मांडला आहे. त्यांचा हा विचार थॉमस माल्थस यांच्या विचारांशी मिळता जुळता आहे.

**३) वेतन निधी** (Wage Fund) **:**

कामगारांना वेतन देण्यासाठी वेतन निधी निर्माण केला जातो. हा वेतन निधी भांडवलाचा काही भाग बाजूला काढून तयार केला जातो. कामगारांचे वेतन हा अत्यंत महत्त्वाचा विषय असतो. वेतननिधीवर वेतनाचा दर अवलंबून असतो. वेतननिधी भागिले कामगार संख्या बरोबर वेतन दर होय.

$$\text{वेतन दर} = \frac{\text{वेतन निधी}}{\text{कामगारांची संख्या}}$$

वेतननिधीला कामगारांच्या संख्येने भागले असता वेतन दर किंवा मजुरीचा दर प्राप्त होतो. वेतन निधी स्थिर असताना कामगारांची संख्या वाढली तर कामगारांचे वेतनाचे दर कमी होतात आणि वेतननिधी स्थिर असताना कामगारांची संख्या घटली तर वेतनाचे दर वाढतात. वेतननिधीत वाढ झाली तर वेतनाचा दर वाढतो आणि वेतन निधीत घट झाली तर वेतनाचा दर घटतो. म्हणून वेतन दराच्या निश्चितीमध्ये वेतन निधी हा घटक महत्त्वाचा आहे. कामगारांच्या वेतनात वाढ करण्यासाठी दोन मार्ग आहेत (१) वेतन निधीत वाढ केली पाहिजे किंवा (२) कामगार संख्येत घट केली पाहिजे. कामगारांचे वेतन वाढले तर लोकसंख्या वाढून कामगारांचा पुरवठा वाढतो. कामगारांचा पुरवठा वाढला की वेतनाचे दर कमी होतात. तसेच काही कामगार बेरोजगार

होतात. जर देशाची लोकसंख्या स्थिर राहिली आणि वेतन निधीत वाढ झाली तर कामगारांच्या वेतनात वाढ घडून येईल. पण लोकसंख्या स्थिर राहणे ही कठीण गोष्ट आहे. वेतन निधी स्थिर (कायम) असेल आणि लोकसंख्येत वाढ घडून आली तर कामगारांच्या वेतनात घट होईल. लोकसंख्या आणि वेतन निधी या दोन्ही घटकात वाढ घडून आली तर यापैकी ज्या घटकातील वाढ अधिक प्रभावी असेल त्या घटकावर मजुरीचे निर्धारण होईल. वेतनाचा दर आणि श्रमपुरवठा यांच्यात जवळचे संबंध असतात. वेतनाचा दरात वाढ झाली की श्रमाचा पुरवठा वाढतो. सर्वांना काम मिळणार नाही. काम मिळवण्याची स्पर्धा वाढेल. त्यामुळे मजुरीचे दर कमी होतील. मिल यांच्या मते, भांडवल वाढीच्या वेगापेक्षा लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असतो. त्यामुळे कामगारांच्या मजुरीचे दर घटतात. (कारण वेतन निधी हा भांडवलाचा काही भाग बाजूला काढून तयार केला जातो.) त्यामुळे कामगारांच्या राहणीमानाचा दर्जा खालावतो. ते होऊ नये म्हणून जन्म दरावर नियंत्रण ठेवले पाहिजे. म्हणजेच लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे. मिल यांच्या मते, गुंतवणूकीत वाढ झाली तर वेतननिधीत वाढ होते. उपभोगात वाढ झाली की गुंतवणूकीत घट होते.

**४) भांडवल संचायाचा दर** (Rate of Capital Accumulation) **:**

भांडवल म्हणजे पूर्वीच्या (अगोदरच्या) कामगारांनी साठवलेल्या उत्पादनाचा साठा अशी भांडवलाची व्याख्या मिल यांनी केली आहे. आर्थिक विकास आणि भांडवल संचय या दोन घटकात जवळचे संबंध असतात. आर्थिक विकासासाठी भांडवल संचय आवश्यक असतो. भांडवल हा बचतीचा परिणाम आहे. म्हणजे बचतीतून भांडवलाची निर्मिती होते. भांडवल संचयाचा दर मोठा असेल तर वेतननिधीचा आकारही मोठा राहतो आणि कामगारांची मागणीही मोठी राहते. जे. एस. मिल यांच्या मते, भांडवल संचयाचा दर खालील दोन घटकावर अवलंबून असतो. (अ) वेतननिधीची रक्कम (ब) बचत करण्याची क्षमता. नफ्याचा दर आणि बचत करण्याची इच्छा (rate of profit and desire to save) या दोन घटकावर बचत करण्याची क्षमता अवलंबून असते.

मिल यांच्या मते, नफा हा श्रम खर्चावर अवलंबून असतो. (Profit depends upon cost of labour.) मजुरीचे दर कमी झाले की उत्पादकांच्या नफ्यात वाढ होते. अशा प्रकारे नफ्यात वाढ झाली की भांडवल संचयाच्या दरात वाढ होते. अशा प्रकारे नफ्यात वाढ झाली किंवा वेतनदरात घट झाली की भांडवल संचयाच्या दरात वाढ होते. भांडवल संचय हा लोकांच्या बचत करण्याच्या इच्छेवरही अवलंबून असतो. लोकांची बचत करण्याची इच्छा जास्त असेल तर बचत वाढून भांडवलनिर्मितीचा दरही वाढतो.

लोकांची बचत ही उद्योगातील निव्वळ उत्पादन वाढीवरही अवलंबून असते. निव्वळ उत्पादनात वाढ झाली की बचत वाढते. नफा आणि खंडात वाढ झाली की निव्वळ उत्पादनात वाढ होते. थोडक्यात, भांडवल संचयात वाढ घडून येण्यासाठी भांडवलदारांच्या नफ्यात वाढ झाली पाहिजे. त्यासाठी त्यांनी अधिक नफा मिळवावा असे मिल यांनी म्हटले आहे. लोकांची बचत करण्याची क्षमता आणि बचत करण्याची इच्छा यात वाढ झाली की भांडवल संचयाचा वेग वाढतो. भांडवल संचयात वाढ झाली की देशाच्या आर्थिक विकासाचा दर वाढतो.

**५) नफ्याचा दर** (Rate of Profit) **:**

मिल यांनी कोणत्याही अर्थव्यवस्थेत नफ्यात का घट घडून येते त्याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते, (१) शेतीला लागू होणारा घटत्या उत्पादन फलाचा नियम आणि (२) माल्थसच्या दराने (भूमिती श्रेणीने) किंवा जास्त वेगाने वाढणारी लोकसंख्या यामुळे अर्थव्यवस्थेत नफ्यात घट घडून येते. देशाच्या आर्थिक विकासासाठी भांडवल संचय आवश्यक असतो आणि भांडवल संचयासाठी भांडवलदारांना नफा मिळाला पाहिजे. परंतु कालांतराने नफ्यात घट होऊ लागते. त्यामुळे बचत आणि भांडवल संचय यात घट होऊन आर्थिक विकासाचा वेग कमी होतो (म्हणजे आर्थिक विकासावर मर्यादा पडतात). कृषी क्षेत्रातील तांत्रिक सुधारणांचा अभाव आणि भांडवल संचयातील वाढीच्या दरापेक्षा लोकसंख्या वृद्धीचा जास्त वेग यामुळे नफ्याचा दर किमान पातळीला पोहचतो. नफ्याचा दर किमान पातळीला आला की, देश स्थितिशील अवस्थेला येऊन पोहचतो. असे असले तरी नफ्यात घट होण्याची प्रवृत्ती काही उपाय योजून रोखता येते. उदाहणार्थ, (१) तांत्रिक सुधारणा (technical improvements), (२) परकीय व्यापाराचा विस्तार (the expasioin of foreign trade), (३) अनुत्पादक खर्चासाठी सरकारी कर्ज उभारणी, (४) भांडवलाची निर्यात (capital exports). परंतु यापैकी कोणताही घटक निश्चितपणे कायम (सतत) राहणार नाही. त्यामुळे नफ्यात घट होण्याचीच प्रवृत्ती राहील. नफा किमान पातळीवर राहील. त्यामुळे भांडवल संचयाचा दर सुद्धा कमी होईल.

**६) स्थैतिक अवस्था (स्थितिशील अवस्था)** (The Stationary State) **:**

मिल यांनी आपल्या पुस्तकात स्थितिशील अवस्थेवर स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. मिल यांच्या मते, अर्थव्यवस्थेत कधीतरी स्थितिशील अवस्था येतेच. स्थितीशील अवस्था येणारच. फार तर काही वर्षासाठी ती पुढे ढकलली जाईल. पण कायमस्वरूपी स्थितिशील अवस्था टाळता येणार नाही. परंतु मिल यांनी स्थितीशील अवस्थेचे स्वागत केले आहे. त्यांच्या मते, स्थितिशील अवस्थेमुळे उत्पन्न वितरणात सुधारणा होते आणि कामगारांना मिळणाऱ्या आर्थिक लाभात वाढ होते. या अवस्थेमुळे श्रमिकांना अधिक मोबदला मिळतो. म्हणून स्थितिशील अवस्थेचे मिल स्वागत करतात. चांगल्या सवयी आणि शिक्षण यांच्या साहाय्याने कामगारांनी आपल्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवले तरच हे फायदे मिळतील, असे मिल यांनी म्हटले आहे. स्थितिशील अवस्था खूप आर्थिक विकास झाल्यानंतर येत असल्याने या अवस्थेला आरिष्ट (Crisis) किंवा अनिष्ट मानू नये असे मिल म्हणतात. अर्थव्यवस्था स्थितिशील अवस्थेत आली असली तरी समाजाने बरीच प्रगती केलेली असते. आर्थिकेतर घटकांच्या साहाय्याने समाजाची प्रगती होऊ शकते. स्थितिशील अवस्थेत नफा जरी किमान पातळीला पोहचलेला असला तरी लोकांच्या राहणीमानाचा दर्जा कमी होत नाही. तो वाढलेलाच राहतो. कारण तांत्रिक प्रगतीमुळे लोक आरामदायी जीवन जगतात आणि लोकांनी आपल्या जीवन जगण्याच्या पद्धतीत केलेल्या सुधारणा यामुळे स्थितिशील अवस्थेतही चांगल्या राहणीमानाचे जीवन लोक जगू शकतात. (१) लोकांनी भरपूर संपत्ती मिळवलेली असल्याने अधिक संपत्ती मिळवण्याचा प्रयत्न लोक करत नाहीत. (२) श्रमिकांना चांगले वेतन मिळाले असल्याने त्यांची परिस्थिती सुधारलेली असते (३) आर्थिक विवंचनेतून मुक्त होऊन जीवनाच्या इतर क्षेत्राकडे लक्ष देणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असते. म्हणून मिल यांनी

अशा स्थितीशील अवस्थेचे स्वागत आणि समर्थन केले आहे. स्थितिशील अवस्था ही कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत कधीतरी येतेच. ती काही वर्षे पुढे जाईल. पण कामयस्वरूपी टाळता येणारी ती बाब नसते असे मिल म्हणतात.

**७) सरकारची भूमिका** (Role of the State) **:**

जे. एस. मिल हे जरी निर्हस्तक्षेप धोरणाचे समर्थक होते तरी त्यांनी देशाच्या आर्थिक विकासासाठी योग्य त्या ठिकाणी योग्य त्या प्रमाणात सरकारी हस्तक्षेपाचे समर्थन केले आहे. आर्थिक विकासातील सरकारच्या भूमिकेचे महत्त्व त्यांना पटले होते. तरीही अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप किमान असावा असे त्यांचे मत होते. सरकारने व्यापाराशी संबंधित भ्रष्टाचाराच्या विरोधात कायदे करावेत आणि त्याची कडकपणे अंमलबजावणी करावी असे म्हटले आहे. सक्तीच्या शिक्षणाचा आणि सरकारी शिक्षण व्यवस्थेचा त्यांनी पुरस्कार केला होता. ग्राहक सुशिक्षित असावेत, अशिक्षित असू नयेत असे त्यांचे मत होते. अशिक्षित ग्राहक हे वस्तूचे सक्षम ग्राहक बनू शकत नाहीत. म्हणून मिल यांनी सक्तीच्या शिक्षणावर आणि सरकारी शिक्षण पद्धतीवर भर दिला होता. मिल यांनी आर्थिक विकासासाठी पुढील बाबतीत सरकारने हस्तक्षेप करावा, असे म्हटले आहे. (१) जी मालमत्ता किंवा संपत्ती वारसा हक्काने लोकांना मिळते त्यावर कमाल मर्यादा घालणे (२) कुळांचे मालकी हक्क (३) उत्पादन साधनांच्या मालकीचे वाटप इत्यादी बाबतीत सरकारने निर्णय घ्यावेत असे मिल म्हणतात. जे. एस. मिल हे मुक्त व्यापाराचे समर्थक होते आणि संरक्षण धोरणाचे विरोधक होते. मिल हे कामगार वर्गाच्या कामाच्या तासाचे नियमन करण्याच्या बाजूचे होते.

**मिल यांच्या सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण :**

जे. एस. मिल यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतावर विविध अर्थतज्ञांनी पुढीलप्रमाणे टीका केल्या आहेत किंवा खालील कारणामुळे मिल यांचा सिद्धांत टीकेस पात्र ठरला आहे.

**१) शेतीला घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम लागू पडत नाही :**

जे. एस. मिल यांनी आपल्या सिद्धांतात घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम शेतीला लागू पडतो, असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते, हे खरे नाही. शेतीला घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम लागू पडत नाही. तांत्रिक प्रगतीमुळे शेतीला हा नियम लागू पडत नाही. आधुनिक अर्थव्यवस्था असलेल्या विकसित देशात हा नियम लागू पडत नाही. कारण तांत्रिक प्रगतीमुळे उत्पादनात घट होण्याऐवजी वाढच होताना दिसते. अशा प्रकारे मिल यांनी गृहित धरलेल्या घटत्या सीमांत उत्पादकतेचे तत्त्व विकसित देशात तांत्रिक प्रगतीमुळे आढळत नाही. ही मिल यांच्या सिद्धांतातील उणिव आहे.

**२) निर्हस्तक्षेप धोरण चुकीचे :**

मिल यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात निर्हस्तक्षेप धोरणाचे समर्थन केले आहे. ॲडम स्मिथ, रिकार्डो यांच्या प्रमाणे जे. एस. मिल हे सुद्धा निर्हस्तक्षेप धोरणाचे समर्थक होते. परंतु टीकाकारांच्या

मते, देश जर लोकशाही किंवा भांडवलशाही असला तरी सरकारी हस्तक्षेप महत्त्वाचाच असतो. आर्थिक विकासात सरकारची भूमिका खूप महत्त्वाची असते. अविकसित आणि विकसनशील देशात आर्थिक विकासात सरकारची भूमिका खूप महत्त्वाची असते. परंतु त्याचा विचार मिल यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. रस्ते प्रकल्प, रेल्वे प्रकल्प, पाणीपुरवठा (सिंचन) प्रकल्प, आरोग्य क्षेत्र इत्यादी क्षेत्रात सरकारला पुढाकार घेऊन प्रचंड गुंतवणूक करावी लागते. त्याशिवाय गरीब देशात तर विकासाला सुरवातच होत नाही. आर्थिक विकासासाठी अर्थव्यवस्थेत सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप असून भागत नाही. सरकारला अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात कार्य करावे लागते. त्याचा विचार मिल यांनी केलेला नाही.

**३) माल्थस यांच्या सिद्धांताचे समर्थन चुकीचे :**

मिल यांचा माल्थस यांच्या लोकसंख्या सिद्धांतावर विश्वास होता. त्यांनी या सिद्धांताचे समर्थन केले होते. परंतु टीकाकारांच्या मते, मिल यांनी माल्थस यांच्या लोकसंख्या सिद्धांताचे अनावश्यक समर्थन केले आहे. माल्थस यांचा लोकसंख्या सिद्धांत पाश्चात्य विकसित देशांना लागू पडलेला नाही. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, इटली आणि अमेरिका या देशांना माल्थस यांचा लोकसंख्या सिद्धांत लागू पडत नाही. विकसित देशात जन्मदर व मृत्यूदरात फारशी तफावत नसते. त्यामुळे अशा देशात लोकसंख्या वाढीचा प्रश्न नसतो. इटलीसारख्या काही देशात तर लोकसंख्या वाढण्याऐवजी कमी होत आहे. काही देश तर लोकसंख्या वाढीसाठी नागरिकांना प्रोत्साहन देत आहेत. मिल व माल्थस यांनी लोकसंख्या वाढीची जी चिंता केली आहे, ती विकसित देशांच्या बाबतीत खरी ठरलेली नाही.

**४) वेतन निधीबाबचते विचार चुकीचे :**

जे. एस. मिल यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात वेतन निधीची संकल्पना मांडली आहे. ती संकल्पना चुकीची आहे अशी टीका टीकाकारांनी केली आहे. मिल यांच्या मते, वेतन निधी हा एकत्रित भांडवलावर अवलंबून असतो आणि त्या वेतन निधीतून कामगारांना वेतन दिले जाते. त्यांच्या मते, कामगार संघटना वेतनात वाढ घडवून आणू शकतात. कॅनन, मार्शल यांनी मिल यांच्या वेतन निधीच्या कल्पनेवर मोठ्या टीका केल्या आहेत. कॅनन यांनी मिल यांची वेतन निधीची कल्पना ही मोठी घोडचूक आहे असे म्हटले आहे. (According to Cannon, "It is the biggest blunder made in economic theory in modern times.") मार्शल यांनी तर 'The vulgar form of the wage fund theory' अशी मिल यांच्या वेतननिधीच्या कल्पनेवर टीका केली आहे.

**५) स्थितिशील अवस्थेची कल्पना अवास्तव :**

टीकाकारांच्या मते, जे. एस. मिल यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात वर्णन केलेली स्थितिशील अवस्थेची कल्पना अवास्तव आहे आणि म्हणून चकीची आहे. मिल म्हणतात, अर्थव्यवस्थेत नफा किमान पातळीला येतो आणि अर्थव्यवस्था स्थैतिक अवस्थेला पोहचते. आर्थिक विकास पूर्ण झाल्यावर अर्थव्यवस्थेत स्थितिशील अवस्था येते आणि ही अवस्था टाळता येत नाही. केव्हा ना केव्हा ही अवस्था

येणारच असे मिल यांनी म्हटले आहे आणि स्थितीशील अवस्थेचे त्यांनी स्वागत केले आहे. पण टीकाकारांच्या मते, मिल यांनी वर्णन केलेली स्थितिशील अवस्थेची कल्पना अवास्तव व चुकीची आहे. ही कल्पना प्रत्यक्षात (वास्तवात) कधीच आलेली नाही.

**६) नवीन काहीच नाही :**

काही टीकाकारांनी जे. एस. मिल यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात नवीन काहीच नाही असे म्हटले आहे. डेव्हिड रिकार्डो यांच्या आर्थिक विचारात काही सुधारणा करून त्यांनी आपले विचार मांडले आहेत अशी मिल यांच्यावर टीकाकारांनी टीका केली आहे. मिल यांच्या आर्थिक विचारावर रिकार्डो, माल्थस आणि ॲडम स्मिथ यांच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात फारसे काही नवीन नाही अशी टीका टीकाकारांनी केली आहे.

**सारांश :** जे. एस. मिल यांच्या सिद्धांतावर जरी वरीलप्रमाणे काही टीका केल्या जात असल्या तरी त्यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताचे किंवा आर्थिक विकासासंबंधी मांडलेल्या आर्थिक विचारांचे महत्त्व कमी होत नाही. आर्थिक विकास कसा होतो? आर्थिक विकास केव्हा व का थांबतो? आणि आर्थिक विकासासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत? हे विचार जे. एस. मिल यांनी अत्यंत प्रभावीपणे व तळमळीने मांडले आहेत. त्यांच्या सिद्धांतातील काही आर्थिक विचार आजही उपयुक्त ठरतात. म्हणून मिल यांच्या सिद्धांतावर जरी काही टीका झाल्या असल्या तरी त्यांच्या सिद्धांताचे महत्त्व फार कमी होत नाही.

**मिल यांचा सिद्धांत आणि अविकसित देश :**

जे. एस. मिल यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत अविकसित आणि विकसनशील देशांना बऱ्याच बाबतीत लागू पडतो. आशिया, आफ्रिका खंडातील मागासलेल्या देशांना मिल यांचा सिद्धांत लागू पडतो. त्याचे स्पष्टीकरण किंवा कारणमीमांसा थोडक्यात खालीलप्रमाणे दिलेली आहे.

१) अनेक अर्धविकसित देशात जमीन मर्यादित असते. तांत्रिक सुधारणा शेतीत खूपच कमी असतात. त्यामुळे कृषी उत्पादन वाढत नाही. अशा देशात शेतीला घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम लागू पडतो. मिल यांचे हे विचार अविकसित देशात खरे ठरतात. मिल यांनी शेतीची उत्पादकता वाढावी यासाठी अप्रगत देशांनी शेतीत तांत्रिक सुधारणा कराव्यात असे म्हटले आहे.

२) भांडवल संचयात वाढ घडवून आणली तर आर्थिक विकासाचा दर वाढतो, हा मिल यांचा आर्थिक विचार अप्रगत देशांना अत्यंत उपयुक्त आहे. कारण अप्रगत देशातील भांडवल संचयाचा दर खूपच कमी असतो. हा दर वाढावा यासाठी काही उपाय मिल यांनी आपल्या सिद्धांतात सांगितले आहेत. ते उपाय अविकसित देशांसाठी उपयुक्त आहेत.

३) लोकसंख्यावाढ व आर्थिक विकास यांच्यातील संबंध मिल यांनी स्पष्ट केले आहेत. लोकसंख्या वाढ

ही आर्थिक विकासात अडथळा ठरते हा मिल यांचा विचार अप्रगत देशात खरा ठरला आहे. भारतही त्याचा अनुभव घेत आहे. आर्थिक विकासासाठी लोकसंख्यावाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे, हा मिल यांचा विचार अप्रगत देशांना अत्यंत उपयुक्त आहे.

४) आर्थिक विकासासाठी सरकारने किमान हस्तक्षेप करावा असा मिल यांचा विचार गरीब देशांना उपयुक्त आहे. कुळांना मालकी हक्क द्यावेत, नफ्यामध्ये कामगारांना वाटा द्यावा, उत्पादन साधनांचे पुनर्वाटप करावे, वारसा हक्क कायद्याने मिळणाऱ्या संपत्तीवर कमाल मर्यादा घालावी अशा सूचना मिल यांनी केल्या आहेत. त्या सूचना गरीब व विकसनशील देशांना उपयुक्त आहेत.

५) मिल यांनी सक्तीच्या शिक्षणाची शिफारस केली आहे. ही शिफारस सुद्धा अप्रगत देशासाठी अत्यंत उपयुक्त आहे. कारण आजही अनेक अप्रगत देशात २५ टक्क्यापेक्षा अधिक लोक निरक्षर आहेत. अशा निरक्षर उपभोक्त्यांचा आर्थिक विकासाच्या दृष्टीने उपयोग होत नाही. म्हणून शिक्षण सक्तीचे करावे असा मिल यांनी जो विचार मांडला आहे, तो अत्यंत महत्त्वाचा व मौल्यवान आहे. हा विचार अप्रगत देशांना मार्गदर्शक आहे.

६) मिल यांनी सरकारी शिक्षण व्यवस्थेची केलेली शिफारस सुद्धा अप्रगत देशांना उपयुक्त व मार्गदर्शक आहे. कारण अशा देशात २५ ते ५० टक्के लोक गरीब असतात. त्यांना खाजगी शिक्षण परवडत नाही. म्हणून देशातील निरक्षरता नष्ट करण्यासाठी, सर्वांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी खाजगी शिक्षण व्यवस्थेबरोबर सरकारी शिक्षणव्यवस्था सुद्धा असली पाहिजे हा मिल यांचा विचार गरीब व विकसनशील देशांना अत्यंत उपयुक्त आहे.

७) कामगारांचे कामाचे तास कमी करावेत किंवा कामाच्या तासांचे नियमन करावे हा मिल यांनी मांडलेला विचार महत्त्वाचा आहे. कारण अनेक अप्रगत देशात कामगारांना जास्त वेळ काम करावे लागते. मिल यांचा हा विचार कामगार हिताचा आहे.

**माल्थस यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत :**

**प्रास्ताविक :**

थॉमस रॉबर्ट माल्थस हे एक सनातनवादी अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांचा जन्म १७६६ चा आणि मृत्यू १८३४ चा. थॉमस माल्थस संपूर्ण जगात प्रसिद्ध आहेत ते त्यांनी मांडलेल्या लोकसंख्या सिद्धांतामुळे. सन १७९८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'An Essay on the Principles of Population' या ग्रंथात माल्थस यांनी आपला लोकसंख्याविषयक सिद्धांत (Theory of Population) मांडला आहे. प्रा. माल्थस यांनी आर्थिक विकासासंबंधी काही विचार मांडले आहेत. विकासासंबंधीचे त्यांचे विचार, त्यांच्या कल्पना आपणास त्यांच्या १८२० मध्ये त्यांनी प्रसिद्ध केलेल्या 'Principles of Political Economy' या पुस्तकात आढळून येतात. या पुस्तकाचे दोन खंड असून माल्थस यांनी पहिल्या भागात मूल्य आणि वितरण या बाबींवर चर्चा केली आहे तर पुस्तकाच्या दुसऱ्या भागात (The Progress of Wealth) या खंडात आर्थिक विकासासंबंधी आपले विचार व्यक्त केले

आहेत. माल्थस यांनी आर्थिक विकासाचा जो सिद्धांत मांडला आहे, तो खालीलप्रमाणे थोडक्यात स्पष्ट केला आहे. माल्थस यांचा हा सिद्धांत म्हणजे त्यांनी आपल्या दोन ग्रंथात आर्थिक विकासासंबंधी जे विचार मांडले आहेत त्या विचारांची एकत्रित मांडणी आहे.

**लोकसंख्या आणि आर्थिक विकास :**

माल्थस यांचा लोकसंख्येचा सिद्धांत जगप्रसिद्ध आहे. लोकसंख्यावाढ आणि आर्थिक विकास यांच्यात जवळचे संबंध असतात असे माल्थस यांचे मत आहे. त्यांच्या मते, वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. लोकसंख्या भूमिती श्रेणीने वाढते (२, ४, ८,१६, ३२, ६४) आणि अन्नधान्याचे उत्पादन गणिती श्रेणीने वाढते (१, २, ३, ४, ५, ६, ७, ८) असे माल्थस यांनी म्हटले आहे. जगाची लोकसंख्या अशाच प्रकारे वाढत राहिली तर उपासमार, कुपोषण, भूकबळी, दारिद्र्य या समस्या निर्माण होतील. अशा प्रकारे वाढती लोकसंख्या हा गरीब राष्ट्राच्या / न्यून विकसित देशांच्या आर्थिक विकासातील मोठा अडथळा असून या लोकसंख्येमुळे उत्पादनात वाढ होत नाही. कारण ही लोकसंख्या केवळ उपभोक्ता असते असे माल्थस यांनी स्पष्ट केले आहे.

**आर्थिक विकासाची संकल्पना :**

काही सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी देशाचा आर्थिक विकास आपोआप व नैसर्गिक (Automatic and natural) होतो असे म्हटले आहे. परंतु माल्थस यांना हे मान्य नाही. त्यांच्या मते आर्थिक विकास आपोआप होत नाही. आर्थिक विकासासाठी देशातील लोकांनी प्रयत्न केले पाहिजे असे त्यांचे मत होते. (According to Malthus, the process of development is not automatic or natural. But it requires consistent and deliberate efforts on the part of people) आर्थिक विकास होत असताना मंदी येते किंवा अर्थव्यवस्थेत चढ-उतार होत असतात. देशाच्या संपत्तीत वाढ घडून आली तर देशाचा विकास घडून येतो. म्हणून आर्थिक विकास हा राष्ट्राच्या संपत्तीच्या वाढीशी संबंधित असतो. माल्थस यांनी राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत संपत्तीच्या उत्पादनाबरोबरच वितरणालाही महत्त्व दिले आहे.

**प्रभावी मागणी आणि आर्थिक विकास :**

माल्थस यांच्या मते, प्रभावी मागणी (Effective Demand) आणि राष्ट्राचा आर्थिक विकास या दोहोत जवळचे संबंध असतात. न्यून प्रभावी मागणी (limited effective demand) आर्थिक विकासात अडथळा निर्माण करते. माल्थस यांना J. B. Say यांचा बाजारपेठेचा नियम मान्य नव्हता. वस्तूचा प्रत्येक पुरवठा आपली स्वत:ची मागणी निर्माण करतो. (Every supply creats its own demand) त्यामुळे अर्थव्यवस्थेत अत्युत्पादन (over production) निर्माण होत नाही, असे से यांचे मत होते. पण से यांचे हे विचार माल्थस यांनी अमान्य केले. त्यांच्या मते जर प्रभावी मागणी कमी झाली तर अतिरिक्त उत्पादनाची समस्या निर्माण होते. श्रमिक जेवढ्या मूल्याच्या (किंमतीच्या) वस्तूंचे उत्पादन करतात त्यापेक्षा त्यांना कमी मजुरी मिळते आणि त्यामुळे श्रमिक बाजारात उपलब्ध असलेल्या सर्व वस्तू विकत घेऊ शकत नाहीत. भांडवलदार, कारखानदार, व्यापारी

यांचे उत्पन्न जास्त असते. परंतु त्यांचा उपभोग खर्च कमी असतो. त्यामुळे देशातील एकूण उपभोग वाढत नाही. प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे किंमती, बचत, गुंतवणूक, रोजगार, भांडवल संचय आणि उत्पादन या घटकावर प्रतिकूल परिणाम होतात. त्यामुळे राष्ट्राच्या आर्थिक विकासाची गती मंदावते. विकासाच्या वेगावर अनिष्ट परिणाम होतो. माल्थस यांच्या मते, प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे कृषी, उद्योग आणि व्यापार क्षेत्राचा विकास व विस्तार होत नाही. सनातनवादी अर्थतज्ज्ञ ॲडम स्मिथ यांनी राष्ट्राच्या विकासासाठी काटकसर आणि बचत या गोष्टीवर भर दिला होता. परंतु माल्थस यांनी स्मिथ यांचे हे विचार चुकीचे आहेत असे म्हटले आहे. जनतेने जर काटकसर केली, खर्च न करता बचत केली तर देशाचा आर्थिक विकास होत नाही, असे माल्थस यांनी म्हटले आहे. माल्थस यांच्या मते लोकांनी खर्च न करता अधिक बचत केली तर आर्थिक मंदीची समस्या निर्माण होते. म्हणून जनतेने काटकसर केली, बचत केली तर देशाचा विकास होत नाही. श्रीमंत लोक जी बचत करतात त्याचे रूपांतर गुंतवणुकीत होत असते. परंतु लोकांनी उपभोग कमी करून बचत करू नये. सक्तीच्या बचतीमुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. मात्र स्वेच्छेच्या बचतीमुळे आर्थिक विकासाला गती मिळते. अतिरिक्त बचतीमुळे वस्तूची मागणी कमी होते. त्यामुळे उत्पादकांची उत्पादन करण्याची प्रेरणा नष्ट होते. म्हणून माल्थस यांनी उपभोग खर्च कमी करून जी बचत केली जाते, त्या बचतीला विरोध केला आहे. अशा बचतीमुळे आर्थिक मंदी निर्माण होते आणि देशाचा विकास होत नाही असे त्यांनी म्हटले आहे. १८१५ ते १८२० या काळात न्यून उपभोग (कमी मागणी), बेकारी, अत्युत्पादन अशा समस्या उद्‌भवल्या होत्या. या समस्यांचा माल्थस यांनी अभ्यास केला होता. गरीबीला श्रीमंत लोक जबाबदार आहेत असे त्यांना दिसून आले होते. म्हणून त्यांनी उपभोग (प्रभावी मागणी) वाढण्यासाठी काटकसरीला किंवा बचतीला विरोध केला. आधुनिक अर्थतज्ज्ञ प्रा. केन्स यांनी थॉमस माल्थस यांच्या या विचारांचे समर्थन करून त्यांचे विचार आपल्या सिद्धांतात ठळकपणे मांडून चांगल्या प्रकारे जगासमोर आणले.

**भांडवल संचय आणि आर्थिक विकास :**

भांडवल संचय (Capital Accumulation) आणि आर्थिक विकास या दोन घटकात जवळचे संबंध असतात असे माल्थस यांनी म्हटले आहे. भांडवलनिर्मिती किंवा भांडवल संचय हा आर्थिक विकास निश्चित करणारा महत्त्वाचा घटक आहे असे माल्थस म्हणतात. रिकार्डो आणि ॲडम स्मिथ यांनी सुद्धा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भांडवल संचय हा महत्त्वाचा घटक असतो असे म्हटले आहे. भांडवल संचयात सतत वृद्धी होत असेल तर देशांच्या संपत्तीत (विकासात) वाढ होते असे माल्थस म्हणतात. भांडवल संचयात ज्यांच्यामुळे वाढ होते, त्या भांडवलदारांच्या भूमिकेला माल्थस यांनी महत्त्व दिले आहे. भांडवलदारांच्या नफ्यावर भांडवल संचय अवलंबून असतो. त्यांना मिळणारा नफा जितका जास्त तितका भांडवल संचय जास्त घडून येतो. (The Source of Capital accumulation is higher profits). श्रमिक खूप गरीब असतात. त्यामुळे त्यांची बचत सुद्धा खूपच कमी असते. भांडवलदार अधिक बचत करू शकतात. त्यामुळे भांडवलदारांच्या बचतीतून नफ्यात वाढ होते. अधिक नफा मिळवण्यासाठी अधिक बचत करावी लागते. जर भांडवलदारांनी अधिक नफा मिळवण्यासाठी उपभोग्य वस्तूवर खर्च कमी करून अधिक बचत केली तर आर्थिक विकासावर

त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. (If capitalists save more and spend less on consumer goods in order to have larger profits, economic growth will be retarded.) भांडवल संचयात वृद्धी घडवून आणण्यासाठी उपभोगात कपात करू नये असे माल्थस यांनी म्हटले आहे.

**उत्पादन आणि वितरण** (Production and Distribution) **:**

माल्थस यांनी राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी उत्पादन आणि वितरण या दोन घटकांना खूप महत्त्व दिले आहे. त्यांनी या दोन घटकांना संपत्तीचे महत्त्वाचे घटक मानले आहे. (Production and distribution are the two grand elements of wealth) उत्पादन आणि वितरण या दोन घटकांना जर योगय आणि सारखेच महत्त्व दिले तर अल्पकाळात राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून येते. या दोन घटकांना सारखेच महत्त्व दिले नाही तर आर्थिक विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल आणि आर्थिक विकास घडून येण्यासाठी (राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून येण्यासाठी) खूप काळ लागेल असे माल्थस यांनी म्हटले आहे. आर्थिक विकास घडून येण्यासाठी अधिक उत्पादन (maximum production) आणि उत्पादन साधनांचे पर्याप्त वाटप (optimum allocation of resources) आवश्यक आहे असे माल्थस म्हणतात. अशा प्रकारे अल्पकाळात राष्ट्राचा आर्थिक विकास घडून येण्यासाठी (राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून येण्यासाठी) उत्पादन आणि वितरण हे दोन घटक अत्यंत महत्त्वाचे असून त्यांचा विचार स्वतंत्र (separate) किंवा अयोग्य प्रमाणात (undue proportions) केला तर राष्ट्राच्या संपत्तीत वाढ घडून येण्यासाठी हजारो वर्षे लागतील असे माल्थस आपल्या ग्रंथात नमूद करतात.

**आर्थिक विकासाचे घटक :**

माल्थस यांनी आपल्या आर्थिक विकासाचा सिद्धांतात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आर्थिक आणि बिगर आर्थिक घटकांना महत्त्व दिले आहे. माल्थस यांनी Potential gross national product आणि actual gross national product यामधील फरक स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, आर्थिक विकासाचा प्रश्न हा स्थूल राष्ट्रीय उत्पादन निर्माण करण्याच्या क्षमतेशी संबंधित आहे. (The problem of economic development is related with the achievement of a high level of potential gross national product) स्थूल राष्ट्रीय उत्पादन हे भूमी, श्रम, भांडवल आणि व्यवस्थापन / संयोजन (management) या घटकावर अवलंबून असते. हे उत्पादनाचे चार घटक योग्य प्रमाणात उपयोगात आणले तर कृषी आणि औद्योगिक उत्पादनात वृद्धी घडून येते. भांडवल संचय, सुपीक जमीन (the fertility of soil) आणि तांत्रिक प्रगती यामुळे कृषी आणि औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनात वाढ घडून येते. माल्थस यांनी आर्थिक विकास घडून येण्यासाठी वरील आर्थिक घटकाबरोबरच काही बिगर आर्थिक घटकांना सुद्धा महत्व दिले आहे. मालमत्तेची सुरक्षा (security of property), चांगली राज्यघटना (good consitution), चांगले कायदे (excellent laws) आणि प्रामाणिक, चांगली नैतिकता असणारी लोकसंख्या (high morals of the people) या घटकांना राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान माल्थस यांनी दिले आहे. आर्थिक घटकाबरोबरच बिगर आर्थिक घटक सुद्धा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात असे माल्थस यांनी म्हटले आहे.

**आर्थिक कुंठित अवस्था** (Economic Stagnation) **:**

अर्थव्यवस्थेत आर्थिक कुंठित अवस्था का निर्माण होते, त्याचे स्पष्टीकरण माल्थस यांनी दिले आहे. अत्युत्पादन (overproduction) आणि उपयोग न्यूनता (deficiency of effective demand) यामुळे कुंठित अवस्था निर्माण होते. माल्थस यांच्या मते, अल्पकाळात श्रम या उत्पादन घटकाचा पुरवठा अलवचिक असतो. त्यामुळे अल्पकाळात श्रमाची मागणी वाढली तर श्रमाचा पुरवठा वाढत नाही. त्यामुळे मजुरीचे दर वाढतात. जरी वेतनाचे दर वाढले तरी उपभोगात (प्रभावी मागणीत) वाढ होत नाही. कारण वेतनातील वाढीमुळे कामगार उपभोग वाढवण्यापेक्षा अधिक आरामदायी जीवन जगणे पसंत करतात. त्यामुळे बाजारात वस्तूचा पुरवठा अधिक राहतो. (general glut or over supply of goods) यामुळे वस्तूंच्या किंमती, बचत, गुंतवणूक आणि नफा यात घट होते. भांडवलदारांचा नफा कमी झाल्याने त्यांची भांडवल संचयाची शक्ती, प्रेरणा, इच्छा कमी होते. अशा प्रकारे उपभोग कमतरता (under consumption) आणि अत्युत्पादन (gult or overproduction) यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास कुंठतो. आर्थिक कुंठित अवस्था (economic stagnation) निर्माण होते.

**आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी सुचवलेले उपाय :**

राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी प्रामुख्याने खालील उपाय सुचवले आहेत.

**१) संतुलित विकास घडवून आणणे :**

देशाच्या आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी समतोल विकासाला (Balanced Growth) प्राधान्य दिले आहे. त्यांच्या मते, देशाची अर्थव्यवस्था कृषी आणि उद्योग अशा दोन क्षेत्रात विभागलेली असते. या दोन्ही क्षेत्रांचा विकास एकाचवेळी घडून आला पाहिजे. या दोन क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीने आर्थिक विकास घडून येतो. जोपर्यंत लागवडीयोग्य शेतजमीन लागवडीखाली आणली जात असते, तोपर्यंत शेतीत भांडवल गुंतवले जाते. शेती क्षेत्राला घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम लागू होत असल्याने शेती क्षेत्रात फायदेशीर गुंतवणूकीच्या संधी राहत नाहीत. त्यामुळे फक्त औद्योगिक क्षेत्रातच गुंतवणूकीच्या संधी असतात. औद्योगिक क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीने अतिरिक्त लोकसंख्येला औद्योगिक क्षेत्रात रोजगार मिळू शकतो. माल्थस यांच्या मते, उद्योग क्षेत्रात जसजशी गुंतवणूक वाढत जाते तसतसे आधुनिक तांत्रिक प्रगतीमुळे वाढत्या उत्पादन फलाची प्रचिती येते. त्यामुळे उद्योगक्षेत्राची वाढ होते. उद्योगांचा विस्तार झाल्याने रोजगार संधी वाढतात. माल्थस यांनी आपल्या सिद्धांतात जमीन सुधारणा, संपत्ती व जमिनीचे योग्य वाटप यावर सरकारने भर दिला पाहिजे असे म्हटले आहे. त्याशिवाय उत्पादनात वाढ होणार नाही आणि प्रभावी मागणी वाढणार नाही असे त्यांचे मत होते. अशा प्रकारे माल्थस यांनी देशाच्या आर्थिक विकासासाठी समतोल विकासावर म्हणजेच कृषी व उद्योग क्षेत्रांच्या संतुलित विकासावर भर दिला आहे. कृषी व उद्योग क्षेत्राचा संतुलित विकास म्हणजे आर्थिक विकास असे माल्थस म्हणतात. (In the words of Malthus, economic development means the balanced growth of both the sectors.)

**२) प्रभावी मागणीत वाढ घडवून आणणे :**

आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी प्रभावी मागणी वाढली पाहिजे असे म्हटले आहे. माल्थस यांच्या मते, प्रभावी मागणी जर वाढली नाही तर केवळ तांत्रिक प्रगतीने आर्थिक विकास घडून येणार नाही. आर्थिक विकासासाठी प्रभावी मागणीत वाढ झाली पाहिजे. देशात प्रभावी मागणीची कमतरता असेल तर आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. प्रभावी मागणीत वाढ घडून येण्यासाठी माल्थस यांनी खालील ठळक उपाय सुचवले आहेत.

**(अ) संपत्ती आणि शेतजमिनींचे समान वितरण आवश्यक :**

माल्थस म्हणतात, एका व्यक्तीचे (single proprietor) वार्षिक उत्पन्न शंभर हजार पौंड असेल आणि तीस-चाळीस व्यक्तींचे (proprietors) वार्षिक उत्पन्न एक ते पाच हजार पौंड असेल तर शंभर हजार पौंड वार्षिक उत्पन्न असणाऱ्या त्या व्यक्तीपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या तीस-चाळीस व्यक्तींची गहू, पाव, मांस आणि इतर मॅन्युफॅक्चर्ड उत्पादनांना मागणी खूप जास्त असेल. म्हणून माल्थस यांनी प्रभावी मागणीत वाढ होण्यासाठी संपत्ती आणि जमिनीच्या समान वितरणावर भर दिला आहे. यामुळे मागणीतही वाढ होईल आणि उत्पादनात सुद्धा वाढ होईल. संपत्तीच्या / धनाच्या असमान वाटपामुळे कमी उपभोग (मागणी कमी) आणि अधिक बचत या समस्या निर्माण होतात. संपत्तीच्या समान वितरणामुळे उपभोगात / मागणीत वाढ होते. म्हणून संपत्तीचे समान वितरण झाले पाहिजे.

**(ब) अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ घडवून आणणे :**

देशाच्या प्रभावी मागणीत वाढ घडवून आणण्यासाठी माल्थस यांनी अंतर्गत आणि परकीय व्यापारात वाढ घडवून आणली पाहिजे, असे म्हटले आहे. देशांतर्गत आणि जागतिक व्यापारामुळे (आयात व निर्यात व्यापारामुळे) लोकांच्या गरजा व इच्छा यात वाढ होते. त्यामुळे वस्तूंच्या किंमती वाढून नफ्यात वाढ होते. आर्थिक विकासासाठी / आर्थिक वृद्धीसाठी प्रभावी मागणी वाढली पाहिजे. त्यासाठी देशांतर्गत व विदेशी व्यापार वाढला पाहिजे असे माल्थस यांनी म्हटले आहे. अशा प्रकारे माल्थस यांनी ॲडम स्मिथ आणि रिकार्डो यांच्याप्रमाणे मुक्त व्यापाराचे समर्थन केले आहे.

**(क) अनुत्पादक उपभोक्त्यांच्या खर्चात वाढ आवश्यक :**

जे उपभोक्ते भौतिक वस्तूंचे उत्पादन करत नाहीत, त्यांना अनुत्पादक उपभोक्ते असे म्हणतात. उदाहरणार्थ देशातील जमीनदार लोकांचा समावेश अनुत्पादक उपभोक्त्यामध्ये होतो. भांडवलदार कंजूष असतात आणि उत्पादक श्रमिकांना केवळ निर्वाहापुरती मजुरी मिळत असते तेव्हा प्रभावी मागणीत वाढ घडून येण्यासाठी अनुत्पादक श्रमिक आणि जमीनदार महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणून प्रभावी मागणीत वाढ घडून येण्यासाठी अनुत्पादक उपभोक्त्यांच्या खर्चात वाढ झाली पाहिजे.

**(ड) सरकारी कामे सुरू करणे :**

प्रभावी मागणीत वाढ घडवून आणण्यासाठी माल्थस यांनी आणखी एक उपाय सुचवला आहे आणि तो म्हणजे त्यांनी सरकारी कामात (Public works) शासकीय खर्चात वाढ करावी असे म्हटले आहे. मंदी व बेरोजगारी नाहीशी करण्यासाठी माल्थस यांनी हा उपाय सुचवला आहे. रस्ते बांधणी आणि इतर सरकारी कामे काढून गरीबांना सरकारने रोजगार द्यावा. तसेच श्रीमंतांनी नोकरचाकर कामास ठेवावेत. आपले बंगले, बागा यांच्या सौंदर्यीकरणावर खर्च करावा. यामुळे उपभोगात व उत्पादनात वाढ होऊन मंदी नाहीशी होईल असे म्हटले आहे.

**३) लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक :**

राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी लोकसंख्या वाढ नियंत्रित करावी असा उपाय सुचवला आहे. वाढती लोकसंख्या / अतिरिक्त लोकसंख्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण करते, असे माल्थस यांनी म्हटले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे उपासमार, अपुरे पोषण, दुष्काळ, पूर, भूकंप, युद्धे epidemics आणि इतर नैसर्गिक आपत्ती उद्भवतात. हे टाळण्यासाठी लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे, असे माल्थस यांनी म्हटले आहे.

अशा प्रकारे आर्थिक विकासासाठी माल्थस यांनी वरीलप्रमाणे काही उपाय सुचवले आहेत. उपभोग, उत्पादन, गुंतवणूक, नफा आणि आर्थिक विकासाचा दर वाढविण्यासाठी त्यांनी हे उपाय सुचवले आहेत.

**माल्थस यांच्या आर्थिक विकास सिद्धांतावरील टीका / उणिवा :**

माल्थस यांच्या आर्थिक विकास सिद्धांतावर खालीलप्रमाणे टीका केल्या जातात. सिद्धांतातील उणिवा किंवा दोष थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) अनुत्पादक उपभोक्त्याबाबतचे विचार चुकीचे :**

परिणामकारक मागणी वाढण्यासाठी देशातील जमिनदारासारख्या अनुत्पादक उपभोक्त्यावर खर्च करावा असे माल्थस म्हणतात. टीकाकारांच्या मते, माल्थसच्या या उपायामुळे उत्पादक कामगारांवर अन्याय होतो. यामुळे अनुत्पादक लोकांचा फायदा होईल. पण यामुळे भांडवलनिर्मितीचा दर कमी होईल. अशा प्रकारे टीकाकारांच्या मते, अनुत्पादक उपभोक्त्यामुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो. (Unproductive Consumers retard economic progress).

**२) भांडवल संचयाबाबत नकारात्मक दृष्टिकोन :**

टीकाकारांच्या मते, भांडवल संचयाबाबत माल्थस यांनी नकारात्मक (चुकीचा) दृष्टिकोन स्वीकारला आहे. टीकाकारांच्या मते, भांडवल संचयाच्या दरात वृद्धी झाली की वेतन, नफा, राष्ट्रीय उत्पन्न यात वाढ होऊन उपभोग्य वस्तूंच्या मागणीत वाढ होते. त्याचा विचार माल्थस यांनी केलेला नाही.

**३) भांडवल संचय प्रक्रियेमुळे कुंठित अवस्था येते हे चूक :**

माल्थस यांनी भांडवल संचय प्रक्रियेमुळे अर्थव्यवस्थेत दीर्घकाळ कुंठित अवस्था येते असे म्हटले आहे. टीकाकारांच्या मते, माल्थस यांची ही चुकीची कल्पना आहे. ती त्यांनी 'से' यांच्या सिद्धांतावरून घेतली आहे. सर्व वस्तूंच्या बाबतीत कायमस्वरूपी न्यून उपभोगाची स्थिती आढळते असे माल्थस म्हणतात. पण टीकाकार म्हणतात, सर्व वस्तूंच्या बाबतीत कधीही कायमस्वरूपी न्यून उपभोगाची (underconsumption) स्थिती नसते.

**४) बचतीबाबतचे विचार चुकीचे** (wrong Saving Base) **:**

माल्थस म्हणतात की बचत केवळ जमीनदार लोकच करतात. टीकाकारांच्या मते, माल्थस यांचा हा विचार चुकीचा व एकांगी आहे. ते म्हणतात, समाजातील कामगार लोक (wage earners) बचत करत असतात. नफा मिळवणारे (profit earners) बचत करत नाहीत.

**५) वाढती लोकसंख्या आर्थिक विकासातील अडथळा :**

वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो, असे माल्थस म्हणतात. परंतु टीकाकारांच्या मते, माल्थस यांचा विचार पूर्ण खरा नाही. ज्या देशाची लोकसंख्या मुळातच कमी आहे, अशा देशात लोकसंख्येत वाढ घडून आली तर आर्थिक विकासात अडथळा निर्माण होत नाही. परंतु ज्या देशात अतिरिक्त लोकसंख्या आहे, अशा देशात लोकसंख्येत वाढ घडून आली तर मात्र त्याचा आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. कमी लोकसंख्या असलेल्या देशात लोकसंख्येत वृद्धी घडून आली तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करता येतो. त्यामुळे विकास दरात वाढ होते, असे टीकाकार म्हणतात.

**समारोप :**

अशा प्रकारे थॉमस माल्थस यांच्या सिद्धांतात वरीलप्रमाणे काही उणिवा असल्या तरी त्यांच्या विकास सिद्धांताचे मोल कमी होत नाही. माल्थस यांचा सिद्धांत आजही जगाला उपयुक्त व मार्गदर्शक आहे. वाढती लोकसंख्या देशाच्या विकासात अडथळा निर्माण करते हा त्यांचा विचार अनेक देशात खरा ठरला आहे. लोकसंख्या वाढीचा वेग कमी केल्याशिवाय विकासाचा वेग वाढणार नाही हा माल्थस यांचा विचार जगातील प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशांना पटलेला आहे. म्हणून त्यांनी लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यास सुरवात केली आहे. आर्थिक विकासासाठी किंवा झालेली आर्थिक वाढ टिकवून ठेवण्यासाठी प्रभावी मागणी वाढली पाहिजे, हाही माल्थस यांचा विचार खरा ठरलेला आहे. माल्थस यांचा विकासाचा सिद्धांत गरीब आणि श्रीमंत दोन्ही देशांना उपयुक्त व मार्गदर्शक आहे. न्यून उपभोग (under consumption) अतिउत्पादन (overproduction) या समस्या भेडसावणाऱ्या देशांना माल्थस यांचा सिद्धांत उपयुक्त आहे. माल्थस यांनी आर्थिक विकासासाठी सुचवलेले उपाय आजही उपुयक्त आहेत. मंदी व बेरोजगारी नाहीशी करण्यासाठी सरकारी कामे काढावीत, असा एक उपाय माल्थस यांनी सुचवला आहे. तोही उपाय आजही अत्यंत उपयुक्त आहे. माल्थस यांनी आपल्या सिद्धांतात आर्थिक घटकाबरोबरच बिगर आर्थिक घटकांनाही महत्त्व दिले आहे.

हे त्यांच्या या सिद्धांताचे ठळक वैशिष्ट्य सांगता येईल. माल्थस यांच्या आर्थिक विकास सिद्धांतातील प्रभावी मागणी, न्यून उपभोग, अत्युत्पादन या संकल्पना आजही महत्त्वाच्या आहेत. आधुनिक अर्थतज्ज्ञ प्रा. जे. एम. केन्स यांनी या संकल्पनांचा आपल्या रोजगार सिद्धांत विचार करून, विस्ताराने मांडणी करून माल्थस यांचा एक प्रकारे गौरवच केला आहे. अशा प्रकारे थॉमस माल्थस यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत अविकसित आणि विकसित अशा दोन्ही प्रकारच्या देशांना उपयुक्त आहे. तसेच कमी लोकसंख्या आणि अतिरिक्त लोकसंख्या असलेल्या देशांनाही तो उपयुक्त आहे.

**कार्ल मार्क्स यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत** (Mark's Theory of Economic Development) **:**

**प्रास्ताविक :**

कार्ल मार्क्स यांना कम्युनिस्ट विचाराचे अर्थशास्त्रज्ञ मानतात. त्यांचा जन्म सन १८१८ चा आणि मृत्यू १८८३ चा. १९ व्या शतकातील महान अर्थशास्त्रज्ञ असेही त्यांना म्हणतात. समाजवादावर (Socialism) त्यांनी शास्त्रशुद्ध लेखन केले आहे. मार्क्स हे भांडवलशाहीचे विरोधक होते तर समाजावादाचे / साम्यवादाचे खंदे पुरस्कर्ते होते. देशाच्या आर्थिक विकासासासाठी त्यांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचे समर्थन केले होते. त्यांनी 'दास कॅपिटल' (Das Kapital) नावाचा ग्रंथ सन १८६७ मध्ये लिहिला. Das Kapital हे जर्मन इंग्रजी शब्द आहेत. सामान्य इंग्रजीत त्याचा अर्थ This is capital असा आहे. म्हणजे मराठीत 'हेच ते भांडवल' असा त्याचा अनुवाद आहे. या पुस्तकात त्यांनी भांडवलाचे दुष्परिणाम सांगितले आहेत. या पुस्तकात त्यांनी विकास कसा होतो आणि भांडवलशाही अर्थव्यवस्था कशी कोसळते ते स्पष्ट केले आहे. त्यांच्या या पुस्तकाला 'समाजवादाचे बायबल' (Bible of Socialism) असे म्हणतात. मार्क्स यांचा दास कॅपिटल हा ग्रंथ त्या काळात अत्यंत गाजलेला होता. त्यांनी एंगल्स यांच्या बरोबर 'साम्यवादाचा जाहीरनामा' (कम्युनिस्ट मॅनिफेस्टो) हा ग्रंथ लिहिला आहे. मार्क्स यांनी आपल्या ग्रंथामध्ये भांडवलशाही नाश पावून समाजवाद प्रस्थापित होईल असे म्हटले आहे. त्यांच्या या विचारांचा जगातील अनेक देशावर मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या या विचारापासून प्रेरणा घेऊन रशिया, चीन इत्यादी देशांनी भांडवलशाहीचा त्याग करून समाजवाद स्वीकारल्याचे आपण पाहिले आहे. कार्ल मार्क्स १९ व्या शतकातील आर्थिक, सामाजिक विचारवंत होते. १९ व्या शतकात सर्व देशात भांडवलशाही अर्थव्यवस्था अस्तित्वात आली होती. जगातील अनेक देशात भांडवलशाहीचा विकास होत होता. परंतु या देशांना भांडवलशाहीचे दुष्परिणाम सुद्धा जाणवू लागले होते. हे दुष्परिणाम मुख्यत: या देशातील गरीबांना भोगावे लागत होते. भांडवलशाही राष्ट्रात बेकारी वाढत होती. गरीबी आणि आर्थिक विषमता वाढत होती. महागाईचे चटके गरीबांना बसत होते. भांडवलदारांकडून (मालक वर्गाकडून) विविध प्रकारे ग्राहकांचे, कामगारांचे आर्थिक शोषण होत होते. त्यामुळे अनेक विचारवंतांना (अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ इत्यादींना) भांडवलशाहीला काहीतरी पर्याय असावा असे वाटू लागले होते. आपल्या परीने ते पर्याय सुचवत होते. त्यामध्ये कार्ल मार्क्स हे एक महान विचारवंत होते. भांडवलशाहीमुळे गरीबांची होणारी पिळवणूक थांबावी यासाठी त्यांनी विविध ग्रंथात जे विचार मांडले ते समाजवादी विचार असून त्याला शास्त्रीय समाजवाद असेही म्हणतात. जर्मनीत जन्मलेल्या कार्ल मार्क्सला जर्मनी सोडून फ्रान्स, इंग्लंड इत्यादी देशात वास्तव्य करावे

लागले. कारण मार्क्स भांडवलशाहीला विरोध करून समाजवादाचे समर्थन करत होते. त्यांच्या या विचारसरणीला क्रांतिकारक विचारसरणी मानून त्यांना जर्मनीत विद्यापीठात प्राध्यापक पद मिळू दिले नाही. जर्मनीत झालेल्या उपेक्षेमुळे मानहानीमुळे मार्क्सला जर्मनी कायमची सोडावी लागली. परंतु त्यांनी आपले समाजवादी किंवा साम्यवादी विचार सोडले नाहीत. इंग्लंडमध्ये स्थायिक होऊन त्यांनी समाजवादावर, त्याच्या उपयुक्ततेवर लेखन करण्यास सुरवात केली. 'दास कॅपिटल' या ग्रंथाचे मार्क्स यांनी तीन खंड लिहिले आहेत. त्यापैकी पहिला खंड त्यांच्या हयातीत म्हणजे सन १८६७ साली प्रसिद्ध झाला. तर नंतरचे दोन खंड त्यांच्या मृत्यूनंतर सन १८८५ मध्ये आणि १८९४ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यांच्या या ग्रंथामुळे रशिया, चीन इत्यादी देशात क्रांती घडून आली आणि भांडवलशाही नष्ट होऊन समाजवादी अर्थव्यवस्था अस्तित्वात आली. सन १९१७ मध्ये रशियात आणि १९४९ मध्ये चीनमध्ये जी क्रांती झाली व समाजवादाचा तेथे जो उदय झाला त्यास कार्ल मार्क्सचे समाजवादी लेखन कारणीभूत ठरले. रशिया, चीन बरोबर इतरही अनेक देशांनी मार्क्स यांनी विचारांनी प्रभावित होऊन समाजवादाची कास धरली. यावरून आपणास मार्क्स यांच्या ग्रंथांचे आणि त्या ग्रंथातील समाजवादी विचारांचे श्रेष्ठत्व आपल्या लक्षात येते. कार्ल मार्क्स यांनी राष्ट्राच्या आर्थिक विकासाचा स्वतंत्र असा सिद्धांत मांडलेला नाही. त्यांनी विविध ग्रंथात आर्थिक विकासासंदर्भात जे विचार मांडले आहेत ते विचार सिद्धांत मानून या ठिकाणी खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**मार्क्स यांच्या आर्थिक विकास सिद्धांताची मांडणी :**

कार्ल मार्क्स यांच्या आर्थिक विकास सिद्धांताची मांडणी खालीलप्रमाणे केली आहे.

**१) इतिहासाची भौतिकवादी मीमांसा** (Materialistic (Economic) Interpretation of History) **:**

कार्ल मार्क्स यांनी मानवाच्या इतिहासाचे विश्लेषण केले असून त्याला इतिहासाची भौतिकवादी मीमांसा असे म्हणतात. मार्क्स यांनी समाजाचा विकास कसा झाला त्याचा अभ्यास केला आहे. मार्क्स यांना अभ्यासात असे आढळले की, आत्तापर्यंत इतिहासात ज्या काही घटना घडून गेल्या आहेत त्या आर्थिक कारणामुळेच घडून गेल्या आहेत. जगात आत्तापर्यंत जी युद्धे झाली, राजकीय बदल झाले त्या सर्वांच्या मुळाशी आर्थिक घटकच कारणीभूत आहेत. मार्क्स यांनी (१) उत्पादन साधनांची मालकी आणि (२) उत्पादन पद्धती हे दोन प्रमुख आर्थिक घटक समाज विकासावर परिणाम करतात असे म्हटले आहे. या दोन घटकात बदल झाला की सामाजिक व्यवस्था बदलते. उत्पादन साधनांची मालकी आणि उत्पादन पद्धती या दोन घटकात बदल झाला की समाजात नवीन व्यवस्था निर्माण होते. उदाहरणार्थ, सरंजामशाही व्यवस्था असेल तर ती नष्ट होऊन भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण होते. उत्पादनाच्या पद्धतीत बदल झाला की सामाजिक रचनेत बदल होतो. म्हणजेच आर्थिक बदलामुळे सामाजिक बदल होतात. अशा प्रकारे मार्क्स यांनी सामाजिक रचनेतील बदलांना देशाच्या उत्पादन पद्धतीला (आर्थिक घटकाला) कारणीभूत मानले आहे. उत्पादन साधनांच्या मालकीत आणि उत्पादन पद्धतीत जसजसा बदल होत गेला तसतशी सामाजिक व्यवस्था बदलत गेली, असे मार्क्स यांचे मत आहे. उत्पादन पद्धती आणि समाजाचा विकास या दोन घटकात जवळचे संबंध असतात, असे मार्क्स यांच्या इतिहासाच्या आर्थिक विश्लेषणावरून आपल्या लक्षात येते.

हेगेल या जर्मन विचारवंताचा मार्क्स यांच्यावर मोठा प्रभाव होता. मार्क्स कायद्याचे शिक्षण घेत होते तेव्हा ते हेगेल यांच्या विचारांनी प्रभावित झाले होते. हेगेल यांनी जे विरोधविकास तत्त्व मांडले होते त्यावर मार्क्स यांचा मोठा विश्वास होता. Thesis - Anti-thesis and synthesis असे हेगेलचे तत्त्वज्ञान आहे. त्याला विरोधविकास तत्त्व असे म्हणतात. सुरवातीला एखादा विचार मांडला जातो. त्याला Thesis असे म्हणतात. त्याला काहीजण विरोध करतात. त्याला Anti-thesis असे म्हणतात आणि त्यातून जी चांगली, सुसंवादी विचारसरणी निर्माण होते त्यास Synthesis असे म्हणतात. अशा प्रकारे संघर्षातून नवे तत्त्व किंवा नवीन चांगली विचारसरणी निर्माण होते त्यास 'सुसंवादी विचारसरणी' (Synthesis) असे म्हणतात. मार्क्स यांनी हेगेल यांच्या या विरोधविकास तत्तचे समर्थन केले आहे. समाजामध्ये परिवर्तन कसे होते ते स्पष्ट करण्यासाठी मार्क्स यांनी हेगेल यांच्या या तत्त्वाचा आधार घेतला. इतिहासाचा अन्वयार्थ लावण्यासाठी मार्क्स यांनी या तत्त्वाचा आधार घेतला. परंतु त्यामध्ये त्यांनी काही बदल करून त्यात भौतिकवादाचा समावेश केला. म्हणून मार्क्स यांच्या इतिहासाच्या अन्वयास ऐतिहासिक भौतिकवाद किंवा इतिहासाची भौतिकवादी मीमांसा असे म्हणतात. समाजाचा विकास कसा होत गेला किंवा सामाजिक उत्क्रांती कशी होत गेली त्याचे मार्क्स यांनी सांगितलेले विश्लेषण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) आदिम साम्यवादी व्यवस्था** (Primitive Communism) **:**

आदिम समाज म्हणजे आदिवासी समाज किंवा प्राचीन समाज होय. आदिम समाज हा वर्गविहीन समाज (Classless Society) होता. गरीब-श्रीमंत, मालक-मजूर, शासन-जनता असे वर्ग त्या काळात नव्हते. त्यामुळे प्राचीन काळात वर्गसंघर्ष नव्हता. लोक गुहेत किंवा जंगलात राहत होते. फळे, कंदमुळे खाऊन, पशुपक्षांची शिकार करून जगत होते. आदिम काळात उत्पादन आणि वितरण सामुदायिकरित्या होत होते. मालक-मजूर किंवा गरीब-श्रीमंत असे वर्गच आदिम समाजात अस्तित्वात नसल्याने कोणाचेही शोषण होत नव्हते. अशा प्रकारे सुरवातीच्या काळात किंवा प्राथमिक अवस्थेत समाजात वर्गसंघर्ष अस्तित्वात नसल्याने, कोणाचे शोषण होत नसल्याने आदिम समाजाला 'साम्यवादी समाज' किंवा 'आदिम साम्यवादी व्यवस्था' (Primitive Communism) असे म्हणतात. आजचा जो मानव समाज आहे तो सुरवातीच्या काळात असा होता असे मार्क्स म्हणतात.

**२) गुलाम समाज** (Slave Society / Ancient Slave Stage) **:**

गुलामगिरी समाज किंवा गुलाम अवस्था ही सामाजिक उत्क्रांतीची दुसरी अवस्था आहे. शेतीचा शोध लागल्यानंतर शेतीमध्ये काम करण्यासाठी कामगारांची मोठ्या प्रमाणात गरज भासू लागली. शेती हे उत्पादनाचे प्रमुख साधन बनले. थोड्या लोकांच्या मालकीची शेती होती आणि त्यांच्या शेतावर काम करणाऱ्यांचे प्रमाण मोठे होते. त्यांना आपला मोबदल्यात जास्त वेळ राबवले जात असे. म्हणून शेतावर काम करणाऱ्या मजुरांना गुलाम असे म्हटले जात असे. त्यांची संख्या खूप मोठी होती. गुलाम अवस्थेत देशाची अर्थव्यवस्था कृषीप्रधान होती.

**३) सरंजामशाही समाज** (Feudal Society) **:**

गुलाम समाज अवस्थेत काही काळानंतर गुलाम आणि मालक या दोन वर्गामध्ये संघर्ष निर्माण झाला आणि त्यातून सरंजामशाही समाजव्यवस्था निर्माण झाली. हा सामाजिक उत्क्रांतीचा तिसरा टप्पा असे मार्क्स मानतात. सरंजामशाही समाजव्यवस्थेत अर्थव्यवस्था ही कृषीप्रधानच होती. या अवस्थेत शेती हे उत्पादनाचे किंवा उपजीविकेचे प्रमुख साधन होते. शेतजमिनीचे मालक कुळांकडून आणि भूमिहीन शेतमजुरांकडून शेती करवून घेत असत. परंतु त्यांना मोबदला कमीच दिला जात होता. शेतीबरोबर लहान लहान उद्योगही चालू झालेले असतात. समाजाची हळूहळू प्रगती होत असते.

**४) भांडवलशाही समाज** Capitalist Society) **:**

सरंजामशाही समाजव्यवस्थेत सरंजामदारांकडून (मालक वर्गाकडून) कुळांचे, भूमिहीन शेतमजूरांचे शोषण होत होते. म्हणून कालांतराने सरंजामदार आणि कुळे यांच्यात संघर्ष निर्माण झाला आणि या वर्गसंघर्षातून भांडवलशाही अर्थव्यवस्था अस्तित्वात आली. मार्क्स भांडवलशाही व्यवस्था हा आर्थिक विकासाचा किंवा सामाजिक विकासाचा चौथा टप्पा मानतात. भांडवलशाहीत उत्पादनाच्या साधनावर खाजगी मालकी असते आणि नफ्यासाठी उत्पादन केले जाते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पादनात वाढ होऊन आर्थिक विकासाचा दर वाढतो. भांडवलदार कामगारांकडून उत्पादन करवून घेतात. भांडवलशाहीत औद्योगिक वस्तूंचे उत्पादन लहान कारखान्याबरोबर मोठ्या कारखान्यात सुद्धा होते. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून, यंत्रांचा वापर करून भांडवलशाहीत उत्पादन केले जाते.

**५) समाजवाद** (Socialism) **:**

भांडवलशाहीत भांडवलदार प्रचंड नफा मिळवतात. त्यासाठी कामगारांचे शोषण करतात. जादा तास काम करवून घेणे, कमी मजुरी देणे इत्यादी विविध मार्गांनी भांडवलदार कामगारांचे आर्थिक शोषण करतात आणि प्रचंड नफा कमावतात. त्यामुळे कामगार नाराज होतात. भांडवलदारांच्या नफेखोरी प्रवृत्तीमुळे कामगारांची आर्थिक स्थिती बिघडते. कामगार एकजूट करून भांडवलदारांना विरोध करतात. मालक-मजूर असा मोठा वर्गसंघर्ष निर्माण होतो आणि भांडवलशाहीचा शेवट होतो. मार्क्स म्हणतात, भांडवलशाहीचा नाश झाल्यानंतर भांडवलशाहीची जागा समाजवाद घेईल. समाजवादी अर्थव्यवस्थेत मालक-मजर वर्ग असणार नाहीत. कारण उत्पादनाच्या साधनावर मालकी समाजाची असेल. उत्पादन, वितरण सामुदायिकरित्या होईल. समाजवादी समाजात कोणाचे शोषण होणार नाही. श्रमिकांना त्यांच्या कार्यक्षमतेनुसार मोबदला मिळेल.

अशा प्रकारे मार्क्स यांनी सामाजिक उत्क्रांतीचे वरीलप्रमाणे पाच टप्पे सांगितले आहेत. या प्रत्येक टप्प्यात किंवा प्रत्येक समाज अवस्थेत वर्गसंघर्ष निर्माण होतो आणि त्या वर्गसंघर्षामुळे पुढची अवस्था निर्माण होते असे मार्क्स म्हणतात. समाजाच्या प्रत्येक अवस्थेत वर्गसंघर्ष निर्माण होतो आणि शेवटी समाजवादी समाज किंवा समाजवाद किंवा समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण होते असे मार्क्स म्हणतात. भांडवलशाहीचा शेवट भांडवलशाहीतील मालक-मजूर यांच्यातील संघर्षामुळेच होतो आणि समाजवाद अस्तित्वात येतो. या समाजवादी

अवस्थेत मालक-मजूर असे वर्ग अस्तित्वात नसतात. त्यामुळे कोणाचेही (विशेषत: श्रमिकांचे) शोषण होत नाही. मार्क्स यांनी सामाजिक उत्क्रांतीची ही जी मीमांसा केली आहे त्यालाच 'इतिहासाची भौतिकवादी (आर्थिक) मीमांसा' (Materialistic (Economic) Interpretation of History) असे म्हणतात.

**भांडवलशाहीत आर्थिक विकास कसा होतो?**

भांडवलशाहीत आर्थिक विकास कसा होतो त्याचे सैद्धांतिक विश्लेषण मार्क्स यांनी दिले आहे. भांडवलशाहीत भांडवलदार वर्ग गुंतवणूक करतात. लहान, मध्यम, मोठे कारखाने उभे करतात आणि कामगारांच्या करवी उत्पादन करतात. नफा मिळवण्यासाठी ते मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतात. त्यामुळे राष्ट्रीय उत्पादनात आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन देशाचा आर्थिक विकास घडून येतो. भांडवलशाहीत आर्थिक विकास कसा होतो ते मार्क्स यांनी खालीलप्रमाणे सांगितले आहे.

**१) अतिरिक्त मूल्य** (Surplus Value) **:**

मार्क्स यांनी अतिरिक्त मूल्याची संकल्पना मांडली आहे. ती त्यांनी सिद्धांताच्या स्वरूपात मांडली आहे. त्यांच्या या सिद्धांताला 'श्रममूल्य सिद्धांत' किंवा 'अतिरिक्त मूल्य सिद्धांत' असे म्हणतात. तसेच त्यांच्या अतिरिक्त मूल्य सिद्धांताला 'मजुरीविषयक शोषणाचा सिद्धांत' असेही म्हणतात. कारण भांडवलदार कामगारांचे कसे आर्थिक शोषण करतात ते मार्क्स यांनी श्रममूल्य सिद्धांतात / अतिरिक्त मूल्य सिद्धांतात सांगितले आहे. म्हणून त्यांच्या या सिद्धांताला 'मजुरीविषयक शोषणाचा सिद्धांत' असेही म्हणतात. भांडवलदार मजुरांचे शोषण कसे करतात ते खालील शब्दात स्पष्ट केले आहे.

**''भांडवलदार कामगारांना त्यांच्या उदरनिर्वाहाइतकीच मजुरी देतात. कामगार आपल्या श्रमाने जेवढ्या मूल्याच्या (किंमतीच्या) वस्तू तयार करतात त्यापेक्षा कमी मजुरी त्यांना भांडवलदार देतात. त्यालाच मजुरांचे आर्थिक शोषण असे म्हणतात.''**

समजा 'क्ष' या कामगाराने तयार केलेल्या वस्तू विकून भांडवलदाराला २०० रुपये मिळाले. परंतु भांडवलदाराने 'क्ष' या कामगाराला फक्त १०० रुपये एवढीच मजुरी दिली तर याचा अर्थ भांडवलदाराने 'क्ष' कामगारावर अन्याय करून त्याचे १०० रुपये शोषण केले असा होतो. कामगार आपल्या श्रमाने जेवढ्या किंमतीच्या वस्तू तयार करतात त्याला श्रममूल्य असे म्हणतात. भांडवलदार कामगारांना त्यांच्या श्रममूल्यापेक्षा कमी मजुरी देतात. त्यालाच भांडवलदाराकडून कामगारांचे होणारे आर्थिक शोषण असे म्हणतात. भांडवलदार कामगारांना किती मजुरी देतात? या प्रश्नाचे उत्तरही मार्क्स यांनी दिले आहे. मार्क्स म्हणतात, भांडवलदार कामगारांना केवळ जगण्यापुरते (उदरनिर्वाहाइतके) वेतन देतात. मजुरांनी जरी जादा मूल्याच्या वस्तू उत्पादित केल्या तरी भांडवलदार त्यांना तेवढे मूल्य वेतन म्हणून देत नाही. कारण भांडवलदारांचा उद्देश जास्तीत जास्त नफा मिळवणे हाच असतो. अशा प्रकारे कामगारांच्या श्रममूल्यापेक्षा कमी मजुरी दिली जाते आणि राहिलेले उत्पन्न भांडवलदार स्वत:जवळ ठेवून घेतो. या उत्पन्नालाच नफा (Profit), आधिक्य / वाढावा (Surplus), वरकड मूल्य / अतिरिक्त मूल्य (Surplus Value) असे म्हणतात. अशा प्रकारे भांडवलदारांना जो वाढावा

मिळतो किंवा जे अतिरिक्त मूल्य मिळते, ते कामगारांच्या श्रमामुळे मिळते. म्हणजे कामगारांच्या श्रममूल्यापेक्षा (त्यांनी तयार केलेल्या वस्तूंच्या किंमतीपेक्षा) कमी मूल्य कामगारांना मजुरी म्हणून भांडवलदारांकडून दिले जाते. भांडवलदारांना मिळणारा नफा हा कामगार करीत असलेल्या श्रमामुळे (कामामुळेच) मिळतो, असे मार्क्स यांनी म्हटले आहे. अतिरिक्त मूल्य जेवढे जास्त तेवढे कामगारांचे शोषण अधिक राहते. अतिरिक्त मूल्य हे कामगारांच्या शोषणाच्या मापनाचे साधन आहे. (The rate of surplus value is the degree of expolitation) मार्क्स म्हणतात, भांडवलदार वस्तूंचे उत्पादन करताना समाजाचा किंवा समाजाच्या हिताचा विचार करत नाहीत. तर ज्या वस्तूंच्या उत्पादनापासून अतिरिक्त मूल्य जास्तीत मिळेल त्या वस्तूंचे उत्पादन करतात. ती वस्तू समाजाला उपयोगाची आहे की नाही, गरजेचे आहे की नाही याचा विचार करत नाहीत. (According to Marx, "Capitalists are not interested in producing those goods which are useful and needed by the society, but in extracting as much surplus value as possible.") थोडक्यात भांडवलदार वस्तूंचे उत्पादन अतिरिक्त मूल्याची निर्मिती व्हावी यासाठीच करतात. भांडवलदार श्रमिकांचे श्रम विकत घेतात आणि त्याच्या सहाय्याने अतिरिक्त मूल्य निर्माण करतात.

**जादा वेळ काम करवून घेऊन शोषण :**

मार्क्स म्हणतात, भांडवलदार कामगारांच्याकडून जादा वेळ काम करवून घेतात. त्यामुळे अतिरिक्त मूल्याची निर्मिती होते. म्हणजे भांडवलदार श्रमिकांना दिवसातून ८ तास राबवून घेतो आणि त्यांना ४ तासांचीच मजुरी देतो. उदाहरणार्थ भांडवलदाराने 'क्ष' या श्रमिकाकडून एक लाकडी टेबल ४ तासात तयार करून घेतले. हे लाकडी टेबल तयार करण्यासाठी त्याला ५०० रुपये एकूण उत्पादन खर्च आला असे मानू. यामध्ये कच्चा माल, यंत्रांची झीज, मजुरी इत्यादीवरील खर्चाचा समावेश आहे. कच्च्या मालावरील खर्च १५० रुपये, यंत्रांची झीज व इतर खर्च १५० रुपये आणि मजुरी २०० रुपये एवढा एकूण ५०० रुपये खर्च आला असे मानू. भांडवलदाराने हे टेबल बाजारात नेऊन ५०० रुपयाला विकले. म्हणजे टेबलाच्या उत्पादन खर्चाइतकी किंमत भांडवलदाराला मिळाली. वरील उदाहरणात टेबलाचा उत्पादन खर्च ५०० रुपये आहे आणि टेबलाची विक्री करून उत्पादकाला / भांडवलदाराला मिळालेले मूल्य सुद्धा ५०० रुपये एवढेच आहे. वस्तूला (टेबलाला) तिच्या उत्पादन खर्चाइतकी किंमत मिळाल्यामुळे भांडवलदारला नफा काहीच मिळणार नाही. परंतु भांडवलदार लोक नफा मिळवण्यासाठीच उत्पादन करत असतात. नफा मिळत नसेल तर ते उत्पादन करणार नाहीत. ४ तासात 'क्ष' या कामगाराने १ टेबल तयार केला. त्यासाठी मजुरीसहित एकूण खर्च ५०० रुपये इतका आला. म्हणून नफा मिळवण्यासाठी उत्पादक किंवा भांडवलदार श्रमिकांना ४ तासाऐवजी ८ तास राबवून घेतात. ते मजुराकडून दिवसातील ४ तासात १ टेबल करवून घेतात आणि उरलेल्या ४ तासात त्या मजुराकडून आणखी १ टेबल तयार करून घेतात. या दुसऱ्या टेबलाचा उत्पादन खर्च ३०० रुपये एवढा येतो. (कच्चा मालाच्या खरेदीखा खर्च १५० रुपये + यंत्रांची झीज व इतर खर्च १५० रुपये) हे टेबल तो बाजारात ५०० रुपयाला विकतो. त्यामुळे त्याला २०० रुपये एवढा नफा मिळतो.

एका दिवसातील पहिल्या ४ तासांचा टेबलाचा उत्पादन खर्च = ५०० रुपये

पहिल्या टेबलाची विक्री करून मिळालेली किंमत (प्राप्ती) = ५०० रुपये

∴ नफा = प्राप्ती – खर्च

किंवा

नफा = किंमत – खर्च

∴ नफा = ५०० रुपये – ५०० रुपये

∴ नफा = शून्य रुपये

एका दिवसातील पुढील ४ तासांचा टेबलाचा खर्च = ३०० रुपये

दुसऱ्या टेबलाची विक्री करून मिळालेली किंमत (प्राप्ती) = ५०० रुपये

∴ नफा = किंमत – खर्च

∴ नफा = ५०० रुपये – ३०० रुपये

∴ नफा = २०० रुपये.

भांडवलदार मजुरांना दिवसातून ८ तास राबवून घेतो. परंतु त्यांना मजुरी मात्र ८ तासांची देत नाही. तर चार तासांची मजुरी देतो. म्हणजे दिवसातील ४ तास वस्तू तयार करण्यासाठी मजुराचे जे श्रम खर्ची पडलेले असतात तेवढीच मजुरी तो मजुरांना ८ तासांची मजुरी म्हणून देतो. दुसरी वस्तू तयार करण्यासाठी आपल्या वरील उदाहरणात भांडवलदाराला ३०० रुपये उत्पादन खर्च आला आहे. कारण दुसऱ्या टेबलाच्या उत्पादन खर्चात 'क्ष' कामगारांची २०० रुपये मजुरी समाविष्ट नाही. पहिल्या ४ तासात 'क्ष' कामगाराने जे एक टेबल तयार केले त्यासाठी त्या 'क्ष' कामगाराला जी २०० रुपये मजुरी दिली त्या मजुरीतच भांडवलदास 'क्ष' मजुराकडून दुसरे टेबल तयार करून घेतो. परंतु दुसरे टेबल तयार करण्यासाठी 'क्ष' कामगाराने आपले २०० रुपयांचे श्रम खर्ची घातलेले असतात. परंतु भांडवलदार 'क्ष' कामगाराला दुसऱ्या टेबलाची काहीही मजुरी देत नाहीत. हे २०० रुपये तो स्वत:च्या खिशात ठेवतो. यालाच मार्क्स कामगारांच्या खिशावर भांडवलदारांनी घातलेला दरोडा असे म्हणतात. या २०० रुपयालाच मार्क्स 'अतिरिक्त मूल्य' (surplus value) किंवा नफा (profit) असे म्हणतात. याला मार्क्स भांडवलदारांनी केलेली चोरी असे म्हणतात. कारण दिवसातील दुसरी वस्तूसुद्धा कामगारांनी ४ तास श्रम खर्च करून तयार केलेली असते. परंतु भांडवलदार कामगारांना निम्म्या दिवसाची (४ तासांचीच) मजुरी देतात आणि निम्म्या दिवसाची (पुढील ४ तासांची) मजुरी की ज्या मजुरीवर कामगारांचा हक्क आहे ती मजुरी स्वत:कडे ठेवून घेतात. अशा प्रकारे नफ्याची किंवा अतिरिक्त मूल्याची निर्मिती कामगारांच्या अतिरिक्त श्रमामुळे होते. म्हणजेच कामगारांना जादा तास राबवून घेतल्यामुळे अतिरिक्त मूल्य निर्माण होते.

**आवश्यक श्रम आणि अतिरिक्त श्रम :**

कार्ल मार्क्स यांनी श्रमाचे आवश्यक श्रम आणि अतिरिक्त श्रम असे दोन प्रकार सांगितले आहेत. या दोन प्रकारांचा अर्थ थोडक्यात खालीलप्रमाणे दिले आहे.

**(अ) आवश्यक श्रम :**

भांडवलदार कामगारांकडून दिवसातील ८ तास काम करवून घेतात. या ८ तासापैकी पहिल्या ४ तासात श्रमिक जे काम करतात त्या श्रमाला आवश्यक श्रम असे म्हणतात किंवा दिवसातील ८ तासापैकी पहिल्या ४ तासात श्रमिक वस्तू तयार करण्यासाठी जे श्रम करतात त्या श्रमाला आवश्यक श्रम असे म्हणतात. कामगार निम्म्या दिवसाच्या श्रमात (४ तासात) आपल्या मजुरीएवढे मूल्य निर्माण करतो. त्यास आवश्यक श्रम असे म्हणतात. वरील उदाहरणात एका टेबलाचा एकूण उत्पादन खर्च ५०० रुपये इतका आहे. यामध्ये भांडवलदाराने मजुरीवर केलेला खर्च २०० रुपये इतका आहे. याचा अर्थ पहिल्या ४ तासात कामगाराने आपल्या मजुरीएवढे (२०० रुपयाएवढे) मूल्य तयार केले आहे. अशा प्रकारे कामगार निम्म्या दिवसात (पहिल्या ४ तासात) आपल्या मजुरीएवढे मूल्य निर्माण करतो. त्यासाठी जे श्रम तो करतो त्या श्रमाला आवश्यक श्रम असे म्हणतात. या श्रमातून नफा किंवा अतिरिक्त मूल्य निर्माण होत नाही. आवश्यक श्रमामुळे कामगारांचे वेतन किंवा श्रममूल्य निर्माण होते.

**(ब) अतिरिक्त श्रम :**

भांडवलदार जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी कामगारांकडून आवश्यक श्रमापेक्षा जादा श्रम करवून घेतात त्यास अतिरिक्त श्रम असे म्हणतात किंवा ज्या श्रमाचा मोबदला भांडवलदार देत नाहीत त्या श्रमाला अतिरिक्त श्रम असे म्हणतात. कामगारांच्या या अतिरिक्त श्रमामुळे अतिरिक्त मूल्याची निर्मिती होते. या अतिरिक्त मूल्यास आधिक्य / नफा / वाढावा / वरकड मूल्ये असे म्हणतात. आपल्या वरील उदाहरणात भांडवलदार कामगाराला रोज (दिवसाची) मजुरी देतो. या २०० रुपयात तो मजूराला ८ तास राबवून घेतो. परंतु दिवसाच्या पहिल्या ४ तासातच मजूर आपल्या मजुरीएवढे (२०० रुपयाएवढे) मूल्य निर्माण करतो. पुढच्या ४ तासात तो आणखी २०० रुपयांचे मूल्य निर्माण करतो. त्यामुळे मार्क्स यांच्या म्हणण्यानुसार मजुराला दिवसाची (८ तासांची) ४०० रुपये मजुरी दिली पाहिजे. परंतु भांडवलदार मजुराला निम्मी म्हणजे फक्त २०० रुपये एवढीच मजुरी देतो. मजुराला ही दिवसाची जी २०० रुपये मजुरी मिळते ती त्याच्या आवश्यक श्रमातून निर्माण झालेल्या वस्तूच्या मूल्याइतकी असते. कामगारांकडून भांडवलदार जे जादा ४ तास काम करवून घेतात त्यास अतिरिक्त श्रम असे म्हणतात. कारण त्या अतिरिक्त श्रमातून कामगार जे मूल्य निर्माण करतात ते मूल्य भांडवलदार कामगारांना देत नाहीत. तर हे मूल्य स्वत:कडे ठेवून घेतात. अशा प्रकारे कामगारांच्या जादा श्रमातून किंवा अतिरिक्त श्रमातून कामगार जे मूल्य निर्माण करतात त्यास अतिरिक्त मूल्य (surplus value) किंवा नफा (profit) असे म्हणतात. या अतिरिक्त मूल्यावर / नफ्यावर कामगारांचा हक्क असतो. परंतु हे अतिरिक्त मूल्य भांडवलदार चोरतो आणि स्वत:कडे ठेवतो. म्हणून भांडवलदार कामगारांच्या पैशावर दरोडा घालतात असे मार्क्स म्हणतात.

**वस्तू – पैसा – वस्तू** (C - M - C) (Commodity - Money - Commodity) **:**

वस्तू–पैसा–वस्तू अशा प्रकारच्या विनिमय व्यवहारामुळे अतिरिक्त मूल्याची निर्मिती होत नाही, असे

मार्क्स म्हणतात. वस्तू-पैसा-वस्तू याचा अर्थ अ व्यक्तीने ब व्यक्तीला वस्तू विकणे आणि त्या वस्तूचे पैसे घेणे त्या पैशातून अ ने दुसरी कोणतीतरी वस्तू विकत घेणे. समजा 'अ' नावाच्या मनुष्याजवळ एक वस्तू आहे. त्याने ही वस्तू बाजारात २००० रुपये किंमतीला विकली आणि या २००० रुपये पैशातून त्याने आपणास गरजेची असणारी दुसरी कोणतीही वस्तू विकत घेतली. या विनिमय व्यवहारामुळे अतिरिक्त मूल्याची निर्मिती होत नाही. 'अ' व्यक्तीने जेवढ्या किंमतीची वस्तू विकली तेवढ्याच किंमतीची दुसरी वस्तू त्याने प्राप्त केली. त्यामुळे या विनिमय व्यवहारातून अतिरिक्त मूल्य निर्माण झाले नाही. वस्तू-पैसा-वस्तू (C-M-C) या विनिमय व्यवहारात पैसा (M) हा मध्यस्थाचे म्हणजेच विनिमय माध्यमाचे काम करतो. मार्क्स यांच्या मतानुसार भांडवलशाहीपूर्व अवस्थेत वस्तू-पैसा-विनिमय माध्यमाचे काम करतो. मार्क्स यांच्या मतानुसार भांडवलशाहीपूर्व अवस्थेत वस्तू-पैसा-वस्तू (C-M-C) असा विनिमय व्यवहार आढळतो. परंतु भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मात्र असा व्यवहार आढळत नाही. तर भांडवलशाहीत M-C-M हा विनिमय व्यवहार आढळतो.

**पैसा – वस्तू – पैसा** (M-C-M) Money - Commodity - Money **:**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत पैसा-वस्तू-पैसा असा विनिमय व्यवहार आढळतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत पैशाचा उपयोग कामगारांचे आर्थिक शोषण करण्यासाठी केला जातो. केवळ विनिमय माध्यमासाठी केला जात नाही. भांडवलशाहीपूर्व अवस्थेत पैशाचा उपयोग विनिमय माध्यम म्हणून केला जातो. त्यामुळे भांडवलशाहीपूर्व अवस्थेत अतिरिक्त मूल्याची निर्मिती होत नाही किंवा कामगारांचे शोषण घडून येत नाही. भांडवलशाहीत नफा मिळवणे, जास्तीत जास्त नफा मिळवणे हा भांडवलदारांचा प्रमुख उद्देश असतो. नफा मिळवण्यासाठीच भांडवलदार उत्पादन करत असतात. त्यामुळे वस्तू विकून मिळालेल्या पैशाची (भांडवलाची) ते पुन्हा गुंतवणूक करतात. त्यामुळे पैसा-वस्तू-पैसा असा विनिमय व्यवहार अस्तित्वात येतो. वस्तू-पैसा-वस्तू या विनिमय व्यवहारात भांडवलदारांना किंवा उत्पादकांना अतिरिक्त मूल्य मिळत नाही. परंतु पैसा-वस्तू-पैसा या विनिमय व्यवहारात मात्र भांडवलदारांना अधिक नफा मिळतो. भांडवलदार आपल्याजवळील पैशाच्या किंवा भांडवलाच्या साहाय्याने जेवढ्या मूल्याची वस्तू तयार करतात त्यापेक्षा अधिक किंमतीला ते ती वस्तू विकतात. त्यामुळे भांडवलदारांना गुंतवलेल्या (खर्च केलेल्या) भांडवलापेक्षा अधिक पैसा मिळतो. या जादा पैशालाच अतिरिक्त मूल्य असे म्हणतात. समजा, एखाद्या भांडवलदाराने स्वत:जवळील १००० रुपये खर्च करून (कच्चा माल, इंधन, मजुरी, यंत्राची झीज इत्यादी) एक वस्तू तयार केली आणि त्याने ती वस्तू १२०० रुपये किंमतीला विकली. त्यामुळे या व्यवहारात त्या भांडवलदाराला २०० रुपये जादा उत्पन्न मिळाले. या २०० रुपयास भांडवलदाराचा नफा किंवा अतिरिक्त मूल्य असे म्हणतात. मार्क्स यांच्या मते, भांडवलदाराला हे जे जादा २०० रुपये मिळतात ते कामगारांच्या श्रमामुळेच मिळतात. म्हणजेच कामगारांच्या श्रमामुळेच अतिरिक त मूल्य निर्माण होते. कारण कामगार जादा श्रम करून जादा मूल्याची निर्मिती करत असतात. म्हणून अतिरिक्त मूल्याची किंवा नफ्याची निर्मिती कामगारांच्या श्रमामुळेच (अतिरिक्त श्रमामुळेच) होत असते. इतर घटकामुळे अतिरिक्त मूल्याची निर्मिती होत नाही. परंतु कामगारांनी आपल्या श्रमाने मिळवलेले हे अतिरिक्त मूल्य भांडवलदार गिळंकृत करतो. यालाच भांडवलदारांकडून कामगारांचे होणारे शोषण असे म्हणतात. वस्तू निर्माण करण्यासाठी

कामगाराबरोबर जरी कच्च्या मालाचा, यंत्रसामग्रीचा, अवजारे आणि उपकरणे यांचा वापर केला जात असला तरी ही सर्व साधने कामगारांच्या श्रमानेच तयार होत असतात. म्हणून अतिरिक्त मूल्याच्या निर्मितीचे श्रेय कामगारानांच द्यावे लागते. भांडवलदार पैसा (M) खर्च करून वस्तू (C) तयार करतात आणि ती वस्तू विकून पैसा (M) मिळवतात. या विनिमय व्यवहाराला M-C-M (पैसा-वस्तू-पैसा) असे म्हणतात. या विनिमय व्यवहारातील M पेक्षा (नंतरच्या M चे मूल्य जास्त असते. C अक्षराच्या अलीकडील जेवढा M (पैसा) असतो त्यापेक्षा जास्त C अक्षरानंतरचा M (पैसा) असतो. तो जेवढा जास्त असतो त्याला अतिरिक्त मूल्य म्हणतात.

**उत्पादन तंत्रात सुधारणा करून शोषण :**

भांडवलदार कामगारांकडून जादा तास काम करवून घेऊन ज्याप्रमाणे अतिरिक्त मूल्य निर्माण करतात त्याप्रमाणे उत्पादन तंत्रात सुधारणा करून अतिरिक्त मूल्य निर्माण करतात आणि कामगारांचे शोषण करतात. उत्पादन तंत्रात सुधारणा केल्यास कामगारांची कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढते; कामगार तेवढ्याच श्रमात पूर्वीपेक्षा अधिक उत्पादन करतात. उत्पादन तंत्रज्ञानातील सुधारणामुळे कामगारांच्या उत्पादकतेत झालेल्या वाढीमुळे भांडवलदारांना पूर्वीपेक्षा अधिक फायदा मिळतो. उत्पादनात वाढ झाल्यामुळे भांडवलदारांच्या फायद्यात म्हणजेच अतिरिक्त मूल्यात वाढ होते. कामगारांच्या उत्पादकतेत वाढ झाली तरी भांडवलदार मजुरीत वाढ करत नाहीत. त्यांना पूर्वीएवढीच मजुरी देतात. त्यामुळे कामगारांचे शोषण होते. हे शोषण भांडवलदारांनी उत्पादन तंत्रात केलेल्या सुधारणामुळे होत असते. समजा उत्पादन तंत्रात सुधारणा करण्यापूर्वी १ कामगार दिवसात ४ वस्तू तयार करत होता आणि उत्पादन तंत्रात सुधारणा केल्यामुळे दिवसभरात तो ५ वस्तू तयार करू लागला तर त्याला कामगारांच्या उत्पादकतेत झालेली वाढ असे म्हणतात. ही पाचवी वस्तू कामगारांनीच तयार केली आहे. परंतु ती वस्तू विकून मिळालेले पैसे भांडवलदार स्वत:कडे ठेवून घेतात. कामगारांना देत नाहीत. यालाच कामगारांचे शोषण असे म्हणतात. अशा प्रकारे उत्पादन तंत्रात सुधारणा करून, कामगारांची उत्पादकता वाढवून भांडवलदार अतिरिक्त मूल्याची / नफ्याची निर्मिती करत असतात.

मार्क्स यांनी आपल्या सिद्धांतात भांडवलदार अतिरिक्त मूल्य निर्माण करण्यासाठी आणि वाढवण्यासाठी कामगारांची उत्पादकता वाढवण्याचा पर्याय निवडतात असे म्हटले आहे. कामगारांच्या कामाच्या तासात वाढ करून आणि कामगारांना कमी मजुरी देऊन भांडवलदार अतिरिक्त मूल्य मिळवू शकतात. परंतु या दोन उपायाऐवजी भांडवलदार कामगारांची उत्पादकता वाढवून अतिरिक्त मूल्य मिळवण्यावर भर देतात. इतर दोन उपायाऐवजी हा उपाय ते अधिक पसंत करतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा किंवा आधुनिक उत्पादन पद्धतीचा वापर करून कामगारांची उत्पादकता वाढवून भांडवलदारांना अतिरिक्त मूल्य कसे मिळते त्याचे स्पष्टीकरण वरती दिले आहे.

**स्थिर भांडवल आणि बदलते भांडवल :**

मार्क्स यांनी भांडवलाचे स्थिर भांडवल आणि बदलते भांडवल असे दोन प्रकार सांगितले आहेत. कारखान्याची इमारत, यंत्रसामग्री, इंधन, कच्चा माल या बाबींना मार्क्स यांनी स्थिर भांडवल असे म्हटले आहे.

तर कामगारांना बदलता घटक किंवा बदलते भांडवल असे म्हटले आहे. मार्क्स यांच्या मते, अतिरिक्त मूल्याची निर्मिती स्थिर भांडवलामुळे होत नाही तर श्रम किंवा मजूर या बदलत्या भांडवलामुळे होते. उत्पादनाची प्रक्रिया चालू असताना स्थिर भांडवलाचे मूल्य बदलत नाही. परंतु कामगारांचे (बदलत्या भांडवलाचे) मूल्य बदलते. त्यामुळे अतिरिक्त मूल्य निर्माण होते. बदलत्या भांडवलाचे (कामगारांचे) उत्पादन प्रक्रियेत प्रमाण जितके जास्त तितके अतिरिक्त मूल्य म्हणजेच नफा जास्त निर्माण होतो. नफा किंवा अतिरिक्त मूल्य श्रमामुळेच म्हणजेच बदलत्या घटकामुळेच निर्माण होते आणि हे अतिरिक्त मूल्य भांडवलदार स्वत:जवळ ठेवून घेतो. त्यामुळे कामगारांची पिळवणूक होते. मार्क्स म्हणतात, अधिक नफा मिळवण्यासाठी भांडवलदार उत्पादन करण्यासाठी यंत्रांचा जास्त वापर करतात. त्यामुळे कामगारांची बेकारी वाढते. बेकारीमुळे कामगारांचे मजुरीचे दर घटतात. काम मिळवण्यासाठी कामगारांच्यात संघर्ष लागतो. त्यामुळे भांडवलदार कामगारांना कमी मजुरी देतात. त्यामुळे कामगारांचे शोषण होते. कामगार हतबल, दुर्बल असतात. त्यांच्या मालकीची उत्पादनाची साधने नसतात. याऊलट भांडवलदारांच्या मालकीची उत्पादनाची साधने असतात. कामगारांना जगण्यासाठी कमी मजुरीत काम करावेच लागते. त्यामुळे कामगारांचे भांडवलदारांकडून शोषण होते. मार्क्स यांचा शोषणाचा हा सिद्धांत त्याकाळात जगभर गाजला होता.

**भांडवल संचय** (Capital Accumulation) **:**

आर्थिक विकासासाठी भांडवल संचय अत्यंत आवश्यक असतो. भांडवलदार लोक जे अतिरिक्त मूल्य मिळवतात त्यातून ते भांडवल संचय करतात. म्हणजेच नफा मिळवण्यासाठी ते अतिरिक्त मूल्याची गुंतवणूक करतात. भांडवलदारांकडून अतिरिक्त मूल्याची (नफ्याची) गुंतवणूक जसजशी वाढत जाते तसतसा औद्योगिक विकास होऊन आर्थिक विकासाला चालना मिळते. भांडवलदार अतिरिक्त मूल्याची किंवा नफ्याची पुनर्गुंतवणूक करत राहतात. त्यामुळे आर्थिक विकासाला गती मिळत राहते. मार्क्स म्हणतात, ''भांडवलाचा साठा करा किंवा बचत करा ही भांडवलदारांची पद्धत आहे.'' (According to Marx, "Accumulate, accumulate ! that is Moses and Prohets and save, save, i. e. reconvert the greatest possible portion of surplus value or surplus product into capital." यामुळे भांडवलदारांकडून भांडवल संचयात वाढ होत जाते. त्यामुळे आर्थिक विकास दरात वाढ होते.

भांडवल संचयात किंवा भांडवल गुंतवणूकीत जसजशी वाढ होत जाते तसतशी भांडवलदारांकडून कामगारांची मागणी वाढत जाते. अधिक उत्पादन करण्यासाठी अधिक मजूर कामावर घ्यावे लागतात. कामगारांची मागणी वाढल्यामुळे कामगारांच्या वेतनात वाढ होते. अशा प्रकारे वेतनात वाढ होऊ लागली तर नफ्यात घट होईल म्हणून भांडवलदार वेतनाचा दर कामगारांच्या निर्वाहाइतका ठेवतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा / अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करतात. त्यामुळे कामगांना मागणी कमी येते. त्यामुळे कामगारांची बेकारी निर्माण होते. तसेच उत्पादन तंत्रात सुधारणा केल्यामुळे कामगारांची उत्पादनक्षमता वाढून ते अधिक उत्पादन करतात. त्यामुळे कामगारांना मागणी कमी येऊन कामगारांची बेकारी वाढते. तसेच लोकसंख्या वाढीमुळे सुद्धा कामगारांच्या बेकारीत वाढ होते. कामगार या बेकारांना 'कामगारांची राखीव सेना' (Reserve Army of

Labour) असे केले आहे. कामगारांची बेकारी वाढल्याने कामगार जगण्यासाठी कमी वेतनात काम करण्यास तयार होतात. त्याचा फायदा भांडवलदार घेतात. कामगारांना कमी वेतन देतात.

**भांडवलाचे केंद्रीकरण** (Concentration of Capital) **:**

उत्पादनात अत्याधुनिक तंत्राचा, मोठमोठ्या यंत्रांचा वापर करणारे भांडवलदार मोठ्या प्रमाणात उत्पादन करतात. भांडवलाची गुंतवणूक जसजशी वाढत जाते तसतसे बदलत्या भांडवलाचे (श्रमाचे) प्रमाण घटत जाते आणि स्थिर भांडवलाचे (यंत्रसामग्री, कच्चा माल इत्यादी) प्रमाण वाढत जाते. कालांतराने भांडवलदारांच्यामध्ये आपापसात तीव्र स्पर्धा सुरू होते. या स्पर्धेत लहान उत्पादक टिकू शकत नाहीत. काही लहान कंपन्या मोठ्या कंपन्यामध्ये विलीन होतात तर काही लहान कंपन्या बंद पडतात. थोडे मुठभर मोठे भांडवलदार या स्पर्धेत टिकून राहतात. त्यांची मक्तेदारी निर्माण होते. त्यांच्या हाती भांडवलाचे केंद्रीकरण होते. ते कमी वेतन देऊन कामगारांचे शोषण करतात. तसेच पुरुष कामगारांना कामावर घेण्याऐवजी स्त्रियांना काम देणे पसंत करतात. स्त्रिया व लहान मुले कमी मजुरीत काम करू शकत असल्याने त्यांना कामावर घेतले जाते. त्यामुळे तरुण, प्रौढ कामगार बेकार होतात.

**नफ्याचा घटता दर** (Falling Rate of Profit) **:**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक विकास होत असताना कालांतराने नफ्याचा दर घटत जातो असे मार्क्स म्हणतात. भांडवलशाहीत विकास चालू असताना भांडवलाची घटनात्मक रचना बदलते. मार्क्स यांनी स्थिर भांडवल + बदलते भांडवल = एकूण भांडवल असे भांडवलाचे दोन प्रकार सांगितले आहेत. भांडवलशाहीची वाढ होत असताना (भांडवलशाहीत आर्थिक विकास होत असताना) स्थिर भांडवलाचे (कच्चा माल, यंत्रसामग्री इत्यादी) बदलत्या भांडवलाची (श्रम) असणारे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे भांडवलदारांचा नफा घटत जातो. स्थिर भांडवलाचे बदलत्या भांडवलाशी असणारे प्रमाण म्हणजे भांडवलाची घटनात्मक रचना होय.

$$\textbf{भांडवलाची घटनात्मक रचना} = \frac{\textbf{स्थिर भांडवल}}{\textbf{बदलते भांडवल}}$$

भांडवलशाहीत आर्थिक विकास होत असताना उत्पादन क्रियेत यंत्रसामग्री, हत्यारे, अवजारे, उपकरणे, कच्चा माल यांचे प्रमाण वाढत जाते आणि श्रम (मजूर) या बदलत्या घटकाचे प्रमाण घटत जाते. एकूण भांडवलामध्ये स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढत जाते आणि बदलत्या भांडवलाचे प्रमाण घटत जाते. त्यामुळे भांडवलाची घटनात्मक रचना बदलून नफ्याचा दर घटत जातो.

समजा X या भांडवलदाराचे स्थिर भांडवल ३० कोटी रुपये आहे आणि बदलते भांडवल १५ कोटी रुपये आहे. अशा प्रकारे त्याने एकूण ४५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली तर भांडवलाची घटनात्मक रचना २:१ अशी राहिल.

$$\text{भांडवलाची घटनात्मक रचना} = \frac{\text{स्थिर भांडवल}}{\text{बदलते भांडवल}}$$

$$= \frac{\text{३० कोटी रुपये}}{\text{१५ कोटी रुपये}}$$

$$= \frac{\text{२}}{\text{१}} \quad \text{(किंवा २:१)}$$

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{स्थिर भांडवल + बदलते भांडवल}} \times \text{१००}$$

आपल्या उदाहरणातील X या भांडवलदाराचे अतिरिक्त मूल्य १२ कोटी रुपये आहे असे मानू. यावरून नफ्याचा दर खालीलप्रमाणे येईल.

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{१२ कोटी रुपये}}{\text{३० कोटी रुपये + १५ कोटी रुपये}} \times \text{१००}$$

$$= \frac{\text{१२ कोटी रुपये}}{\text{४५ कोटी रुपये}} \times \text{१००}$$

$$= \text{२६.६६\%}$$

वरील उदाहरणात X या भांडवलदाराचा नफ्याचा दर २६.६६ टक्के आला आहे. भांडवलदार अधिक नफा मिळवण्यासाठी स्थिर भांडवलात (यंत्रसामग्री, कच्चा माल इत्यादीमध्ये मोठी वाढ करतात. परंतु त्यामानाने बदलत्या घटकात (बदलत्या भांडवलात) म्हणजे मजुरांच्या संख्येत तेवढ्या प्रमाणात वाढ करत नाहीत. त्यामुळे भांडवलाची घटनात्मक रचना बदलते आणि नफ्याच्या दरात घट होते. आपल्या वरील उदहरणातील X या भांडवलदाराने समजा काही वर्षांनी स्थिर भांडवलावर ७२ कोटी रुपये आणि बदलत्या भांडवलावर १८ कोटी रुपये असे एकूण ९० कोटी रुपये खर्च केले तर भांडवलाची घटनात्मक रचना ४:१ अशी राहिल.

$$\text{भांडवलाची घटनात्मक रचना} = \frac{\text{७२ कोटी रुपये}}{\text{१८ कोटी रुपये}}$$

$$= \frac{\text{४}}{\text{१}} \quad \text{(किंवा ४:१)}$$

समजा X या भांडवलदाराचे अतिरिक्त मूल्य १४ कोटी रुपये एवढे आहे. तर नफ्याचा दर खालीलप्रमाणे येईल.

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{स्थिर भांडवल + बदलते भांडवल}} \times \text{१०००}$$

$$\therefore \text{नफ्याचा दर} = \frac{\text{१४ कोटी रुपये}}{\text{७२ कोटी रुपये + १८ कोटी रुपये}} \times \text{१००}$$

$$\therefore \text{नफ्याचा दर} = \frac{\text{१४ कोटी रुपये}}{\text{९० कोटी रुपये}} \times \text{१००}$$

$$\therefore \text{नफ्याचा दर} = \text{१५.५५\%}$$

जेव्हा X या भांडवलदाराची भांडवलाची घटनात्मक रचना २:१ होती तेव्हा नफ्याचा दर २६.६६% होता आणि त्याच्या भांडवलाची घटनात्मक रचना ४:१ अशी बदलल्यावर नफ्याचा दर १५.५५% एवढा घटल्याचे वरील उदाहरणात दिसते. भांडवलशाहीचा विकास होत असताना नफ्याचा दर कसा घटतो ते वरील सूत्रावरून आणि उदाहरणावरून आपल्या लक्षात येते. भांडवलदार यंत्रसामग्रीवर, कच्च्या मालावर अधिक खर्च करतात. परंतु त्याप्रमाणात श्रमिकांवर (श्रमिकांच्या वेतनावर) खर्च करत नाहीत. म्हणजे जास्त प्रमाणावर श्रमिकांना कामावर घेत नाहीत. त्यामुळे सतत नफ्याचा दर घटत जातो. नफ्याचा दर घटू नये म्हणून भांडवलदार कामगारांच्या वेतनात घट करण्याचा उपाय योजतात. यंत्रांचा वापर वाढवतात. परंतु या उपायांचा फारसा उपयोग होत नाही. कारण कामगारांच्या वेतनात कपात केल्याने कामगारांची खरेदीशक्ती घटते. तसेच भांडवलदारांनी बदलत्या घटकावर (श्रमाच्या नेमणुकीवर / वेतनावर) स्थिर भांडवलाच्या तुलनेत कमी खर्च केल्यामुळे बेकारी वाढत जाते. त्यामुळे खरेदीशक्ती (प्रभावी मागणी) घटते. भांडवलदारांनी जेवढे उत्पादन करून ठेवलेले असते त्या सर्व वस्तूंना मागणी येत नाही. त्यामुळे देशात अत्युत्पादनाची (overproduction) समस्या निर्माण होते. कामगारांच्या मजुरीत वाढ केल्याशिवाय आणि वस्तूंच्या किंमती कमी केल्याशिवाय प्रभावी मागणीत वाढ होत नाही. या उपायामुळे भांडवलदारांचा नफा घटतो. नफ्यात घट होत असल्यामुळे त्यांची गुंतवणूक करण्याची इच्छा व क्षमता कमी होते. त्यामुळे भांडवल गुंतवणूक कमी होऊन विकासाचा दर कमी होऊ लागतो.

**समाजवादाचा जन्म :**

मार्क्स यांनी भांडवलशाहीच्या विकासातच भांडवलशाहीच्या नाशाची बीजे दडलेली असतात असे म्हटले आहे. भांडवलशाहीची वाढ होत असताना देशाचा आर्थिक विकास होत जातो. परंतु कालांतराने भांडवलशाही नष्ट होऊन त्याची जागा समाजवाद घेतो, असे मार्क्स यांनी म्हटले आहे. नफ्याच्या दरातील घट रोखण्यासाठी भांडवलदार कमी वेतन देणे, जास्त वेळ राबवून घेणे या माध्यमातून कामगारांचे शोषण चालू करतात. भांडवलदारांकडून स्थिर भांडवलात गुंतवूणक वाढत जाते आणि श्रमिकांना कामावर घेण्याचे प्रमाण कमी होत जाते. त्यामुळे देशात बेकारीत खूप मोठी वाढ होते. ज्या कामगारांना काम मिळालेले असते त्यांना मजुरी कमी मिळत असते. त्यामुळे काम करणारे कामगार आणि बेरोजगार अस्वस्थ होतात. ते भांडवलदारांच्या विरोधात रस्त्यावर उतरतात. भांडवलदार आणि कामगार या दोन वर्गातील संघर्ष वाढत जातो. कामगार आपल्या हक्काबाबत जागरूक होतात. भांडवलदारांकडून होणाऱ्या शोषणाची त्यांना कल्पना येते. आपल्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी कामगार संघटना स्थापन करतात. भांडवलदारांच्या विरोधात या संघटना तीव्र लढा देतात. देशात क्रांती घडवून आणतात आणि या क्रांतीमुळे भांडवलशाही नष्ट होऊन समाजवाद अस्तित्वात येतो. कामगारांनी केलेल्या क्रांतीमुळे भांडवलदार व कामगार हे दोन वर्ग नष्ट होतात. वर्गविरहित समाज (Classless Society) अस्तित्वात येतो. मूठभर लोकांची उत्पादन साधनावर असलेली मालकी नष्ट होते. उत्पादनाच्या साधनावर समाजाची मालकी प्रस्थापित होते. अशा प्रकारे भांडवलशाहीचा विकास होत असताना कालांतराने भांडवलशाही नष्ट होते आणि भांडवलशाहीचा जागा समाजवाद घेतो.

**सारांश :** अशा प्रकारे कार्ल मार्क्स यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत वरीलप्रमाणे स्पष्ट केला आहे. भांडवलदार कामगारांना कमी मजुरी देऊन जास्तीत जास्त नफा मिळवतात. तसेच यंत्रांचा वापर करून, उत्पादन तंत्रात सुधारणा करून कामगारांची उत्पादकता वाढवून ते भरपून नफा कमवतात. त्या नफ्याची ते गुंतवणूक करतात. त्यामुळे भांडवलशाहीचा विकास होऊन राष्ट्रीय उत्पादनात, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. अशा प्रकारे भांडवलशाहीचा जसजसा विकास होत जातो तसतसा देशाचा आर्थिक विकास होत जातो. परंतु पुढे भांडवलदार यंत्रसामग्री, कच्चा माल इत्यादीवर जेवढा खर्च करतात तेवढा कामगारावर करत नाहीत. त्यामुळे कामगारांची बेकारी वाढते. बेकारी वाढल्यामुळे समाजाची वस्तू व सेवांची मागणी (प्रभावी मागणी) कमी होते. त्यामुळे भांडवलदारांचा नफा कमी होऊन त्यांच्याकडून होणारी भांडवलाची गुंतवणूक कमी होते. त्यामुळे आर्थिक विकासाचा दर कमी होतो. भांडवलदारांकडून कामगारांची पिळवणूक वाढत गेल्याने आणि ही पिळवणूक कामगारांच्या लक्षात आल्याने कामगार भांडवलदारांच्या विरोधात क्रांती करतात आणि भांडवलशाही नष्ट करून समाजवाद प्रस्थापित करतात. हा मार्क्स यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताचा सारांश आहे.

**मार्क्स यांच्या आर्थिक विकास सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण :**

मार्क्स यांच्या आर्थिक विकास सिद्धांतात काही उणिवा किंवा दोष आहेत. म्हणून या सिद्धांतावर टीका केल्या जातात. त्या टीकांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) केवळ आर्थिक कारणामुळेच इतिहास घडतो हे चूक :**

कार्ल मार्क्स यांनी इतिहासाची भौतिकवादी मीमांसा केली आहे. त्यात ते म्हणतात, इतिहासात आत्तापर्यंत युद्धासारख्या ज्या अनेक घटना घडून गेल्या आहेत त्याला आर्थिक घटकच कारणीभूत आहेत. या सर्व घटना आर्थिक कारणामुळेच घडून गेल्या आहेत. परंतु टीकाकारांनी मार्क्स यांच्या या विधानाला आक्षेप घेतला आहे. त्यांच्या मते, मार्क्स यांचे हे विधान १०० टक्के खरे नाही. केवळ आर्थिक कारणामुळेच इतिहास घडत नाही. आर्थिक घटकाबरोबर बिगर आर्थिक घटकामुळेसुद्धा इतिहास घडला आहे व घडणार आहे. भौगोलिक, राजकीय कारणामुळे, मनुष्याच्या हुकूमशाही स्वभावामुळेसुद्धा इतिहासात विविध घटना घडल्या आहेत व घडत आहेत. त्यामुळे केवळ आर्थिक कारणामुळेच इतिहास घडतो हे मार्क्स यांचे विधान संपूर्णपणे खरे नाही.

**२) वर्गसंघर्षामुळे आर्थिक आणि सामाजिक बदल होतात हे चूक :**

कार्ल मार्क्स यांनी आपल्या सिद्धांतात कामगार आणि मालक यांच्यातील वर्गसंघर्षामुळेच आर्थिक आणि सामाजिक बदल होतात असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांना मार्क्स यांचे हे प्रतिपादन मान्य नाही. त्यांच्या मते केवळ वर्गसंघर्षामुळेच आर्थिक व सामाजिक बदल होतात असे नाही. इतर घटकामुळेही आर्थिक व सामाजिक बदल होत असतात. परंतु त्याचा विचार मार्क्स यांनी केलेला नाही.

**३) भांडवलशाही संपून समाजवाद अस्तित्वात येतो हे चूक :**

कार्ल मार्क्स यांनी आपल्या सिद्धांतात भांडवलशाहीचा विकास झाल्यानंतर भांडवलशाही नष्ट होऊन तेथे समाजवाद प्रस्थापित होतो असे म्हटले आहे. परंतु जागतील काही कमी विकसित देशात असे आढळले आहे की त्या देशात भांडवलशाही नसतानाही समाजवाद अस्तित्वात आला आहे. म्हणून भांडवलशाही अवस्थेनंतर समाजवाद अस्तित्वात येतो हे मार्क्स यांचे विधान संपूर्णपणे खरे नाही.

**४) भांडवलशाहीचा विकास झाला की भांडवलशाही नष्ट होते हे चूक :**

मार्क्स यांनी आपल्या सिद्धांतात भांडवलशाहीच्या विकासातच भांडवलशाहीच्या नाशाची बीजे दडलेली असतात असे म्हटले आहे. भांडवलशाहीचा विकास झाला की कालांतराने भांडवलशाही नष्ट होते. परंतु ज्या देशात भांडवलशाही आहे त्या देशात ती कमकुवत किंवा नष्ट होण्याऐवजी मजबूत बनत चालली आहे. त्यामुळे भांडवलशाहीचा विकास झाला की ती नष्ट होते हे मार्क्स यांचे प्रतिपादन खरे नाही.

**५) मोठ्या उद्योगांची वाढ झाली की लहान उद्योग नष्ट होतात हे चूक :**

मार्क्स यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात मोठ्या उद्योगांची वाढ झाली की देशातील लहान उद्योग नष्ट होतात असे म्हटले आहे. परंतु असे घडलेले नाही किंवा घडणार नाही. मोठे उद्योग आणि लहान उद्योग एकमेकांना पूरक वस्तूंचे उत्पादन करत असतात. लहान उद्योग मोठ्या उद्योगांना सहाय्यक असतात. त्यामुळे भांडवलशाहीत स्पर्धा असली तरी लहान उद्योगांचे हित जपले जाते. त्यामुळे लहान उद्योग नष्ट होत नाहीत.

**६) वर्गविरहित समाजाची संकल्पना चुकीची :**

मार्क्स यांनी आलप्या सिद्धांतात भांडवलशाही संपून समाजवाद अस्तित्वात येतो आणि समाजवादी अर्थव्यवस्थेत गरीब-श्रीमंत किंवा मालक मजूर असे वर्ग नसतात असे म्हटले आहे. परंतु मार्क्स यांचे हे विधान खरे नाही. समाजवादी देशात गरीब लोकही आढळतात आणि श्रीमंत लोकही आढळतात. परंतु तेथे गरीब आणि श्रीमंत यांच्यातील अंतर मात्र कमी आहे.

**७) भांडवलशाहीचा विकास होत असताना मजुरांची मजुरी कमी होते हे चूक :**

भांडवलशाहीचा विकास होत असताना अधिक नफा मिळवण्यासाठी भांडवलदार मजुरांना कमी मजुरी देतात. त्यामुळे मजुरांचे शोषण होते असे मार्क्स यांनी म्हटले आहे. परंतु भांडवलशाही राष्ट्रात मार्क्स म्हणतात तसे आढळून येत नाही. भांडवलशाही राष्ट्रात मजुरांना चांगली मजुरी दिली जात आहे. त्यांना योग्य मजुरी मिळत आहे. आपल्या नफ्यात वाढ करण्यासाठी मजुरीत घट करण्याचे धोरण भांडवलदार राबवत नाहीत. त्यामुळे नफा मिळवण्यासाठी, नफ्यात वाढ करण्यासाठी भांडवलदार मजुरांची मजुरी कमी करतात हे मार्क्स यांचे विधान प्रत्यक्ष व्यवहारात आढळत नाही. भांडवलशाही राष्ट्रातील कामगारांच्या उत्पन्नात दिवसेंदिवस वाढ होत असून त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही उंचावत आहे.

**८) नफा केवळ बदलत्या भांडवलामुळेच मिळतो हे चूक :**

मार्क्स यांनी आपल्या सिद्धांतात एकूण भांडवलाचे (१) स्थिर भांडवल आणि (२) बदलते भांडवल असे दोन प्रकार सांगितले आहेत. स्थिर भांडवलात त्यांनी कच्चा माल, यंत्रसामग्रीचा समावेश केला आहे, तर बदलत्या घटकात किंवा बदलत्या भांडवलात त्यांनी श्रमाचा (कामगारांचा) समावेश केला आहे. त्यांनी आपल्या सिद्धांतात नफा 'श्रम' या बदलत्या भांडवलामुळेच मिळतो असे म्हटले आहे. परंतु नफा केवळ श्रमामुळे मिळत नाही तर स्थिर घटकामुळे नफा मिळत असतो. परंतु त्याचा विचार मार्क्स यांनी केलेला नाही.

**९) आर्थिक मंदीचे भाकित चुकीचे :**

भांडवल संचयात वाढ झाली की आर्थिक मंदी येते असे मार्क्स यांनी म्हटले आहे. भांडवलशाहीचा विकास होत असताना अत्युत्पादनाची परिस्थिती मिर्माण होते. प्रभावी मागणी कमी झाल्याने अत्युत्पादनाची समस्या निर्माण होऊन वस्तूंच्या किंमती कमी होतात, नफा कमी होतो व मंदी येते असे मार्क्स म्हणतात. टीकाकारांनी मार्क्स यांच्या या विधानाला आक्षेप घेतला आहे. भांडवल गुंतवूणकीत वाढ झाली की कामगारांच्या वेतनात वाढ होते त्यामुळे प्रभावी मागणी वाढते. त्यामुळे अत्युत्पादनाची, किंमत घटीची किंवा मंदीची समस्या निर्माण होत नाही. परंतु त्याचा विचार मार्क्स यांनी केलेला नाही.

**१०) भांडवलदार कामगारांना जादा वेळ राबवून घेतात हे चूक :**

भांडवलदार कामगारांना जादा वेळ राबवून घेतात. त्यांच्या जादा श्रमाने तयार केलेल्या वस्तू विकून मिळणारे उत्पन्न भांडवलदार हडप करतात असे मार्क्स यांनी आपल्या आर्थिक विकास सिद्धांतात म्हटले आहे.

परंतु भांडवलशाही राष्ट्रात कामगारांच्या कामाचे तास ठरलेले असून त्यापेक्षा अधिक वेळ कामगारांना राबवून घेतले जात नाही. सरकार, कामगार आणि भांडवलदार यांना मान्य होतील असे कामगारांचे कामाचे तास भांडवलशाही राष्ट्रात ठरवण्यात आले आहेत. त्यामुळे भांडवलदार कामगारांना जादा वेळ काम करून घेतात हे मार्क्स यांचे विधान असत्य आहे. आज तसे कुठेच आढळत नाही.

**११) उत्पादन तंत्रात सुधारणा झाली की कामगारांचे शोषण होते हे चूक :**

कार्ल मार्क्स यांनी भांडवलदार उत्पादन तंत्रात सुधारणा करून कामगारांची उत्पादकता वाढवतात असे म्हटले आहे. कामगारांची उत्पादकता वाढली की कामगार तेवढ्याच श्रमात पूर्वीपेक्षा अधिक वस्तू तयार करतात. त्यामुळे भांडवलदारांचा फायदा होतो. कामगार या जादा वस्तू तयार करतात त्या वस्तू विकून भांडवलदार जे उत्पन्न मिळवतात ते स्वत:कडे ठेवून घेतात. त्यामुळे कामगारांचे शोषण होते असे मार्क्स म्हणतात. परंतु आधुनिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कामगारांच्या उत्पादकतेत वाढ झाली की कामगारांच्या वेतनात सुद्धा वाढ होते. त्यामुळे कामगारांचे शोषण होत नाही. कामगारांच्या वेतनाचा संबंध त्यांच्या उत्पादकतेशी जोडला आहे. त्यामुळे कामगारांची उत्पादकता वाढली की त्यांचे शोषण होते हे मार्क्स यांचे प्रतिपादन चुकीचे आहे.

**१२) नफ्यात वाढ करण्यासाठी भांडवलदार स्त्रिया, लहान मुले यांना काम देतात हे चूक :**

मार्क्स यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात नफा घटू नये यासाठी कमी वेतनावर काम करण्यास तयार असलेल्या स्त्रिया, लहान मुले यांना कामावर घेतात असे म्हटले आहे. परंतु कामगार संघटना असे करू देत नाहीत. सर्व भांडवलशाही राष्ट्रांनी मुलांना काम करण्यास बंदी घातली आहे. लहान मुलांना कामावर ठेवणे बेकायदेशीर व दंडनीय अपराध ठरवण्यात आला आहे. त्याचा विचार मार्क्स यांनी केलेला नाही.

**१३) भांडवलशाहीत विकास झाल्यानंतर भांडवलदारांच्या नफ्यात घट होते हे चूक :**

मार्क्स यांनी आपल्या सिद्धांतात भांडवलशाहीचा विकास घडून आल्यानंतर काही काळाने भांडवलदारांच्या नफ्यात घट होते असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांना हे मत मान्य नाही. भांडवलशाही देशात नफा घटण्याऐवजी वाढत असल्याचे दिसत आहे. तसेच कामगारांचे वेतन सुद्धा घटत नाही. उलट ते वाढत असल्याचे दिसते.

**१४) मध्यमवर्ग नष्ट होईल हे भाकित खोटे :**

मार्क्स यांनी भांडवलशाहीचा विकास होत असताना मध्यवमर्ग नष्ट होईल असे भाकित केले होते. प्रत्यक्षात भांडवलशाही देशात मध्यमवर्गीयांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. भांडवलशाहीमधील मध्यवमर्गीयांची आर्थिक परिस्थिती सुधारत आहे. त्यामुळे मार्क्स यांचे मध्यमवर्ग नष्ट होईल हे भाकित खोटे ठरले आहे.

**१५) सरकारच्या भूमिकेकडे दुर्लक्ष :**

भांडवलशाहीत भांडवलदार कामगारांचे शोषण करतात असे मार्क्स यांनी आपल्या सिद्धांतात म्हटले

आहे. कामगारांना कमी मोबदला देऊन त्यांचे शोषण करतात असे मार्क्स म्हणतात. परंतु भांडवलशाही देशातील सरकार भांडवलदारांना तसे करू देत नाही. या देशांनी किमान वेतन कायदा केला असून कायद्याने ठरवून दिलेल्या वेतनापेक्षा कमी वेतन भांडवलदार देऊ शकत नाहीत. सरकार कामगार व भांडवलदार यांच्यात संघर्ष होऊ देत नाही. संघर्ष केला तर तो सोडवते. परंतु त्याचा विचार मार्क्स यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

**समारोप :**

मार्क्स यांच्या सिद्धांतावर वरीलप्रमाणे विविध टीका केल्या जातात. मार्क्स यांच्या काळात जी परिस्थिती होती ती परिस्थिती आता आढळत नाही. त्यामुळे मार्क्स यांचा सिद्धांत दोषयुक्त वाटतो. मार्क्स यांनी त्यावेळची परिस्थिती विचारात घेऊन कामगारांच्या शोषणांबद्दल, नफ्याच्या घटत्या दराबाबत आपली मते मांडली आहेत. परंतु आज भांडवलशाही राष्ट्रात लोकशाही असून तेथील सरकारे कामगार कल्याणाच्या योजना राबवत आहेत. कामगारांच्या मुलांसाठी दवाखाने, शाळा भांडवलदारांनी काढल्या आहेत. कामगार संघटनाही मजबूत आहेत. त्यामुळे कामगारांचे भांडवलदारांकडून शोषण होत नाही. असे असले तरी कार्ल मार्क्स यांच्या सिद्धांताचे महत्त्व फरसे कमी होत नाही. मार्क्स यांना कामगारांबद्दल किती कळकळ होती हे त्यांच्या या सिद्धांतावरून समजते. त्यांनी कामगारांच्या हिताचे विचार मांडल्यामुळेच कामगारांच्या कल्याणाकडे भांडवलशाही राष्ट्रातील सरकारे लक्ष देत आहेत. त्यांनी आपल्या लिखानामध्ये कामगारांच्या कष्टाला, त्यांच्या श्रमाला महत्त्व दिले आहे. त्यांनी कामगार हिताचे लेखन केल्यामुळे आज कामगारांना चांगले दिवस येत आहेत. म्हणून मार्क्स यांच्या विकास सिद्धांतात जरी काही दोष असले तरी कामगार जगताच्या दृष्टीने त्यांचा सिद्धांत उपयुक्तच आहे. सरकारला सुद्धा मार्क्स यांचा सिद्धांत उपयुक्त आहे. भांडवलदारांनी कामगारांचे शोषण केले तरी कामगार एकत्र येऊन क्रांती करू शकतात, रक्तपात करू शकतात, सरकार उलथवू शकतात हे मार्क्स यांच्या सिद्धांतावरून लक्षात येते. हे होऊ नये म्हणून सरकार भांडवलदारांकडून कामगारांचे शोषण होणार नाही याची काळजी घेते. भांडवलदारही कामगारांनी क्रांती करून आपले साम्राज्य उद्ध्वस्त होणार नाही याची काळजी घेतात. त्यासाठी त्यांना योग्य किंवा न्याय्य वेतन देतात. हेच मार्क्स यांच्या विचारांचे मोठेपण आहे. म्हणून मार्क्स यांच्या सिद्धांतातील काही विचार कामगार, भांडवलदार, सरकार यांच्या दृष्टीने उपयुक्तच आहेत.

**शुंपीटर यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत** (The Schumpeterian Theory of Economic Development) **:**

**प्रास्ताविक :**

प्रा. शुंपीटर (Joseph Alois Schumpeter) यांचा जन्म १८८३ चा आणि मृत्यू १९५० चा आहे. जोसेफ शुंपीटर हे केवळ अर्थशास्त्रज्ञ नव्हते. अर्थशास्त्राबरोबर इतरही विषयावर त्यांनी लेखन केले आहे. ते कायदेशीर सल्लागार होते. आर्थिक सल्लागार होते. वित्तमंत्री होते. एका खाजगी बँकेचे अध्यक्ष होते आणि हारवर्ड (Harvard) या ठिकाणी अर्थशास्त्र विषयाचे प्रोफेसर होते. शुंपीटर यांचे आर्थिक विकासविषयक विचार त्यांच्या काही प्रमुख ग्रंथात आढळतात. शुंपीटर यांनी सन १९११ मध्ये आपला 'आर्थिक विकासाचा सिद्धांत'

(Theory of Economic Development) हा ग्रंथ प्रसिद्ध केला. हा ग्रंथ जर्मन भाषेत होता. सन १९३४ साली त्याची इंग्रजी भाषेत आवृत्ती निघाली. त्यानंतर सन १९३९ साली शुंपीटर यांची 'व्यापारचक्रे' (Business Cycles), १९४२ साली 'भांडवलदार, समाजवाद आणि लोकशाही' (Capitalism, Socialism and Democracy) ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाली. या विविध पुस्तकात शुंपीटर यांनी देशाच्या आर्थिक विकासासंबंधी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. त्या विचारांची थोडक्यात माहिती आपण याठिकाणी घेणार आहोत. शुंपीटर यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात नवप्रवर्तनाला (Innovation) विशेष महत्त्व दिले आहे. म्हणून त्यांच्या सिद्धांताला 'नवप्रवर्तनाचा सिद्धांत / नवोन्मेष सिद्धांत' (Innovation Theory) असेही म्हणतात.

**शुंपीटर यांची आर्थिक विकासाची व्याख्या :**

शुंपीटर यांची आर्थिक विकासाची व्याख्या पुढील शब्दात दिली आहे.

**''अर्थव्यवस्थेत होणारे संख्यात्मक बदल (Quantitative Change) म्हणजे आर्थिक विकास नव्हे तर होणारे गुणात्मक बदल (Qualitative Change) म्हणजे आर्थिक विकास होय.''**

आर्थिक विकासात संख्यात्मक बदलाबरोबर गुणात्मक बदलांनाही महत्त्व असते. विविध वस्तूंच्या उत्पादनात संख्यात्मक वाढ झाली म्हणजे देशाचा आर्थिक विकास झाला असे म्हणता येत नाही. तर उत्पादनात गुणात्मक बदल होणे आवश्यक असते. वस्तू पूर्वीपेक्षा अधिक उपयोगी असणे म्हणजे वस्तूचा गुणात्मक दर्जा उंचावणे होय. उदाहरणार्थ, कॉम्प्युटरऐवजी लॅपटॉपची निर्मिती, लॅण्डलाईन फोन ऐवजी मोबाईल फोन, साध्या मोबाईल फोन ऐवजी आयफोनची निर्मिती याला गुणात्मक बदल असे म्हणतात. आर्थिक विकासामध्ये शुंपीटर यांना गुणात्मक बदल अभिप्रेत होते. म्हणून त्यांनी आर्थिक विकास म्हणजे अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील गुणात्मक बदल असे म्हटले आहे.

**स्थितीशील अर्थव्यवस्था (Static Economy) आणि चक्राकार प्रवाह (Circular Flow) :**

शुंपीटर यांनी आपल्या आर्थिक विकास सिद्धांतात स्थितीशील अर्थव्यवस्था आणि चक्राकार प्रवाह या संकल्पना मांडल्या आहेत. शुंपीटर यांनी स्थैतिक अवस्था (स्थिर अवस्था) गृहीत धरून सिद्धांताची मांडणी केली आहे. शुंपीटर त्यास 'स्पर्धात्मक भांडवलशाही अर्थव्यवस्था' (Competitve Capitalist Economy) असे म्हणतात. अशा स्पर्धात्मक भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व्यापारचक्राची किंवा तेजी-मंदीची निर्मिती होत नाही. कारण अशी अर्थव्यवस्था स्थितीशील किंवा गतिशून्य असते. स्थिर अवस्थेत सर्व गोष्टी या स्थिर असतात. त्यामुळे व्यापारचक्रे निर्माण होत नाहीत.

१) स्थिर अर्थव्यवस्थेत लोकसंख्या स्थिर (कायम) असते. म्हणजे लोकसंख्येत वाढही होत नाही किंवा घटही होत नाही.

२) लोकांची वस्तूबद्दलची आवड-निवड स्थिर असते.

३) लोकांची वस्तूची मागणी स्थिर असते. मागणी वाढत नाही किंवा घटत नाही.

४) उत्पादन पद्धती स्थिर असते. उत्पादन तंत्रात बदल होत नाही.

५) व्यापारी बँकांचा पतपुरवठा स्थिर असतो, पतपुरवठा वाढतही नाही किंवा कमीही होत नाही.

६) पैशाचा पुरवठा सुद्धा स्थिर असतो. त्यामुळे आर्थिक चढ-उतार निर्माण होत नाहीत.

७) निव्वळ गुंतवणूक शून्य असते.

८) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित झालेला असतो. अनैच्छिक बेकारी आढळत नाही.

९) उत्पादनाचे दोनच घटक असतात (अ) भूमी आणि (ब) श्रम. स्थितीशील अर्थव्यवस्थेत खंड किंवा वेतन हे दोनच मोबदले दिले जातात.

१०) त्याच त्याच वस्तू वर्षानुवर्षे तयार होतात आणि त्याच वस्तूंचा उपभोग वर्षानुवर्षे घेतला जातो.

११) स्थिर अर्थव्यवस्थेत व्याजाचा दर शून्य असतो.

१२) स्थिर अर्थव्यवस्थेत नफ्याचे प्रमाण शून्य असते. वस्तूची किंमत वस्तूच्या सरासरी खर्चाएवढी असते. (P = AC). नफा मिळवण्याच्या संधी अस्तित्वात नसतात.

१३) स्थिर अर्थव्यवस्थेत वस्तूची मागणी आणि वस्तूचा पुरवठा दोन्ही समान असतात. (D = S). ग्राहक किती वस्तूंची मागणी करणार आहेत याची सर्व उत्पादकांना माहिती असते. त्यामुळे उत्पादक मागणीइतकेच उत्पादन करतात. त्यामुळे मागणीपेक्षा पुरवठा जास्त किंवा कमी होत नाही.

१४) प्रत्येक उद्योगसंस्थेचा आकार पर्याप्त असतो. उत्पादन घटकांना त्यांच्या सीमांत उत्पादकतेएवढा मोबदला मिळतो.

अशा प्रकारे स्थैतिक अर्थव्यवस्थेत सर्व गोष्टी स्थिर असतात. लोकसंख्या, पैशाचा पुरवठा, वस्तूचा पुरवठा, वस्तूची मागणी, उत्पादन तंत्र, गुंतवणूक यामध्ये वाढ किंवा घट होत नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेत व्यापारचक्राची / आर्थिक चढ-उतारांची म्हणजे तेजी किंवा मंदीची निर्मिती होत नाही. थोडक्यात ज्या अर्थव्यवस्थेत वर उल्लेख केलेले सर्व घटक स्थिर असतात अशा अर्थव्यवस्थेत कोणत्याही उद्योगसंस्थेला जादा (अतिरिक्त) नफा मिळत नाही. तर सर्वसाधारण नफा मिळत असतो. स्थिर अर्थव्यवस्थेत व्याज दर शून्य असतो. भांडवलाला व्याज दिले जात नाही. कारण शुंपीटर यांच्या मते, श्रम (Labour) आणि भूमी (Land) या दोन उत्पादन घटकांच्या एकत्रीकरणातूनच भांडवलाची निर्मिती होत असते. म्हणून भांडवलाला स्वतंत्र मोबदला देण्याची गरज नसते. त्यामुळे स्थितीशील अर्थव्यवस्थेत भांडवलाला व्याज मिळत नाही. अशा देशात त्याच त्या वस्तू वर्षानुवर्षे तयार होत असतात आणि लोकांकडून त्याच वस्तूंचा उपभोग वर्षानुवर्षे घेतला जात असतो. (There are no profits, no interest rates, no savings, no investments and no unemployment), यालाच शुंपीटर अर्थव्यवस्थेत रुढ झालेल्या विविध घटकांचा चक्राकार प्रवाह (Circular Flow) असे म्हणतात. या चक्रीय प्रवाहात काहीही बदल होत नाही. अर्थव्यवस्थेतील सर्व घटक (वस्तू, पैसा, भूमी,

भांडवल, पतपैसा इत्यादी) या चक्राकार प्रवाहात फिरत असतात. मनुष्याच्या शरीरातील रक्त ज्याप्रमाणे एका विशिष्ट प्रकारे फिरत असते त्याप्रमाणे हे सर्व घटक अर्थव्यवस्थेत निश्चित होऊन फिरत असतात. (According to Schumpeter, "This stationary equlilibrium is characterised by the circular flow which continues to revive itself every year in the same system as the blood circulates in a human body.") या स्थितीशील अर्थव्यवस्थेत नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित आपत्ती आणि इतर काही कारणांनी (सरकारच्या करधारणातील बदल इत्यादी) काही आर्थिक चढ-उतार होतात. परंतु त्याला तेजी किंवा मंदी म्हणता येणार नाही. म्हणजेच व्यापारचक्र (Trade Cycle) म्हणता येणार नाही. नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीमुळे जरी सामान्य संतुलन (General Equilibrium) बिघडले तरी समायोजन (adjustment) होऊन पुन्हा आपोआप संतुलन अवस्था तयार होते. याला शुंपीटर आर्थिक जीवनाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात. हा प्रवाह अखंड चालू असतो. त्यात बदल होत नाही.

**आर्थिक विकासाला कशी सुरवात होते?**

उत्पादनात संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ घडून येणे म्हणजे आर्थिक विकास असे शुंपीटर म्हणतात. भांडवलशाही अर्थव्यवस्था ही सामान्य संतुलनाच्या (Genral Equilibrium) अवस्थेत असते. हे सामान्य संतुलन बिघडल्याशिवाय किंवा चक्राकार प्रवाहात अडथळे आल्याशिवाय आर्थिक विकासाला सुरवात होत नाही. सामान्य संतुलन बिघडल्यानंतर किंवा चक्रीय प्रवाहात अडथळे आल्यानंतर व्यापारचक्राची (तेजी किंवा मंदीची) निर्मिती होते आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाला सुरवात होते. अशा प्रकारे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विकास हा तेजी-मंदीयुक्त किंवा आर्थिक चढ-उतारांनी भरलेला असतो. भांडवलशाही स्थितीशील अर्थव्यवस्थेत नवप्रवर्तक (Innovators) नवप्रवर्तनाचे (Innovations) जे कार्य करतात त्यामुळे सामान्य संतुलन बिघडते किंवा चक्राकार प्रवाहात अडथळे येतात आणि व्यापारचक्राची (तेजी व मंदीची) निर्मिती होते. अशा प्रकारे स्थिर अर्थव्यवस्थेत जेव्हा नवप्रवर्तनाला सुरवात होते तेव्हा सामान्य संतुलन बिघडून आर्थिक विकासाला सुरवात होते. (When the Innovations or the changes (economic, social, political and technical) take place in the economy, the stationary equilibrium or circulation flow is displaced and the process of development starts) भांडवलशाही औद्योगिक अर्थव्यवस्थेत नवप्रवर्तनामुळे व्यापारचक्राची (तेजी आणि मंदीची) निर्मिती होत असते. या तेजी-मंदीलाच आर्थिक चढ-उतार असे म्हणतात. नवप्रवर्तनामुळे आर्थिक विकासाच्या मार्गात तेजी-मंदीसारखे अडथळे निर्माण होत असतात. या अडथळ्यामुळे किंवा चढ-उतारामुळेच भांडवलशाही राष्ट्राचा आर्थिक विकास घडून येत असतो.

**नवप्रवर्तन म्हणजे काय?**

शुंपीटर यांनी आपल्या सिद्धांतात नवप्रवर्तनामुळे व्यापारचक्रे उद्‌भवतात असे म्हटले आहे. म्हणून नवप्रवर्तन म्हणजे काय? हे पाहणे आवश्यक आहे. नवप्रवर्तनाच्या खालील काही व्याख्यावरून नवप्रवर्तन म्हणजे काय ते आपणास समजून येईल.

**''उत्पादन, व्यापार, व्यवस्थापन यासंदर्भात संशोधक जे नवनवीन शोध लावत असतात त्या शोधांचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करणे म्हणजे नवप्रवर्तन (Innovation) होय.''**

संशोधक, शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ, तंत्रज्ञ इत्यादी औद्योगिक क्षेत्राशी संबंधित नवनवीन शोध लावत असतात, हे तज्ञ लोक केवळ संशोधनाचे किंवा शोध लावण्याचे काम करत असतात. ते उद्योजक किंवा कारखानदार किंवा संयोजक नसतात. या संशोधकांना त्यांच्या शोधाबद्दल (शोधाचा वापर करू दिल्याबद्दल) संयोजक विशिष्ट मोबदला देत असतात आणि संयोजक त्यांच्या शोधांचा वापर करून उत्पादन करत असतात. आणि ते उत्पादन बाजारात विक्रीसाठी आणत असतात. यालाच शोधांचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करणे असे म्हणतात. नवीन शोधांचा वापर करून उत्पादन करणे याला शुंपीटर नवप्रवर्तन (Innovation) असे म्हणतात आणि जे संयोजक असे नवप्रवर्तन करतात त्या संयोजकांना त्यांनी 'नवप्रर्तक' (Innovators) असे म्हटले आहे. म्हणजे नवप्रवर्तक नवप्रवर्तन करत असतात.

नवप्रवर्तनालाच उपक्रमशीलता असेही म्हणतात. नवप्रवर्तनाची आणखी एक व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''वर्तमान स्थितीत जी गोष्ट (वस्तू) अस्तित्वात नाही तिथे नवीन गोष्ट निर्माण करणे म्हणजे प्रवर्तन किंवा नवप्रवर्तन किंवा अभिनव प्रक्रिया (Innovation) होय.'' (Innovation implies an activity leading to creation of something new, in relation to what is not being done in existing system.)**

एखादी वस्तू किंवा उत्पादन पद्धत किंवा व्यवस्थापन पद्धत किंवा एखादी बाजारपेठ नव्याने शोधून काढणे म्हणजे नवप्रवर्तन असा वरील व्याख्येचा सोपा अर्थ आहे. जी गोष्ट अस्तित्वात नाही ती गोष्ट निर्माण करणे असा नवप्रवर्तनाचा व्यापक अर्थ आहे.

**''संशोधकांनी, तज्ज्ञांनी लावलेल्या शोधांचा (नवीन यंत्र, नवीन तंत्र इत्यादी) व्यावसायिक वापर करणे म्हणजे नवप्रवर्तन होय.''**

संशोधक जे शोध लावत असतात त्या शोधांचा वापर करून उत्पादन करणे व ते उत्पादन बाजारात विक्रीसाठी आणणे याला नवप्रवर्तन असे म्हणतात. उदाहरणार्थ गवत (तण) काढण्याचे यंत्र संशोधक शोधून काढतात. संयोजक त्याप्रमाणे यंत्र बनवून बाजारात विक्रीसाठी आणतात. याला शोधाचा व्यावसायिक वापर असे म्हणतात. नवप्रवर्तनाची आणखी एक व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''वस्तूचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आणि वस्तूचा खप वाढविण्यासाठी संयोजकांनी (नवप्रवर्तकांनी) उत्पादन पद्धतीत केलेले बदल म्हणजे नवप्रवर्तन किंवा उपक्रमशीलता होय.''**

नवप्रवर्तनालाच उपक्रमशीलता असे म्हणतात. वरील व्याख्येत नवप्रवर्तन संयोजकांकडून का केले जाते आणि कसे केले जाते याची माहिती दिली आहे. प्रचलित उत्पादन पद्धतीत योग्य ते बदल करणे म्हणजे

नवप्रवर्तन होय. नवीन उत्पादन पद्धतीचा अवलंब केला असता वस्तूचा खर्च कमी होतो आणि वस्तूचा खप वाढतो. हे नवप्रवर्तनाचे फायदे वरील व्याख्येवरून स्पष्ट होतात.

**नवप्रवर्तनाचे हेतू :**

**१) जास्तीत जास्त नफा मिळवणे :**

संयोजक (नवप्रवर्तक) नवप्रवर्तन का करतात ते शुंपीटर यांनी स्पष्ट केले आहे. जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी नवप्रवर्तक नवप्रवर्तन करतात. नफा मिळवण्यासाठीच नवप्रवर्तन केले जाते. नफा मिळवणे हाच नवप्रवर्तनाचा मुख्य हेतू असतो.

**२) इतरांपेक्षा अधिक उत्पादन साधने मिळवणे :**

इतर संयोजक किंवा संघटकापेक्षा अधिक उत्पादनाची साधने मिळवणे हा प्रवर्तकाचा हेतू असतो. स्पर्धात्मक भांडवलशाही अर्थव्यवस्थेत इतर उत्पादकांपेक्षा अधिक उत्पादन साधने प्रवर्तक मिळवतो. प्रवर्तकाला अधिक नफा मिळवण्यासाठी अधिक उत्पादन साधने मिळवावी लागतात.

**३) नवनिर्मितीचा आनंद मिळवणे :**

नवीन वस्तू तयार करून बाजारात आणणे, नवीन उत्पादन तंत्र वापरून वस्तू बनविणे, नवीन व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे, वस्तूच्या दर्जात, गुणवत्तेत सुधारणा करणे याला नवनिर्मिती असे म्हणतात. नवनिर्मितीचा हा आनंद मिळवण्यासाठी सुद्धा काही लोक नवप्रवर्तन (Innovation) करतात. त्यांना प्रवर्तक किंवा नवप्रवर्तक (Innovators) असे म्हणतात.

**४) नावलौकिक मिळवणे :**

नफा मिळवण्याबरोबरच उद्योग क्षेत्रात नाव कमावणे, श्रेष्ठत्व मिळवणे किंवा नावलौकिक मिळवणे यासाठी काही संयोजक नवप्रवर्तन करत असतात.

**नवप्रवर्तनाच्या पद्धती / प्रकार / स्वरूप :**

नवप्रवर्तनाच्या पद्धती किंवा नवप्रवर्तनाचे प्रकार थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. त्यावरून आपणास नवप्रवर्तन म्हणजे काय हे अधिक चांगल्या प्रकारे लक्षात येईल.

**१) नवीन उत्पादन तंत्राचा वापर :**

जुन्या किंवा कालबाह्य उत्पादन पद्धतीचा किंवा तंत्राचा वापर केला असता उत्पादन खर्च अधिक येतो. परंतु नवीन अत्याधुनिक उत्पादन पद्धतीचा किंवा नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन केले असता उत्पादन खर्चात बचत होते. कमी वेळेत अधिक उत्पादन होते. उत्पादन दर्जेदार, आकर्षक तयार होते. त्यामुळे खप वाढून नफा अधिक मिळतो. जे संयोजक अशा प्रकारे नवीन उत्पादन तंत्राचा (नवीन आधुनिक यंत्रांचा) वापर करून उत्पादन करतात त्यांना अधिक नफा मिळतो. अशा संयोजकांना नवप्रवर्तक असे म्हणतात.

**२) नवीन कच्च्या मालाचा वापर करणे :**

उत्पादनासाठी (वस्तू तयार करण्यासाठी किंवा पक्का माल तयार करण्यासाठी) विविध प्रकारच्या कच्च्या मालाची गरज असते. परंतु कच्च्या मालाचा तुटवडा असेल, कच्चा माल पुरेशा प्रमाणात मिळत नसेल, कच्च्या मालाच्या किंमती जास्त असतील, कच्च्या मालाची गुणवत्ता फारशी चांगली नसेल तर पक्क्या मालाचा उत्पादन खर्च वाढतो. परंतु जर संशोधकांनी नवीन कच्च्या मालाचा शोध लावला आणि त्या कच्च्या मालाचा वापर करून पक्का माल बनवला तर संयोजकांना पूर्वीपेक्षा अधिक फायदा मिळतो. संशोधकांनी शोधून काढलेल्या नवीन कच्च्या मालाचा वापर करून उत्पादन करणे याला नवप्रवर्तन असे म्हणतात. उदाहरणार्थ कापूस हा कच्चा माल असून कापसापासून कापड तयार केले जाते. कापसाऐवजी कृत्रिम धाग्यांचा (नायलॉन, टेरिलिन) वापर केला असता कापसाच्या टंचाईवर मात करता येते. कापसाऐवजी कृत्रिम धाग्यांचा वापर करणे म्हणजे नवप्रवर्तन करणे होय. नवीन प्रकारचा (पर्यायी) कच्चा माल वापरला तर कमी खर्चात पक्का माल तयार करता येतो. नवीन कच्चा माल पुरेशा प्रमाणात मिळतो. त्यामुळे पक्क्या मालाचे उत्पादनही पुरेशा प्रमाणात करता येते. नवीन कच्चा माल चांगल्या क्वॉलिटिचा असल्याने पक्का मालही चांगला व दर्जेदार तयार होतो. त्यामुळे नवप्रवर्तकाच्या वस्तूचा खप वाढून नफाही भरपूर मिळतो. अशा प्रकारे संशोधकांनी शोधून काढलेल्या नवीन कच्च्या मालाचा वापर करून जे संयोजक उत्पादन करतात त्यांना अधिक नफा मिळतो. इतरांना तो मिळत नाही.

**३) वस्तूच्या दर्जात सुधारणा :**

जुन्या वस्तूच्या दर्जात सुधारणा करणे, वस्तू आकर्षक बनविणे यालासुद्धा नवप्रवर्तन असे म्हणतात. संशोधकांनी जुन्या वस्तूवर संशोधन करून वस्तूच्या दर्जात, उपयुक्ततेत किंवा गुणवत्तेत सुधारणा केली आणि संशोधकांनी सुचवलेल्या सुधारणानुसार संयोजकांनी उत्पादन केले म्हणजे वस्तूच्या दर्जात सुधारणा केली तर अशा वस्तूचा खप वाढतो. अशा सुधारणा केलेल्या वस्तूला किंमतही चांगली मिळते. त्यामुळे नफाही अधिक मिळतो. ज्या शोधाच्या वापराने वस्तूचा खप वाढतो, वस्तूला चांगली किंमत मिळते त्या शोधाच्या वापराला नवप्रवर्तन असे म्हणतात. जे संयोजक असे नवप्रवर्तन करतात त्यांना अधिक नफा मिळतो.

**४) नवीन वस्तू तयार करून बाजारात आणणे :**

जी वस्तू अस्तित्वात नाही, बाजारात विक्रीसाठी नाही अशी वस्तू तयार करून बाजारात विक्रीसाठी आणणे यालाही नवप्रवर्तन असे म्हणतात. उदाहरणार्थ मोबाईल फोनचा शोध. मोबाईल फोन ही पूर्णपणे नवीन वस्तू होती. ही वस्तू बाजारात आल्यावर तिचा खप प्रचंड वाढला. संशोधक किंवा तज्ज्ञ लोक अशा प्रकारे काही नव्या वस्तूंचा शोध लावत असतात. या वस्तू तयार करून जे संयोजक बाजारात विक्रीसाठी आणतात त्यांना चांगली किंमत मिळते आणि नफा सुद्धा चांगला मिळतो. नवीन वस्तू आकर्षक आणि अधिक उपयोगी असते. अशी वस्तू ग्राहकांनी यापूर्वी पाहिलेली नसते किंवा वापरलेली नसते. त्यामुळे अशा नवीन वस्तू मोठ्या प्रमाणात खपतात. त्यामुळे संयोजकांना प्रचंड नफा मिळतो. जे संयोजक अशा नवीन वस्तूंचे उत्पादन करत नाहीत त्यांना असा प्रचंड नफा मिळत नाही.

**५) नवीन आणि उच्च दर्जाच्या व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब :**

उद्योगसंस्थेचे यश किंवा उद्योगसंस्थेचा नफा हा व्यवस्थापनाच्या दर्जावरही अवलंबून असतो. व्यवस्थापन चांगले, उच्च दर्जाचे असेल तर कच्च्या मालाची नासधूस होत नाही. कामगार व इतर उत्पादन साधनांचा पर्याप्त व योग्य वापर करून घेता येतो. उत्पादन खर्च कमीत कमी येतो आणि नफा चांगला मिळतो. जे संयोजक नव्या, उच्च दर्जाच्या व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करतात त्यांना नवप्रवर्तक असे म्हणतात आणि उत्पादनात (कारखान्यात) नवीन, उच्च आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करणे याला नवप्रवर्तन असे म्हणतात. जे संयोजक उद्योग व्यवसायात आधुनिक, नवीन व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करत नाहीत म्हणजेच नवप्रवर्तन करत नाहीत त्यांना नवप्रवर्तक म्हणत नाहीत आणि त्यांना नवप्रवर्तकाइतका नफा सुद्धा मिळत नाही.

**६) नवनवीन बाजारपेठांचा शोध लाऊन तेथे वस्तू विकणे :**

ज्या संयोजकांना नवीन बाजारपेठांचा शोध लागतो आणि जे संयोजक नवनवीन बाजारपेठेत वस्तू विक्रीस पाठवतात त्या संयोजकांना भरपूर नफा मिळतो. नवीन बाजारपेठांचा शोध लावून त्या बाजारात वस्तू विकणे याला नवप्रवर्तन असे म्हणतात. जे संयोजक अशा प्रकारे नवीन बाजारपेठेत वस्तू विकतात त्या संयोजकांना नवप्रवर्तक असे म्हणतात. नवीन बाजारपेठेत वस्तू विक्रीसाठी पाठवल्यामुळे संयोजकांना (नवप्रवर्तकांना) भरपूर नफा मिळतो. त्यांच्या वस्तूंचा खप वाढतो. जे संयोजक नवीन बाजारपेठांचा शोध लावत नाहीत आणि तेथे वस्तू विकत नाहीत त्यांना त्याचा लाभ मिळत नाही व त्या संयोजकांना नवप्रवर्तकही म्हटले जात नाही.

अशा प्रकारे नवीन उत्पादन तंत्राचा वापर करणे, नवीन कच्चा माल वापरून उत्पादन करणे, वस्तूच्या दर्जात सुधारणा करणे, नवीन वस्तू तयार करून बाजारात विक्रीसाठी आणणे, नवीन आणि उच्च दर्जाच्या व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करणे, नवनवीन बाजारपेठांचा शोध लाऊन तेथे वस्तू विकणे, नवीन स्वस्त उर्जा साधनांचा वापर करणे, नवीन व आकर्षक जाहिरात करणे याला नवप्रवर्तन असे म्हणतात आणि जे संयोजक असे नवप्रवर्तन करतात त्या संयोजकांना नवप्रवर्तक असे म्हणतात. संयोजकांपेक्षा नवप्रवर्तकांनाच अधिक नफा मिळतो. **म्हणून नफा हे नवप्रवर्तनाचे बक्षीस असते. (Profit is reward for innovation).**

**नवप्रवर्तन केंव्हा शक्य होते? (नवप्रवर्तनासाठी अनुकूल परिस्थिती) / नवप्रवर्तन शक्य होण्यासाठी अटी :**

नवप्रवर्तन घडून येण्यासाठी शुंपीटर यांनी पुढील बाबी अनुकूल असल्या पाहिजेत असे म्हटले आहे.

१) सामाजिक परिस्थिती अनुकूल असली पाहिजे. नफा मिळवणे गैर किंवा चुकीचे मानले जाता कामा नये. समाजाचा त्यासाठी पाठिंबा असला पाहिजे.

२) नफा मिळवण्यावर सरकारची बंधने असता कामा नयेत.

वरील दोन्ही गोष्टी अनुकूल असतील तरच संयोजक नवप्रवर्तन करतील. अन्यथा त्यांच्याकडून नवप्रवर्तन होणार नाही.

**नवप्रतवर्तनाचे फायदे :**

१) नवप्रवर्तनामुळे कमी खर्चात उत्पादन शक्य होते.

२) नवीन, आकर्षक वस्तू तयार करता येते.

३) उत्पादन खर्च कमी असल्याने कमी किंमतीला वस्तू विकता येते.

४) नवप्रवर्तनामुळे नवीन वस्तू निर्माण होते. किंमत कमी असते. त्यामुळे ग्राहकांची मागणी वाढते.

५) नवप्रवर्तन करणाऱ्यांना इतरांपेक्षा अधिक (अतिरिक्त) नफा मिळतो.

६) नवप्रवर्तनामुळे राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न यात वाढ होऊन आर्थिक विकास दरात वाढ होते.

अशा प्रकारे अर्थव्यवस्थेत नवप्रवर्तकामुळे स्थिर अर्थव्यवस्थेतील चक्रीय प्रवाह मोडून तेजी, घसरण, मंदी, पुनरुज्जीवन या अवस्था निर्माण होतात आणि पुन्हा अर्थव्यवस्थेत स्थैतिक अवस्था येते. त्यानंतर परत अर्थव्यवस्थेत अभिनव प्रक्रिया सुरू होतात. नवप्रवर्तक नवप्रवर्तन करतात आणि आर्थिक विकास होत राहतो.

**भांडवलशाहीचा नाश** (The End of Capitalism) **:**

नवप्रवर्तनामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेत तेजी (भरभराट), घसरण, मंदी आणि पुनरुज्जीवन या व्यापारचक्राच्या अवस्था निर्माण होतात. यालाच आर्थिक चढ-उतार असे म्हणतात. या आर्थिक चढ-उतारामधून आर्थिक विकास घडून येतो. परंतु शुंपीटर यांच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्था टिकून राहणे कठीण असते. विविध कारणामुळे भांडवलशाही नष्ट होते आणि तिच्या जागी समाजवादी अर्थव्यवस्था येऊ शकते असे शुंपीटर यांनी म्हटले आहे. (According to Schumpeter, "Capitalism cannot survive. It will die on its own accord. It will ultimately give place to socialism.") भविष्यात नवप्रवर्तनांना महत्त्व राहत नाही. सुरवातीला नवप्रवर्तनामुळे फायदे मिळतात. परंतु कालांतराने नाविण्य संपुष्टात येऊन नवप्रवर्तकांचे महत्त्व संपते. खाजगी मालमत्ता करार स्वातंत्र्य संपुष्टात येते. भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्या राजकीय समर्थकांचा ऱ्हास होतो. देशातील बुद्धिमान लोक भांडवलशाहीवर टीका करू लागतात. कामगार चळवळ बुद्धिवंतांच्या हातात जाते. त्यामुळे कामगार भांडवलशाहीला विरोध करतात आणि भांडवलशाहीचा नाश होऊन देशात समाजवाद प्रस्थापित होतो. शुंपीटर म्हणतात, भांडवलशाहीच्या विकासातच भांडवलशाहीच्या नाशाची बीजे दडलेली असतात. (According to Schumpeter, "Capitalism is self destructive.") भांडवलशाहीमध्ये अनेक दोष असतात. म्हणून भांडवलशाहीचा नाश होणे अटळ आहे असे शुंपीटर म्हणतात. बिगर आर्थिक घटकामुळे भांडवलशाहीचा नाश होतो, असे शुंपीटर यांचे मत आहे. शुंपीटर यांनी भांडवलशाहीच्या नाशाची जी कारणे सांगितली आहेत ती खालीलप्रमाणे दिली आहेत.

**१) नवप्रवर्तकांचे महत्त्व संपुष्टात येणे :**

स्थितीशील भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या विकासात नवप्रवर्तकांची भूमिका खूप महत्त्वाची असते. अनेक नवप्रवर्तक मिळून देशात जी अभिनव प्रक्रिया सुरू करतात त्यामुळे देशाचा आर्थिक विकास घडून येत

असतो. नवप्रवर्तनामुळे नवीन, चांगल्या प्रकारची, चांगल्या दर्जाची वस्तू तयार होऊन बाजारात येते. त्यामुळे बाजारातील जुन्या वस्तूंना मागणी कमी येते. काही काळाने जुन्या वस्तूंची जागा नवीन वस्तू घेतात. त्याला शुंपीटर यांनी 'निर्माणक्षम विध्वंस' (Creative Destruction) असे म्हटले आहे. अशा प्रकारे नवप्रवर्तनामुळे नवप्रवर्तकांच्या फायद्यात मोठी वाढ होते. त्यामुळे त्यांच्याकडून गुंतवणूक वाढून आर्थिक विकासाला चांगली चालना मिळते. अशा प्रकारे देशाच्या आर्थिक विकासात नवप्रवर्तकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. परंतु काही काळानंतर नवप्रवर्तकांच्या नवप्रवर्तनाला अर्थ राहत नाही. नवप्रवर्तकांच्या नवप्रवर्तनाचे / अभिनव प्रक्रियांचे नाविण्य संपते. त्यामुळे नवप्रवर्तकांचे महत्त्व संपुष्टात येते. त्यामुळे भांडवलशाहीचा नाश होतो.

**२) संस्थात्मक संरचनेचा नाश** (The Destruction of the Institutional Framework of the capitalist society) **:**

भांडवलशाहीचा नाश होण्याचे आणखी एक प्रमुख कारण शुंपीटर यांनी सांगितले आहे आणि ते म्हणजे उद्योगांची मालकी पगारदार नोकर वर्ग आणि भागधारक होतात. त्यामुळे खाजगी मालमत्ता आणि करारस्वातंत्र्य या संकल्पनांचे महत्त्व संपते. त्यामुळे भांडवलशाहीचा नाश होतो.

**३) भांडवलशाहीच्या पाठीराख्यांचा ऱ्हास :**

भांडवलशाहीला पाठिंबा असणाऱ्या राजकीय समर्थकांचा ऱ्हास होतो. भांडवलशाहीला राजकीय पाठबळ उरत नाही. त्यामुळे भांडवलशाहीचा नाश होतो.

**४) बुद्धिजीवी लोकांचा विरोध :**

भांडवलशाहीचा विकास होत असताना देशातील बुद्धिजीवी लोक भांडवलशाहीच्या विरोधात उभे राहतात. ते भांडवलशाहीवर टीका करतात. भांडवलशाहीने दिलेल्या स्वातंत्र्याचा लाभ घेऊन बुद्धिजीवी लोक भांडवलशाहीला विरोध करतात. आर्थिक विकास होत असताना शिक्षणाच्या संधी वाढत असतात. त्यामुळे देशात सुशिक्षित लोकांची संख्या वाढत जाते. हे लोक सुद्धा भांडवलशाहीला विरोध करतात. देशातील कामगार चळवळ बुद्धिजीवी लोक ताब्यात घेतात आणि त्यांच्याकरवी भांडवलशाहीच्या विरोधात जनमत तयार करतात. त्यामुळे भांडवलशाहीचा नाश होतो. तसेच बेरोजगार व्यक्तीसुद्धा भांडवलशाहीला विरोध करतात.

अशा प्रकारे नवप्रवर्तकांचे महत्त्व संपुष्टात येणे, संस्थात्मक संरचनेचा नाश होणे, भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्या राजकीय शक्तीचा ऱ्हास होणे, बुद्धिजीवी आणि कामगार लोकांकडून भांडवलशाहीला विरोध होणे या कारणामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्था नष्ट होते आणि तिची जागा समाजवादी अर्थव्यवस्था घेते, असे शुंपीटर यांचे मत आहे.

**शुंपीटर यांच्या सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :**

शुंपीटर यांच्या आर्थिक विकास सिद्धांतावर खालीलप्रमाणे टीका केल्या जातात.

**१) नवप्रवर्तनामुळे संपूर्ण देशाचा विकास होत नाही :**

शुंपीटर यांनी नवप्रवर्तनामुळे देशाचा आर्थिक विकास होतो असे म्हटले आहे. परंतु त्यांचे हे प्रतिपादन खरे नाही. कारण जगात काही देश असे आहेत की त्या देशात ज्या क्षेत्रात नवप्रवर्तन झाले आहे त्या क्षेत्रांची प्रगती झाली आहे आणि ज्या क्षेत्रात नवप्रवर्तन झालेले नाही ती क्षेत्रे अप्रगत राहिलेली आहेत. म्हणून नवप्रवर्तनामुळे संपूर्ण देशाचा विकास होतो असे नाही.

**२) नवप्रवर्तन बंद पडल्यास नफा शून्य होतो हे चूक :**

शुंपीटर यांनी नवप्रवर्तन बंद पडल्यास नफा शून्य होतो, असे म्हटले आहे. परंतु शुंपीटर यांचे हे प्रतिपादन बरोबर नाही. नफा हा संयोजकाच्या संयोजन कार्याचा मोबदला असतो. संयोजक जी विविध कार्ये करत असतो त्याबद्दल त्याला मोबदला म्हणून नफा मिळत असतो. म्हणून नवप्रवर्तन बंद पडल्यास नफा शून्य होत नाही.

**३) वाढत्या लोकसंखेचा विचार नाही :**

शुंपीटर यांनी वाढत्या लोकसंख्येचा / अतिरिक्त लोकसंख्येचा विचार केलेला नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. त्याचा विचार शुंपीटर यांनी केलेला नाही.

**४) अविकसित देशांना फारसा लागू पडत नाही :**

शुंपीटर यांचा आर्थिक विकास सिद्धांत अप्रगत देशांना फारसा लागू पडत नाही. कारण अप्रगत देशात नवप्रवर्तकांची उणीव असते. धाडसी संयोजक किंवा उपक्रमशील संयोजक खूपच कमी असतात. तसेच बँकिंग व्यवस्था पुरेशी सक्षम नसते. बँका आर्थिकदृष्ट्या मजबूत नसतात. त्यामुळे बँकांकडून संयोजकांना / नवप्रवर्तकांना पुरेसा वित्तपुरवठा होऊ शकत नाही. त्याचा विचिार शुंपीटर यांनी केलेला नाही.

**५) गरीबांचे नुकसान :**

तेजीमुळे (भरभराटीमुळे / भाववाढीमुळे) आर्थिक विकासाला चालना मिळते असे शुंपीटर म्हणतात. तेजी म्हणजे भाववाढ म्हणजेच किंमतीतील वाढ. परंतु किंमत वाढीमुळे गरीबांचे आर्थिक नुकसान होते. त्यांचा उपभोग कमी होतो. परंतु त्याचा विचार शुंपीटर यांनी केलेला नाही.

**६) पूर्ण रोजगाराचे गृहीत चुकीचे :**

शुंपीटर यांनी आपला व्यापारचक्राचा सिद्धांत पूर्ण रोजगार गृहीत धरून मांडला आहे. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असतो असे गृहीत धरून त्यांनी सिद्धांताची मांडणी केली आहे. टीकाकारांनी शुंपीटर यांच्या या गृहीतावर मोठी टीका केली आहे. त्यांनी पूर्ण रोजगाराचे गृहीत चुकीचे, अवास्तव, काल्पनिक आहे असे म्हटले आहे. जगात कोणत्याही देशात पूर्ण रोजगार आढळत नाही. जगातील कोणत्याही देशाने पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट गाठलेले नाही. जेव्हा भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन हे उत्पादनाचे सर्व घटक कामाला लागलेले असतात तेव्हा त्यास पूर्ण रोजगाराची परिस्थिती असे म्हणतात. अशी परिस्थिती जगात कुठेच आढळत नाही.

श्रीमंत किंवा विकसित देशात सुद्धा पूर्ण रोजगाराची परिस्थिती दिसून येत नाही. अपूर्ण रोजगार हे वास्तव आहे. पूर्ण रोजगार अवास्तव / काल्पनिक आहे. म्हणून चुकीच्या गृहीतावर शुंपीटर यांच्या सिद्धांताची उभारणी झाली असल्याने या सिद्धांताचे महत्त्व कमी होते. अवास्तव अशा पूर्ण रोजगाराच्या गृहीतावर सिद्धांताची मांडणी केली असल्याने सिद्धांत दोषयुक्त आहे.

**७) केवळ नवप्रवर्तनामुळे व्यापारचक्राची निर्मिती होते हे चूक :**

शुंपीटर यांनी आपल्या व्यापारचक्राच्या सिद्धांतात नवप्रवर्तनामुळे (नवप्रवर्तकांच्या उपक्रमशीलतेमुळे) व्यापारचक्राची निर्मिती होते असे म्हटले आहे. म्हणजे नवप्रवर्तनामुळे तेजी येते आणि नवप्रवर्तन संपले की मंदी येते असे म्हटले आहे. नवप्रवर्तनामुळे तेजी आणि मंदी येते हे खरे असले तरी केवळ नवप्रवर्तन याच घटकामुळे तेजी-मंदीची (व्यापारचक्राची) निर्मिती होते हे चुकीचे आहे. व्यापारचक्राच्या निर्मितीस नवप्रवर्तनाशिवाय इतरही काही घटक जबाबदार असतात. परंतु त्याचा विचार शुंपीटर यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. शुंपीटर यांनी आपल्या सिद्धांतात नवप्रवर्तकांनाच अधिक महत्त्व दिले आहे. व्यापारचक्रास कारणीभत असलेल्या इतर घटकांकडे शुंपीटर यांनी दुर्लक्ष केले आहे. म्हणून हा सिद्धांत अपूर्ण वाटतो.

**८) नवप्रवर्तकांना केवळ बँकाच पतपुरवठा करतात हे चूक :**

शुंपीटर यांनी आपल्या सिद्धांतात नवप्रवर्तकांबरोबर व्यापारी बँकांच्या पतपुरवठ्यालाही अवास्तव महत्त्व दिले आहे. व्यापारी बँका नवप्रवर्तकांना लागणारा सर्व कर्जपुरवठा करतात. त्यामुळे नवप्रवर्तन शक्य होते, असे शुंपीटर यांनी म्हटले आहे. परंतु नवप्रवर्तक किंवा उद्योजक केवळ व्यापारी बँकाकडून कर्ज घेत नाहीत. लोकांना शेअर्सची विक्री करून, कर्जरोख्यांची विक्री करून आणि स्वत:जवळचे भांडवल वापरून नवप्रवर्तक नवप्रवर्तन करत असतात. (नवप्रवर्तन म्हणजे संशोधकांनी लावलेल्या शोधांचा वापर करून नवीन उत्पादन करणे आणि त्यांची बाजारपेठेत विक्री करणे.) नवप्रवर्तन करण्यासाठी नवप्रवर्तक किंवा कारखानदार अशा प्रकारे केवळ व्यापारी बँकांच्या पतपुरवठ्यावर अवलंबून नसतात. इतर ठिकाणाहूनही कर्ज किंवा भांडवल गोळा करून नवप्रवर्तक नवप्रवर्तन करत असतात. परंतु त्याचा विचार प्रा. जोसेफ शुंपीटर यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. अशा प्रकारे शुंपीटर यांनी आपल्या व्यापारचक्राच्या सिद्धांतात व्यापारी बँकांना आणि त्यांच्या पतपुरवठा कार्याला अवास्तव महत्त्व दिले आहे. नवप्रवर्तनासाठी नवप्रवर्तकांना (संयोजकांना/उद्योजकांना) व्यापारी बँका जो पतपुरवठा करतात त्यामुळे अर्थव्यवस्थेतील पैशाचा एकूण पुरवठा वाढून तेजी येते आणि व्यापारी बँकांनी पतनिर्मितीचे (नवप्रवर्तकांना अर्थपुरवठा करण्याचे) कमी केले तर मंदी येते असे शुंपीटर यांनी म्हटले आहे. ते संपूर्णत: बरोबर नाही. कारण नवप्रवर्तक नवप्रवर्तनासाठी इतर ठिकाणाहूनही (इतर स्रोतांकडूनही) कर्ज किंवा भांडवल गोळा करत असतात. म्हणून केवळ व्यापारी बँकाच नवप्रवर्तकांना कर्ज पुरवतात हे शुंपीटर यांचे म्हणणे खरे नाही. ठेवीदार, भागधारक, सरकार हे घटकसुद्धा नवप्रवर्तनासाठी भांडवलाचा पुरवठा करत असतात. परंतु त्याचा विचार शुंपीटर यांनी केलेला नाही.

**९) पेटंट कायद्याकडे दुर्लक्ष:**

शुंपीटर यांनी आपल्या सिद्धांतात असे म्हटले आहे की, जेव्हा एखादा संयोजक संशोधकाच्या शोधाचा वापर करून नवीन व आकर्षक वस्तू बाजारात विक्रीसाठी आणतो तेव्हा त्याला इतरांपेक्षा अधिक नफा मिळतो. त्याला अधिक नफा मिळत असल्याचे पाहून इतर संयोजक सुद्धा त्याचे अनुकरण करतात आणि तशीच वस्तू बनवून बाजारात आणतात आणि अमाप नफा मिळवतात. अशा प्रकारे नवप्रवर्तनात वाढ होऊन देशात तेजीची (भरभराटीची) परिस्थिती निर्माण होते. परंतु आजच्या काळात पेटंट कायदे अस्तित्वात आले असल्याने या कायद्यानुसार एखाद्या नवप्रवर्तकाने जशी वस्तू बनवली आहे तशी वस्तू कोणालाही बनवता येत नाही. एखाद्याच्या वस्तूची नक्कल करणे हा कायद्यानुसार गुन्हा मानण्यात आला आहे. परंतु शुंपीटर यांच्या काळात पेटंटचे कायदे नव्हते. त्यामुळे शुंपीटर यांना दोष देता येत नाही.

**१०) प्रवर्तक कोणाला म्हणावयाचे हा कठीण प्रश्न आहे:**

आजच्या आधुनिक काळात प्रवर्तक कोणाला म्हणावयाचे हा कठीण प्रश्न आहे. शुंपीटरच्या काळात ही गोष्ट सोपी होती. अनेक मोठमोठ्या कंपन्यांचे स्वत:चे संशोधन विभाग आहेत. या विभागात निरंतर संशोधन कार्य चालत असते. अनेक संशोधक संशोधन करत असतात. त्यामुळे नवप्रवर्तकच विकासाला जबाबदार असतात असे म्हणता येत नाही.

**११) भांडवलशाही नष्ट होऊन समाजवाद येईल हे भाकीत खोटे :**

शुंपीटर यांनी आपल्या सिद्धांतात भांडवलशाही नष्ट होऊन तिच्या जागी समाजवाद येईल, असे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्षात सर्वत्र असे घडलेले आढळत नाही. तसेच समाजवादच भांडवलशाहीची जागा घेईल हे शुंपीटरचे मत अनेक टीकाकारांना पटलेले नाही.

**सारांश :** शुंपीटर यांच्या आर्थिक विकास सिद्धांतावर वरीलप्रमाणे टीका केल्या जात असल्या तरी या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. नवप्रवर्तनामुळे आर्थिक विकास होतो हा अत्यंत महत्त्वाचा विचार जगाला आजही उपयुक्त आहे. अविकसित, विकसनशील देशात नवप्रवर्तकांची संख्या कमी असते. सरकारने जर पुढाकार घेऊन मदत केली तर अशा देशात नवप्रवर्तकांची संख्या वाढून विकासाला चालना मिळू शकते. गरीब, विकसनशील राष्ट्रांच्या सरकारांनी नवप्रवर्तकांना बँकामार्फत मदत करण्याची भूमिका घेतली तर आर्थिक विकासाला गती मिळू शकते. म्हणून शुंपीटर यांचा सिद्धांत आजही महत्त्वाचा आहे.

**प्रा. लेविस यांचा अमर्यादित श्रमपुरवठा सिद्धांत** (Lewis Theory of Unlimited Supplies of Labour) **:**

**प्रास्ताविक :**

प्रा. आर्थर लेविस यांनी मे १९५४ मध्ये 'Economic Development with Unlimited Supplies of Labour' या शीर्षकाचा एक लेख (article) प्रसिद्ध केला. त्या लेखात प्रा. लेविस यांनी आर्थिक विकासासंबंधीचे विचार मांडले आहेत. त्यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत हा त्यांच्या या लेखाच्या स्वरूपात आहे. ज्या देशात प्रचंड लोकसंख्या असते त्या देशात श्रमिकांची संख्या किंवा श्रमिकांचा पुरवठा सुद्धा अमर्यादित असतो. असे

देश प्रामुख्याने अविकसित किंवा न्यून विकसित देश असतात. अशा अविकसित व प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशातील अमर्याद श्रमपुरवठ्याचा वापर करून आर्थिक विकास कसा घडवून आणता येतो याचे स्पष्टीकरण लेविस यांनी आपल्या सिद्धांतात दिले आहे. गरीब देशातील अमर्याद श्रमपुरवठा आर्थिक विकासाचे साधन कसे बनू शकते याचे विवेचन लेविस यांच्या सिद्धांतात आढळते. लेविस यांच्या आर्थिक विकासाच्या अमर्यादित श्रमपुरवठा सिद्धांताला 'लेविस प्रारुप' (Lewis Model) असेही म्हणतात. त्यांचे हे प्रारूप प्रामुख्याने जगातील अर्धविकसित राष्ट्रांच्या विकासासाठी मांडलेले आढळते. बंदिस्त अर्थव्यवस्थेत (closed economy) आणि खुल्या अर्थव्यवस्थेत (open economy) अमर्याद श्रमपुरवठ्याच्या साहाय्याने गरीब देशात आर्थिक विकास घडवून आणता येतो हे लेविस यांनी आपल्या सिद्धांताद्वारे दाखवून दिले आहे.

**सिद्धांताची मध्यवर्ती कल्पना :**

**''अविकसित देशात लोकसंख्या प्रचंड असते. त्यामुळे श्रमाचा पुरवठाही अमर्याद (प्रचंड) असतो. अशा अमर्याद श्रमपुरवठ्याचा वापर करून अविकसित देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करता येते व देशाचा आर्थिक विकास घडवून आणता येतो.''**

**प्रा. लेविस यांच्या सिद्धांताची / वृद्धीच्या प्रारूपाची गुहीते :**

१) अर्धविकसित देशात लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असतो आणि त्यामुळे अशा देशात श्रमिकांची संख्याही मोठी असते. बरोजगार श्रमिकांची संख्या मोठी असते. बेरोजगार श्रमिकांची सीमांत उत्पादकता ही शून्य असते.

२) अर्धविकसित प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात श्रमाचा पुरवठा पूर्ण लवचिक असतो. निर्वाह वेतन पातळीला श्रमपुरवठा पूर्ण लवचिक असतो.

३) अर्धविकसित देशात अर्थव्यवस्था दोन क्षेत्रात विभागलेली असते. १. भांडवली क्षेत्र (Capital sector) आणि २. निर्वाह क्षेत्र (Subsistence Sector). अशा प्रकारे अर्धविकसित देशात भांडवली क्षेत्र आणि निर्वाह क्षेत्र अशा दोन क्षेत्रांचे सहअस्तित्व (Co-existence) आढळते. म्हणजेच अर्थव्यवस्था द्विदल / द्विक्षेत्रीय (Dual economy) असते.

४) भांडवली क्षेत्रातील वेतनाचे दर निर्वाह क्षेत्रातील वेतन दरापेक्षा जास्त असतात.

५) निर्वाह क्षेत्रातील भांडवलसंचयाचा दर हा खूपच कमी असतो.

६) भांडवली क्षेत्रात जे उत्पादन केले जाते त्या सर्वांचा उपभोग घेतला जातो किंवा त्याची निर्यात केली जाते.

७) भांडवली क्षेत्रात पुनरुत्पादित भांडवलाचा (Reproducible capital) आणि ज्यांना वेतन दिले जाते अशा श्रमिकांचा वापर करून उत्पादन केले जाते.

८) निर्वाह क्षेत्रात पुनरुत्पादित भांडवलाचा उपयोग केला जात नाही.

९) भांडवली क्षेत्रातील उत्पादन 'नफ्याचे महत्तमीकरण' (Principle of Maximisation of Profit) या तत्त्वानुसार केले जाते. म्हणजे नफा मिळवण्यासाठी उत्पादन केले जाते.

१०) भांडवली क्षेत्रातील कामगारांचे वेतनाचे दर निर्वाह क्षेत्रातील कामगारांना मिळणाऱ्या वेतनावरून निश्चित होतात.

११) भांडवली क्षेत्राचा जसजसा विकास / विस्तार होत जाईल तसतशी भांडवली क्षेत्राकडून निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांची मागणी वाढत जाईल.

१२) निर्वाह क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचा वापर करून नवीन उद्योग काढता येतात. जुन्या उद्योगांचा विस्तार करता येतो.

१३) अर्धविकसित देशात श्रमिकांचा पुरवठा शेतकरी, घरगुती कामे करणारे नोकरचाकर, स्त्रिया, लहान व्यापारी यांच्यामधून व लोकसंख्यावाढीतून होतो. या श्रमिकांना शिक्षण, प्रशिक्षण दिल्यास कुशल मजूर उपलब्ध होतात. त्यामुळे भांडवली क्षेत्राला भासणारी कुशल मजुरांची टंचाई दूर होते.

१४) अकुशल श्रमिकांना कुशल बनविण्यासाठी येणाऱ्या प्रशिक्षणाचा खर्च स्थिर असतो.

१५) अर्धविकसित देशातील भांडवल आणि नैसर्गिक साधनसामग्री ही लोकसंख्येच्या तुलनेत अपुरी / दुर्मिळ असते.

अशा प्रकारे प्रा. लेविस यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतातील गृहीते वरीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत. वरील गृहीते विचारात घेऊन लेविस यांनी आपला सिद्धांत मांडला आहे. याचा अर्थ वरील गृहीते किंवा वरील गृहीत परिस्थिती ज्या देशात आढळून येते, त्याच देशात लेविस यांच्या अमर्याद श्रमपुरवठा सिद्धांताची प्रचिती येते.

**बंदिस्त अर्थव्यवस्था** (Closed Economy) **:**

अमर्यादित श्रमपुरवठ्याचा किंवा अतिरिक्त श्रमाचा (Surplus labour) वापर करून बंदिस्त अर्थव्यवस्थेत अल्पविकसित देशात आर्थिक विकास कसा घडवून आणता येतो याची माहिती या ठिकाणी दिली आहे. बंदिस्त अर्थव्यवस्था म्हणजे अशी अर्थव्यवस्था की, ज्या देशात उत्पादनाचे घटक बाहेरून आयात केले जात नाहीत आणि त्या देशातील उत्पादनाचे घटक इतर देशात स्थलांतरित होत नाहीत.

**द्विक्षेत्रीय : द्विदल अर्थव्यवस्था** (Two Sector Economy) **:**

प्रा. लेविस यांच्या मते, न्यून विकसित देशातील अर्थव्यवस्था ही भांडवली क्षेत्र (capitalist sector)

आणि निर्वाह क्षेत्र (subsistence sector) या दोन क्षेत्रात विभागलेली असते. अशा देशात भांडवली क्षेत्र आणि निर्वाह क्षेत्र अशी दोन क्षेत्रे आढळतात. अशा द्विक्षेत्रीय अर्थव्यवस्था असलेल्या न्यूनविकसित देशांचा विकास अमर्यादित श्रमपुरवठ्याच्या साहाय्याने करता येतो. लेविस यांच्या मते, अल्पविकसित देशातील अमर्याद श्रमपुरवठा हे आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन असते.

**(अ) निर्वाह क्षेत्र** (Subsistence Sector) **:**

निर्वाह क्षेत्रात पुनरुत्पादित भांडवलाचा वापर केला जात नाही. भांडवली वस्तूंचा वापर न करता उत्पादन केले जाते. म्हणून या क्षेत्राला निर्वाह क्षेत्र म्हणतात. निर्वाह क्षेत्राला स्वयंरोजगार क्षेत्र असेही म्हणतात. निर्वाह क्षेत्रात शेती व्यवसायाचा समावेश होतो. तसेच घरगुती व्यवसाय, किरकोळ व्यापार, हंगामी रोजगार पुरवणारे व्यवसाय यांचा समावेश निर्वाह क्षेत्रात होतो. निर्वाह क्षेत्रातील दरडोई उत्पादन भांडवली क्षेत्रापेक्षा खूपच कमी असते. या क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते. तसेच ऋण (शून्यापेक्षा कमी) असते. या क्षेत्रात काम करणाऱ्या मजुरांना भांडवली क्षेत्रापेक्षा खूपच कमी मजुरी मिळते. निर्वाह क्षेत्रात / ग्रामीण भागात श्रमाचा पुरवठा मागणीपेक्षा खूपच जास्त असतो.

**(ब) भांडवली क्षेत्र** (Capitalistic Sector) **:**

भांडवली क्षेत्रात उद्योग, खाणी, मळे (Plantation Industry) यांचा समावेश होतो. या क्षेत्रात पुनरुत्पादित भांडवलाचा वापर केला जातो. भांडवली वस्तूंचा वापर करून उत्पादन केले जाते. भांडवल आणि श्रम यांच्या सहाय्याने उत्पादन केले जाते. नफा मिळवण्यासाठी उत्पादन केले जाते. भांडवली क्षेत्रातील भांडवलदारांना नफा मिळतो. तसेच निर्वाह क्षेत्रात काम करणाऱ्या मजुरापेक्षा अधिक मजुरी भांडवली क्षेत्रातील मजुरांना दिली जाते.

**श्रमपुरवठा** (Labour supply) **:**

अशा प्रकारे अर्धविकसित / अविकसित देशातील अर्थव्यवस्था वरीलप्रमाणे दोन क्षेत्रात विभागलेली असते. निर्वाह क्षेत्रात काम करत असलेले श्रमिक अकुशल आणि मागासलेले असतात तर भांडवली क्षेत्रातील श्रमिक कुशल, शिक्षित, प्रशिक्षित, विकसित असतात. अविकसित देशात भांडवली साठ्याच्या आणि नैसर्गिक साधनसामग्रीच्या तुलनेत लोकसंख्या अतिरिक्त (जास्त) असते. लोकसंख्या प्रचंड असल्याने श्रमाचा पुरवठाही अमर्यादित असतो. त्यामुळे श्रमपुरवठा स्वस्त असतो. शेतकरी, छोटे व्यापारी, दुकानदार, किरकोळ कामगार, घरगुती नोकर, स्त्रिया आणि वाढती लोकसंख्या हे श्रमपुरवठ्याचे साठे (स्रोत) असतात. निर्वाह क्षेत्रात (शेती क्षेत्रात) काम करणाऱ्या श्रमिकांची उत्पादकता खूपच कमी (नगण्य) असते. शून्य असते. उणेसुद्धा असते. उदाहरणार्थ, एक एकरात कामासाठी पाच कामगार पुरेसे असतील आणि जर तिथे दहा कामगार काम करत असतील तर याचा अर्थ त्या ठिकाणी पाच कामगार अतिरिक्त (surplus) असतात म्हणून ते बेरोजगाराच असतात. अशा प्रकारे निर्वाह क्षेत्रात सुप्त बेकारी (disguised unemployment) अस्तित्वात असते. या अतिरिक्त श्रमिकांचा (सुप्त बेकारीचा) योग्य उपयोग केला तर भांडवलनिर्मितीचा दर वाढून आर्थिक विकासाचा वेग वाढू शकतो. लेविस यांच्या मते, अर्धविकसित देशात असलेल्या अमर्याद श्रमपुरवठ्याला फायदेशीर /

उत्पादक रोजगार पुरवणे आवश्यक आहे. तेथील मुख्य समस्या अतिरिक्त श्रमपुरवठ्याच्या योग्य उपयोगाची आहे. या अतिरिक्त / जादा श्रमिकांना निर्वाह क्षेत्रातून (शेती क्षेत्रातून) बाहेर काढून भांडवली क्षेत्रात (औद्योगिक क्षेत्रात) वळवले पाहिजे. असे केले तर निर्वाह (शेती) क्षेत्रातील उत्पादन घटणार नाही. कारण गरजेपेक्षा जास्त श्रमिक शेतीत काम करत असतात. लेविस म्हणतात, निर्वाह क्षेत्रातून (शेतीतून) जादा श्रमिकांना बाहेर काढून त्यांना भांडवली क्षेत्रात आणावे. त्यासाठी नवीन उद्योग काढावेत किंवा जुन्या उद्योगांची वाढ करावी, जुन्या उद्योगांचा विस्तार करावा आणि निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांना तेथे रोजगार द्यावा. देशाच्या आर्थिक विकासासाठी अतिरिक्त श्रमशक्तीला व्यावसायिक रोजगार (gainful employment) दिला पाहिजे. जीवन निर्वाह रोजगार देऊन चालणार नाही असे लेविस म्हणतात. अतिरिक्त श्रमिकांना भांडवली क्षेत्रात व्यावसायिक रोजगार दिल्यास राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडून येते. निर्वाह क्षेत्रातील श्रमिक भांडवली क्षेत्रात स्थलांतरित व्हावेत यासाठी या श्रमिकांना निर्वाह क्षेत्रातील मजुरीपेक्षा (Subsistence Wages) अधिक मजुरी द्यावी लागेल. या मजुरीस / वेतन दरास लेविस यांनी 'वास्तव वेतन दर' (Real Wages) असे म्हटले आहे. लेविस यांच्या मते, भांडवली क्षेत्राला विस्तारासाठी कुशल कमगारांची गरज असते आणि अल्पविकसित देशात अशा कुशल कामगारांचा पुरवठा मर्यादित असतो. यामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. परंतु हा अडथळा तात्पुरता असतो. निर्वाह क्षेत्रातील अकुशल श्रमिकांना सरकार आणि भांडवलदारांनी प्रशिक्षण दिले तर भांडवली क्षेत्राला कुशल श्रमिक उपलब्ध होतात. त्यामुळे कुशल श्रमिकांची टंचाई भासणार नाही.

**भांडवली आधिक्य** (Capitalist Surplus) **:**

प्रा. लेविस यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात भांडवली क्षेत्रातील आधिक्य या बाबीला खूप महत्त्व दिले आहे. भांडवली आधिक्य जेवढे जास्त तेवढी भांडवलनिर्मिती जास्त राहते. भांडवलनिर्मिती जितकी जास्त तितका आर्थिक विकासाचा दर जास्त राहतो. निर्वाह क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकापेक्षा भांडवली क्षेत्रातील श्रमिकांची सीमांत उत्पादकता जास्त असते. त्यामुळे भांडवली क्षेत्रात भांडवली आधिक्य निर्माण होते. लेविस यांच्या मते, भांडवल संचय (भांडवलनिर्मिती) ही भांडवली आधिक्यावर अवलंबून असते. भांडवली क्षेत्रात (औद्योगक क्षेत्रात) रोजगारासाठी उपलब्ध असणाऱ्या अतिरिक्त श्रमिकांचे निर्वाह वेतन कसे निश्चित होते? हा प्रश्न असतो. या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, निर्वाहासाठी आवश्यक असणाऱ्या किमान उत्पन्नावर निर्वाह वेतन दर अवलंबून असतो. (Subsistence wage is depends upon the minimum earnings required for subsistence) हा वेतन दर निर्वाह क्षेत्रात (शेती क्षेत्रात) काम करणाऱ्या श्रमिकांच्या सरासरी उत्पादनापेक्षा कमी असू शकत नाही. भांडवली क्षेत्रातील (औद्योगिक क्षेत्रातील) वेतनाचे दर हे निर्वाह क्षेत्रातील वेतन दरापेक्षा ३० टक्के अधिक असतात. निर्वाह क्षेत्रातून (शेती क्षेत्रातून) भांडवली क्षेत्रात (औद्योगिक क्षेत्रात) रोजगारासाठी येणाऱ्या मजुरांना निर्वाह क्षेत्रापेक्षा / शेतीपेक्षा अधिक मजुरी द्यावे लागेल. कारण (अ) शहरात अन्नधान्याच्या किंमती जास्त असतात. गावाकडील किंवा घरातील माणसे सोडून शहरात राहण्यास जाण्यामुळे मानसिक अडचणी उद्‌भवतात. म्हणून खेड्यातील / निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांनी भांडवली क्षेत्रात

(कारखानदारी क्षेत्रात / शहरात) कामासाठी यावे यासाठी त्यांना निर्वाह वेतनापेक्षा अधिक मजुरी द्यावी लागते. अधिक मजुरीचे आकर्षण दाखवल्याशिवाय निर्वाह क्षेत्रातील मजूर शहरात कामासाठी येणार नाहीत. (ब) निर्वाह क्षेत्रातून (शेतीतून) अतिरिक्त श्रमिक भांडवली क्षेत्रात (कारखानदारी क्षेत्रात) वळवले तर निर्वाह क्षेत्रात जे श्रमिक कार्यरत असतात त्यांची उत्पादकता वाढेल. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांच्या मजुरी दरात वाढ होईल. त्यांच्या वेतनात वाढ झाल्यामुळे भांडवली क्षेत्रातील वास्तव वेतनदरातही वाढ होईल. वरील कारणामुळे निर्वाह क्षेत्रातील मजुरी दरात वाढ झाल्यामुळे निर्वाह क्षेत्रातून भांडवली क्षेत्रात रोजगारासाठी आलेल्या श्रमिकांना अधिक मजुरी द्यावी लागेल. ते अधिक मजुरीची मागणी करतील. त्यामुळे भांडवली क्षेत्रातील निर्वाह वेतन दर अधिक राहतील. (क) भांडवली क्षेत्रातील / शहरातील राहणीमानाचा खर्च जास्त असतो. त्यामुळे मजुरी दर जास्त राहतो. कामगार संघटनाच्या प्रभावामुळे / दबावामुळे सुद्धा भांडवली क्षेत्रातील मजुरीचे दर जास्त राहतात. सरकारच्या पाठिंब्यामुळे आणि मानवतावादी दृष्टिकोनामुळे सुद्धा मजुरी वाढवून द्यावी लागते.

लेविस यांच्या मते, भांडवली क्षेत्रात (कारखानदारी क्षेत्रात) काम करणाऱ्या कामगारांची सीमांत उत्पादकता ही निर्वाह क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांपेक्षा जास्त असते. त्यामुळे भांडवली क्षेत्रात भांडवली आधिक्य निर्माण होते. यालाच वाढावा (Capital Surplus) असे म्हणतात. भांडवली आधिक्य (भांडवली वाढावा) भांडवलदार कारखानदारी क्षेत्रात गुंतवत राहतात (भांडवली वस्तूवर खर्च करतात) त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांना भांडवली क्षेत्रात रोजगार मिळतो. भांडवलदार त्यांना मिळणाऱ्या भांडवली आधिक्याची/वाढाव्याची पुनर्गुंतवणूक करत राहतात. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना रोजगार उपलब्ध होत राहतो. श्रमाचा पुरवठा अलवचिक होईपर्यंत ही प्रक्रिया चालू राहते. म्हणजेच जोपर्यंत देशातील अतिरिक्त श्रमिकांची संख्या संपत नाही तोपर्यंत ही प्रक्रिया चालू राहते.

लेविस यांच्या मते, भांडवल संचय हा भांडवली आधिक्यावर अवलंबून असतो. (Capital formation is depend on capital surplus) भांडवली क्षेत्रात जे आधिक्य निर्माण होते त्यावरच भांडवल संचयाची प्रक्रिया अवलंबून असते. हे आधिक्य भांडवली वस्तूंच्या खरेदीत गुंतवले जाते. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांना भांडवली क्षेत्रात रोजगार मिळतो आणि भांडवली आधिक्यात भांडवली संचयात व आर्थिक वृद्धी दरात वाढ होत राहते. जास्तीत जास्त नफा मिळवणे हे भांडवलदारांचे ध्येय असते. अधिक नफा मिळवण्यासाठी ते भांडवली क्षेत्रात वाढाव्याची गुंतवणूक करतात. भांडवली क्षेत्रातील कामगारांची उत्पादकता ही त्यांना मिळणाऱ्या मजुरीपेक्षा जास्त असते. त्यामुळे भांडवली आधिक्य निर्माण होते. या भांडवली आधिक्याची ते सतत गुंतवणूक करत राहतात त्यामुळे रोजगार वाढत राहतो. निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांना / सुप्त बेकारांना भांडवली क्षेत्रत काम मिळत राहते. भांडवलदारांना मिळणारा भांडवली वाढावा कारखानदारी क्षेत्रात गुंतवल्यानंतर अतिरिक्त श्रमिकांना रोजगार कसा मिळतो ते खालील आकृतीत स्पष्ट केले आहे.




वरील आकृतीत अर्धविकसित देशात / न्यून विकसित देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया कशी चालते ते स्पष्ट केले आहे. OS हा निर्वाह क्षेत्रातील वेतनाचा दर आहे. OW हा भांडवली क्षेत्रातील वेतनाचा दर आहे. SS हा निर्वाह वेतनाचा वक्र WW या भांडवली क्षेत्रातील वेतनाच्या वक्राच्या खालच्या बाजूला दर्शविला आहे. कारण भांडवली क्षेत्रापेक्षा निर्वाह क्षेत्रातील वेतनाचे दर कमी असतात. जेव्हा भांडवली क्षेत्रात O ते $N_1$ एवढे श्रमिक काम करत असतात तेव्हा श्रमिकांच्या सीमांत उत्पादकतेचा वक्र $P_1 L_1$ हा आहे. $P_1 L_1$ हा सीमांत उत्पादकता वक्र WW या वक्राला $E_1$ बिंदूत छेदतो. $ON_1$ श्रमिकांचे एकूण उत्पादन $ON_1 E_1 P_1$ एवढे आहे. $ON_1$ श्रमिकांवरचा वेतनावरचा एकूण खर्च (एकूण वेतन) $ON_1 E_1 W$ एवढे आहे. एकूण उत्पादनातून एकून वेतन वजा केल्यानंतर $P_1 E_1 W$ हा जो भाग शिल्लक राहतो त्याला सुरवातीच्या काळातील भांडवली आधिक्य असे म्हणतात किंवा उत्पादकांचा नफा असे म्हणतात. या आधिक्याची उत्पादकांनी गुंतवणूक केली तर सीमांत उत्पादकतेचा वक्र वरच्या बाजूला सरकतो. उत्पादकांनी $P_1 W E_1$ या भांडवली आधिक्याची भांडवली साधनात गुंतवणूक केल्यामुळे $ON_2$ एवढ्या श्रमिकांना रोजगार मिळतो. सीमांत उत्पादकता वक्र वरच्या बाजूला सरकून तो $P_2 L_2$ असे स्वरूप धारण करतो. $P_2 L_2$ हा सीमांत उत्पादकता वक्र. WW या भांडवली क्षेत्रातील वेतन वक्राला $E_2$ या बिंदूत छेदतो. त्यामुळे $N_1$ ते $N_2$ एवढ्या जादा श्रमिकांना रोजगार मिळतो. $ON_2$ एवढे श्रमिक $OP_2 E_2 N_2$ एवढे एकूण उत्पादन करतात. त्यांना $OWE_2 N_2$ एवढी एकूण मुजरी दिली जाते. ही मजुरी त्यांनी केलेल्या एकूण उत्पादनापेक्षा कमी आहे. त्यामुळे $ON_2$ श्रमिक

पातळीला $P_2 W E_2$ एवढे आधिक्य निर्माण होते. $N_1$ ते $N_2$ एवढ्या कामगारांना काम दिल्यानंतर $P_1 P_2 E_2$ एवढे आधिक्य निर्माण होते. हे आधिक्य भांडवली क्षेत्रात गुंतवले तर $N_2$ ते $N_3$ एवढ्या कामगारांना रोजगार मिळतो आणि सीमांत उत्पादकतेचा वक्र वरती सरकून तो $P_3 L_3$ असे स्वरूप धारण करतो. $ON_3$ श्रमिकांना $OWE_3 N_3$ एवढे एकूण वेतन दिले जाते. त्यामुळे $ON_3$ श्रमिकांपासून $WP_3E_3$ एवढे आधिक्य मिळते. $N_2$ ते $N_3$ एवढ्या श्रमिकापासून $P_3WE_3$ एवढे निव्वळ आधिकच मिळते. भांडवलदार नफा मिळवण्यासाठी काम करत असल्याने जोपर्यंत आधिक्य मिळते तोपर्यंत ते आधिक्य (वाढावा) भांडवली साधनात गुंतवत राहतात. त्यामुळे देशातील अतिरिक्त श्रमिकांना रोजगार मिळत राहतो. आधिक्याच्या गुंतवणुकीमुळे देशातील बेकारी कमी होते तसेच भांडवल संचयात वाढ होऊन देशाचा आर्थिक विकास घडून येतो. आर्थिक विकास दरात वाढ होते. देशातील अतिरिक्त श्रमपुरवठा संपला की ही प्रक्रिया थांबते. भांडवली क्षेत्रातील उत्पादक त्यांना मिळणारे आधिक्य (नफा) कारखानदारी क्षेत्रात गुंतवत राहतात. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील (शेती क्षेत्रातील) श्रमिकांना भांडवली क्षेत्रात रोजगार मिळत राहतो. त्यामुळे उत्पादनात सुद्धा वाढ होते. भांडवली आधिक्य किंवा नफा आणि त्याची पुनर्गुंतवणूक यामुळे आर्थिक वृद्धीला चालना मिळते.

**भांडवल आणि तांत्रिक प्रगती** (Capital and Technical Progress) **:**

लेविस यांनी आपल्या सिद्धांतात भांडवल आणि तांत्रिक प्रगती या बाबींना विशेष महत्त्व दिले आहे. भांडवल आणि तंत्रजन्य प्रगतीचे फायदे त्यांनी आपल्या सिद्धांतात सांगितले आहेत. या दोन घटकामुळे भांडवलनिर्मिती, सीमांत उत्पादकता, नफा आणि रोजगार यात वाढ होते असे लेविस म्हणतात. म्हणून त्यांनी तांत्रिक प्रगतीवर भर दिला आहे. तांत्रिक ज्ञानाच्या वापराने कामगारांच्या वेतनात वाढ होऊन त्यांची बचतक्षमता वाढते. भांडवलनिर्मिती आणि तांत्रिक विकास यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात व नफ्यात वाढ होते. राष्ट्रीय उत्पन्नातील नफ्याचा वाटा वाढतो. तांत्रिक ज्ञानाचा वापर करण्यासाठी नवीन गुंतवणूक केली पाहिजे. तांत्रिक ज्ञानाच्या प्रगतीने व त्याच्या वापराने भांडवलनिर्मितीत आणि श्रमिकांच्या सीमांत उत्पादकतेत वाढ होते. त्यामुळे श्रमिकांच्या सीमांत उत्पादकतेचा वक्र वरच्या बाजूला जातो. अशा प्रकारे भांडवली आणि बिगर भांडवली क्षेत्रात भांडवलाचा आणि तांत्रिक ज्ञानाचा वापर केल्यामुळे सीमांत उत्पादकता, राष्ट्रीय उत्पन्न, वेतन, नफा, रोजगार इत्यादी घटकात वाढ घडून येते. म्हणून देशात तांत्रिक प्रगती घडून आली पाहिजे. देशात तांत्रिक प्रगतीचा वेग कमी असेल तर भांडवली आधिक्यामध्ये सुद्धा कमी वेगाने वाढ होते. भांडवल आणि उत्पादकता, प्रगती आणि उत्पादकता यांच्यात धन सहसंबंध असतात.

**सरकार आणि खाजगी देशी भांडवलदारांची भांडवलनिर्मितीतील भूमिका** (The Role of the State and Indigenous Privide Capitalist in Capital Formation) **:**

आर्थिक विकासाला चालना मिळण्यासाठी / आर्थिक विस्तारासाठी भांडवलनिर्मिती आवश्यक असते. भांडवलनिर्मितीत सरकार (State Capitalists) आणि देशी खाजगी भांडवलदार (indigenous private capitalists) महत्त्वाची भूमिका बजावू शकतात असे प्रा. लुईस यांनी आपल्या सिद्धांतात म्हटले आहे. म्हणून राज्य

भांडवलदार आणि देशी खाजगी भांडवलदार यांना प्रोत्साहन दिले पाहिजे असे प्रा. लेविस यांनी म्हटले आहे. According to Lewis, "The central problem in the theory of economic development is that of rapid capital formation." बहुसंख्य न्यून विकसित देशात बचत आणि बचत करणारे कमी असतात. देशातील १० टक्के लोकांकडे ४०% राष्ट्रीय उत्पन्न असते. कामगार व पगारदार लोकांची बचत राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३ टक्के असते. जमीनदार, राजे महाराजे, व्यापारी, सरकार हे आपले उत्पन्न अनुत्पादक उपभोगावर खर्च करत असतात. (चैनीच्या व प्रतिष्ठेच्या वस्तूवर खर्च करत असतात) म्हणून भांडवल संचयासाठी म्हणजे आर्थिक विकासासाठी सरकारने (state capitalists यांनी) आणि खाजगी भांडवलदारांनी पुढाकार घेतला पाहिजे. सरकार (राज्य भांडवलदार) आणि खाजगी भांडवलदार जेव्हा गुंतवणूक वाढवतात तेव्हा बाजारपेठांचा विस्तार होतो. आधुनिक तांत्रिक ज्ञानाचा अवलंब करतात तेव्हा श्रमिकांच्या उत्पादकतेत आणि भांडवली आधिक्यात (वाढ) होते. लेविस यांच्या मते, खाजगी भांडवलदारापेक्षा सरकारचा भांडवल संचयाचा वेग जास्त असतो. कारण सरकार भांडवली आधिक्याचा वापर करून जशी अधिक भांडवलनिर्मिती करते त्याप्रमाणे करवसुली करून भांडवल गोळा करू शकते. त्यामुळे सरकारचा भांडवलनिर्मितीचा वेग जास्त असतो. सरकार निर्वाह क्षेत्रातील उत्पन्न करवसुली करून काढून घेऊ शकते. खाजगी भांडवलदार आणि राज्य भांडवलदार या दोन्ही घटकांचे सक्रिय सहकार्य लाभले तर भांडवल आधिक्यात आणि भांडवल निर्मितीत वाढ घडून येते.

**आर्थिक विकासातील बचतीची भूमिका** (Role of Savings) **:**

लेविस यांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत बचतीला अनन्यसाधारण महत्व दिले आहे. भांडवलदारांना जे भांडवली आधिक्य मिळते त्यास नफा असे म्हणतात. या भांडवली आधिक्याची / नफ्याची भांडवलदारांनी जर पुनर्गुंतवणूक केली नाही तर उत्पादनातही वाढ होणार नाही आणि रोजगाराच्या नवीन संधीही निर्माण होणार नाहीत. न्यून विकसित देशात ज्या लोकांना नफा आणि खंड मिळतो तेच लोक बचत करू शकतात. खंड ज्यांना मिळतो ते लोक बचत करू शकत नाहीत कारण त्यांचा खर्च अनुत्पादक असतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात बचतीची पातळी वाढत असेल तर राष्ट्रीय उत्पन्नातील नफ्याचा वाटा सुद्धा वाढत असतो. आर्थिक विकासासाठी बचत वाढली पाहिजे. न्यून विकसित देशात राष्ट्रीय उत्पन्नाच्या चार ते पाच टक्के बचत केली जात असते. हे प्रमाण १२ ते १५ टक्के पर्यंत वाढले पाहिजे. त्यामुळे भांडवल संचय (Capital Accumulation) जलद गतीने होईल. बचतीतील वाढीमुळे भांडवली क्षेत्राचा विस्तार घडून येतो. प्रा. लेविस यांच्या मते, गरीब देशात कामगार, मध्यमवर्गीय यांची बचत खूपच कमी असते. या दोन वर्गांची बचत राष्ट्रीय उत्पन्नाच्या जेमतेम ३% असते. म्हणून अविकसित देशातील दारिद्र्याचे मुख्य कारण बचतीचे कमी प्रमाण हे असते. कमी बचतीमुळे अशा देशातील भांडवली क्षेत्राचा आकार खूपच लहान असतो. थोडक्यात, अप्रगत देशात बचतीत वाढ झाली तर भांडवल संचयाचा वेग वाढून आर्थिक विकासाचाही वेग वाढतो. या देशातील भांडवली क्षेत्राची वाढ झाली तर नफा, बचत आणि गुंतवणूक यामध्ये वाढ होऊ शकेल. विकसित देशापेक्षा अविकसित देशात आर्थिक विषमता अधिक असते. राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप जितके समान असेल तितकी लोकांची बचत क्षमता अधिक राहील.

**बँक पैशाच्या माध्यमातून भांडवल निर्मिती** (Capital Formation through Bank Credit) **:**

भांडवली आधिक्याची पुनर्गुंतवणूक करून जशी भांडवल निर्मिती होते तशी व्यापारी बँका जी पतनिर्मिती करतात त्या पतपैशाच्या सहाय्यानेही भांडवल निर्मिती होत असते. पतनिर्मितीत वाढ झाली असता पैशाचा एकूण पुरवठा वाढतो. यामुळे भांडवल निर्मितीत सुद्धा वाढ होते. अविकसित देशात नैसर्गिक साधनसंपत्ती आणि श्रमपुरवठा विपुल असतो. हे दोन घटक वापराशिवाय पडून असतात. अशा देशात बँकपैसा / पतपैसा जर योग्य प्रकारे गुंतवला तर रोजगारात, उत्पादनात, लोकांच्या खरेदीशक्तीत आणि प्रभावी मागणीत मोठी वाढ घडून येते. आणि आर्थिक विकासाचा वेगही वाढतो. म्हणून भांडवली आधिक्याच्या वापराने (पुनर्गुंतवणुकीने) जशी भांडवलनिर्मिती करता येते तशी बँक पैशाच्या माध्यमातूनही भांडवलनिर्मिती करून विकासाचा वेग वाढवता येतो. म्हणून लेविस यांनी आपल्या सिद्धांतात व्यापारी बँकांच्या पतनिर्मितीलाही महत्त्व दिले आहे. बँकांच्या पतनिर्मितीमुळे सुरवातीला भाववाढ घडून येते. कारण पतनिर्मितीमुळे अर्थव्यवस्थेतील पैशाचा एकूण पुरवठा वाढतो. लोकांचे वेतन (उत्पन्न) वाढल्याने उपभोग्य वस्तूंची मागणी वाढून या वस्तूंच्या किंमती वाढतात. परंतु ही भाववाढ फार काळ टिकत नाही. उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढले की या वस्तूंच्या किंमती कमी होऊ लागतात. तसेच लोकांच्या वाढत्या उत्पन्नाबरोबर ऐच्छिक बचत वाढत जाते. त्यामुळेही भाववाढ कमी होते. सरकार कर वसुली करून लोकांची खरेदीशक्ती कमी करेल आणि भाववाढ आटोक्यात ठेवेल. सरकारने भाववाढ रोखण्यासाठी प्रयत्न करावेत असे लेविस यांनी म्हटले आहे. लेविस म्हणतात, भांडवलनिर्मिती सतत चालू राहते. रोजगार, उत्पादन व नफा यात सतत वाढ होत राहते. नफा वाढला की बचतही वाढते. कालांतराने बचत एवढी वाढते की, गुंतणूक करण्यासाठी बँकेकडून कर्ज घेण्याची गरज भासत नाही. अशा प्रकारे अविकसित देशात भांडवलनिर्मिती केवळ भांडवली आधिक्यातील वाढीमुळे (नफ्यामुळे) निर्माण होत नाही तर बँकांच्या पतपैशाच्या निर्मितीमुळे सुद्धा भांडवलनिर्मिती घडून येते.

**वृद्धी प्रक्रियेचा शेवट** (End of the Growth Process) **:**

प्रा. लेविस यांनी आपल्या सिद्धांतात आर्थिक विकासाची प्रक्रिया कशी चालते ते स्पष्ट केले आहे. अप्रगत देशात उपलब्ध असलेल्या छुप्या बेकारांना / अमर्याद श्रमपुरवठ्याला / अतिरिक्त श्रमिकांना भांडवली क्षेत्रात वळवून भांडवली आधिक्यात वाढ घडवून आणता येते. जोपर्यंत देशात अमर्याद श्रमपुरवठा उपलब्ध असतो तोपर्यंत आर्थिक विकासाची किंवा भांडवल निर्मितीची प्रक्रिया निरंतर चालू राहते. परंतु अतिरिक्त श्रमिकांचा पुरवठा संपला की आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचा अंत होतो. आर्थिक विकासाची प्रक्रिया का थांबते? याची काही कारणे लेविस यांनी दिली आहेत. किंवा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत अडथळे का निर्माण होतात त्याची माहिती लेविस यांनी दिली आहे. ती माहिती पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

१) जेव्हा अप्रगत देशातील असलेला अमर्याद श्रमपुरवठा संपतो तेव्हा आर्थिक विकासाची प्रक्रिया थांबते.

२) भांडवली क्षेत्राचा जसजसा विकास होत जातो तसतशी निर्वाह क्षेत्रातील लोकसंख्या वेगाने कमी

होऊ लागते. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांची सरासरी उत्पादकता वाढू लागते. यामुळे भांडवली क्षेत्रातील श्रमिकांचे वेतन वाढवावे लागते. त्यामुळे भांडवली आधिक्य (नफा) कमी होतो. त्यामुळे भांडवलनिर्मिती कमी होते.

३) विकास होत असताना निर्वाह क्षेत्राच्या तुलनेत भांडवली क्षेत्राचा अधिक विस्तार होतो. अन्नधान्याच्या व कच्च्या मालाच्या किंमती वाढतात. त्यामुळे भांडवली क्षेत्रातील श्रमिकांना वेतन वाढवून द्यावे लागते. त्यामुळे आधिक्य कमी होऊन भांडवलनिर्मिती कमी होते.

४) निर्वाह क्षेत्रात (शेती क्षेत्रात) आधुनिक नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांची उत्पादकता वाढते व त्यामुळे त्यांचे मजुरीचे दर वाढतात. भांडवली क्षेत्रातील मजुरीचे दरही त्यामुळे वाढतात. त्यामुळे भांडवली आधिक्य (नफा) कमी होतो.

५) भांडवली क्षेत्राची जसजशी वाढ होत जाते तसतशी या क्षेत्रातील कामगार चांगली (भांडवलशाही) जीवन पद्धती जगण्याची इच्छा धरतील. त्यासाठी ते अधिक मजुरीची मागणी करतील. त्यामध्ये ते यशस्वी झाले तर भांडवलदारांचे भांडवली आधिक्य कमी होऊन भांडवलनिर्मितीचा वेग कमी होतो.

६) कामगार संघटना भांडवलदार वर्गावर दबाव आणून वेतनात वाढ घडवून आणतात. त्यामुळे भांडवली आधिक्य कमी होऊन भांडवलनिर्मितीचा दर कमी होतो.

वरील कारणामुळे न्यून विकसित देशातील विकासाची प्रक्रिया संपुष्टात येते असे प्रा. लेविस यांनी म्हटले आहे.

**खुली अर्थव्यवस्था** (Open Economy) **:**

बंदिस्त अर्थव्यवस्थेत अतिरिक्त श्रमपुरवठा संपला की किंवा वरीलपैकी इतर कारणांनी आर्थिक विकासाची प्रक्रिया कालांतराने थांबते. परंतु खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला तर आर्थिक विकासाची प्रक्रिया मंद होत नाही किंवा तिचा अंत होत नाही असे लेविस यांनी म्हटले आहे. वरीलपैकी एका किंवा इतर कोणत्याही कारणामुळे अर्धविकसित देशातील विकासाची प्रक्रिया जर खंडित झाली तर खुली अर्थव्यवस्था स्वीकारून (बंदिस्त अर्थव्यवस्थेचा त्याग करून) खालील मार्गाने भांडवल निर्मितीची प्रक्रिया चालू ठेवता येते असे प्रा. लेविस यांनी म्हटले आहे.

**१) इतर देशातील श्रमिकांना आपल्या देशात स्थायिक होऊ देणे** (Mass Immigration) **:**

ज्या देशात अतिरिक्त श्रमपुरवठा आहे त्या देशातील श्रमिकांना आपल्या देशात स्थायिक होण्यास प्रोत्साहन देऊन (by encouraging immigration) भांडवलदार आर्थिक संकट टाळू शकतात. न्यून विकसित देशातील श्रमिकांचा पुरवठा संपला की बाहेरच्या देशातील श्रमिक आणून भांडवल संचय चालू ठेवता येतो.

**२) भांडवलाची निर्यात** (Export of Capital) **:**

ज्या देशात अमर्याद श्रमपुरवठा आहे आणि श्रमिक निर्वाह वेतनावर काम करतात अशा देशात भांडवलाची निर्यात करून (by exporting capital) भांडवलदार भांडवलनिर्मिती चालू ठेवू शकतात. असे दोन उपाय प्रा. लेविस यांनी सुचवले आहेत. यापैकी पहिला उपाय योग्य वाटत नाही. कारण बाहेरच्या देशातून कामगार आणण्यास कामगार संघटना विरोध करतील. कारण यामुळे देशातील कामगारांच्या मजुरीत घट होण्याचा धोका असतो. दुसऱ्या उपायाला कामगार संघटना विरोध करणार नाहीत. कारण कामगार वर्गाचे यामुळे काही नुकसान होत नाही. त्यामुळे दुसरा उपाय स्वीकारार्ह व व्यावहारिक वाटतो. या दुसऱ्या मार्गाने भांडवलदार दुसऱ्या देशात भांडवलाची निर्यात करून अधिक नफा मिळवतील व तो नफा ते आपल्या देशात गुंतवतील. त्यामुळे भांडवलनिर्मितीची प्रक्रिया अखंड चालू राहील आणि आर्थिक विकासाची / आर्थिक विस्ताराची प्रक्रियाही निरंतर चालू राहील. त्यासाठी न्यूनविकसित देशांनी खुली अर्थव्यवस्था स्वीकारावी असे लुईस यांनी म्हटले आहे.

**प्रा. लेविस यांच्या सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :**

प्रा. लेविस यांच्या आर्थिक विकासाच्या अमर्यादित श्रमपुरवठा सिद्धांतावर काही अर्थतज्ज्ञांनी खालीलप्रमाणे टीका केल्या आहेत.

**१) सर्वच अविकसित देशात श्रमपुरवठा अमर्यादित असतो हे चूक :**

प्रा. लेविस यांनी अविकसित देशात श्रमाचा पुरवठा अमर्यादित असतो असे म्हटले आहे. भारत, चीन इत्यादी देशांच्या बाबतीत त्यांचे हे विधान खरे आहे. परंतु दक्षिण आफ्रिका, लॅटिन अमेरिका इत्यादी अविकसित देशात लोकसंख्या कमी आहे. सर्वच अल्पविकसित राष्ट्रात लोकसंख्या आणि श्रमाचा पुरवठा अमर्यादित नसतो.

**२) कुशल श्रमिकांची टंचाई ही तात्पुरती समस्या असते हे चूक :**

प्रा. लेविस यांनी आपल्या सिद्धांतात कुशल मजुरांचा तुटवडा (shortage of skilled labour) ही तात्पुरती समस्या असते असे म्हटले आहे. पण टीकाकारांच्या मते, ही समस्या अस्थाई स्वरूपाची नसते. श्रमिकांना शिक्षण व प्रशिक्षण देऊन कुशल बनवण्यासाठी खूप वेळ लागतो. त्यांना कुशल बनवण्यासाठी लागणारी साधनेही अपुरी असतात. त्यामुळे ही प्रक्रिया अल्पकालीन नसते तर दीर्घकालीन असते.

**३) धाडसी संयोजकांचा अभाव** (Lack of Enterpreneurs) **:**

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत संयोजकांची भूमिका महत्त्वाची असते. लेविस यांनी संयोजकांचा वाढता पुरवठा गृहीत धरला आहे. परंतु अविकसित तदेशात धाडस करून धोका पत्करून गुंतवणूक करणाऱ्या संयोजकांची / उद्योजकांची खूपच कमतरता असते. भांडवली क्षेत्रात गुंतवणूक करण्याऐवजी सट्टेबाजीचे व्यवहार करून नफा मिळवण्याकडे त्यांचा कल असतो.

**४) भांडवली क्षेत्रातील वास्तव वेतन दर स्थिर असतो हे चूक :**

लेविस यांनी अविकसित देशातील भांडवली क्षेत्रातील वास्तव वेतन दर स्थिर असतात असे म्हटले आहे. पण टीकाकारांच्या मते, वेतन दर स्थिर नसतात. देशात अमर्याद श्रमपुरठा असूनही वेतनाचे दर जास्त असतात. कारण अनेक देशांनी किमान वेतनाचे कायदे केले आहेत. तसेच कामगार संघटना प्रबळ आहेत. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात (भांडवली क्षेत्रात) वेतन दरात वाढीचीच प्रवृत्ती दिसते.

**५) प्रभावी मागणीकडे दुर्लक्ष :**

प्रा. लेविस यांच्या सिद्धांतावरील आणखी एक टीका म्हणजे त्यांनी आपल्या सिद्धांतात परिणामकारक किंवा एकूण मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. लेविस यांनी असे गृहीत धरले आहे की, भांडवली क्षेत्र ज्या ज्या वस्तूंचे उत्पादन करते त्या सर्व वस्तूंचा त्याच क्षेत्रात उपभोग घेतला जातो किंवा त्याची निर्यात केली जाते. भांडवली क्षेत्रात तयार होणाऱ्या या उत्पादनांची मागणी निर्वाह क्षेत्राकडूनसुद्धा केली जाईल, याचा विचार लुईस यांनी केलेला नाही. भांडवली क्षेत्रातील वस्तूच्या मागणीत घट झाली तर विकास प्रक्रियेत खंड पडेल. निर्वाह क्षेत्रातून भांडवली क्षेत्रातील वस्तूंना मागणी वाढली नाही तर भांडवली (औद्योगिक) क्षेत्रातील वस्तूंना मोठा खप येणार नाही. पण याकडे लेविस यांनी दुर्लक्ष केले आहे.

**६) श्रमिकांच्या गतिक्षमतेचे गृहीत पूर्णत: खरे नाही :**

निर्वाह क्षेत्रातील (ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रातील) अतिरिक्त श्रमिक शहरात (औद्योगिक क्षेत्रात) वळवून बेकारी कमी करता येते व आर्थिक विकास घडवून आणता येतो असे प्रा. लेविस यांनी म्हटले आहे. परंतु ते पूर्णत: खरे नाही किंवा असे करणे इतके सोपे नाही. कारण अविकसित देशातील श्रमिकांची गतिशीलता कमी असते. हे श्रमिक अशिक्षित, अकुशल, अंधश्रद्धाळू असतात. त्यामुळे आपला भाग सोडून शहरात जाण्यास ते सहजासहजी तयार होत नाहीत. त्यांची गतिशीलता खूपच कमी असते. आपला भूभाग, जमीन, कुटुंब, नातेवाईक सोडून शहरात जाण्यास अनेक कामगार तयार नसतात. तसेच भाषा, रूढी परंपरा, शहरातील राहणीमानाचा मोठा खर्च यामुळेसुद्धा त्यांची गतिक्षमता कमी असते. त्याचा विचार लेविस यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही.

**७) श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते हे चूक :**

लेविस यांनी आपल्या सिद्धांतात अमर्याद श्रमपुरवठा असलेल्या देशात श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य असते असे म्हटले आहे. परंतु शुल्झ (Prof. Schultz) सारख्या अर्थतज्ज्ञांनी लेविस यांचे हे मत अमान्य केले आहे. त्यांच्या मते, श्रमिकांची सीमांत उत्पादकता जर शून्य राहिली तर निर्वाह वेतनही शून्य राहील. म्हणून लेविस यांचे विधान / गृहीत पूर्णत: चुकीचे आहे.

**८) विर्वाह क्षेत्रातील श्रमिकांच्या स्थलांतराच्या दुष्परिणामाकडे दुर्लक्ष :**

टीकाकारांच्या मते, अविकसित देशातील श्रमिक भांडवली क्षेत्रात जेव्हा स्थलांतरित होतात तेव्हा निर्वाह

क्षेत्रातील (शेती क्षेत्रातील) एकूण उत्पादन आणि उत्पादकता यामध्ये घट होते. परंतु त्याचा विचार लेविस यांनी केलेला नाही. निर्वाह क्षेत्रातील श्रमिकांच्या स्थलांतरामुळे कृषी उत्पादनावर काहीच परिणाम होत नाही, हे लेविस यांचे मत चुकीचे आहे.

**९) उत्पन्नातील विषमता वाढण्याचा धोका :**

प्रा. कुझनेटस्सारख्या टीकाकारांच्या मते, जर अविकसित देशात प्रा.लेव्हिस यांचे वृद्धी प्रतिमान अंमलात आणले तर त्या देशात उत्पन्नातील विषमता वाढण्याचा धोका अधिक आहे. उत्पन्नात विषमता असेल तर उत्पादक गुंतवणूकीत वाढ होत नाही. अशी विषमता विनाशकारी ठरते, असे टीकाकारांनी म्हटले आहे.

**१०) भाववाढ (चलनवाढ) आत्मविनाशी असते हे चूक :**

लेविस यांनी आपल्या आर्थिक वृद्धीच्या प्रारूपात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून निर्माण होणारी भाववाढ ही स्वयंविनाशकारी (self destructive) असते असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते, लेविस यांचे हे विधान खरे नाही. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत निर्माण झालेली भाववाढ उच्च उपभोगामुळे दीर्घकाळ टिकून राहू शकते. टीकाकारांच्या मते, भाववाढीवर बाह्य घटकांचा प्रभाव पडत असतो. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनात वाढ झाली की, वस्तूंच्या किंमती खाली येतील हे लेविस यांचे मत पटत नाही. भाववाढ आत्मविनाशी नसते तर दीर्घकाळ टिकून राहू शकते. भाववाढ स्वत:चाच नाश करू शकत नाही.

**११) उच्च उत्पन्न गटातील लोकच बचत करतात हे चूक :**

प्रा. लेविस यांनी आपल्या सिद्धांतात उच्च उत्पन्न गटातील लोकच फक्त बचत करतात असे म्हटले आहे. टीकाकारांच्या मते, न्यून विकसित देशातील गरीब लोक सुद्धा बचत करत असतात. अनेक गरीब देशात अल्प उत्पन्न गटातील लोक सुद्धा बचत करतात, असे दिसून आले आहे. म्हणून गरीब देशात फक्त श्रीमंत लोकच बचत करतात, हे चुकीचे आहे.

**१२) अविकसित देशात गुंतवणूक गुणक कार्यरत नसतो :**

टीकाकारांच्या मते, अविकसित देशात गुंतवणूक गुणक दिसून येत नाही. भांडवलदार सतत भांडवली आधिक्याची (नफ्याची) भांडवली क्षेत्रात गुंतवणूक करत राहतात तेंव्हा भांडवलनिर्मितीची प्रक्रिया चालू राहते. पण टीकाकारांच्या मते, अप्रगत देशात गुंतवणूक गुणक कार्य करत नाही.

**१३) अकार्यक्षम कर प्रशासन :**

भांडवलनिर्मितीसाठी आवश्यक असणारे उत्पन्न लोकांच्यावर कर बसवून वसूल करता येईल, असे लेविस म्हणतात. परंतु टीकाकारांच्या मते, अप्रगत देशात हे तितकेसे शक्य नसते. कारण अप्रगत देशातील करवसुली यंत्रणा फारशी कार्यक्षम नसते. त्यामुळे भांडवलनिर्मितीसाठी पुरेसे भांडवल या यंत्रणेला गोळा करता येत नाही. न्यून विकसित देशातील सरकारची कर प्रशासन व्यवस्था फारशी कार्यक्षम नसते. त्यामुळे पुरेसा कर वसुल होत

नाही. त्यामुळे भांडवल निर्मितीही पुरेशी होत नाही. परंतु या बाबीकडे लेविस यांनी लक्ष दिलेले नाही अशी त्यांच्यावर टीका केली जाते.

**समारोप :**

प्रा. लेविस यांच्या सिद्धांतात वरीलप्रमाणे काही उणिवा असल्या तरी या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. ज्या न्यूनविकसित देशात प्रचंड लोकसंख्या आहे आणि श्रमाचा पुरवठा अमर्यादित आहे त्या देशांना लेविस यांनी सिद्धांत मार्गदर्शक आणि उपयुक्त आहे. अमर्यादित श्रमपुरवठ्याचा उपयोग करून आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू करता येते हा लेविस यांचा विचार महनीय आहे. आर्थिक विकासाच्या प्रारूपात प्रा. लेविस यांनी विकासावर परिणाम करणाऱ्या बाबींची चर्चा केली आहे. बंदिस्त अर्थव्यवस्थेत आणि खुल्या अर्थव्यवस्थेत अविकसित देश विकास प्रक्रिया कशी सुरू करू शकतात याची माहिती लेविस यांनी आपल्या वृद्धी प्रतिमानात दिली आहे. भांडवलाची टंचाई असणारे गरीब देश अमर्यादित श्रमपुरवठ्याद्वारे आपला विकास घडवून आणू शकतात, हा लेविस यांचा विचार जगातील गरीब देशांना दिलासा देणारा आणि मार्गदर्शक आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सरकारची भूमिका महत्त्वाची असते. असे लेविस यांनी स्पष्ट केले आहे. गरीब देशात तांत्रिक प्रगती घडवून आणली तर उत्पादकता, नफा आणि रोजगार वाढतो हाही लेविस यांचा विचार महत्त्वाचा आहे. लेविस यांनी गरीब देशांचा आर्थिक विकास नफ्याची पुनर्गुंतवणूक, पतनिर्मिती, सरकारचा हस्तक्षेप, तांत्रिक प्रगती, कुशल श्रमिकांची उपलब्धता, भांडवल निर्मिती या घटकावर कसा अवलंबून असतो, ते परिणामकारकपणे स्पष्ट केले आहे. म्हणून लेविस यांचा आर्थिक विकासाचा अमर्यादित श्रमपुरवठा सिद्धांत अविकसित आणि विकसनशील देशांना अत्यंत उपयुक्त आहे. लेविस यांच्या सिद्धांतातील काही आर्थिक विचार विकसित देशांनाही उपयुक्त आहेत. म्हणून लेविस यांच्या सिद्धांतावर कितीही टीका झाल्या असल्या तरी त्यांच्या सिद्धांताचे मोल कमी होत नाही.

## १.३ सारांश :

देशाचा आर्थिक विकास कसा घडवून आणता येईल? यासंदर्भात अर्थशास्त्रज्ञ शास्त्रीय भाषेत आणि मोजक्या शब्दात जे विचार मांडतात त्यांना आर्थिक विकासाचे सिद्धांत असे म्हणतात. आर्थिक विकास कशामुळे होईल? आर्थिक विकासासाठी काय केले पाहिजे? आर्थिक विकासावर कोणत्या घटकांचा परिणाम होतो? इत्यादी विविध महत्त्वपूर्ण बाबींची माहिती आर्थिक विकासाच्या सिद्धांतातून मिळते. आर्थिक विकासाचे सिद्धांत अविकसित, विकसनशील राष्ट्रांना अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन करतात. आर्थिक विकासाची धोरणे आखताना, विकासासाठी नियोजन करताना सरकार विविध कालखंडातील अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताचा आधार घेत असते. १२ व्या शतकात होऊन गेलेल्या अर्थशास्त्रज्ञांच्या काही आर्थिक विचारांना आजही महत्त्व असलेले दिसते. जुन्या कालखंडातील अर्थशास्त्रज्ञांचे आर्थिक सिद्धांत आजही उपयुक्त आहेत. ते टाकावू ठरलेले नाहीत. म्हणून आधुनिक अर्थाशास्त्रज्ञांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताबरोबर सनातनवादी, नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विकास सिद्धांताचाही अभ्यास केला जातो. ॲडम स्मिथ, रिकार्डो, मिल आणि माल्थस हे प्रमुख सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आहेत. कार्ल मार्क्स, शुंपीटर हे नवसनातनवादी

अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी मांडलेले आर्थिक विकासाचे सिद्धांत काही प्रमाणात का होईना आजही उपयुक्त आहेत.

## १.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ :

१) **निर्हस्तक्षेप धोरण :** सरकारने अर्थव्यवस्थेत फार हस्तक्षेप करू नये असे सनातनवाद्यांचे मत आहे. सरकारने मोजकीच कामे करावीत. उदाहरणार्थ देशाचे अंतर्गत व बाह्य शत्रूपासून संरक्षण करावे, देशात कायदा व सुव्यवस्था राखावी. यापेक्षा अधिक कार्ये सरकारने करू नयेत, असे सनातनवाद्यांचे मत होते. त्यालाच निर्हस्तक्षेप धोरण असे म्हणतात.

२) **विकासाचे मध्यस्थ :** ॲडम स्मिथ यांनी (१) शेतकरी (२) उद्योजक आणि (३) व्यापारी यांना विकासाचे मध्यस्थ (Agents of Economic Growth) असे म्हटले आहे.

३) **स्थितीशील अवस्था :** आर्थिक विकासाची प्रक्रिया थांबणे म्हणजे स्थितीशील अवस्था (Stationary State) निर्माण होणे होय. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार प्रस्थापित झाला की देशाचा विकास थांबतो.

४) **मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार :** आयात व निर्यातीवर सरकारची कोणतीही बंधने नसणे म्हणजे मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार होय.

५) **वेतन निधी :** कामगारांना वेतन देण्यासाठी वेतननिधी निर्माण केला जातो. हा वेतन निधी भांडवलाचा काही भाग बाजूला काढून तयार केला जातो.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्न :

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

१. .................. हे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ आहेत.

अ) ॲडम स्मिथ ब) रिकार्डो क) मिल ड) माल्थस इ) अ ते ड

२. .................. यांना अर्थशास्त्राचे जनक म्हणतात.

अ) रिकार्डो ब) ॲडम स्मिथ क) माल्थस ड) केन्स

३. .................. यांनी 'राष्ट्राची संपत्ती' हा ग्रंथ लिहिला आहे.

अ) मिल ब) ॲडम स्मिथ क) केन्स ड) रिकार्डो

४. .................. या ग्रंथामुळे ॲडम स्मिथ यांना 'अर्थशास्त्राचा जनक' हा किताब मिळाला.

अ) राष्ट्राची संपत्ती ब) समाजवाद क) भांडवलदार ड) यापैकी नाही

५. .................. यांचा निसर्ग नियमावर विश्वास होता.

अ) मिल ब) केन्स क) शुंपीटर ड) ॲडम स्मिथ

६. ॲडम स्मिथ यांनी ................... धोरणाचा पुरस्कार केला होता.

अ) हस्तक्षेप धोरण ब) निर्हस्तक्षेप धोरण क) यापैकी नाही

७. राजकीय अर्थव्यवस्था आणि करांची तत्त्वे हा ग्रंथ ................... यांनी लिहिला आहे.

अ) रिकार्डो ब) मिल क) केन्स ड) शुंपीटर

८. रिकार्डो यांच्या मते शेतीला घटत्या उत्पादन फलाचा नियम ...................

अ) लागू होतो ब) लागू होत नाही क) यापैकी नाही

९. मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ होते असे ................... यांनी म्हटले आहे.

अ) रिकार्डो ब) अमर्त्य सेन क) सेन ड) दासगुप्ता

१०. कर आकारणीमुळे भांडवलनिर्मितीचा दर कमी होतो असे................... यांनी म्हटले आहे.

अ) केन्स ब) शुंपीटर क) मिल ड) रिकार्डो

११. ................... यांनी वयाच्या तिसऱ्या वर्षी ग्रीक भाषा शिकली होती.

अ) जे. एस. मिल ब) से क) रिकार्डा ड) स्मिथ

१२. ................... हे वयाच्या ८ व्या वर्षी लॅटिन भाषा शिकले होते.

अ) से ब) रिकार्डो क) स्मिथ ड) जे. एस. मिल

१३. ................... यांनी वयाच्या १२ व्या वर्षी तर्कशास्त्राचा अभ्यास केला होता.

अ) जे. एस. मिल ब) से क) स्मिथ ड) केन्स

१४. ................... यांनी वयाच्या १३ व्या वर्षी अर्थशास्त्राचा अभ्यास केला होता.

अ) जे. एस. मिल ब) से क) रिकार्डो ड) स्मिथ

१५. वयाच्या १५ व्या वर्षी................... यांनी राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता.

अ) जे. एस. मिल ब) रिकार्डो क) केन्स ड) स्मिथ

१६. राजकीय अर्थशास्त्राची तत्त्वे हा ग्रंथ सन १८४८ मध्ये ................... यांनी लिहिला.

अ) से ब) रिकार्डो क) स्मिथ ड) जे. एस. मिल.

१७. जे. एस. मिल हे ................... धोरणाचे समर्थक होते.

अ) मुक्त व्यापार ब) संरक्षक व्यापार क) यापैकी नाही

१८. ................... यांनी सक्तीच्या शिक्षणाची शिफारस केली आहे.

अ) जे. एस. मिल ब) शुंपीटर क) से ड) लेविस

१९. ................... यांनी सरकारी शिक्षणव्यवस्थेची शिफारस केली आहे.

अ) शुंपीटर ब) जे. एस. मिल क) से ड) लेविस

२०. कामगारांचे कामाचे तास कमी करावेत हा विचार ................... यांनी मांडला आहे.

अ) जे. एस. मिल ब) से क) स्मिथ ड) शुंपीटर

२१. आर्थिक विकासासाठी सरकारने किमान हस्तक्षेप करावा असे ................... यांनी म्हटले आहे.

अ) से ब) जे. एस. मिल क) मार्शल ड) यापैकी नाही

२२. थॉमस रॉबर्ट माल्थस यांचा ................... सिद्धांत जगप्रसिद्ध आहे.

अ) लोकसंख्या ब) उत्पन्न क) वितरण ड) मूल्य

२३. माल्थस यांच्या मते, लोकसंख्या ................... श्रेणीने वाढते.

अ) गणिती ब) भूमिती क) स्थिर ड) यापैकी नाही

२४. माल्थस यांच्या मते, अन्नधान्याचे उत्पादन ................... श्रेणीने वाढते.

अ) भूमिती ब) स्थिर क) गणिती ड) यापैकी नाही

२५. माल्थस यांना जे. बी. से यांचा बाजारपेठ नियम ................... होता.

अ) मान्य ब) अमान्य क) यापैकी नाही

२६. ................... यांच्या मते न्यून प्रभावी मागणी आर्थिक विकासात अडथळा निर्माण करते.

अ) माल्थस ब) से क) स्मिथ ड) रिकार्डो

२७. ................... यांच्या आर्थिक विकास सिद्धांताला नवप्रवर्तन सिद्धांत म्हणतात.

अ) मिल ब) से क) स्मिथ ड) शुंपीटर

२८. चक्रीय प्रवाहाची संकल्पना ................... यांनी मांडली आहे.

अ) शुंपीटर ब) से क) केन्स ड) रिकार्डो

२९. .................. आर्थिक विकास होतो असे शुंपीटर म्हणतात.

अ) संयोजकामुळे ब) नवप्रवर्तकामुळे क) व्यापाऱ्यामुळे ड) यापैकी नाही

३०. भांडवलशाहीचा नाश होऊन समाजवाद अस्तित्वात येतो असे .................. यांनी म्हटले आहे.

अ) शुंपीटर ब) से क) स्मिथ ड) रिकार्डो

३१. अर्थव्यवस्थेत होणारे गुणात्मक बदल म्हणजे आर्थिक विकास अशी आर्थिक विकासाची व्याख्या .................. यांनी केली आहे.

अ) स्मिथ ब) से क) मार्क्स ड) शुंपीटर

३२. आर्थिक विकासाचा अमर्यादित श्रमपुरवठा सिद्धांत .................. यांनी मांडला आहे.

अ) ऑर्थर लेविस ब) से क) रिकार्डो ड) मार्क्स

३३. गरीब देशातील अमर्याद श्रमपुरवठा आर्थिक विकासाचे साधन बनू शकते, असे .................. यांनी म्हटले आहे.

अ) लेविस ब) व्यारवादी क) निसर्गवादी ड) केन्स

३४. .................. यांच्या मते न्यून विकसित देशातील अर्थव्यवस्था ही भांडवली क्षेत्र आणि निर्वाह क्षेत्र या दोन क्षेत्रात विभागलेली असते.

अ) केन्स ब) लेविस क) रिकार्डो ड) व्यापारवादी

३५. जेव्हा अप्रगत देशात असलेला अमर्याद श्रमपुरवठा संपतो तेव्हा आर्थिक विकासाची प्रक्रिया थांबते असे .................. यांनी म्हटले आहे.

अ) लेविस ब) केन्स क) से ड) मिल

३६. दास कॅपिटल हा ग्रंथ .................. यांनी लिहिला आहे.

अ) केन्स ब) से क) मिल ड) कार्ल मार्क्स

३७. ऐतिहासिक भौतिकवादाची (Historical Materialism) संकल्पना .................. यांनी मांडली आहे.

अ) मार्क्स ब) से क) मिल ड) केन्स

३८. .................. यांच्या आर्थिक विकास सिद्धांतात श्रममूल्य (Labour Value) आणि अतिरिक्त मूल्य (Surplus Value) या संकल्पना आढळतात.

अ) मार्क्स ब) से क) मिल ड) रिकार्डो

३९. समाजातील वर्गसंघर्षावर ................... यांनी लेखन केले आहे.

अ) रिकार्डो ब) से क) मिल ड) मार्क्स

४०. जगातील कामगारांनो संघटित व्हावा असे ................... यांनी म्हटले आहे.

अ) मार्क्स ब) रिकार्डो क) मिल ड) से

४१. ................... यांच्या श्रममूल्य सिद्धांताला 'अतिरिक्त मूल्य सिद्धांत' किंवा मजुरीविषयक शोषणाचा सिद्धांत असे म्हणतात.

अ) से ब) मिल क) केन्स ड) मार्क्स

४२. ................... यांनी श्रमाचे आवश्यक श्रम आणि अतिरिक्त श्रम असे दोन प्रकार सांगितले आहेत.

अ) से ब) मार्क्स क) केन्स ड) रिकार्डो

४३. एंगल्स बरोबर ................... यांनी साम्यवादाचा जाहीरनामा हा ग्रंथ लिहिला.

अ) मार्क्स ब) रिकार्डो क) से ड) केन्स

४४. मानव समाजाचा इतिहास वर्गसंघर्षाचा आहे असे ................... यांनी म्हटले आहे.

अ) मार्क्स ब) से क) केन्स ड) स्मिथ

४५. नफ्याच्या घटत्या दराचा सिद्धांत ................... यांनी मांडला आहे.

अ) केन्स ब) से क) स्मिथ ड) मार्क्स

## १.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) इ | २) ब | ३) ब | ४) अ | ५) ड | ६) ब | ७) अ |
| ८) अ | ९) अ | १०) ड | ११) अ | १२) ड | १३) अ | १४) अ |
| १५) अ | १६) ड | १७) अ | १८) अ | १९) ब | २०) अ | २१) ब |
| २२) अ | २३) ब | २४) क | २५) ब | २६) अ | २७) ड | २८) अ |
| २९) ब | ३०) अ | ३१) ड | ३२) अ | ३३) अ | ३४) ब | ३५) अ |
| ३६) ड | ३७) अ | ३८) अ | ३९) ड | ४०) अ | ४१) ड | ४२) ब |
| ४३) अ | ४४) अ | ४५) ड. | | | | |

## १.७ सरावासाठी प्रश्न :

**अ) टीपा द्या.**

१) निसर्ग नियम
२) वेतन निधी
३) नवप्रवर्तन
४) निर्वाह व भांडवली क्षेत्र

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१) ॲडम स्मिथ यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत स्पष्ट करा.
२) रिकार्डो यांचा आर्थिक विकास सिद्धांत स्पष्ट करा.
३) मिल यांचा आर्थिक विकास सिद्धांत स्पष्ट करा.

**क) सविस्तर उत्तरे द्या.**

१) माल्थस यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत स्पष्ट करा.
२) कार्ल मार्क्स यांचा आर्थिक विकास सिद्धांत स्पष्ट करा.
३) शुंपीटर यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत स्पष्ट करा.
४) लेविस यांचा आर्थिक विकासाचा अमर्यादित श्रमपुरवठा सिद्धांत स्पष्ट करा.

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


1. Agarwal R. C., Economics and Development, Educational Publishers, Agra, 2013-14.
2. Jhingan M. L., Vrinda Publications (P) limited, Delhi, 2006.
3. Puri V. K. and Misra S. K., Economics of Development and Planning, Himalay Publishing House, 1998.
४. कविमंडन विजय, विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, ४४००१०.


❑❑❑

घटक २

# आर्थिक विकासाचे सिद्धांत – II

## (Theories of Economic Development - II)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

- २.२.१ 'बिग पुश' (मोठ्या धक्क्याचा)/ प्रबळ धक्का सिध्दांत
- २.२.२ संतुलित आणि असंतुलित विकासाचा सिद्धांत
- २.२.३ लिबेनस्टीन यांचा 'क्रांतिकारी किमान प्रयत्न' सिद्धांत
- २.२.४ मिर्डल यांचा 'चक्रीय कार्य–कारण भाव' सिद्धांत

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी


### २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील घटक समजण्यास सोपी होतील.

१. विविध अर्थतज्ज्ञांनी माडलेले आर्थिक विकासाचे सिध्दांत अभ्यासता येतील.

२. आर्थिक विकासासंबंधी सनातनवादी आर्थिक सिध्दांत समजावून घेता येतील.

३. संतुलित आणि असंतुलित विकासाचा सिध्दांतामधील प्रा. रॅग्नर नर्क्स चे योगदान लक्षात येईल.

४. प्रा. हार्वे लिबेनस्टीन यांनी विकासाबाबत मांडलेले 'क्रांतिकारी किमान प्रयत्न' हा सिद्धांत समजावून घेता येईल.

५. विकसनशील देशाच्या विकास प्रक्रियेबाबत मांडलेला प्रा.पॉल रोझेनस्टाईन-रॉडन आणि आर्थर लुईस यांनी मांडलेला 'प्रबळ धक्का सिध्दांत' हा सिद्धांत समजावून घेता येईल.

६. अविकसित देशांमधील मागासलेपणाच्या मागील कारणांची मीमांसा करणारा गुन्नार मिर्डल यांचा 'विकासाचा चक्रिय कार्यकारण संबंध' सिध्दांत स्पष्ट करता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत घटकामध्ये आपण विविध अर्थतज्ज्ञांनी आर्थिक विकासाविषयी मांडलेले सिध्दांत पाहणार आहोत. विविध अर्थतज्वांनी त्या त्या कालखंडातील आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीला अनुसरून मांडलेले सिध्दांत आजच्या परिस्थितीला कितपत लागू होतात. त्यावर कोणत्या मर्यादा येतात याचे परीक्षण करणे गरजेचे आहे. वास्तविक पाहता आर्थिक विकास विषयक सिध्दांताच्या शास्त्रशुध्द मांडणी. सनातनवादी आर्थिक विचारांपासून (Classical School and Economics) सुरुवात झाली. त्यामध्ये ॲडम स्मिथ, डेव्हीड रिकार्डो, थॉमस माल्थस इ. विचारवंतांनी आर्थिक विकास विषयक प्रश्नांचे विश्लेषण केले. सनातनवादी विचारसरणी पूर्वी व्यापारवादी व निसर्गवादी विचारवंतांनी देखील आर्थिक विकास विषयक बाबत आपआपले विचार मांडलेले आहेत. त्याला शास्त्रशुध्द व सैध्दांतिक मांडणी नव्हती. यामुळे त्याचा उद्देश हा फक्त देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे हा होता. या सर्व पार्श्वभूमीवर आपण प्रस्तूत घटकात पुढील प्रमाणे सनातनवादी, समाजवादी व नव-सनातनवादी आधुनिक असे 'आर्थिक विकासविषयक सिध्दांत' समजाऊन घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### आर्थिक विकससाचे सनातनवादी सिद्धांत (Classical Theories of Economic Development) :

**प्रास्ताविक :**

या घटकमध्ये आपणास विकसनशील देशाचा विकास कसा होईल या बाबत व्यापारवादी व निसर्गवादी विचारवंतांनी जे आर्थिक विकास सिद्धांत मांडले त्यामधील त्यांचे योगदान पाहणार आहोत, या मध्ये रोझेनस्टाईन-रॉडन यांचा प्रबळ धक्का सिध्दांत, प्रा. हार्वे लिबेनस्टीन यांचा 'क्रांतिकारी किमान प्रयत्न' सिध्दांत, गुन्नार मिर्डल यांचा 'विकासाचा चक्रिय कार्यकारण संबंध' हे आर्थिक विकास यावर भाष्य करणारे सिद्धांत पाहणार आहोत.

### २.२.१ रोझेन्स्टिन रोडान यांचा 'बिग पुश' (मोठ्या धक्क्याचा)/ प्रबळ धक्का सिध्दांत (Big Push Theory) :

**प्रस्तावना :**

गतीहीन अर्थव्यवस्थेला असलेले मुळचे जडत्व नष्ट करून तिला जास्तीत जास्त उत्पादनक्षम बनवण्याच्या

दृष्टिने अनेक छोटे-छोटे व वेगवेगळ्या कालखंडात विभागलेले प्रयत्न करण्यापेक्षा एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर, सुसंघटीत व व्यापक स्तरावरील प्रयत्न करणे गरजेचे आहे. असा मतप्रवाह १९५० व्या दशकात व्यक्त होऊ लागला. सन १९४३ मध्ये या विचारप्रवाहाला बळकटी देणारा सिध्दांत प्रो. पॉल एन. रोझेन्स्टीन रोडान यांनी मांडला. यालाच रोडान यांचा प्रबळ धक्का सिध्दांत /'बिग पुश' सिध्दांत असे म्हणतात.

**रोझेन्स्टीन रोडान यांचा प्रबळ धक्का सिध्दांत :-**

अल्पविकसित देशांना दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी संथ किंवा लहान प्रमाणावर गुंतवणूक करून चालणार नाही, तर त्यांना **एक मोठा आर्थिक धक्का (Big Push)** देणे गरजेचे आहे, असे रोडान म्हणतात.

प्रो. रोझेन्स्टीन रोडान यांच्या सिध्दांतांची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की, विकास प्रक्रिया ही तुटक वा खंडित अशा उड्डाणांची बनलेली असते. यामध्ये विकासाकरता आवश्यक असणारे जे घटक असतात ते परस्परांशी संबंधीत व किमान आकाराचे असतात. त्यामुळे आर्थिक विकासाचा किमान असा एक टप्पा गाठण्याकरता साधनसामग्रीचा व संसाधनांचा असा प्रबळ वापराचा प्रयत्न व्हायला हवा. जो मोठ्या प्रमाणावर परिणामकारक विकास घडवून आणेल यासाठी रोडान विमानाच्या उड्डाणाचे उदाहरण देतात, आर्थिक विकास हा एका विमानासारखा असतो. विमानाला हवेत उडण्यासाठी एका विशिष्ट गतीची (Take-off speed) गरज असते, संथ गतीने धावून विमान उडू शकत नाही. त्याचप्रमाणे, अल्पविकसित देशांमध्ये एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक करणे आवश्यक असते.

थोडक्यात अशा प्रयत्नातून मोठ्या प्रमाणावरल उत्पादनाचे बर्हिगत फायदे प्राप्त करणे हा हेतू असतो. आपला हा दृष्टिकोन स्पष्ट करताना रोडान यांनी बाजारपेठेची व्याप्ती आर्थिक विकास गतिशील करण्यासाकरिता किती महत्त्वाचे असते याचे पुढील घटकातून विश्लेषण केले.

**१) आर्थिक अविभाज्यता किंवा बाह्य फायदे :-**

रोझेन्स्टिन रोडान यांनी तीन प्रकारची आर्थिक अविभाज्यता सांगितल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :-

**उत्पादन फलनातील अविभाज्यता :-**

सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधा यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागते. या सुविधांचे तुकडे करता येत नाहीत कारण त्या अविभाज्य असतात. या पायाभूत सुविधांवर होणाऱ्या खर्चामुळे इतर उद्योगांचा उत्पादन खर्च कमी होतो. हे फायदे प्राप्त करण्यासाठी उत्पादन कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामाजिक व आर्थिक सुविधांचे आकारमान वा त्यांचा पुरवठा हा विशिष्ट अशा किमान प्रमाणात असणे गरजेचे आहे. उदा. रेल्वे, रस्ते, शिक्षण, आरोग्य, वीज, दळणवळण, बँका, टपालसेवा, गृहनिर्माण यांसारख्या सोयी-सुविधांची उपलब्धता किमान एका विशिष्ट प्रमाणातच असाव्या लागतात. कारण या सोयी-सुविधा जर मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतील तर इतर उद्योग व्यवसायाच्या उत्पादन विनीमयासाठी

लागणारी गुंतवणूक देखील वाढते, या वरील सेवा किमान प्रमाणात उपलब्ध असल्याशिवाय इतर व्यवसाय उद्योगांचा विकास होत नाही.

रोडानच्या मते विकसनशील देशांनी त्यांच्या एकूण गुंतवणूकीच्या ३० ते ४०% गुतवणूक या घटकांवर करणे गरजेचे आहे. तरच या देशाच्या विकास प्रक्रियेला गती प्राप्त होऊ शकते. त्यामुळे या 'अविभाज्यता' घटकांवर विकसनशील देशांनी फार मोठ्या प्रमाण किमान आवश्यक गुंतवणूक करणे गरजेचे आहे. सामाजिक वरकड भांडवल कालाची अविभाज्यता, टिकाऊपणाची अविभाज्यता, दीर्घ फलधारणाकाळाची अविभाज्यता व विविध सार्वजनिक उपयुक्ततांचे मिश्रण असणारी ही अविभाज्यता असते.

**२. मागणीची अविभाज्यता :-**

मागणीची अविभाज्यता स्पष्ट करताना रोडान यांनी अल्पविकसित देशात लोकांचे उत्पन्न कमी असल्याने बाजारपेठ मर्यादित असते. जर एकाच उद्योगात गुंतवणूक केली, तर त्या वस्तूची मागणी वाढेलच असे नाही.यासाठी अनेक उद्योगांमध्ये एकाच वेळी गुंतवणूक करावी लागते, जेणेकरून एका उद्योगातील कामगार हे दुसऱ्या उद्योगाच्या वस्तूंचे ग्राहक बनतील आणि मागणीचे चक्र कायमपणे सुरू होईल.

रोडानंनी मांडलेली ही संकल्पना नंतर रॅग्नर नर्क्स यांनी 'संतुलित विकास' संकल्पनेचे स्पष्टीकरण देताना अधिक विस्तृतपणे मांडली. प्रो. रोडानच्या मते, मागणीची अविभाज्यता तेव्हाच प्राप्त होऊ शकते जेव्हा परस्परांवर अवलंबीत असणाऱ्या उद्योगांच्या विकासाचा एकाच वेळी मोठा प्रयत्न केला जाईल. कारण एकाच विशिष्ट प्रकल्प वा उद्योगात मोठी गुंतवणुक करण्यामध्ये मोठा धोका व फलनिष्पत्तीची अनिश्चितता जास्त असते. कारण असा प्रकल्प मोठी गुंतवणुक करून जरी पूर्ण झाला तरी त्याच्या वस्तू या सेवांना मागणी असेलच असे नाही. त्यामुळे एकच एक उद्योग सुरु न करता परस्परांवर अवलंबून असणारे एकापेक्षा जास्त उद्योग एकाच वेळी सुरु करावेत. यातून ते उद्योग एकमेकांच्या वस्तूंना मागणी निर्माण करतील. रोडान यासाठी पाद?त्राण उद्योगाचे उदाहरण देतात.

समजा, कोणताही परकीय व्यापार नसणारा एक अविकसीत देश आहे. ही एक बंद अर्थव्यवस्था आहे. निर्वाह क्षेत्रातील १०० छुप्या बेकारांना पादत्राणे बनविणाऱ्या कारखान्यात रोजगार दिला. त्यातून त्यांना जे वेतन मिळते त्याद्वारे त्यांचे उत्पन्न वाढते. आता त्यांना मिळालेले हे सर्व उत्पन्न त्यांची जर पादत्राण खरेदी करण्यावरच खर्च केले तर त्या कारखान्यांची मागणी पूर्ण होऊ शकते. मात्र हे कामगार तसे करणार नाहीत. कारण त्यांना त्या उत्पन्नाद्वारे आपल्या इतर उपभोग्य वस्तू आणि सेवा खरेदी करावयाच्या असतात. परिणामी पादत्राणांना बाजारपेठ उपलब्ध होणार नाही. यामुळे या कारखान्यातील गुंतवणूक ही धोक्याची ठरते. म्हणून हा कारखाना सहसा कुणी सुरु करणारच नाही. याउलट जर एक पादत्राणाचा कारखाना सुरु करण्याऐवजी १०० प्रकारच्या उपभोग्य वस्तू आणि सेवा उत्पादन करणारे १०० प्रकारचे कारखाने चालू केले व त्यासाठी १०,००० छुप्या बेकारांना रोजगार दिला तर हे प्रत्येक जण एकमेकांच्या वस्तूचा मागणी निर्माण करतील व मागणीची अविभाज्याला तयार होईल.

यातून पुढील दोन घटक स्पष्ट होतात.

१. नवीन रोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या श्रमिकांचे उत्पन्न त्या उपभोग्य वस्तूंवर खर्च होते. त्यांच्या उत्पादनासाठी किमान विशिष्ट प्रमाणात गुंतवणूक करणे गरजेचे आहे.

२. एका उद्योगात केली जाणारी गुंतवणूक ही दुसऱ्या उद्योगातील गुंतवणूकीवरुन ठरते.

म्हणजेच या गुंतवणूक निर्णयांमध्ये एक प्रकारची परस्पर घनिष्ठ अशी अविभाज्यता दिसून येते.

**३. बचतीच्या पुरवठ्यातील अविभाज्यता :-**

अल्पविकसीत देशाच्या जलद आर्थिक प्रगतीकरता मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीची गरज असते. मात्र अशा गुंतवणुकीसाठी मोठ्या व व्यापक स्वरुपात बचत उपलब्ध होणे गरजेचे आहे. अल्पविकसित देशात दारिद्र्य जास्त असल्याने उत्पन्नपातळी आधीच अल्प असते. त्यामुळे बचतीची फारशी शक्यता नसते. म्हणूनच रोडान या बचतीच्या वैशिष्ट्याला 'बचतीच्या पुरवठ्याची अविभाज्यता' असे म्हणतात. यातून मार्ग काढण्यासाठी तेव्हा मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक विविध क्षेत्रांमध्ये केली जाईल. तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या उत्पन्नाचा फार मोठा भाग बचतीत रूपांतरित केला पाहिजे. यासाठी सीमांत बचतीचा दर हा सरासरी बचतीच्या दरापेक्षा जास्त ठेवावा लागेल. मात्र याकरता किमान विशिष्ट प्रमाणात बचत व गुंतवणुक होणे गरजेचे आहे.

थोडक्यात आर्थिक विकासातील अडथळे दूरकरून अर्थव्यवस्थेला गतीक्षम बनविण्यासाठी एका किमान मोठ्या प्रमाणात (Big Push) भांडवल गुंतवणुकीची गरज असते. कारण अल्पविकसीत देशांमध्ये एक प्रकारची मानसिक अविभाज्यता वास करीत असते. ज्यामुळे लोकांना आवश्यक तेवढे सामर्थ्य व उत्साह देणे गरजेचे असते.

**टीकात्मक परिक्षण :-**

प्रो. रोझेन्स्टिन रोडान यांनी आपल्या सिध्दांतांचे विवेचन अविभाज्यता मोठ्या प्रमाणाच्या बचती, विकास प्रक्रिया ही खंडीत उड्डाणांची असते. या संकल्पनांच्या आधारे केलेले दिसून येते. त्यामुळे त्यांचे विचार हे श्रमिक वास्तवदर्शी व कालसुसंगत वाटतात. रोडान यांनी आपल्या विवेचनाद्वारे समतोलीत अवस्थेकडे जाण्याचा मार्ग स्पष्ट केलेला आहे. त्यांनी विकसनशील देशांतील बाजारपेठांची अपूर्णता लक्षात घेऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात व एकत्रितरित्या, एकाच वेळी मोठी भांडवल गुंतवणूक होणे कसे गरजेचे आहे हे शास्त्रीयदृष्ट्या दाखवून दिले. रोडान यांचे आर्थिक विकासाचे हे प्रारूप वास्तवदर्शी असते तरी त्यावर पुढील टीका केल्या जातात.

१. **भांडवलाची कमतरता :-** अल्पविकसित देशांकडे एकाच वेळी 'मोठा धक्का' देण्यासाठी आवश्यक एवढे प्रचंड भांडवल उपलब्ध नसते.

२. **उत्पादन घटकांची स्पर्धात्मकता :-** प्रा. जे. मार्क्स फ्लेमींग यांच्या मते, विकसनशील देशांमधील प्राथमिक अवस्थेतील उद्योगांमधील उत्पादनाचे घटक हे परस्परांशी पूरक असतात. मात्र उत्पादन

प्रक्रिया जसजशी विकसीत होत जाते तसतसे हे उत्पादन घटक परस्परांशी स्पर्धक ठरू लागतात.

३. **किफायतशीर उत्पादनाची शक्यता :–** प्रा. किंडल बर्जर यांच्या मते रोडाननी गृहीत धरल्याप्रमाणे मागणीची निर्मिती उत्पन्नाद्वारे होते. मात्र प्रत्येक उद्योग आपला उत्पादनखर्च कमी ठेवण्याकडे लक्ष देत असतो. त्यातून उत्पन्न पातळी कामगारांच्या बाजूने सतत वाढतच राहील असे नाही.

४. **आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे दुर्लक्ष :–** प्रो. जॅकोब वायनर यांच्या मते आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंधातून अविकसित देशांना अनेक परकीय गुंतवणूकाच्या संधी उपलब्ध असतात. शिवाय या देशांच्या एकूण गुंतवणुकीचा फार मेठा वाटा भाग परकीय निर्यातीसाठी खर्च केला जातो. त्या तुलनेत आयातीसाठीची गुंतवणूक अल्प असते.

५. **शेती क्षेत्रातील गुंतवणुकीकडे दुर्लक्ष :–** विकसनशील देश हे मुख्यत्वे शेतीप्रधान असतात. येथील फार मोठी लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या अवलंबून असते. त्यामुळे जर या शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक केली तर त्याचा विकास प्रक्रियेवर होणारा परिणाम रोडान यांनी दुर्लक्षित केला. शेतीत खते, बी–बियाणे, जंतुनाशके, किटकनाशके, यंत्रे–अवजारे, पाणीपुरवठा, वीज, वाहतुक इ. सोयी–सुविधांवर जर गुंतवणुक झाली तरच विकासाच्या गती प्राप्त होईल.

६. **महागाई होण्याची शक्यता :–** रोडानने सांगितलेला मार्ग जर विकसनशील देशांनी अंगीकारला तर त्यांना त्यासाठी फार मोठी व दिर्घकालीन गुंतवणुक करावी लागेल व अशा देशांनी एवढी मोठी गुंतवणूक करण्यासाठी पैशाचा पुरवठा वाढवावा लागेल व त्यासाठी तुटीच्या अर्थभरण्याचा मार्ग अंगीकारावा लागतो. मात्र यातून विकास प्रक्रिया अवरूध्द करणारी भाववाढ निर्माण होते.

७. **अल्प गुंतवणुक देखील किफायतशीर ठरू शकते :–** प्रा. जॉन ॲडलर यांनी भारत, पाकिस्तान व अन्य आशियायी देश, दक्षिण अमेरिकेतील काही राष्ट्रे यांचा अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की, अल्प प्रमाणावर गुंतवणूक केलेले प्रकल्प देखील फायद्याचे ठरलेले दिसून येतात. म्हणून विकासाची प्रक्रिया गतमीन करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावरच भांडवल गुंतवणुक करणे ही एकमेव पूर्वअट असू शकत नाही.

८. **वास्तव खर्चातील वाढीची शक्यता :** प्रो. रोडानच्या मते जर एकाच वेळी अनेक उद्योगांमध्ये गुंतवणुक केल्यास विविध प्रकारची भांडवल साधने, कुशल श्रमाचा पुरवठा, वीज, विजपुरवठा, कच्चा माल इ. साधनसामग्री तौलनिकदृष्ट्या दुर्मीळ होऊ लागेल. यातून त्यांच्या किंमती व खर्च वाढेल. या खर्चामुळे उत्पादनसाठीचा पैशातील आणि वास्तव खर्च वाढू लागेल. त्यामुळे उत्पादित वस्तू व सेवांची किफायतशीर विक्री करण्यामध्ये अनेक अडथळे येतील.

## २.२.२ संतुलित आणि असंतुलित विकासाचा सिद्धांत (Theory of Balanced and Unbalanced Growth) :

**प्रस्तावना :**

या आर्थिक विकासाच्या सिद्धांतानुसार रॅग्नार नर्क्स,पॉल रोझेनस्टीन, आणि आर्थर लुईस यांनी अर्थव्येवस्थेचा कसा करता येईल यासाठी देशातील शेती, उद्योग सेवा क्षेत्र आणि पायाभूत सुविधा यांचा एकाचवेळी समान पद्धतीने गतीने विकास करणे आवश्यक आहे,तसे झाल्यास अर्थवयेवस्था भरभराटीला येईल, देशात विकासाचे वारे वाहू लागेले असे असे मत तिन्ही अर्थतज्ञानी मांडले आहे.

संतुलित विकास सिद्धांताची वैशिष्ट्ये :

१) अर्थव्येवस्थेमध्ये एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जाते.

२) विविध उद्योग एकमेकांना पूरक असल्यामुळे कामगारांचे उत्पन्न एकमेकांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देऊ शकते.

३) अर्थव्येवस्थेमध्ये पुरवठा आणि मागणीचा समतोल राखला जातो.

**संतुलित विकास सिद्धांत :**

या सिद्धांताचे मुख्य समर्थक प्रा. रॅग्नर नर्क्से आणि आर्थर लुईस हे आहेत.

**अर्थ :–** ''देशातील सर्व क्षेत्रांचा (शेती, उद्योग, सेवा, वाहतूक इ.) आणि सर्व उपभोगी वस्तूंच्या उद्योगांचा विकास एकाच वेळी आणि समान गतीने करणे म्हणजे संतुलित विकास होय''.

**रॅग्नर नर्क्स यांचा संतुलित विकासाचा सिद्धांत** (Balanced Growth Theory) **:**

''देश गरीब आहे कारण तो गरीब आहे'' असे मत नर्क्स यांनी विकसनशील देशांमधील दारिद्र्याचे दुष्टचक्र तोडण्यासाठी मांडलेला एक अत्यंत महत्त्वपूर्ण आर्थिक दृष्टिकोन आहे. नर्क्स यांनी१९५३ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'Problems of Caital Formation in Underdeveloped Countries' या प्रसिद्ध पुस्तकात हा सिद्धांत सविस्तरपणे मांडला.

**१. सिद्धांताची पार्श्वभूमी : दारिद्र्याचे दुष्टचक्र** (Vicious Circle of Poverty) **:–**

रॅग्नर नर्क्स यांच्या मते, ''एक देश गरीब असतो कारण तो गरीब आहे.'' (A country is poor because it is poor) विकसनशील देशांमध्ये दारिद्र्याचे एक वतुर्ळाकार चक्र असते, ज्यामध्ये मागणी आणि पुरवठा अशा दोन्ही बाजूंनी अडथळे निर्माण होतात.

**मागणीची बाजू :–** अल्प उत्पन्न कमी खरेदी क्षमता (मागणी) गुंतवणुकीसाठी कमी प्रोत्साहन भांडवलाची कमतरता कमी उत्पादकता पुन्हा अल्प उत्पन्न.

**पुरवठ्याची बाजू :-** अल्प उत्पन्न कमी बचत क्षमता कमी गुंतवणूक भांडवलाची कमतरता कमी उत्पादकता पुन्हा अल्प उत्पन्न. या दुष्टचक्रामुळे पारंपारिक पद्धतीने होणारी छोटी-मोठी गुंतवणूक अर्थव्यवस्थेला गती देऊ शकत नाही. हे चक्र तोडण्यासाठी नर्क्स यांनी संतुलित विकासाचा पर्याय सुचवला.

**२. संतुलित विकासाची मुख्य संकल्पना :**

रॅग्नर नर्क्स यांच्या मते, अर्थव्यवस्थेतील एकाच किंवा काही मोजक्या उद्योगांमध्ये गुंतवणूक केल्यास विकास साध्य होणार नाही. त्याऐवजी, अर्थव्यवस्थेतील सर्व प्रमुख ग्राहकोपयोगी आणि उत्पादक उद्योगांमध्ये एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली पाहिजे.

जेव्हा अनेक उद्योग एकत्र सुरू होतात, तेव्हा ते एकमेकांसाठी पूरक (Complementary) ठरतात. एका उद्योगातील कामगारांना मिळणारे उत्पन्न हे दुसऱ्या उद्योगातील वस्तू खरेदी करण्यासाठी वापरले जाते. यामुळे बाजाराचा विस्तार होतो आणि मागणीची टंचाई दूर होते.

**आकृती १**




वरील आकृती मध्ये मागणी बाजूने दारिद्र्याचे दृष्टचक्र मांडले आहे.

**आकृती २**

**३. सिद्धांताचे प्रमुख घटक आणि कार्यपद्धती :**

**अ) बाजाराच्या मर्यादेवर मात करता येते** (Overcoming the Limitation of Market) **:**

विकसनशील देशांमध्ये बाजारपेठेचा आकार लहान असतो कारण लोकांची खरेदी क्षमता कमी असते.

नर्क्स यांनी 'बाजाराची पूरकता' हा महत्वाचा दृष्टिकोन मांडला आहे .

उदा. जर फक्त एकाच शूज (Shoes) बनवणाऱ्या कारखान्यात गुंतवणूक केली, तर तिथले कामगार त्यांचे सर्व उत्पन्न फक्त शूज खरेदीवर खर्च करणार नाहीत. त्यामुळे तो कारखाना अपयशी ठरू शकतो. परंतु, जर शूज, कापड, अन्नप्रक्रिया, सायकल अशा अनेक विविध कारखान्यांमध्ये एकाच वेळी गुंतवणूक केली, तर सर्व कारखान्यांमधील कामगारांच्या उत्पन्नातून एकमेकांच्या वस्तूंची मागणी वाढेल आणि सर्वच उद्योग फायद्यात चालतील.

**ब) अंतर्गत आणि बाह्य बचतींचा लाभ मिळतात** (Internal and External Economies) **:**

जेव्हा सर्व क्षेत्रांचा एकाच वेळी विकास होतो, तेव्हा दळणवळण, वीज, बँक आणि कच्चा माल यांसारख्या पायाभूत सुविधांचा एकत्रित विकास होतो. याचा फायदा सर्व उद्योगांना मिळून उत्पादनाचा खर्च कमी होतो.

**क) खासगी आणि सार्वजनिक भागीदारी महत्वाची :**

नर्क्स यांच्या मते, या प्रक्रियेत केवळ सरकारी गुंतवणूक पुरेशी नसते. सरकारने पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करून अनुकूल वातावरण निर्माण केल्यास, बाजारपेठेचा विस्तार पाहून खासगी गुंतवणूकदारही मोठ्या प्रमाणावर पुढे येतात.

**४. नर्क्स यांच्या सिद्धांतावरील मर्यादा / टीका :**

**अल्बर्ट हिर्शमन** यांनी खालील मुद्द्यांच्या आधारे या सिद्धांतावर टीका केली आहे.

१) **साधनसामग्रीचा अभाव :–** विकसनशील देशांकडे एकाच वेळी सर्व क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेले अफाट भांडवल, तंत्रज्ञान आणि कुशल मजूर उपलब्ध नसतात.

२) **नियोजनातील अडचणी:–** सर्व क्षेत्रांचा एकाच गतीने विकास साधण्यासाठी अत्यंत उच्च दर्जाच्या प्रशासकीय नियोजनाची गरज असते, जी अशा देशांमध्ये नसते.

३) **असंतुलित विकासाचा पर्याय अधिक योग्य :–** हिर्शमन यांच्या मते, सर्व क्षेत्रांत गुंतवणूक विखुरण्याऐवजी आधी लोखंड, पोलाद, वीज अशा मूलभूत उद्योगांमध्ये (Leading Sectors) गुंतवणूक करणे अधिक फायदेशीर ठरते.

**निष्कर्ष :**

रॅग्नर नर्क्स यांचा संतुलित विकासाचा सिद्धांत हा मागणीच्या समस्येवर आणि बाजारपेठेच्या विस्तारावर भर देणारा एक उत्कृष्ट सिद्धांत आहे. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक (Big Push) करूनच दारिद्र्याचे दुष्टचक्र तोडले जाऊ शकते, हा त्यांचा विचार आजही आर्थिक नियोजनात महत्त्वाचा मानला जातो.

**अल्बर्ट हिर्शमन यांचा असंतुलित विकासाचा सिद्धांत** (Unbalanced Growth Theory) **:**

**प्रस्तावना :**

या सिद्धांताचे मुख्य प्रणेते प्रा. अल्बर्ट हिर्शमन हे आहेत. या सिद्धांताला सिंगर आणि किंडल बर्जर यांनीही याला पाठिंबा दिल आहे. असंतुलित विकास या सिद्धांतानुसार, आर्थिक विकासासाठी विविध क्षेत्रांमध्ये असमानता (असंतुलन) आवश्यक आहे, ज्यामुळे एक क्षेत्र प्रगती करत राहते आणि दुसरे क्षेत्र त्याच्याशी संबंधित होते. यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेला अनुकूल वाढ होणे शक्य होते असे मत हिर्शमन यांनी मांडले.

प्रा. अल्बर्ट हिर्शमन यांच्या मते जर सर्व क्षेत्रे एकसमानपणे विकसित झाल्यास, तर त्याची वाढ मंद होऊ शकते किंवा अडथळे येऊ शकतात. त्यामुळे, एका विशिष्ट क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणे, त्यात गुंतवणूक करणे आणि त्याला प्रोत्साहन देणे, ही पुढील विकासासाठी आवश्यक असते. या पद्धतीने, एक क्षेत्र पुढे सरकते आणि इतर क्षेत्रे त्याला आधार देतात, ज्यामुळे एकूणच अर्थव्यवस्थेचा विकास अधिक वेगाने होतो.

**अर्थ :–** ''सर्व क्षेत्रांमध्ये एकाच वेळी गुंतवणूक न करता, देशाल महत्वाचे असणारे विशिष्ट क्षेत्रांची निवड करून त्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे म्हणजे असंतुलित विकास होय.''

**प्रा. अल्बर्ट हिर्शमन यांचा दृष्टिकोन :–** अल्पविकसित देशांकडे संसाधने आणि भांडवल मर्यादित असते. त्यामुळे ते सर्व क्षेत्रांत सारखी गुंतवणूक करू शकत नाहीत. आधी काही विशिष्ट क्षेत्रांचा विकास केल्यास अर्थव्यवस्थेत असंतुलन निर्माण होईल. हे असंतुलन पुढील विकासाला आणि नवीन गुंतवणुकीला चालना देईल.

**सिद्धांताचे मुख्य गृहीतक :– १. 'असंतुलन हेच विकासाचे इंजिन'**

प्रा. अल्बर्ट हिर्शमन म्हणतात की, ''जेव्हा आपण एखाद्या ठराविक क्षेत्रात मोठी गुंतवणूक करतो, तेव्हा इतर क्षेत्रांमध्ये दबाव किंवा मागणी निर्माण होते. त्यामुळे हा दबाव दूर करण्यासाठी इतर क्षेत्रांचाही आपोआप विकास करावा लागतो.''

प्रा. अल्बर्ट हिर्शमन यांनी गुंतवणुकीसाठी प्रामुख्याने दोन क्षेत्रे सांगितली आहेत:

१. **सामाजिक पायाभूत सुविधा –** यामध्ये रस्ते, वीज, पाणीपुरवठा, शिक्षण, दळणवळण यांचा समावेश होतो.

२. **थेट उत्पादक उपक्रम –** यामध्ये कारखाने, उद्योग आणि शेती यांचा समावेश होतो, जिथून थेट वस्तूंचे उत्पादन होते.

**अग्रगामी आणि पश्चगामी संबंध:–**

पश्चगामी संबंध (Backward Linkage) :– एखाद्या उद्योगाच्या स्थापनेमुळे त्याच्या कच्च्या मालाची मागणी करणाऱ्या इतर उद्योगांचा विकास होणे. (उदा. स्टील उद्योगामुळे लोखंड आणि कोळसा खाणींचा विकास).

अग्रगामी संबंध (Forward Linkage) :- उत्पादित वस्तूचा वापर करून पुढील नवीन उद्योग निर्माण होणे. (उदा. स्टीलच्या उपलब्धतेमुळे मोटारगाड्या किंवा यंत्रसामग्रीचे उद्योग सुरू होणे).

हिर्शमन यांच्या मते, सरकारने अशा उद्योगांमध्ये गुंतवणूक करावी ज्यांचे हे दोन्ही संबंध सर्वाधिक मजबूत आहेत.

**सारांश :** प्रा. हिर्शमन यांच्या मते, आर्थिक विकास हा एका रेषेत किंवा शांतपणे होत नाही. तो एका क्षेत्राकडून दुसऱ्या क्षेत्राकडे पडणाऱ्या 'आर्थिक धक्क्यांमुळे' आणि दबावामुळे वेगाने पुढे सरकतो. त्यामुळे विकसनशील देशांनी सर्वाधिक 'सहसंबंध प्रभाव' (Linkage Effects) असलेल्या क्षेत्रांमध्येच आधी गुंतवणूक केली पाहिजे असे ठाम मत आहे.

## २.२.३ प्रा. हार्वे लिबेनस्टीन यांचा 'क्रांतिकारी किमान प्रयत्न' सिद्धांत आणि न्युन उत्पन्न समतोल सापळा सिद्धांत (Prof. Harvey Libenstins Critical Minimum Effort Thesis and Low Income Equilibrium Trap) :

**प्रस्तावना :-**

क्रांतिकारी किमान आवश्यक प्रयत्न सिध्दांतांची मांडणी सर्वप्रथम करण्याचे श्रेय हे प्रा. हार्वे लायबेनस्टिन यांना दिले जाते. हा सिध्दांत 'Economic Backwardness and Economic Growth' (1957) या ग्रंथात मांडला आहे, वास्तविक पाहता प्रो. रोझेस्टिन व रोडान यांनी मांडलेला जोराचा धक्का सिध्दांत म्हणजे Big Push Theory आणि प्रो. हार्वे लायबेस्टिन यांचा किमान आवश्यक प्रयत्न हे दोन्ही सिध्दांत परस्परांशी अगदी जवळचे साधर्म्य असणारे व समतोल विकास गृहीततत्वाशी संबंधीत असे आहे.

**क्रांतिकारी किमान आवश्यक प्रयत्न सिध्दांत** (Critical Minimum Effort Theory) **:**

अल्पविकसित/मागास अर्थव्यवस्था या सहसा 'दारिद्र्याच्या दृष्टचक्रा'मध्ये अडकलेल्या असतात. या दृष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी अर्थव्यवस्थेला एका विशिष्ट किमान पातळीपर्यंतचा (Critical Minimum) आर्थिक प्रयत्न किंवा गुंतवणूक करणे अनिवार्य असते. जर प्रयत्न या किमान पातळीपेक्षा कमी असेल तर अर्थव्यवस्था पुन्हा मूळच्या मागासलेल्या स्थितीत परत जाते.

**प्रेरक आणि रोधक शक्ती** (Stimulants and Shocks) **:**

लिबेनस्टीन यांच्या मते, अर्थव्यवस्थेत सतत दोन प्रकारच्या शक्ती कार्यरत असतात:

१. **उत्पन्न वाढवणाऱ्या शक्ती –** या शक्ती गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि उत्पादन वाढवून देशाचे दरडोई उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करतात.

२. **उत्पन्न घटवणाऱ्या शक्ती –** या शक्ती वाढलेल्या उत्पन्नाचा प्रभाव कमी करतात. याचे मुख्य उदाहरण म्हणजे 'लोकसंख्या वाढ'.

**सिद्धांताचे कार्य :-**

१) जेव्हा देशात थोडी गुंतवणूक केली जाते, तेव्हा उत्पन्न वाढते. पण उत्पन्न वाढल्यामुळे आरोग्य सुधारते आणि मृत्यूदर घटतो, परिणामी लोकसंख्या वेगाने वाढते.

२) लोकसंख्या वाढल्यामुळे वाढलेले दरडोई उत्पन्न पुन्हा घटते आणि देश आहे त्याच जागी येतो. म्हणूनच, गुंतवणूक एवढी मोठी असावी (Critical Minimum) जी लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा जास्त गतीने राष्ट्रीय उत्पन्न वाढवू शकेल, जेणेकरून देश दारिद्र्याच्या सापळ्यातून कायमचा बाहेर पडेल.

**'क्रांतिकारी किमान आवश्यक प्रयत्न' या सिध्दांतील मुख्य बाबी पुढीलप्रमाणे :-**

**१. विकसनशील देश आणि अल्प उत्पन्न संतुलन सापळा :-**

प्रो. हार्वे लायबॅन्स्टिन यांच्या मते, जगातील विकसनशील देशांमध्ये अल्प उत्पन्न संतुलन सापळ्यामध्ये अडकण्याची प्रवृत्ती असते. या Low Level Equilibrium Trap मुळे अशा देशांनी जरी स्वयंप्रेरणेने विकास करण्याचा प्रयत्न जरी केला तरी तो फारसा यशस्वी ठरू शकत नाही व ते पुन्हा मागे पडतात व अल्प उत्पन्न संतुलन सापळ्यात अडकतात.

**२. राष्ट्रीय उत्पन्न, लोकसंख्या आणि दरडोई उत्पन्न यांमधील परस्परसंबंध :-**

प्रो. हार्वे लायबेंन्स्टिन यांनी आपल्या विश्लेषणामध्ये राष्ट्रीय उत्पन्न, लोकसंख्या आणि दरडोई उत्पन्न यांचा आर्थिक विकासाशी असणारा परस्परसंबंध स्पष्ट केला आहे. त्याच्या मते, या तिन्ही घटकांचा आर्थिक विकासावर महत्त्वपूर्ण परिणाम होत असतो. उदा. जर राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग ५% एवढा असेल आणि लोकसंख्या वाढीचा दर हा २% एवढा असेल तर याचा अर्थ असा की, दरडोई उत्पन्न वाढीचा वेग हा (५-२)=३ एवढा राहील. मात्र जर एखाद्या वर्गामध्ये राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर १% एवढा व लोकसंख्येच्या वाढीचा दर २% एवढा असेल तर दरडोई उत्पन्नातील होणारी वाढ ही १% घटेल. भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या दरात जेव्हा जेव्हा घट घडून आली आहे. तेव्हा तेव्हा त्यासाठी वरील घटक कारणीभूत असलेले दिसून येतात. थोडक्यात याचा अर्थ असा की जर आपणाला देशातील सर्वसामान्य जनतेच्या, राहणीमानाचा दर्जा जर सातत्याने उंचावत न्यायचा असेल तर, त्यांच्या दरडोई उत्पन्नाची पातळी ही सातत्याने कशी वाढत जाईल यादृष्टिने प्रयत्न होणे गरजेचे आहे. मात्र याकरिता एक आवश्यक अटी अशी आहे की, देशातील राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर हा लोकसंख्यावाढीच्या दरापेक्षा जास्त असणे आवश्यक असते, मात्र अविकसीत अर्थव्यवस्थांच्या दृष्टिने या अटीची पूर्तता करणे अत्यंत कठीण असते. ही गोष्ट कशी साध्य करता येईल याचा विचार प्रा. हार्वे लायबेंन्स्टिन यांनी केला आहे. त्यांनी आपले याबाबतचे विश्लेषण अल्प उत्पन्न संतुलनाचा सापळा (Low Level Equilibrium Trap) द्वारे केलेले आहे.

### ३. अल्प उत्पन्न संतुलन सापळा :

प्रो. हार्वे लायबेन्स्टिन यांनी आपल्या सैध्दांतिक विश्लेषणाकरता अविकसीत देशांतील अलप उत्पन्न संतुलन सापळा संकल्पना पुढील आकृतीद्वारे स्पष्ट केले आहे.

आकृतीमध्ये अक्ष अक्ष (OX) = दरडोई उत्पन्न (उत्पादन लोकसंख्या)

अय अक्ष (OY) = लोकसंख्या वाढीचा दर व दरडोई उत्पन्न वाढीचा दर AL ≙ = लोकसंख्या वाढीचा दर

△ = उत्पन्न वाढीचा दर I

**आकृती ३**




आकृतीमध्ये 'S' या बिंदूपासून 'Y' या बिंदूपर्यंत राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दरापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर हा जास्त आहे. (११) हा कक खालच्या पातळीवर असलेला दिसतो. लोकसंख्या वाढीच्या दबावामुळे उत्पन्नाची पातळी ही सतत अल्प राहते. परिणामी राष्ट्रीय उत्पन्न व लोकसंख्या वाढीचा दर दर्शविणारे हे दोन्ही वक्र परस्परांना त्या बिंदूत छेदतात तो म्हणजे बिंदू 'S' या ठिकाणी अर्थव्यवस्थेचे संतुलन साधले जाते. मात्र या 'S' या बिंदुचा ठिकाणी असलेले उत्पन्न पातळी ही एवढी अल्प असते की ती जवळपास निर्वाह उत्पन्न पातळी एवढी असलेली दिसून येते. म्हणून प्रो. हार्वे लाक्नेन्स्टिन या ('S' बिंदूतील) संतुलनाचा ‘अल्प उत्पन्न संतुलन सापळा’ असे म्हणतात. यामध्ये देशाचे दरडोई उत्पन्न हे इतर कोणत्याही बिंदुवर कमी असले तरी ते

'S' या संतुलन बिंदुकडेच आकर्षित होते. कारण विकसनशील देशांमध्ये राष्ट्रीय उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर हा जास्त असतो. मात्र जर भविष्यात दरडोई उत्पन्नाचा चक्र '' बिंदुच्याही वर सरकला. तर तो लोकसंख्या वाढीच्या काला छेदून वरच्या दिशेला जाईल. परिणामी दरडोई उत्पन्नामध्ये लोकसंख्या वाढीपेक्षा सातत्याने वाढ होत जाते. मात्र पुन्हा M बिंदुला लोकसंख्या व दरडोई उत्पन्नवाढ यामध्ये संतुलन घडून येते. कारण हे दोन्ही करू 'M' बिंदुत परस्परांना छेदतात. याठिकाणी पुन्हा अल्प उत्पन्न संतुलनाचा सापळा तयार होतो व लोक्संख्या वाढ ही राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त राहून दरडोईल उत्पन्न सातत्याने घटत जाते.

प्रो. हार्वे लायबेन्स्टिन यांनी 'किमान निर्णायक प्रयत्न' करण्याचा उपाय सुचविला आहे. त्यांच्या मते, 'अविकसित देशानी' या सापळ्यातून बाहेर पडण्यासाठी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर अशी गुंतवणूक करावी ज्यायोगे दरडोई उत्पन्नाची पातळी ही अय पेक्षा जास्त राहील. कारण 'Y' या संतुलन बिंदुच्या पुढे दरडोई उत्पन्न पातळीचा कक हा लोकसंख्या वाढीच्या वक्राच्या वरच्या पातळीवर राहतो व ही स्थिती बराच काळ टिकून राहते. पण याच दम्यान लायबेन्स्टिन म्हणतात त्याप्रमाणे किमान अशी मोठी गुंतवणुक केली गेली तर ही स्थिती कायमस्वरूपी टिकून राहते व तो देश अल्प उत्पन्नाच्या संतुलन सापळ्यातुन कायमचा बाहेर पडू शकेल. मात्र ही किमान आवश्यक अशी मोठी गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक अशी भांडवलाची उपलब्धता अशा अविकसीत देशांकडे नसल्याने, त्यांना हे शक्य होणे अवघड वाटते. याशिवाय अशा देशांनी विविध मार्गानी लोकसंख्यावाढीचा दर कमी करणे व शिक्षणाचा प्रचार प्रसार करणे देखील गरजेचे आहे. लोकसंख्या वाढ जर रोखता आली नाही तरी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उत्पादन व उत्पादकतेत वाढ घडवून आणता येते. न्यून उत्पन्नामुळे जर भांडवलनिर्मितीचा वेग कमी असला तरी परकीय भांडवलांना आकर्षीत करुन गुंतवणुकीमध्ये वाढ घडवून आणे गरजेचे असते.

**हार्वे लायबेस्टिन यांच्या निर्णायक किमान आवश्यक प्रयत्न सिध्दांतांचे विश्लेषण :–**

हार्वे लावबेन्स्टिन यांच्या मते, फक्त लोकसंख्या नियंत्रण व भांडवल गुंतवणुक यामुळेच अल्प उत्पन्न सापळ्यातून बाहेर पडता येतो किंवा यामुळे हा सापळा निर्माण होतो असे नाही. तर याला कारणीभूत असणारे इतर अनेक घटक असू शकतात. त्यांचे हे विश्लेषण पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.

आकृतीमध्ये,

OX अक्ष = दरडोई उत्पन्न व उत्पन्न प्रेरीत वृध्दी

OY अक्ष = दरडोई उत्पन्न व उत्पन्न अवरोधक घट

PP, वक्र = उत्पन्न प्रेरीत वक्र

RR, वक्र = उत्पन्न अवरोधक वक्र

**आकृती ४**




प्रो. हार्वे लायबॅन्स्टिन यांच्या मते, अविकसित अर्थव्यवस्थेमध्ये दरडोई उत्पन्नाच्या वाढीवर परिणाम करणारे दोन परस्पर विरोधी घटक कार्यरत असतात. यापैकी जे घटक दरडोई उत्पन्न वाढीसाठी प्रेरक ठरतात. त्यांना ‘उत्पन्न प्रेरक वृध्दी घटक’ म्हणतात. याउलट ज्या घटकांमुळे दरडोई उत्पन्नात घट घडून येते त्यांना उत्पन्न अवरोधक घटक म्हणतात. यापैकी आकृतीमध्ये $P*P_{1}$ हा वक्र उत्पन्न, वृध्दीचे घटक दर्शवितो तर $R*R_{1}$ हा वक्र, उत्पन्न अवरोधक घटक दर्शवितो. हे दोन्ही वक्र S बिंदुत परस्परांना छेदतात. त्यामुळे $O*S_{1}$ ही अर्थव्यवस्थेची संतुलन पातळी निश्चित होते. $O*S_{1}$ ते $O*M_{1}$ पर्यंत उत्पन्न अवरोधक घटक हे उत्पन्न प्रेरीत घटकांपेक्षा अधिक प्रभावी असतात. परिणामी दरडोई उत्पन्न हे $O*M_{1}$ पासून खाली जाऊन ते पूर्वीच्याच $O*S_{1}$ पातळीवर संतुलन पावेल. थोडक्यात अल्पकाळ जरी दरडोई उत्पन्नात $O*S_{1}$ वरून $O*M_{1}$ ^ p वाढ झाली तरी उत्पन्न अवरोधक घटकांच्या प्रभावामुळे ते घटून पुन्हा $O*S_{1}$ एवढे होईल. लायबॅन्स्टिन यालाच ‘अल्प उत्पन्न संतुलन’ असे म्हणतात.

अविकसित देशांनी या अल्प उत्पन्न सापळ्यातुन बाहेर पडण्यासाठी प्रो. हार्वे लायबॅन्स्टिन हे 'किमान आवश्यक प्रयत्न' हा सिध्दांत उपाय म्हणून मांडला. त्यांच्या मते, अविकसित देशांनी या अल्प उत्पन्न सापळ्यातून बाहेर पडण्यासाठी एवढी किमान आवश्यक गुंतवणुक करणे गरजेचे आहे. ज्यायोगे दरडोई उत्पन्न पातळी ही OM पेक्षा जास्त राहील. कारण अविकसित देशांनी जर हे OM पातळी ओलांडली तर त्यापुढे उत्पन्न अवरोधक घटकांपेक्षा उत्पन्न प्रेरक घटक अधिक प्रभावी ठरतील. (R*R_{1}) ४५० रेषेपासूनचे अंतर हे P*P_{1} पेक्षा जास्त आहे ते त्यामुळेच.

**सिध्दांतांचे टीकात्मक परिक्षण :–**

१. **प्रो. मिलेवाल यांची टीका :–** प्रो. लायबॅन्स्टिन यांनी अविकसित देशांना त्यांच्या 'अल्प उत्पन्न संतुलन' सापळ्यातुन बाहेर पडण्यासाठी मोठी अशी किमान गुंतवणुक करण्याचे सुचविले आहे. मात्र प्रो. भिलेवाल यांच्या मते ही किमान मोठी गुंतवणूक अविकसित देशांच्या कुवतीच्या मानाने खूपच मोठी असल्याने त्यांना हे शक्य होणार नाही.

२. **हेगन यांची टीका :–** प्रो. हेगन यांनी याबाबत पश्चिम युरोपातील देशांचा अभ्यास केला व त्याद्वारे त्यांनी असा निष्कर्ष काढला की, या देशांमध्ये ज्या काळात लोकसंख्या वाढीचा दर हा जास्त होता. त्याच काळात दरडोई उत्पन्नाच्या दरात देखील वाढ घडून आली. म्हणजेच या देशांमध्ये दरडोई उत्पन्न वाढीमध्ये लोकसंख्येतील वाढ हा घटक अवरोधक न ठरता प्रेरक ठरलेला दिसून येतो.

### २.२.४ मिर्डल यांचा 'चक्रीय कार्य–कारण भाव' सिद्धांत (Prof. Gunnar Myrdal's Theory of Circular Cumulation Causation) :

**प्रस्तावना :–**

जागतिक स्तरावरील आर्थिक विषमता हा विषय जाणीवपूर्वक गुन्नार मिर्डाल यांनी प्रकर्षाने पुढे आणला. अर्थशास्त्राच्या इतिहासात जो नावलौकिक ॲडम स्मिथला 'वेल्थ ऑफ नेशन्स' या ग्रंथामुळे लाभता. कार्ल मार्क्सला जो गौरव 'दास कंपीटल' या ग्रंथामुळे मिळाला. लॉर्ड केन्सला जी जागतिक प्रसिध्द 'सरल थिअरी'ने मिळवून दिली. या सर्वाप्रमाणेच अर्थशास्त्रज्ञ म्हणून तितकेच गौरवशाली स्थान गुन्नार मिर्डलनी त्यांच्या **'एशियन ड्रामा'** या ग्रंथाने प्राप्त करुन दिले. मिर्डल यांची आपल्या आंतरराष्ट्रीय विषमतेच्या मिमांसेमध्ये विविध पटकांच्या चक्रीय कार्यकारण संबंधाची चर्चा केली आहे. ही विषमता त्याने या संबंधातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील प्रतिसारक व विस्तारक परिणामांद्वारे व वर्धमान प्रक्रियेद्वारे स्पष्ट केलेली आहे.

**स्थिर भांडवलाच्या कल्पनेचा त्याग :–**

'चक्रीय कार्यकारण भाव' या सिध्दांताची मांडणी करताना. प्रा. गुन्नार मिर्डालनी अर्थव्यवस्थेची स्थिर संतुलनाची प्रवृत्ती हे गृहीतक नाकारतले आहे. त्यांच्या मते, अर्थव्यवस्थेमध्ये असे स्थिर संतुलन असत नाही. तर विविध गतीमान घटकांच्या व सामाजिक प्रक्रियेच्या विश्लेषणासाठी हे जुने गृहीत तत्व अडसर ठरणारे आहे.

आत्ता पर्यंत पारंपारिक दृष्टिकोन हा सामाजिक प्रक्रियेचे विश्लेषण हे विशिष्ट दिशेने फिरत राहणारी प्रक्रिया आहे जिचे वर्णन विविध घटकांमधील स्थिर संतुलनाची अवस्था असे करता येईल. अर्थव्यवस्थेत एखादा बदल घडून आला तर त्याच्या विरुध्द प्रतिक्रिया देनारा असा काही बदल घडून येतो की, जो पहिल्या बदलाचा प्रभाव कमी किंवा नष्ट करतो आणि या दोन्ही बदलांच्या क्रिया-प्रतिक्रिया एकाच काळात पडून आल्याने संतुलन अवस्थेत कोणताही बदल होत नाही. थोडक्यात या क्रिया-प्रतिक्रियांद्वारे सामाजिक प्रक्रियेमध्ये एका विशिष्ट दिशेने जाण्याची प्रवृती राहते. स्थिर संतुलनामध्ये विपाड आणणारे घटक हे त्यांच्याच क्रिया-प्रतिक्रियांनी निष्क्रिय होत असतात.

प्रा. गुन्नार मिर्डालनी याच्या अगदी उलट मत व्यक्त केले आहे, जे म्हणतात की, सामाजिक आंतरक्रियेमध्ये असे 'स्य-स्थिरीकरण' असत नाही. परिणामी प्रत्यक्षात संतुलनाऐवजी असंतुलन अवस्थाच पाहायला मिळते. एवढेच नव्हे तर विशिष्ट क्रियेमुळे एखाद्या बदलाच्या प्रक्रियेच्या विरुध्द बाजूने कोणतीही प्रक्रिया न पडून येता तिला पोषक ठरणान्चा सम दिशेनेच इतर बदल पडू लागतात. परिणामी असे संतुलन दूर होण्याऐवजी तिच्यामध्ये बाढ होण्याचीच शक्यता जास्त असते. विषमतेच्या दृष्टिने पाहिले असता अनुकूल घटना पडत गेल्याने काही अर्थव्यवस्थांची प्रगती होत राहते. मात्र त्याऐवजी जर प्रतिकूल पटना पडत गेल्या तर त्या अर्थव्यवस्थेचा मागासलेपणा आणि विषमता यांमध्ये बाढ पडवून आणतात.

**दुष्टचक्रांचा प्रभाव :-**

जागतिक पातळीवर वाढत जाणाऱ्या दुष्ट चक्रांचा (Vicious Circles) प्रभाव या संकल्पनेचा आधार घेतला आहे. जेव्हा एखादा प्रतिकुल पटक (Negative Factor) हा दुसऱ्या तशाच एखादा प्रतिकुल घटकाचा कारण व परिणाम असतो. यातुनच दुष्टचक्राची निर्मिती होते, मात्र येथे एखादाच विशिष्ट पटक कारण आहे किंवा त्याचा परिणाम आहे हे नेमकेपणाने सांगता येत नाही. कारण ज्याला आपण एखादा घटकाचा कारण म्हणू तो कदाचित दुसऱ्या घटकांचा परिणाम देखील असू शकतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रो. नर्क्से यांनी दिलेले दारिद्र्याच्या दुष्टचक्रांचे विश्लेषण नर्क्से म्हणतात, ''एखादी व्यक्ती गरीब असल्याने तिचे उत्पन्न अल्प आणि राहणीमानाचा दर्जा निकृष्ट असतो. त्यामुळे त्याची शारीरिक व मानसिक क्षमता अलप राहते. त्यामुळे त्याच्याकडे कौशल्य आणि उत्पादकता दोन्ही अल्प राहतात. परिणामी तो आणखी गरीब होतो. हीच बाब एखाद्या देशालाही तंतोतंत लागू होते. एखादा देश गरीब आहे याचे कारण तो गरीब आहे.'' (A country is Poor because it is Poor).

थोडक्यात, दारिद्र्याच्या या दुष्टचक्रामध्ये अनेक घटकांचा चक्रीयकार्यकारण संबंध असतो. प्रत्येक येणारा पटक हा पुढच्या घटकाचे कारण ठरत असतो. शिवाय या सर्व घटकांचा एकमेकांवर होणारा परिणाम हा वर्धमान प्रक्रियेद्वारे होत असल्याने हे दुष्टचक्र आणधी तीव्र होते. या दुष्टचक्रामधील गहरीची न्युन उत्पन्न निकृष्ट राहणीमान - अल्प उत्पादकता-गरीची यांचे एकमेकांशी परस्परसंबंध तर असतातच पण यामुळे त्याचे दारिद्र्य आणखी वाढत जाते.

**चक्रिय कार्यकारण संबंध व वर्धमान प्रक्रिया :-**

मिर्डालने आपल्या संपूर्ण विश्लेषणामध्ये एक मुख्य गोष्ट गृहीत धरली ती म्हणजे 'अर्थव्यकोतील विविध कारक चले' ही परस्परांशी चत्रिय पध्दतीने जोडलेली असतात. शिवाय ही कारक चले परस्परांसाठी कारण व परिणाम ठरत असतात, अविकसित देशांचे दरडोई उत्पन्न हे फारच अल्प असते. त्यामुळे त्यांची उपभोग व बचत प्रवृत्ती अत्प असते, त्यामुळे त्यांची गुंतवणुकीची व उत्पादनाची क्षमतादेखील अल्पच राहले. म्हणून पुन्हा त्यांचे दरडोई उत्पन्न आणखी कमीच राहते. म्हणजेच वरील कारक चतांमधील परस्पर चक्रिय सहसंबंधामुळे आणि वर्धमान प्रक्रियेमुळे तो देश मागासलेलाव राहतो.

वरील बाब आणखी सविस्तरपणे स्पष्ट करण्याकरता प्रो. मिर्डाल अमेरिकेतील निग्रो समाजाचे उदाहरण अमेरिकेतील निधी समाजाचा प्रश्न : अमेरिकेतील निग्रो समाज हा इतर समाजाच्या तुलनेत संख्येनी जास्त असूनही आज वेगळा पड़तेला आहे. त्यांची सामाजिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. प्रो. मिलिच्या मते, त्यांच्या या परिस्थितीमागे दोन कारक मतांचा चक्रिय कार्यकारण संबंध दिसून येतो.

१. गौरवणीयांच्या मनात निग्रोबदल जो पूर्वग्रह आहे त्यातून टोकाचा वर्णभेद निर्माण होतो.

२. निग्रो समाजाचा अतिशय खालावलेला राहणीमानाचा दर्जा.

अमेरिकन समाजव्यवस्थेतच निप्रशेबद्दलच्या वर्णभेदामुळे त्यांना निकृष्ट राहणीमानाचा आणि सामाजिक दर्जा दिला जातो. त्यामुळे त्यांच्यामध्ये अल्प उत्पन्न, बेकारी, अकुशलता, निरक्षरता, व्यसनाधीनता, गुन्हेगारी वृत्ती इ. दोष निर्माण होतात. या देषांमुळे त्यांच्या विषयीचा पूर्वग्रह आणखी बळावत जातो. त्यामुळे त्यांचे प्रश्न आणखी गंभीर होतात. थोडक्यात त्यांच्यातील वर्णभेद आणि पुर्वग्रह या दोन्ही घटकांच्या परस्पर चक्रिय सहसंबंधाने ते परस्परांचे कारणही आहेत आणि परिणामही. त्यातुनच या निग्रोंची सामाजिक, आर्थिक परिस्थिती खालावलेली राहते. प्रत्यक्षात जरी आपण असे मानले की, हे दोन्ही घटक स्थिर राहतील व परिस्थिती तशीच राहील. मात्र यातील एखादा तरी घटक बदलतो आणि वर्धमान प्रक्रिया (Cumulative) सुरू होऊन ते दुश्चक्र अधिक्य तीव्र होत जाते. एवढेच नव्हे तर प्रो. मिर्डलनी हे दाखवून देतात की या दोन पठकांमध्ये देखील आपसात चक्रीय स्वरूपाचा कार्यकारण संबंध असतो. निप्रोचे राहणीमान निकृष्ट ठेवणारा (शिक्षण, आरोग्य, नोकरी, उत्पन्न इ.) एखादा जरी घटक बदलता तरी त्याचा निग्रोंच्या राहणीमानावर अनुकूल वा प्रतिकूल परिणाम घडून येतो. याउलट जर गौरवणीयांचा निप्रोविषयीचा दृष्टिकोन बदलता तरीदेखील त्याचाही त्यांच्या राहणीमानावर परिणाम होईल. थोडक्यात या दोन घटकांच्या अंतर्गत कारणांमध्ये जो बदल होईल त्यावर निग्रोची परिस्थिती काय असेल हे ठरेल. त्यामुळे या अंतर्गत घटकांचा सक्रिय सहसंबंध असल्याने ही सर्व प्रक्रिया त्यांच्यातील बदलांच्या अनुकुलतेवर वा प्रतिकुलतेवर ठरेल. शिवाय ती पुढे जाऊन वर्धमान स्वरूपाची असल्याने ती पूर्वीच्या निश्चित झालेल्या बढ़ताची दिशा आणि वेग घधीत करते. घटक जेव्हा परिणाम करतील त्यावेळच्या काळावर ते परिणाम अवलंबून राहतील. निग्रोसाठीच्या रोजगाराच्या संधीमध्ये जर वाद झाली तर वर्धमान प्रक्रिया वेगाने घडून येऊन त्याची परिस्थिती लवकरच सुधारू शकेल. मात्र शिक्षणाद्वारे

या परिस्थितीत बदल होण्यास वेळ लागेल. प्रो. मिर्दाल यांच्या या विश्लेषणावरुन पुढील निष्कर्ष काढता येतात.

१. सामाजिक प्रक्रियेमध्ये एखादा घटक मुलभूत म्हणून वेगळा काढणे व फक्त आर्थिक घटकांचाच शोध घेणे हे चुकीचे आहे. कारण ही प्रक्रिया चक्रिय कार्यकारण संबंध असलेल्या पठकांचा परिणाम असतो.

२. आर्थिकस्तर अशा महत्वपूर्ण घटकांचा विचार यापूर्वीच्या अर्थतज्ज्ञांनी केलेला नव्हता तो या सिध्दांतात केला.

३. प्रो. मिर्डलनी यांनी विश्लेषण केलेला चक्रिय कार्यकारण सहसंबंधाचे गृहीत मान्य केल्यास फक्त एका घटकामध्ये योग्य दिशेने बदल करून वर्धमान प्रक्रिया सकारात्मक दिशेने वळिवता येईल. मात्र यासाठी जोकालावधी लागणार आहे त्याचा देखील विचार कराक्ता हवा. या सर्वांच्याद्वारे दुष्टचक्रांचे रूपांतर मुष्ट चक्रांमध्ये करून अल्पविकसित देशाचा आर्थिक विकास जलद गतीने होऊ शकेल.

**आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेची मीमांसा :-**

चक्रिय कार्यकारण संबंध आणि वर्धमान प्रक्रिया या दोन संकल्पनांच्या साहाय्याने प्रो. मिर्दालनी आंतरराष्ट्रीय प्रादेशिक विषमतेचे विश्लेषण केले. त्यांच्या मते, ''विविध घटकांच्या क्रिया-प्रतिक्रियांच्या सहसंबंधामुळे व त्यांचा क्रिया-प्रतिक्रियांमुळे प्रादेशिक विषमता निर्माण होते. देशाच्या काही भौगोलिक भाग असा असतो की, जेथे विकासाची प्रक्रिया योगायोगानेच सुरू झालेली असते व त्यामुळे हा भागाचा आर्थिक विकास होत जातो. मात्र इतर भूभागामध्ये देखील विकासाची तितकीच क्षमता आणि कुक्त असतानाही भांडवल, कच्चा माल, यंत्रसामग्री, मजूर इ. उत्पादनाचे घटक विकसीत झालेल्याच क्षेत्राकडेच आकर्षीत होतात, त्यामुळे विकसित भागाचाच आर्थिक विकास होत राहतो व मागासलेला भाग मागासलेलाच राहतो. महत्त्वाची बाब म्हणजे विकसित देशामधील अशी प्रादेशिक विषमता कमी असून ती अधिकच कमी-कमी होण्याची प्रवृत्ती असते. याउलट जर विकसनशील देशांमधीत प्रादेशिक विषमता जास्त असून ती दिवसेंदिवस वाढत जात राहते.''

काही देशांमधील विकासाचे परिणाम दोन प्रकारचे असल्याचे प्रो. मिर्डलनी यांनी संगितले आहेत-

१) प्रतिसारक परिणाम (Backward Effects)

२) विस्तारक परिणाम (Spread Effects)

हे दोन्ही परिणाम ज्या घटकांमुळे होतात ते घटक जहरी विविध प्रकारचे असले तरी विकसनशील देशांसाठी ते सर्वसामान्यपणे पाहिले असता प्रतिसारक परिणाम जास्त क्रियाशील आणि विस्तारक परिणाम हे अक्रियाशील असतात. त्यामुळे या देशांच्या आर्थिक विकासाची स्थिती कठीण असते.

**१) प्रतिसारक परिणाम** (Backward Effects) **:**

हे परिणाम असे असतात की, त्यामध्ये एका क्षेत्रात प्रगती होत असताना त्याचा दुसऱ्या क्षेत्रावर प्रतिकुल परिणाम घडून येतो. हा परिणाम पुढील तीन घटकांद्वारे पडून येतो.

**अ) श्रमिकांचे स्थानांतरण :–** ज्या भागांच्या विकासाची प्रक्रिया सुरु असते त्या भागाकडे कुशल श्रमिक आकीत होतात व त्या भागाची अधिक प्रगती होते. परिणामी पुन्हा आणखी नवी श्रमशक्ती त्या भागाकडे आकर्षिली जाते. हे श्रमिक मागासलेल्य भागातून आलेले असतात. त्यामुळे त्या भागात श्रमिकांचा तुटवडा निर्माण होतो. तेथील विकासप्रक्रिया मात्र कुंठीत राहते. परिणामी पुन्हा त्या मागास भागातील श्रमाचे स्थानांतरण बाढू लागते.

**ब) भांडवल :–** ज्या भागाची आर्थिक प्रगती झालेली असते तेथे उत्पादन घटक, कासामग्री इ. चा पुरवठा मागणीनुसार होऊ लागतो. त्यामुळे नवनवीन भांडवल आकर्षीत होत जाते. या भांडवल गुंतवणुकीतून उत्पादन वाढ होते. त्याहूनउत्पन्नाची पातळी वाढत जाते. त्यातून उपभोगाच्या व बचतीच्या प्रेरणा मिळत जातात. त्यातून पुन्हा मागणी व गुंतवणूकीत वाढ होते. हा सर्व गुंतवणुकीचा ओप मागास भागाकडून येत असतो. परिणामी तेथे भांडवलाचा तुटवडा निर्माण होतो. परिणामी त्या भागाच्या मागासलेपणाचे भांडवलाची दुर्मीळता हे कारण आणि परिणाम असतो.

**क) व्यापार : –** प्रत्येक देशांचे भौगोलिक प्रदेश आणि विविध देश देखील व्यापारी संबंधांनी परस्परांशी जोडलेले असतात. वर्धमान प्रक्रियेच्या कार्यवाहीमुळे विकसीत भागाचा व्यापार उलरोलर वृध्दींगत होत जातो. तर मागास व अप्रगत भागाचा व्यापार मात्र अविकसीतच राहतो. विकसीत भागातून स्वस्त अशा वस्तू व सेवांचा पुरवठा मागास भागाकडे होत राहतो. परिणामी मागास भागाचा फारसा औद्योगिक व व्यापारी विकास होत नाही. याउलट प्रगत क्षेत्रातील वस्तू व सेवांची मागणी सातत्याने वाढत जात असल्याने त्यांच्या उत्पादकतेत, व्यवसायात वाढ होत जाईल. प्रो. मिर्धातनी असेही सांगितले की, आजवरचा ऐतिहासिक अनुभव असे सांगतो की, व्यापाराच्या अटी आणि शर्ती देखील विकसित क्षेत्राला अनुकूल असेच असतात.

वरील तीन आर्थिक घटकांसोबतच इतरही काही आर्थिकतर घटकांच्या परिणामामुळे प्रतिसारक परिणाम अधिक प्रभावी होतात. हे प्रतिसारक परिणाम विविध पटकांच्या चक्रिय कार्यकारण संबंधातून अधिक वेगाने वर्धमान होतात. त्यामुळे मागास भागाचा लक्कर विकास होत नाही.

**२) विस्तारक परिणाम** (Spread Effects) **:**

विकास प्रक्रियेतून केवळ प्रतिसारक परिणामच पडून येतात असे नसून त्याच्या परिणामातून अनेक विस्तारक परिणामही धडून येतात असे नसून त्याच्या परिणामातून अनेक विस्तारक परिणामही पडून येतात. हा चांगल्या परिणामांनीच प्रो. मिर्डल 'विस्तारक परिणाम' असे म्हणतात. त्यांच्या मते एखादे क्षेत्र तेव्हा विकसित होत असते. तेव्हा खऱ्या या विकासाचा परिणाम त्याचा सभोवतालच्या क्षेत्रांचा अनुकूलरित्या होण्यास सुरवात होते. उदाहरणार्थ विकसित भागातील उत्पादन कार्यासाठी कच्चा माल, कुशल श्रम, बाजारपेठा, वित्तपुरवठा,

वाहतुक इ. सेवांचा पुरवठा व निर्मिती करण्याची संधी आजुबाजुच्या क्षेत्रांना मिळू लागते. त्यांचा परस्परांशी असणारा सहसंबंधाचा परिणाम वर्धमान प्रक्रियेने हे विस्तारक परिणाम बाढवीत नेते व त्या जवळपासच्या प्रदेशांचा देखील विकास होतो.

विस्तारक आणि अतिसारक परिणाम हे परस्परांच्या अगदी विरुध्द असल्याने ते नेहमी संतुलनामध्ये राहतीलच असे नाही. तरीही मुख्यत्वे विकसनशील देशांबाबतीत प्रतिसारक परिणाम अधिक प्रभावशाली असतात.

वरील विवेचनाचा संदर्भ घेऊन युनोने युरोपसाठी नेमलेल्या अभ्यास गटाने जे निष्कर्ष काढले ते खूपच वास्तवदर्शी असे आहेत.

१. पश्चिम युरोपमधील गरीब देशांमध्ये प्रादेशिक विषमता जास्त असून श्रीमंत देशांमध्ये ती कमी प्रमाणांत दिसून येते.

२. विकसित देशांमधील प्रादेशिक विषमता ही सातत्याने कमी होत असून अविकसित देशांमध्ये ती वाढत आहे.

थोडक्यात, आपल्या विश्लेषणांद्वारे प्रो. मिर्दालनी हे दाखवून दिले की, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेची गती आणि प्रगती ही विस्तारक आणि प्रतिसारक परिणामांवर अवलंबून असते. विकसित देशांमध्ये विकास प्रक्रियेतील विस्तारक परिणाम हे अधिक प्रबळ असतात. त्यामुळे त्यांचा आर्थिक विकास सातत्यपूर्णरित्या व जलदगतीने होतो. मात्र त्या तुलनेत अविकसित देशांच्या विकास प्रक्रियेमध्ये प्रतिसारक परिणाम अधिक क्रियाशिल असतात. परिणामी त्यांच्या आर्थिक विकासाचा वेग व गती मंद राहते. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भयावह विषमता दिसून येते. यातुन आपण अखिल मानवजातीचे कल्याण करण्यामध्ये कितपत यशस्वी झाली. हा मोठा गंभीर प्रश्न आहे. आज जगाचं चित्र असं दिसून येत आहे की, एका बाजूला अतिश्रीमंत असे मुठभर देश तर दुसरीकडे मोठ्या संख्येने असलेले अविकसित देश मिर्डालने जे आंतरराष्ट्रीय प्रादेशिक विषमतेचे ते विश्लेषण दिलेले आहे. त्या आधारे यातील तीन मुख्य बाबी प्रकर्षान पुढे येतात,

१. जगात थोडेच देश प्रगत असून बहुसंख्य देश अप्रगत आहे.

२. फार मोठे असलेले विकसित देश विकासाच्या मार्गावर वेगाने मार्गक्रमण करत आहेत. तर बहुसंख्येने असलले अप्रगत देश विकासाच्या कुंठीत अवस्थेतच अडकून पडलेले आहेत.

३. वरील दोन्ही कारणांनी जगातील विषमता सातत्याने वाढत आहे.

**सिध्दांताचे मूल्यमापन :–**

प्रो. मिर्डालनी 'आर्थिक विकास आणि विषमतेचे' जे विश्लेषण 'एशियन ड्रामा' या ग्रंथात केले. त्याचे शिर्षक अतिशय समर्पक आणि त्यातील अभ्यासविषयक कालसुसंगत असा महत्त्वपूर्ण ठरतो. कारण १८ व्या शतकात तत्कालीन परिस्थितीच्या परिपेक्षामध्ये 'ॲडम स्मिथनी' आपल्या 'राष्ट्रीय संपत्ती' (Wealth of

Nations) या ग्रंथामध्ये राष्ट्राची संपत्ती कशी निर्माण होते यावर प्रकाश टाकला होता. कालौघात संपत्तीनिर्मितीच्या हव्यासापोटी होणाऱ्या भांडवशाहीमुलक शोषणाचा प्रश्न १९ व्या शतकात गंभीर होत गेला. त्याचे कालसापेक्ष विश्लेषण मार्क्सनी आपल्या 'दास कॅपीटल'मध्ये केले. पुढे महायुद्धांच्या पार्श्वभूमीवर मंदीच्या खाईत लोटलेल्या जगाला सावरण्यासाठीचे उपाय सांगणारा ग्रंथ २० व्या शतकाच्या प्रारंभी केन्सने आपल्या 'जनरल विअरी' या ग्रंथातून केला, पण जगाच्या विकासाच्या या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर विषमतेची झालेली वाढ अगदी गंभीरपणे मांडण्याचे महत्वपूर्ण काम प्रो. गुन्नार मिर्डाल यांच्या 'एशिन ड्रामा' या ग्रंथाने केले. आता आपणांस बदलत्या परिस्थितीत 'संपत्तीच्या निर्मितीची' चर्चा करुन चालणार नाही. तर दारिद्र्य आणि विषमता याकडे गांभीर्याने पहावे लागेल. म्हणूनच मिलिच्या ग्रंथाचे विस्तृत शिर्षक 'An Enquiry into the Poverty of Nations' असे देण्यात आले.

सनातनवादी आर्थिक विचारवंतांनी आपल्या विश्लेषणामध्ये आर्थिक विकासामध्ये 'आंतरराष्ट्रीय व्यापार' या घटकाला महत्वाचे स्थान दिले. 'आर्थिक विकासाचे इंजिन' असे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा उल्लेख सनातनवादीविचारवंत करतात मात्र प्रत्यक्षात विकसनशील देशाच्या बाबतीत हे खरे ठरताना दिसत नाही. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाढीबरोबर अविकसीत अर्थव्यवस्थांमधील द्विदलतावाद वाढून त्यांच्यासाठी व्यापारशर्ती या अधिक प्रतिकूल ठरू लागल्या. कारण अप्रगत देश मुख्यत्वे प्राथमिक व कृषि मालाचे निर्यात करणार व प्रगत देश यंखे, तंत्रज्ञान इ. ची निर्यात करतात. परिणामी याचे सर्व फायदे विकसित देशांनाच जास्तीत जास्त मिळतात. म्हणूनच प्रा. मिंटनी दिलेल्या विस्तारक आणि प्रतिसारक परिणामांचा या अनुषंगाने जे मिर्दालनी विस्तार केला. प्रो. हेरॉड आपल्या विकास प्रतिभानामध्ये संतुलनापासून दूर जाणाऱ्या प्रवृत्ती आणि वर्धमान प्रक्रियेचे विश्लेषण केलेले आहे. मिॉलनी याच संकल्पनेचे सामाजिक व आर्थिक पैलू विचारात घेऊन वास्तवस्पर्शी असे विश्लेषण पुढे आणते.

## २.३ सारांश :

गरिबी हेच गरिबीचे मुख्य कारण आणि परिणामदेखील आहे. ही वस्तुस्थिती प्रो. गुन्नार मिर्डालनी आपल्या विश्लेषणाद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटकांचा संदर्भा देत स्पष्ट केली आहे. मिर्डालनी मांडलेले अप्रगत देशातील विस्तारक परिणामाची प्रभावहीनता आणि प्रतिसारक पणिामांचा प्रभावीपणा हे विश्लेषण अत्यंत वास्तवदर्शी असे आहे. आणि यातुनच आंतरराष्ट्रीय विषमता मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे. या सर्व प्रश्नाला भिडून त्याचे गांभीर्य जगासमोर आणण्याचे काम मिलिनी केले. प्रस्थापीत विचारधारेपेक्षा वेगळा असलेला हा विचार त्यामुळेच फार मौलीक ठरणारा असा आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ :

१. **विस्तारक परिणाम :** चांगले परिणाम करणारे घटक

२. **दरडोई उत्पन्न :** कुटुंबाचे एकूण उत्पन्न

३. **दारिद्र्याचे दुष्टचक्र :** कायम स्वरूपी गरीबीत असणे

४. **अरोधक पटक :** विकासाला विरोध करणारे.

५. **प्रतिसारक परिणाम :** चांगल्या घटकांचे परिणाम कमी करणारे घटक.

६. **कुंठीत अवस्था :** गती न पकड़ता येणारी स्थिर स्थिती.

७. **वर्धमान प्रक्रिया :** एखादा गतीक्षम जियाला अधिक वेगाने चालना देणारी प्रक्रिया.

८. **एक मोठा आर्थिक धक्का :** जास्त गुंतवणूक करणे

**२.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून पुढील रिकाम्या जागा भरा.**

१. आर्थिक विकाससंबंधीचा किमान आवश्यक प्रयत्न सिध्दांत ................. यांनी मांडला.

अ) गुन्नार मिर्डाल ब) पॉल सॅम्युअल्सन

क) प्रो. हार्वेलायबेन्स्टिन ड) ए. सी. पीगू

२. गुन्नार मिर्डाल यांनी ................. ग्रंथ लिहिला आहे.

अ) 'एशियन ड्रामा' ब) 'राष्ट्रीय संपत्ती'

क) 'बाजाराची पूरकता' ड) 'दारिद्र्य'

३. ................. अर्थव्यवस्थेची स्थिर संतुलनाची प्रवृत्ती हे गृहीतक नाकारतले आहे.

अ) प्रा. गुन्नार मिर्डलनी ब) लायबेन्स्टिन

क) पॉल सॅम्युअल्सन ड) ए.सी.पीगू

४. ................. यांनी पारंपरिक अर्थशास्त्रातील 'संतुलन' या संकल्पनेला नाकारले.

अ) ॲडम स्मिथ ब) प्रा. गुन्नार मिर्डलनी

क) प्रो.हेरॉड ड) हार्वे लायबेन्स्टिन

५. असंतुलित विकास सिध्दांत ................. यांनी मांडला.

अ) हर्षमन ब) लायबेन्स्टिन

क) प्रा. मिलि ड) गुन्नार मिर्डालनी

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१. क), २. अ), ३) ४) ५) अ

**२.६ सरावासाठी प्रश्न :**

**अ) टीपा द्या.**

१. प्रबळ धक्का　　　　२. संतुलित विकास

३. असंतुलित विकास　　४. किमान प्रयत्न

५. प्रतिसारक परिणाम　　६. विस्तारक परिणाम

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१. रोडान यांच्या सिद्धांतावरील टीका स्पष्ट करा.

२. प्रबळ धक्का म्हणजे काय?

३. चक्रीय कार्यकारणभाव म्हणजे काय?

**क) सविस्तर उत्तरे द्या.**

१. लायबेन्स्टिन यांचा विकासाचा सिद्धांत स्पष्ट करा.

२. मिर्डाल यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत स्पष्ट करा.

३. संतुलित व असंतुलित विकासाचा सिद्धांत स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी :


१. Hans W/Singer : 'Dualism Revisited' A New approach in Journal of Development Studies Jan. 1970, 60-62

२. Higgins B (1959) : Economic Development : W.W. Norton, New York.

३. Todaro M. P. (1996) : Economic Development, Sixth Edition Economic Development, Longman, London.

४. Misra S. K. & Puri V. K. (2017) : Economics of Development & Planning, Himalaya Publication House, Mumbai.

५. जे. एफ. पाटील (२०००) : वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. कुरूळकर (२००४ ) : विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत, विद्याप्रकाशन, नागपूर.


❑❑❑